माध्यमिक पाठ्यक्रम

# २२३ - भारतीय संस्कृती आणि वारसा

*पाठ्यक्रम समन्वयक*

आर. एन.मिना

राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान

ए-२४-२५. इंस्टीटयूशनल एरिया, सेक्टर-६२, नोएडा-२०१ ३०९ (उ.प्र.)

Website: www.nios.ac.in, Toll Free No. 18001809393

एनआईओएस वाटरमार्क 80 जीएसएम पेपर पर मुद्रित।

© राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान

मुद्रण : दिसंबर, 2013 (2,000 प्रतियाँ)

सचिव, राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान, ए–24–25, इंस्टीट्यूशनल एरिया, सेक्टर–62, नोएडा–201309 द्वारा प्रकाशित एवं मैसर्स अरावली प्रिन्टर्स एण्ड पब्लिशर्स, (प्रा.) लि., डब्ल्यू–30, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेस–II, नई दिल्ली–110020 द्वारा मुद्रित

## राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था सल्लागार समिती

**डॉ. सितांशु एस्. जेना**
अध्यक्ष
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण सस्थान, नोईडा

**डॉ. कुलदिप अगरवाल**
संचालक (शैक्षणिक)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा

**श्रीमती गोपा विश्वास**
सहसंचालक (शैक्षणिक)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा

## पाठयक्रम समिती

**डॉ. शामसिंग शशी**
मुध्य संचालक
प्रसिद्धी विभाग एम. आय. बी.
भारत सरकार

**प्रा. आर. पी. शर्मा**
अधिष्ठाता
शिक्षण विभाग
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**प्रा. भिक्षु सत्यपाल**
भौद्ध धर्म अभ्यस विभाग
फदिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**श्री. आय. एस. अस्थाना**
माजी प्राचार्य
भारतीय डिग्री कॉलेज
फरूखाबाद, उत्तरप्रदेश

**प्रा. एम. के. दास**
अधिष्ठाता, शिक्षण विभाग
एम. जी. काशी विद्यापीठ,
वाराणशी, उत्तरप्रदेश

**डॉ. हुमा मसूद**
कार्यक्रम अधिकारी
(शिक्षण) युनेस्को

**डॉ. प्रत्युप के. मंडल**
अधिव्याख्याता (इतिहास)
डी. इ. एस.एस. एच.
एन. सी.इ. आर.टी. नवी दिल्ली

**डॉ. इंदू विरेंद्र**
अधिव्याख्याता
जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठ
नवी दिल्ली

**श्रीमती अनिता देवराज**
प्राचार्य
डी. ए. व्ही. पब्लिक स्कुल
बहादरगड हरयाना

**डॉ. एस. एस. हसन**
संस्कृती प्रतिष्ठान
नवी दिल्ली

**डॉ. रमेश चंद**
माजी प्रपाठक (अर्थशास्त्र)
डी.इ.एस.एस. एच.
एन.सी.इ.आर.टी., सीइओ एनआयओ एस
नवी दिल्ली

**श्री. राम नारायण मीना**
शैक्षणिक अधिकारी (संस्कृत)
आणि अभ्यासक्रम समन्वयक
(भारतीय संस्कृती आणि वारसा)
शैक्षणिक विभाग (एनआयओ एस)

**डॉ. सी. एम. खन्ना**
अध्यक्ष
एमडीपीपी ॲण्ड एसके, नवी दिल्ली

## पाठ्यलेखन समिती


**डॉ. आय. एस. अस्थाना**
माजी प्राचार्य
भारतीय डिग्री कॉलेज
फरूखाबाद उत्तरप्रदेश

**श्रीमती अनिता देवराज**
प्राचार्य
डी.ए.व्ही. पब्लिक स्कल
भहादरगड हरियाना

**डॉ. रमेश चंद्र**
माजी प्रपाठक (अर्थशास्त्रा)
डी.इ.एस.एस.एच.
एन.सी.इ.आर.टी.,
सीइओ एनआयओ एस. नवी दिल्ली

**श्री. हितेंद्र श्रीवास्तव**
प्राचार्य
स्पेस इंडिया स्कल कांझावाला
नवी दिल्ली

**श्री. सी. एम. खन्ना**
अध्यक्ष
एमडीपीपी ॲण्डी एसके, नवी दिल्ली

**डॉ. इंदू विरेंद्र**
अधिव्याख्याता
जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठ
नवी दिल्ली

**प्रत्युष के. मंडल**
अधिव्याख्याता (इतिहास)
डी.इ.एस.एस.एच.
एन.सी.इ.आर.टी.नवी दिल्ली

**डॉ. सर्वदमन मिश्रा**
व्याख्याता (इतिहास)
शासकिय महाविद्यालय
अजमेर, राजस्थान

**श्री. राम नारायण मीना**
शैक्षणिक अधिकारी (संस्कृत)
शैक्षणिक विभाग (एनआयओ एस.)


## संपादक समिती


**डॉ. आय. एस. अस्थाना**
माजी प्राचार्य
भारतीय डिग्री कॉलेज
फरूकाबाद उत्तरप्रदेश

**श्रीमती अनिता देवराज**
प्राचार्य
डी.ए.व्ही.पब्लिक स्कल

**डॉ. रमेश चंद्र**
माजी प्रपाठक (अर्थशास्त्रा)
डी.इ.एस.एस. एच.

**श्री. राम नारायण मीना**
शैक्षणिक अधिकारी (संस्कृत)
शैक्षणिक विभाग
(एनआयओ एस.)


## पाठ्यक्रम समन्वयक


**श्री. राम नारायण मीना**
शैक्षणिक अधिकारी (संस्कृत) शैक्षणिक विभाग (एनआयओ एस)


## मराठी अनुवाद


**डॉ. अमोल शंकरराव विद्यासागर**
सहाय्यक प्राध्यापक
आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

**डॉ. बाळासाहेब केंजळे**
सहयोगी प्राध्यापक
अमृतेश्वर महाविद्यालय मु. पो. विंजर ता. वेल्हे, जि. पुणे


## रेखाचित्र, मुखपृष्ठ आणि लेसर मुद्रण


**डॉ. महेश शर्मा**
रेखाचित्रकार एन.आय.ओ.एस. नोएडा, नवी दिल्ली

ग्राफिक ॲण्ड डाटा सिस्टीम

# अध्यक्षांचा संदेश

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

आपणास माहित असेलच की समाजाच्या तसेच समाजातील काही विशिष्ठ घटकांच्या गरजा ह्या कालपरत्वे बदलत असतात. आणि ह्या सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यासाठी योजावयाच्या पद्धती व तंत्रे ही काळानुरूप बदलने गरजेचे असते. शिक्षण हे तर बदलाचे प्रमुख साधन. योग्य वेळी शिक्षणात घडवून आणलेला योग्य बदल हा समाजामध्ये सकारात्मकता आणतो. हा दृष्टिकोन येणाऱ्या आव्हानांना तसेच कठीण परिस्थितीला तोंड देण्याचे धाडस देतो. हे सर्व परिणामकारकपणे ठराविक अंतराने अभ्यासक्रम बदलून साध्य केले जाऊ शकते. स्थिर अभ्यासक्रम हा फक्त शिक्षणाचे एक मानवी साधन म्हणूनच कार्य करतो. समजा जर आपण एका भांड्यामध्ये पाणी भरले व ते भांडे पाणी न बदलता तसेच दीर्घ काळ ठेवले तर काही काळाने ते पाणी पिण्यास अयोग्य बनते. एवढेच नव्हे तर त्या पाण्याचा दुर्गंध सगळीकडे पसरायला लागतो आणि म्हणूनच अभ्यासक्रम बदकलणे ही या पाण्याप्रमाणे काळानुरूप गरजेचे असते.

पाठयपुस्तकातील घटक तयार करणे हा नवीन अभ्यासक्रमाचा सर्वात प्रमुख व महत्वाचा घटक असतो की ज्या द्वारे त्या विषयाची ध्येये व उद्दिष्टे साध्य केली जावू शकतात. तसेच याद्वारे आपणास जुन्या व पारंपारिक पद्धती (की ज्या आता कालबाह्य झालेल्या आहेत) बदलून नवनवीन तंत्रे शिकता येतात.

आणि हाच हेतु मनात धरून देशभरातील सर्व शिक्षणतज्ञ हे ठरावीक कालाने एकत्र येत असतात व अपेक्षित व गरजेचे असनारे बदल सुचवत असतात. याचाच परिपाक म्हणुन राष्ट्रीय अभ्यासक्रम आकृतीबंध (National Curriculam Frame-work (NCF)) अस्तीत्वात आला. या राष्ट्रीय अभ्यासक्रमामध्ये शिक्षणाच्या वेगवेगळया पातळयावर म्हणजेच प्राथमिक, पूर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर अपेक्षित असणारे बदल सुचविलेले आहेत.

हाच आकृतीबंध मनात धरून तसेच देशाच्या व समाजाच्या गरजा लक्षात घेवून आम्ही माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम अद्ययावत केला आहे. तो गरजांना व काळाला अनुसरून आहे.

हा अभ्यासक्रम तयार करताना तो अतिशय रंजक व आकर्षक असावा, हि काळजी घेण्यात आली आहे .

**डॉ. एस.एस.जेना**
अध्यक्ष (एनआयओएस)

# संचालकांचा अभिप्राय

**प्रिय विद्यार्थ्यांनों,**

तुमच्या आवश्यकतेनुसार व गरजेप्रमाणे नवीन अभ्यासक्रम तयार करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय मुक्त विद्यालयाच्या शिक्षण विभागाने केला आहे. माध्यमिक स्तरावरील सर्व विषयांचा अभ्यासक्रम बदलण्याची जबाबदारी आम्ही नुकतीच घेतली आहे. देशातील इतर मंडळाच्या पाठ्यक्रमाशी समानता आणण्यासाठी आम्ही केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (Central Board of Secondary Education ) तसेच माध्यमिक शिक्षण मंडळ महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गोवा, जम्मू आणि काश्मिर, पं. बंगाल इ. मंडळाशी चर्चा विनिमय केला. राष्ट्रीय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण व सल्लागार मंडळाने तयार केलेला अभ्यासक्रम प्रमाणयुक्त मानूनच राष्ट्रीय पाठ्यक्रम तयार करण्यात आला. या सर्व गोष्टींचा सर्वकष व तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर असे जाणवले की आपला अभ्यासक्रम हा अधिक कार्यात्मक् जीवनाशी निगडीत असणारा व सोपा होता. हा अभ्यासक्रम जास्तीत जास्त परिणामकारक व उपयोगी कसा बनवता येइल हा गहन प्रश्न होता. त्यासाठी आम्ही देशभरातील शिक्षणतज्ञ आमंत्रित करून त्याच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम सुधारीत व अद्यायावत करून घेतला.

तुम्हाला दिल्या जाणाऱ्या अध्ययन साहित्याचाही आम्ही विचार केला आहे. जुनी, कालबाह्य माहिती काढून त्याऐवजी नवीन अद्ययावत माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ही माहिती आकर्षक व आवाहनात्मक देण्याचाही पयत्न केला आहे.

मला अशी आशा वाटते की तुम्हाला हा अभ्यासक्रम रंजक व उत्साहवर्धक वाटेल. पुढील प्रगतीसाठी तुमच्या सर्व योग्य सूचनांचे स्वागत करू.

आपना सर्वांना माझ्याकडून आनंदी व यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा.

# दोन शब्द

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

भारतीय संस्कृती आणि वारसा हा अतिशय माहितीपर्ण आणि मनोरंजक अभ्यासविषय आपण निवडलात, त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन!

जगातील सर्वात प्राचीन संस्कृती आपल्या देशातच उगम पावली असल्याने, आपल्या देशाला इतिहासाचा सर्वात प्राचीन आणि समृद्ध वारसा लाभला आहे. या अभ्यासविषयात तुम्ही आपल्या वैभवाली देशाच्या याच समृद्ध वारशाचा आणि संस्कृतीचा अभ्यास करणार आहात. आणि मला खात्री आहे की या अतिप्राचीन आणि समृद्ध वारशाचे आपण वारसदार असल्याचा अभिमान आपल्याला निश्चितपणे वाटू लागेल. आपल्या पूर्वजांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रात केलेल्या सर्वांगीण प्रगतीची आपण कल्पानाही करू शकत नाही. आपल्या पूर्वजांनी ही प्रगती वाङ्मय, कला, शिल्पकला, सगीत, नृत्य, नाटय, विज्ञान, शिक्षण, तत्त्वज्ञान धर्म आणि अध्यात्म या जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या क्षेत्रात केली होती. आपली संस्कृती आणि वारसा आदर्श असल्याने इतर देशांनीही त्याचे अनुकरण केले आहे. या संबंधीची सर्व माहिती आपण या पाठयक्रमात अभ्यासणार आहोत. ही माहिती अभ्यासताना आपल्याला आनंद तर होईलच एवढेच नव्हे तर आपल्या देशाविषयी आपला ऊर अभिमानाने भरून येईल.

आपली संस्कृती आणि वारसा यासंबंधी सर्वच गोष्टी या छोटया अभ्यासक्रमात सांगता येणार नाहीत. परंतु यातील माहिती आपणास या विषयातील अनेक पुस्तके वाचण्यास उद्युक्त करेल,यात शंका नाही. याच विषयावर आंतरजालावर (इंटरनेटवर) माहितीचा खजिना उपलब्ध आहे. शक्य असल्यास हा खजिना हस्तगत करण्याचा प्रयत्न करा. आपल्यातील काही भाग्यवंतांना अभ्यासक्रमात वर्णिलेल्या स्थळांपर्यंत जाण्याची संधी उपलब्ध होईल. अशांनी प्रत्यक्ष स्थळे पाहन अस्सल माहिती मिळवावी. माहिती मिळविण्याचा दुसरा मार्ग म्हणजे पुराणवस्तु संग्रहालये होत. या संग्रहालयात उत्खननात सापडलेले अवशेष आणि तत्सम गोष्टी अतिशय काळजीपूर्वक जपून ठेवलेल्या असतात.

अभ्यासक्रमातील माहिती आपणास मित्राप्रमाणे उपयोगी पडेल. गुरूप्रमाणे ज्ञान देईल आणि वाटाडयाप्रमाणे मार्गदर्शनसुद्धा करेल. आणि आपली आंतरिक ज्ञानलालसा जागृत करेल. असे घडल्यास सर्वात जास्त आनंद 'राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान' मधील सर्वच लोकांना होईल. कारण या समृद्ध वारशाची ओळख आपणास करून देण्यात आम्ही यशस्वी झाले आहोत हेच यावरून सिद्ध होईल. या समृद्धीचे वारसदार आपण सगळेच आहोत याबद्दल आपणास खरोखरच धन्यता वाटेल.

पुस्तकासंबंधी सर्वच सूचना काळजीपर्वक विचारात घेण्यात येतील.

मी आपणास अभ्यासात आणि जीवनाच्या वाटचालीत भरघोस यश मिळो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

आनंदी शिक्षण.

तुमच्या यशासाठी शुभेच्छा!

**राम नारायण मीना**
**शैक्षणिक अधिकारी (संस्कृत)**

# अध्ययन साहित्याचा उपयोग कसा कराल?

### अभिनंदन! स्वयं अध्ययनाचे आव्हान स्विकारल्याबद्दल

राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था प्रत्येक टप्प्यावर तुमच्या बरोबर नक्कीच आहे. त्या दृष्टीने तुम्हाला केंद्रस्थानी ठेऊन तज्ज्ञांच्या गटाने अर्थशास्त्राचे अध्ययन साहित्य विकसित केले आहे. स्वअध्ययनाच्या आकृतीबंधाचा पाठपुरावा अध्ययन साहित्यात केला आहे. जर तुम्ही सूचनांचे पालन केलेत, तर या अध्ययन साहित्याच्या मदतीने तुम्ही अधिकाधिक ज्ञान मिळवू शकाल. अध्ययन साहित्यातील सूचना तुम्हाला मार्गदर्शन करू शकतील. तुमच्या सोयीसाठी खाली त्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

**शीर्षक :** कोणता आशय प्रकरणामध्ये आहे हे तुम्हाला शीर्षकावरून कळू शकेल. ते जरूर वाचा.

**प्रस्तावना:** प्रस्तावनेमधे जे लिहिलेले असते त्याचा संबंध शीर्षकाशी असतो.



**उद्दिष्टे :** प्रकरणामधून तुम्ही जे शिकणे अपेक्षित असते ते या विधानांवरून तुम्हाला समजू शकते. प्रकरण वाचल्यानंतर तुम्ही जो अभ्यास करणे अपेक्षित असते ते उद्दिष्ट्यांच्या मदतीने तपासू शकता. ते जरूर वाचा



**टिपणे :** (notes) प्रत्येक पानावर काही रिकामी जागा आहे तिथे तुम्ही महत्त्वाचे मुद्दे लिहू शकता.



**पाठ्यांशावरील प्रश्न :** प्रत्येक भागानंतर तुम्हाला किती समजले आहे ते तपासण्यासाठी लघुत्तरी प्रश्न दिले आहेत. प्रकरणाच्या शेवटी या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. ते प्रश्न जरूर सोडवा. प्रश्नांची उत्तरे तुम्हाला माहीत आहेत का नाहीत यावरून पुढचे प्रकरण वाचायचे का परत आधीच्या प्रकरणाचा अभ्यास करायचा हे तुम्ही ठरवू शकाल.



### तुम्ही काय शिकलात?

प्रकरणातील मुख्य मुद्दे सारांश रुपाने यात सांगितलेले आहेत. उजळणीसाठी तुम्हाला याची मदत होईल. यात तुम्ही तुमचे स्वत:चे काही मुद्दे पण लिहू शकता.



**अंतिम प्रश्न :** यात लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रश्न असतात. संपूर्ण प्रकरण समजून घेण्याची संधी उत्तरांचा सराव करून तुम्हाला मिळू शकेल.



**उत्तरे :** तुमची उत्तरे किती प्रमाणात बरोबर आहेत हे तुम्हाला दिलेल्या उत्तरावरून लक्षात येईल.

**कार्य :** संकल्पना समजून घेण्यासाठी दिले आहे.

**संकेत स्थळ :** Web site

याच्या मदतीने जास्तीचे अध्ययन करू शकाल आवश्यक माहिती संकेत स्थळावर आशयामधे दिलेली आहे. त्याचा तुम्ही उपयोग करू शकाल.

# अनुक्रमणिका


| पाठ क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संस्कृती परिचय | ०३ |
| २. | भारतीय संस्कृती | १२ |
| ३. | प्राचीन भारत | २२ |
| ४. | मध्ययुगीन भारत | ४९ |
| ५. | आधुनिक भारत | ६८ |
| ६. | भारतीय भाषा आणि वाङ्मय भाग १ | ८७ |
| ७. | भारतीय भाषा आणि वाङ्मय भाग २ | १०३ |
| ८. | प्राचीन भारतातील धर्म आणि तत्वज्ञान | ११९ |
| ९. | मध्ययुगिन भारतातील धर्म व तत्वज्ञान | १३३ |
| १०. | आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी | १४२ |
| ११. | भारतीय चित्रकला | १५५ |
| १२. | ललित कला ः संगीत, नृत्य आणि नाटक | १६५ |
| १३. | भारतीय स्थापत्यशास्त्र | १८३ |
| १४. | भारतातील शास्त्र आणि शास्त्रज्ञ | २०४ |
| १५. | प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ | २१६ |
| १६. | मध्ययुगीन भारतातील शास्त्र व शास्त्रज्ञ | २२६ |
| १७. | आधुनिक भारतातील शास्त्रज्ञ | २३३ |
| १८. | भारतातील शिक्षण | २४३ |
| १९. | भारतीय सामाज रचना | २६३ |
| २०. | समकालीन भारतातील सामाजिक सांस्कृतिक समस्या | २८० |
| २१. | भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार | २९३ |
| | • अभ्यासक्रम | ३१४ |
| | • नमुना प्रश्नपत्रिका | ३२६ |
| | • गुणदान योजना | ३२९ |
| | • अभिप्राय | |

# *Mukta Vidya Vani*



Mukta Vidya Vani is a pioneering initiative of the National Institute of Open Schooling (NIOS) for using Streaming Audio for educational purposes. This application of ICT will enhance accessibility as well as quality of programme delivery of NIOS Programmes. This is a rare accomplishment of NIOS as the first Open and Distance Learning Institute to start a two way interaction with its learners, using streaming audio and the internet.

Keeping in mind the fact that the transmission is done through the web, the NIOS website (www.nios.ac.in) has a link that will take any user to the Mukta Vidya Vani. Mukta Vidya Vani thus enables a two way communication with any audience that has access to an internet connection, from the studio at its Headquarters in NOIDA, where NIOS has set up a state-of-art studio, which will be used for this purpose as well as for recording educational audio programmes meant for NIOS learners, though others can also take advantage of this facility.

Mukta Vidya Vani is a modern interactive, participatory and cost effective programme, involving an academic perspective along with the technical responsibilities of production of audio and video programmes, which are one of the most important components of the multi channel package offered by the NIOS. These programmes will attempt to present the topic/ theme in a simple, interesting and engaging manner, so that the learners get a clear understanding and insight into the subject matter.

NIOS has launched a scheme to motivate the learners to participate in the Mukta Vidya Vani by sending their Audio CD's to the respective regional centre on various subjects such as-

1. Poetry / Shloka recitation
2. Story telling
3. Radio Drama
4. Music
5. Talks on various topic related to the NIOS curriculum including Painting, Vocational Subjects etc.
6. Quiz
7. Mathematics puzzles etc.



The selected CD can be webcast on Mukta Vidya Vani and the winner participant be rewarded suitably.

Learners may visit the NIOS website and participate in live programmes from 2pm to 5pm on all week days and from 10.30am to 12.30pm on Saturdays, Sundays and all Public Holidays. The Subject Experts in the Studio will respond to their telephonic queries during this time. A weekly schedule of the programmes for webcast is available on the NIOS website. The Studio telephone number are 0120-4626949 and Toll Free No. 1800-180-2543.





# विभाग १

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

## संस्कृती

अभ्यासघटकाची रचना संस्कृतीची संकल्पना आणि अर्थ यांच्या आकलनात वाढ होण्यासाठी करण्यात आली आहे.

भारतीय संस्कृतीच्या ज्या वैशिष्ट्यांमुळे ती आगळी वेगळी बनली आहे. त्याचीही चर्चा करण्यात येईल.

**घटक १ ः संस्कृती एक ओळख**

**घटक २ ः भारतीय संस्कृती**

# *Success Stories*

**Jaspal Singh**
**Enrolment No.: Secondary - 27020212195**
**Senior Secondary – 92279300066**



Forced to discontinue his tenth class in 1993 in order to earn a livelihood to support his family, when his parents met with an accident, Jaspal Singh resumed his studies in 2003 by enrolling for the Secondary level course in NIOS. The flexibility of the NIOS system enabled him to pursue his studies along with his vocation. He acquired skills in fashion designing while working as a freelancer in garment export houses.

Having completed his Senior Secondary course from the NIOS and moved by the desire to continue studies, Jaspal Singh has managed to obtain admission to a three year course in Fashion Management at the University of Thames Valley, London.

**Ms. Sudha**
**Enrolment No. : 27029182593**



Ms. Sudha was a only housewife until such time that her husband passed away and she was offered the job of a constable in the Delhi Police. She then took up the job to support the family consisting of her two children.

Sudha who had not completed her schooling was motivated by her children to join the NIOS. She then passed the Secondary examination from NIOS in April 2009. A resident of Sant Nagar, Burari, Delhi and posted at the Rohini Court, Delhi, Sudha today feels more confident and empowered by the qualification acquired by her through the NIOS.

# १

# संस्कृती परिचय
# संस्कृतीची तोंडओळख

कल्ट किंवा कल्टस या लॅटिन शब्दापासून इंग्रजी कल्चर या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. याचा अर्थ नांगरणी किंवा पिकांचे उत्पादन किंवा पूजा आणि सुधारणा असा होतो. थोडक्यात एखादी बाब इतकी सुधारणा करून उत्पादित करायची की जी आपल्यामधे कौतुकाच्या आणि आदराच्या भावना निर्माण करते. वस्तुतः संस्कृत भाषेतील संस्कृती या शब्दाशी कल्चर या शब्दाचे साम्य आहे. कृ म्हणजे करणे या धादुपासुन संस्कृत शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. संस्कृतातील मुळ कृती धातुपासुन प्रकृती (पदार्थ अथवा परिस्थितीचे वास्तविक अस्तीत्त्वस्वरूप) संस्कृती (परिस्थितीचे सुधारित अस्तित्त्व स्वरूप) विकृती ( परिस्थितीचे ऱ्हास पावलेले अस्तित्त्व स्वरूप)जेव्हा प्रकृतीची किंवा अप्रगत कच्चा पदार्थ प्रगत स्वरूपाला पोहचतो त्यावेळेस संस्कृतीच्या अवस्थेला पोहचतो ज्या वेळेस संस्कृतीला हानी पोहचते किंवा खंडित होते त्यावेळेस ती विकृती बनते.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला

- संस्कृतीची संकल्पना आणि अर्थ यांचे आकलन होईल.
- संस्कृती आणि सभ्यता यामधील संबंध प्रस्थापित करता येईल.
- संस्कृती आणि वारसा यांच्यामधील संबंध प्रस्थापित करता येईल.
- मानवी जीवनातील संस्कृतीची भूमिका आणि परिणाम यांची चर्चा करता येईल.

## १.१ संस्कृतीची संकल्पना :

जीवनशैली म्हणजे संस्कृती. जे अन्न आपण खातो, जे कपडे आपण परिधान करतो आणि जी भाषा आपण बोलतो हे सर्व संस्कृतीचे भाग आहेत. थोडक्यात आपण ज्या पद्धतीने विचार करतो आणि कार्य पार पाडतो अशा समावेशक बाबी म्हणजे संस्कृती. समाजाचा सदस्य म्हणून ज्या बाबी आपल्याकडे वारशाने येतात अशा बाबींचा पण संस्कृतीत समावेश होतो. सामाजिक गटाचे सदस्य

म्हणून मानवाने जे सर्व प्राप्त केले आहे त्याला देखील संस्कृती म्हणता येईल. कला, संगीत, वाङ्मय वास्तुकला, मूर्तीकला, तत्वज्ञान, धर्म आणि विज्ञान हे सर्व संस्कृतीचे भाग आहेत. या व्यतिरिक्त रूढी, परंपरा, जीवनशैली आणि जीवनाचा विविध पैलुकडे पाहण्याचा दृष्टीकोन. याचा देखील संस्कृतीत समावेश होतो. अशा प्रकारे संस्कृती म्हणजे मानवनिर्मित असे पर्यावरण की ज्यात सामाजिक गटांच्या आध्यात्मिक आणि भौतिक घटकांचा समावेश होतो आणि जे घटक एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होतात. सर्व सामाजिक शास्त्रज्ञांच्या मतानुसार व्यक्त आणि अव्यक्त स्वरूपातील वर्तनाचा समावेश संस्कृतीत होतो. मानवी वर्तनाचे हे हस्तांतरण मानवी गटाची वैशिष्टपूर्ण कामगिरीचा समावेश असलेल्या विशिष्ट चिन्हांमार्फत होते. यामध्ये कलात्मक वस्तुचाही समावेश असतो.

सामाजिक गटांतर्गत मुल्याधिष्ठित ऐतिहासिक प्रक्रियेने संचलित निवडक शुद्ध कल्पनांचा संस्कृतीच्या गाभ्यात अशाप्रकारे समावेश झालेला असतो.

ऐतिहासिक दृष्टया अर्थपूर्ण चिन्हांचे हस्तांतरणाचे प्रकार असा संस्कृतीला अलिकडे लाभलेला आहे. ज्या योगे पद्धतीमुळे लोक एकमेकांशी संवाद साधू शकतात. जीवनविषयक दृष्टिकोनातील ज्ञानांचा वाढता विकास व त्यात वाढ करून ते अभिव्यक्त करतात.

आपले विचार आणि जीवनपद्धती याची अभिव्यक्ती म्हणजे संस्कृती. आपले वाङ्मय, धार्मिक आचार, मनोरंजन आणि उपभोग यातून ही अभिव्यक्ती आपण पाहू शकतो. संस्कृतीचे भौतिक व अभौतिक असे वैशिष्टयपुर्ण दोन घटक आहेत. पोषाख अन्न आणि घरगुती वस्तु याचा भौतिक घटकांत समावेश होतो तर संकल्पना, आदर्श विचार आणि श्रद्धा यांचा अभौतिक संस्कृतीत समावेश होतो.

प्रत्येक देशाची व ठिकाणाची संस्कृती वेगवेगळी असते. संस्कृतीचा विकास स्थानिक प्रादेशिक किंवा राष्ट्रीय पातळीवर चालू असणाऱ्या ऐतिहासिक प्रक्रियेवर अवलंबून असतो. उदाहरणार्थ आपल्या स्वागताची पद्धत, पोषाख, आहार, सवयी, सामाजिक आणि धार्मिक चालीरिती या पश्चिमेकडील देशापेक्षा वेगळया आहेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कोणत्याही देशाचे लोक त्यांच्या वैशिष्टयपूर्ण संस्कृतीने ओळखले जातात.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १.१

१. संस्कृती आणि कल्चर या शब्दाचा अर्थ एकच आहे हे आपण का म्हणतो ?

उत्तर ____________________

____________________

**ब. रिकाम्या जागा भरा.**

१. मानवी कला व मानवी गटांच्या कामगिरिला ........ म्हणतात.

२. संस्कृतीचे दोन वैशिष्टयपूर्ण घटक आहेत. ज्यामध्ये भौतिक आणि ...... समावेश होतो.

## १.२ संस्कृती आणि सभ्यता ः

अनेकवेळा संस्कृती आणि सभ्यता हे शब्द समान अर्थाने वापरले जातात. परंतु हे दोन्ही शब्दांना निश्चित अर्थछटासह निराळे अर्थ आहेत. सभ्यता म्हणजे प्रगत जीवनशैली आणि गरजांच्या परिपूर्ती साठी निसर्गाला योग्य वळण देणे. तसेच राजकियदृष्टया सुसंघटित सामाजिक गटांचे अन्न वस्त्र संप्रेषण आणि इतर बाबीत सुधारणा करण्यासाठी त्याचे सामुहिक कार्याचे संघटन करणे या बाबीचाही सभ्यतेत समावेश होतो. अशा प्रकारे काही गट स्वतःला अधिक सुसंस्कृत समजुन इतरांना तुच्छ समजतात. काही गटांच्या या भूमिकेतून युद्धे आणि मनुष्यहानी झाली आहे.

दुसऱ्या बाजुला मन आणि मेंदूच्या विकासाला म्हणजे आंतरिक विकासाला संस्कृती म्हणता येईल. संस्कृतीमध्ये कला आणि विज्ञान, संगीत आणि नृत्य मानवी जीवनाची इतर ध्येये ज्याला सांस्कृतीक कृती म्हणता येईल. त्यांचा समावेश होतो.

एखादा गरीब असेल आणि त्याने साधे कपडे परिधान केलेले असतील. त्याला असभ्य म्हणता येई ल.परंतु अशी व्यक्ती सर्वाधिक सुसंस्कृत असू शकते. एखाद्या भपकेबाज श्रीमंताला सभ्य समजता येईल, परंतु सुसंस्कृत समजता येणार नाही.

त्यामुळे यावेळेस आपण संस्कृतीचा विचार करतो. त्यावेळेस ती सभ्यतेपासून वेगळी आहे. हे समजून घेतले पाहिजे. संस्कृतीला आपण उच्च दर्जाचे आंतरिक उन्नयन समजतो. त्यामुळे माणसे केवळ शारिरिक प्राणी ठरत नाहीत. माणसे व्यावहारीक मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर वावरत असतात. आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक संसाधनाचा योग्य उपयोग केलेली अधिक चांगली जीवनशैली म्हणजे सभ्यता म्हणता येईल. परंतु संस्कृतीला एवढे पुरेसे नाही. व्यक्तीची आंतरिक बुद्धिमत्ता आणि संवेदना ज्यावेळेस अभिव्यक्त होतात. अशा व्यक्तींना सुसंस्कृत व्यक्ती म्हणतात.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १.२

१. संस्कृती आणि सभ्यतेमध्ये काय फरक आहे

उत्तर ______

२. संस्कृती आणि सभ्यतेमधील साम्य विशद करा.

उत्तर ______

## १.३ संस्कृती आणि वारसा :

सांस्कृतिक विकास ही ऐतिहासिक प्रक्रिया आहे. आपल्या पूर्वजांनी त्यांच्या पूर्वजांकडून अनेक बाबी शिकल्या. काळाच्या ओघात आपल्या अनुभवातून त्यांनी अनेक बाबी जोडल्या आणि या निरूपयोगी आहेत, त्यांचा त्याग केला. अशाप्रकारे आपण आपल्या पूर्वजांकडून अनेक बाबी शिकलो. काळाच्या ओघात आपणही नवे विचार नव्या कल्पना यांची भर अगोदरच अस्तित्वात असलेल्या बाबीमध्ये घातली आणि ज्या बाबी निरूपयोगी आहेत त्यांचा त्याग केला. अशाप्रकारे संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होते. आपल्याला जी संस्कृती आपल्या पूर्वजांकडून वारसाने मिळते तिला सांस्कृतीक वारसा म्हणतत. संपुर्ण मानवताच सांस्कृतिक वारश्याने हस्तांतरित होते. व त्याला मानवी वारसा असे म्हणता येईल. संपूर्ण देशाला सांस्कृतिक वारसा असतो. त्याला राष्ट्रीय सांस्कृतिक वारसा म्हणता येईल.

माणसाला त्यांच्या पूर्वजांकडून प्राप्त झालेल्या संस्कृतिच्या सर्व मूल्यांचा सांस्कृतिक वारस्यात समावेश होतो. ही मूल्ये सातत्याने आठवणीत ठेवली जातात. संरक्षित आणि जपली जातात. व त्याचा अभिमान बाळगला जातो.

वारश्याची संकल्पना पटवून देण्यासाठी काही उदाहरणे दिल्यास योग्य ठरेल. ताज महाल, दिल्ली आणि गांधीनगर मधील स्वामी नारायण मंदिरे, आग्राचा लाल किल्ला, कुतुबमिनार, म्हैसुरचा राजवाडा, राजस्थानातील दिलवारा येथिल जैन मंदिर निझामउद्दीन अवलियाचा दर्गा, अमृतसरचे सुवर्णमंदिर दिल्ली येथिल सिसगंजचे गुरूद्वारा, सांचीचा स्तूप, गोव्यातील ख्रिस्ती चर्च ही सर्व स्थळे आपल्या वारश्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत व त्यांचे सर्वोतोपरी संरक्षण केले जाते.

वस्तुकलेतील निर्मितीशिवाय ऐतिहासिक स्मारके कलात्मक वस्तू बौद्धिक प्रगती. तत्त्वज्ञान, ज्ञानाची भांडारे, वैज्ञानिक संशोधन व शोध हे सुद्धा आपल्या वारश्याचे भाग आहेत. भारतीय संदर्भात बुद्धयान, आर्यभट्ट. भास्कराचार्य यांचे गणित. खगोल शास्त्र, भविष्यज्ञान या क्षेत्रातील योगदान तसेच कनाद आणि वराहमिहिर यांचे भौतिकशास्त्रातील, नागार्जुनाचे रसायनशास्त्रातील, सुश्रुत आणि चरकाचे वैद्यकशास्त्रातील आणि पतंजलीचे योगशास्त्रातील योगदान भारतीय सांस्कृतीक वारश्याचा भव्य ठेवा आहे.

संस्कृतीत बदल संभवतात. परंतु आपल्या वारश्यात बदल संभवत नाहीत. आपण एखाद्या सामाजिक सांस्कृतिक गटाचे वैयक्तिक सदस्य म्हणून इतर सामाजिक गटाकडून अथवा संस्कृतीकडून काही सांस्कृतिक वैशिष्टये सामावुन घेऊ शकतो. परंतु भारतीय संस्कृती व वारसा जो आपला स्वतःचा आहे त्यात काहीही बदल होत नाहीत. उदा. भारतीय वाङ्मय, वेद, उपनिषद, गीता आणि योग पद्धती इत्यादी जी सम्यक ज्ञान, सम्यक कृती, वर्तन याकरिता भरीव योगदान दिलेले आहे. ज्यामुळे भारतीय सभ्यतेचा विकासाला मदत झाली आहे. भारतीय सांस्कृतीक वारसा आपल्याला एकत्रित बांधुन ठेवणारा आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १.३

१. सांस्कृतिक वारसा म्हणजे काय ?

उत्तर

२. सांस्कृतिक वारस्याची काही उदाहरणे द्या.

उत्तर

## १.४ संस्कृतीची सामान्य वैशिष्टये :

आता आपण जगभर सर्व संस्कृतींमध्ये समान असलेली काही समान गुण वैशिष्टयाची चर्चा करणार आहोत.

१. **संस्कृतीचे अध्ययन करता येते आणि ती आत्मसात करता येते.**: वंशपरंपरेने काही वर्तन प्रकिया आत्मसात करता येतात. व्यक्ती त्यांच्या आईवडिलांकडून काही ठराविक बाबी वारश्याने घेतात. परंतु सामाजिक सांस्कृतिक आकृतीबंध आई वडिलांकडून वारश्याने घेता येत नाही. सामाजिक गटात आणि समाजात कुटुंबातील सदस्य रहातात त्या कुटूंब सदस्यांकडून सामाजिक सांस्कृतिक आकृतिबंध शिकता येतात. अशा प्रकारे मानवी संस्कृती तिच्या भौतिक आणि सामाजिक पर्यावरणाने प्रभावित झालेली असते.

२. **सामाजिक गटात संस्कृती सामाईक असते.**: ज्यावेळेस एखादी कृती किंवा विचार समुहाने एकत्रितपणे आत्मसात केलेला असतो. किंवा आचरणात आणलेला असतो त्यास संस्कृती म्हणतात.

३. **संस्कृती संचयित होत जाते** : संस्कृतित मिसळलेले ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. जसजसा अधिक काळ लोटेल तसतसे अधिक ज्ञानाची संस्कृतीत भर पडते. पिढ्यांना भेडसावणाऱ्या समस्येवर प्रत्येकाकडून तोडगा काढला जाऊ शकतो. जी संस्कृती काळाबरोबर प्रगत होत असते त्या संस्कृतीत आपल्याला हे चक्र पहायला मिळते.

४. **संस्कृती बदलत असते** : जसजसे नविन सांस्कृतिक गुणवैशिष्ट्यांची भर पडत असते तशा काही चालीरिती विचार व ज्ञान लुप्त होत जातात. कालांतराने एखाद्या संस्कृतित सांस्कृतिक बदलाची शक्यता असते.

५. **संस्कृती प्रवाही असते.** : कोणतीही संस्कृती चिरस्थायी नसते. जसजसे नव्या कल्पना नवे तंत्रज्ञान काळाच्या ओघात सुधारित होते किंवा जुन्या पद्धतीत बदल होतो तसे सातत्याने संस्कृतीत बदल होतात. संस्कृती संचयाच्या गुणधर्मानुसार संस्कृतीचे हे बदलाचे वैशिष्ट्ये संस्कृतिमध्ये निर्माण होते.

६. **संस्कृती आपल्याला वर्तनाच्या सर्वमान्य पद्धतीमध्ये अनेक पर्याय उपलब्ध करून देते.:** मानवाने आपली कार्ये कशी पार पाडली पाहिजेत आणि कोणत्या योग्य प्रकारे माणसाने आपले वर्तन केले पाहिजे याचा संस्कृतिमध्ये समावेश होतो.

७. **संस्कृतित वैविध्य असते.:** संस्कृतीही एक अशी पद्धती असते की जिच्यात परस्परअवलंबी, परस्परमान्य भाग असतात. जरी हे भाग वेगवेगळे असले तरी जे एकमेकांवर अवलंबून असतात व त्यातून एकात्म संस्कृती निर्माण होत असते.

८. **संस्कृती आदर्शवादी असते :** एकाच समान संस्कृतीत वावरत असणाऱ्या लोकांकडून सामाजिक मान्यता मिळवण्यासाठी संस्कृती वर्तनाचा एक आदर्श आकृतीबंध व्यक्तीसमोर आचरणासाठी ठेवत असते जो सर्वांनी अनुसरण्याची अपेक्षा असते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १.४

१. सर्वमान्य वर्तन प्रकार म्हणजे काय ?

उत्तर ____________________

____________________

२. संस्कृती प्रवाही असते हे कशाप्रकारे स्पष्ट कराल ?

उत्तर ____________________

____________________

## १.५ मानवी जीवनातील संस्कृतीचे महत्त्व :

संस्कृती मानवी जीवनाशी घट्ट जोडली गेलेली आहे. आपण अंगावर घालू अशा प्रकारचा अधिकचा दागिना अशा स्वरूपात संस्कृती नसते. फक्त स्पर्श करण्यासारखे रंगाचे स्वरूप संस्कृतीला नसते. संस्कृतीच माणसाला माणूस बनवते. संस्कृती नसेल तर मानवी अस्तित्वाला महत्त्व नाही. परंपरा, श्रद्धा, जीवनशैली यांची मिळून संस्कृती बनते. ज्यात अधिभौतिक ते अत्यंतिक भौतिक बाबी समाविष्ट झालेल्या असतात. मानवप्राणी हा संस्कृतीचा निर्माता असतो. त्याचबरोबर संस्कृती माणसाला माणूसपण प्राप्त करून देत असते.

धार्मिक श्रद्धा आणि त्यांची सांकेतिक अभिव्यक्ती हा मुख्य विषय संस्कृतीचा मुलभूत घटक आहे. आपण धार्मिक गटांचे महत्त्व ओळखले पाहिजे. तसेच सावधानतेने विविध श्रद्धा असणाऱ्या लोकांमधील संवाद जो खऱ्या अर्थाने आंतरसांस्कृतिक संवाद आहे त्याचा वेध घेतला पाहिजे. जग जसे अधिक अधिक एकत्र येत आहे तसे आपण जागतिक पातळीवर अधिक सहचार्याने राहत आहोत अशा परिस्थितीत फक्त एकच एक जीवनशैली योग्य किंवा कायदेशीर आहे असा आपण विचार करू शकत नाही. सहचर्याच्या गरजेतुनच संस्कृती आणि श्रद्धाच्या सहचार्याची आवश्यकता निर्माण





झालेली आहे. चुका टाळण्यासाठी आपण इतर संस्कृत्यांबरोबर आपली संस्कृतीही जाणून घेतली पाहिजे. आपल्याला आपली संस्कृती माहिती असल्याशिवाय आपण इतर संस्कृतीशी कशा प्रकारे संवाद साधु शकतो ?

'सत्यम् शिवम् सुंदरम्' ही तीन वैश्विक शाश्वत मूल्ये संस्कृतीशी घट्ट जोडली गेलेली आहेत. धर्म आणि तत्वज्ञानाच्या माध्यमातून संस्कृती आपल्याला जवळ आणते. तसेच संस्कृती कलेच्या माध्यमातून आपल्या आयुष्यात सौंदर्य आणते व आपल्यात सौंदर्यचिकित्सा निर्माण करते. तसेच संस्कृती आपल्याला इतर माणसांच्या अधिक जवळ आणुन तसे प्रेम सहिष्णुता आणि शांतीची शिकवण देत नैतिक प्राणी बनवते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १.५

१. सुव्यवस्थित जीवनासाठी संस्कृती कशाची परिपूर्ती करते ?

उत्तर ____________________

____________________

२. कोणत्या व्यक्तींना समाजात असंस्कृत समजले जाते ?

उत्तर ____________________

____________________

## तुम्ही काय शिकलात?

- कल्ट किंवा कल्टस म्हणजे शेतीची मशागत किंवा सुधारणा असा त्याला अर्थ आहे. अशा लॅटिन शब्दापासून कलचर म्हणजे संस्कृती हा शब्द निघाला आहे.
- संस्कृत मूळ कृ म्हणजे करणे या धातूपासून संस्कृती हा शब्द निघाला आहे.
- व्यक्ती आणि समाज या पद्धतीने जीवन जगतो तसेच विचार करतो, संघटित होतो आनंदोत्सव साजरे करतो आणि जाणिवा अनुभवतात त्याला संस्कृती असे म्हणतात.
- संस्कृतीची विविध गुण वैशिष्ट्ये आहेत. संस्कृती आत्मसात करता येते ती लुप्त होते व ती इतरांशी वाटून घेता येते.संस्कृती संयमी, प्रवाही, वैविध्यपुर्ण असुन संस्कृती आपल्याला सर्वमान्य वर्तन प्रकाराचे आकृतीबंध उपलब्ध करून देतात. संस्कृती परिवर्तनिय आहे. संस्कृतीत भौतिक, अधिभौतिक अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो.
- सखोल विचार करता संगीत, नृत्य, शिल्पकला, वास्तुकला इतर विविध कला 'प्रकार' तसेच अनेक संघटना वास्तुरचना जे समाजाची कार्ये सुव्यवस्थित आणि सुलभपणे पार पाडतात ते

सर्व संस्कृती निर्माण करते.

➢ संस्कृती आपल्याला सुव्यवस्थित जीवन जगण्यासाठी कल्पना, आदर्श आणि मूल्यांचा पुरवठा करते.

➢ वर्तनातील स्वयंमर्यादा इतरांच्या भावनांचा आदर. इतरांच्या अधिकारांची जाणीव ही संस्कृतीची सर्वोच्च मानके आहेत.

➢ पूर्वजांकडून पुढील पिढीला संक्रमित होणारे सांस्कृतिक सर्व घटक किंवा मूल्ये म्हणजे सांस्कृतिक वारसा होय.

➢ वास्तुकला, स्मारके, भौतिक कलावस्तू, बौद्धिक कामगिरी, तत्त्वज्ञान प्राप्त करण्यातील आनंद वैज्ञानिक संशोधन व शोध आपल्या वारश्याचे भाग आहेत.

## सत्रान्त अभ्यास

१. संस्कृतीची संकल्पना तुम्ही कशी स्पष्ट कराल ?

२. संस्कृती आणि सभ्यता कशा प्रकारे समानार्थी आहेत ?

३. सांस्कृतीक वारसा म्हणजे काय ?

४. संस्कृतीची सर्वसाधारण वैशिष्टये काय आहेत ?

## प्रश्नांची उत्तरे

### १.१

१. क्लचरचा शब्दशः अर्थ करणे असा आहे आणि संस्कृतीचा शब्दशः अर्थ शेतीची मशागत करणे आणि सुधारणा करणे असा होतो.

२. अ. संस्कृती

ब. अधिभौतिक

### १.२

१. संस्कृती म्हणजे आपण जे आशेने ते आणि सभ्यता म्हणजे आपल्याकडे जे आहे आणि ज्याचा आपण वापर करतो.

२. सभ्यता आणि संस्कृती मध्ये बदल घडतात. सभ्यता ही संस्कृतीची अधिक प्रगत अवस्था आहे.

### १.३

१. जी संस्कृती आपल्याला आपल्या पुर्वजांकडून मिळते तिला आपण आपला सांस्कृतिक





वारसा म्हणतो.

२. ताज महल, आग्र्याचा लाल किल्ला, वेद, उपनिषदे आणि गीता

(वास्तुकलात्मक स्मारके, ज्ञानाची भांडारे वैज्ञानिक आणि बौद्धिक कामगिरी)

**१.४**

१. व्यक्तींनी आचरणात आणावयाचे आदर्श वर्तन आकृतिबंध म्हणजे संस्कृती

२. संस्कृती सातत्याने बदलत असते. वेळोवेळी संस्कृतीत नव्या संकल्पना आणि नवी तंत्रे यांची भर पडते.

**१.५**

१. संस्कृती आपल्याला सुव्यवस्थित जीवनासाठी संकल्पना, आदर्श आणि मूल्ये यांचा पुरवठा करत असते.

२. आचार विचार भावना आणि कृती याच्यावर ज्यांचे स्वयं नियंत्रण नाही त्याला असभ्य व्यक्ती म्हणतात.

# २

# भारतीय संस्कृती

भाषा, वाङ्मय, कला, वास्तुकला, विज्ञान किंवा धर्म या जीवनाच्या विविध क्षेत्रात आपण मनुष्य प्राणी म्हणुन जी आश्चर्यकारक प्रगती केली आहे त्याबद्दल तुम्ही कधी विचार केला आहे का ? हे सर्व कसे घडून आले याबद्दल तुम्हाला कधी आश्चर्य वाटले आहे का ? हे सर्व घडून आले आहे कारण आपल्याला प्रत्येक वेळेस नव्याने सुरूवात करावी लागली नाही परंतु मागच्या पिढ्यांनी केलेल्या कामाचा उपयोग करत त्यावर नविन बांधणी केली.

तुम्हाला तुमची नवी लिपी किंवा भाषा तुमच्यासाठी नवी तयार करावी लागली नाही. त्याची तुम्हाला काळजी करावी लागली नाही. तुम्हाला त्याचा समाजाचा सदस्य म्हणून लाभ झालेला आहे. तुम्ही त्यावर तुमचे योगदान देत किंवा भर घालत पुढच्या पिढयासाठी मालमत्ता निर्माण करत अधिकची निर्मिती केली. ही सतत चालणारी न संपणारी प्रक्रिया आहे. हा मानवाला मिळालेला अमूल्य आगळावेगळा ठेवा आहे. यालाच संस्कृती म्हणतात.तुम्हाला तुमच्या कुटुंबाला तसेच तुमच्या प्रदेशाला आणि देशालाही संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीचे वेगळेपण आणि तिची ठळक वैशिष्टे ओळखायला तुम्ही उत्सुक असाल. या प्रकरणात भारतीय संस्कृतीचे वेगळेपण आणि वैशिष्टे आपण समजून घेणार आहोत.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपण

- भारतीय संस्कृतीची ठळक वैशिष्टे वर्णन करू शकू.
- भारतीय संस्कृतीचे मध्यवर्ती मुद्दे आणि वेगळेपण ओळखू शकू.
- भारतीय संस्कृतीतील आध्यात्माच्या महत्त्वाची चर्चा करू शकू.
- विविधता आणि त्यामधील एकता या विषयक मुद्यांचे स्पष्टीकरण करू शकू.
- भारतीय संस्कृतीत इतर संस्कृतीतील घटक मिसळल्याची व ते एकात्म होणाऱ्या प्रक्रियेचा आढावा घेऊ शकू.

## २.१ भारतीय संस्कृतीची वैशिष्टे ः

जीवनाला जितक्या बाजू आहेत तितक्याच भारतीय संस्कृतीला आहेत. कोणत्याही व्यक्तीमधील बौद्धिक आणि सामाजिक घटकांचा भारतीय संस्कृतीत समावेश होतो. माणसामधील सौंदर्यासक्ती आणि आध्यात्मिक चेतना यांचा वेध भारतीय संस्कृतीत घेतला जातो. वस्तुतः चारिञ्यनिर्मितीसाठी संस्कृती एक शक्ती म्हणुन आपल्या अबोध मनाला एक प्रकारे अवाहन करत असते.

आपण भारताच्या नकाशाकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर चटकन लक्षात येते की भारत हा एक विशाल देश आहे आणि देशाच्या सामाजिक आणि भौतिक पर्यावरणात अनेक वैविध्ये आहेत. आपल्या सभोवतालचे लोक अनेक भाषा बोलतात त्यांचे विविध धर्म आहेत आणि त्यांच्या उपासना पद्धती भिन्न आहेत. हे वैविध्य आपण त्यांच्या आहार संबंधी आणि पोषाखात ही पाहू शकतो. या शिवाय आपण नानाविध प्रकारचे संगीत आणि नृत्य प्रकार पाहू शकतो. परंतु ह्या सर्व विविधतेत आपण एकतेचे सुत्र पाहू शकतो. जे सूत्र एकमेकांना सिमेंटसारखे जोडण्याचे काम करते. अनेक शतके लोकांची एकमेकांत हळूहळू सरमिसळ होत आहे. विविध वेशाने विविध संस्कृतीचे विविध धार्मिक श्रद्धा असणारे असंख्य लोक भारतात स्थयिक झाले.

भारतीय संस्कृतीचे संमिश्र गतीशिल स्वरूप ह्या विविध सांस्कृतीक घटकांच्या बराच काळ मिळालेल्या योगदानामुळे आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही. भारतीय संस्कृतीची ठळक वैशिष्टे आणि तिचे वेगळेपण हा सर्व भारतीयांचा अमूल्य ठेवा आहे.

### २.१.१ सातत्य आणि बदल ः

जगाच्या विविध भागात आणि विविध देशात अनेक महान संस्कृती विकसीत झाल्या. त्यापैकी अनेक संस्कृती नष्ट झाल्या किंवा त्यांची जागा दुसऱ्या संस्कृतींनी घेतली. परंतु भारतीय संस्कृतीत सातत्य राहिले आहे. भारतीय इतिहासाच्या संपूर्ण कालखंडात अगदी आजपर्यंत काही चढउतार आणि महात्वाच्या बदलांची स्थित्यंतरे होऊनही भारतीय संस्कृतीच्या सातत्याचा ठळक सलग धागा अगदी आजपर्यंत आपण पाहु शकतो. भारतीय उपखंडात ४५00 वर्षांपुर्वी भरभराटीस आलेल्या हडप्पा सभ्यतेबद्दल तुम्ही वाचले असेल. पुरातत्व शास्त्रज्ञांना हडप्पा संस्कृती पूर्वीही येथे संस्कृती अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळाले आहेत. आपल्याला फार मोठ्या इतिहासाची पार्श्वभूमी आहे ते यावरून समजते. भारतीय खेडयातील घरांची रचना आजही हडप्पा संस्कृतीतील घरांसारखी आहे ही आश्चर्याची बाव आहे. मातृदेवता आणि पशुपतीची पूजा या हडप्पा संस्कृतीतील परंपरा आजही पाळल्या जातात. वैदिक, बौद्ध. जैन आणि इतर अनेक परंपरा आजही पाळल्या जात आहेत. परंतु त्याचबरोबर मुंबई आणि दिल्ली सारख्या महानगरांतील बहुमजली इमारतीतून प्रतीत होणारे बदलही कोणी नजरेआड करू शकत नाही. या इमारती खचितच हडप्पा संस्कृतीमधील दुमजली इमरतीपेक्षा वेगळया आहेत. यावरून आपल्या संस्कृतीतील सातत्य आणि बदल या प्रक्रिया एकाच वेळी होत आल्या आहेत. ही बाब नोंद घेण्यासारखी आहे. किंबहुना सातत्याबरोबरच बदलत राहणे हे भारतीय संस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य असूनही संस्कृतीचे मूळ चैतन्यदायी रूप सातत्याने भारतीय संस्कृतीत प्रवाहित राहिले आहे. आधुनिक काळात ज्या असंबंध बावी आहेत त्या भारतीय संस्कृतीने टाकून दिल्या आहेत. आपल्या दीर्घ इतिहासात अनेक चढ उतार आहेत. अनेक चळवळी येथे रूजल्या व त्यामुळे सुधारणा घडवून आणल्या. इ.स.पूर्व सहाव्या शतकात जैन व बौद्ध धर्माने

वैदिक धर्मात ज्या सुधारणा घडवून आणल्या तसेच भारतातील अठराव्या व एकोणीसाव्या शतकातील प्रबोधन चळवळी ही काही भारतीय विचार आणि चालीरीतीमध्ये क्रांतीकारी बदल घडवून आणणाऱ्या चळवळींची काही उदाहरणे आहेत. असे असूनही भारतीय संस्कृतीच्या तत्त्वज्ञानाचे मूळस्वरूप सतत चालत आले असून अजूनही टिकून आहे. अशा प्रकारे सातत्य आणि बदलाची प्रक्रिया नेहमीच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट ठरली आहे. हे भारतीय संस्कृतीचे गतिशीलताच दर्शवते.

### २.१.२ विविधता आणि एकता ः

भारतीय संस्कृतीने गेल्या तीन हजार वर्षात इतर धर्म व संस्कृतीमधील सर्वोतकृष्ठ बाबी ज्या आपल्या संस्कृतीत सामावू शकतात त्यांचे शांतपणे निरीक्षण केले आणि त्या स्वतःमध्ये सामावून घेतल्या.

जगातील फारच थोडया संस्कृत्यांमध्ये भारतीय संस्कृतीत आठळणारी विविधता आढळून येते . केरळी लोक स्वयंपाकात खोबऱ्याचे तेल आणि उत्तर प्रदेशातील लोक मोहरीचे तेल का वापरतात हे ऐकूण कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल. कारण केरळ हा किनारपट्टीचा प्रदेश असुन तेथे नारळ विपुल प्रमाणात उत्पादित होतात. उत्तरप्रदेशाचा भाग मैदानी प्रदेश असुन या प्रदेशात मोठया प्रमाणावर मोहरीचे उत्पादन होते.

पंजाबचे भांगडा नृत्य़ तामिळनाडूचे पोंगलनृत्य असामचे बिहू नृत्य यामध्ये काय साम्य आहे ? ही पीके काढणीच्या काळात म्हणजेच सुगीच्या दिवसात सादर केली जातात. आपण बोलत असलेल्या बंगाली, तमिळ, गुजराथी किंवा आसामी भाषाची माहिती तुम्ही करून घेतली आहे का? भारत ही असंख्य नृत्य व संगीत प्रकाराची भूमी आहे. जे विवाह, मुलांचे जन्म इत्यादी उत्सव व सामाजिक समारंभाच्या प्रसंगी सादर केले जातात.

भारतात असंख्य भाषा व त्यांच्या बोली बोलल्या जातात, ज्यांनी वैविध्यपूर्ण साहित्याची निर्मिती केली आहे. आपल्या देशात जगातील आठ महान धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. जैन, बौद्ध, शीख, हिंदु या धर्मांचा उगम भारतात झाला हे तुम्हाला माहित आहे का ? संगीत, नृत्य, वास्तुकला आणि चित्रकलेच्या विविध शैली येथे विकसीत झाल्या. आपल्या देशात शास्त्रीय व लोक संगीताच्या व नृत्याच्या दोन्ही प्रकारातील शैली आढळतात. त्याचप्रमाणे विविध उत्सव व परंपराही आढळतात. या वैविध्यामुळे भारतीय संस्कृती एकाच वेळी समृद्ध सुंदर आणि संमिश्र स्वरूपाची बनलेली आहे. आपल्या संस्कृतीत इतके वैविध्य का आहे ? याला कारणीभूत आहेत आपल्या देशाचा भौगोलिक विस्तार, प्राकृतिक आणि हवामानाच्या वैशिष्टयातील वैविध्य ही यामागची स्वाभाविक कारणे आहेत.

विविध सांस्कृतिक वांशिक गटांची एकमेकात सरमिसळ हे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. अनंत काळापासून आजूबाजूच्या प्रदेशातील व दूरच्या प्रदेशातील लोक भारतात येत आहेत व स्थायिक होत आहेत.

भारतात आपण प्रोटो ऑस्ट्रेलाइड, नेग्रिटो व मंगोलियन वंशाचे लोक पाहू शकतो. इराणी, ग्रीक, कुषाण, द्रुव, शक, अरब, हुण, मुघल, युरोपियन अशा विविध वांशिक संस्कृतीचे लोक भारतात आले. ते येथे स्थायिक झाले आणि स्थानिक लोकसंख्येत मिसळून गेले. इतर संस्कृतीच्या लोकांनी त्यांच्या सांस्कृतिक सवयी विचार, कल्पना त्यांच्याबरोबर भारतात आणल्या व त्या नंतर भारतात





अस्तित्त्वात असलेल्या सांस्कृतिक घटकाशी एकरूप झाल्या. तुम्हाला आश्चर्य वाटले की फक्त इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून सलवार कुर्ता, अंगरखा शिवलेले कपडे घालण्याची पद्धती कुषाण शक आणि पार्शियन लोकांनी त्यांच्याबरोबर आणून भारतात रूढ केली. त्यापूर्वी बिगर शिलाई केलेले कपडे भारतीय लोक वापरत. अगदी अलिकडच्या काळात म्हणजे अठराव्या शतकात सदरा, लेहंगा, स्कर्ट या पोषाखांच्या प्रकाराचा युरोपियन लोकांनी भारतीयांना परिचय करून दिला. अनंत काळापासून भारतीयांनी विविध कल्पनांना स्वतःत सामावून घेण्याची आश्चर्यकारक क्षमता दाखवून दिली आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीच्या वैविध्यात आणि वैभवात भर पडली आहे.

बाह्य संस्कृतीशी असलेल्या संबंधाबरोबरच भारतांर्गत विविध प्रादेशिक संस्कृतीशी ही संस्कृतिक आदानप्रदान होत आले आहे. लखौनोची चिकनकारी, पंजाबची फुलकारी, बंगालची कथा, ओरिसाची पटोला ह्या कपडयांवरील प्रादेशिक भरतकामाच्या कला एकमेकांपासून भिन्न प्रादेशिक छटा दर्शवितात. या भरतकामाच्या शैली उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम अशा विविध केंद्राना त्यांची स्वतःची आगळी वेगळी वैशिष्टे आहेत तरी त्यांचा विकास पूर्णपणे अलिप्तपणे झालेला नाही. भौगोलिक मर्यादा असल्यातरी भारतीय लोक व्यापार व धार्मिक यात्रासाठी देशाच्या एका भागातुन दुसऱ्या भागात प्रवास करत, काही भाग आक्रमणांच्याद्वारे किंवा संयुक्त आघडयांच्याद्वारे एकमेकांना जोडले जात होते. परिणामी संस्कृतिक सवयी आणि विचार देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात येत जात होते. विचारांची आदान प्रदान त्यामुळे होत होती. अशा प्रकारच्या संबंधामुळे भारतीय संस्कृतीत समानता निर्माण केली व आपल्या संपूर्ण ऐतिहासिक कालखंडात ती जपली गेली. हवामान हा दुसरा एकात्मता साधणारा घटक आहे. भौगोलिक व हवामानाचे वैविध्य असुनही भारतामध्ये अंगभूत एकात्मता दिसून येते. भारतीय हवामानाच्या आकृतीबंधात मान्सुन हा सर्वात महात्त्वाचा घटक आहे. मान्सुनच्या सातत्याने शेती हा भरतातील लोकांचा मुख्य व्यवसाय निश्चित केलेला आहे. दुसऱ्या बाजुला भौगोलिक वैविध्याने लोकांच्या आहार, सवयी, पोाषाख, घरे आणि आर्थिक उलाढाली यांवर परिणाम साधून सामाजिक, आर्थिक आणि राजकिय संस्था निर्माण केल्या आहेत. या विविधी घटकांचा त्यामुळे लोकांचा विचार आणि तत्व्ज्ञानावर प्रभाव पडलेला आहे. भौगोलिक घटकांच वैशिष्टये आणि हवामानमुळे अशा प्रकारे भरताच्या विविध भागात विविध संस्कृती उदयास आलेल्या आहेत. विविध भागंच्या नमुनेदार वेशिष्टयांमुळे त्या त्या भागातील संस्कृतीना एक वेगळी ओळख निर्माण करून दिलेली आहे.

आपल्या संस्कृतीचे संमिश्र स्वरूप आपल्या संगीत, चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला यासारख्या विविध कला व नाट्यप्रकार यामधुन प्रतिबिंबित होते. हे संमिश्र स्वरूप देशाच्या विविध भाषातुनही प्रतित होते.

आपल्या राजकिय संस्थातूनही विविधतेतील एकता परावर्तित होते. पूर्व वैदिक काळात चराऊ करणाच्या शोधात लोक नेहमीच स्थलांतर करत असत. म्हणजेच तो समाज पशुपालक समाज होता. ज्यावेळेस हे पशुपालक लोक शेती करू लागले त्यावेळेस ते स्थायिक झाले. या स्थायिक जीवनपद्धतीमुळे समाजाचा विकास होऊन शहरे निर्माण झाली. अशा शहरांनाकायदा व सुव्यवस्थेची गरज होती. यातुनच राजकिय संघटन उदयास आले. या राजकिय संस्था होत्या. व त्यांच्याद्वारे लोक शासन प्रणालीत सहभागी होत होते. कालांतराने राष्ट्र ही संकल्पना उदयास आली व त्यामुळे प्रदेशांचा तावा हे सत्ता मापनाचे एकक बनले काही ठिकाणी गणराज्यांचा उदय झाला.

इ.स.पूर्व सहावे शतक महाजनपदाचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात राजे व राज्यांना फार मोठया प्रमाणावर सत्ता होती. परिणामी विस्तीर्ण साम्राज्ये निर्माण झाली. जेथे सम्राटांना निरंकुश सत्ता प्राप्त झाली. आपल्याला अशोक समुद्रगुप्त आणि हर्षवर्धन या प्राचीन काळातील सम्राटांबद्दल माहिती असेलच. मुघलांनी भारतात विशाल साम्राज्याची निर्मिती केली १८५८ मध्ये ब्रिटिशांनी भारतात आपले साम्राज्य मजबूत बनविले व भारत ब्रिटिश सम्राज्याचा भाग बनले. परंतु प्रदीर्घ संघर्षानंतर १९४७ मध्ये आपण आपले स्वातंत्र्य प्राप्त करू शकले. आज आपण सार्वभौम, समाजवादी, निधर्मी लोकशाही आणि प्रजासत्ताकवादी असून आपल्या संपूर्ण देशात एकात्म शासनप्रणाली अस्तित्वात आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २.१

१. ज्या राज्यात भांगडा हे लोकप्रिय नृत्य आहे त्या राज्याचे नाव लिहा.

उत्तर ____________________

२. आसाममध्ये कोणते लोकनृत्य केले जाते ?

उत्तर ____________________

३. इ.स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या सुमारास सलवार कुर्ता आणि अंगरखे यांची भारताला कोणी ओळख करून दिली ?

उत्तर ____________________

४ पटोला या भरतकामासाठी कोणता भाग प्रसिद्ध आहे ?

उत्तर ____________________

### २.१.३ निधर्मी दृष्टिकोन ः

भारतीय संस्कृतीचे निधर्मी स्वरूप अनंतकाळापासून भिन्न सांस्कृतिक समुहांच्या होत असलेल्या सरमिसळीमुळे निर्माण झाले आहे. काही प्रांतातील संघर्षाचे प्रसंग इतस्तः घडले असले तरी प्रामुख्याने लोक अनेक शतके गुण्यागोविंदाने एकत्र राहत आले आहेत. भिन्न सांस्कृतिक समुहांच्या एकत्र येण्यामधून जी सांस्कृतिक संयोगाची प्रक्रिया झाली त्याचे प्रसिद्ध भारतीय सांस्कृतिक परंपरा उत्तम उदाहरण आहे.

आपल्या देशात विचार आणि परंपराचे महान वैविध्य आहे. याची तुम्हाला कल्पना असेलच. इतक्या वैविध्यात कोणत्याही एका विशिष्ट विचाराचे वर्चस्व शक्यच नाही. हिंदू, मुस्लीम, ख्रिस्ती, शिख, बौद्ध, जैन, पारसी आणि ज्यू लोक भारतात राहतात. याची तुम्हाला कल्पना आहे. भारतीय

राज्यघटनेने भारत हे निधर्मी राष्ट्र आहे असे प्रकट केले आहे. प्रत्येकाला आपल्या आवडीप्रमाणे स्वतःच्या धर्माचे पालन प्रसार आणि आचरन करण्याचे स्वातंज्य आहे. राज्यसंस्थेला स्वतःचा धर्म नाही व राज्यसंस्था प्रत्येक धर्माला समान मानते. धर्माच्या आधारावर कोणाशीही भेदभाव केला जात नाही. लोकांनी विशाल दृष्टीकोन अंगीकारून जगा आणि जगु द्या हे तत्व आत्मसात केले आहे.

धर्मस्वातंज्याच्या अधिकारामुळे आपल्या राज्यव्यवस्थेला निधर्मी स्वरूप प्राप्त झाले आहे. पाश्चात्य विचारांच्या संदर्भात निधर्मीवाद म्हणजे धर्म व राज्यसंस्थेची पूर्ण फारकत. भारतामध्ये गुंतागुंतीच्या सामाजिक रचनेशी जुळवून घेण्यासाठी व सर्वांच्या विशेषतः अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी निधर्मिपणा हा अधिक सकारात्मक पद्धतीने रूढ केलेला आहे.

### २.१.४ वैश्विकत्व :

सहजीवन ही संकल्पना देशाच्या भौगोलिक व राजकिय सीमापुरतीच फक्त मर्यादित नाही. भारताला वैश्विक दृष्टिकोन आहे व भारत संपुर्ण जगाला शांतता व सामंजस्य वृद्धिंगत करण्याचा संदेश देत आलेला आहे. वंशवाद व वसाहतवादाविरूद्ध भारताने नेहमीच आवाज उठवलेला आहे. जगात तयार झालेल्या सत्तागटाविरूद्ध भारताने निषेध नोंदविलेला आहे. किंबहुना अलिप्त राष्ट्राच्या चळवळीचा भारत हा एक संस्थापक देश बनलेला आहे. इतर अल्पविकसित देशाच्या विकासासाठी भारत कटीबद्ध आहे. अशा प्रकारे जागतिक बंधुभावाचा एक भाग म्हणून भारत आपली जबावदारी पार पाडत आलेला आहे.

**भारतीय द्विपकल्प पुरातनकाळापासुन राजकिय सीमा पार करून एकात्मिक सांस्कृतिक एकक म्हणुन राहिले आहे. हे लक्षात घेणे गरजेचे आहे.**

### २.१.५ भौतिक आणि आध्यात्मिक :

**"वंश किंवा राष्ट्राचा, व्यवहार, विचार, कला, कौशल्य, आवडी निवडी, मानसिक व सभ्यता या क्षेत्रातील आध्यात्मिक विकास म्हणजे संस्कृती होय."**

पाश्चात्य राष्ट्रांना एक आध्यत्मिक देश म्हणुन भारताची ओळख आहे. परंतु प्राचीनकाळ ते अगदी आजपर्यंतचा इतिहास भौतिक व आध्यात्मिक संस्कृत्याचा विकास भारतात समांतरपद्धतीने घडून आल्याचे दाखवून देतो. हडप्पा संस्कृती ही नागरी संस्कृती होती हे तुम्हाला आठवत असेल. या शहराला सुव्यवस्थित नगररचना होती. या शहरात रस्ते एकमेकांना काटकोनात मिळत. तेथील लोकांना गणित व वजनमापांचे उत्तम ज्ञान होते. त्यांनी त्यांची शहरे शास्त्रीय पद्धीने व विस्तृत भुमीगत गटारांच्या प्रणालीनी बांधली होती. हडप्पामधील लोकाचा बाह्य जगाशी व्यापार होत होता व समुद्रमार्गे ते प्रवास करून समुरेयिन लोकांशी व्यापार करत होते.

औषधे, ग्रह-तारे, वनस्पती यावर उत्कृष्ट ग्रंथ लिहीले गेले होते. "पृथ्वी सुर्याभोवती फिरते" "पृथ्वीगोल आहे." या सारख्या सिद्धांताचा युरोपियन लोकांनी स्वीकार करण्याच्या कितीतरी अगोदर भारतीयांनी शोध लावले होते. त्याचप्रमाणे गणित, वैद्यक आणि इतर शास्त्रांच्या

क्षेत्रात भारतीयाची प्राचीन काळातील कामगिरी उल्लेखनिय आहे. अशा प्रकारच्या ज्ञानाच्या प्रगतीसाठी कोणत्याही प्रकारचे धार्मिक किंवा वैचारिक अडथळे भारतामध्ये नव्हते.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात नास्तिक विचारप्रणालीसुद्धा भारतात विकसित झाल्या. जैन व बौद्ध धर्मात देवाच्या अस्तित्त्वाबद्दल मौन बाळगले याची तुम्हाला कल्पना आहे. यातुन काय सूचित होते ? खचितच भारतीय संस्कृती एकाच वेळी भौतिक व आध्यात्मिक क्षेत्रात विकास पावत आलेली आहे.

> **"भारतीय लोकांची भव्यता आणि साधेपणा ही भारतीय संस्कृतीची जिवंत अभिव्यक्ती आहे."**

## २.२ सांस्कृतिक ओळख,धर्म,प्रदेश आणि वांशिक संस्कृतीः

आपली सांस्कृतिक ओळख, धर्म आणि प्रदेश यासारख्या विविध घटकांवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक भारतीयाला अनेक प्रकारच्या सांस्कृतिक ओळखी आहेत.

एखाद्या विशिष्ट प्रसंगी व्यक्तीची कोणती ओळख अधिक प्रभावी आहे हे ती व्यक्ती राजकिय, सामाजिक किंवा आर्थिक संदर्भात त्याप्रसंगी कशी आहे यावरून ठरते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीकडे इतरांकडे आहेत असे समान घटक असतात. परंतु त्याच्याकडे इतरांकडे नाहीत असे अनेक वेगळे घटक असतात. उदा. संपूर्ण देशाचा विचार करता विशिष्ट धर्माचे आचरण करणाऱ्या व्यक्तीमध्ये, श्रद्धा, उपासना पद्धती आणि पूजा विधी यांच्याशिवाय फारच थोडया बाबींची समानता असू शकते.

अशा प्रकारे सांस्कृतिकदृष्ट्या सर्व हिंदू किंवा सर्व मुस्लिम समान नाहीत. काश्मिरी ब्राह्मण तामिळनाडूमधील ब्राह्मणापेक्षा फारच वेगळे आहेत. त्याचप्रमाणे केरळमधील मुस्लिम व उत्तरप्रदेशातील मुस्लिम हे अनेक बाबतीत एकमेकापासुन वेगळे आहेत. प्रादेशिक ओळखी अधिक वास्तवदर्शी आहेत. एकाच प्रदेशातील भिन्न धर्मिय व जातीय लोकांमध्ये भाषा, अन्न, पोषाख, मूल्यव्यवस्था, एवढेच नव्हेतर जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातही सामायिक सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये असू शकतात. बंगालमधील हिंदु व मुस्लिम दोन्ही समाजाला त्यांच्या बंगालीपणाचा अभिमान वाटतो. इतर ठिकाणीही हिंदू, ख्रिस्ती व मुस्लिम यांच्यामध्ये प्रादेशिक संस्कृतिचे अनेक घटक सामाईक असतात.

तत्त्वतः विविध धार्मिक गट विविध धार्मिक तत्त्वावर श्रद्धा ठेऊन असतात. उदाहरणार्थ वेद आणि शास्त्रे हिंदूना प्रेरक स्त्रोत आहेत. कुराण आणि हदीस मुस्लिमांना त्याचप्रमाणे बायबल ख्रिस्ती लोकांना प्रेरणादायी स्त्रोत आहे.तरीसुद्धा जीवनशैली व कर्मकांडाच्या बाबतीत विविध धर्माच्या अनुयांयामध्ये मोठया प्रमाणावर सरमिसळ झाली आहे.

आदिवासीमध्ये वांशिक संस्कृती प्रबळ असते. उदा. नागालँडसारख्या लहान राज्यात १२ आदिवासी जमाती आहेत. पोषाख, श्रद्धा यांच्याबाबतीत आदिवासी जमातीमध्ये भिन्नत्त्व आहे. छत्तीसगड राज्याच्या बस्तर जिल्ह्यातील अनेक समुह त्यांची उत्पत्ती भिन्न वांशिक गटापासून झाली आहे असा दावा करतात.

## २.३ सांस्कृतिक प्रभाव ः

आधुनिक काळाच्या संदर्भात आपल्या संस्कृतीवर किमान तीन ठळक प्रभावांचा परिणाम जाणवतो. यामध्ये पाश्चातीकरण, लोकसंस्कृती व उदय पावणाऱ्या सांस्कृतिक शैली यांचा समावेश होतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय अभिजन व उच्चवर्गाने तसेच सनदी सेवेमध्ये असणाऱ्या लोकांनी पाश्चात्य पद्धतीचा अवलंब केला. हा प्रभाव काही वर्षानंतर मध्यमवर्गीयांवर व अतिशय कमी प्रमाणात खेडयांवर पडला. खेडयांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांना असलेली वाढती मागणी हा त्यांचा पुरावा आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात नविन शैली उदयास आली. ती राष्ट्रीय शैली बनली. उदाहरणार्थ गांधी टोपी व खादीचा वापर आता उत्सवी व सांकेतिक बनले असले तरी देशाच्या एकात्मतेला त्याने हातभार लावून संस्कृतीला एकात्मता प्रदान केलेली आहे.

लोकसंस्कृती ही एकात्मता प्रदान करणाऱ्या सार्वत्रिक प्रसारमाध्यमांचे अपत्य आहे. चित्रपटांचा परिणाम फार व्यापक आहे. रेडिओ व दूरदर्शन सुद्धा दृष्टीकोन आणि प्रतिमा यांची पुर्नमांडणी करतात. त्यांचा आपल्यावरील प्रभाव नाकारता येत नाही. आधुनिक प्रसारमाध्यमांनी पारंपारिक तसेच लोकप्रिय विषयांना उत्तेजन दिले आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २.२

१. भारताबाहेरून भारतात आलेल्या व स्थायिक झालेल्या लोकांची दोन उदाहरणे द्या.

उत्तर ____________________

२. हवामानाच्या कोणत्या घटकाने भारताला एकात्मता प्रदान केलेली आहे.

उत्तर ____________________

३. हडप्पा संस्कृतीचे समुद्रमार्गे व्यापारी संबंध असलेल्या संस्कृतीचे नाव सांगा.

उत्तर ____________________

## तुम्ही काय शिकलात?

- संस्कृतीची व्याख्या विस्तृत आणि व्यापक आहे. मानवाने आत्मसात केलेली संपुर्ण एकात्म वर्णन म्हणजे संस्कृती. समाजामध्ये राहणाऱ्या लोकांची जीवनशैली असाही तिला अर्थ आहे.

- समाजाचे सदस्य असलेल्या व्यक्तींनी आत्मसात केलेले ज्ञान, श्रद्धा, कला, नैतिकता, कायदा, रूढी यांचा संस्कृतीत समावेश होतो.
- संस्कृतीच्या अनुकुलन आणि व्यापकता या गुणांमुळे संस्कृती अनंत काळ टिकून राहिलेली आहे.
- विविधतेतील एकता हे भारतीय संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट आहे ज्यामुळे भारतीय संस्कृती वैशिष्टयपूर्ण ठरलेली आहे.
- भारतीय संस्कृतीत अनंत काळापासून अनेक संस्कृतीचा मिलाफ होत आलेला आहे व त्यामुळे तिला आजचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.
- मुल्याधिष्ठित जीवन आणि आध्यात्मिकता हा भारतीय संस्कृतीचा गाभा आहे. तरीसुद्धा भारतीय संस्कृतिला वैज्ञानिक मानसिकताही लाभलेली आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. संस्कृतीचे निरनिराळे घटक कोणते ?

२. भौतिक व अधिभौतिक संस्कृतीचा अर्थ स्पष्ट करा.

३. भारतीय संस्कृतीचे निधर्मी वैशिष्टे स्पष्ट करा.

४. भारतीय संस्कृतीची ठळक वैशिष्टे वर्णन करा.

५. खालील विषयांवर टीपा लिहा.

   अ. सांस्कृतिक संयोग

   ब. आध्यात्मिकता

   क. जुळवुन घेणे म्हणजे अनुकुलन साधणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट.

६. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात विविधतेतील एकता सविस्तर वर्णन करा.

## प्रश्नांची उत्तरे

**२.१**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पंजाब | २. | बिहू |
| ३. | कुषाण | ४. | ओरिसा |

**२.२**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुषाण आणि मुघल | २. | मान्सून |
| ३. | सुमेरियन | | |





# विभाग २

# युगायुगातील भारतीय संस्कृती

हा अभ्यासघटक भारतीय संस्कृतीच्या ऐतिहासिक विकासाचे आकलन विकसित करण्याचे लक्ष्य ठेवतो. अनेक काळातून जो भारताच्या संस्कृतीचा विकास झाला आहे त्याचा मागोवा घेतला जाईल. प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक भारताच्या इतिहासातील वैशिष्ट्यामुळे वैशिष्टतापूर्ण सांस्कृतिक विकास ठळकपणे नजरेस आणून देणे हा ह्या अभ्यासघटकाचा उद्देश आहे.

**घटक ३ ः प्राचीन इतिहास ः**

**घटक ४ ः मध्ययुगीन भारत**

**घटक ५ः आधुनिक भारत ः**

# ३

# प्राचीन भारत

अगदी सुरूवातीपासुन भारतीय संस्कृती एकसारखीच राहत आलेली आहे असे तुम्हाला वाटते का ? या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. कोणतीही संस्कृती सारखी किंवा स्थिर राहत नाही. भारताच्या बाबतीत हे खरे आहे. बदलांच्या अनेक अवस्थांतुन ती गेलेली आहे. तुम्हाला माहित आहे का हे बदल का घडून आलेत ? प्रत्येक राजघराणे, प्रत्येक आक्रमक जे भारतात आले आणि स्थायिक झाले त्यांनी त्यांची छाप भारतीय संस्कृतीवर सोडलेली आहे. भारतीय लोकांची सध्याची संस्कृती समजून घ्यायची असेल तर भूतकाळात ती कोणत्या अवस्थांतून गेली हे समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणात आपण प्राचीन भारतातील लोकांच्या जीवनमानाकडे पाहण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण ह्या प्रकरणात हडप्पा काळ, वैदिक, मौर्य आणि गुप्तकाळ या प्राचीन भारतातील विविध अवस्थांबद्दल वाचणार आहोत. इतिहास वाचल्यानंतर अनेक शतकांच्या दीर्घ विकास प्रक्रियेनंतर आधुनिक जग कसे उदयास आले हे आपल्याला समजते. भूतकाळातून आपल्याला जे मिळाले त्याने आपल्या भविष्यकाळाला अर्थ प्राप्त करून दिला. त्यांचे महत्त्व लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबी समजतील.

- इतिहासाचे महत्त्व आणि त्याची आजच्या काळाशी सुसंगतता ओळखणे.
- हडप्पा संस्कृती भारतातील सर्वात पहिली ज्ञात नागरी संस्कृती आहे हे ओळखणे.
- वैदिक समाज धर्म आणि तत्वज्ञानाचे स्वरूप तपासणे.
- जैन आणि बौद्ध धर्मांचा उदयाची कारणे स्पष्ट करणे.
- दक्षिण भारताच्या सुरूवातीच्या काळातील इतिहासाचा मागोवा घेणे.
- विविध साम्राज्यांच्या काळातील ठळक सांस्कृतिक विकासाचा आढावा घेणे.
- प्राचीन भारतातील सांस्कृतिक विकासातील सामान्य गतीशीलत्वाचे परीक्षण करणे.

## ३.१ इतिहासाचे महत्त्व :

मला खात्री आहे तुम्ही स्वतःलाच अनेक वेळा आपण इतिहास का शिकतो हा प्रश्न विचारलेला असेल. भूतकाळाबद्दल जाणून घेण्याचा इतिहास अभ्यास हा एक मार्ग आहे. आपले पूर्वज प्राचीन काळी कसे राहिले आणि तसे ते का राहत होते तसेच त्यांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागला आणि त्यावर त्यांनी कशी मात केली हे समजून घेण्याचा प्रयत्न म्हणजे इतिहास होय. आजकाल भारतात घडणाऱ्या घटनांचे चांगले आकलन करून घेण्यासाठी तुम्हाला भूतकाळाचे चांगले अकलन करून घेणे महत्त्वाचे आहे. अनेक शतकापूर्वी सुरू झालेले तुमच्या देशाचे कथानक तुम्हाला हे प्रकरण वाचल्यानंतर समजेल.

मुख्यतः राजकीय घटनंच्या संदर्भातील घटना आणि तारखा अभ्यासणे म्हणजे केवळ इतिहास नव्हे. तसा इतिहास आजच्या काळात अपेक्षित नाही. जीवनाचे अनेक पैलूंना अंतर्भूत करत इतिहासाची व्याप्ती वाढलेली आहे. यामध्ये जीवनशैलींचा अभ्यास म्हणजे संस्कृतींचा समावेश होतो. संस्कृतीची व्याख्या करताना त्यामध्ये कला, वास्तुकला, वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांचा समावेश करण्यात आलेला होता. आता संस्कृतीमध्ये समाजाच्या सर्व व्यवहारांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे संस्कृतीच्या अभ्यासाचा दृष्टीकोन जो पूर्वी उच्चवर्गापुरता मर्यादित होता तो आता समाजाच्या सर्व समाजघटकांचा समावेश करणारा बनलेला आहे. राजे आणि शासक यांच्याबरोबरच सामान्य माणसे ज्यांनी इतिहास घडविलेला आहे त्या सर्वांचा आता इतिहासात समावेश झालेला आहे. इतिहासात कला, वास्तुकला, भारतातील भाषांची उत्क्रांती, वाङ्मय आणि धर्म यांचा समावेश होतो. समाजाच्या अभिजनवर्गात काय घडामोडी घडतात याकडे आता फक्त लक्ष दिले जात नाही. समाजातील खालच्या स्तरातील लोकांची अभिरूची आणि जाणिवा यांची पुर्नमांडणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या सर्वांमुळे इतिहास अधिक मनोरंजक बनलेला आहे व त्यामुळे आपला समाज चांगल्या प्रकारे समजण्यास त्यामुळे आपल्याला मदत झालेली आहे.

ह्या अभिजातवर्गांनी आणि सामान्य वर्गांनी आपला समाज निर्माण केला ते सर्व लोक मुळ भारतीय नव्हते. त्यापैकी अनेक लोक इतर भागातून भारतात आले व स्थायिक झाले. त्यांनी भारतात विवाह केले व भारतात त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या लोकात मिसळून भारतीय समाजाचा भाग बनले. त्यामुळे आपल्या समाजाला विविध प्रकारच्या लोकांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. विविध प्रकारांच्या लोकांमुळे तितक्याच विविध प्रकारचे धर्म, भाषा आणि रूढी भारतात निर्माण झाले.

इतिहासाचे योग्य आकलन दोन बाबींवर अवलंबून असते. ऐतिहासिक साधनाचा काळजीपूर्वक आणि चिकित्सक वापर यामध्ये वस्तुनिष्ठपद्धतीने इतिहासकारांनी उपलब्ध करून दिलेल्या साधनांचा काळजीपूर्वक आणि चिकित्सक वापर करून वस्तुनिष्ठ विश्लेषणातून काही निष्कर्षात्मक विधानांचे केलेले समर्थन याचा समावेश असलेली एक बाब आहे व दुसरी ऐतिहासिक घटनांना कारणे असतात व ही कारणे पूर्णतः तपासली पाहिजेत याचा समावेश दुसऱ्या बाबीत होतो. भूतकाळाचे चिकित्सक विश्लेषण हेच इतिहासाचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे. ऐतिहासिक ज्ञान अशाच प्रकारे प्रगती करत असते.

भारताचा भूतकाळ हजारो वर्षे मागे जातो. आपल्या पूर्वजांनी मागे ठेवलेला पुराव्याच्या आधारावर आपण आपल्या भूतकाळाबद्दल शिकत आहोत. नजिकचा भूतकाळासंबंधी आपल्याकडे लिखित

आणि मुद्रित पुरावे आहेत. ज्या काळात मुद्रणाची कला माहित नव्हती त्या काळातील हाताने कागदावर लिहिलेल्या दस्ताऐवज उपलब्ध आहेत. परंतु त्यापूर्वी ज्यावेळेस कागद तयार होत नव्हते त्यावेळेस वाळलेल्या पामवृक्षांच्या पानांवर, ब्रिचवृक्षांच्या सालीवर आणि ताम्रपटावर दस्ताऐवज लिहिले जात. काही प्रकारांत मोठया खडकांवर, खांबावर, दगडाच्या भिंतीवर आणि दगडांच्या आणि मातीच्या शिक्क्यावरही दस्ताऐवज कोरले जात. या काळाच्याही पूर्वी ज्यावेळेस लेखनाची कला अवयव नव्हती. त्यावेळेस त्या प्राचीन काळातील लोकांच्या जीवनाबद्दल माहिती ते लोक ज्या वस्तू वापरत त्यातून मिळते. उदा. त्या लोकांची हत्यारे, मातीची भांडी इत्यादीतून. यावस्तू भरीव असून तुम्ही त्याला स्पर्श करू शकता आणि या वस्तू बऱ्याचवेळा उकरून काढाव्या लागतात. ऐतिहासिक खजिना शोधाच्या मोहिमेतील हे सर्व संकेत आहेत. परंतु ते आपल्या संस्कृतीचे भाग आहेत. परंतु हे संकेत अनेक प्रकारचे असू शकतात. हस्तलिखिते या संकेतात सर्वात जास्त आढळणारे संकेत आहेत. हस्तलिखिते पामवृक्षाच्या पानावर किंवा ब्रीचवृक्षाच्या सालीवर (भुर्जपत्रे) किंवा कागदांवर लिहिलेली आहेत. वरील प्रकारातील कागदावर लिहिलेली हस्तलिखिते टिकून राहिलेली आहेत. परंतु ती फार प्राचीन नाहीत. पाली आणि प्राकृत या सारख्या आज भारतात रोजच्या व्यवहारात वापरात नसलेल्या भाषांमध्ये लिहिलेले आहेत. इतर ग्रंथ संस्कृत आणि अरबी भाषा ज्या आपण आपल्या घरात बोलत नाही. परंतु आपल्या धार्मिक समारंभात त्यांचा उपयोग करून त्यांचा अभ्यासही करतो. दुसरी एक भाषा तमिळ जी दक्षिण भारतात बोलली जाते आणि तिचे वाङ्मय फार जुने आहे ती भाषा आजही बोलली जाते. या भाषांना अभिजात भाषा म्हणतात जगातील अनेक भागांचा इतिहास अशा अभिजात भाषेत लिहिले गेले आहेत.

युरोपातील प्राचीन दस्ताऐवज बऱ्याचदा लॅटिन आणि ग्रीक भाषेत लिहिले गेले आहेत. पश्चिम आशियात ते अरबी आणि हिब्रुमध्ये आणि चीनमध्ये अभिजात चिनी भाषेत लिहिले गेले आहेत.

## ३.२ प्राचीन भारत ः

विस्तृत कालखंडभर विस्तारलेला भारताचा इतिहास अखंड व दीर्घ आहे. बलुचिस्तानमधील मेहरगड येथे इ.स.पूर्व ७000 वर्षापर्यंत मागे जातो. परंतु भारतातील पहिली उल्लेखनीय सभ्यता भारतात वायव्य भागात इ.स.पूर्व २७00 या कालखंडात भरभराटीस आली. या सभ्यतेला हडप्पा सभ्यता म्हणतात. या संस्कृतीची बहुतेक सर्व ठिकाणे सिंधू व घग्गर नद्या व त्यांच्या उपनद्यांच्या काठावर विकसित झाली.

हडप्पा संस्कृती भरतातील पहिली ज्ञात संस्कृती आहे. नियोजित आराखडे, आरोग्यदायी सुविधा, भूमिगत गटारांच्या प्रणाली, रूंद सुव्यवस्थित रस्ते या बाबींनी परिपूर्ण सर्वात पहिली शहरे हडप्पावासियांनी निर्माण केली. स्नानगृह स्वयंपाकगृह आणि विहिरी या सुविधांनी युक्त पक्क्या विटांची दुमजली घरे त्यांनी बांधली. तटबंदी असलेल्या या शहरांमध्ये विशाल स्नानगृह धान्य कोठारे आणि सार्वजनिक सभागृहे यासारख्या इतर महत्वाच्या इमरतींचा सुद्धा समावेश होतो.

ग्रामिण भागात राहणाऱ्या हडप्पाकालीन लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता. शहरात राहणाऱ्या लोकांनी अंतर्गत आणि बहिर्गत व्यापार केला आणि मेसोपोटेमिया सारख्या इतर सभ्यतांशी संबंध प्रस्थापित केले. कुंभारी कलेत हे लोक निष्णांत हाते. विविध पद्धतीची भांडी, खेळणी, मूर्त्या उत्खननातून मिळाले आहेत. हडप्पामधील लोकांनी धातू व मिश्र धातू बनविण्याच्या प्रक्रियेचे

तांत्रिक ज्ञान होते. मोहंजोदडो येथे मिळालेल्या शिल्पज्ञान व सौंदर्यदृष्टीचे दर्शन घडते. शिंपले, हस्तीदंत खडे व मणी यांचा विविध वस्तु व कलाकसुरीसाठी उपयोग केला जात होता. गुजराथमधील अहमदाबाद जिल्ह्याच्या ढोलका तालुक्यातील लोथाल येथे गोदी होती. लोथालासुद्धा सुनियोजित तटबंदी असलेले शहर होते. पाश्चात्य जगताशी समुद्री व्यापाराचे ते एक महत्वाचे केंद्र होते. ढोलावीरा हे गुजराथ मधील व कालिबंगन हे राजस्थानातील इतर महत्वाची केंद्रे होती. विविध शिक्यावरील एक शिंगी गेंडा, पिंपळाचे पान व पुरूष देवतांची चित्रे यावरून हडप्पावासीयांच्या धार्मिक समजुतीवर प्रकाश पडतो. हे लोक वनस्पती व प्राणी आणि निसर्ग शक्तीची पूजा करत होते. नंतरच्या काळातील शिव या देवतेशी साम्य असणाऱ्या पुरूष देवतेची व मातृदेवतेची ते पूजा करत तसेच ते मृत्युनंतरच्या जीवनावर व मंत्र आणि जादूटोन्यावर विश्वास ठेवत असावेत. वशिंड असलेल्या बैल हत्ती आणि गेंडा या प्राण्यांच्या आकृती कोरलेल्या शिक्क्यावरून हे प्राणी पवित्र मानले गेले होते हे समजते. अनेक शिक्यात पिंपळाच्या आकृत्या कोरलेल्या दिसतात.

हडप्पाकालिन लोकांना लेखनाची कला अवगत होती. त्यांच्या शिक्यावर विशिष्ट लिपी कोरलेली होती. परंतु दुर्दैवाने कोणीही ती लिपी आजपर्यंत वाचू शकले नाही. त्यामुळे हडप्पाविषयी आपले ज्ञान फक्त पुरातत्व विद्येवर अवलंबून आहे. उत्खननात आढळून आलेल्या शिक्यावरील स्त्री व पुरूषांच्या चित्रावरून तेथील लोकांना सूत कातण्याची व कापड विणण्याची कला अवगत होती हे समजते. कापडाचे उत्पादन करणारे जगातील ते पहिले लोक असावेत.

मेसोपोटोमिया येथे फार मोठया प्रमाणावर हडप्पांमधील शिक्के सापडले आहेत. यावरून मेसोपोटोमिया व सिंधू संस्कृतीतील लोकांमध्ये व्यापार होत असावा हे समजते.

इ.स.पूर्व १८00च्या सुमारास सिंधु संस्कृती ऱ्हास पावली. परंतु तिचा ऱ्हास का घडून आला हे अद्याप समजुन आले नाही.

## ३.३ वेदिक संस्कृती ः

हडप्पा सभ्यतेच्या ऱ्हासानंतर, काही शतकांनी त्या ठिकाणी एक नवी संस्कृती उदयास आली आणि हळूहळू ती गंगा यमुनेच्या मैदानी प्रदेशात विस्तारत गेली. या संस्कृतीला आर्य संस्कृती म्हणतात. आर्यांची संस्कृती व तिच्या पूर्वीची हडप्पा संस्कृती यामध्ये वैशिष्टयपूर्ण फरक होते.

आर्य सिंधू आणि सरस्वती नदीच्या काठावर स्थायिक झाले. सरस्वती नदी सध्या अस्तित्वात नाही. ते ज्या देवी देवतांची पूजा करत त्या देवी देवतांच्या सन्मानार्थ त्यांनी अनेक ऋचा रचल्या. या ऋचा ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद यांच्या स्वरूपात रचल्या आहेत. पवित्र आध्यात्मिक ज्ञान हा वेद या शब्दाचा अर्थ आहे. सर्वोच्च आध्यात्मिक ज्ञान वेदांतून मिळत असल्यामुळे वेदांना दैवी मानण्यात आले आहे. सुरूवातीला मौखिक परंपरेने वेद संक्रमित झाले. सुरूवातीच्या आर्यांच्या जीवना बद्दलचे ज्ञान आपल्याला वेदांतून मिळत असल्यामुळे गत काळाशी संबंधीत संस्कृतीला वैदिक संस्कृती म्हणतात. ऋग्वेद सुरूवातीच्या संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतो तर ब्राह्मणके आरण्यके आणि उपनिषदे यासारखे इतर वैदिक वाङ्मय उत्तर वैदिक काळाचे प्रतिनिधीत्व करते. रामायण आणि महाभारत दोन महाकाव्ये आणि पुराणे बऱ्याच नंतरच्या काळात रचली गेली. तरी सुरूवातीच्या काळातील जीवन व समाजाबद्दल माहिती त्यातून मिळते. उत्तर प्रदेशातील काही भागात या विषयी पुरातत्वीय पुरावे मिळतात.



टिपा

**ऋग्वेदात इंद्राची स्तुती करणाऱ्या २५० ऋचा आहेत. ज्यांत इंद्राला शहरांचा विध्वंस करणारा म्हटले आहे. अग्नीची स्तुती करणाऱ्या २०० ऋचा आहेत. अग्नी देव आणि माणसे यांच्यामधील मध्यस्थ म्हणून मानला जात होता हे तुम्हाला महित आहे का ?**

## समाज आणि धर्म ः

आर्यांचा समाज पितृसत्ताक असूनही स्त्रीयांना सन्मानाने व आदराने वागविले जात होते.

कुटुंब हा सर्वात लहान सामाजिक घटक होता. अनेक कुटुंबांचे मिळून खेडे (ग्राम) बने व अनेक खेडयांचा मिळून देश बने. अनेक खेडयाच्या लोकांनी मिळून एक जमात किंवा जन बने. या जनांवर ज्याची अधिसत्ता चाले त्या प्रमुखाला राजन म्हटले जाई. जमातीचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण करणे आणि कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे त्याचे प्रमुख कार्य होते. राजाला सभा आणि समिती या दोन परिषदा कामात मदत करत. पुरोहित धार्मिक कार्ये पार पाडी व सेनानी लष्करी कार्यावर देखरेख ठेवी. या कालापर्यंत राज्य किंवा शासनव्यवस्था या संकल्पनांचा उदय झालेला नव्हता. परंतु राजा हे पद अनुवंशिक बनलेले होते . जर राजा दुर्बल, अकार्यक्षम आणि क्रूर आढळला तर त्याला पदावरून दूर सारता येत होते.

उलट वैदिक काळात समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या वर्णात विभागलेला होता. या पद्धतीला वर्णव्यवस्था म्हटले जाई. विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांचे गट असे त्याचे सुरूवातीचे स्वरूप होते. परंतु नंतर हे वर्गीकरण अनुवंशिक व दृढ बनले. शिक्षकांना ब्राम्हण, राज्य करणाऱ्या वर्गाला क्षत्रिय, शेतकरी, व्यापारी आणि सावकारांना वैश्य तर कारागिर हस्तकलाकार आणि मजुरांना शुद्र म्हटले जाई. एक व्यवसाय बदलून दुसरा व्यवसाय करणे अशक्य बनले. त्याचबरोबर ब्राम्हणांनी समाजात प्रभावशाली स्थान बळकावले. चार आश्रम ही या काळातील दुसरी सामाजिक संस्था होती. म्हणजे जीवनाचे चार कालखंडात विभाजन केलेले होते. उदाहरणार्थ ब्रम्हाचर्य (गुरूच्या आश्रमातील शिस्तपूर्ण जीवन शिक्षण आणि ब्रम्हचर्याचा काल), गृहस्थ (कुटुंबातील घरगुती जीवनाचा काळ), वानप्रस्थ (हळूहळु विरक्त होण्याचा काळ), संन्यास (व्यावहारिक जीवनापासून आध्यात्माचा पाठपुरावा करत व्यतीत केलेले जीवन). विशेष म्हणजे जीवनाची या अवस्थांतील विभागणी स्त्रीया व खालच्या वर्णातील लोकांना लागू नव्हती. स्त्रीयांचा समाजात आदर केला जात होता. स्त्रीया स्वातंत्र्य अनुभवत होत्या, त्यांना शिक्षण खुले होते आणि त्यांना स्वयंवरातून स्वतःचा जीवनसाथीदार निवडण्याचे बऱ्याचवेळा स्वातंत्र्य दिले जात होते. पडदा व सती पद्धती अस्तित्वात नव्हती. जीवनाचे अंतिम उद्दिष्टय धर्म अर्थ आणि काम या मार्फत मोक्ष किंवा मुक्ती मिळवणे हे होते. भगवद्गीतेमध्ये फळाची अपेक्षा न करता कर्तव्य आणि कर्म करण्याची शिकवण दिली आहे.

पूर्व वैदिक काळातील लोक निसर्ग शक्तीची उपासना करत व ह्या शक्तींना देवी व देवता यांच्या रूपात कल्पीत; इंद्र, अग्नी, वरूण, मरूत ह्या त्यांच्या पुरूष तर उषा, अदिती, पृथ्वी या काही स्त्री देवता आहेत. ऋग्वेदामध्ये सूर्य, सावित्री आणि पुषाण या काही सौर देवतांचे ऋग्वेदात उल्लेख आहेत. वैदिक ऋचांचे पठण करत; आहुती देऊन यज्ञ पार पाडले जात. देवतांच्या कृपाप्रसादासाठी लोक साजुक तूप व इतर पदार्थाची यज्ञात आहूती देऊन त्यांची करूणा भाकत. माणसे व देवता

यांच्यामधील मध्यस्थ म्हणून अग्नी या देवतेला स्थान दिले जाई. वैदिक लोक व्यक्तीगतरीत्या तसेच सामुदायिकरित्या लोकांच्या कल्याणासाठी प्रार्थना करत.

धार्मिक चालिरितीत उत्तर वैदिक काळात बदल घडून आले. पूर्व वैदिक काळातील इंद्र, अग्नी आणि वरूण या प्रभावी देवतांचा प्रभाव आणि लोकप्रियता कमी झाली. त्यांची जागा तीन देवतांनी घेतली ब्रह्म या देवतेला प्रमुख स्थान मिळाले. विष्णु ही देवता संरक्षणकर्ता बनली; तर शीव या देवतेने त्रीमूर्तीची संकल्पना परिपूर्ण केली. धर्म हा आत्यंतिक कर्मकांडी बनला. संस्कृतमंत्र ही ब्राह्मणांची मक्तेदारी बनले. व हे मंत्र धार्मिक विधिीचे अत्यावश्यक भाग बनले यामुळे ब्राह्मण हे अधिक शक्तीशाली व यज्ञ खर्चिक बनले. यज्ञातील सहभाग फक्त वरच्या तीन वर्गांना मर्यादित करण्यात आला. राजे त्यांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी अश्वमेध, राजसूय आणि वाजपेयी यज्ञ करत. वैदिक काळातील काही भाग तीन हजार वर्षाहून आधिक काळ टिकून आहेत. व आजही ते भारतीय संस्कृतीचा भाग आहेत हे आश्चर्यकारक वाटते. वैदिक काळच्या शेवटी समाजात बदल घडू लागले. विश्वाच्या शेवटी समाजात बदल घडू लागले. विश्वाची निर्मिती, मृत्युनंतरचे जीवन आणि जीवनाचे सार यावर पहिल्यांदाच लोक चर्चा करू लागले. काही जीवनाविषयक प्रश्न विस्तृतपणे उपनिषदात चर्चिले गेले आहेत.

### भौतिक जीवन व अर्थकारण ः

आर्य प्रामुख्याने भटके आणि शेती करणारे लोक होते. त्यांनी गाय, घोडा, मेंढी, शेळी यासारख्या प्राण्यांना माणसाळवले. तृणधान्य, डाळी, फळे, भाजीपाला, दूध आणि दुग्धजन्य पदार्थासारख्या साध्या पदार्थाचा आहार ते घेत. सोम नावांचे पेय ते पीत. बुद्धीबळाचा खेळ, रथाच्या शर्यती ही त्यांच्या मनोरंजनाची साधने होती.

सुरूवातीच्या काळात पैसा हे विनिमयाचे साधन नव्हते. कसल्याही प्रकारचे कर नव्हते. बली किंवा स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांची पद्धती अस्तित्वात होती. काळाच्या ओघात विस्तृत प्रमाणावरील लोखंडाच्या वापराने भौतिक जीवनात बदल घडून आले. लोखंडाच्या कुऱ्हाडीने जंगल साफ करण्यास मदत झाली त्यामुळे गंगेच्या मैदानात शेतीचा विस्तार होण्यास मदत झाली. लोखंडी हत्यारामुळे हस्तकला आणि तंत्रज्ञानाचा विकास झाला. लोखंडी हत्यारे व घोडयांच्या वापरामुळे त्यांना लढाया लढणे व शत्रूपासून बचाव करणे सोपे गेले. वाढत्या हस्तउद्योगांचा विकास अतिरिक्त अन्नधान्याची उपलब्धता आणि लोकसंख्येची वाढ कौशल्याचे विशेषीकरण झाले आणि त्यामुळे नागरीकरण घडून आले. मध्यम व मोठया शहरांची वाढ झाली व प्रादेशिक राज्ये उदयाला आली. रंगवलेली राखाडया रंगाची व उत्तरेकडची चकचकीत काळया रंगाची उच्च प्रतीची मातीची भांडी अनेक ठिकाणी आढळून आली. नाण्यांचा व्यवहारात उपयोग होऊ लागला. जमीनीवरून व जलमार्गांनी अशा दोन्ही मार्गांनी व्यापार करण्यात येऊ लागला. त्यामुळे भौतिक वैभव वाढीस लागले.

इ.स.पूर्व सहाव्या शतकात उत्तर भारतात व उत्तर दक्षिण पठारावर महाजनपद नावांची सोळा प्रादेशिक राज्ये निर्माण झाली. त्यांपैकी अंग, मगध, कोसला, काशी, कुरू आणि पांचाल ही महत्त्वाची महाजनपदे होती.

## ३.४ लोकप्रिय धार्मिक सुधारणा ः

इ.स.पूर्व ६00 ते इ.स.पूर्व २00 हा कालखंड राजकिय तसेच सांस्कृतिक एकात्मतेसाठी महात्त्वाचा होता. जैन आणि बौद्ध या दोन महत्त्वाच्या धर्माचा प्राचीन भारतात उदय झाला. ज्यांनी भारतीय संस्कृती व जीवनपद्धतीवर चिरकालीन प्रभाव टाकला. वैदिक धर्माला पूर्वी ब्राह्मणी धर्म असेही म्हटले जायचे. कारण ब्राह्मणांनी त्यामधे महत्त्वाची भूमिका वजावली. कालांतराने त्याला हिंदू धर्म संवोधण्यात येऊ लागले. ब्राह्मणांनी कर्मकांडात स्वतःचे हितसंबंध यज्ञसमाप्तीच्या वेळी मोठया प्रमाणावर देणग्यांची मागणी करत विकसित केले. त्यामुळे आहुतींचा खर्च वढला. याशिवाय ब्राह्मण स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत. त्यामुळे ते अहंकारी बनले. त्यामुळे ब्राह्मणांविरूद्ध नाराजी वाढली व सुधारणांची गरज भासली.

याशिवाय ब्राह्मण स्वतःला इतर वर्णापेक्षा श्रेष्ठवर्णाचे मानू लागले व ते अधिक उद्धट बनले. यामुळे ब्राह्मणांच्याविरूद्ध असंतोष निर्माण होऊन धर्मसुधारणांची गरज निर्माण झाली.

याशिवाय क्षत्रियांची ब्राह्मणांच्या वर्चस्वाच्या दाव्याला तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली व वैश्यांच्या वरच्या सामाजिक वर्णासाठीची मागणी सुद्धा धर्मसुधारणांसाठीची कारणे होती. वैदिक धर्म अधिक कर्मठ व गुंतागुंतीचा बनला. क्षत्रियांनी नेतृत्व दिलेल्या धार्मिक सुधारणांना ज्यांना यज्ञाचा मोठा खर्च परवडत नव्हता अशा गरीब जनसमुहाने पाठिंबा दिला. त्यामुळे इ.स.पूर्व सहाव्या शतकात जैन आणि बौद्ध या नव्या धर्मांनी हिंदु धर्माच्या अनेक श्रद्धा आणि चालींवर प्रभाव पाडला.

जैन धर्माचे संस्थापक वृषभदेव होते असे मानले जाते. चोविस तीर्थकरांपैकी ते सर्वात पहिले तीर्थकर होते. शेवटचे तीर्थकर महावीर होते. त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचा विकास करून त्याला अंतिम स्वरूप दिले. जैनांनी आत्यंतिक क्लेश व विरक्तीवर अधिक भर दिला. भगवान महावीरांनी जैनांना पाच शपथा दिल्या. त्यामध्ये खोटे बोलू नये, जीवांची हिंसा करू नये , संपत्तीचा संग्रह करू नये , चोरी करू नये व ब्रह्मचर्याचे पालन करावे या बाबींचा समावेश आहे. त्यांनी त्यांच्या अनुयायांना सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चारिञ्य या त्रिरत्नांच्या आधारे वर्तन करण्याचा आदेश दिला.

जैनांचे नंतर श्वेतांबर(शुभ्र वस्त्रे परिधान करणारे) व दिगांबर (वस्त्र परिधान न करणारे) अशा दोन पंथात विभाजन घडून आले. या धर्माचे बहुतेक सर्व अनुयायी व्यापारी जमातीतील आहेत.

दुसऱ्या एका अशाच प्रकारच्या धार्मिक चळवळीचे नेतृत्व गौतम बुद्ध (इ.स.पूर्व ५६३ ते इ.स.पूर्व ४८३) वर्धमानाचे त्यांच्यापेक्षा तरूण असलेले समकालीन होते. त्यांनी चार सत्याची शिकवण दिली त्यांच्या शिकवणीचा मार्ग मध्यममार्ग होता. जग दुःखमय आहे. तृष्णा म्हणजे कोणत्याही गोष्टीची इच्छा हे दुःखाचे कारण आहे. दुःखाचे निवारण करता येते. अष्टांगमार्गाच्या अनुसरणाने दुःखाचे निवारण करता येते. हे अष्टांगमार्ग पुढीलप्रमाणे ः

१. सम्यक दृष्टी (योग्य आकलन)

२. सम्यक संकल्प (योग्य विचार)

३. सम्यक वाक (सत्य वचन)

४. सम्यक कर्मान्त (योग्य कृती)

५. सम्यक आर्जव (योग्य मार्गाने उपजिविका करणे.)

६. सम्यक व्यायाम (योग्य व्यायाम व सुविचारांचा आचार)

७. सम्यक स्मृती (योग्य अयोग्य कृतीचा विवेक ठेवणे.)

८. सम्यक समाधी (चित्ताची एकाग्रता साधणे)

मुळात या दोन्ही धार्मिक चळवळी ब्राम्हणांच्या वर्चस्वाविरूद्ध होत्या. दोन्ही सुधारणा चळवळींनी आदर्श नैतिक जीवन व नैतिक मुल्यांना महत्त्व दिले. दोन्ही चळवळींनी साधुचे संघ निर्माण केले. तसेच त्यांनी मठ स्थापन केले. जैनांच्या मठांना स्थानक व बुद्धांच्या मठांना विहार म्हणतात.

नंतरच्या हिंदू परंपरेने बुद्धाला विष्णुचे अवतार मानले. बौद्ध धर्माचे हिनयान व महायान या दोन उपपंथात विभाजन झाले. वज्रयान हा या पंथाची नंतर त्यात भर पडली. बौद्ध धर्माचा नंतर श्रीलंका, म्यानमार, कंबोडिया, व्हिएतनाम, चीन, जपान, थायलंड, कोरिया, मंगोलिया आणि अफगाणिस्थान अशा जगाच्या फार मोठया भागात प्रसार झाला. आजही या देशांतील बहुसंख्य लोकसंख्या बौद्ध आहे.

हिंदुधर्म इतिहासकालातून बदललेला आहे. हिंदुधर्मांतर्गत विविध श्रद्धा व पंथीय परंपरा निर्माण होऊन नानाविध पंथ निर्माण झाले. बौद्ध धर्माप्रमाणेच हिंदु धर्माच्या उपपंथाचा आग्नेय आशियात प्रसार झाला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ३.१

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. हडप्पा सभ्येतील सर्वात जास्त ठिकाणे कोठे सापडली ?

उत्तर ______________________

२. हडप्पा सभ्यतेतील लोकांचा मुख्य व्यवसाय काय होता ?

उत्तर ______________________

३. नवअश्मयुगीन वस्तीचे पुरावे कोठे मिळतात ?

उत्तर ______________________

४. हडप्पा सभ्यतेत भाषा उपयोगात होती हे कशावरून सांगता येईल ?

उत्तर ______________________

५. हडप्पा सभ्यतेतील लोकांना शिल्पकलेतील कौशल्य होते हे तुम्हाला कशावरून समजेल ?

उत्तर ____________________

६. वैदिक अर्यांच्या वाङ्मयाची नावे लिहा.

उत्तर ____________________

७. माणसाला मोक्ष किंवा मुक्ती कशी मिळते ?

उत्तर ____________________

८. पहिल्यांदा वैदिक यज्ञ कसे पार पाडले जात ?

उत्तर ____________________

९. राजाला त्याचे राजपद सिद्ध करण्यासाठी कोणते यज्ञ करावे लागत ?

उत्तर ____________________

१०. उत्तर वैदिक आर्यांनी त्यांच्या धार्मिक चालीरितीत कोणते बदल केले ?

उत्तर ____________________

११. आर्यांची मनोरंजनाची साधने कोणती होती ?

उत्तर ____________________

१२. इ.स.पूर्व सहाव्या शतकातील उत्तर भारत व उत्तर दख्खनमधील महाजनपदांची नावे लिहा.

उत्तर ____________________

१३. जैनधर्माचे किती उपपंथात विभाजन झाले ?

उत्तर ____________________

१४. अष्टांगिकाला किती मार्ग आहेत ?

उत्तर

१५. जैन व बौद्ध धर्मातील मठांना काय म्हटले जाई ?

उत्तर

१६. बौद्ध धर्माच्या तीन पंथाची नावे लिहा.

उत्तर

## ३.५ इराणी आक्रमणे व त्यांचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम

इ.स.पूर्व सहाव्या शतकाच्या पूर्वार्धात वायव्य भारतात अनेक लहान जमातीची राज्ये होती. या जमातींना एकच करील अशी एक सुद्धा सार्वभौम सत्ता नव्हती. इराण किंवा पार्शियाच्या अकेमेनियन राजांनी या भागातील राजकिय ऐक्याच्या अभावाचा फायदा घेतला. अकेमेनियन साम्राज्याचा संस्थापक सायरस आणि त्याचा वारस दारियस यांनी पंजाब व सिंधचा काही भाग जिंकुन आपल्या साम्राज्याला जोडला. अकेमेनियन साम्राज्याच्या ताब्यातील हा प्रदेश दाट लोकवस्तीचा व अधिक सुपीक होता. भारतीय नागरिकसुद्धा अकेमेनियन लष्करात भरती केले जात.

वायव्य भारतातील इराणी राजवट जवळ जवळ दोन शतके टिकली. या काळात या दोन प्रदेशात कायमचे संबंध प्रस्थापित झाले असावेत. स्कायलॅक्स या इराणी राजाच्या भारतकडील समुद्री मोहिमेमुळे भारत व इराणमध्ये व्यापारउदीम वाढीस लागला असावा काही प्राचीन इराणी सोन्याची व चांदिची नाणी पंजाबात मिळाली आहेत.

भारतातील वायव्य सीमेलगतच्या पर्वतमय खिंडी फार पूर्वीपासून वापरल्या जात होत्या. परंतु पहिल्यांदांच दारियसच्या नेतृत्वाखाली आक्रमक शाही सैन्य या खिंडीतून भारतात आले. असा अंदाज बांधता येतो. नंतर अलेक्झांडरच्या काळात त्याच्या सैन्याच्या काही गटाने पंजाबवर आक्रमण करताना या मार्गाचा अवलंब केला.

मौर्य साम्राज्यातील प्रशासनावर पार्शियन राजांचा काही प्रमाणावर प्रभाव जाणवतो. पार्शियन किंवा इराणी क्षत्रप हे प्रादेशिक राज्यपालाला दिलेले पदनाम नंतर अनेक वर्ष भारतात प्रांतिक राज्यपालांसाठी वापरले जात होते. हे या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे.

इराणी साम्राज्याशी असलेल्या संबंधाचाही सांस्कृतिक परिणाम ठळकपणे जाणवतो.

इराणी शिल्प लेखकांनी भारतात नविन लिपी आणली या लिपिला खारोष्टी लिपी म्हणतात. ही लिपी अरोमिक लिपी पासून निर्माण झाली होती व ती उजवीकडून डावीकडे लिहीली जाई. वायव्य भारतात मिळालेले अशोकाचे अनेक शिलालेख खारोष्टी लिपीत आहेत. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत वायव्य भारतात हि लिपी अस्तित्वात होती. अशोकाच्या शिलालेखाच्या सरनाम्यातून सुद्धा आपल्याला पर्शियन प्रभाव शोधता येतो. मौर्यकला व वास्तुकलाही फार मोठ्या प्रमाणावर पर्शियन कलेने प्रभावित झालेली आहे. अशोकाचक्र घंटेच्या आकाराचा स्तंभशीर्ष असलेला एकसंघ

स्तंभ पर्शिओपोलिस येथे मिळालेल्या अकेमेनियन सम्राटाच्या विजय स्तंभासारखाच आहे.

चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात सम्राटाच्या वाढदिवसाच्या दिवशी जो समारंभपूर्वक सकेश अभिषेक सम्राटाला केला जायचा त्या विधीवरही आपण पार्शियन प्रभाव पाहू शकतो. हा विधी पार्शियन पद्धतीचा नमुना होता. ज्या ज्या वेळेस राजाला संन्यासी किंवा राजवैद्याशी चर्चा करायची असेल त्या त्या वेळेस त्याने या चर्चा ज्या दालनात पवित्र अग्नीची धुनी असेल त्याच ठिकाणी अशा चर्चा व्हाव्यात असे अर्थशास्त्रात नमुद केले आहे. त्यापासून प्राचीन इराण्याच्या झोरीष्ट्रीयण धर्माचा भारतीयांवर प्रभाव होता हे दिसून येते.

## ३.६ ग्रीक (मॅसेडोनियन) आक्रमणे व त्यांचा भारतीय जीवनावरील परीणाम ः

इ.स. पूर्व चौथ्या शतकात पश्चिम अशियावरील वर्चस्वासाठी ग्रीक आणि इराणी लोक एकमेकाविरूद्ध लढले. मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडरच्या नेतृत्वाखाली ग्रीकांनी अकेमेनियन साम्राज्याचा शेवट केला. त्याने आशिया मायनरचा प्रदेश, इराक, इराण जिंकुन नंतर भारताकडे कूच केले. ग्रीक इतिहासकार हरोडेरोस याच्या मताप्रमाणे भारताच्या विस्मयकारक संपत्तीमुळे अलेक्झांडर भारताकडे आकर्षित झाला.

अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या वेळेस वायव्य भारताचे अनेक लहान लहान राज्यांमध्ये विभाजन झाले होते. या राज्यांमधील आपआपसांतील दुहीमुळे ग्रीकांना त्यांच्यावर एकापाठोपाठ विजय मिळवता आले. ज्यावेळेस अलेक्झांडरच्या सैन्याने मगधाच्या नंद राजाच्या प्रचंड सैन्याबद्दल व शक्तीबद्दल ऐकले त्यावेळेस अलेक्झांडरच्या सैन्याने पुढे कुच करण्यास नकार दिला. त्यामुळे अलेक्झांडरला परत फिरावे लागले. मॅसेडोनिया येथे परत जाताना वयाच्या ३२व्या वर्षी बॅबेलोनिया येथे त्याचा मृत्यु झाला.

त्याच्या मोहिमेचे पुर्नसंघटन करण्यासाठी अलेक्झांडरकडे वेळ नव्हता. प्रत्यक्ष पराभूत केलेल्या ज्या ज्या राजांनी अलेक्झांडरचे वर्चस्व मान्य केले अशा राजांना त्यांचे राज्य त्याने परत केले. अलेक्झांडरने पूर्व युरोप व पश्चिम आशियातील मोठा प्रदेश या त्याच्या वर्चस्वाखालील प्रदेशाचे तीन विभागात विभाजन करून त्यावर तीन राज्यपालांची नेमणूक केली त्याच्या पूर्वभागातील प्रदेशाची जबाबदारी सेल्युकस निकोटर याच्याकडे दिली. सेल्युकस निकोटरने अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर स्वतःला राजा म्हणून घोषित केले.

प्राचीन भारतीयांचा मॅसेडोनियाशी अल्पकाळ संबंध आला तरी त्याचा परिणाम अनेकांगी होता. अलेक्झांडरच्या आक्रमणामुळे समुद्री मार्ग व जमिनीवरील मार्ग भारत व पाश्चात्य देशांमध्ये खुले झाले. परिणामतः युरोप व भारत यांच्यामध्ये पहिल्यांदाच इतके जवळचे संबंध प्रस्थापित झाले. घनिष्ठ व्यापारी संबंथ सुद्धा प्रस्थापित झाले. व्यापारी व कारागिरांनी याच मार्गाचा उपयोग केला. अलेक्झांडरने त्याचा मित्र नेअराचिस याला सिंधू नदीच्या मुखापासून युफ्रेटीस नदीच्या मुखापर्यंतचा समुद्रमार्गाच शोध घेत योग्य बंदरे शोधून काढण्यास सांगितले.

अलेक्झांडरच्या आक्रमणाने आपआपसात लढणाऱ्या वायव्य भारतातील जमातींवर त्याने विजय मिळवल्यामुळे या भागाच्या राजकिय ऐक्याचा मार्ग खुला झाला. अलेक्झांडरच्या आक्रमणामुळे चंद्रगुप्त मौर्याला हा भाग आपल्या साम्राज्याला जोडणे अधिक सुलभ झाले असे दिसते. अलेक्झांडर

निघुन गेल्यावर त्याचा सेनापती सेक्युकस निकोटर याचा चंद्रगुप्ताने पराभव केला आणि त्यामुळे अफगाणिस्थानपर्यंतचा सर्व वायव्य भारतातील प्रदेश चंद्रगुप्ताच्या वर्चस्वाखाली आला.

ग्रीक कलेचा भारतीय मूर्तीकलेवरही प्रभाव पडल्याचे दिसून येते. ग्रीक व भारतीय शैलीच्या मिश्रणातून गांधार शैलीचा उदय झाला. ग्रीकांकडून भारतीय चांगल्या आकाराची सुंदर सोने व चांदीची नाणी बनवण्याची कलाही शिकले. ग्रीकांचा भारतीय ज्योतिष विद्येवर परिणाम घडून आला.

आरियान खलाशी नेअरचस आणि मॅजेस्थेनिस यांनी केलेल्या वर्णनावरून त्या काळच्या उत्तर व वायव्य भारताच्या आर्थिक व सामाजिक स्थितीबद्दल माहिती मिळते. भारताची विविध हस्तउद्योगातील प्रगत अवस्था बाह्य जगाशी अस्तित्वात असलेला अल्प व्यापार, भारताचे सांपत्तिक वैभव याबद्दलची माहिती आपणास वरील लेखाच्या वर्णनातून मिळते. सुतारी कामातून तयार झालेल्या मालाच्या व्यापाराची या काळात भरभराट झाली होती. याची विस्तृत वर्णने वरील लेखनातून मिळतात अलेक्झांडरने नेअरासच्या नेतृत्त्वाखाली भारताच्या पश्चिम किनाऱ्याने जे आरमार पाठविले होते त्याची निर्मिती भारतात झाली होती. अलेक्झांडरच्या स्वारीमुळे भारतीय जीवन व विचार शैलीची माहिती पाश्चिमात्यांना समजायला मदत झाली. रोमन साम्राज्यात भारतीय तत्त्वज्ञानाची तत्त्वे विचार यांचा जो शिरकाव झालेला होता तो अलेक्झांडरच्या स्वारीमुळे झाला होता असे म्हटले जाते.

ग्रीक लेखकांनी अलेक्झांडरच्या स्वारीचा तारखेच्या संदर्भासह वृत्तांत लिहिल्यामुळे प्राचीन भारताच्या इतिहासाचा कालानुक्रम समजण्यास मदत होते. अलेक्झांडरच्या स्वारीचे वर्ष इ.स. पूर्व ३२६ दिले असल्यामुळे ही घटना भारतीय ऐतिहासिक घटनांचा क्रम मांडायला अत्यंत महत्त्वपूर्ण व उल्लेखनिय आहे.

## ३.७ महान सम्राट अशोक : भारतीय संस्कृतीच्या वैभवाचे प्रतिनिधित्व करणारा सम्राट :

भारताच्या इतिहासात अशोकाचे स्थान एकमेवाद्वितीय आहे. वैश्विक शांतता, अहिंसा, धार्मिक सलोखा या त्याच्या धोरणांना जागतिक राजवंशाच्या इतिहासात तोड नाही. अशोकाने आदर्शवादी, तत्त्वज्ञानाची एक राजा म्हणुन राजेशाहीशी यशस्वी सांगड घातली. इतर राजांप्रमाणेच अशोकानेही त्याची कारकीर्द युद्धाने म्हणजे कलिंगावरील आक्रमणाने केली. या युद्धात जीवन व संपत्तीची जी कल्पानातीत हानी झाली त्यामुळे अशोक इतका हेलावून गेला की त्यानंतर त्याने पुन्हा कधीही युद्ध न करण्याची प्रतिज्ञा केली. युद्धाशिवाय धर्माने विजय मिळविण्याचे धोरण त्याने अंगीकारले त्याच्या तेराव्या मुख्य शिलालेखात अशोकाने खरा विजय कारूण्य आणि सद्गुणांनी मिळतो असे नमूद केले आहे. तो ज्या काळात राहत होता त्या काळात लष्करी सामर्थ्य हाच खरे वर्चस्व मोजण्याचे परिणाम होते. त्याकाळात त्याने वरील प्रकारचे निर्णय घेतले त्यामुळेच अशोकाच्या इतिहासात आगळेवेगळे स्थान मिळाले आहे.

अशोक खरा मानवतावादी होता. त्याच्या धोरणाचा उद्देश लोककल्याण होता. त्याचा धम्म सामाजिक जबाबदारीवर अवलंबून होता. ब्राह्मण आणि श्रमणांचा (साधुचा) आदर करण्याबरोबरच वडिलधाऱ्यांचा मान ठेवावा. कोणत्याही जीवाची हत्या करू नये, धार्मिक सलोखा राखावा असे त्याने सांगितलेल्या धम्मात त्याला अपेक्षित होते. त्याच्या धम्मात सर्व धर्मातील चांगल्या बाबी एकत्र

केल्या होत्या. अशोकाचे सहिष्णुत्व सिद्ध झालेले होते. स्वतः बौद्ध धर्मी राजा असुनही त्याच्या प्रजेवर हा धर्म लादणाचा त्याने कधीच प्रयत्न केला नाही. त्याच्या बाराव्या मुख्य शिलालेखात इतर धर्माचा आदर करण्यातच आपल्या धर्माचाही आदर आहे असे म्हटले आहे.

एक राजा म्हणून अशोकाने स्वतःपुढे फार मोठे आदर्श ठेवले होते. सर्व प्रजा माझी मुले आहेत असे तो समजे तो त्याचे विचार व तत्त्वज्ञान दगडी खांब व दगडी पृष्ठभागावर कोरून लोकापर्यंत पोहचवत असे. त्याचे शिलालेख मौर्यांच्या काळातील वास्तुकला आणि अभियांत्रिकी कौशल्याचे उत्कृष्ठ नमुने आहेत. ती त्याच्या काळातील जिवंत स्मारके आहेत.

कर्मकांडावरील खर्च व्यर्थ व महागडे आहेत हे दाखवून देत त्याने लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्याने त्याच्या प्रजेला अहिंसेचा अवलंब करण्यास सांगितले त्यांनी स्वतः, शाही शिकारी आणि मौजेखातरच्या सहली बंद करून धर्मप्रसारासाठी धम्म यात्रा सुरू केल्या. त्याच्या साम्राज्यांतर्गत त्याने एकच धम्म, एकच भाषा व एकच व्यवहारी ब्रह्मी लिपी यांचा अवलंब करून भारताच्या राजकीय ऐक्यात भर घातली. बौद्ध काळापासून भारत हे एक निधर्मी राष्ट्र आहे. जरी अशोक स्वतः बौद्ध धर्मअनुयायी बनला तरी, त्याने हा धर्म कोणावर लादला नाही. परंतु त्याने सहिष्णु धार्मिक धोरणाचा अवलंब केला.

जगाच्या विविध भागात शांतीचा संदेश पोहचविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळेही त्याला किर्ती मिळाली. त्याने ग्रीक राजाकडे आणि पश्चिमेकडे राजदूत पाठविले व भारतीय संस्कृतीचा अतिदूरच्या प्रदेशात प्रसार झाला. बौद्ध परंपरेप्रमाणे अशोकाने श्रीलंका मध्य आशिया या ठिकाणी प्रचारक पाठविले. भारतात आज बौद्ध धर्म अत्यंत क्षीण असतांना जगातील विविध भागात बौद्ध धर्माचा प्रसार झालेला आहे. आजही हा धर्म श्रीलंका व अतिपूर्वेकडच्या देशात लोकप्रिय आहे.

वैदिक काळात उदयास आलेली वर्णव्यवस्था जिचा आजच्या काळात जातीव्यवस्था म्हणतात. हळुहळू संपूर्ण भारतात प्रभावी समाजिक संघटना बनली. नविन धर्मपंथ व तत्त्वज्ञानामुळे शहरांची हस्तउद्योगांची व व्यापाराची वाढ होऊन देशातील सांस्कृतीक एकात्मतेला चालना मिळाली. अशोकाने संपूर्ण देशाचे एकाच साम्राज्याखाली ऐक्य घडवून आणले व राज्याचे धोरण म्हणून युद्धावर बंदी आणली. दुसऱ्या बाजुला सर्व प्राणीमात्राचे जो तो देणे लागतो त्याच्या परतफेडीसाठी तो कटिबद्ध आहे हे तो नमुद करतो.

## ३.८ कला आणि वास्तुकला मौर्यकालातील सुरूवात ः

मौर्यांचे कला आणि वास्तुकला क्षेत्रातील योगदान वैशिष्टयपूर्ण आहे. बुद्धाच्या जीवनातील विविध प्रसंगाचे स्मरण करण्यासाठी अशोकाने चौऱ्यांशी हजार स्तूप बांधले. मॅगेस्थितसच्या मते पाटलीपुत्राची भव्यता पर्शियातील शहराइतकीच होती.

अशोकाचे शिलालेख वरच्या टोकावर स्तंभशीर्ष असलेल्या एकसंध वालुकाश्माच्या चकचकीत दगडी खांबावर कोरले आहेत. बिहार येथिल लौंरिया नंदनगडया स्तंभ शिलालेख उपलब्ध जतन केलेल्या शिलालेखातील सर्वोतकृष्ठ शिलालेख आहे. हा स्तंभ ३२ फुट उंच असुन त्या स्तंभाच्या टोकावर ५२ टनी बसलेल्या सिंहाचे स्तंभशीर्ष आहे. या स्तंभाचे अभियांत्रिकी कौशल्य वाखणण्यासारखे आहे. रामपुरवा येथिल बैलाचे स्तंभशीर्ष हे दुसरे उल्लेखनीय उदाहरण आहे. सर्वात प्रसिद्ध

स्तंभशीर्ष सारनाथ येथिल स्थंभाचे आहे. या स्तंभावर चार सिंह व धम्मचक्र आहे. आधुनिक भारतीय प्रजासत्ताकाचे राजचिन्ह म्हणुन सारनाथ स्तंभावरील या स्तंभशीर्षाचा आपण स्वीकार केलेला आहे. हे तुम्हाला माहित असेलच.

स्तंभाव्यतिरिक्त काही मौर्य प्रतिमा प्रकाशात आलेल्या आहेत. यातील सर्वात प्रसिद्ध दिदारगंज येथिल यक्षिणीची प्रतिमा आहे. या शिल्पाचे सौंदर्य, शिल्पातील तंतोतंत कोरलेली कारागिरी व एकसंध पाषाणात कोरलेले शिल्प या दोन बाबीत सामावलेले आहे. अशोकाच्या स्थंभाप्रमाणेच या शिल्पाचा पृष्ठभाग मौर्याच्या विशिष्ठ पॉलिस पद्धतीने चकचकीत केलेली आहे. इतकी शतके होऊनही या शिल्पांवरील चकाकी आजही गेली नाही हे कळल्यावर तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्याकाळातील जनसामान्यांची भाषा असलेली प्राकृत भाषा ही सर्व शिलालेखाची भाषा राहिली असून ब्राह्मी या भाषेची लिपी होती जी भारतातील सर्वात प्राचीन लिपी आहे.

मौर्य वास्तुकलेची दुसरी नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे त्यांच्या काळातील पाषाणात कोरलेल्या वास्तुकलेचा प्रारंभ झाला. या वास्तुकलेला नंतरच्या राजांनांही उत्तेजन दिले. अशोकाचे शिलालेख स्थानिक भाषेत व लिपीत कोरले आहेत.

## ३.९ मौर्यात्तरकालीन सांस्कृतिक विकास ः

ग्रीक शक पर्शियन कुषाण हे परकीय असले तरी स्थानिक लोकसंख्येत ते हळूहळु मिसळून गेले. ते लढवय्ये असल्यामुळे स्मृतीकारांनी त्यांना क्षत्रियांचा दर्जा दिला. फार मोठया प्रमाणावर परकीयांना फक्त मौर्यात्तर काळात सामावून घेण्यात आले. हा काळ सुमारे इ.स. पूर्व ३00 ते इ.सनाचे तिसरे शतक असा मानला गेला आहे.

या काळात राजकिय व आर्थिक जीवनात फार मोठे बदल घडून आले आणि सांस्कृतिक जीवनातील विविध घटकात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. उदा. धर्म, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान.परराष्ट्र व्यापारात खुष्कीचा मार्ग व समुद्रमार्ग या दोन्ही मार्गाने होणाऱ्या व्यापारात भरीव वाढ झाली व त्याच्याबरोबर विविध हस्तउद्योगांचा उदय झाला.

अनेक परकिय राजांनी वैष्णव धर्म स्विकारला. इंडो ग्रीक राजा ॲन्टीक्लइडसचा ग्रीक राजदूत हेलिओडरस याने बेसनगर येथे एक स्तंभ उभारला. या स्तंभावर त्याने भागवत म्हणजे विष्णुचा भक्त असे स्वतःचे वर्णन कोरून ठेवले आहे. त्याचप्रमाणे कनिष्काच्या काही नाण्यावर शिव प्रतिमा कोरलेल्या आहेत. तुम्हाला आठवत असेल एका कुषाण राजाचे नाव विष्णुभक्तीचे निदर्शक असे वासुदेव होते. कनिष्काच्या राज्यरोहणाच्या वर्षाला म्हणजे इसवीसन ८व्याला असलेले महत्त्व तुम्हाला माहित आहे का ? ही शालीवाहन शकाची सुरूवात होती.

विविध वांशिक गट व भारतीय लोक यांच्यात परस्परसंबंधानुसार कोणत्या धर्माची निवड करायची हे निश्चित होई. काही परकिय राजांनी बौद्ध धर्म स्वीकारला. काही राजांनी बौद्ध धर्मामुळे जातीची समस्या निर्माण होत नसल्यामुळे बौद्ध धर्माचा स्विकार केला. मिनॅनडर नावाच्या राजाने बौद्ध धर्मा चा स्वीकार केला. बौद्ध धर्मासाठी कनिष्काने बरेच कार्य केल्यामुळे बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी कनिष्काचे कार्य सुद्धा संस्मरणीय आहे. परंतु बौद्ध धर्माच्या या वाढत्या लोकप्रियतेमुळे बौद्ध धर्मात महत्वाचे बदल घडून आले. परकीयांना मुळ बौद्ध धर्म बराच संदिग्ध वाटत होता. त्यामुळेच त्यांनी साध्या सोप्या वाटणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या पद्धतीच्या धर्मामुळे जे त्यांच्या धार्मिक







इच्छांची पूर्ती करू शकले. याच सुमारास बौद्ध धर्माचे महायान व हिनयान पंथात विभाजन झाले. महायान पंथ कर्मकांड विधी व मूर्तीपूजेवर तसेच बोधीसत्त्व (बुद्धाचे विविध अवतार) यावर विश्वास ठेवतो. तर हिनयान पंथ जुन्या बौद्ध परंपरा व तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवतो.

बौद्ध धर्माच्या शिकवणीला अंतिम स्वरूप देण्याच्या हेतूने ज्या कनिष्काने चौथी बौद्ध परिषद बोलवली, त्या कनिष्काने महायान बौद्ध पंथाला राजाश्रय दिला. बुद्धाच्या स्मृतीप्रित्यर्थ त्याने अनेक स्तूप बांधले.

### कला आणि शिल्पकला ः

मध्य आशियातून झालेल्या आक्रमणांमुळे भारतीय कला व शिल्पकलेचा अधिक विकास घडून आला. पाश्चिमात्य जगाशी आलेल्या निकट संबंधामुळे भारतीय कलेत अनेक नविन बाबींचा समावेश होऊ शकला. गंधार कला शैलीचा विकास हा सर्वात महत्त्वपूर्ण, अशी बाब या संदर्भात होती या एका प्रकाराने ग्रीक व रोमन कला प्रकारातून अनेक वैशिष्टे घेतली आहेत. कुषाण काळातील बुद्धाच्या अनेक मूर्तीचे चेहरे अपोलोनियन पद्धतीचे केशरचना ग्रीक रोमन शैलीची व वेशभूषा रोमन तांगा शैलीची होती. कलेमध्ये या सर्व बाबी कुषाण काळात विविध देशातील विविध शैलीत पारंगत असलेले कलाकार एकत्र आल्यामुळे समाविष्ठ झाल्या.

मथुरा कला शैली ही भारतीय कला शैली असुनही ही शैलीसुद्धा परकियांच्या आक्रमणामुळे प्रभावित झाली. शक कुषाण प्रभावाने प्रभावित झालेल्या शाडूच्या मातीच्या (टेराकोटा) आणि तांबडया वालुकणाच्या अनेक मूर्ती टिकून आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाची मूर्ती म्हणजे शीर नसलेला मथुरा येथिल कनिष्काचा पुतळा. बुद्धाचे अस्तित्त्व दाखविण्यासाठी पूर्वी प्रतीके व संकेत वापरले जात. परंतु मथुरा शैलीने पहिल्यांदाच बुद्धाच्या मूर्ति बनवल्या. जातकसारख्या लोककथा लांबचलांब दगडी पृष्ठभागावर व सरळ आयताकृती चौकटीत कोरल्या जात. बहुसंख्य बौद्ध मूर्तीबरोबरच महावीराचे पुतळे सुद्धा निर्माण करण्यात आले.

### दक्षिण भारत ः

मौर्याच्या अधिपत्याखाली दक्षिणेत सातवहानांना महत्त्वाचे स्थान होते. अशोकाच्या मृत्युनंतर त्यांना पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. ते अतिशय शक्तीशाली बनले व त्यांनी गोदावरी नदीच्या तीरावर प्रतिष्ठान किंवा पाटलीपुत्र येथे आपली राजधानी स्थापन केली. सातवाहनांचा लगेचच परकीय असलेल्या क्षत्रपांशी विशेषतः शकांशी संघर्ष सुरू झाला. गौतमीपुत्र आणि त्याचा मुलगा वसिष्ठीपुत्र सातकर्णी यांच्या काळात सातवाहन राजे अतिशय शक्तीशाली बनले. त्यांनी त्यांच्या साम्राज्याचा विस्तार केला. जंगले साफ केली. रस्ते बनविले. आणि त्यांच्या राज्यात प्रशासन चांगल्या पद्धतीने चालविले. नविन शहरांचा उदय झाला. पर्शिया, इराक, कंबोडिया या दूरवरच्या देशांशी व्यापार केला जात होता.

### कलिंगाचा खारवेल ः

मौर्य राजवटीनंतरच्या काळात दुसरे एक राज्य महत्त्वाच्या स्थानी उदयाला आले ते म्हणजे कलिगाचे राज्य होय. कलिंगाच्या राज्यात आधुनिक ओरीसा व उत्तर आंध्र प्रदेशाचा समावेश होत होता. या प्रदेशाचा खारवेल हा महत्त्वाचा राजा होता. उदयागिरी टेकडयावरील जैन गुफामधील शिलालेखातून त्याच्या कारकिर्दीबद्दल विस्तृत माहिती मिळु शकली असती, परंतु त्या शिलालेखाचा सहज उलगडा

होऊ शकत नाही. हा राजा महान प्रशासक व तसेच शूर योद्धा होता. हे शिलालेखातून नक्की समजते. त्याने रस्ते व बागांच्या उभारणीची व सार्वजनिक उपयोगाची कामे केली.

### दक्षिण भारत ः

कृष्णा आणि तुंगभद्रेच्या दक्षिणेच्या प्रदेशाला दक्षिण भारत म्हणतात. हा प्रदेश चोल चेर आणि पांडय राजा ज्यांचे एकमेकांशी नेहमीच संघर्ष होत अशा राजांचे प्रदेश होते.

### साधने ः

या राजांच्या बद्दल आणि येथील प्रदेशांच्या लोकजीवनाबद्दल माहिती सांगणारे मुख्य साधन म्हणजे संगम साहित्य होय. म्हणुनच इ.स.पुर्व पहिल्या शतकापासुन दुसऱ्या शतकाच्या अखेरीपर्यंतच्या दक्षिण भारतातील या ऐतिहासिक काळाला असे म्हणतात.

### चोल ः

करिकाल हा या राज्याचा महत्त्वाचा राजा होता. या राजाने चेर व पांडय यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला. सिलोन या देशाचे आक्रमण मागे सारण्यात या राजाला यश आले. अनेक लोककल्याणकारी कामाचे श्रेय या राजाला जाते. या राजाने अनेक कालवे खोदल्यामुळे कावेरी नदीचे पाणी शेतीसाठी वापरता आले. करिकाल राजाने साहित्य आणि कलेला उत्तेजन दिले. हा राजा वैदिक धर्माचा अनुयायी होता.

### पांडय ः

पांडय राजाची स्थापना एका राणीने केली. या राणीकडे मोठे सैन्य होते. राणीने व्यापाराला उत्तेजन दिले आणि कला व वाङ्मयालाही प्रोत्साहन दिले.

### जीवन आणि संस्कृती ः

या कालातील लोक साधे जीवन जगत होते. लोक संगीत, नृत्य आणि काव्याचे चाहते होते. ढोल, बासरी इ. अनेक वाद्ये लोकप्रिय होती. यातलि अनेक लोक शेतकरी होते. व ते या खोऱ्यात राहत होते. इतर लोक गुराखी होते. मुख्यतः हस्तकलाकार व कलाकार लोक शहरात राहत होते. व्यापारी लोक प्रामुख्याने समुद्र किनाऱ्याच्या प्रदेशात राहत होते व ते त्या ठिकाणाहुन व्यापार करत होते.

### समाज ः

ग्रीक कुषाण शक आणि पार्थियन लोकांना यवन लोक म्हटले जाई. थोडयाच कालावधीत हे लोक भारतीयांत मिसळले. भारतीय नावे त्यांनी घेतली व भारतीयांशी विवाहही केले. त्यांच्या नाण्यावर सुद्धा विष्णु, गणेश व महेश या हिंदू देवतांच्या प्रतिमा कोरल्या जाऊ लागल्या. वस्तुतः परकीयांनी भारतीय जीवन पद्धतीचा सहजगत्या स्वीकार केला. यावरून बौद्ध धर्माला राजाश्रय का दिला याचा खुलासा होतो.

### हर्षवर्धनांचा काळ ः

राजा हर्षवर्धनाने अनेक छोटया संघर्षाच्या स्थितीत असलेल्या राजांना नमवून स्वतःच्या प्रभुत्वाखाली आणावे असे ठरवले. त्याने या कामासाठी त्याच्या आयुष्याची महत्त्वपूर्ण सहा वर्षे व्यतीत केली. युआनश्वांग या चिनी प्रवाश्याने व बाण्भट्ट या त्याच्या दरबारी कवीने हर्षाच्या कारकीर्दीबद्दल विस्तृतपणे लिहिले आहे. युआनश्वांगच्या मताप्रमाणे हर्षवर्धनाचे सरकार कार्यक्षम होते. हर्षवर्ध

नाच्या कालखंडावर कुटुंबांची नोंदणी केली जात नव्हती व वेठबिगारीची प्रथा अस्तित्वात नव्हती. ही माहितीही आपणांस युआनश्वांगच्य वर्णनातून मिळते.

### हर्षवर्धनाचे धार्मिक कार्य ः

हर्षवर्धनाने अनेक विश्रामगृहे व इस्पितळे बांधली हे तुम्हाला माहित आहे का? त्याने बौद्ध आणि ब्राह्मणधर्माला सुद्धा अनेक देणग्या दिल्या. त्याच्या आयुष्याच्या उत्तरकालखंडात हर्षवर्धन बौद्ध धर्माकडे अधिक आकर्षित झाला.

नागनंदा रत्नावली आणि प्रियदर्शिका इत्यादी महत्वाच्या नाटकांची निर्मिती हे हर्षवर्धनाच्या वाङ्मयीन कार्याची उदाहरणे आहेत. युआनश्वांग आणि बाणभट्टाच्या वर्णनावरून हर्षवर्धनाने अनेक विद्वानांना आपल्या दरबारी राजाश्रय दिला होता हे सिद्ध होते. हर्षचरित हे हर्षवर्धनाचे प्रसिद्ध चरित्र व कादंबरी हे ग्रंथ बाणाने लिहिले.

### दक्षिणेकडील राज्ये ः

आपण सातवाहन राज्यांबद्दल वाचले आहे. ज्यांनी दक्षिणेवर अनेक वर्षे नियंत्रण मिळवले होते. सातवाहनांच्या अस्तानंतर अनेक लहान राज्यांचा दक्षिणेत उदय झाला. त्यांच्यामध्ये वाकाटकराजे प्रमुख होते. त्यांनी शक्तीशाली राज्य निर्माण केले. परंतु ते दिर्घ काळ टिकू शकले नाही.

वाकाटकानंतर वातापी आणि कल्याणी येथिल चालुक्यांचा उदय झाला. पुलकेशी हा चालुक्य राजवंशाचा शक्तीशाली राजा होता. चालुक्यांचा उत्तरेकडे राष्ट्रकुटांशी व दक्षिणेकडे पल्लवांशी संघर्ष होत होता. इसवी सन ७५३ मध्ये चालुक्यांची सत्ता राष्ट्रकुटांनी त्यांचा पराभव केल्यामुळे समाप्त झाली.

वातापी हे राजधानीचे शहर भरभराटीस आलेले शहर होते. त्याकाळात अरबस्थानशी, इराण व तांबडया समुद्राच्या पश्चिम बंदराशी तसेच आग्नेय आशियाशी भारताचे व्यापारी संबंध होते. पुलकेशी दुसरा या राजाने प्रशियाचा राजा खुस्त्रो दुसरा याच्या दरबारात आपला वकिल पाठविला होता. चालुक्यराजांनी धर्म आणि कलेला उत्तेजन दिले. त्यांनी दक्षिणेकडील पर्वतावर मंदिरे आणि गुहा बांधल्या. वेरूळ येथिल गुहातील चालुक्य आणि राष्ट्रकुट राजांच्या आश्रयाखाली निर्माण केल्या होत्या.

### पाठ्यांशांवरील प्रश्न ३.२

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. वायव्य व उत्तर भारतातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची माहिती सांगणारी साधने कोणती आहेत?

उत्तर ______

२. अशोकाच्या मते धर्म विजय म्हणजे काय ?

उत्तर ______

३. अशोकाच्या दीर्घ शिलालेखातून प्रकट होणारे त्याचे विचार नमुद करा.

उत्तर

४. अशोकाचे शिलालेख आपल्याला कोठे आढळतात ?

उत्तर

५. भारताचे राष्ट्रचिन्ह कोठून घेतले आहे ?

उत्तर

६. ग्रीक आणि रोमन कला प्रकारातून गांधार शिल्पशैलीने कोणती वैशिष्टे घेतली?

उत्तर

७. मथुरा कला शैलीची वैशिष्टये वर्णन करा.

उत्तर

## ३.१० गुप्तकाळातील सांस्कृतिक विकास ः

प्राचीन भारतीय इतिहासाची शेवटची अवस्था चौथ्या शतकाच्या सुरूवातीला सुरू होते आणि आठव्या शतकात समाप्त होते. राजकिय ऐक्य व राजाश्रय या वैशिष्टयासह गुप्तांनी शक्तीशाली राजवट निर्माण केली त्यामुळे सांस्कृतिक घडामोडी अनेक पटींनी वाढल्या. तुम्हाला कल्पना असेल. ग्रीकांच्या आक्रमणानंतर भारतातील विविध कलाप्रकार ग्रीक रोमन शैलीनी प्रभावित झाले. या कला इ.प्रकारातून प्रामुख्याने बुद्ध आणि बुद्धाचे विचार चित्रित झालेले आहेत. परंतु गुप्तकाळात ही कला अधिक कलात्मक होऊन हिंदू देव व स्त्रीदेवतांच्या प्रतिमा या कला प्रकारातून चित्रीत करण्यात आल्या.

या काळातील कलात्मक कामगिरी गुप्तकाळातील विविध राजांची नाणी आणि नाजुक कलाकुसरीतून प्रदर्शित होते. यातून ती सर्वसाधारणपणे नाण्याच्या एका बाजूला राजाची प्रतीकृती व दुसऱ्या बाजूला देवता व देवतेशी संदर्भात चिन्ह नाण्यांवर कोरली जात असे. राजाच्या अनेक पद्धतीच्या मुद्रा उदाहरणार्थ वाघ किंवा सिंहाची शिकार करताना, संगीत वाद्य वाजवत असतांना किंवा उंच सिंहासनावर बसला असतांना तसेच नाण्याच्या दुसऱ्या बाजुला बऱ्याचदा संपत्तीची देवता लक्ष्मी, काही नाण्यांवर कलेची देवता सरस्वती यांच्या आकृती अनुक्रमे दोन्ही बाजूंना कोरलेल्या असत. नाण्यांच्या व्यतिरिक्त गुप्त कलेची अभिव्यक्ती मोठया प्रमाणावर ऐतिहासिक स्मारके व शिल्पकलेत पाहृयला मिळते. या काळातील कुशल कारागिर विविध कला प्रकारांच्या माध्यमातून भारताच्या विविध तत्त्वज्ञानाच्या परंपरा आणि आदर्श त्यांच्या हत्यारांच्या आणि कौशल्याच्या सहाय्याने व्यक्त







करत. धार्मिक स्थळांच्या व कोपऱ्यावर देवदेवतांचे मूर्ती बसवून ती ठिकाणे त्यांनी सुशोभित केली. देवतांच्या मूर्ती म्हणज देवतांच्या ठिकाणी असलेली गुणवैशिष्ट्याची प्रतीके समजली जात. म्हणूनच देवतांच्या मूर्तीमध्ये विविध आयुधे घेतलेल्या अनेक दूतांच्या मूर्तींचा समावेश होत होता. अन्यथा त्या मानवी आकृतीत निर्माण केल्या असत्या. पाषण, टेरेकोटा आणि इतर वस्तूचा देवतांच्या मूर्ती व देवतांचे निवासस्थान दर्शविण्यासाठी उपयोग केला जाई.

देवगड येथिल दशावतार मंदिर व उदयगिरी पर्वतावरील गुंफा मंदिरे ही गुप्तकलेची उत्तम उदाहरणे आहेत. परंतु बुद्धाच्या सारनाथ येथिल उभ्या व बसलेल्या  व आजही अस्तित्त्वात असलेल्या मूर्ती हीच गुप्तकलेची सर्वात जास्त प्रसिद्ध उदाहरणे आहेत.

सारनाथ येथे भरभराटीस आलेल्या शैलीतील सर्वात जास्त आल्हाददायक आणि रूबाबदार बुद्धाच्या मूर्ती आपल्याला पाहायला मिळतात. पाषाणकलेबरोबरच कांस्याच्या मूर्तीकलेतही गुप्तकाळांतील कारागीर पारंगत होते. विहार मधील भागलपूर जवळ सुलतानगंज येथे बुद्धांची २ मीटर उंचीची कास्यांची मूर्ती शोधून काढण्यात आलेली आहे. या काळात गुंफात कोरलेल्या शिल्पांची परंपरा प्रसिद्ध वेरूळच्या गुंफा शिल्पापर्यंत नेता येते.

### वास्तुकला ः

गुप्त वास्तुकला काही धार्मिकस्थळ अजिंठा येथिल पाषाणात गुहा आणि देवगड येथिल दशावतार मंदिरासारख्या मंदिरातुन जिवंत राहिलेली आहे. या वास्तू मुख्यतः दगड व विटांनी बनलेल्या आहेत. कालिदासाच्या साहित्यकृतीतून आपल्याला गुप्तकलेचे ओझरते दर्शन घडते. कालिदासाने आपल्याला रस्त्यांच्या जाळयांसह सुनियोजित शहरे, बाजार, उंच गगनचुंबी राजवाडे व भव्य गच्चीसहित मोठया इमारती यांचे प्रत्यकारी चित्रण केलेले आहे. राजवाडयात अनेक अंतपुरे होती. राजवाडयासमोर प्रशस्त मोकळया जागा होत्या. राजवाडयात दरवार सभागृह समोरचे प्रशस्त पटांगण व कारागृह होते. छतांवरील ओवऱ्यातून चंद्रकिरण आत येत असत राजवाडयालगत असणाऱ्या आरामदायी शाहीबागेत सर्वप्रकारची हंगामी फुले व वृक्ष असत.

गुप्तकाळासंबंधी पुरातत्वीय  पुरावे मात्र फारच अल्प आहेत. विशेषतः मध्य भारतातील बुंदेलखंड भागात जंगलात गुप्त काळातील मंदिरे आढळून आली आहेत. या मंदिरात कानपूर जिल्ह्यातील भितरगांव येथिल मंदिराचा समावेश आहे.

### चित्रकला ः

गुप्तकाळात चित्रकलेने पूर्ण परिपक्वता गाठली होती. औरंगाबाद जवळील अजिंठयाच्या लेण्यातील जलरंगातील चित्रे याचे पुरावे आहेत. अजिंठयातील चित्रे  पहिल्या ते सातव्या शतकातील असली तरी त्यातील बरीच चित्रे गुप्तकाळातच काढली गेली आहेत. या चित्रांत बुद्धाच्या जीवनातील अनेक प्रसंग चित्तारले आहेत. मानवी व्यक्ती प्राणी आणि वनस्पतीच्या आकृत्या ज्या कौशल्याने चित्तारल्या आहेत त्यावरून गुप्तकलेचे प्रगत आणि संवेदनशील स्वरूप प्रत्ययास येते. सौंदर्याची संकल्पना हे गुप्तकलेचे वैशिष्टय आहे. कलेच्या माध्यमातून अभिव्यक्ती केल्याने आध्यत्मिक आनंद मिळतो. अशी धारणा असल्याने कला अभिव्यक्तीला महत्त्व होते.

## ३.११ पल्लव आणि चोल :



महाबलीपुरम येथिल मंदिर

दक्षिणेतील पल्लव व चोल या दोन राजवंशाचा तसेच त्यांचे कला वास्तुकला प्रशासन व लष्करी मोहिमांतील योगदान याशिवाय लिहीलेला प्राचीन भारताचा कोणताही इतिहास अपूर्ण आहे. इसवीसनाच्या पहिल्या शतकात दक्षिण भारतात काही राजवंश उदयास आले. त्यामधे पल्लव हे कला आणि वास्तुकलेचे आश्रयदाते होते. त्यांचे महाबलीपुरम येथिल रथ पाषाण घडविण्याच्या कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. पल्लवांनी कैलासनाथ आणि वैकुंठ पेरूमल ही जमीनीवरील रचनात्मक मंदिरेही बांधली. कैलासनाथ मंदिराची रचना अवाढव्य आहे. भारतातील आतापर्यंतची ही सर्वात मोठी एकसंघ वास्तु आहे.महाबलीपुरम येथे जमिनीवरील बांधकामाच्या इतरही वास्तु आहेत व त्यांचा काळ पल्लव काळ आहे.



सूर्य मंदिर कोणार्क

मंदिरे बांधण्याची पद्धती पाचव्या शतकानंतर रूढ झाली. उत्तर भारतातील मंदिरे शिखर शैलीची आहेत. म्हणजे मूर्ती ज्या ठिकाणी असतात. त्या गर्भगृहावर उंच उंच मनोरा असतो. गर्भगृहासमोर मंडप असतो. तर दक्षिण भारतातील मंदिरे गोपुरे शैलीची आहेत. प्रवेशद्वारावर आयातकृती निमुळती वरच्या टोकाला अरूंद होत गेलेली रचना म्हणजे गोपुरे.

पल्लवानंतर सहाव्या ते आठव्या शतकात होऊन गेलेल्या चोल राजांनी सुंदर मंदिरे बांधली व ही परंपरा नंतर चोल राजांनी पुढे दहाव्या ते बाराव्या शतकापर्यंत तशीच चालू ठेऊन विकसित केली.

तुम्हाला माहित आहे का ? खेडयात मंदिरांना मध्यवर्ती स्थान होते. खेडयातील लोकांचे एकत्र येण्याचे ते ठिकाण होते. संध्याकाळी गावकरी मंदिरात जमत या ठिकाणी त्यांची विचारांची देवाणघेवाण होई. सामुहिक हिताच्या विषयांवर ते चर्चा करत. मंदिराचा उपयोग शाळा म्हणूनही होत असे. उत्सवाच्या काळात मंदिराच्या पटांगणात नृत्य व नाटके सादर केली जात.

समुद्रपार मोहिमा व गावपातळीवर लोकशाहीत्मक संस्थाचा विकास यात चोलांच्या कामगिरीचे श्रेय दडलेले आहे. सभा किंवा उत्तर या गावातील पंचायतीला विस्तृत अधिकार असत व आर्थिक बाबींवर तिचे नियंत्रण असे पंचायत कार्यकारीणीचे अनेक लहान समित्यात विभाजन झालेले असायचे

ग्रामप्रशासनाच्या विविध विभागांचे या समित्या कामकाज पहात. गावातील पंचायतीच्या या कामकाजांचे विस्तृत वर्णन एका शिलालेखात आले आहे. चोकराजे महान मंदिर निर्माते होते. द्रविड शैलीच्या मंदिर वास्तुआरेखणात चोकराजांनी शिखर गाठले याचे उत्कृष्ठ उदाहरण राजराजेश्वर किंवा बृहतेश्वर मंदिर आहे. शिल्पकलेचा क्षेत्रातही या काळात बरीच मोठी झेप घेतली गेली.

धार्मिक आणि निधर्मी अशा दोन्ही प्रकारांच्या वाङ्‌मयात मोठी प्रगती करण्यात आली. देशाच्या विविध भागात संस्कृत ही दरबारी भाषा बनली. तमिळ वाङ्‌मयानेही मोठी प्रगती केली. अलवार व नयनार म्हणजे अनुक्रमे विष्णु व शिवभक्तांनी वाङ्‌मयाला चिरकालीन योगदान दिले देशातील बऱ्याच भागात संस्कृत भाषाच वरचढ ठरलेली असली तरी देशाच्या विविध भागात विविध भाषा व किस्सा यांची सुरूवात या काळात सुरूवात झाली. थोडक्यात भारतीय इतिहासाचा प्राचीन काळ संपला असे आपण म्हणू शकतो. दरम्यानच्या काळात भारताने अशी संस्कृती निर्माण केली की तोपर्यंत तिच्यात अशा प्रकारची नवी वैशिष्टे निर्माण झाली नव्हती.

## ३.१२ वैदिक ब्राह्मतत्वाचे पुराणिक हिंदुत्वात रूपांतर ः

प्राचीन ब्राह्मणी श्रद्धांचे आधुनिक हिंदुत्व रूपांतर हे गुप्तकाळ व त्यानंतरच्या काळाचे सर्वात ठळक वैशिष्ट आहे. बौद्ध धर्माला पूर्वी जो राजाश्रय मिळत होता तो आता मिळत नव्हता. गुप्तकाळात ब्राह्मणवादाला महत्व आले. गुप्तराजांनी प्रामुख्याने हिंदुधर्माच्या भागवतपंथाला बळकटी दिली. ते स्वतःला भागवत म्हणत. ते विष्णु या देवतेची पुजा करत. अश्वमेध यज्ञ त्यांनी केले. ब्राह्मणांना मोठी दाने दिली व अनेक मंदिरे बांधली. पुराणांची अंतिम रचना या काळात करण्यात आली. विष्णु ही भक्ती संप्रदायाची केंद्रवर्ती देवता बनली. विष्णुला धर्माची संरक्षण्कर्ती देवता मानण्यात येऊ लागले. विष्णुच्या गौरवार्थ निर्माण करण्यात आलेल्या विष्णुपुराणात अनेक दंतकथा या देवतेभोवती निर्माण करण्यात आल्या. त्याचप्रमाणे विष्णुस्मृती हा सामाजिक कायद्याचा ग्रंथ ही या देवतेच्या नावाने तयार करण्यात आला. सर्वात महत्वाचे म्हणजे श्रीमद् भागवत पुराण हे श्रीकृष्णाच्या भक्तीविषयक पुराण इ.सनाच्या चौथ्या शतकात निर्माण झाले. काही गुप्त राजे ऱ्हासाची देवता असणाऱ्या शिवाचे उपासक होते. एकाच काळात जैन बौद्ध व भागवत धर्माचा उदय झाला. उपनिषदांचे विचार ज्यावेळेस सर्वोच्च बिंदूवर होते, त्यावेळेस त्या विचारांच्या प्रवादापासून भागवत धर्माची निर्माती झाली. हा पंथ गुप्तकाळात सर्वात लोकप्रिय होता. सर्वोच्च देवत विष्णु व तिच्या दशावताराचा सिद्धांत या काळात स्वीकारला गेला. त्यापैकी कृष्णअवताराला सर्वात जास्त महत्व दिले गेले.

विष्णु व्यतिरिक्त ब्रह्म, सूर्य, कार्तिकेय, गणेश, दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती आणि इतर देवतांची उपासना केली जात होती. इतर कमी महत्वाच्या देवता इंद्र, वरूण, यम इत्यादी देवतांचीही पूजा केली जात होती. सर्प, यक्ष, गंधर्व या देवतांनाही आदराचे स्थान होते. प्राणी वनस्पती नद्या पर्वत याकडेही देवत्वाच्या आदराने पाहिले जात होते. बनारस व प्रयाग ही तीर्थस्थळे या काळात बनली. अशाप्रकारे आधुनिक हिंदूत्वाच्या प्रमुख वैशिष्टयांनी गुप्तकाळात आकार घेतला.

बौद्धधर्म या काळात उतरणीला लागला होता. तरी या धर्माला अनुयायी लाभत आलेले होते.

अजिंठा आणि वेरूळच्या लेण्यातील कलात्मक निर्मिती व्यतिरिक्त या काळातील सारनाथ येथिल बुद्धमूर्ती वरूनही बौद्धधर्म या काळात लोकप्रिय होता हे दिसुन येते. गुप्तकाळात जैनधर्मालाही काही शिष्यगण लाभले होते.

## ३.१३ एक महान शैक्षणिक केंद्र म्हणून नालंदाचा उदय ः

हर्षाच्या काळात एक शैक्षणिक केंद्र म्हणून नालंदाचा उदय झाला. जगातील विविध भागातून शिकण्यासाठी विद्यार्थी येथे येत. नालंदा येथिल सर्व अवशेषांचे उत्खनन झाले नसले तरी येथील अवाढव्य इमारतीच्या संकुलाचा पुरावा उघड झालेला आहे. यातील काही इमारती चार मजली उंच होता. युआनश्वांगच्या मते नालंदा मधे दहा हजार विद्यार्थी राहत होते. २०० गावांच्या महसुलाचे पाठबळ नालंदाला होते.

ही विशाल भिक्षु शैक्षणिक आस्थापना प्रामुख्याने महायान बौद्ध धर्माचे केंद्र होती. तरीसुद्धा या ठिकाणच्या अभ्यासक्रमात काही निधर्मी विषय होते. व्याकरण, तर्कशास्त्र, विज्ञान, सत्ताशास्त्र (अध्यात्म) या विषयांचा त्यात समावेश असे. विद्यार्थ्याच्या कार्यकारणभाव व चिकित्सक चौकस वृत्तीला उत्तेजन दिले जाई. प्रत्यक्ष क्रियाशील चर्चा व वादविवाद होत. हर्षाने कनौज येथिल धर्म परिषदेत नालंदा येथिल एक हजार विद्वान भिक्षुंना आमंत्रित केले होते. युआनश्वांगने त्याच्या प्रवासवर्णनात नालंदाबद्दल विस्तृत माहिती दिली आहे. बाराव्या शतकांपर्यंत हे विद्यापिठ बौद्धिक चळवळीचे केंद्र राहिले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ३.३

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. गुप्त नाण्यांची वैशिष्टये काय होती ?

उत्तर

२. दशावतार मंदिर कोठे आहे ?

उत्तर

३. उदयागिरी टेकडयांवरील गुंफा मंदिरे कशाबद्दल प्रसिद्ध आहेत ?

उत्तर

४. भागलपूर जवळील सुलतानगंज येथे सापडलेली बुद्धाची मूर्ती किती उंच होती?

उत्तर

५. गुप्तकाळातील चित्रकलेचे प्रकार कोठे आढळून येतात ?

उत्तर

६. हर्षाच्या काळातील धर्मपरिषद कोठे भरली होती ?

उत्तर

## ३.१४ भारतातील ख्रिश्चन धर्म ः

इसवीसनाच्या पहिल्या शतकात सेंट थॉमस यांनी भारतात ख्रिश्चन धर्म आणला असे परंपरा सांगते. एका आख्यायिकेप्रमाणे पर्थियन राजा गोंडी फोरस याने सिरयामध्ये एक वास्तु आरेखन अभियंता एक जो त्यांच्यासाठी एक नविन शहराची रचना करून देईल अशा अभियंत्याला घेऊन येण्यासाठी एका दूताला पाठविले. हा दूत सेंट थॉमस याना घेऊन भारतात आला. सेंट थॉमसने गोंडो फोरस व इतर अनेक लोकांना ख्रिस्ती धर्मात धर्मांतरीत केले. या अख्ययिकेच्या सत्यतेबद्दल साशंकता आहे. भारत आणि पश्चिमेकडील देश यांच्यामध्ये जो व्यापार होत होता व या दोन्ही भागात जी ये जा होत होती त्यामुळे ख्रिस्ताच्या शिष्यांनी भारतात ख्रिस्तीधर्म आणण्याची दाट शक्यता आहे. व्यापारी व्यावसायिक आणि कधी कधी कारागिरसुद्धा समुद्रमार्गे किंवा खुष्कीच्या मार्गाने प्रवास करीत सेंट थॉमस यांनी भारतातील विविध भागात ख्रिस्ती धर्माची शिकवण दिली.त्यांची मद्रासजवळील मलायापूर येथे हत्या झाली. त्याच ठिकाणी सेंट थॉमस यांचे थडगे पाहायला मिळते. आजही सिरीयन ख्रिस्ती नावाचे बहुसंख्य ख्रिस्ती लोक केरळमध्ये आहेत.

ख्रिस्ती चर्च (धर्मस्थळ व उपासना पद्धती) मध्ये रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट असे दोन प्रमुख उपपंथ आहेत. बायबलमधे जुना करार व नवा करार (टेस्टामेंट) असे दोन भाग आहेत. आपल्या देशामधील सर्व प्रमुख भाषांमध्ये आज बायबल उपलब्ध आहे.

आज भारतामध्ये दीड कोटीपेक्षा जास्त ख्रिस्ती लोक आहेत. त्यांना उत्तेजन देण्यासाठी अनेक धर्म दाय संस्था भारताच्या सर्व भागात भरभराटीला आल्या आहेत. कदाचित तुम्हाला माहित असलेलापैकी मदर तेरेसा या सर्वात जास्त प्रसिद्ध ख्रिस्ती समाजसुधारक असाव्यात. त्यांनी आपल्या देशातील अनेक निरश्रीत निराधार व निर्धन लोकांच्या कल्याणासाठी मोठे योगदान दिले आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ३.४

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारतामध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रवेश कसा झाला ?

उत्तर

२. ख्रिस्ती उपासनापद्धती अर्थात चर्चमध्ये कोणते प्रकार आहेत ?

उत्तर

३. मदरतेरेसा कोण होत्या ?

उत्तर

४. कांचीपुरम येथे पल्लवानी जमीनीवर रचनात्मक पद्धतीची कोणती मंदिरे बांधली?

उत्तर

५. पल्लव व चोलांच्या काळात मंदिर वास्तुकलेला कोणत्या विविध पद्धती होत्या?

उत्तर

६. चोलांनी बांधलेल्या मंदिरांची नावे लिहा.

उत्तर

७. चोलांच्या काळातील शिल्पशैलीला काय म्हणतात ?

उत्तर

८. महाबलीपुरम येथे तुम्हाला कोणत्या प्रकारची कार्यशैली आढळते ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- भारताला फार मोठया कालखंडावर विस्तारलेल्या सातत्यपूर्ण इतिहास इसवी सन पूर्व ७000 पासून लाभलेला आहे.
- भारतीयांनी सुनियोजित पद्धतीने आरोग्याच्या, गटारांचा आणि व्यवस्थित रस्त्यांनीयुक्त अशी सर्वात प्राचीन शहरे निर्माण केली.
- ग्रामिण भागातील लोकांचा शेती हा महत्त्वाचा व्यवसाय होता.

  वैदिक काळातील लोकांनी वाङ्मय, धर्म आणि तत्वज्ञान या विषयांत मोठे योगदान दिले.

- उत्तरवैदिक काळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार वर्णात समाज विभागला होता.
- हिंदू, जैन, बौद्ध यासारखे धर्म उत्क्रांत झाले आणि त्यांच्यामधील एकमेकांशी झालेल्या संवादामुळे भारताची संमिश्र संस्कृती निर्माण झाली.
- मौर्यानी उत्तरभारतात पहिले महान साम्राज्य निर्माण केले अशोकाच्या काळात या साम्राज्याने विविध क्षेत्रात सर्वोच्च उंची गाठली.
- मौर्याचे कला व वास्तुकलेच्या क्षेत्रात वैशिष्टयपूर्ण योगदान होते.
- मंदिर वास्तुकलेने तिचे सर्वोच्च वैभव पल्लवांच्या काळात गाठले. पल्लव हे महान वास्तुनिर्माते होते.
- गुप्तकलेची उदाहरणे आपण देवगडयेथील दशावतार मंदिर व उदयगिरी येथील टेकडयांवरील गुंफा मंदिरातून पाहू शकतो.
- दुःखकारक प्रसंगात आपल्या कुटुंबाचा नाश पाहिल्यानंतर ठाणेश्वर येथे हर्ष राजगादीवर आला.
- युआनश्वांग हा चिनी प्रवासी व दरबारी कवी बाणभट्ट यांनी हर्षाच्या चरित्राची विस्तृत माहिती दिली आहे.
- हर्षवर्धन हा कार्यक्षम व लोकल्याणकारी राजा होता. हर्षवर्धनाने अनेक लोकप्रिय कामे केली. त्याने अनेक सार्वजनिक सेवकांना भेटवस्तू दिल्या. ज्यांनी बद्धिमत्तापूर्ण उच्च दर्जाची कामे केली त्यांना बक्षिसे दिली व विविध पंथाच्या धार्मिक कार्याला भेटवस्तू देऊन उत्तेजन दिले त्याने अनेक इस्पितळे व विश्रामगृहे बांधली. हर्षाच्या काळात नालंदा हे महत्त्वाचे विद्याकेंद्र हर्षवर्धनाच्या काळात बनले.
- हर्ष हा साहित्यिक होता. त्यांनी स्वतः नाटके लिहिली व विद्वानांना त्याच्या दरबारात राजाश्रय दिला.
- समुद्रापलिकडील लष्करी मोहिमा व ग्रामपातळीवरील लोकशाहीत्मक संस्थाचा विकास ही चौलराजाची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. हडप्पावासीय व आर्य यांच्या संस्कृतीमध्ये तुम्ही कशाप्रकारे फरक कराल?

२. इराणी (पार्शियन) आक्रमणांचा भारतावर काय परिणाम झाला ?

३. प्राचीन भारतीयांवरील मॅसेडोनियन आक्रमणाचे फलित काय होते ?

४. वैदिक ब्राह्मणतत्त्वाचे पुराणिक हिंदुत्वात कशाप्रकारे रूपांतर झाले ?

५. प्रत्येक साम्राज्याच्या काळात भारतीय संस्कृतीच्या झालेल्या विकासाचे वर्णन करा.

## प्रश्नांची उत्तरे

३.१

१. सिंधू घग्गर या नद्या व त्यांच्या उपनद्यांच्या काठावर

२. शेती

३. इ.स.पूर्व ७00 मध्ये बलुचिस्थानमधील मेहरगडमध्ये

४. शिक्यावरती वैशिष्टयपूर्ण लिपी आहे.

५. एकशिंगी गेंडा शिक्यावर आढळला. नर्तकीची कास्याची मूर्ती मोहंजोदरो येथे आढळली. यातून त्या लोकांची शिल्पकलेतील कौशल्ये समजतात.

६. ऋग्वेद, अथर्ववेद, यजुर्वेद व सामवेद हे चार वेद ब्राह्मणके, आरण्यके आणि उपनिषदे

७. धर्माने व कर्माने

८. वैदिक मंत्राचे पठण करत ते पार पाडले जात.

९. अश्वमेघ, राजसयू व वाजपेयी यज्ञ

१0. ते अत्यंतिक कर्मकांडी बनले. इंद्र, अग्नी, वरूण यांच्या ऐवजी ब्रह्म, विष्णु आणि शिव या नविन त्रिदेवतांची पूजा केली जाऊ लागली.

११. बुद्धीबळ व रथांच्या शर्यती

१२. अग्नी, मगध, कोसला, काशी, कुरू, पांचाल

१३. श्वेतांबर व दिगंबर

१४. आठ

१५. जैनधर्मामध्ये स्थानक व बौद्धधर्मात विहार

१६. हितयान, महायन, वज्रायान

३.२

१. आरियान आणि ॲडमिरल नारिस व मॅगेस्पेनिस यांचे ग्रीक ग्रंथ

२. लोककल्याणसाधुन प्रभुत्व स्थापन करणे म्हणजे लोककल्याण व लोकाबद्दल कळकळ.

३. एकमेकांच्या धर्माबद्दल आदर बाळगणे.

४. बिहारमधील लोरिया नंदनगड

५. अशोकाच्या सारनाथ येथिल स्थंभाच्या स्थंभशीर्षकावरून

६. १. अपोलियन पद्धतीचे चेहरे

   २. केशरचना

   ३. वेशभूषा

टिपा

७. १. बुद्धाचा चेहरा व मूर्ती

२. मोठया पट्टीवर व दगडी पृष्ठभागावर

३. त्यांनी पुतळे सुद्धा निर्माण केले.

३.३

१. नाण्याच्या एका बाजूवर राजाची मुद्रा व दुसऱ्या बाजुवर देवता व त्यांच्या संबंधित चिन्हे कोरली असत.

२. देवगड येथे

३. गुप्त कला

४. २ मीटर

५. १. अजिंठा येथिल गुंफा चित्रे

२. बाग येथिल गुंफा चित्रे

६. कनोज येथे

३.४

१. सेंट थॉमस हा वास्तु आरेखनकार होता. पार्शियन राजा गोंडा फरनेस याने सेंट थॉमस यांना भारतात बोलवले. त्यांनी अनेक लोकांचे ख्रिस्ती धर्मात धर्मांतर घडवून आणले.

२. रोमन कॅथालिक व प्रोटेस्टंट

३. या महान ख्रिस्ती समाजसुधारक होत्या. त्यांनी निरश्रीत व गरिबांसाठी मोठे कार्य केले.

४. कैलासनाथ व वैकुंठ पेरूमल

५. नागर व द्रविड शैली

६. राजराजेश्वर व बृहतेश्वर

७. द्रविड शैली

८. उठावाची शिल्पे किंवा जमिनीवरील वास्तु

# ४

# मध्ययुगिन भारत

धर्म लोककला आणि भाषेच्या क्षेत्रात मध्ययुगीन काळात भारतात जो विकास झाला त्यामुळे संमिश्र संस्कृतीच्या उत्क्रांतीमध्ये मध्ययुगिन काळ हा एक मैलाचा दगड आहे. इस्लाम आणि सुफी पंथाचा शीख पंथाबरोबरच्य उदयामुळे संमिश्र संस्कृतीचा उदयाच्या प्रक्रियेला गती मिळाली. आपण आपल्या आवतीभोवती पाहिल्यास भारतीय संस्कृतीच्या बऱ्याच अंगावर इस्लामचा प्रभाव पडल्याचे जाणवेल. तुम्ही भारतातील काही महत्त्वाच्या ऐतिहासिक वस्तुंना भेट दिलेली असेल. ह्या ऐतिहासिक वास्तु हिंदु मुस्लीम संमिश्र संस्कृतीची चिन्हे आहेत. भारतात सर्व धर्मांनी एकमेकांना प्रभावित केलेले आहे. प्रत्येक प्रदेशावरोबरच संबंध भारत कोणत्या ना कोणत्या लोककलेबद्दल प्रसिद्ध आहे. लोककलांच्या विकासामुळे ग्रामिण भागातील लोकांना त्यांच्या कलागुणांना प्रदर्शित करण्याची संधी मिळते हे भारतीय संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. आपण ज्या विविध प्रादेशिक भाषा बोलतो ह्या भाषांनाही फार मनोरंजक इतिहास आहे. या भाषा या काळात उत्क्रांत झाल्या.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपण खालील बावी करू शकाल.

- मध्ययुगीन काळातील समाजाचे आकलन करणे.
- इस्लाम व सुफी पंथाच्या उदयाचा इतिहास
- मध्ययुगीन काळातील राजकिय स्थितीचे वर्णन करणे.
- भारतीय धर्मावरील इस्लामच्या प्रभावाचे परिक्षण करणे.
- मध्ययुगीन काळातील लोककला चित्रकला आणि संगिताच्या विकासाचे परिक्षण करणे.
- आधुनिक भारतीय भाषांच्या उदयाचा इतिहास शोधणे.
- शीख धर्माचा व शीख सत्तेचा उदय यांची चर्चा करणे.
- दक्षिण भारतातील घडामोडीचा इतिहास शोधणे.

## ४.१ दिल्ली सुलतानशाहीच्या काळातील लोकजीवन ः

ज्यावेळेस मुस्लीम आक्रमक भारतात आले त्यावेळेस त्यांनी भारतात स्थायिक होण्याचे ठरविले. त्यांनी भारतीयांशी विवाह केले व भारतीय संस्कृतीचा स्वीकार केला. एकमेकांच्या चालीरिती आणि कल्पना त्यांनी परस्परांमध्ये स्वीकारल्या. पोषाख, संभाषण, शिष्टाचार, बौद्धिक परिप्रेक्ष्य या बाबतीत दोहोंचा एकमेकांवर मोठा प्रभाव पडला. यातील काही बदल खाली वर्णन केले आहेत.

### समाज ः

भारतीय  समाज चार मुख्य गटात विभागलेला होता. उमराव किंवा वरिष्ठ गटातील लोक, पुरोहित, शहरात राहणारे लोक आणि शेतकरी असे लोकांचे गट होते.

### वरिष्ठ वर्ग ः

यामध्ये सुलतान त्यांचे नातेवाईक सरदार व जमीनदार यांचा समावेश होत होता. सर्व सत्ता व संपत्ती या लोकांनी त्यांच्या हातात केंद्रित करून ठेवलेली होती. हे लोक म्हणजे अतिशय शक्तीशाली लोकांचा गट होता. हे स्पष्ट करण्याची गरज नाही. हे लोक ऐटीत व ऐषारामात राहत होते.

परंतु सुलतान या सर्वांपेक्षा वरचढ पद्धतीने राहत होता. कारण त्याला त्याचे प्रभुत्त्व आणि दर्जा टिकवायचा होता. ज्या ज्या वेळेस नवीन सुलतान गादीवर येई त्या त्या वेळेस नव्या सुलतानाच्या नावाने शुक्रवारचा नमाजाच्या वेळेस खुतबा वाचला जाई. व सुलतानाच्या नावे नवी नाणी पाडली जात. यामुळे नवीन सुलतानाचे राजपद सिद्ध होत असे. स्वतःचे राजपदाचे वेगळेपण टिकवण्यासाठी राजवाडयात त्याच्या  दिमतीला अनेक नोकरचाकर व अधिकारी असत. सुलतानाचे सरदार हे त्याचे अनुकरण करत व आपल्या वैभवाचे प्रदर्शन करत.

### पुरोहित ः

पुरोहित हा समाजातील महात्त्वाचा वर्ग होता. हिंदूमध्ये या वर्गात ब्राह्मणाचा व मुस्लीमांमध्ये उलेमाचा समावेश होत असे. त्यांना त्यांच्या उपजिविकेसाठी वारंवार महसूलाची आकरणी न करता जमीन दिली जात असे. उलेमांचा नेहमीच सुलतांनावर मोठा प्रभाव पडत असे व सुलतानांच्या धोरणावरही ते प्रभाव टाकत. पुरोहित वर्गाचे बऱ्याचवेळा धार्मिक बाबींवर लक्ष्य असण्याऐवजी इतर व्यवहारिक घडामोडींवर जास्त लक्ष्य असे.

### शहरी लोक ः

शहरात श्रीमंत व्यापारी आणि कारागिर राहत. सरदार सरकारी अधिकारी आणि सैनिक शहरात राहत. शहरात प्रशासकिय आणि लष्करी केंद्रे असत. ज्या ठिकाणी सुफी आणि भक्ती संत राहत होते व ज्या ठिकाणी महत्त्वाची मंदिरे व मजस्दि होत्या ती सर्व ठिकाणे महत्त्वाची तीर्थक्षेत्रे बनली. कारागीर स्वतःच्या विशेष बनवलेल्या विभागात शहरांमध्ये राहत.

जसे विणकर विणकरांच्या गल्लीत राहत. सोनार सोनार गल्लीत राहत. सर्व करागीरांसाठी हा एक सर्वसामान्य आराखडा होता. हे लोक चैनीच्या वस्तु बनवत व त्या परदेशातही व्यापाराकरीता पाठविल्या जात. शाही कारखाने म्हणजे कारागिरांच्या कार्यशाळा सुंदर वस्तु बनविण्यासाठी निर्माण केलेल्या असायच्या या ठिकाणाहून बनलेल्या वस्तु सुलतान भेटवस्तु म्हणून वापरत.

### शेतकरी ः

शेतकरी हे मुख्यतः खेडयातून राहत व त्यांची स्थिती दयनीय होती. जमीन महसूल म्हणून फार मोठी रक्कम ते सरकारला जमा करत. कोणताही राजवंश सत्तेवर आला तरी त्यांच्या स्थितीवर काहीही फरक पडत नसे.

जाती व्यवस्था ही फार कर्मठ होती. आंतरजातीय विवाह व एकात्रित खाणेपिण्यावर पुर्णतः बंदी होती. परंतु देवाणघेवाण मोठया प्रमाणावर होत होती. ज्या लोकांनी इस्लाम धर्मात धर्मांतर केले ते त्यांच्या चालीरिती विसरू शकले नाहीत. अशा प्रकारे कल्पना व परंपरांची देवाणघेवाण झाली. हिंदु व मुस्लीमांनी एकमेकांच्या अनेक रूढी परंपरा स्वीकारल्या. यात प्रामुख्याने खानपान, पोषाख, संगीत व इतर अनेक बाबींचा समावेश होता.

### व्यापार ः

व्यापार हा भरभराटीस आलेला होता आणि व्यापाराच्या उत्तेजनासाठी नविन शहरे उदयास आली. वनिया मारवाडी आणि मुलतानी या सारख्या जातींचा व्यापार हा विशेष व्यवसाय बनला. बंजारालोक त्यांच्या तांडयाच्या माध्यमातुन सतत व्यापार करत आणि ते सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात.

मालाची ने आण करण्यासाठी दिल्ली हे महत्त्वाचे केंद्र होते. पूर्वेकडून भात, कनौजकडून साखर, दुआबातून गहू आणि दक्षिणेकडून तलम रेशीम दिल्लीमध्ये येई. या व्यतिरिक्त धातूच्या वस्तू, हस्तीदंत, जडजवाहीरे, सुती कपडे आणि इतर अनेक चैनीच्या वस्तू याही दिल्लीमध्ये येत असत. भारताबाहेरून पूर्व आफ्रिका, अरेबिया आणि चीन सारख्या प्रदेशातूनही दिल्लीमध्ये वस्तू येत. इब्न बहुरा यांच्या मते दिल्ली त्यावेळेस विलोभनीय शहर होते.

व्यापारवाढीमुळे पैशांच्या वापराला उत्तेजन मिळाले आणि त्यामुळे या काळात चांदीचे टंका हे नाणे प्रचलीत झाले. हे सगळयात जास्त दैनंदिन व्यवहारात सामान्यपणे वापरले जाणारे चलन अल्तमश या सुलतानाने सुरू केले होते. याशिवाय वजने व मापांची पद्धतीसुद्धा या काळात सुरू करण्यात आली आणि ती आतापर्यंत मेट्रिक पद्धतीचा अवलंब करेपर्यंत वापरण्यात आली.

### धार्मिक स्थिती ः

ज्यावेळेस इस्लामचे भारतात आगमन झाले त्यावेळेस हिंदू धर्मही अस्पष्ट स्वरूपात होता. हिंदू धर्मा ची अवनती घडून आलेली होती.

भारतात अंधश्रद्धा, कर्मकांड आणि आहुती यांचे प्रावल्य होते. ब्राह्मण हे फार शक्तीशाली बनलेले होते व जाती व्यवस्था अधिक कठोर बनलेली होती. खालच्या वर्गाला हीण वागणूक दिली जात होती. हिंदू धर्मात जे प्रकार चालू होते त्याच्या अगदी विरोधी इस्लाममध्ये परिस्थिती होती. समता, वंधुता आणि ऐकेश्वरवाद ही इस्लामची तत्त्वे होती. इस्लाममध्ये कसल्याही प्रकारचे अवडंबर नव्हते. दुसऱ्या बाजुला एकदम साधी तत्त्वे व लोकशाहीवर आधारीत संघटन या बाबी इस्लाममध्ये होत्या.

इस्लामच्या आगमनामुळे भारताच्या राजकिय रचनेत विशेष बदल घडून आले नाहीत. दुसऱ्या बाजुला त्याने समाजाच्या सामाजिक ढाच्यालाच एक प्रकारे आव्हान दिले. इस्लामच्या संपर्काचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे भक्ती व सुफी चळवळीचा उदय झाला. परमेश्वर सर्वश्रेष्ठ

आहे.सर्व लोक त्याला समान आहेत आणि त्याची भक्ती केल्यास मुक्ती मिळते ही धारणा दोन्ही चळवळीचा सामाईक पाया होता.

## ४.२ इस्लाम व सुफी पंथाचा उदय :

भारतात मुस्लिम पहिल्यांदा आठव्या शतकात व्यापारी म्हणुन आले. या देशातील सामाजिक, सांस्कृतिक स्थितीमुळे ते प्रभावित झाले व भारतात स्थायिक होण्याचे त्यांनी ठरविले. मध्य व पश्चिम आशियातून जे व्यापारी भारतात आले त्यांनी जाताना भारतीय विज्ञान आणि संस्कृतीचे काही अंश त्यांच्या प्रदेशात परत नेले. भारतीय ज्ञान त्यांनी इस्लामी जगात व युरोपात प्रसारित केल्यामुळे ते भारताचे सांस्कृतिक राजदूत बनले. स्थलांतरीत मुस्लिमांनी स्थानिक लोक व स्थानिक लोकांशी वैवाहिक संबंध निर्माण केले व तेथे ते सलोख्याने राहण्याचे शिकले. परस्पर विचार व चालीरितीची देवाणघेवाण झाली. पोशाख, शिष्टाचार बोलणे, आदब या बाबतीत हिंदू मुस्लिमांनी एकमेकांना सारखेच प्रभावित केले आहे. मुस्लिमांनी त्यांच्याबरोबर त्यांचा जो इस्लाम धर्म भारतात आणला त्याचा भारतीय समाज व संस्कृतीवर खोल परिणाम झाला. आपण ह्या प्रकरणांत महंमद पैगंबर आणि इस्लामबद्दल अधिक माहिती करून घेऊ या.

प्रेषित महंमद पैगंबराने अरेबियात सातव्या शतकात इस्लामची शिकवण दिली. त्यांचा जन्म अरेबियात इ.स.५७१ मध्ये कुरेशी जमातीत झाला. त्यांनी इ.स. ६२२ मध्ये मदिनेवरून मक्केला स्थलांतर केले व तेव्हापासून हिजरी सनाची सुरूवात झाली. मुस्लिम श्रद्धेप्रमाणे देवदूत गॅबरियल यांच्यामार्फत प्रेषित महंमदाला प्रत्यक्ष अल्लाने (परमेश्वराने) कुरणाचे प्रकटीकरण केले. आता कुराणाचे अनेक भाषेत भाषांतर झाले आहे. इस्लामचे पाच मुलभूत सिद्धांत खालीलप्रमाणे आहे.

१. तौहिद (अल्लाह म्हणजे परमेश्वर)

२. नमाझ (पाच वेळा देवाची पार्थना)

३. रोझा (रमझानच्या महिन्यात उपवास)

४. झकत (दान)

५. हाज (मक्केची धर्मयात्रा)

प्रेषित महंमदाचे बोल हदिथ हदीस किंवा हदीतमध्ये जतन करून ठेवले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर खिलापतीची स्थापना झाली. चार पुण्यवान खलिफा होऊन गेले. इस्लाम समानता बंधुता आणि परमेश्वराच्या अस्तित्वावर भाष्य करतो.

समता, बंधुता आणि एकमेकवाद ही इस्लामची तत्त्वे होत. इस्लामच्या आगमनामुळे भारतीय समाजाच्या पारंपारिक समाजरचनेवर मोठा परिणाम घडून आला. भक्ती आणि सुफी चळवळीचे योगदान या संदर्भात विशेष महत्त्वाचे आहे. परमेश्वर सर्वश्रेष्ठ आहे. सर्व लोक समान आहेत व परमेश्वराची भक्ती केल्यास मुक्ती मिळते अशी दोन्ही पंथाची धारणा होती.

### ४.२.१ सुफी पंथाचा उदय :

इस्लामी गुढवादाला सूफीवाद ही सामान्य संज्ञा वापरली आहे. सुफी संत त्याच्या धार्मिक दृष्टीकोनात फार उदार होते. सर्व धर्माच्या अनिवार्य एकतेबद्दल ते बोलत त्यांनी संगितातून आध्यात्म व अद्वैत

तत्त्वज्ञान शिकविण्याचा प्रयत्न केला. सुफी पंथाचा उदय इराणमध्ये झाला. तुर्की राजवटीच्या काळात सुफी पंथाला भारतात पोषक वातावरण मिळाले. सुफी संताची करूणा, सहिष्णुता, कनवाळुपणा समानतेची भावना व मित्रत्त्वाचा दृष्टिकोन यामुळे हिंदु धर्मातील खालच्या जातीतील अनेक लोक इस्लामकडे आकर्षित झाले. मोईनोद्दीन चिस्ती निझामद्दीन आवलिया फरिदउद्दीन गंज इ. शक्कर हे सुफी पंथाचे आघाडीचे संत होते. त्यांच्या बद्दल आजही जिव्हाळा आदर आणि सन्मानाची भावना लोकांच्या मनात आहे. त्याचा खनक आणि दर्ग्याच्या स्थापनेचा विचार करता ते सुद्धा ख्रिस्ती आणि बौद्ध साधुंमुळे प्रभावित झाले होते असे दिसून येते. खनक ही सुफी साधूंची उत्तर भारतात राहण्याची किंवा विश्रांतीची ठिकाणे असत. त्यांनी सुफी पंथाचा प्रसार दूरदूरच्या खेडयापर्यंत केला. मुस्लिम संताच्या कबरी म्हणजे मझर आणि विश्रांतीस्थाने म्हणजे तकीया ही सुद्धा इस्लामी विचारांच्या प्रसाराची केंद्रे होते. ह्या संतांना सामान्य लोकांबरोबरच उच्चवर्गीय लोकांनी सुद्धा मोठया प्रमाणावर पाठिंबा दिला. सुफी संतांनी सर्व लोकांच्या सन्मानावर भर दिला.

सुफी पंथाचे अनेक उपपंथ किंवा सिलसिला होते. हे सिलसिला संस्थापक संताच्या नावाने असत. उदा. चिस्ती, सुरावर्दी कादरी आणि नक्शेबंदी इ. ऐन-इ-अकबारीचा लेखक अबुल फझल यांच्या मते सोळाव्या शतकात भारतात जवळजवळ १४ सिलसिले होते. प्रत्येक सिलसिल्याला स्वतःचे सुफी संताना भक्तांच्या आश्रयासाठी खनक असत. नंतर ही खनक विद्याभ्यासाची केंद्रे बनली.

अजमेर नागौर आणि अजोदन किंवा पाकिस्तानातील पाटण ही सुफींची महत्त्वाची केंद्रे बनली. सुफी संतांनी पीरी-मुरादी म्हणजे गुरू शिष्यांची परंपरा सुरू केली. आध्यात्मिक शांती मिळण्यासाठी पहिल्यांदा मूळ फारसीमधील व नंतर हिंदवी किंवा हिंदुस्थानमधील काव्य व संगीत ऐकत त्याला सामा म्हणत देव भक्त ऐक्य आणि अनन्य भावाने देवाला शरण जाणे ही सुफी पंथाची शिकवण पूर्ण पणे निर्गुण भक्ती चळवळीतील भक्तांप्रमाणेच आहे. संगीत, भाषेचा अडसर न येऊ देता प्रत्येकाला आकर्षित करत असते. हळूहळू सुफी पंथाने दर्ग्याला भेट देणाऱ्या हिंदूंना आकर्षित करून घेणे सुरू केले. सुफी पंथावरील हिंदू प्रभाव आपण सुफी संताच्या सिद्ध आणि योगी ह्या ध्यानमग्न (अवस्थेचा) मुद्राच्या रूपाने पाहू शकतो.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ४.१

१. प्रेषित महंमदाचे मदिनेवरून मक्केला जे स्थलांतर झाले तेव्हापासून एक कालगणना सुरू होते त्या कालगणनेला काय म्हणतात ?

उत्तर ______________________

२. रोझा म्हणजे काय ?

उत्तर ______________________

३. त्यांच्या करूणा, सहिष्णुता, समानतेची कल्पना आणि कनवाळुपणा यामुळे हिंदू धर्मातून इस्लामला कोणी अनुयायी मिळवून दिले ?

उत्तर ______

४. ऐन-इ-अकबरीच्या लेखकाचे नाव सांगा.

उत्तर ______

## ४.३ राजकीय पार्श्वभूमी :

इ.स. १२०६-१२९० या काळात दिल्लीवर राज्य केलेले पहिले सुलतान मामलुक तुर्क होते. त्यांच्यानंतर तुघलक सैय्यद आणि लोदींनी उत्तर भारतावर १५२६ पर्यंत दिल्लीवर राज्य केले. ह्या सर्व राज्यकर्त्यांना सुलतान म्हणत. मुस्लीम जगताचा धार्मिक व राजकिय नेता खलिफा समजला जाई व त्याच्या प्रतिनिधी म्हणून सुलतान राज्य करत आहे असे मानले जाई. खलिफा आणि सुलतानचे नाव खुतव्यात वाचले जाई. शुक्रवारच्या नमाझाच्या वेळेस स्थानिक इमाम जो भाषण द्यायचा त्याला खुतवा म्हणतात.

इ.स.१५२६ मध्ये दिल्ली सुलतानाच्या जागी मुघल राज्यकर्ते बनले. त्यांनी सुरूवातीला अग्र्याहून व नंतर दिल्लीहून मजबूतीने १७०७ पर्यंत राज्य केले. त्यानंतर १८५७ पर्यंतची मुघल राजवट नामधारी स्वरूपाची होती १८५७ मध्ये हा राजवंश संपुष्टात आला. मुघलांनी खलिफाकडून कसल्याही प्रकारची मान्यता मागितली नाही.परंतु ते खलिफाला नेहमी भेटवस्तु पाठवत असत. अर्थात ते त्यांच्या स्वतःच्या नावाने खुतवा वाचत.

तरीसुद्धा स्थानिक अफगाण राजा शेर शहा याने तसेच अफगाण राजा शेर शहा याने मुघल सम्राट हुमायुन याला १५४० त १५५५ असे पंधरा वर्षे दिल्लीच्या गादीपासून दूर ठेवले. शेर शहाची कारकीर्द त्याच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल प्रसिद्ध आहे. शेर शहाच्या विविध महत्त्वपूर्ण कार्यात अनेक हमरस्त्यांच्या बांधकामाचा समावेश होतो. परंतु त्यातही सध्याच्या बांगलादेशातील सोनारगावपासून पाकिस्तानातील अटकपर्यंत दिल्ली अग्र्याहून जाणारा हा ग्रँड ट्रक रोड अर्थात सडक-इ-अझम १५०० कोस इतका लांब असणारा हमरस्ता सर्वात महत्त्वाचा आहे.

१५५६-१६०५ या भारताच्या इतिहासाच्या काळात मुघल सम्राट अकबर हा राज्य करत होता. त्याने भारतीयांमध्ये प्रेमभाव सहिष्णुता या तत्त्वांना उत्तेजन देण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. त्यासाठी त्याने वांशिक धार्मिक व सांस्कृतिक बाबतीत असलेले परस्पर आकस कमी केले. त्याने हिंदूशी मित्रत्वाचे व उदार संबंध प्रस्थापित केले. त्याचे साम्राज्यवादी हेतू साध्य करण्यासाठी त्याने राजपूत राजांशी वैवाहिक संबंध निर्माण केले. त्याचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्याने देशाचे राजकिय ऐक्य तसेच एकसंध प्रशासकिय व्यवस्थेसह शक्तीशाली केंद्र सरकार निर्माण केले. अकबर हा कला वास्तुकला आणि शिक्षण यांचा महान आश्रयदाता होता. तो निधर्मी मानसिकतेचा राजा होता. त्याने दिन-इ-इलाही नावाचा धर्म स्थापन केला ज्या धर्मात सर्व धर्माच्या तत्वांचा अंतर्भाव होता. अकबराची उदारमतवादी सहिष्णु धोरणे जहांगीर शहाजन या त्याच्या वारसांनी ही पुढे चालविली परंतु हे धोरण औरंगजेबाने सोडून दिले.

औरंगजेबाची अदूरदर्शी धोरणे व त्याची देशातील व विशेषतः दक्षिण भारतातील दीर्घकालीन युद्धे यामुळे मुघल साम्राज्याचे विघटन घडून आले.

दक्षिणेत मराठी सत्तेचा उदय, नादिरशहाची आणि अहमद शहा अब्दालीची आक्रमणे, या व्यतिरिक्त दरबारातील सरदारामधील असंतोष, वायव्य भारतात शिखांचा उदय या सर्व घटकांमुळे उरली सुरली मुघल शक्ती (सत्ता) नाश पावली. आर्थिकदृष्ट्या तरीही भारत हा जगातील सर्वात मोठा निर्यातदार होता व भारताकडे सर्वात जास्त संपत्ती होती. परंतु तरीही आधुनिकतेच्या प्रवासात भारत मागे पडला.

## ४.४ भारतातील सांस्कृतिक विकास ः

ह्या काळातील राजांनी प्रामाणिकपणे कला व वास्तुकलेच्या क्षेत्रात रूची घेतली. मध्ययुगीन काळातील सांस्कृतिक संयोग हे वैशिष्टये आपण वास्तुकलेच्या क्षेत्रातही शोधू शकतो. भारतीय व इस्लामी शैलीच्या मिश्रणाने नवीन वास्तुशैली उदयास आली व तिला भारतीय इस्लामी शैली म्हणण्यात येऊ लागले. ह्या शैलीची मुख्य वैशिष्टये पुढीलप्रमाणे

१. घुमट

२. उंच मनोरे किंवा मिनार

३. कमान

४. कमानदार छप्पर

मुघल सम्राट हे महान निसर्गप्रेमी होते. सुंदरबागा आणि किल्ले बांधण्यात ह्या राजांना आनंद मिळे. प्रसिद्ध शालीमार आणि निशात ह्या मुघल बागा आपल्या सांस्कृतिक वारस्याच्या महत्त्वपूर्ण घटक आहेत. ह्या बागात पाण्याचे नागमोडी वळणांचे प्रवाह व कारंजी होती व या बागा पायऱ्या पायऱ्यांच्या स्तरवार रचनेच्या होत्या. या वेळेस पाणी बागात एका पायरीवरून (स्तरावरून) दुसऱ्या खालच्या पायरीवर(प्रवाह) प्रवाहित केले जाई. त्यावर सोडलेला पाण्याचा प्रवाह ही प्रकाशमय होऊन लुकलुकत असे त्यामुळे सर्व वातावरणालाच एक प्रकारची प्रसन्नता येई.

हे पाणी निमुळत्या छतासारख्या भागावरून प्रवाहित केले जाई. त्यावरून सोडलेल्या पाण्याचा प्रवाह ही प्रकाशमय होऊन लुकलुकत असे. या प्रकारचे उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे लाहोर येथील शालीमार बाग (सध्याच्या पाकिस्तानात) होय.लाहोर बाग तीन पायऱ्यांची (स्तरांची) आहे. परंतु सर्वात चांगले उदाहरण म्हणून भारतातील चंदिगड कालका रोडवरील पिंजोर गार्डनकडे पाहता येईल. ह्या बागेला सात पायऱ्या (स्तर) आहेत. ह्या बागेमुळे ब्रिटीश इतके प्रभावित झाले की त्यांनी व्हाइसरॉयच्या निवासस्थानापुढे (सध्याच्या राष्ट्रपती भवनापुढे) नवी दिल्ली मध्ये तीन पायऱ्यांची बाग निर्माण केली. विसाव्या शतकात याच धर्तीवर म्हैसूर येथे वृंदावन गार्डन निर्माण करण्यात आले.

संगमरवरावर रंगीबेरंगी मौल्यवान बसवलेल्या खडयांचे काम म्हणजे पिटराड्युरा. हा प्रकार शहाजनाच्या काळात फार लोकप्रिय बनला. ह्या कलेची उत्तम उदाहरणे दिल्ली येथील लाल किल्ल्यात व आगऱ्याच्या ताजमहालात उपलब्ध आहेत. फत्तेपूर सिक्री येथील इमारत समुह आग्रा आणि लाहोर येथील मशिदी ह्या इमारती सुद्धा भारताच्या सांस्कृतिक वारशाचा भाग आहेत. आपल्या इतिहासाच्या

ह्या काळात मशिदी राजांच्या कबरी आणि दर्गे ह्या वास्तुरचना भुप्रादेशिक सौंदर्यात प्रभावशाली ठरल्या.

## नाणी :

कोणत्याही काळाच्या ऐतिहासिक माहितीसाठी नाणकशास्त्र म्हणजे नाण्याचा अभ्यास हा एक वेगळा महत्त्वपूर्ण पैलु कलेशी जोडला गेला आहे. त्यामुळे मुस्लीम राजांच्या नाण्यांना इतिहासात महत्त्व आहे या नाण्यांची रचना त्यावरील लेखन हे या काळाबद्दल फार रंजक माहिती पुरविते.

नाण्यांवरील शाही पदव्या, नावे, टांकसाळ यावरून सुलतानाच्या साम्राज्याचा विस्तार व त्याची स्थिती याबद्दलची माहिती मिळते. महंमद तुघलकाची नाणी दिल्ली, दौलताबाद आणि इतर प्रादेशिक राजधान्याच्या ठिकाणी पाडण्यात येत व त्या नाण्यांचे किमान पंचविस प्रकार आढळून येतात. नाण्यांवरील काही मजकुर फारच मनोरंजक आढळून येतो. सैनिक हा दैवी कारणासाठी रणांगणात असतो किंवा जो कोणी सुलतानाची आज्ञा पाळतो तो दयाघन परमेश्वराची आज्ञा पाळतो. ही त्याची काही उदाहरणे आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ४.२

**रिकाम्या जागा भरा.**

१. खलिफा व सुलतानची नावे ........ मध्ये वाचली जात.

२. ........ ह्या स्थानिक अफगाण नेत्याने मुघल सम्राट हुमायून याला शह देऊन त्याला दिल्लीच्या तख्तापासून पंधरा वर्षे दूर ठेवले.

३. साम्राज्यवादी धोरणे पूर्णत्वास नेण्यासाठी अकबराने ......... राजांबरोबर वैवाहिक संबंध निर्माण केले.

४. ब्रिटीश काळात राष्ट्रपती भवनाला ......... म्हणत.

५. पिटराडयुरा किंवा संगमरवरात रंगीबेरंगी बसवलेले खडयांचे काम ....... बादशहाच्या काळात फार लोकप्रिय बनले.

## ४.५ भक्ती चळवळ :

सुफी संतच फक्त या काळातील लोकप्रिय धार्मिक गुरू नव्हते तर त्यात भक्ती संताचाही समावेश होत होता. त्याची शिकवण सुफी संतासारखीच होती. परंतु ही शिकवण ते फार काळ शिकवत आले होते. वीणकर कारागीर आणि व्यापारी लोकांमध्ये ते लोकप्रिय होते. खेडयातील लोकही त्यांची शिकवण ऐकण्यासाठी शहरात येत.

सुफी आणि भक्ती संताच्या बऱ्याच आचारविचारात समानता आढळते. परमेश्वराशी एकरूप होणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण आवश्यक बाब मानली गेली आहे. परमेश्वराशी आत्यंतिक प्रेम आणि भक्ती हा देवाशी असलेल्या नात्याचा पाया मानला गेला आहे. भक्ती संतानी त्यांची संपूर्ण शिकवण साध्या माणसांना समजावी म्हणून स्थानिक भाषेत दिली.

भक्ती संताना विविध प्रकारांची पार्श्वभूमी आहे. परंतु ते मुख्यतः कनिष्ठ जातीतुन आले आहेत. त्यातील बरेच कारगीर होते व ते कमी श्रीमंत वर्गातून आले होते. त्यांनी व्यक्ती व धर्माबावत अधिक सहिष्णुता वाळगण्यावर भर दिला. दक्षिण भारतातही भक्ती चळवळ दीर्घ काळ परिचीत होती. स्तोत्रे व कथानकाच्या माध्यमातून भक्तीची शिकवण देण्याची पद्धती पारंपारिक पद्धतीने अलवार व नयनार या तमिळ संतांनी चालू ठेवली होती.

तुम्ही त्यांच्या बद्दल या ग्रंथाच्या शेवटच्या भागात वाचाल.

### गुरूनानक ः

गुरूनानकांचा जन्म खत्री कुटुंबात तलवंडी येथे झाला ज्याला आज नानकाना म्हणून ओळखले जाते. त्यांना हिशोब लिहिण्याचे प्रशिक्षण दिले होते. तरी सुफी संत व भक्ती संतामध्ये रममान होण्याला त्यांनी अग्रक्रम दिला. काही काळानंतर त्यांना गूढ ज्ञानाची अनुभूती झाली. संत आणि पीरांच्या संगतीसाठी त्यांनी गृह त्याग केला. त्यांनी अनेक रचना केल्या व त्या त्यांनी रबाब नावाच्या वाद्याच्या साह्याने गायल्याही. त्यांच्या रचना लोकप्रिय आहेत त्यांचा एकमेव परमेश्वरावरच्या प्रेमावर आणि भक्तीवर भर होता. देवाच्या प्राप्तीसाठी त्यांनी मूर्ति पुजेला तीर्थयात्रांना, पशुहत्या आणि कर्मकांडांना प्रखर विरोध केला. शुद्ध चारित्र्य आणि आचार विचार ही परमेश्वर प्राप्तीची पहिली अट आहे; ही त्यांची शिकवण होती. त्याच्या मते कोणताही गृहस्थ संसार संभाळून आध्यात्मिक जीवन जगू शकतो.


गुरूनानक

### रामानुज ः

रामानुज हा दक्षिणेतील संत होता आणि त्याने सामन्यांच्या भाषेत शिकवण दिली.

त्यांचा शिष्य रामानंद होता. त्याने त्याच्या गुरूचा संदेश उत्तर भारतात प्रसारीत केला.



रामानुज

### रामानंद ः

रामानंदाचा जन्म अलाहाबाद येथे झाला व त्यांचे शिक्षण वाराणसी येथे झाले. त्यांनी या दोन्ही ठिकाणी प्रवचने दिली. हिंदू धर्मातील अनिष्ठ रूढी, परंपरा नष्ठ व्हाव्यात असे त्यांना वाटत होते. परमेश्वराच्या दृष्टीने सर्व लोक समान आहेत कोणी उच्च नीच नाही हे लोकांनी माहिती करून घ्यावे असे त्यांना वाटत होते. त्यांचे शिष्यामध्ये सर्व प्रकारच्या शिष्यांचा समावेश होत होता. उदाहरणार्थ कवीर हे वीणकर होते. साधना हे खाटीक होते. रवीदास हे चर्मकार होते तर सेना हे न्हावी होते.

**कबीर ः**

कबीर हे रामानंदाचे आवडते शिष्य होते. नानकांप्रमाणे कबीरांनी सुद्धा सामाजिक विषमतेविरूद्ध टीका केली आणि हिंदु मुस्लीम ऐक्यासाठी हाक दिली. कबीर हे मुस्लीम वीणकराचे अपत्य होते व त्यांनी मूर्तीपूजेचा धिक्कार केला. तसेच पूजा, अर्चा, नमाझ पठण किंवा तीर्थस्थान यांनाही त्यांनी विरोध केला. त्यांना सगळयांना पसंत पडेल अशा धर्मांची शिकवण देऊन सर्व धर्मामध्ये ऐक्य घडवून आणायचे होते. त्यांनी देवाशी एकरूप होण्यावर भर दिला. राम, गोविंद, हरी आणि अल्लाह अशा अनेक पद्धतीने ते देवाला संबोधत.



कबीर

तुम्ही कबीराचे दोहा किंवा रचना ऐकल्या असतील.

**चैतन्य महाप्रभु ः**

चैतन्य हे बंगालमधील संत होते ते भगवान श्रीकृष्णाचे भक्त होते. जरी ते ब्राह्मण होते तरी त्यांनी जातीव्यवस्थेवर टीका केली आणि सर्वांच्या समतेवर भर दिला. लोकांनी खरी प्रार्थना म्हणजे प्रेम आणि भक्ती आहे. हे लोकांनी समजून घ्यावे असे त्यांना वाटत होते. भगवान श्रीकृष्णाच्या स्तुतीपर भजनात तल्लीन होऊन ते देहभान हरपून जात.



चैतन्य महाप्रभ

**संत मीराबाई ः**

भगवान श्रीकृष्णाच्या स्तुतीपर भजनांची रचना करून ती गाऊन त्यांची पूजा बांधणारी मीराबाई या दुसऱ्या एक संत होत्या. चैतन्याप्रमाणे त्याही त्यांच्या भक्तीत देहभान हरपून जात.

**नामदेव ः**

नामदेव हे शिंपी होते. त्यांनी मराठीत रचना केल्या. त्यांच्या रचनामध्ये देवाबद्दल अत्यंतिक प्रेम व भक्ती असल्याने दिसून येते.



संत मीराबाई

**भक्ती चळवळीची लोकप्रियता ः**

भक्ती चळवळ लोकांमध्ये इतकी लोकप्रिय का झाली ? कारण या चळवळीने जाती व्यवस्था व ब्राह्मणांचे वर्चस्व याला आव्हान दिले. हे त्याचे एक महत्त्वाचे कारण होते. समता आणि बंधुता या

तत्त्वाची शिकवण सुफी संतही देत होते. त्या तत्त्वाचे भक्ती संतानी स्वागत केले. लोकांचे जुन्या धर्म श्रद्धांवर समाधान होत नव्हते. लोकांच्या भावना व विवेक या दोन्हींचे समाधान करणारा धर्म लोकांना हवा होता.

सर्व भक्ती संतानी ऐकेश्वरवादावर भर दिला. देवाकडे जाण्यासाठी भक्तीमार्गाची गरज आह व कार्मकांडाची गरज नाही. असे त्यांनी प्रतिवादित केले. आहुती, पशुबळी व कर्मकांड यांवर त्यांनी टीका केली.

उत्तर भारतात ही चळवळ निर्गुण व सगुण भक्ती अशा दोन उपप्रवाहात विकसित झाली. निर्गुण भक्त हे राम गोविंद हरी किंवा रघुनाथ असा नामजाप करतानाही आकाररहित देवतेची भक्त करत कबीर व नानक अशा सगुण भक्तांची ठळक उदाहरणे आहेत. सगुण भक्त हे दशरथाचा पुत्र राम किंवा वासुदेव देवकीपुत्र कृष्ण यांचे भक्त होते. निर्गुण भक्ताचे उत्तम उदाहरणे म्हणजे तुलसीदास, सुरदास व रासखान हे होत. तुलसीदासांनी त्यांच्या प्रसिद्ध रामचरित्र मानसमध्ये रामाच्या रूपाचे वर्ण न करून रामाची एक प्रतिमा साकारली. सूरसागर या ग्रंथात सूरदासांनी कृष्ण स्तुतीपर गीते लिहून कृष्णाचीही अशीच प्रतिमा साकारली. सगुण भक्तीच्या ह्या परंपरेतील रासखान या कवीने वरील प्रकारेच कृष्ण प्रतिमा साकारली आहे.

भक्ती चळवळीचे पहिले महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे ह्या चळवळीने देवाला पित्याचा दर्जा दिला व प्रत्येक व्यक्तीला बंधुत्वाचा दर्जा दिला. जात किंवा लिंगाच्या आधारावर ह्या चळवळीने भेदाभेद केला नाही. ह्या चळवळीचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे जो देव सर्वशक्तीमान, सगळीकडे संचार करणारा भक्ताच्या सर्व समस्या सोडविणारा आहे. त्या देवाला अनन्य भावाने शरण जाणे. भक्ती चळवळीचे तिसरे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे वैयक्तिकरित्या देवाची आत्यंतिक भक्ती करणे. चौथे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे योग्य नैतिक आचरण; देवाच्या सतत नामस्मरणाने आत्मा शुद्ध वनतो. देवाच्या कृपाप्रसादासाठी भक्ताला त्यामुळे तयार केले जाते. खऱ्या भक्ताला मोक्ष किंवा स्वर्गाची गरज नसते. अशा भक्ताला देवाचे नामस्मरण त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे वाटते व परमेश्वराचे गुणगान करण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्माला यावे असे वाटते.

याशिवाय गुरू किंवा आध्यत्मिक शिक्षकालाही भक्ती चळवळीत महत्त्व आहे. भक्तीच्या मार्गावरून वरीच पुढे वाटचाल केलेली व्यक्ती म्हणजे गुरू. त्याला परमेश्वराचा साक्षात्कार झालेला असतो व देवापर्यंत पोहोचण्याची त्याची क्षमताही असते. लोकांना आशादायी बनवणे त्यांना खंबीर बनवून त्यांच्यात आत्मशक्ती निर्माण करणे ही गुरूची कार्ये आहेत. गुरू आणि शिष्य यांच्या संबंधातून पहुल पद्धतीचा उदय झाला. पहुल म्हणजे गुरूने त्याच्या शिष्याला त्याच्या आध्यात्मिक मार्गावर शिष्य म्हणून स्विकारण्याचे मान्य करण्यासाठी दिलेले पाणी (संकेत), शिखांनी नंतर हा विधी तलवार, धुणे, ह्या विधीत रूपांतरीत केला. ह्या विधीला खंडे का पहुल असे त्यामुळे म्हणतात. ह्या प्रथेतून पुढे पिरी-मुरादी ही पद्धती संत-शिष्य (संत-सैनिक) या परंपरेला उजाळा देण्यासाठी निर्माण झाली. ह्या ठिकाणी भक्ती चळवळीची काही वैशिष्टये व प्रथा परंपरा सुफी पंथाप्रमाणेच आहेत. याची तुम्ही नोंद घेतली आहे का ?

एकेश्वरवाद व भक्ती चळवळ भारतभर व्यापून राहिली. मध्ययुगीन संत व अवलियांच्या भक्ती काव्यातून ह्या चळवळींची प्रत्ययकारी आणि सुंदर अभिव्यक्ती आढळते. भले हे संत अवलिया कोणत्याही धार्मिक श्रद्धा मानत असले तरी त्यांची वरीलप्रकारची अभिव्यक्ती त्यांच्या काव्यातून

पाहायला मिळते. त्यांची गीते किंवा कवाली ह्या वङ्मयीन रचनांतून त्यांनी लोकांना एकत्र आणले (जोडले) जे कशानेही हे होऊ शकले नसते. यामुळे प्रादेशिक भाषांच्या विकासालाही उत्तेजन मिळाले.

टिपा

## पाठ्यांशांवरील प्रश्न ४.३

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भक्ती चळवळीचे दोन मुख्य उपप्रवाह कोणते ?

उत्तर

२. महत्त्वाच्या निर्गुण व सगुण भक्तांची नावे लिहा.

उत्तर

## ४.६ लोककलांचा विकास ः

खेडयातील लोकांना त्यांची सर्जनात्मक कौशल्य दाखविण्याची संधी इतर क्षेत्रातही मिळाली. शेतीच्या मशागतीशी अनेक प्रसंग जोडले गेले आहेत. उदाहरणार्थ जमीन नांगरणे, बी पेरणे, रोपे लावणे, कापसाची वेचणी, खुरपणे, तण काढणे तसेच काही सामाजिक समारंभ अशा प्रसंगांनी नृत्य व गायनाच्या संधी मिळवून दिल्या. तुम्हाला हे सर्व परिचयाचे वाटते का ? होय आज जे तुम्ही उत्सव आणि विधी पार पाडता हे पूर्वीपासून काही बदल होत चालत आलेले आहेत. सुगीचा काळ व पावसाचे आगमन आनंद व्यक्त करायला व नृत्य करायला औचित्यपूर्ण प्रसंग असत. देवाला आवाहन करून विशेष पूजा मंदिरात केल्या जात. श्रावण (जुलै/ ऑगस्ट) महिना आणि कोकिळेचे गायन (हाक) हे प्रसंग झोके टांगून झोक्याचा आनंद लुटण्याचे असत. त्याचप्रमाणे रात्री उशिरापर्यंत स्त्रिया गटागटाने त्यांच्या चरख्यावर बसून सूत कातत गात असत हे भारतातील जवळजवळ सर्व खेडयातील नेहमीचे दृश्य असे.

हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की प्रत्येक प्रदेशाने त्याचा विशिष्ट नृत्यप्रकार स्थानिक वैशिष्टयांसह विकसित केला. गरवा कालबेलिया, गिड्डा, बांबू, लावणी आणि असेच कित्येक नृत्य प्रकार अस्तित्वात आले. यातील काही प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात सादर केले जातात.

शिक्षण हे स्त्रियांसाठी महत्त्वाचे मानले जात नव्हते. तरीसुद्धा विविध क्षेत्रात त्यांची प्रतिभा दाखवायला अडसर त्यामुळे त्यांना निर्माण झाला नाही. त्यांनी त्यांची प्रतिमा भरतकामात दाखविली. राजस्थानात मुली त्यांची ओढणी, शर्ट व घागऱ्यावर सुंदर भरतकाम करतात. राजस्थानातून बांधणी व रंगकामाची तसेच स्त्रिया व पुरूषांसाठी विविध रंगसंगतीची व आकृतींची वस्त्रे तयार केली गेली. आजही राजस्थानातील लोक संबंध भारतात सर्वात वैविध्यपूर्ण रंगसंगती असलेले कपडे घालतात. त्यांच्या रंगाची उधळण त्यांच्या घरगुती प्राण्यांच्या सजावटीतून आपण पाहू शकतो. (घोडे, बैल, उंट व हत्ती) पंजाबात मुली सुंदर फुलकारी कला प्रदर्शित करतात. लखनौ आणि लखनौच्या परिसरात

सलवार, ओढणी, शर्ट व साडीवरसुद्ध चिकनकारी केलेली दिसते. भरताने आपला नाटयशास्त्रात पाचव्या शतकामध्ये ज्या ज्या नाटककारांबद्दल लिहीले ते सर्व लुप्त झालेले नाही. तमाशा व लावणी यांचा महाराष्ट्र विकास झाला. मध्य भारतात पांडवांनी उत्तर भारतात मेरासीचा थोडया फार फेरफारसह विकास झाला. कठपुतळीवाले भाट, मुकअभिनय करणारे गावोगावी हिंडून लोकांचे विविध प्रकारे मनोरंजन करत डोंबारी व हातचलाखी करणारे जादूगर ही गावोगावी हिंडताना आपण पाहू शकतो. काही भागात मर्दानी लष्करी कौशल्य असणारे खेळ विकसित झाले होते. सर्व भारतभर कुस्ती अनादीकाळापांसून लोकप्रिय आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ४.४

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोणत्याही दोन लोक नृत्यांची नावे सांगा.

उत्तर ______________________________

२. भारतात विकसित झालेले कोणतेही एक भरतकाम सांगा.

उत्तर ______________________________

## ४.७ चित्रकला ः

इस्लामी संस्कृतीने ज्या दुसऱ्या एका क्षेत्रावर प्रभाव टाकला ते क्षेत्र म्हणजे चित्रकलेचे होते. हुमायून ज्याने राजकिय निर्वासित म्हणून पर्शियात १२ वर्षापेक्षा जास्त काळ घालवला, १५५५ मध्ये तो पुन्हा ज्या वेळेस दिल्लीचा बादशहा झाला त्यावेळेस त्याच्याबरोबर त्याने चित्रकार आणले. त्यांच्यापैकी मीर सय्यद अली आणि अब्दुस समन्द हे प्रसिद्ध आहेत. त्यांनी हस्तलिखित प्रतीवरील चित्रकलेची परंपरा विकसीत केली. जवळजवळ १२00 चित्रांचा संग्रह असलेले दास्तान-इ-अमीर हमझा हे त्याचे उदाहरण आहे. हा काळ हुबेहुब प्रसंग अथवा व्यक्ती चितारणाऱ्या प्रोट्रेट आणि लघुचित्रशैलीच्या भरभराटीचा साक्षीदार होता. परंतु यातील आश्चर्याची बाब म्हणजे या चित्रकारांनी शास्त्रीय राग चितारण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांनी शास्त्रीय रागांसारख्या पूर्णतः अमूर्त कल्पनांना आकार व रंग देण्याचा प्रयत्न केला. ऋतु किंवा बारामास चित्रकलेला भौतिक आकार दिला गेला तुम्ही या कलाकारांच्या सर्जनशीलतेचा अंदाज करू शकता का ? कदाचित फक्त चीन सोडल्यास जगात कोठेही कलाकारांनी ऋतुंना किंवा संगीताला चित्रबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

अकबर जहांगिर आणि शहाजान या बादशहांनी अशा कलाकारांना राजाश्रय देणे सुरू ठेवले त्यामुळे मुघल चित्रशैली भरभराटीस आली. अकबर ह्या उदार राजाने चित्रकलेला उत्तेजन दिले. त्याने दसवंत आणि बसवनलालसारख्या अनेक हिंदू चित्रकारांना सरकारी सेवेत घेतले. त्याच्या काळात भारतीय व पर्शियन (इराणी) शैलीचा संयोग झाला. भारतीय चित्रकलेवरील या काळातील युरोपियन प्रभावही आपण ओळखू शकतो. मुघल चित्रशैलीने जहागिरांच्या काळात सर्वोच्च बिंदू

गाठला. स्वतः जहांगिर प्रसिद्ध चित्रकार होता. अबुल हसन आणि उस्ताद हे त्याच्या दरबाराचे वैभव होते. मन्सूर हा त्याच्या लघुचित्र शैलीतील चित्राबद्दल प्रसिद्ध होता. औरंगजेब त्याच्या राजकिय बाबीत व्यस्त असल्यामुळे त्याने संगीत आणि चित्रकलेला उत्तेजन देण्याचे थांबवले. आपल्या धन्यांचे अनुकरण करत अनेक मांडलिक सरंजमदार राजपुत्रांनी चित्रकारांना राजाश्रय दिला. अशा प्रकारे मुघल शैलीबरोबरच राजपूत आणि पहाडी शैलीचा विकास झाला. समाजातील उच्च वर्गाने सुद्धा चित्रकलेला उत्तेजन दिले. अठराव्या शतकाच्या अखेरीस व एकोणीसाव्या शतकात श्रीमंताच्या हवेली किंवा मोठे राजवाडे तसेच मंदिरे ही चित्रांनी सुशोभित केली जाऊ लागली. आजही अशा हवेल्या राजस्थानात बहुसंख्य पर्यटकांना आकर्षित करत आहेत. तुम्ही जर त्या भागात कधी गेला तर अशा हवेल्यांना भेटी देऊ शकता.

मुघल चित्रशैलीने सोळाव्या ते अठराव्या शतकात पर्शियन (इंडो पर्शियन) लघुचित्रशैलीला जन्माला घातले. मुघल दरबारी चित्रकारांनी भू-अवकाश (लँडस्केप) रचनाच्या बरोबर मानवी आकृत्या आणि वेशभूषा अशी चित्रे नव्याने प्रचलित केली. ज्यावेळेस ह्या चित्रकारांचा पारंपारिक भारतीय शैलीशी संबंध आला त्यावेळेस त्यांची चित्रकला अधिक नैसर्गिक बनली. लघुचित्रावर स्वाक्षरी करण्याची प्रथा सुरू झाली. कलाकरांना या काळात मासिक वेतनावर नेमण्यात येऊ लागले. चेंगझनामा, जफरनामा आणि रामायण ह्या ग्रंथातून त्यांनी प्रसंग निवेदन करणारी चित्रे काढली आहेत.

## ४.८ संगीत ः

अकबर जहांगिर शहाजन ह्या मुघल सम्राटानी अनेक संगीतकारांना राजाश्रय दिला. अकबराच्या दरबारातील तानसेनने अनेक शास्त्रीय राग गायले व अनेक नवे राग रचले. शहाजान स्वतः चांगला गायक होता असे म्हणतात. हे गायक विविध ऋतुत व दिवसांच्या विविध प्रहरी प्रसंग व समयानुरूप राग गाऊन बादशहाचे मनोरंजन करत.

तुर्की व अफगाणी राजांच्या काळात भारतीय इराणी अशा संमिश्र संगीताची सुरूवात झाली. मुघल काळात ह्या संगीताच्या विकासाची पुढील अवस्था गाठली होती. औरंगजेबाने संगीताला विरोध केला. परंतु त्याच्याच काळात सर्वात जास्त भारतीय शास्त्रीय संगीतावर फारसी ग्रंथ लिहीले गेले हे एक आश्चर्य आहे. उत्तर भारतात वरील सर्व घडामोडींमुळे हिंदुस्थानी संगीत शैली वाढली. ह्या संगीताने जीवनातील विविध मानसिक स्थितीमध्ये गोड अत्यानंद देणारी नादमय संगीत ध्वनी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले. राग व रागिणीची योजना (सादरीकरण) त्यामुळे प्रसंगानुरूप होत असे.

खयाल, ठुमरी, गझल यांचा या काळात विस्तार झाला. मुघल दरबारातील तानसेन ह्या शैलींचा संस्थापक होता. त्याचप्रमाणे दक्षिणेत कर्नाटकी संगीत शैलीचा विकास झाला. सामान्य लोकांनी त्यांची संगीताची अभिरूची व जाण लोकसंगीत व लोकगीतात जतन करून ठेवली. या लोकसंगीतातून व लोकगीतातून त्याचे स्थानिक नायक अलाहउदल दुल्लाभट्टी जैमल पट्टा यांच्या कामगिरीचे स्मरण केले गेले.





### भारतीय मुघल (हिंदी मुघल) संस्कृती :

मुघल शासकांनी सुलतान ही अफगाणी पदवी नाकारली व ते स्वतःला बादशाह म्हणजे सम्राट दिन इ. पनाह म्हणजे श्रद्धांचा रक्षणकर्ता ह्या पदव्या घेऊ लागले. लोकांमध्ये राजपदाबद्दल पावित्र्य व आदराची भावना निर्माण व्हावी म्हणून मुघल बादशाहनी खास बनविलेल्या खिडकीतून म्हणजे झरोक्यातून लोकांना दर्शन देण्याची प्रथा सुरू केली. त्यांनी सिजदा म्हणजे वाकुन मुजरा करण्याची प्रथा सुरू केली. तसेच राजकिय व धार्मिक सत्तेचे स्वतःच्या हातात केंद्रिकरण केले.

## ४.९ आधुनिक भारतीय भाषांचा उदय :

या काळातील दुसरी महत्त्वाची घटना म्हणते अनेक भारतीय भाषांचा या काळात विकास झाला. उर्दु भाषेचा दिल्लीच्या आसपास उदय झाला असावा. चौदाव्या शतकाच्या आसपास ज्या वेळेस अल्लाउद्दीनचा लष्करी तळ दक्षिणेत होता, त्यावेळेस त्याच्या लष्करात लष्करी भाषा म्हणून उर्दुचा उदय झाला. वस्तुतः दक्षिणेतील गोवळकोंडा व विजापूर ही राज्ये नंतरच्या काळात उर्दु वाङ्मयाची महत्त्वाची केंद्रे बनली. या भाषेने लगेच स्वतःचे व्याकरण निर्माण केले त्यामुळे ती वेगळी भाषा म्हणून परिचित झाली.

काही काळानंतर अभिजन वर्गही या भाषेचा वापर करू लागला. प्रसिद्ध कवी अमीर खुस्त्रो ने या भाषेत काव्यरचना केली. तसेच ही भाषा लोकप्रिय करण्यातही हातभार लावला. काव्याबरोबर सुंदर गद्य, लघुकथा, कादंबऱ्या आणि नाटके अठराव्या व एकोणिसाव्या शतकात ह्या भाषेत लिहिली गेली. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उर्दु पत्रकारितेच विकास झाला. ह्या पत्रकारितेने स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. उर्दु बरोबरच बंगाली, असामी, उडिया, खडी बोली पंजावी, गुजराथी आणि मराठी  या आधुनिक भाषा तसेच तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम् या चार दक्षिण भारतीय भाषा अशा जवळजवळ सर्वच आधुनिक भारतीय भाषा त्यांच्या आजच्या स्वरूपात या काळात तयार झाल्या.

## ४.१० नवे धर्म :

या काळात शीख व पारसी यासारखे नवे धर्म भारतात भरभराटीस आले. काळाच्या ओघात हिंदू व मुस्लीम धर्मात अनेक अनिष्ट प्रथा घुसल्या. धर्मांतर्गत सुधारणांसाठी विविध सुधारणा चळवळी भारतात सुरू झाल्या.

### शिख धर्म :

आपल्या लोकसंख्येत लक्षणिय गट असलेले शीख धर्मीय बहुसंख्येने पंजाब राज्यात आहेत. परमेश्वरानेच ह्या धर्माचे प्रकटीकरण गुरू नानकाकडे केले असे सनातनी शिख मानतात.गुरूनानकानंतर दहावे गुरू गोविंदसिंगापपर्यंत गुरू परंपरेने नानकाची शिकवण व पंथीय उत्साह त्याच जोरकसपणे परावर्तीत होत आला. गुरू गोविंदसिंगानी सर्व शिख धर्मियांनी आदिग्रंथाला गुरूग्रंथ साहेब म्हणून मान्यता द्यावी व ह्या ग्रंथालाच गुरू मानावे अशी आज्ञा दिली. भक्ती चळवळीच्या निर्गुण उपपंथात शिख धर्माच्या उदयाची व वाढीची बीजे होती असे इतिहास आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक मानतात.शिख प्रामुख्याने आकारविरहीत देव सर्व माणसामधील समानता, गुरूंची आवश्यकता आणि पहुल परंपरा

या पंथीय परंपरांवर विश्वास ठेवतात.

काही वेळा गुरूपद वडिलांकडून मुलाला तर काही वेळा गुरूच्या सर्वोत्तम शिष्याला मिळत असे. पाचवे गुरू अर्जुनदेव यांनी शिख धर्माला तीन महत्त्वाची योगदाने दिली. त्यातील पहिले योगदान म्हणजे आदिग्रंथ. ह्या ग्रंथात पाच गुरू आणि इतर संताची शिकवण ग्रंथित करण्यात आली आहे. दुसरे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी गुरूमुखी लिपीला पूर्णत्व देऊन त्याच लिपीत पहिल्यांदा गुरूवचने लिहीली. तिसरे महत्त्वाचे योगदान म्हणजे सुवर्णमंदिर किंवा हरमिंदरसाहेबचे अमृतसरमध्ये बांधकाम झाले. ह्याच मंदिरात सर्व शिख धर्माच्या धार्मिक बाबींचे नियंत्रण करणाऱ्या सर्वोच्च अकाल तख्त ह्या धर्म पिठांची त्यांनी निर्मिर्ती केली.

दहावे गुरू, गुरू गोविंदसिंगांनी १६९९ मध्ये खालसा पंथाची स्थापना केली. खालसा म्हणजे युद्ध त्यांनी पाच क च्या आचार धर्माचे पालन करण्याची प्रतिज्ञा आपल्या शिष्यांना घ्यायला सांगितल्या. त्यात केश (कधीही अंगावरील केस न काढणे) कंघा (कंगवा) कडा (हातात धातूचे कडे घालणे) कृपाण (तलवार जवळ बाळगणे) काच्या (गुडघ्यापर्यंत चड्डी घालणे) वरील पाच 'क'च्या सहाय्याने आचरण करणे बंधनकारक केले. मुळात हा शिख योद्धयाचा पोशाख होता. त्याचप्रमाणे इतरांपेक्षा त्याचे अलगत्व दाखविण्याचा मार्ग होता. गोविंदसिंगानी त्यांच्या मृत्यूनंतर आदिग्रंथ अर्थात गुरूग्रंथ साहेबच शिखांचा गुरू राहिल व प्रत्येक शिखांनी ह्या पवित्र ग्रंथाचा आदर करावा हा उपदेश केला.

संगीत हे शिख धर्माचे नेहमीचे महत्वाचे वैशिष्टय राहिले आहे. संगीताच्या सहाय्याने परमानंद व समाधीही मिळू शकते हा त्यांचा विश्वास होता.

### पारसी धर्म ः

पारसी किंवा झोराष्ट्रीयन धर्माची स्थापना झुतराष्ट्र किंवा झोराष्ट्र यांनी इ.स.पूर्व आठव्या शतकात केली त्यांनी आता पर्शिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात ऐकेश्वरवादाची शिकवण दिली त्यांनी अग्नीची पूजा करण्याची शिकवण दिली. त्याचबरोबर अहूऽऽ माझदा आणि अहुऽरमान म्हणजे चांगल्या व वाईट स्वरूपातील देवतांचे अस्तित्व आहे ही शिकवण दिली. दयाळूपणा व धर्म दाय ह्यासारख्या नैतिक तत्वाचीही त्यांनी शिकवण दिली. त्यांच्या तत्वज्ञानाचा झेंद अवेस्ता ह्या ग्रंथात समावेश केलेला आहे.

त्यांच्या धर्माचा संपूर्ण पर्शियात प्रसार झाला. आठव्या शतकापर्यंत पर्शियावर मुस्लीम आक्रमण होई पर्यंत त्या भागात पारसी धर्म प्रभावी राहिला. परंतु आठव्या शतकात मुस्लीमांनी ह्या भागावर प्रभुत्व निर्माण केले. त्यामुळे अनेक पारसी जगाच्या विविध भागात स्थलांतरीत झाले. ते भारतात आले व गुजराथमध्ये नवसारी येथे स्थायिक झाले. त्यानंतर भारताच्या जवळ जवळ सर्व भागात ते पसरले. त्यांनी भारतीय संस्कृतीत मोठया प्रमाणावर भर घातली. ब्रिटीश राजवट भारतीयांना सुसंस्कृत बनवत आहे व ही राजवट भारतीयांचे शोषण करत नाही. ब्रिटीशांच्या ह्या युक्तीवादातील पोकळपणा दादाभाई नौरोजी या प्रसिद्ध पारसी राष्ट्रवादी नेत्याने दाखवून दिला. त्या समाजातील दुसरे एक सर्वोत्तम व्यक्तीमत्व जमशेटजी टाटा हे भारतीय उद्योगांचे जनक होते. त्यांनी भारतात ब्रिटीशांच्या पोलाद कारखान्याच्या तीव्र स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारतात लोखंड व पोलादाची कारखानदारी स्थापन केली. ती व्यवस्थित चालवली व ह्या उद्योगात भरभराट घडवून आणली. पारश्यांनी मोठया प्रमाणावर सार्वजनिक धर्मदाय संस्था स्थापन केल्या. पारसी धर्म प्रसार होत नाही

कारण ह्या धर्माबाहेर जन्मलेल्यांना कोणत्याही परिस्थितीत पारसी धर्मात प्रवेश दिला जात नाही.

अशा प्रकारे भारतीय सांस्कृतिक प्रवाह सर्व नवागतांना त्याच्यामध्ये सामावून घेत आलेला आहे. त्यामुळे सांस्कृतिक आदान प्रदान घडून आले. यातून भारतीय संस्कृतीला तिचे वैशिष्टे असलेले बहुअंगी बहुभाषिक बहुधर्मीय आणि तरीही एकात्म स्वरूप प्राप्त झाले आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ४.५

**रिकाम्या जागा भरा.**

१. .......... यांनी खालसा पंथ स्थापन केली व शिखांना पाच 'क' रांच्या आचार धर्माच्या प्रतिज्ञा घ्यायला लावल्या.

२. .......... लोक अग्नीची पूजा करत. चांगल्या व वाईट स्वरूपाच्या देवाच्या पूजा करत. तसेच दयाळुपणा व धर्मदायाला प्रोत्साहन देत.

## ४.११ दक्षिण भारत :

इ.स.सनाच्या नवव्या ते अकराव्या शतकाच्या दरम्यान दक्षिण भारतात चोलमंडलमच्या प्रदेशात चोल राजवंशाचे राज्य होते. त्यांनी शक्तीशाली पायदळाबरोबरच शक्तीशाली आरमारही उभारले. राजेंद्र चोलाने काही इंडोनेशियातील बेटे जिंकली अशी आख्यायिका आहे. त्यांनी गावपातळीवर लोकशाहीत्मक संस्था स्थापन केल्या. बौद्ध व जैन धर्माची सुद्धा ह्या प्रदेशात भरभराट झाली. चोल राजांच्या उत्तेजनामुळे वाङ्मय ललितकला, शिल्पकला धातुंचे सर्वोत्तम ओतकाम या बाबींची भरभराट झाली. चौदाव्या शतकात दक्षिण भारतात नवे साम्राज्य उदयाला आले. सध्याच्या कर्नाटक मधील या साम्राज्याला विजयनगर साम्राज्य म्हणजे तुंगभद्रा व विजयनगर साम्राज्याच्या उत्तरेला नवे मुस्लीम साम्राज्य उदयास आले, ह्या साम्राज्याला बाहमणी साम्राज्य म्हणत. हे साम्राज्य सध्याच्या आंध्रप्रदेशात होते. बाहमणी आणि विजयनगर साम्राज्यात रायचूर दुआबावरून सतत संघर्ष होत होते.

चोलमंडलम प्रदेशात तामिळ भाषा, कर्नाटकात कन्नड, आंध्रात तेलगू व केरळमध्ये मल्याळम भाषा लोकप्रिय होत्या. ह्या भाषा त्याच्या संबंधीत प्रदेशात नावारूपास आल्या. ह्या सर्व भाषांना वेगवेगळया लिप्या आहेत. दक्षिण भारतातील सर्व प्रदेशात प्राचीन काळी मुळात तामिळ भाषा बोलली जात होती कारण तामिळ ही फार प्राचीन भाषा आहे. परंतु मध्य युगात ह्या चार भाषांना भिन्न स्वरूप प्राप्त होऊन वेगळी ओळख प्राप्त झाली. ह्या परिस्थितीत चौदाव्या ते सोळाव्या शतकांच्या दरम्यान विजयनगर साम्राज्याने महान किर्ती संपादित केली. ज्या परदेशी प्रवाश्यांनी विजयनगर साम्राज्याला पंधराव्या आणि सोळाव्या शतकात भेटी दिल्या त्यातील काहींनी येथील राजे शहर व लोकांची स्तुती केली आहे. विजयनगर साम्राज्याचे जे अवशेष हंपी येथे सापडले आहेत ते पाहुन जगभरातील लोक आजही अचंबित होतात.

चोलांच्या काळात कांची विद्याभ्यासाचे केंद्र बनले. विजयनगरचे राजेही कला आणि विद्याभ्यासाचे आश्रयदाते बनले.

## तुम्ही काय शिकलात?

- प्रारंभीच्या तुर्की शासकांना (१२०६-१५२६) सुलतान म्हणत. कारण ते खलिफाच्या वतीने कारभार पाहत.
- दिल्ली सुलतानाच्या जागी मुघल राजे बनले त्यांनी संगीत, चित्रकला, वास्तुकला ह्या सर्वांना उत्तेजन दिले व त्यांनी १७०७ पर्यंत राज्य केले. त्यांनी सुद्धा बहुसंख्य इमारती बांधल्या. १७०७ नंतर मुघल साम्राज्य क्षीण झाले व नंतर ह्या साम्राज्याचे विघटन घडून आले. या गोंधळात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा राजकीय सत्ता म्हणून उदय झाला.
- करूणा, सहिष्णुता, सहानुभुती व समानतेची संकल्पना अशा प्रकारच्या दृष्टीकोनामुळे सुफी संताचा भारतीय लोकांवर खोल प्रभाव पडला.
- चौदाव्या आणि सोळाव्या शतकातील भक्ती चळवळ निर्गुण आणि सगुण अशा दोन प्रवाहात विकसित झाली.
- लोकांनी त्यांच्या प्रादेशिक व स्थानिक लोकपरंपरा नृत्य आणि संगीतात निर्माण केल्या.
- मध्ययुगीन काळात उर्दुचा विकास झाला. ह्याच काळात आजची मराठी, तमिळ, तेलगु, कन्नड, मल्याळम् ह्या दक्षिणेतील व आसामी, बंगाली, हिंदी किंवा खडी बोली तसेच पंजावी आणि गुजराती ह्या उत्तरेकडील भाषांचा उदय झाला.
- शिख धर्माची स्थापना गुरू नानकांनी केली. गुरू अर्जुनदेवांनी आजच्या प्रगत गुरूमुखी लिपीला आदि ग्रंथाला आणि अमृतसरला हरमंदिरला अंतिम रूप दिले.
- पारसी धर्म पर्शियामध्ये झुतराष्ट्र यांनी स्थापन केला.
- चोल राजांनी बंगाल व इंडोनेशियाचा काही भाग जिंकला. त्यांनी गाव पातळीवर लोकशाहीत्मक संस्था सुरू केल्या.
- कांची विद्याभ्यासाचे महान केंद्र बनले.
- विजयनगर साम्राज्याचे अवशेष हंपी येथे कर्नाटकात आहेत. आंध्रप्रदेशात बाहमणी साम्राज्य भरभराटीस आले.
- भारतीय समाज या काळात चार महत्त्वाच्या गटांत सामावलेला होता त्यामधे वरिष्ठ वर्ग, पुरोहित, शहरातील लोक व शेतकऱ्यांच्या गटांचा समावेश होता.
- दिल्लीमधे या काळात व्यापार भरभराटीस आला. कारण सर्व आयात व निर्यात या ठिकाणाहून होत होती.
- इस्लामचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव पडलेला होता. या काळात सुफी आणि भक्ती या दोन महत्त्वाच्या चळवळी कार्यरत होत्या.
- या काळातील सर्वात महत्त्वाचे सुफी संत म्हणजे चिस्ती, फिरदोसी व निझामउद्दीन अवलिया होते.

- गुरूनानक, रामानुज, रामानंद, कबीर, चैतन्य, मीराबाई, नामदेव हे काही प्रसिद्ध भक्ती संत होऊन गेले.

## सत्रान्त अभ्यास

१. मध्ययुगीन काळातील भारताच्या राजकिय स्थितीचे वर्णन करा.

२. इस्लामच्या हिंदू धर्मांवरील प्रभावाची चर्चा करा.

३. भारतीय संस्कृतीच्या समृद्धीत भर घालताना भक्ती चळवळीने जी भूमिका पार पाडली त्याची चर्चा करा.

४. आधुनिक भारतीय भाषांच्या उदयावर टिप लिहा.

५. शिख आणि पारसी ह्या नव्या धर्मांच्या उदयाची चर्चा करा.

## प्रश्नांची उत्तरे

**४.१**

१. हिजरी कालगणना

२. रमझान महिन्यातील उपवासाला रोझा म्हणतात.

३. सुफी

४. अबुल फझल

**४.२**

१. खुतबा        २. शेरशहा

३. राजपूत        ४. व्हाइस रॉयचे निवासस्थान

५. शहाजन

**४.३**

१. निर्गुण व सगुण भक्ती

२. निर्गुण भक्त – नानक व कबीर        सगुण भक्त – तुलसीदास व सुरदास

**४.४**

१. गरवा, कालबेलिया, भांगडा (कोणतेही दोन)

२. पंजावात फुलकारी लखनौमध्ये चिकनकाम

**४.५**

१. गुरू गोविंदसिंग        २. झोराष्ट्रीयन

# ५

# आधुनिक भारत

आपल्या देशाचा इतिहास आपण प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक काळात अगदी सहजतेने विभाजित करू शकतो. प्राचीन काळ ज्यावेळेस मानव पृथ्वीवर राहू लागला. तेव्हापासून सुरू होतो. आधिच्या प्रकरणांत आपण मध्ययुगीन काळत म्हणजे इसवी सनाच्या आठव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत काय घडले हे वाचले आहे. आता आपण इतिहासाच्या आधुनिक काळाबद्दल वाचणार आहोत. मागील दोन कालखंडातील समाज, अर्थकारण, राजकारण आणि संस्कृती एकमेकांपासून फार वेगळे आहेत. हे तुम्ही पाहिले असले, हे फरक ज्याला आपण प्रगती, वाढ असे म्हणतो ती तशीच चालू राहिली असल्याने त्याने वेग घेतला व आपल्या जीवनमानावर त्याने खोल प्रभाव टाकला त्यातून सहज दिसुन येतात.

तुम्हाला आठवत असेल तुर्क, अफगाण, मुघल यासारखे जे परकीय बाहेरून भारतात आले त्यांनी भारतालाच त्यांचे घर बनवून टाकले. परंतु आधुनिक भारतात ब्रिटीश वसाहतकार ह्या भूमीत शेवटपर्यंत परकीय म्हणून राहिले. तरीसुद्धा त्यांचे साम्राज्यवादी हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी फार मोठया प्रमाणावर सामाजिक, आर्थिक व राजकिय बदल घडवून आणले. ह्या प्रक्रियेत भारतीय संस्कृतीवर खोलवर परिणाम घडवून आणले. तुम्ही जर नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन पाहिले तर तुम्हाला ब्रिटीश वास्तुकलेच्या परिणामाचे स्पष्ट चित्र दिसेल. तुम्ही हाच परिणाम भारतातील कोलकत्ता, मुंबई व देशातील इतर भागातील इमारतीतूनही पाहू शकाल. ह्या सर्व इमारती आपल्या सांस्कृतिक वारश्याच्या भाग बनल्या आहेत. वास्तुकलेच्या अवशेषाव्यतिरिक्त ब्रिटीश सरकारने प्रशासनाची एकात्म व्यवस्था, विज्ञाननिष्ठ ज्ञानावर आधारीत असलेली शिक्षण व्यवस्था व पाश्चात्य कल्पना व तत्त्वज्ञानाची देणगी या बाबींही भारतीयांसाठी मागे ठेवल्या. तुम्हाला आश्चर्य वाटेल की धार्मिक, सामाजिक सुधारणा ज्या एकोणीसाव्या शतकात सुरू झाल्या त्यांनी आधुनिक भारताच्या उभारणीला मदत केली. आधुनिक भारतीय भाषातील वाङ्मयाची मोठया प्रमाणावर झालेली वाढ हा घटकही आधुनिक इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराने खोलवर प्रभावित झाला होता. वरील दोन्ही घटकावर भारतीय व पाश्चात्य संकल्पनांचा एकमेकांशी आलेला संबंधाचाही खोलवर प्रभाव होता.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपण खालील बाबी करू शकाल.

- अठराव्या शतकात युरोपात घडणाऱ्या घटना व त्यांचा भारतावर होणाऱ्या परिणामाचा मागोवा घेणे.
- अठराव्या शतकातील अखेरच्या काळाचे वर्णन करणे.
- हिंदु व मुस्लीमांच्या या काळातील धार्मिक व सामाजिक स्थितीचे परिक्षण करणे.
- राजा राम मोहन रॉय स्वामी दयानंद सरस्वती आणि इतर धार्मिक सामाजिक सुधारकांच्या कार्याची जंत्री बनवणे.
- मुद्रण यंत्र व त्याची आपल्या स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका यांचे परिक्षण करणे.
- भारताच्या स्वातंत्र्य लढयाचा गौरव करणे.

## ५.१ पश्चिमेचा उदय आणि त्याचा भारतावरील परिणामः

१४५० नंतर खालील महत्वाच्या घटनांनी युरोपवर परिणाम घडवून आणले.

१. मुद्रण यंत्राचा शोध

२. प्रवोधन पुर्नजीवन व धर्मसुधारणा चळवळी

३. नविन व्यापारी मार्गाचा शोध. त्यानंतर युरोपने विज्ञान भौगोलिक शोध व बंदुकीच्या तंत्रज्ञानात मोठी प्रगती केली. लवकरच त्यांचे लष्कर व आरमार जगात सर्वोत्तम बनले. वैज्ञानिक शिक्षणाने कार्यकारणभाव व तर्कशास्त्र यांच्यावर जुने ज्ञान व समज घासून पाहिले. भारतावर वर्चस्व मिळविण्याच्या शर्यतीत ब्रिटीश, फ्रेंच, डच आणि पोर्तुगीज उतरले. यामध्ये ब्रिटीश यशस्वी झाले. जवळजवळ दोनशे वर्षे भारत पाश्चात्य प्रभुत्वाखाली राहिला. भारताची सर्व मानवी साधनसंपत्ती निष्ठुरपणे राज्यकर्त्या देशाच्या फायद्यासाठी शोषली गेली.

भारतातील सामाजिक व राजकीय स्थितीचा फायदा ब्रिटीशांनी घेतला. शक्तीशाली मुघल साम्राज्याच्या अस्तानंतर अनेक भारतीय संस्थाने व लहान लहान राज्य उदयास आली. ब्रिटीशांनी ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन एका राज्याला दुसऱ्या राज्या (संस्थांना) विरूद्ध लढायला लावले किंवा त्यापैकी एकाला पाठिंबा दिला किंवा गादी बळकावणाऱ्या बंडखोरांना त्यांनी मदत केली. म्हैसूरच्या टिपू सुलतानाने ब्रिटीशांनी ज्या कुटनितीचा अवलंब केला त्याच कुटनितीचा अवलंब करत ब्रिटीश आणि फ्रेंच यांच्यामधील संघर्षाचा फायदा घेतला, तरी ब्रिटीशांची सरस राजनिती आणि शक्तीपुढे टिपू सुलतान हा बराच थिटा होता. ब्रिटीशांचे भारतावरील प्रभुत्व सलग अवस्थेत निर्माण केले गेले.

त्यातील पहिली अवस्था म्हणजे भारतीय व्यापार ताब्यात घेण्याची होती. भारतातून ते अत्यंत अल्प किंमतीत माल विकत घेत व पाश्चिमात्य बाजारात तोच माल फार मोठया किंमतीला विकत. या

व्यापारात त्यांना भारतीय सेठ व गुमास्त्यांचीही त्यासाठी मदत होई. प्रचंड मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना कसलाही मोबदला न देता त्यांच्या मालाच्या निर्यातीतून प्रचंड नफा कमावला गेला. दुसऱ्या अवस्थेत ब्रिटीशांनी उत्पादन व्यवस्थेवर अशा प्रकारे नियंत्रण मिळवले की ज्यामुळे त्यांची निर्यात वाढणार होती. या प्रक्रियेत त्यांनी भारतीय उद्योगांचा पद्धतशीरपणे ऱ्हास घडवून आणला, कारण भारत हा प्रचंड क्षमता असलेला उपभोक्ता व खरेदीदार आहे हे त्यांनी ओळखले होते. तिसरी अवस्था ब्रिटीश साम्राज्यवादी व वसाहतिक शोषणाची तीव्र शोषण अवस्था होती. त्या वेळेस ब्रिटीश आर्थिक हितसंबंधाची जोपासना करण्यासाठी भारतावर राज्य केले जात होते.

१७५७ च्या प्लासीच्या युद्धानंतर बंगालवर खऱ्या अर्थाने ब्रिटीशांचे वर्चस्व निर्माण झाले. बंगालवरील वर्चस्वाचा उपयोग त्यांनी त्यांचा प्रतिस्पर्धी भारतीय व युरोपिय व्यापारांचा व्यापार नष्ट करण्यात केला त्यामुळे त्यांना कोणाचीच स्पर्धा राहिली नाही. त्यांनी कापसाच्या व्यापारात मक्तेदारी निर्माण केली व बंगालच्या वीणकरांना हा कापूस फार मोठया किंमतींना विकला. त्यांनी ब्रिटनमध्ये जाणाऱ्या भारतीय मालावरही मोठया प्रमाणावर आयात कर लावून स्वतःच्या उद्योगांचे संरक्षण केले.

युरोपात औद्योगिक क्रांती झाल्यानंतर त्याचा भारतीय उद्योगांवर फार विपरित परिणाम झाला. १८१३च्या सुमारास भारतीय हस्त उद्योगाला भारतीय व परकीय बाजारपेठ उरली नाही. भारतीय माल ब्रिटनमध्ये कारखान्यात यंत्रावर बनलेल्या मालाशी स्पर्धा करू शकला नाही.

दुसऱ्या बाजूला इंग्लीश व्यापाऱ्यांनी कमवलेल्या प्रचंड संपत्तीतून नवीन उद्योग व व्यापार निर्माण केले. ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना अर्थपुरवठा करून त्यांचा औद्योगिक पाया विस्तारला. या काळात इंग्लडमध्ये जे उत्पादक होते. त्यांना व्यापार करणाऱ्यापेक्षा जादा फायदा झाला. भारतातून जास्तीत जास्त आयात माल आणणे व त्याच प्रमाणात तयार माल भारतात पाठवीणे यामध्ये त्यांना अधिक रस होता. १७९३ ते १८१३ मध्ये ब्रिटीश कारखानदारांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या भारताशी असणाऱ्या व्यापारातील मक्तेदारी विरूद्ध मोहिम राबवली. परिणामी १८१३ मध्ये हे कारखानदार ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी संपुष्टात आणण्यात यशस्वी झाले.

परिणामी हातानी बनविलेला भारतीय माल ब्रिटीशांच्या यंत्रावर बनवलेल्या मालामुळे दिसेनासा झाला. ब्रिटीशांच्या भारतात आयात होणाऱ्या मालावर अत्यल्प आयत कर असे किंवा तो कधी कधी नसेच. भारतीय लोकांनी पाश्चात्य वस्तुची रूची निर्माण व्हावी म्हणून त्यांना आधुनिक बनवण्यात आले. या काळात त्यांनी भारतीय व्यापाराचे संरक्षण केले नाही व भारतात आधुनिक तंत्रज्ञानही आणले नाही. परकीय वस्तुंना मुक्त प्रवेश दिल्यामुळे भारतीय हस्तउद्यागांचा ऱ्हास घडून आला. दुसऱ्या बाजुला भारतीय हस्तउद्योगातून निर्माण केलेल्या वस्तुंवर मोठया प्रमाणावर आयात शुल्क आकारले जात होते. भारतीय साखर ज्यावेळेस ब्रिटनमध्ये निर्यात केली जात होती त्यावेळेस मूळ किंमतीच्या तिप्पट आयात शुल्क आकारले जात होते. त्यामुळे भारतीय व्यापार वस्तुतः थांबला.

१८१३च्या सुमारास भारत या इंग्लंडच्या वस्तूचा मोठा उपभोक्ता बनला. व इंग्लंडला कच्चा माल पाठविणारा मोठा निर्यातदार बनला.

इंग्लंडला भारताचे व्यापारासाठी म्हणजे मोठया प्रमाणावर कच्चा माल खरेदी करून व तयार माल विकून शोषण करायचे असल्यामुळे त्यांनी भारतात आगबोटी व रेल्वे या व्यवस्था आणल्या.

रेल्वेमुळे ब्रिटीशांना मोठी बाजारपेठ खुली झाली व कच्चा मालाच्या निर्यातीला ही फायदा झाला.

१८५३ मध्ये मुंबई ते ठाणे ही लोकांसाठी सुरू करण्यात आलेला पहिला रेल्वे मार्ग आहे हे तुम्हाला माहित आहे का ? कच्या मालाचा पुरवठा करणाऱ्या भागापासून निर्यात करणाऱ्या बंदरापर्यंत रेल्वे जोडल्या गेल्या त्यामुळे ब्रिटीश वस्तु भारतामध्ये मोठया प्रमाणावर आल्या. राष्ट्रीय जागृती करण्यामध्ये रेल्वेची महत्त्वाची भूमिका होती. हे तुम्हाला माहित आहे का ? लोकांना व विचारांना एकत्र आणण्यात रेल्वेनी मदत केली. ज्यांची कल्पना ब्रिटीशांनी कधीच केली नाही हा उपहास नाही का ?

१८५३ मध्येच डलहौसीने पहिली टेलिग्राफ लाईन (तारायंत्र) कलकत्ता ते आग्रा निर्माण केली व त्याच वर्षी पोस्ट सेवा सुरू केली. तुम्हाला याची कल्पना आहे का ?

## पाठ्यांशांवरील प्रश्न ५.१

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारतावर राजकिय वर्चस्व निर्माण करण्यात कोण यशस्वी झाले ?

उत्तर ____________________

२. ब्रिटीश व फ्रेंच यांच्यामधील संघर्षाचा फायदा कोणत्या भारतीय राजाने घेण्याचा प्रयत्न केला व त्यात तो यशस्वी झाला नाही?

उत्तर ____________________

३. भारतावरील ब्रिटीश वर्चस्वाच्या किती अवस्था आपण पाहू शकतो ?

उत्तर ____________________

## ५.२ अठराव्या शतकातील भारत : आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक :

अठराव्या शतकातील भारत अनेक परिस्परविरोधी परस्थितीचे चित्र होते.

आर्थिकदृष्टया शेती हा लोकांचा मुख्य व्यवसाय होता. सतत युद्धाची स्थिती असल्यामुळे शेतीकडे लक्ष्य द्यायला लोकांना वेळ नव्हता. मुघलांच्या काळात परकीय व्यापार भरभराटीस आला होता. भारत मोती, कच्चे रेशीम, खजूर, सुकामेवा यांची पार्शियन आखातातून व कॉफी, सोने, औषधे आणि मधाची अरेबियातून तर चहा, चिनीमातीची भांडी यांची चीनमधुन आयात करत होता. याशिवाय तिबेट, सिंगापूर, इंडोनेशिया येथून चैनीच्या वस्तुंची आयात करत होता. भारत कच्चे रेशीम, रेशमी धागे, नीळ, मीरी आणि इत्यादी वस्तु निर्यात करत होता. भारतीय सुती कापड या काळात जगभर प्रसिद्ध होते.

भारताचा या काळातील व्यापार तोल भारताला अनुकुल असतांनाही भारताची आर्थिक स्थिती

सुधारू शकली नाही. कारण या काळात सतत युद्धे होत होती. या काळात देशांतर्गत शीख, जाट व मराठयांची युद्धे झाली व भारताबाहेरून नादीरशाह (१७३९) व अहमदशाह अब्दाली (१७६१) यांसारखी आक्रमणे नेहमीचीच झाली होती.

अठराव्या शतकात फ्रांस, इंग्लंड, पोर्तुगाल आणि स्पेन सारखे देश भारताशी व्यापार करण्यास उत्सुक होते. त्यांनी भारतात आर्थिक आणि राजकिय अस्थैर्य निर्माण करण्यास उत्तेजन दिले. अंतिमतः त्यांनी भारतीय अर्थव्यवस्था अधोगतीला नेली. परंतु दरम्यानच्या काळात सुंदर हस्तउद्योगाचा देश म्हणून भारताची किर्ती जगभर पसरली होती.

सामाजिक दृष्टया लोकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात एकात्म पद्धती नव्हती. हिंदु अथवा मुस्लीम दोन्ही मध्ये प्रदेश, जमात, भाषा, जात यांच्या आधारावर विभागणी होत होती.

विवाह, खानपान, समाजभोजन व व्यवसायाची निवड या बाबतीत जातीचे नियम पाळले जात होते. जो कोणी हे नियम पाळत नव्हता त्याला जातीबाहेर टाकले जात होते.

विज्ञानाच्या क्षेत्रात भारत इतका अग्रेसर होता तरी गणित आणि विज्ञानाकडे दुर्लक्ष्य केले जाऊ लागले. पश्चिमेकडील देशांनी विज्ञानाच्या क्षेत्रात जी प्रगती केली त्याबद्दल भारत अनभिज्ञ राहिला.

शिक्षकांचा त्याकाळात आदर केला जात होता. शिक्षण प्रक्रिया परंपरात अडकली होती. अंकगणिताबरोबरच विद्यार्थ्यांना लेखन वाचन शिकवले जात होते. मुली क्वचितच शाळेत जात होत्या. शासन शिक्षणाला उत्तेजन देत नव्हते. स्थानिक राज्यकर्ते, वरिष्ठ वर्गातील सदस्य आणि लोककल्याणकारी समाजसुधारक यांचा आर्थिक मदतीतून शिक्षण दिले जात होते.

## हिंदु मुस्लीम संबंध ः

दोन्ही धर्मातील लोकांत मित्रत्वाचे संबंध होते. धार्मिक सहिष्णुता पाळली जात होती. युद्धे राजकीय व वैयक्तिक कारणासाठी लढली जात होती. परंतु धर्मासाठी लढली जात नव्हती. दोन्ही धर्माचे लोक ऐकमेकांच्या सणउत्सवात सहभागी होत होते. अनेक हिंदुची मुस्लीम संतावर श्रद्धा होती व तेवढयाच प्रमाणात मुस्लीम लोक हिंदु देवता व संताचा आदर करत होते. वस्तुतः हिंदु व मुस्लीमांच्या वरिष्ठ वर्गात बऱ्याच बाबी त्यांच्या कनिष्ठ वर्गातील लोकांपेक्षा समान होत्या. याशिवाय मुस्लीमांनी भारतीय शैली व संस्कृतीचा इतक्या सफाईदारपणे स्वीकार केला होता की त्यांच्यामध्ये फरक करणे अवघड होते.

## ५.३ सामाजिक स्थिती ः

अठराव्या शतकाच्या अखेरीस स्त्रीयांनी समाधान मानावे अशी परिस्थिती नव्हती. मुलीचा जन्म दुर्दैवी समजला जाई. लहान वयातच मुलींची लग्ने होत होती बहुभार्या पद्धतीला परवानगी होती. स्त्रियांना मालमत्तेत अधिकार नव्हता तसेच घटस्फोटाचाही अधिकार नव्हता. विशेषतः उच्च जातीमध्ये विशेषतः समाज स्त्रियावर कायमचे वैधव्य लादत असे. विधवा स्त्रिया रंगीत कपडे घालु शकत नव्हत्या व लग्न समारंभांना त्या जाऊ शकत नसत. कारण त्यांची उपस्थिती अशुभ मानली जायची. बालविवाह हे सर्रास केले जात. काही वेळा अर्भक बालिकाही विधवा बनत अशा विधवावर कायमचे वैधव्य लादले जायचे.

आंतरजातीय विवाहांना परवानगी नव्हती. सामाजिक संरचनेत खालच्या जातीतील व्यक्ती वरच्या जातीतील व्यक्तीबरोबर खाऊ पिऊ शकत नसत. मुस्लीम स्त्रियांचीही तीच परिस्थिती होती. बहुभार्या पद्धतीमुळे स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. स्त्रियांना शिक्षण व मालमत्तेचे हक्क नव्हते.

## ५.४ सामाजिक आणि धार्मिक सुधारणा ः

ख्रिस्ती पादरी ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांबरोबर त्यांचे बाप्तीस्मा, विवाह व दफनविधी तसेच रविवारची धार्मिक कृत्ये व इतर विधी कर्मकांड पार पाडायला भारतात आले. कंपनीच्या ख्रिस्तीत्तोर लोकांनाही ते ख्रिस्ती धर्माची शिकवण द्यायला लागले. हळुहळू त्यांनी शाळा सुरू केल्या व त्यात भारतीय मुले जाऊ लागली. ख्रिस्ती धर्मतत्वे आणि ख्रिस्ती वाङ्मयाचा प्रसार व्हावा म्हणून ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतात मुद्रण यंत्रे मसिके सुरू केली. ख्रिस्ती धर्मप्रसाराबरोबरच इंग्रजी शिक्षण सुरू करण्यात आले त्याचा भारतीय समाज व अर्थकारणावर खोल परिणाम घडून आला.आधुनिक पाश्चात्त्य शिक्षण ब्रिटीशांचे राजकिय आणि प्रशासकीय गरजांची पूर्तता करण्यासाठी सुरू करण्यात आले. त्यामुळे भारतीयांसाठी पश्चिमेकडची खिडकी उघडली गेली. पाश्चात्य शिक्षणाने पाश्चिमात्यांनी भारतात उदारमतवाद, विवेकवाद, लोकशाही समानता आणि स्वातंज्य ह्या पाश्चात्य संकल्पना रूजवल्या. इंग्रजी भाषा ही शिक्षीत भारतीयांची व्यवहाराची भाषा बनली इंग्रजी ही पाश्चात्य संकल्पना व भारतीयांना एकजीव करणारी शक्ती बनली.

### राम मोहन राय ः


राम मोहन राय

राम मोहन राय यांना भारताचा पहिला आधुनिक पुरुष समजले जाते. त्यांनी ग्रीक आणि लॅटिन सहित अनेक भाषा आत्मसात केल्या. हिंदु समाजाची सुधारणा आणि भारताचे पुनरूत्थान यामध्ये त्यांची भूमिका महत्वाची होती. धार्मिक निर्बंधाशी संबंधित अनेक सामाजिक प्रथा हिंदुमध्ये अस्तित्वात होत्या. त्यांनी त्यांच्यावर धार्मिक ग्रंथाचाच आधार घेत हल्ला केला. या प्रथांत तथ्य नाही हे दाखवून दिले. या प्रथा मध्ये सती प्रथा वरच्या क्रमांकावर होती. सती प्रथा म्हणजे विधवा स्त्रीने पतीच्या अंत्यविधीच्या वेळेस स्वतःला चितेवर जाळून घेणे, ही प्रथा बंगाल व राजस्थानात होती. राम मोहन राय यांनी ह्या प्रथेवर टीका केली व शेवटी ह्या प्रथेवर बंदी घातली गेली. त्यांनी त्यांच्या तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी म्हणजे विवेकवाद व सामाजिक समतेच्या प्रसारासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना केली त्यांचे अनुयायी ऐकेश्वरवादी होते व एकाच सर्वोच्च परमेश्वराची ते उपासना करत. मूर्तीपूजा बहुदेवतावाद आणि कर्मकांडाला त्यांचा विरोध होता.

### देवेंद्रनाथ टागोर (१८१७-१९०५) ः

राम मोहन राय नंतर देवेंद्रनाथ टागोर ब्राह्मो समाजाचे नेते बनले. त्यांनी ब्राह्मो समाजाला उर्जीत अवस्था आणली आणि राम मोहन राय यांच्या विचारांचा प्रसार केला. त्यानंतर ब्राह्मो समाजाचे नेतृत्व केशवचंद्र सेन (१८३८-१८८४) यांच्याकडे आले. या संबंध कालखंडात ब्राह्मो समाजाने

वैयक्तिक स्वातंत्र्य, राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता, सामजिक संबंधाचे आणि सामाजिक संस्थाचे लोकशाही करण यावर भर दिला. ब्राह्मो समाज हा राष्ट्रीय जागरणाचा भारतातील पहिला वाहक बनला.

### प्रार्थना समाज आणि रानडे :

१८६७ मध्ये प्रार्थना समाजाची मुंबईमध्ये डॉ.आत्माराम पांडुरंग यांनी स्थापना केली. आंतरजातीय सामुहिक भोजन समारंभ, आंतरजातीय विवाह, विधवा विवाह, स्त्रीया व शोषीत समाजाची प्रगती यासारख्या सामाजिक सुधारणांना प्रार्थना समाजाने सुरूवात केली. रानडयांच्या मते धार्मिक कर्मठपणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकिय क्षेत्रात प्रगती साधने अवघड होते. रानडयांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. मूर्तिपूजा व जातीव्यवस्थेला विरोध केला.



**स्वामी विवेकानंद**

### रामकृष्ण परमहंस :

भारतीय समाजाच्या पुनरूत्थानासाठी स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. ते गदाधर चटोपाध्ये जे नंतर रामकृष्ण परमहंस म्हणुन ओळखले गेले, त्यांचे शिष्य होते. विवेकानंदांनी रामकृष्ण परमहंसाच्या शिकवणीला अंतिम स्वरूप दिले. स्वातंत्र्य, स्वतंत्र विचार आणि समता यांचा त्यांनी पुरस्कार केला. सर्व धर्माच्या ऐक्यावर त्यांनी भर दिला त्यांनी वेदात तत्त्वज्ञानाला उत्तेजन दिले. जे तत्वज्ञान त्यांच्या मते सर्वात विवेकवादी विचारांवर आधारीत होते.

### थिऑसॉफीकल सोसायटी आणि ॲनी बेझंट :

मॅडम ब्लाव्हाटस्की (१८३७-१८९१) आणि कर्नल एच.एस.ऑल्कट आणि इतरांनी स्थापन केलेल्या थिऑस्फीकल सोसायटीनेही सुधारणा चळवळीला पाठबळ दिले.

ॲनी बेझंट यांनी प्राचीन भारतीय धर्म, तत्वज्ञान यांच्या शिक्षणाला उत्तेजन दिले. त्यांनी शिक्षणाच्या प्रोत्साहनासाठी मध्यवर्ती हिंदु विद्यालय स्थापन केले.



**ॲनी बेझंट**

### नारायण गुरू :


नारायण गुरू दक्षिणेतील महान संत होते. सप्टेंबर १८५४ मध्ये त्यांचा केरळमध्ये जन्म झाला.

स्थानिक गुरूंकडे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. मल्याळम्, तमिळ आणि संस्कृत या मध्ये ते व्यासंगी होते. तरूण वयातच त्यांनी धार्मिक अधिकार नष्ट करण्याचे आपले ध्येय स्पष्ट केले.

आईवडिलांच्या निधनानंतर खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी त्यांनी आपला प्रवास सुरू केला. ते चताम्बी स्वामीगंल यांच्या संपर्कात आले. त्यांनी पुण्यवान पुरूषाच्या सेवेत ध्यानात आणि तीर्थयात्रात

आपला वेळ व्यतीत केला. स्वामीगंल आणि नारायण गुरू यांना केरळाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी नायर आणि इझावा या जमातींची एकमेका बद्दलची सद्‌भावना आणि सहकार्य आवश्यक आहे असे जाणवले या दोन जमातीतच म्हणजे अनुक्रमे नायर व इझावा या जमातीत या दोघांचा जन्म झालेला होता. या दोन जमातीतील संघर्षामुळे केरळच्या अधोगतीचा धोका निर्माण झालेला होता. त्यांना या दोन्ही जमातींना एकत्र आणण्याचे ठरविले.

नारायण गुरू धार्मिक व सामाजिक सुधारक होते. ते संन्यासाचे आयुष्य जगले. त्यांनी केरळमधील लोकांचे आध्यात्मिक व सामाजिक जीवन सुधारण्यासाठी मोठे कार्य केले.



**नारायण गुरू**

### मुस्लीम सुधारणा चळवळी ः

मुस्लीमांमध्ये सर सय्यद अहमदखान हे सर्वात मोठे समाज सुधारक होते. आधुनिक शिक्षण घेतले तरच मुस्लीम प्रगती करू शकतात. याची त्यांना जाणीव झाली.

अज्ञान, विवेकशून्यता आणि धार्मिक असहिष्णुता याला त्यांचा विरोध होता. त्यांनी पडदा पद्धती बहुपत्नीत्व आणि सहजगत्य दिल्या जाणाऱ्या घटस्फोटांच्या विरोधी ते होते सय्यद अहमदखान यांनी अलिगड चळवळ सुरू केली. त्यांनी अलिगड येथे महंमदन अँग्लो ओरिएटल महाविद्यालय स्थापन केले. हे महाविद्यालय विज्ञान आणि संस्कृतीच्या प्रसारासाठी स्थापन करण्यात आले. नंतर या महाविद्यालयाचे अलिगड मुस्लीम विद्यापीठात रूपांतर झाले.

अलिगड चळवळीने मुस्लीम पुनरूज्जीवनाला मदत केली. या चळवळीने त्यांना उर्दु ही सामाईक भाषा प्रदान केली. उर्दुमधील लेखनाच्या एकत्रीकरणासाठी मुस्लीम छापखाना सुरू करण्यात आला. दुर्दैवाने त्यांच्या अखेरच्या काळात सय्यद अहमदखानने भारतीय मुस्लीमांनी काग्रेसमध्ये सामील होऊ नये म्हणुन उत्तेजन दिले. त्यांचे मते त्यांना शिक्षणाची गरज राजकारणापेक्षा अधिक होती. एका अर्थाने त्यांनी या काळात संप्रदायवादी आणि विभाजनवादी शक्तींना वळ दिले.

### सामाजिक सुधारणा ः

सर्व धार्मिक सुधारणांनी सामाजिक सुधारणांना सुद्धा हातभार लावला हे तुम्हाला माहित आहे का ? कारण भारतीय समाजाचे मागसलेपण जाती व्यवस्था लिंग विषमता यावर भूतकाळातील धार्मिक बंधने होती. सामाजिक सुधारणा चळवळीची दोन मुख्य उद्दिष्टे होती ती म्हणजे (अ) स्त्री मुक्ती व स्त्रीयांना बरोबरीचा दर्जा देणे. (ब) जातीव्यवस्थेतील कर्मठपणा घालविणे विशेषतः अस्पृश्यता नष्ट करणे व मागसलेल्या वर्गाला उत्तेजन देणे.



**सर सय्यद अहमदखान**

## स्त्रीमुक्ती ः

भारतीय सामाजिक जीवनातील सर्वात लक्ष्यवेधी बदल म्हणजे स्त्रीयांची स्थिती. शासनाने आणि समाजसुधारकांनी बालविवाहाची प्रथा कायद्याने बंद करण्याचे प्रयत्न केले.

स्त्रीयांच्या त्यांच्या बहुसंख्य भगिनींच्या सुधारणासाठी म्हणजे त्यांना शैक्षणिक सुधारणा देण्याच्या प्रयत्नात आणि सामाजिक समस्या नष्ट करण्याच्या प्रयत्नात तिरस्काराच्या रूपाने अडसर आहेत. परंतु आता स्त्रीयांमध्ये राजकिय जागृती होत आहे. १९३० मध्ये मुलीचे लग्नाचे किमान वय १४ व मुलांचे १८ शारदा कायद्याने ठरविण्यात आले.

तुम्हाला माहित आहे का महर्षि कर्वेंना त्यांच्या स्त्रीयांच्या शिक्षणातील योगदानाबद्दल भारतरत्न देण्यात आली. त्यांनी स्त्री मुक्तीसाठी शाळा व काम करणाऱ्या व निरश्रीत स्त्रीयांसाठी आश्रयस्थाने बांधली. या चळवळीने लवकरच गती पकडली व स्त्रीयांसाठी अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये उघडण्यात आली.

## जाती व्यवस्थे विरूद्ध लढा ः



महर्षि कर्वे

या क्षेत्रात रामकृष्ण मिशन आणि आर्यसमाजाने मोठे कार्य केले आहे.

आर्य समाजाने विशेषतः शुद्धी चळवळीच्या माध्यमातून म्हणजे मुस्लीम व ख्रिस्ती धर्मात धर्मांतरीत झालेल्या हिंदुचे पुन्हा हिंदु धर्मात आणण्याच्या प्रक्रियेतून योगदान दिले आहे.

महात्मा गांधी आणि बी.आर.आंबेडकर मागासवर्गाचे खरे पुरस्कर्ते होते. आंबेडकरांनी त्यांच्या उद्धारासाठी अनेक शाळा व महाविद्यालये उघडली. दुसऱ्या बाजुला महात्मा गांधीनी विशेषतः अस्पृश्यांच्या प्रश्नासाठी पुढाकार घेतला. गांधी त्यांना हरिजन संबोधित. त्यांना मंदिरे खुली करावीत व समानतेचा दर्जा द्यावा अशी गांधीनी भूमिका मांडली.



बी.आर.आंबेडकर

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेनेही घटनात्मक आणि कायदेशिर पाठिंबा या चळवळीला दिला. अस्पृश्यता हा शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यात आला. आपण सतत योजलेले समता व समानतेवर आधारलेल्या समाजाचे उद्दिष्टे गाठण्यासाठी अजूनही बरीच मोठी वाटचाल करायची आहे. म्हणजेच समाजातील कोणत्याही सामाजिक व आर्थिक स्तरातील स्त्री व पुरूष सदस्य सुखी राहुन त्यांच्या सर्व गरजा भागविल्या जातील व आपल्याला ती परिस्थिती आणण्यासाठी एकत्रित काम करावे लागेल.

टिपा

### स्वामी दयानंद ः

संस्कृत भाषा व वेदावरील प्रभुत्व हे त्यांच्याकडचे सर्वात मोठे धन होते. भारतीय समाजात घुसलेल्या विविध प्रकाराच्या शतकानुशतकाच्या धार्मिक व सामाजिक समस्यांचे मूळ वेदांच्या अज्ञानात आहे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे मूर्तीपूजा व स्त्रियांचे शिक्षण या बद्दल त्यांनी हिंदु समाजाला आव्हान दिले.



स्वामी दयानंद

१८७५ मध्ये त्यांनी आर्यसमाजाची स्थापना केली. त्यांची मुख्य उद्दिष्टये म्हणजे वेदांच्या खऱ्या ज्ञानाचा प्रसार करणे आणि नंतर हिंदू समाजात घुसलेल्या अनिष्ठ समस्यांचा नाश करणे ही होती. त्यांनी अस्पृश्यतेला विरोध केला. त्याचप्रमाणे त्यांना अनेक देवतावाद अवतारवाद आणि कर्म कांडांना ही विरोध केला. वेदांकडे परत चला अशी घोषणा त्यांनी दिली. वेदांचे श्रेष्ठत्व त्यांनी स्वीकारले. भारतात पहिल्यांदा त्यांच्या पुढाकाराने वेद ग्रंथित करण्यात आले. त्यांच्या वैयक्तीक लेखनात सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ सर्वात महत्वाचा आहे.

सन १८८३ मध्ये महत्वपूर्ण घटनांनी भरलेले आयुष्य पूर्ण करून त्यांनी देह ठेवला. १८८६ मध्ये त्यांच्या शिष्यांनी लाहोरमध्ये दयानंद ॲग्लो वैदिक शाळा व महाविद्यालय सुरू केले. दयानंद ॲग्लो वैदिक चळवळीने त्यांचे कार्य पुढे नेले. त्यानंतर आजपर्यंत ७५० संस्था एका छत्राखाली कार्य करत आहेत.

दयानंद आणि स्वामी विवेकानंद यांसारख्या पायाभरणीचे काम करणाऱ्या व्यक्तीमुळे तसेच ईश्वरचंद्र विद्यासागर आणि राधाकृष्ण देवसारख्या संघटकामुळे तसेच थिआसोफिकल सोसायटी आणि आर्य समाजामुळे पूर्व व ईशान्य भारतातील हजारो लोकांत भरीव लोकजागृती झाली. आणि ब्रिटीशांच्या सहकार्याने अनेक सामाजिक समस्यांवर बंदी घालण्यात आली.

### ज्योतीराव गोविंदराव फुले (१८२७-१८९०) ः

पुण्यातील कनिष्ठ माळी जातीत १८२७ मध्ये ज्योतीराव गोविंदराव फुल्यांचा जन्म झाला. त्यांना प्रामुख्याने ज्योतिबा म्हणून ओळखले जात होते. मागासलेल्या जाती व स्त्रीयांचा उद्धार करायचा असेल तर तो शिक्षणातून करावा लागेल असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी खालच्या वर्गासाठी शाळा सुरू केल्या व १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित अस्पृश्य लोक आणि मागासवर्गाला सामाजिक न्याय


ज्योतीराव गोविंदराव फुले

मिळवून देणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. त्यांच्या या कार्याची ओळख नंतर ते पुणे नगरपालिकेत निवडून आले त्यावरून दिसुन येते.

### पंडिता रमाबाई (१८५८–१९२२) ः

महाराष्ट्र आणि भारत व ह्या परिघाबाहेरही काम केलेल्या सर्वात महत्त्वाच्या स्त्री समाजसुधारक म्हणजे रमाबाई. त्यांच्या आईवडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या भावाबरोबर गावोगावी जाऊन त्यांनी पुराणांवर प्रवचने केली. विदुषी व प्रवचनकार म्हणून त्यांची किर्ती सर्वदूर पसरली. त्यामुळे कलकत्त्याच्या पंडितांनी त्यांना आमंत्रण दिले. कलकत्त्यातील पंडित त्यांच्या ज्ञानाने व वक्तृत्वाने अचंबित झाले. ते रमाबाईंना पंडिता (विदुषी) म्हणू लागले. त्यामुळे लोक त्यांना पंडिता म्हणू लागले. ही लोकांनी त्यांना विदुषी म्हणुन दिलेली पदवी आहे.

१८८२ मध्ये त्या पुण्याला आल्या. त्या प्रार्थना समाजाकडे आकृष्ट झाल्या. प्रार्थना समाज महाराष्ट्र ात ब्राह्मो समाजाच्या विचारांचा प्रसार करत होता. त्यांनी त्यानंतर स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित केले. १८९० मध्ये त्यांनी विधवांसाठी शारदा सदन सुरू केले. वरील सर्व सुधारणांनी भारतीय समाजात टोकांचे बदल घडवून आणले.

महादेव गोविंद रानडे, आर.जी. भांडारकर, दादाभाई नौरोजी, बेहरामजी मलबारी हे पश्चिम महाराष्ट्रातील इतर प्रसिद्ध समाजसुधारक होते.

## ५.५ वर्तमानपत्रे आणि आधुनिक भारतीय भाषा आणि वाङ्मयाची वाढ ः

१७९८ मध्ये शिळा छापाच्या (पाषाणपृष्ठीय) मुद्रणयंत्राचा शोध लागला. या यंत्रात छाप (ठसा) पद्धतीने शिळा किंवा दगडाचा पृष्ठभाग लिपी चित्र किंवा आकृत्या ह्या छाप उठवून छापल्या जायच्या. अनेक प्रती या पद्धतीने मुद्रीत केल्या जायच्या. १९२० नंतर शेकडो पत्रके पुस्तके छापली गेली आणि त्यामुळे साक्षर भारतीय लोकसंख्येची गरज पोसली गेली. ही पाश्चात्यांनी भारतीयांना दिलेली सर्वात मोठी देणगी होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वर्तमानपत्रे जनमतावर प्रभाव टाकणारे शक्तीशाली साधन बनले.

नवी छपाईयंत्रे (मुद्रण यंत्रे) महाग नसल्यामुळे त्यांची संख्या वेगाने वाढली. त्यामुळे अनेक आधुनिक भारतीय भाषेतील लेखकांना उत्तेजन मिळाले. त्यामुळे प्रचंड साहित्य निर्मिती झाली. नव्या लेखकांनी सर्जनशील साहित्याबरोबरच जुन्या भारतीय व पाश्चात्य अभिजात साहित्यकृतीचे भाषांतर व रूपांतर करून आपल्या सांस्कृतिक वारश्यात भर घातली. त्यांनी भारतीयांमध्ये जागृती आणली.

जवळ जवळ सर्वच भाषात साप्ताहिके, पाक्षिके एखाद्या ठराविक विषयाला वाहून घेतलेली शैक्षणिक नियतकालिके, दैनिके वर्तमानपत्रे सुरू झाली. युरोपियन देशांच्या तुलनेत वर्तमानपत्रे वाचणारा वर्ग लहान असला तरी कादंबऱ्या निबंध आणि कवितांच्या स्वरूपातील नव्या पद्धतीच्या राष्ट्रवादी लेखनाने राष्ट्रवादाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली.

बंकिमचंद्रांची आनंदमठ, दिनबंधू मित्रांचे नीलदर्पण, भारतेंदु हरिश्चद्रांचे भारत दुर्दशा, लक्ष्मीकांत वेझ बासीजा यांचे आसामीतील लेखन सुब्रह्मण्यम भारती यांचे तामिळमधिल लेखन अल्ताफ हुसेन यांचे उर्दुतील लेखन यामुळे भारतीयांच्या मनात वादळे निर्माण झाली.





### वर्तमानपत्राची भूमिका ः

अशा प्रकारे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लोकमत तयार करण्यासाठी व लोकमताचा प्रसार करण्यासाठी, तसेच त्यांना प्रभावित व टोकदार बनविण्यासाठी वर्तमानपत्रे महत्वाचे साधन बनले.

वर्तमानपत्रांनी ब्रिटीश विरोधी भावनेचा प्रसार करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावलेली होती. त्यांनी सरकारविरोधी लोकांना उभे केले. त्यासाठी सरकारी धोरणावर तसेच प्रमुख सामाजिक आणि आर्थिक मुद्यावर चर्चा टीका आणि भाष्य केले. वर्तमानपत्रांनी अखिल भारतीय जागृती घडवून आणून भारतीय लोकांचे राजकिय शिक्षण केले.

काही महत्वाची वर्तमानपत्रे

| | | |
|---|---|---|
| वंगाल | ः | द हिंदू पॅट्रीयट अमृत वझारपत्रिका (दोन्ही इंग्रजी) |
| वॉम्बे | ः | मराठा (इंग्रजी) केसरी (मराठी) |
| मद्रास | ः | दि हिंदू (इंग्रजी) स्वदेशमित्र (तमिळ) |
| पंजाब | ः | दि ट्रिब्यून (इंग्रजी) कोहिनूर अखबार अम (उर्दु) |

## ५.६ स्वातंत्र्यापासूनचा भारत ः

स्वतंत्र भारताला भारताच्या कामगिरीचा सार्थ अभिमान आहे. निधर्मी आणि लोकशाहीत्मक गणराज्याची भक्कम पायावर उभारणी ही स्वातंत्र्योत्तर भारताच्या सर्वात महत्वाच्या कामगिऱ्यापैकी एक महत्वाची कामगिरी आहे. संसदीय पद्धतीच्या सरकारने अनेक कसोटीचे प्रसंग यशस्वी रितीने निभावून नेले. भारत आज जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही आहे. पूर्वीच्या संस्थांनाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण ही ही एक महत्वाची कामगिरी आहे. राज्यांची पुर्नरचना ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. लोकांच्या गरजाप्रमाणे नवीन राज्ये व केंद्रशासित प्रदेश निर्माण होत आहेत. स्वातंत्र्यानंतर आर्थिक नियोजनाची आर्थिक विकास व सामाजिक न्यायासाठी सुरूवात करण्यात आली. आर्थिक विकासाच्या क्षेत्रात भारताने नोंद घेण्यासारखी प्रगती विशेषतः शेती व शेती आधारित उद्योगात केलेली आहे. भारताने वेगाने व स्तुत्य प्रगती विज्ञानाच्या क्षेत्रात उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातही केलेली आहे. भारत सर्वाधिक विकसित देशाच्या बरोबरीने वरील क्षेत्रात प्रगती करत आहे. भारतातील राजकीय व आर्थिक स्थैर्यामुळे व भारताच्या त्याच्या विभागातील दर्जामुळे भारताचे म्हणणे आंतरराष्ट्रीय सभांमध्ये ऐकून घेतले जाते. भारताला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व देण्याच्या मुद्याला मोठया प्रमाणावर पाठिंबा आजकाल मिळत आहे.

### ५.६.१ स्वातंत्र्य चळवळीची सुरूवात ः

ब्रिटीशांचा साम्राज्यवादी वसाहतवाद हे भारताच्या मागासलेपणाचे एक कारण होते. भारतीयांना या सत्याची आता जाणीव होऊ लागली. ब्रिटीशांच्या लोभाचे आणि अवकृपेचे शेतकरी आणि कामगार हे सर्वात वाईट बळी होते. उद्योगपती आणि भांडवलदार सुद्धा ब्रिटीश राजवटीवर खूष नव्हते. या काळात बुद्धीवंतानी महत्वाची भूमिका बजावली. बुद्धीवादी लोकांना सर्वात प्रथम ब्रिटीश राजवटीचे खरे स्वरूप लक्षात आले. ब्रिटीश हे लोककल्याणकारक राज्यकर्ते असतील हा त्यांचा सुरूवातीचा विश्वास संपुष्टात आला. आता त्यांना ब्रिटीश लोभी व स्वार्थी आहेत व त्यांची धोरणे स्वार्थी व

सामान्यतः ब्रिटनच्या हितासाठी आखली आहेत याची जाणीव झाली. एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी सर्व भारतीयांत एकी निर्माण होऊन ब्रिटीश हा त्यांचा समान शत्रू आहे व ते स्वतःच्या फायद्याकरता ते भारताचा नाश करायला येथे आहेत, याची जाणीव झाली. ब्रिटीशांनी भारताचे प्रशासकीय व आर्थिक एकीकरण करण्यास मदत केली. त्यांनी रेल्वे, तारायंत्र, पोस्ट या सुविधा निर्माण केल्या त्याचबरोबर रस्ते व मोटारी व दळणवळणाच्या सुविधा निर्माण केल्या. ज्यांनी भारताच्या एकीकरणात योगदान दिले. पाश्चात्य शिक्षण व विचार जे ब्रिटीशांबरोबर भारतात आले त्यामुळे भारतीय लोकात जागृती निर्माण झाली. लोकशाहीचे आधुनिक विचार, मानवतावाद, राष्ट्रवाद लोकांचे सार्वभौमत्व या सर्व बाबींनी भारतीयांना राष्ट्रवादाकडे वाटचालीची दिशा दिली. राष्ट्रीय भावनाच्या प्रसारासाठी वर्तमानपत्रे व वाङ्मयाने ही महत्वाची भूमिका बजावली. अनेक देशभक्त लेखकांनी त्यांच्या लेखनाने लोकांना प्रोत्साहित केले.

एकोणीसाव्या शतकातही प्राचीन भारताच्या वैभवाचे पुनरूज्जीवन करण्यात आले. त्याचे नेतृत्व ज्यांनी भारताचा भूतकाळ अभ्यासून त्यांची सखोलता आणि वैभव आपल्यासमोर आणले अशा ज्ञानी युरोपियन लोकांनी केले. काही ख्यातनाम शिक्षित भारतीयांनीही भारतीय भुतकालीन वैभवाबद्दल जाणीव जागृती करून त्यात भर घातली. भारतातील ब्रिटीश राज्यकर्त्यांचा वांशिक दुराभिमान आणि भेदभाव, ब्रिटीशांनी इल्बर्ट बिलाला केलेले विरोध व त्याच्या विरोधातील भारतीयांचे विरोध प्रदर्शन तसेच दुष्काळात असंख्य भारतीय भारत असतांना लॉर्ड लिंटन यांनी ब्रिटीश राजाचा भरवलेला खर्चिक दरबार या सगळयांनी भारतीयांच्या मनात ब्रिटीश विरोधी भावना तीव्र बनवल्या. या सर्व बाबींनी एकोणीसाव्या शतकात भारतामध्ये राष्ट्रीय भावनांचा प्रसार केला. या भावनांनी १८८५ मध्ये अे.ओ.ह्युम यांनी सुरू केलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे स्वरूप धारण केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास बनला. काँग्रेसच्या स्थापनेपासुन सुरूवातीच्या पहिल्या वर्षात राजकियदृष्ट्या काँग्रेसला काही साधता आले नाही. परंतु राजकीय जागृती आणि एकात्मतेच्या भावना निर्माण करण्यात काँग्रेस यशस्वी झाली. भारतीय राष्ट्रीय चळवळीतील या कालखंडाला मवाळ कालखंड असे म्हणता येईल.

मुस्लीम लीगची स्थापना ही ब्रिटीशांच्या फोडा आणि राज्य करा या नितीचे पहिले फलित होते असे समजण्यात येते. ६ कोटी २० लाख मुस्लीमांना हिंदु पासुन वेगळे करण्यात यशस्वी झाल्यामुळे ब्रिटीश लोक आनंदी होते. यामुळे संप्रदायवाद या नागरी दुष्ट राक्षसाचा उदय झाला.

### होमरूल चळवळ ः

पहिले महायुद्ध १९१४ मध्ये सुरू झाले. काँग्रेसने ब्रिटीशांना पाठिंबा देण्याचे ठरविले. युद्ध समाप्तीनंतर ब्रिटीश भारतीयांना स्वातंत्र्य देण्यास बांधील आहेत असे विशेषतः मवाळाचा समज होता. ही आशा फोल ठरेल याची जाणीव लगेचच झाली. याचे कारण युद्ध हे वसाहतीचा कब्जा राखण्यासाठीच लढले होत. परिणामतः १९१५–१६ मध्ये दोन होमरूल चळवळी निर्माण झाल्या. एक टिळकांनी पुण्यात सुरू केली व दुसरी ॲनी बेझंट यांनी मद्रास येथे सुरू केली. या लीगचा उद्देश स्वराज्य मिळवण्याचे होते. यांमुळे भारतीय राष्ट्रवाद्यांना साध्य करण्याचे निश्चित उद्दिष्ट मिळाले. या चळवळीने क्रांतीकारी आणि हिंसात्मक मार्ग टाळले. होमरूल लीगने काँग्रेसचे सहाय्यकारी सेवक म्हणून काम केले.

### ५.६.२ १९०५ ते १९१८ चा कालखंड ः

१९०५ ते १९१८ चा कालखंड हा आपल्या राष्ट्रीय चळवळीतील जहालांचा कालखंड आहे.

भारताचे राजकीय उद्दिष्ट निश्चित करण्यातील अपयश, मवाळ आणि परिणामशून्य पद्धतीचा अवलंब आणि काँग्रेसही लोकचळवळ बनविण्यात आलेले अपयश जहालांनी या मुद्यावरून मवाळांवर टीका केली. जहालांनी घटनात्मक सुधारणांपेक्षा प्रत्यक्ष राजकीय कृती व स्वराज्याची मागणी यावर भर दिला. जहालांच्या क्रांतीकारी गटाचे नेतृत्व लाल बाल पाल या त्रिमूर्तीनी म्हणजे लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, विपीनचंद्र पाल यांनी केले. बंकीमचंद्र, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती आणि अरविंदो घोष यांनी त्यांच्या कल्पनांनी आणि प्रचाराने प्रोत्साहीत केले. कर्झनाच्या दडपशाही धोरणांचा अवलंब करून धार्मिक तत्वावर फोडा आणि राज्य करा या तत्वावर बंगालची फाळणी केली व हे विरोध प्रदर्शनाचे कारण बनले. बंगालच्या फाळणी विरोधात मोठया प्रमाणावर निदर्शने झाली. परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार या मार्गाचा अवलंब करण्यात आला. बहिष्कार व स्वदेशी ही देशभर चळवळ बनली. समाजातील विद्यार्थी व महिला सहित सर्व समाज घटक निदर्शनांत सामील झाले. ही एक लोक चळवळ बनली. ब्रिटीश सरकारने सर्व हिंसात्मक दडपशाहींच्या मार्गाचा चळवळ दडपण्यासाठी उपयोग केला.

### ५.६.३ १९१९ ते १९३४ चा कालखंड ः

१९१९ च्या कायद्याने मॉंटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणांनी प्रांतमध्ये व्दिदल राज्यपद्धती सुरू केली. मवाळांनी या सुधारणांचे स्वागत केले तर जहालांनी या सुधारणा नाकारल्या. राजकीय हिंसाचार रोखण्यासाठी १९१९ मध्ये रौलेट कायदा सुद्धा पारीत करण्यात आला. ह्या वळणावर भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या क्षितीजावर एक नविन चेहऱ्याचा उदय झाला. तो म्हणजे गांधी त्यांनी काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वात निर्माण झालेली पोकळी भरून काढली. दक्षिण अफ्रिकेत भारतीयांना मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीच्या विरोधातील चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी सत्याग्रह या राजकीय हत्याराचा त्यासाठी वापर केला. त्यांच्या सत्याग्रहाचा भारतातील पहिला विजय म्हणजे चंपारण्य सत्याग्रह होता. भारतीय स्वातंत्र्य लढयातील तिसऱ्या कालखंडाची ही सुरूवात होती. जिला गांधी कालखंड असे म्हणता येईल. रॉलेट कायद्याविरोधात चळवळ सुरू करण्यात आली होती. गांधीनी ही चळवळ मागे घेतली. कारण हिंसेचा उद्रेक झाला होता. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर मध्ये जालियनवाला बागमध्ये हत्याकांड घडले. जनरल डायरच्या आदेशाने एक हजाराहुन अधिक लोकांची कत्तल झाली. नोव्हेंबर १९१९ मध्ये खिलाफत चळवळ सुरू झाली. तुर्कस्थानाच्या प्रश्नासंदर्भात मुस्लीमासंबंधी जी चुकीची बाब घडली त्याच्या विरोधात सरकारवर दबाव टाकणे हा हेतू होता. गांधीच्या नेतृत्वाखाली खिलाफत चळवळ असहकार चळवळीत विलीन झाली. १० मार्च १९२० रोजी गांधीनी अहिंसात्मक असहकाराचा कार्यक्रम घोषीत केला. त्यांनी ब्रिटीशांच्या नोकऱ्या, न्यायालये, शाळा, महाविद्यालये कार्यक्रम आणि वस्तू या बाबींवर बहिष्कार टाकण्याचा सविस्तर कार्यक्रम पुढे मांडला. रचनात्मक कार्यक्रमात स्वदेशीला उत्तेजन अस्पृश्यता नष्ट करणे आणि हिंदू मुस्लीम ऐक्यावर भर या कार्यक्रमाचा समावेश होता. स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून कौंसीलमध्ये ब्रिटीश व्यवस्थेला विरोध करणाऱ्या योजना सी. आर. दास व मोतीलाल नेहरू यांनी आखली. परंतु ही योजना तीन वर्षात अपयशी ठरली. १९२२ मध्ये क्रांतीकारी चळवळीचे पुनरूज्जीवन झाले व १९३४ पर्यंत त्या इतस्तः चालू राहिल्या. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरू, सुखदेव,

बिस्मील अशफकउल्लाह आणि इतर अनेकांचा प्रमुख क्रांतीकारकांत समावेश होत होता. एम.एन रॉय, डांगे आणि मुझ्झफर असे क्रांतीकारी साम्यवादी होते. मीरत कटाच्या खटल्यात अनेक साम्यवद्यांना दीर्घ कारावासाच्या शिक्षा देण्यात आल्या. भारतातील राजकीय संस्थाचे अवलोकन करण्यासाठी सायमन कमिशन गठीत करण्यात आले व भारतात पाठविण्यात आले. ते भारतात ज्या ज्या ठिकाणी गेले त्या प्रत्येक ठिकाणी त्याला कडवा परंतु अहिंसात्मक निदर्शनांना यात एकही भारतीय नसल्यामुळे सामोरे जावे लागले. लाहोर येथे शांततापूर्ण निदर्शनाचे नेतृत्व करताना लाला लजपतराय यांना लाठीमाराला सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांना दुखापत होऊन त्यात त्यांचा अंत झाला. १९२८ मध्ये भारतीय राज्यघटनेची रूपरेखा नेहरू रिपोर्टच्या रूपात आखण्यात आली. १९२९ च्या लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात पूर्ण स्वराज्य ही घोषणा करून ते कॉंग्रेसचे उद्दिष्ट आहे याचा स्वीकार करण्यात आला. २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्रदिन साजरा करण्यात आला. ६ एप्रील १९३० रोजी गांधीनी मीठाचा सत्याग्रह ज्याल दांडी मार्च असे म्हणतात, तो सुरू केला. ही सवनिय कायदेभंगाची चळवळ १९३४ पर्यंत चालली. दरम्यानच्या काळात गोलमेज परिषदा पार पडल्या. परंतु ही सवनिय कायदेभंगाची चळवळ थांबवावी लागली. १९३४ मध्ये गांधीनी कॉंग्रेसच्या कार्य क्रमातून विश्रांती घेतली. गांधीनी अस्पृश्य ज्यांना ते हरिजन म्हणत अशा मागास समुहासाठी कार्य सुरू केले. हरिजन सेवक संघाची स्थापना करण्यात आली.

### ५.६.४ स्वातंज्याची प्राप्ती :

१९३५ मध्ये भारत सरकारचा कायदा पारीत झाला. यामध्ये अखिल भारतीय संघराज्याची कल्पना उत्क्रांत झाली. प्रांतिक स्वायत्तता सुरू करण्यात आली. फक्त १४% लोकसंख्या मतदान करू शकणार होती. मुस्लीम, शीख, भारतीय, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन आणि युरोपियन लोकांसाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात आले होते. या कायद्याने राष्ट्रीय एकात्मकतेच्या तत्त्वाला दडपण्यात आले आणि विभाजन व संप्रदायवादाला उत्तेजन दिले. कॉंग्रेसने कायद्याचा धिक्कार केला. परंतु निवडणुकीत सहभागी होण्याचे ठरविले. १९३७ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. ११ पैकी ७ प्रांतात कॉंग्रेसची सरकारे बनविण्यात आली. त्यामुळे लोकांना अनेक प्रकारे मदत झाली. कॉंग्रेसच्या अंतर्गत व बाहेर समाजवादी विचार वाढीस लागले. नेहरू आणि बोससारखे प्रमुख कॉंग्रेस नेतेही समाजवादाने प्रभावित झाले. ब्रिटीशांच्या फोडा आणि राज्य करा या धोरणामुळे संप्रदायवाद निर्माण झाला. ब्रिटीशांनी एका संप्रदाय विरूद्ध दुसऱ्या संप्रदायाला उभे करण्यास सुरूवात केली. वाढत्या राष्ट्रवादाला आळा घालण्यासाठी त्यांनी मुस्लीमांचे तुष्टीकरण करत त्यांना अल्पसंख्यकांचे अधिकार या नावाखाली अधिक हक्कांची मागणी करण्यास उद्युक्त केले. जातीय मतदार संघाचा हेतू हा भारतीयांमध्ये फूट निर्माण करून राष्ट्रीय ऐक्य क्षीण करण्याचे होते. संप्रदायवादामुळे १९३८ मधे द्विराष्ट्र उत्क्रांत झाला व १९४० मध्ये जीनांनी तो जाहीर केला. मुस्लीमेत्तर संप्रदायाला मुस्लीम संप्रदायवादाइतके गंभीर स्वरूप धारण केले नाही. किंबहुना ती मुस्लीम संप्रदायवादाची प्रतिक्रिया होती. १९३३ मध्ये हिंदु धर्मातील शुद्धीकरण आणि मजबुतीकरण स्वामी दयानंद सरस्वतीनी स्थापन केलेल्या आर्यसमाजाच्या सहकार्याने शुद्धी चळवळीने केले. डॉ.हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. हिंदू लोकांत जागृती निर्माण करणे व तीव्र राष्ट्रवाद त्यांच्या मध्ये बिंबवणे हे त्याचे उद्दिष्ट होते. या कारणासाठी शाखा तंत्र विकसीत करण्यात आले. ज्यावेळेस दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात झाली. त्यावेळेस कॉंग्रेसने पूर्ण स्वातंज्याची

टिपा

मागणी केली. युद्धसमाप्तीनंतर वसाहतीचा दर्जा देऊ असे १९४२ मध्ये क्रीप्स मिशनने जाहीर केले. काँग्रेसने हा प्रस्ताव नाकारला. संपूर्ण स्वातंत्र्यासाठी ऑगस्ट १९४२ मध्ये गांधीनी व काँग्रेसनी चले जाव चळवळ सुरू केली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालीही या काळात चळवळ कार्य रत होती.

हिंसात्मक व अहिंसात्मक अशा दोन्ही चळवळी अपयशी झाल्या. परंतु ब्रिटीशांना जाणीव झाली की त्यांना लवकरच देश सोडावा लागेल. सुभाषचंद्र बोस व रासविहारी बोस इंडियन इंडिपेंडेन्स लीग आणि इंडियन नॅशनल आर्मी म्हणजे आझाद हिंद फौजेची १९४३ मध्ये सिंगापुरला स्थापना केली. जपान्यांच्या मदतीने १९४३ मध्ये आझाद हिंद फौज भारतीय सीमेपर्यंत पोहचली व कोहिमावर ताबा मिळवला. परंतु नंतर बाजू पलटली व जपानचा ब्रिटनने पराभव केला. १९४५ मध्ये सुभाष चंद्र बोस ऑगस्ट १९४५ मध्ये विमान अपघातात मारले गेले त्यामुळे आझाद हिंद फौजेही स्थगित झाली. युद्ध संपल्यानंतर १९४६च्या सुरूवातीला भारतात निवडणूका झाल्या. काँग्रेसने अनेक जागा जिंकल्या. मार्च १९४६ मध्ये वेगाने सत्तांतर करण्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात आले. १६ मे १९४६ मध्ये त्याने आपल्या शिफारसी जाहीर केल्या. अंतिम सत्तांतर करण्यासाठीची योजना जाहीर केली. अंतिम सत्तांतर करण्यासाठीची ही योजना विस्तारपूर्वक तयार करण्यात आली होती. काँग्रेस व मुस्लीम लीगमध्ये या योजनेसंदर्भात असहमती होती. दरम्यानच्या काळात व्हायसरॉयनी नेहरूंच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसला निमंत्रण दिले. मुस्लीम लीग क्रोधीत झाली होती. त्याचे रूपांतर धार्मिक दंग्यात व मोठया रक्तपातात झाले. अंतरिम सरकार काहीही करू शकले नाही. कारण मुस्लीम लीग त्यांच्या स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीवर ठाम राहिली. ब्रिटीश पंतप्रधान ॲटली यांनी जून १९४८ च्या अखेरीस सत्तांतर घडवून आणण्याची योजना फेब्रुवारीमध्ये जाहीर केली. त्याची व्यवस्था करण्यासाठी मार्च मध्ये लॉर्ड माऊंट बॅटन यांना व्हाइसराय म्हणून पाठविण्यात आले. अनेक दबावांमुळे विशेषतः सर्वदूर पसरलेल्या धार्मिक रक्तपातामुळे आणि जीना व मुस्लीम लीगच्या आडमुठेपणामुळे काँग्रेसला फाळणीची योजना स्वीकारावी लागली. फाळणीनंतर १५ ऑगस्ट १९४७ नंतर भारत स्वतंत्र झाला. १४ ऑगस्टच्या मध्यरात्री सत्तांतर घडून आले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ५.२

**खालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

१. खास बनविलेल्या पाषाण पृष्ठभागाचा वापर मुद्रण किंवा छपाईसाठी केला जातो. त्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

उत्तर ______________________

२. आनंदमठ ह्या कादंबरीचा लेखक कोण ?

उत्तर ______________________

३. वेदाकडे चला अशी घोषणा कोणी दिली ?

उत्तर ________________________________

४. ज्योतीबा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केव्हा केली ?

उत्तर ________________________________

## तुम्ही काय शिकलात?

- मुद्रणकलेचा शोध, युरोपातील पुनरूज्जीवन आणि धर्मसुधारणा यामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळे लोकांनी कर्मठ व ठाम विचारांना विरोध करणे सुरू केले.
- भारताचे पाश्चात्याशी असलेल्या संबंधाचे सकारात्मक परिणाम झाले त्यामुळे अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणांनी सामाजिक दुष्टतेला म्हणजेच सती प्रथा, बालविवाह, सक्तीच्या वैधव्याला, अंधश्रद्धेला, स्त्रीभ्रूणहत्येला आणि जातीव्यवस्थेला आव्हान दिले गेले.
- महान वैदिक विद्वान स्वामी दयानंद सरस्वतीच्या शिष्यांनी १८७५ मध्ये आर्यसमाजाची स्थापना केली. ह्या समाजाने अस्पृश्यता बहु देवतावाद मूर्तीपूजा आणि स्त्रीयांच्या समान सामाजिक दर्जाबद्दल सहानूभूतीपूर्वक युक्तीवाद केले.
- १७९८ मधील शिळा छापाच्या छपाई यंत्राच्या शोध मैलाचा दगड होता. ह्या शोधामुळे भारतीयांना अनेक शहरात छापखाने व वर्तमानपत्रे व नियतकालिके सुरू करता आली. त्यामुळे भारतीय भाषांची मोठया प्रमाणावर वाढ झाली.

## सत्रान्त अभ्यास

१. युरोपातील पुनरूज्जीवन (प्रवोधन) व धर्मसुधारणा चळवळींच्या भारतावरील परिणामाचे वर्णन करा.

२. आर्य समाजाच्या सुधारणा चळवळीतील भूमिकेचे परिक्षण करा.

३. दयानंद सरस्वतींचे शिक्षणाच्या क्षेत्रात काय योगदान होते ?

४. शिळा छापाचे मुद्रण म्हणजे काय ? भारतीय भाषांच्या विकासात ते कसे उपयोगी पडले ?

५. भारतीयांच्या जागृतीत राम मोहन रायच्या भुमिकेचे परिक्षण करा.

६. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढयावर निबंध लिहा.

## प्रश्नांची उत्तरे

**५.१**

१. इंग्लंड २. म्हैसुरचा टिपू सुलतान ३. तीन अवस्था

**५.२**

१. शिळा छापाचे मुद्रण २. बंकीमचंद्र

३. स्वामी विवेकानंद ४. १८७३

# विभाग ३

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

## भाषा आणि वाङ्मय

विद्यार्थ्यांनो भारतीय भाषा व वाङ्मयाचा परिचय करून देणे, हा ह्या अभ्यासघटकाचा हेतू आहे. प्राचीन भारतातील संस्कृतच्या महत्वपूर्ण भूमिकेचे हा अभ्यासघटक परिक्षण करील. हा अभ्यासघटक उपलब्ध संस्कृत प्राकृत आणि पाली भाषेच्या समग्र वाङ्मयाचा शोध घेण्याचा प्रयत्न करील. विद्यार्थ्यांना तमिळ भाषेतील संगम वाङ्मयाच्या समृद्ध वारस्याचा तसेच दक्षिण भारतातील इतर भाषा म्हणजे तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषांचा परिचय करून देणे हा ही हेतू आहे.

**घटक ६ ः भारतीय भाषा आणि वाङ्मय १**

**घटक ७ ः भारतीय भाषा आणि वाङ्मय २**

# ६

# भारतीय भाषा आणि वाङ्मय – भाग १

सागर आणि समीर आंदमान आणि निकोबार बेटांवर सुटयासाठी गेले. त्यांनी तेथे समुद्रात खेळण्यामध्ये आणि लहान बेटे पाहण्यात छान वेळ व्यतीत केला. परंतु त्यांना काही समस्या सुद्धा जाणवल्या. ते स्थानिक लोक जी भाषा बोलत होते ती भाषा ते समजू शकत नव्हते. परिणामी आदिवासी लोक त्यांना जे त्यांच्या बद्दल सांगत होते त्या बऱ्याच बाबींचे त्यांना आकलन होत नव्हते यावरून भाषेचे महत्त्व तुम्हाला समजले असेल.

भाषा हे एक माध्यम आहे ज्याच्यामार्फत आपण आपले विचार अभिव्यक्त करतो. आपला समाज ज्या कल्पना व जे तत्वज्ञान बाळगतो त्याचा आरसा म्हणजे वाङ्मय त्यामुळे कोणतीही विशिष्ट संस्कृती आणि तिची परंपरा समजून घेण्यासाठी भाषेची उत्क्रांती व भाषेतील विविध काव्य नाटक धार्मिक तसेच निधर्मी प्रकारचे वाङ्मय समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. ह्या प्रकरणात विविध भारतीय भाषांनी संमिश्र सांस्कृतिक वारसा जो आपल्या देशाचा विशेष आहे तो विशेष निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

## उद्दिष्टे ः

हे प्रकरण वाचल्यानंतर आपण खालील बाबी करू शकाल.

- भारताच्या समृद्ध वाङ्मयीन वारस्याचे परिक्षण करणे.
- भारतातील विविध भाषा आणि वाङ्मयाची सूची बनविणे.
- भारतीय भाषा व वाङ्मयातील विविधतेतून एकता शोधणे.
- भारताचे जागतिक वाङ्मयात असलेल्या योगदानाचे मूल्यमापन करणे.
- जागतिक वाङ्मयातील भारताचे योगदान ओळखणे.

## ६.१ भारतीय भाषा – संस्कृत भाषेची भूमिका ः

ज्यावेळेस माणसाने लिपीचा शोध लावला तेव्हापासून लेखनातून संस्कृती जीवनशैली समाज आणि समकालीन राजकारण यांचे प्रतिबिंब पडत आले आहे. ह्या प्रक्रियेत प्रत्येक संस्कृतीने तिची स्वतःची भाषा विकसित करून प्रचंड वाङ्मय निर्मित केली. सभ्यतेचा वाङ्मयीन पाया अनेक शतकांच्या

टिपा

काळातून तिच्या प्रत्येक भाषेच्या आणि संस्कृतीच्या उत्क्रांतीबद्दल सांगतो. संस्कृत ही अनेक भाषांची जननी आहे. वेद, उपनिषदे, पुराणे आणि धर्मशास्त्रे हे विविध अवस्थांतील संस्कृतमध्ये लिहीले गेले आहे. याशिवाय विविध प्रकारचे निधर्मी व प्रादेशिक वाङ्मय सुद्धा आहे. भूतकाळात निर्माण झालेले वाङ्मय आणि भाषा याबद्दल वाचल्यानंतर आपण आपल्या सभ्यतेबद्दल अधिक चांगले आकलन करू शकतो. आणि आपल्या संस्कृतीचे वैविध्य आणि समृद्धी यांचा गुणगौरव करू शकतो. हे सर्व शक्य आहे. कारण त्या काळात भाषा विकसित झाल्या.

संस्कृत ही आपली सर्वात प्राचीन भाषा आहे. भारतीय राज्यघटनेत नमुद केलेल्या २२ भाषांपैकी ती एक आहे. संस्कृतमध्ये अफाट वाङ्मय लिहीले गेले. याची सुरूवत ऋग्वेद या सर्वात प्राचीन विचार ज्यात गुंफले गेले आहेत. अशा मानवाच्या प्राचीन वाङ्मयीन कृतीपासून व झेंद अवस्थेच्या काळापासून होते. अठराव्या शतकात संस्कृतमुळेच शास्त्रीयदृष्टया भाषाशास्त्र अभ्यासण्यास गती दिली गेली. महान व्याकरणकार पाणिनीने संस्कृत आणि त्याच्यातील शब्दांची निर्मिती यांचे विश्लेषण त्यांच्या अष्टाध्यायी ह्या व्याकरणविषयक ग्रंथात अप्रतिम व वर्णनात्मक पद्धतीने केले आहे.

बौद्ध धर्मीय संस्कृत वाङ्मयात महायान व हिनयान या दोन्ही पंथाच्या संस्कृत वाङ्मयाचा समावेश होतो. हिनयान पंथीय वाङ्मयात महावस्तू या ग्रंथाचा समावेश होता. ज्यामध्ये अनेक कथा समाविष्ट झालेल्या आहेत.

प्रदेश आणि सीमांच्या मर्यादा ओलांडत संस्कृत ही एकमेव भाषा आतापर्यंत प्रकट होत आली आहे. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर अशा भारताच्या विस्तारात एकही प्रदेश असा नाही की जो संस्कृतने प्रभावित झाला नाही किंवा ज्याने या भाषेत भर घातली नाही. कल्हाणाच्या राजतारांगिणीत काश्मिरच्या राजांची सविस्तर माहिती दिली आहे. याच ग्रंथातण जोन राजा व पृथ्वीराजच्या वैभवाची माहिती मिळते. कालिदासाच्या लेखनाने संस्कृत वाङ्मयाच्या भांडाराला सौंदर्य प्राप्त करून दिले आहे.

कालिदासाच्या अभिज्ञान शाकुंतल आणि मेघदूत यांनी भारतीय वाङ्मयाचा सुवर्णकाळ अंकित केला आहे. शुद्रकाचे मृच्छकिटक भासाचे स्वप्न वासवदत्त हर्षाचे रत्नावली चाणक्याचे अर्थशास्त्र व वात्सायानाचे कामसूत्र यांचाही महान संस्कृत वाङ्मयात समावेश होतो.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.१

१. प्राचीन भारताच्य सर्वात प्राचीन भाषेचे नाव सांगा.

उत्तर ____________________

२. मानवाच्या सर्वात जुना वाङ्मयीन वारसा कोणता आहे ?

उत्तर ____________________



टिपा

## ६.२ वेद ः

वेद हे भारतातील ज्ञात वाङ्मयापैकी सर्वात प्राचीन आहे. वेद हे संस्कृतमध्ये रचले गेले व ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराने (मौखीक परंपरेने) हस्तांतरित झाले. हे तुम्हाला माहित आहे का ? आजपर्यंतचे वेदांचे जतन ही लक्षणीय कामगिरी आहे. ज्यावेळेस लेखनाची कला अवगत नव्हती आणि ज्यावेळेस लेखन साहित्य उपलब्ध नव्हते त्यावेळेस वेदांसारखा अमुल्य ठेवा जतन करून ठेवणे अशक्यप्राय बाब होती म्हणूनच त्याला लक्षणीय कामगिरी म्हणता येईल.

वेदाचा शब्दशः अर्थ ज्ञान असा आहे. हिंदू संस्कृतीमध्ये वेदांना शाश्वत दैवी प्रकटीकरण म्हटले आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद आहेत. प्रत्येक वेदांत ब्राह्मणके उपनिषदे आणि आरण्यकाचा समावेश होतो. ऋग्वेद हा सर्वात प्राचीन वेद आहे. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद यांना एकत्रितपणे त्राजी म्हणतात. नंतरच्या काळात वेदांमध्ये अथर्ववेदाचा समावेश झाला.

### ऋग्वेद ः

ऋग्वेद वेदांत सर्वात प्राचीन आहे. ऋग्वेदात वैदिक संस्कृतांतील १०२८ ऋचा आहेत. यातील बहुतांश ऋचा म्हणजे निसर्गाचे वर्णन आहे. यातील प्रर्थना भौतीक वैभवाच्या प्राप्तीसाठी आहे. वैदिक ऋषी ज्यावेळेस ध्यानमग्न एकचित्त अवस्थेत असत त्यावेळी वैदिक ऋचा त्यांच्या समधी अवस्थेत त्यांच्याकडून नैसर्गिकरित्या अमुर्ताचे अलौकिकरीत्या प्रकटीकरण करून उच्चारल्या जात. वसिष्ठ, गौतम, ग्रीतासमदा, वामदेव, विश्वामित्र आणि अत्री हे त्याकाळचे प्रसिद्ध ऋषी आहेत. इंद्र, अग्नी, वरूण, रूद्र, अदित्य, वायु, अदिती आणि अश्विन बंधू व या ऋग्वेद कालीन काही प्रमुख पुरूष देवता तसेच वाक्ही विद्येची देवता तर पृथ्वी ही भूमीची देवता अशा काही प्रमुख स्त्री देवता आहेत. बहुतांश ऋचा वैश्वीक मान्यता पावलेली जीवनविषयक मूल्ये जसे की सत्य, प्रामाणिकपणा, त्याग, नम्रता, ध्येयनिष्ठा आणि संस्कृती यावर भाष्य करतात हे तुम्हाला माहित आहे का ? भौतिकसमृद्धी आणि उच्च सुसंस्कृत समाजाची निर्मीती यासाठी प्रार्थना केल्या आहेत. धार्मिक बाबींबरोबरच ऋग्वेद आपल्याला प्राचीन भारतातील सामाजिक आर्थिक राजकीय परिस्थितीची माहिती पुरवितो.

### यर्जुवेद ः

यर्जु म्हणजे आहुती किंवा प्रार्थना. हा वेद मुख्यतः विविध विधी व मंत्र व आहुत्या संदर्भात आहे. यज्ञ करण्यासंबंधी मार्गदर्शन या वेदात आहे.

या वेदात गद्य आणि पद्य रचना आहे.कर्मकांड व विधी संदर्भात सूत्रे या वेदात असल्यामुळे हा वेद फार प्रसिद्ध आहे. या वेदाच्या शुक्ल व कृष्ण म्हणजे वाजेसनीय संहिता व तैतरीय संहिता अशा दोन शाखा आहेत.

### सामवेद ः

साम म्हणजे नाद किंवा गीत. ह्या वेदात सोळा हजार राग आणि रागिणी म्हणजे संगीत चाली आहेत.एकूण १८७५ सूत्रापैकी फक्त ७५ मूळ किंवा वेगळी सूत्रे आहेत. उरलेली ऋग्वेदातील आहेत. ऋग्वेदाच्या ऋचा उच्चारण्यासाठी सामवेद चालींची महिती किंवा सूचना वर्णन करतो. या वेदाला संमांचा म्हणजे मंत्रोच्चाराच्या चालीरीती ग्रंथ म्हणता येईल. भारतीय संगीताच्या विकासाचा पुरावा असे या ग्रंथाला म्हणता येईल.

### अथर्ववेद ः

ह्या वेदाला ब्रह्मवेद असेही म्हणतात. या वेदात ९९ रोगावरील उपचार सांगितले आहेत. ह्या वेदाचा मूळ स्त्रोत अथर्व आणि अंगिरस ह्या ऋषीपर्यंत पोहोचतो. प्रारंभिच्या काळातील सभ्यतेच्या धार्मिक कल्पनांचे प्रतिनिधीत्व करत असल्यामुळे या वेदांला फार महत्व आहे. या वेदाच्या पैपालदा आणि सौनक या दोन शाखा आहेत. हा ग्रंथ उत्तरवैदिक काळातील कुटुंबसंस्था सामाजिक आणि राजकिय जीवनाबद्दल विस्तृत माहिती पुरविती.

वेदांचे अकलन होण्यासाठी वेदांगे म्हणजे वेदांची सहाय्यकारी उपांगे समजणे आवश्यक आहे. वेद समजण्यास सहाय्यभूत होणाऱ्या ह्या वेदागांत शिक्षा म्हणजे उच्चार शास्त्र, व्याकरण, कल्प म्हणजे विधी किंवा कर्मकांड निरूक्त म्हणजे शब्दउत्पत्तीशास्त्र छंद म्हणजे छंदबद्ध शब्दरचना व ज्योतिष याचा वेद समजण्यास पूरक असलेल्या माहितीचा अंगाचा समावेश होतो. ह्या विषयासंबंधी फार चांगले साहित्य निर्माण झाले. सूत्र पद्धतीने बोध वाक्यांच्या स्वरूपात ते लिहिले गेले. ह्या बोध वाक्यांना त्यांच्या संक्षिप्त स्वरूपामुळे सूत्रे म्हटले गेले. यातील सर्वात महत्वाचे उदाहरण म्हणजे पाणिनीचे अष्टाध्यायी हा व्याकरणविषयक ग्रंथ एकाच वेळेस त्यावेळचा समाज अर्थकारण आणि संस्कृतीविषयक माहिती पुरवत या ग्रंथात व्याकरणाविषयक नियम सोदाहरण उलगडून दाखविले आहेत.

### ब्राह्मणके आणि आरण्यके ः

चार वेदानंतर ब्राह्मणके आणि आरण्यके नावाचे अनेक ग्रंथ विकसीत झाले. हे ग्रंथ वैदिक विधी व कर्मकांडाचे विवेचन त्याचे नियम व आहुतींचे शास्त्र याबद्दल विस्तृत माहिती पुरवितात. ब्राह्मणकांच्या शेवटच्या भागाला आरण्यके म्हणतात. आरण्यकाचे शेवटचे भाग तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ असून त्यांना उपनिषदे म्हणतात. हे ग्रंथ ब्राह्मण वाङ्मयातील शेवटचे वाङ्मय आहे. प्रत्येक वेदाला त्याची ब्राह्मणके आहेत. ऐतरीय आणि कौष्टकी ही ऋग्वेदाची ब्राह्मणके आहेत. तैतरीय आरण्यक कृष्ण यर्जुवेदाचे तर शथपथ ब्राह्मणक हे शुक्ल यर्जुवेदाचे आहे. पंचविश आणि जमैनी अथर्ववेदाचे ब्राह्मणक आहे. यांमधून आपल्याला सामाजिक राजकिय आणि धार्मिक जीवनाची विस्तृत माहिती मिळते.

अरण्यके, आत्मा, जन्म आणि मृत्युनंतरचे जग याच्याशी संबंधीत आहे. आरण्यात राहणारे मुनी वानप्रस्थ आश्रमातील गृहस्थ आरण्यकाचा अभ्यास करत.

हे सर्व ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. सुरूवातीला हे ग्रंथ मौखिक परंपरेने हस्तांतरीत होत होते.

वेदाच्या रचनेचा आणि वेदांचा काळ निश्चित करणे फार अवघड आहे. मॅक्समुलरच्या मते इ.स.१000 मध्ये ऋग्वेदाची रचना झाली. परंतु लोकमान्य टिळकांच्या मते इ.स.पूर्व ६000 मध्ये त्याची रचना झाली.

### श्रुती आणि स्मृतीमधील फरक :

श्रुती आणि स्मृती या दोन्ही प्रकारातील ग्रंथ हिंदू परंपरा मध्ये कायद्याने नियम स्थापित करणाऱ्या ग्रंथीचे प्रतिनिधीत्व करतात. श्रुतींची निर्मीती दैवी आहे व त्यात कायद्याच्या विशेष अशा संकल्पना अनुस्यूत नाही. श्रुती या दैवी असल्यामुळे त्या सुत्रानंतर सूत्र अशा जतन न करता आहे त्या स्वरूपात जतन केल्या आहेत. श्रुतीमध्ये असलेल्या दैवी घटकाचे संरक्षण आणि त्याचा आर्वतनाच्या स्वरूपातील जप यावर त्याचे आकलन आणि मौखिक परंपरेच्या जतनावर अन्वार्थापेक्षा जादा भर आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न ६.२

१. वेद या शब्दाचा अर्थ काय आहे ?

उत्तर ______________________________

२. चार वेदांची नावे लिहा.

उत्तर ______________________________

३. यर्जु म्हणजे काय ? त्या काळातील कोणती माहिती यर्जवेद देतो ?

उत्तर ______________________________

४. सामवेदांतून किती संगीत धुनी निर्माण झाल्या ?

उत्तर ______________________________

## ६.३ उपनिषदे :

उपनिषद हा शब्द उप म्हणजे जवळ आणि निषद म्हणजे बसणे या धातूपासून निर्माण झाला आहे.

अनेक शिष्य गुरूजवळ बसुन गुरू शिष्य परंपरेतून शिकतात त्यावरून उपनिषद हा शब्द तयार झालेला आहे.

उपनिषदात सर्व भारतीय विचार एकत्रीत आले आहेत. व तो वेदाचा शेवटचा भाग आहे. उपनिषदांत अवघड आणि संदिग्ध चर्चा व अंतिम तत्वज्ञानाविषयक समस्या यांचा समावेश होत असल्याने शिष्यांना ते सर्वात शेवटी शिकवले जातात. त्यामुळेच त्यांना वेदाचा शेवटचा भाग म्हणतात. निसर्गाच्या पूजेपासून वेदाची सुरूवात होते. आणि खचितच नंतरच हळूहळू अमूर्ताच्या ज्ञानाकडे वळावे लागते.माहित असलेली दोनशेच्यावर उपनिषदे आहेत.

मुक्तीक हे असे एक उपनिषद आहे. त्यातून १०८ उपनिषदांची माहिती मिळते. ही संख्या हिंदू जपमाळेतील मण्यांशी जुळणारी आहे.

आपल्या वाङ्मयीन वारशाचा उपनिषद हा एक महत्वाचा भाग आहे. विश्वाची निर्मिती, जन्म, मरण, भौतिक आणि अधिभौतिक जग, ज्ञानाचे स्वरूप आणि इतर अशा अनेक प्रश्नांशी संबंधित उपनिषदे आहेत. बृहत अरण्यक व छांदोग्य ही सर्वात प्राचीन उपनिषदे आहेत. ती अनुक्रमे शुक्ल यर्जुवेद आणि सामवेदाची उपनिषदे आहेत. ती ऐतरीथ, केन, कथा ही इतर उपनिषदे आहेत. तुम्ही तुमच्या प्रयत्नाने इतर काही उपनिषदे शोधण्याचा प्रयत्न करा. या उपनिषदांचे वाचन करा. भारतीय तत्वज्ञानाचे संपूर्ण नवे जग तुमच्यासमोर येईल. उपनिषदांवर आधारीत इतर अनेक ग्रंथ निर्माण झाले. छोटया कथांपासुन सुरूवात करा त्यात रस घ्या आणि नंतर उपनिषदांचे सर्व ग्रंथ वाचा.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.३

१. उपनिषदांचा अर्थ काय आहे ?

उत्तर ______________________

२. काही महत्त्वाच्या उपनिषदांची नावे लिहा.

उत्तर ______________________

## ६.४ रामायण आणि महाभारत ः

रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये आहेत. वाल्मिकीचे रामायण हे मूळ रामायण आहे. रामायणाला अदिकाव्य म्हटले गेले आहे तर वाल्मिकींना अदिकवी म्हटले गेले आहे. रामायणात आदर्श समाजाचे चित्रण आहे. दुसरे महाकाव्य महाभारत वेद व्यासांनी रचले आहे. हे काव्य मुळ संस्कृत मध्ये लिहिले गेले होते. या काव्यात ८८00 सुत्रांचा समावेश होता व त्याला जय किंवा विजयाशी संबंधीत संग्रह असे म्हटले जात होते. या सूत्रांची संख्या २४000 पर्यंत वाढली व त्याला एक आर्य टोळीच्या नावावरून भारत संबोधण्यात येऊ लागले. अगदी अंतिम रचनेमध्ये सूत्रांची संख्या एक लाखावर जाऊन पोहचली व त्याला महाभारत किंवा शतसहस्त्री संहिता असे संबोधण्यात येऊ लागले. यामध्ये कौरव व पांडवांच्या संघर्षाच्या संदर्भात कथाकथन, वर्णन आणि उपदेशपर कथानके यांचा समावेश होतो. महाभारत आणि रामायणाने अनेक भाषांना कथाविषय पुरविले आहेत. महाभारतामध्ये गीतेचा समावेश आहे व जिच्यात दैवी शहाणपणाचे सार समाविष्ट आहे व ती खऱ्या अर्थाने वैश्विक शिकवण आहे. जरी तो प्राचीन धर्मग्रंथ असला तरी त्याची मुलभूत शिकवण आजही उपयोगात आणली जात आहे.

भगवतगीतेत कृष्णाने अर्जनाला एक योद्धा आणि राजपुत्र म्हणून त्याची कर्तव्य समजावून सांगितली आहेत. त्याचबरोबर विविध वेदांतिक व योगी तत्वज्ञानही विविध उदाहरणे व उपमांच्या साह्याने समजावून दिले आहे. यामुळे गीता ही हिंदुतत्वाची आणि स्वयंसिद्ध अतिमहत्वाची संक्षिप्त मार्गदर्शिका आहे. आधुनिक काळात स्वामी विवेकानंद, बाळ गंगाधर टिळक,



महात्मा गांधी आणि अनेकांनी गीतेचा उपयोग भारतीय स्वातंत्र्य चळवळीला प्रोत्साहित करण्यासाठी केला. कारण मुख्यतः भगवतगीता मानवी कृतीच्या सकारात्मक बाजू बददल बोलते. फळाची अपेक्षा न करता कर्मकरत राहणे याबद्दल गीता बोलते. गीतेचे जगातील सर्व मुख्य भाषेत भाषांतर झालेले आहे यावरून तुम्ही गीतेची महानता मान्य करालच.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.४

१. संस्कृतमधील दोन प्राचीन महाकाव्याची नावे लिहा.

उत्तर ______________________

२. रामायण व महाभारताचे रचनाकार कोण होते ?

उत्तर ______________________

३. भगवत गीतेत कृष्णाने अर्जुनाला कोणता उपदेश केला ?

उत्तर ______________________

## ६.५ पुराणे ः

हिंदूच्या पवित्र धार्मिक ग्रंथात पुराणांना महत्वाचे स्थान आहे. वेद व महाकाव्यानंतर पुराणांना महत्व आहे. पुराणांची संख्या अठरा आहे व तेवढीच उपपुराणे आहेत. यातील काही महत्वाची पुराणे पुढीलप्रमाणे आहेत. ब्रह्म, भागवत, पद्म, विष्णु, वायु, अग्नी, मत्स्य आणि गरूड.

बौद्ध धर्माला महत्व प्राप्त होत असतांना पुराणे लिहिली जाऊ लागली. कारण बौद्ध धर्म ब्राह्मणी धर्माचा मुख्य विरोधक होता.

पुराणात काल्पनिक रचलेल्या कथा आहेत, ज्यातून आध्यात्मिक व धार्मिक संदेश, बोधकथा आणि कथा यांच्यामार्फत पोहोचवला जातो. लोकांच्या धार्मिक जीवनाच्या विकासात पुराणांचा परिणामकारक प्रभाव आहे.

महाकाव्याच्या वैचारिक धर्तीवरच पुराणांची रचना केलेली आहे व अगदी सुरूवातीची पुराणे गुप्त काळात रचली आहेत. पुराणांमध्ये भाकड कथा प्रवचने कल्पित यांची रेलचेल आहे व ह्या आशय घटकांच्या सहाय्यानेच सामान्य लोकांचे शिक्षण केले जात होते. पुराणांमध्ये महत्वाची भौगोलिक

माहिती इतिहास विश्वाची निर्मिती आणि पुर्ननिर्मिती राजवंशाच्या वंशावळी ह्या सर्व बाबींचा समावेश केलेला होता. ह्या काळात धार्मिक, सामाजिक कायदा किंवा स्मृतींची रचना करून सूत्ररूपाने ग्रंथित करण्यात आली. स्मृतींवर भाष्य लिहिण्याची अवस्था गुप्त काळानंतर सुरू झाली.

अमरसिंह या संस्कृत कोशकाराने पुराणांमध्ये पाच विषयांचा अनुषंगाने लेखन आले आहे असे नमुद केलेले आहे ते विषय खालीलप्रमाणे

१. सर्ग (निर्मिती)

२. प्रतिसर्ग (दुय्यम निर्मिती)

३. वंश (वंशावळ)

४. मन्वंतर (मनुचे कालखंड)

५. वंश चरित्र (राजवंशाचा इतिहास)

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.४

१. एकूण पुराणे किती ?

उत्तर ______________________________

२. पुराणांची वैशीष्टे लिहा.

उत्तर ______________________________

## ६.६ पाली प्राकृत आणि संस्कृत मधील बौद्ध आणि जैन वाङ्मय ः

ऐतिहासिक व्यक्ती आणि प्रसंगाचे संदर्भ जैन आणि बौद्ध वाङ्मयीन ग्रंथातून येतात. सुरूवातीचे बौद्ध वाङ्मय पाली भाषेत लिहिले आहे. पाली भाषा मगध आणि दक्षिण बिहारमध्ये बोलली जात होती. बौद्ध वाङ्मयाची पंथीय व बिगरपंथीय किंवा धार्मिक आणि निधर्मी अशा दोन गटात विभागणी होते.

धार्मिक वाङ्मयात त्रिपिटकांचा समावेश होतो. पिटक म्हणजे टोपल्या यामध्ये विनय पिटक सुत्तपिटक आणि अभिधम्म पिटक या तीन पिटकांचा समावेश होतो. विनय पिटकामध्ये रोजचे जगण्याच्या व जीवन नियंत्रणाच्या नियमांचा समावेश आहे. सुत्त पिटकामध्ये नैतिकतेसंबंधी संवाद आणि बुद्धाच्या प्रवचनाचा समावेश होतो आहे. अभिधम्मपिटक तत्वज्ञान आणि आध्यात्माशी संबंधीत आहे.

बिगरपंथीय आणि निधर्मी वाङ्मयात जातकाचा समावेश होतो. बुद्धाच्या जन्माच्या मनोरंजक गोष्टींचा प्रामुख्याने जातकांमध्ये समावेश होतो. बुद्धाचा गौतम म्हणून जन्म होण्यापूर्वी बुद्धाने ५५० वेळा जन्म घेऊन धर्माचे तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला. यामध्ये प्राणी आवतारांच्या जन्मांचाही समावेश होतो. ह्या प्रत्येक जन्मकथेला जातक म्हणतात. जातक कथांमधून इ.स.पूर्व सहावे शतक

ते इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर प्रकाश पडतो. जातक कथांतून बुद्धाच्या काळच्या राजकिय घटनांचे प्रासंगिक उल्लेख येतात. जैन धर्मग्रंथात अंग, उपांगे, प्रकरणे, छेदब, सूत्रे आणि मलसूत्रांचा समावेश होतो. महत्वाच्या जैन विद्वावानात हरिभद्र सुरी (आठवे शतक) आणि हेमचंद्र सुरी (बारावे शतक) यांचा समावेश होतो. काव्य तत्वज्ञान आणि व्याकरण यांचा समावेश असलेल्या समृद्ध वाङ्मयाच्या वाढीसाठी जैन धर्माने उत्तेजन दिले. जैन धर्माच्या ग्रंथातूनअनेक परिच्छेद येतात की ज्यामुळे ते पूर्व उत्तरप्रदेश आणि बिहारच्या राजकिय इतिहासाच्या लेखनाला उपयुक्तता ठरतात. जैन धर्मग्रंथातून व्यापार आणि व्यापाऱ्यांचे वारंवार उल्लेख येतात.

प्राचीन भारतीय वाङ्मयाचे खालील दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

अ. धार्मिक

ब. निधर्मी

धार्मिक वाङ्मयात खालील ग्रंथाचा समावेश होतो.

१. **चार वेद :**

- ऋग्वेद हा सर्वात जुना वेद असुन त्यात १०२८ सूक्ते होती.
- सामवेदातील ऋचा विशेष पुरोहिताकडून यज्ञाच्या वेळेस यर्जुवेदातील ऋचाचे पठण केले जायचे.
- अथर्ववेदात गेय रचना पिशाच्च शक्तींना वश करण्यासाठीचे जादूटोणा इत्यादीचा समावेश होता.

२. **ब्राम्हण्के :**

ही वेदांना जोडली होती व ती विस्तृतपणे आहुतींचे महत्व आणि फायदे याचे विवेचन करतात.

३. **आरण्यके :**

ब्राम्हणकांचा शेवटचा भाग म्हणजे आरण्यके.

४. **उपनिषदे :**

गुरूजवळ बसुन शिकण्याचे ग्रंथ

५. **रामायण व महाभारतासारखी महाकाव्ये**

६. **बौद्ध वाङ्मय**

७. **जैन वाङ्मय**

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.५

१. कोणत्या भाषेत प्राचीन जैन व बौद्ध धर्मग्रंथ लिहीले गेले ?

उत्तर

टिपा

२. त्रिपिटकांची नावे लिहा.

उत्तर

३. जातक कथा आपल्याला कशाबद्दल माहिती सांगतात ?

उत्तर

४. काही जैन विद्वानांची नावे सांगा.

उत्तर

## ६.७ इतर संस्कृत वाङ्मय ः

विविध नैसर्गिक शास्त्रे, कायदा, वैद्यक आणि व्याकरण याविषयी अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. धर्मसूत्र व स्मृती ह्या कायदेविषयक ग्रंथांच्या एकत्रित गटाला धर्मशास्त्र म्हणतात. धर्मशास्त्र इ.स.पूर्व ५०० ते २०० या काळात लिहीली गेली. यामध्ये विविध वर्णाची राजांची आणि त्यांच्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये नमूद केलेली आहेत. धर्मशास्त्रे मालमत्ता विक्री तिची वंशपरंपरागत मालकी व मालमत्तेचा तावा या संबंधी नियम सुचित करतात. ज्या व्यक्ती चोरी, हल्ला, खून, व्यभिचार या गुन्ह्यात अपराधी आहेत त्यांच्यासाठी कोणत्या शिक्षा द्यायच्या यासंबंधी माहिती आहे. स्त्री पुरूषासाठी वर्तनाचे नियम व एकमेकांशी कसे संबंध असावेत हे वर्तनसंबंध निश्चित करणारे नियमही मनुस्मृतीत आहेत.

कौटील्याचे अर्थशास्त्र हा मौर्यकाळातील महत्वाचा प्रबंधात्मक ग्रंथ आहे. या ग्रंथातून त्या काळातील राज्यव्यवस्था, समाज आणि अर्थकारण यांचे प्रतिबिंब दिसते आणि प्राचीन भारतीय राजनिती आणि अर्थकारण यांच्या अभ्यासासाठी समृद्ध साधन म्हणून ते उपयोगात येते.

भास, शुद्रक, कालिदास आणि वाग्भट्ट आपल्याला उत्तर आणि मध्य भारतातील गुप्त आणि हर्षाच्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे ओझरते दर्शन घडवतात. गुप्तकाळात संस्कृत व्याकरणात सुद्धा पाणिनी आणि पातंजलीच्या लेखनावर आधारीत ग्रंथ लिहून प्रगती साधली गेली.

### गुप्त काळातील प्रसिद्ध संस्कृत लेखक ः

गुप्तकाळ हा भारताच्या संस्कृतीचा महान आणि वैभवशाली काळापैकी एक असलेला सुवर्णकाळ होता. त्यांनी मुक्तपणे संस्कृतचे विद्वान आणि कवींना मदत केली. त्यामुळे संस्कृत भाषा समृद्ध बनली. वस्तुतः संस्कृत ही सभ्य आणि शिक्षीत माणसाची भाषा बनली. अनेक कवी नाटककार विद्वान या काळात निर्माण झाले आणि संस्कृतमधील साहित्याने वेगळी उंची गाठली.

### १. कालिदास ः

या कवीने अनेक सुंदर काव्य व नाटके लिहीली त्यांचे संस्कृतमधील साहित्याला मौल्यवान रत्न म्हणून समजले जाते. त्याने चित्तवेधक नाटके आणि कविता लिहिल्या. त्याचे लेखनातील आश्चर्यकारक

कौशल्य मेघदूत, ऋतुसंभार, कुमारसंभाव आणि रघुवंश या काव्यातून प्रतीत होते. अभिज्ञान शाकुंतल, विक्रम उर्वशी आणि मालविका अग्नीमित्र ही त्यांची नाटके आहेत.

### २. विशाखादत्त ः

विशाखादत्त या काळातील दुसरा महान नाटककार होता. त्यांनी मुद्राराक्षस आणि विशाखादत्त ही ऐतिहासिक नाटके लिहीली.

### ३. शूद्रक ः

ह्या लेखकाने मृच्छकटीक म्हणजे खेळण्यातील गाडी हे उत्कंठावर्धक नाटक लिहिले. हे नाटक त्या काळातील सामाजिक सांस्कृतिक स्थितीचे वर्णन करणारे मोठे साधन आहे.

### ४. हरिसेन ः

गुप्तकाळातील हा महान कवी व नाटककार होता. त्याने समुद्रगुप्ताची स्तुती करणाऱ्या कविता लिहील्या व त्या अलहाबाद येथिल स्तंभावर कोरल्या आहेत.

### ५. भास ः

याने १३ नाटके लिहीली. ज्यांतून त्याच्या काळातील संस्कृती आणि श्रद्धा यांचे प्रतिध्वनी उमटतात.

कुशाण राजांनी सस्कृत विद्वानांना राजाश्रय दिला. अश्वघोषाने बुद्धचरित्र नावाचा बुद्धाच्या चरित्रावरील ग्रंथ लिहिला. त्यांनी सौदरानंद हा ही ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ संस्कृत काव्याचे उत्तम उदाहरण आहे. गणित, खगोलशास्त्र, ज्योतिष, शेती, भूगोल यासारख्या विषयांत भारतात महान ग्रंथ तयार केले गेले.

वैद्यकशास्त्रावर चरक यांनी तर शल्यकर्मावर (शस्त्रक्रियेवर) सूश्रूताने ग्रंथ लिहिले आहे. माधव यांनी जंतूसंसर्ग यावर ग्रंथ लिहिलेला आहे. खगोल शास्त्रावर वराहमिहीर व आर्यभट्टाने लिहिलेले ग्रंथ ह्या सर्व ग्रंथांनी महत्वपूर्ण स्थान मिळविले आहे. वराहमिहिराचे बृहत संहिता व इतर आर्यभट्टाचे आर्यभट्टीय व लगडाचार्याच्या वेदीक ज्योतीषाशी स्पर्धा करू शकणारे ग्रंथ नाही.

उत्तर मध्ययुगीन काळात उत्तर भारतात काश्मीरमध्ये संस्कृत वाङ्मय उदयास आले. सोमदेवांचा कथा सरितसागर आणि कल्हानाचा राजतारांगणी या ग्रंथाना ऐतिहासिक महत्व आहे. ह्या काळात गीत गोविंद हे जयदेवांचे या काळातील उत्कृष्ट काव्य निर्माण झाले. याशिवाय कला, वास्तुकला, शिल्पकला, मूर्तीशास्त्र या विषयाशी संबंधीत विविध घटकांवर अनेक ग्रंथ लिहीले गेले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ६.६

१. धर्मशास्त्राचा विषय काय आहे ?

उत्तर ______________________

२. राजतारांगिणी हा ग्रंथ कोणी लिहीला ?

उत्तर ______________________

३. कालिदासाच्या प्रसिद्ध नाटकाचे नाव लिहा.

उत्तर

४. जयदेवाच्या ग्रंथाचे नाव लिहा.

उत्तर

५. वैद्यकशास्त्रावरील ग्रंथच्या लेखकाचे नाव काय ?

उत्तर

## ६.८ तमिळ, कन्नड आणि मल्याळम वाङ्मय ः

चार द्रविडी भाषांनी म्हणजे तेलगू तमिळ, कन्नड व मल्याळम भाषांनी त्याची वाङ्मय निर्मिती केली तमिळ ही सर्वात प्राचीन भाषा असल्यामुळे जुन्या काळापासून तिच्यात लेखन परंपरा सुरू झाली. संगम वाङ्मय निर्माण करण्यात आले ते सर्वात जुने तमिळ वाङ्मय आहे.

### तेलगु वाङ्मय ः

विजयनगर साम्राज्याचा काळ तेलगु वाङ्मयाचा सुवर्ण काळ होता. बुक्क पहिला याचा दरबारी कवी नाचना सोमनाथ याने उत्तर हरीवंश नावाचे काव्य लिहीले. कृष्णदेवराय (१५०९-१५२९) विजयनगरचा सर्वात महान सम्राट होता व तो महान प्रतिभावान कवीही होता. त्यांचा अम्मुक्त मल्यादा हा ग्रंथ तेलगु वाङ्मयातील उत्कृष्ट प्रवंध समजला जातो. अष्टदिग्गज् किंवा तेलगु विद्वान साहित्यकारांनी त्यच्या दरबाराची शोभा वाढवली होती. त्यामध्ये मनुचरित्राचा लेखक अलास्नी पेदान्ना हा महान साहित्यीक होता. त्यांना आंध्र कविपितामह म्हणून समजले जायचे. इतर सात कवींमध्ये प्रजातपहरणचा लेखक तिमन्ना, मदयागिरीचा लेखक मालाना धुजती, आयालराजु, रामभद्रकवी, पिंगाली, सुरान्ना, रामराजा भुषण आणि तेनाली रामकृष्ण यांचा समावेश होतो.

धुजती ह्या शिवभक्त कवीने कलहस्तीश्वर महात्मायाम आणि कलहस्तीश्वर सत्काम हे काव्यात्मक व महान गुणवत्ता असलेले ग्रंथ रचले. पिंगाली सुराना यांनी राघवपांडीयाम आणि कल्पपुरणोदय ह्या दोन ग्रंथाची रचना केली. यातील पहिल्या ग्रंथात त्यांनी रामायण आणि महाभारत यांची कथा समांतरपणे सांगण्याची वाङ्मयीन करामत केलेली आहे. तेनाली रामकृष्ण हे दरबारी विदूषक होते. कृष्णदेवरायाचा दरबारातील ते एक गमतीदार व्यक्तीमत्व होते. त्या काळातील प्रतिष्ठित व्यक्तीवर केलेले त्यांचे प्रसंगनिष्ठ विनोद आजही पुन्हा पुन्हा आनंदासाठी आठवले जातात.रामकृष्ण यांनी पांडुरंग महात्म्य ह्या काव्याची रचना केली. हे तेलगुतील महान काव्यापैकी एक आहे. रामराजभुषण हा वासुचरित्रमचा लेखक होता. त्यांना भट्टमूर्ती असेही म्हटले जायचे. त्यांच्या इतर साहित्य कृतीत नरसभुपालियम आणि हरिश्चंद्र नलोपअख्यायम यांचा समावेश होतो. वरील साहित्यकृती राघवपांडव्यमवर आधरित काव्यरचना आहेत. ह्या काव्यातून नल आणि हरिश्चद्रांच्या कथा ऐकायला मिळतात. राजशेखर चरित्र हा मदयागिरी मालाना यांची प्रवंध साहित्यकृती असुन हा ग्रंथ राजशेखर





ह्या अवंतीच्या राजाच्या प्रेम आणि युद्धावर लिहीलेला आहे. आयलाराजु रामभद्र याने रामअभययुद्धम आणि सकल कथासार संग्रह हे दोन ग्रंथ लिहिले.

### कन्नड वाङ्मय ः

विजयनगरच्या राजांनी तेलगु व्यतिरिक्त कन्नड आणि संस्कृत लेखकांनाही उत्तेजन दिले अनेक जैन साधुंनी कन्नड वाङ्मयाला योगदान दिले. माधव यांनी धर्मपुराण हा ग्रंथ लिहिला. दुसरा जैन विद्वान उरिता विलासा याने धर्म परिक्षे हा ग्रंथ लिहिला. या काळातील संस्कृत ग्रंथात वेदात देसिकाने यांचा यादव अभ्युदम आणि माधवचार्यांचा प्रसार स्मृती व्याख्या या ग्रंथाचा समावेश होतो.

कन्नड भाषा  दहाव्या शतकानंतर पूर्णपणे विकसित झाली. या काळातील सर्वात पहिला ग्रंथ राष्ट्र कुट राजा नृपतुंग अमोघ वर्ष पहिला याने लिहिलेला कविराजमांग हा आहे. पंपा ह्या लेखकाला कन्नड भाषेचे जनक समजले जाते. त्यांनी आदि पुराण आणि विक्रमराजीव विजय हे दहाव्या शतकातील महान काव्य ग्रंथ लिहीले. पंपा हा चालुक्य राजा अरीकेसरी यांच्या दरबारात होता. काव्यशैलीत, सौंदर्य वर्णनात व्यक्तीचित्रणात व रसानिर्मितीत पंपा या साहित्यीकाला कन्नड साहित्यकारात तोड नाही. पोताण्णा आणि रण्णा हे दोन कवी राष्ट्रकुट राजा कृष्णा तिसरा याच्या काळात होऊन गेले.

पोण्णा याने शांती पुराण हे महाकाव्य लिहीले आणि राणा याने अजितनाथ पुराण हे महाकाव्य लिहिले पंपा पोण्णा रण्णा यांना त्रिरत्न म्हटले आहे.

तेराव्या शतकात कन्नड वाङ्मयात नवी शिखरे निर्माण झाली. हरीशवारा यांनी हरिश्चंद्र काव्य आणि सोमनाथ चरित्र हे ग्रंथ लिहिले तसेच वंधुवर्मा याने हरिवंश अभ्युदय आणि जीव संबोधन हे ग्रंथ लिहिले. नंतरच्या होयसाळ राजांच्या राजाश्रयाखाली  अनेक ग्रंथ लिहिले गेले. रूद्र भट्ट याने जगन्नाथ विजय आनंदय्या याने मदाना विजय किंवा कवीगार काव्य हे ग्रंथ संस्कृत शब्दांच्या मिश्रणाशिवाय अस्सल कन्नड मध्ये लिहिले. मल्लिकार्जुन यांनी कन्नडमधील पहिला सुक्तीसुधार्नाव नावाचा कविता संग्रह लिहिला. त्याचबरोबर केसीराजाचे शब्दमनीदर्पण हा व्याकरणावरील ग्रंथ हे कन्नडमधील दर्जेदार ग्रंथ आहेत.

कन्नड वाङ्मय चौदाव्या आणि सोळाव्या शतकात विजयनगर राजांच्या काळात त्यांच्या राजाश्रयामुळे भरभराटीस आले. कौनुरा व्यास याने भारत आणि नरहरीने तखे रामायण हे ग्रंथ लिहिले. लक्ष्मीशा जो सतराव्या शतकात रहात होता. त्याने नमैनी भारत हा ग्रंथ लिहिला. कामता कारीकटवनचरित्र (म्हणजे कर्नाटकातील आंब्याच्या बागातील शरद ऋतु) ही पदवी त्याल ह्या लेखनामुळे मिळाली. ह्या काळातील दुसरा महत्वाचा कवी सर्वजण होता व त्याला लोककवी म्हटले जायचे. त्याच्या सुविचारवजा त्रिपदी रचना शहाणपण व नैतिकेचे आदर्श आहेत. होनात्मा ही कन्नडमधील पहिली उत्कृष्ट कवयित्री आहे. या कवयित्रीचा हदीबदेय धर्म (भक्त पत्नीची कर्तव्ये) हा काव्यसंग्रह नैतिक आचरणावरील कर्तव्याचे संकलन आहे.

### मल्याळम वाङ्मय ः

मल्याळम ही भाषा केरळ व त्याच्या लगतच्या प्रदेशात बोलली जाते. ह्या भाषेचा उदय अकराव्या शतकात झाला. पंधराव्या शतकात मल्याळम ही स्वतंत्र भाषा म्हणून ओळखली जाऊ लागली.



टिपा



या भाषेतील भास कौटिल्य अर्थशास्त्रावरील टीकात्मक ग्रंथ व कोकसनदीसन हे दोन महान ग्रंथ आहेत. राम पण्णीकर आणि रामानुजन इझुथाच्चन हे मल्याळम वाङ्मयाचे प्रसिद्ध लेखक आहेत. इतर दक्षिण भारतीय भाषांच्या तुलनेत ह्या भाषेचा विकास उशीरा झालेला असला तरी अभिव्यक्तीचे शक्तीशाली माध्यम म्हणून मल्याळम ने आपला ठसा उमटविला आहे. सध्या अनेक नियतकालिके वर्तमानपत्रे मासिके मल्याळम मधून प्रकाशित होत आहेत. ज्या वेळेस लोक त्याच्या स्वतःच्या भाषेत लिहितात व वाचतात ते त्याचा आनंद घेतात. कारण भाषा त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे. त्याच्या सामाजिक जीवनात अशा प्रकारे गुंफलेली असते की ते त्यांच्या भावना अभिव्यक्त करतात व त्या अनुभवतातही हे तम्ही व तुमच्या भाषेबावतही तितकेच खरे आहे.

## ६.९ तमिळ किंवा संगम वाङ्मय ः

एक लिखीत भाषा म्हणुन तमिळ इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून माहिती आहे. त्यामुळे या भाषेत इसवीसनाच्या पहिल्या चार शतकात संगम वाङ्मयच्या रूपाने विपुल साहित्य निर्मिती झाली. यात विशेष आश्चर्य नाही.इसवीसन ६00 मध्ये हे वाङ्मय अंतिम स्वरूपात रचण्यात आले. संगम म्हणजे साहित्यकाची संमेलने राजांनी अशा संमेलनाला तीन ते चार शतकाहून जास्त काळ राजाश्रय दिला. दक्षिण भारतातील वेगवेगळया प्रदेशातून मदुराईला या संमेलनांसाठी साहित्यीक येत. या संमेलनाला संगम म्हटले गेले आहे व संमेलनात जे साहित्य निर्माण झाले, त्याला संगम वाङ्मय असे म्हणतात. तमिळसंत तिरूवल्लार ज्यांनी कुराल नावाचा ग्रंथ लिहीला व हा ग्रंथ अनेक भाषांत भाषांतरित झाला हा ग्रंथ लक्षणीय आहे. अनेक नायक व नायिकांच्या गौरवार्थ रचलेल्या लहान मोठया कवितांच्या संग्रहाला संगम वाङ्मय म्हणतात. हे वाङ्मय निधर्मी स्वरूपाचे असून फार उच्च दर्जाचे आहे. अशा प्रकारच्या तीन संगम भरल्या. पहिल्या संगमच्या वेळेस जे काव्य रचले गेले ते आता उपलब्ध नाही. दुसऱ्या संगममध्ये दोन हजार कवितांचा संग्रह करण्यात आला.

जवळजवळ तीस हजार ओळींचे काव्य रचले गेले. या कविता इत्तुतीकाई म्हणजे आठ काव्य संग्रहाच्या भागात वर्ग करण्यात आल्या. या काव्य संग्रहाचे दोन मुख्य गट आहेत. पट्टीनकील कांकू म्हणजे १८ लघुसंग्रह आणि पट्टपाहू म्हणजे दहा कविता. यातील पट्टीनकील कांकू हे सर्वात जुने समजले जाते.त्याला ऐतिहासिक महत्व आहे. तिरूवल्लारचे कुराल तीन भागात विभागले आहे. पहिला भाग महाकाव्यासंदर्भात, दुसरा राजकारणासंदर्भात आणि तिसरा भाग प्रेमाशी संदर्भात आहे.

संगम ग्रंथाशिवाय टोलका पियम हा महत्वाचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ व्याकरण आणि काव्याविषयी आहे या व्यतिरिक्त संगम वाङ्मयात शिल्पाधिकरणम आणि मनीमेकाली ही दोन महाकाव्ये आहेत. ही दोन्ही महाकाव्ये इसवीसनाच्या सहाव्या शतकात रचली गेली. यातील पहिले तमिळ वाङ्मयातील रत्न समजले जाते व ते प्रेमकथेवर आहे. दुसरे महाकाव्य मदुराईच्या धान्यव्यापाऱ्याने लिहिले आहे. ही महाकाव्ये तामिळ लोकांच्या दुसऱ्या ते सहाव्या शतकापर्यंतच्या सामाजिक आर्थिक जीवनावर प्रकाश टाकतात.

इसवीसनच्या सहाव्या ते बाराव्या शतकापर्यंत नयनार हे तमिळ शैव संत व अलवार या वैष्णव संतानी भक्ती चळवळ गतीशील बनविली. जी संपुर्ण भारतीय उपखंडात व्यापुन राहिली कामवारामयानम आणि पेरीया पुरानम हे या काळातील तमिळ अभिजात साहित्यीक होते.

## तुम्ही काय शिकलात?

- बौद्धीक भांडारातील एकंदरीय संचयाची बेरीज म्हणजे वारसा होय.
- संस्कृत ही भारतातील सर्वात प्राचीन भाषा आहे.
- ऋग्वेद हा सर्वात प्राचीन आणि समृद्ध असा मानवजातीचा वारसा आहे.
- उपनिषदांनी जगातील महान तत्वज्ञान्यांना प्रभावित केले.
- रामायण आणि महाभारत या आपल्या महाकाव्यांची आपल्या सांस्कृतिक वैशिष्टयांवर आजही प्रभावी छाप आहे.
- पुराणांनी बहुजनांना मार्गदर्शक प्रकाश दाखविलेला आहे.
- जैन धर्माने चांगले वर्णन नैतिकता आणि अहिंसेची शिकवण सत्यता आणि वैराग्य यावर भर दिला. जातक कथा हा त्या काळातील लोकांचे विचार आणि जीवन यासंबंधी माहितीचा अमूल स्त्रोत आहे. बौद्ध संघ ही शिक्षणाची महान केंद्रे बनली.
- कायदा, राज्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, शल्यकर्म (शस्त्रक्रिया), जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि वास्तु आरेखनशास्त्रावर अमूल्य प्रबंध आहेत.
- तमिळ वाङ्मय संगम वाङ्मय म्हणून प्रसिद्ध आहे

## सत्रान्त अभ्यास

१. संस्कृत अनेक भाषांचे मूळ आहे स्पष्ट करा.

२ उपनिषदांचे महत्व विशद करा.

३. जैन आणि बौद्ध वाङ्मयावर सविस्तर माहिती लिहा.

४. खालील बाबींवर टीपा लिहा.

अ. संगम साहित्य

ब. वेद

५. शिल्पाधिकरणम आनि मणिमेकली या दोन महाकाव्यामागील कथानक काय आहे ?

६. तरावे यांच्या रामायणाची वेगळी वैशिष्टे काय आहेत ?

## प्रश्नांची उत्तरे

**६.१**

१. संस्कृत

२.ऋग्वेद

**६.२**

१. ज्ञान

२. ऋग्वेद, यर्जुवेद, सामवेद, अथर्ववेद

३. याचा अर्थ आहुती आणि पूजा. त्या काळातील भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थिती

४. सोळा हजार

**६.३**

१. उपनिषद म्हणजे गुरूजवळ बसणे.

२. ऐतरीय केन, कथा बृहतआरण्यक आणि छांदोग्य

३. कृष्णाने अर्जुनाला त्याची राजपुत्र व योद्धा म्हणून कर्तव्य समजावून सांगतली आणि विविध उदाहरणे व उपमासंहित विविध तत्वज्ञानांची विस्तृत माहिती दिली.

**६.४**

१. रामायण आणि महाभारत

२. वाल्मिकी आणि वेद व्यास

**६.५**

१. १८ पुराणे आणि १८ उपपुराणे

२. पुराणे निर्मिती पुर्ननिर्मीती तसेच ऐतिहासिक वंशावळी व महात्वाच्या कथामधून सांगीतलेल्या वैज्ञानिक कल्पना

**६.६**

१. पाली व प्राकृत

२. विनय पिटक सुत्त पिटक व अभिधम्म पिटक

३. बुद्धाचे पूर्वीचे जन्म व ज्यात त्याने धर्मासंबंधी प्रवचने दिली आहे व धर्माचे पालन केले आहे.

४. हरिभद्र सुरी (आठवे शतक) आणि हेमचंद्र सूरी (१२ वे शतक) हे दोन जैन विद्वान होते.

**६.७**

१. कायदा  २. कल्हण  ३. अभिज्ञान शाकुंतल

४. गीत गोविंद  ५. चरक

७

# भारतीय भाषा आणि वाङ्मय भाग - २

एखाद्या संस्कृतीचे वैभव आपण पाहू शकतो किंवा त्याची दखल घेऊ शकतो. परंतु ज्या वेळेस भाषा व वाङ्मयाचा संबंध येतो त्यावेळेस आपल्याला ते वाचावे आणि ऐकावे लागते. आपल्या संस्कृतीच्या या घटकांना दाद देऊन त्याचा अभिमान बाळगावा लागतो. त्या त्या काळातील जितके ग्रंथ आपण वाचू तितक्या त्या काळातील जादा बाबी आपल्याला कळू शकतील. वरील विवेचन आपल्याला अधिक वाचण्यास मदत करील आणि त्यामुळे आपल्या आजूबाजूला बऱ्याच गोष्टी आपल्याला समजतील.

या प्रकरणात आपण आधुनिक भारतीय भाषा आणि त्यांचे वाङ्मय यासंबंधी शिकणार आहोत. आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आधुनिक भारतीय भाषांची अगदी सुरूवातीला जी व्याकरणे लिहिली व जे शब्दसंग्रह निर्माण केले त्यामुळे या भाषांच्या वाङ्मयाच्या विकासातून दिसणारा राष्ट्रवाद यासंबंधीही आपल्याला माहिती घ्यायची आहे.

## उद्दिष्टे :

हे प्रकरण वाचल्यानंतर आपण खालील बाबी करू शकाल.

- आधुनिक भारतीय भाषांच्या विकासाचा मागोवा घेणे.
- भारतीय समाजातील सामाजिक सांस्कृतिक बदल आणि विविध भारतीय भाषातील वाङ्मयाच्या संबंधाचे परिक्षण करणे.
- भारतीय भाषा आणि त्यांच्या वाङ्मयातील विविधतेतून एकता सोदाहरण दाखवून देणे.
- भारतीय भाषा आणि त्यांच्या वाङ्मय यांचे भारतीय समाजाच्या प्रबोधनातील योगदानाचे परिक्षण करणे.

## ७.१ उत्तर भारतीय भाषा आणि वाङ्मय :

मध्ययुगीन काळाच्या पूर्वार्धापर्यंत भारतीय भाषा कशाप्रकारे उत्क्रांत झाल्या ते आपण पाहिले. जुन्या अपभ्रंशाने काही प्रदेशात नवे स्वरूप धारण केले किंवा हे अपभ्रंश दुसरे स्वरूप धारण

करण्याच्या उत्क्रातींच्या अवस्थेत होते. ह्या भाषा उत्क्रांतीच्या दोन पातळयावर होत्या. बोली आणि लिखीत अशोकाच्या काळातील जुनी ब्रम्ही लिपी अनेक स्थित्यंतरातून गेली. अशोकाच्या काळातील मुळाक्षरांचा आकार असमान होता. हर्षाच्या काळात हा आकार समान आणि नियमित बनला यातून लेखन कौशल्यात झालेली वाढ दिसते.

भारतीय भाषांच्या लिप्यांच्या संशोधनाने असे दाखवून दिले आहे कि उर्दु सोडून सर्व भाषांच्या लिप्यांचे मूळ ब्रम्ही लिपी आहे.

अतिशय मंद गतीने बऱ्याच काळाच्या अंतराने ह्या लिप्यांना आजचा आकार प्राप्त झाला आहे. जर आपण गुजराती, हिंदी आणि पंजाबी भाष्यांच्या लिप्यांची तुलना केली तर आपल्या लक्षात चटकन हा बदल येईल. आपण जर भारतातील बोली भाषांचा विचार केला तर भारतात आज २00 बोली भाषा आहेत हे आपल्या लक्षात येईल. काही बोली विस्तीर्ण प्रदेशावर बोलल्या जात आहेत तर काही मर्यादित प्रदेशावर ठराविक प्रदेशात बोलल्या जात आहेत. त्यापैकी फक्त २२ भाषांना भारतीय राज्यघटनेत स्थान मिळाले आहे.

बहुसंख्य लोक ब्रजभाषा, अवधी (अयोगध्येच्या प्रदेशात बोलली जाणारी), भोजपुरी, मागधी आणि मैथिली (मिथीलेच्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या) तसेच राजस्थानी आणि खडी बोली (दिल्लीच्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या) ह्या विविध स्वरूपात हिंदी भाषा बोलतात. हिंदीच्या बोलीचे हे वर्गी करण विविध साहित्यकांनी अनेक काळापर्यंत जी साहित्य निर्मिती केली त्या आधारावर केले आहे. अशा प्रकारे सुरदास आणि बिहारी यांनी ज्या भाषेचा वापर केला तिला ब्रज भाषा म्हणतात. तुलसीदासांनी रामचरितमानस मध्ये ज्या भाषेचा उपयोग केला त्या भाषेला अवधी भाषा म्हणतात व तसेच विद्यापतींनी ज्या भाषेचा उपयोग केला त्या भाषेला मैथीली भाषा म्हणतात. परंतु ज्या भाषेला आपण हिंदी म्हणतो त्या भाषेला खडी बोली असेही म्हणतात.

खुस्रो यांनी त्यांच्या रचनात खडी बोलीचा उपयोग केला असला तरी ह्या भाषेचा व्यापक वापर एकोणिसाव्या शतकात सुरू झाला. ह्या भाषेचा काही प्रमाणावर उर्दुवरही प्रभाव पडला.

## ७.२ उर्दु ही स्वतंत्र भाषा ः

उर्दु ही स्वतंत्र भाषा १४ व्या शतकात निर्माण झाली. अरबी आणि फारसी भाषाचा परिचय भारताच्या मोंगोल व तुर्क आक्रमणाच्या वेळेस झाला. फारसी ही दरबारी भाषा म्हणून अनेक शतके राहिली. हिंदी आणि फारसी भाषांच्या संयोगाने उर्दु भाषा निर्माण झाली.

११९२ मध्ये तुर्कांनी दिल्ली जिंकल्यावर ते लोक दिल्लीत स्थायिक झाले. ह्या लोकांचा स्थानिक लोकांशी जो संवाद निर्माण झाला त्यातून उर्दुचा जन्म झाला. मुळात ही बोली भाषा होती. परंतु ज्या वेळेस तिला लेखनाचे रूप दिले त्यावेळेस फारसीची लिपी परंपरा एवढेच काय व्याकरणाचाही उपयोग करण्यात आला. हळूहळू या भाषेची वैशिष्टे प्राप्त केली. ह्या भाषेचा वापर अहमदनगर, गोवळकोंडा, विजापूर आणि वेरार या बाहमनी राज्यात वाढल्याने ह्या भाषेला बळ मिळाले. दक्षिणेमध्ये उर्दुला दख्खनी म्हणण्यात येऊ लागले. काळाच्या ओघात ही भाषा दिल्लीमध्ये बहुसंख्य लोकांत लोकप्रिय झाली.

अठराव्या शतकाच्या सुरूवातीला उर्दु अधिक लोकप्रिय वनली. उत्तर मुघल राजांची कामगिरीही उर्दु

त लिहीली जाऊ लागली. हळूहळू गद्य आणि पद्य अशा दोन्ही प्रकारातील वाङ्मय ह्या भाषेत लिहिले गेल्यामुळे ह्या भाषेला एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. शेवटचा मुघल सम्राट बहादुरशहा जाफर याने ह्या भाषेत काव्य लिहिले. ह्या सम्राटाचे काही शेर हिंदी आणि उर्दु भाषिक पट्टयात फार लोकप्रिय बनले.

अनेक कवींनी ज्या बेजोड कविता पुढच्या पिढयांसाठी मागे ठेवल्या त्यामुळे उर्दुला अभिमानास्पद दर्जा मिळाला. अगदी सुरूवातीचा उर्दु कवी खुस्रो (१२५३ -१३२५) समजण्यात येते. इतर प्रसिद्ध कवीमध्ये गालिब, झक हली आणि इक्बाल यांचा समावेश होतो. इक्बाल यांच्या उर्दु कवित त्यांच्या बंग-इ-दारा या कविता संग्रहात समाविष्ट झालेल्या आहेत. सारे जहॉसे अच्छा हिंदूसितॉ हमारा ह्या इक्बाल यांच्या गीताची ध्वनीमुद्रिका अनेक राष्ट्रीय समारंभातून वाजवली जाते. कोणतेही लष्करी संचलन लष्करी वाद्यवृंदाने त्या संचालनात हे गीत वाजवल्या शिवाय पुरे होत नाही दिल्ली सारख्या मोठया शहरात गालिब, माऊम, बुकेशाह, वारीस शाह यासारख्या प्रसिद्ध कवींच्या गझला किंवा नझम गायला प्रसिद्ध गायकांना बोलावले जाते.

त्यामुळे आपली वाङ्मयीन संस्कृती जी आतापर्यंत चालू आहे. ती किती समृद्ध आहे याची तुम्हाला कल्पना असेल. या संस्कृतीने आपले जीवन समृद्ध झाले आहे. त्यामुळे लोकांच्या आदानप्रदानात आणि सरमिसळीत संस्कृती केंद्रस्थानी राहिली आहे.

उर्दु भाषेत उत्कृष्ठ ग्रंथ लिहिणाऱ्यांमध्ये पंडित रतननाथ सरशार यांचा समावेश होतो. त्यांनी फसनह-इ-आझाद हा ग्रंथ लिहिला. हिंदी साहित्याचे मुकुटमणि(उत्कृष्ट लेखक) मुन्शी प्रेमचंद यांनी ही त्यांच्या साहित्यीक कारकिर्दीच्या सुरूवातीला उर्दुमधून लेखन केले होते. उर्दु कवितेने नज्म नावाच्या वेगळया काव्य प्रकाराची भर घातली. उर्दुला लखनौच्या नबाबांनी उत्तेजन दिले. त्यांनी उर्दु भाषेच परिसंवादही भरवले. हळूहळू ही भाषा फार लोकप्रिय बनली. पाकिस्तानने ह्या भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्विकार केलेला आहे.

## मुघल काळातील वाङ्मयीन विकास ः

मुघल काळात वाङ्मयीन क्षेत्रात फार मोठा विकास झाल. बाबर आणि हुमायुन हे वाङ्मयाचे भोक्ते होते. बाबर स्वतः फारशी भाषेचा विद्वान होता. त्याने तुझुक-इ-बाबरी हा ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ तुर्की वाङ्मयात मान्यता पावलेला ग्रंथ आहे. हुमायुनने हा ग्रंथ अरबी भाषेत भाषांतरीत केला. तो स्वतः वाङ्मयाचा रसिक होता त्याने फार मोठे ग्रंथालय स्थापन केले. हुमायुन नामा हा त्याच्या काळातील सर्वोत्कृष्ठ ग्रंथ आहे.

अकबर हा ज्ञानाचा भोक्ता होता. अकबर नफा, सुरसागर, रामचरितमानस ही त्याच्या काळातील महत्वाचे ग्रंथ होते. मलिक महंमद जैसीचे पद्मावत आणि केशवाचे चंद्रिका हे सुद्धा या काळात लिहीले गेलेले ग्रंथ होते. जहांगिराने ही वाङ्मयाला उत्तेजन दिले. त्याच्या दरबारात अनेक विद्वानांचा आदर सत्कार केला जात होता. तो स्वतः उच्च दर्जा चा साहित्यिक होता व त्याने स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे. शहाजानच्या काळात अब्दुल अहमद लाहोरी हा प्रसिद्ध साहित्यिक होता. त्याने बादशाहनामा हा ग्रंथ लिहीला.

औरंगजेबाच्या काळात साहित्यीक घडामोडींना प्रतिबंध करण्यात आला. मुघल सम्राटांच्या शेवटच्या कालखंडात उर्दु वाङ्मयाचा विकास सुरू झाला. याचे श्रेय सर सय्यद अहमदखान यांना जाते. त्यांची भाषा फार साधी आणि परिणामकारक होती. त्यांच्या रचनांमुळे मिर्झा गालिब या त्यावेळच्या प्रसिद्ध कवी यांना काव्य करण्याची स्फूर्ती निर्माण झाली. त्यांनी उर्दुच्या विकासासाठी महत्वाचे योगदान दिले. त्या वेळेस इतरही अनेक कवींनी उर्दु वाङ्मयात रूची दाखवून उर्दु वाङ्मय समृद्ध केले. मौलवी अल्ताब हुसेन इक्बाल ही त्यांच्या पैकी काही प्रसिद्ध नावे आहेत.

फारसी ही दरबारी भाषा असल्यामुळे या काळात लिहिले गेलेले बहुतांश वाङ्मय फारसी भाषेत होत. अमीर खुस्रो आणि अमीर हसन दहेलवी यांनी फारसी भाषेत उत्कृष्ठ काव्यरचना केली. मिनांझ-उस-सिराज, इबन बटुटा, झियाउद्दीन बर्नीयासारखे जे इतिहासकार या काळात भारतात आले, त्यांनी महत्वाच्या घटना राजांच्या कामगिरी आणि राजकिय घटना या सर्व फारसी भाषेत लिहील्या.

या भाषेतील कित्येक ऐतिहासिक घडामोडी प्रशासकीय माहिती पुस्तिका आणि संबंधित वाङ्मय आज आपल्यापर्यंत येऊन पोहचले आहे. मुघल सम्राट शिक्षण आणि वाङ्मयाचे आश्रयदाते होते.

बाबराने तुझुक-इ-बाबरी हे स्वतःचे आत्मचरित्र तुर्की भाषेत लिहिले. परंतु त्याच्या नातवाने अकबराने ते फारसीत भाषांतरीत केले. अकबराने महाभारताचेही फारसीत भाषांतर करवून घेतले. जहागिरांचे आत्मचरित्र तुझुक-इ-जहांगिरी हे ही फारसी भाषेत आहे. नुरजहाँ ही फारसीतील उत्तम कवियित्री होती. मुघलांच्या दरबारात अनेक अधिकाऱ्यांनी फारसी भाषेत विपुल ग्रंथ निर्मिती केली. अबुल फझल याचा अकबरनामा हा वाङ्मयाचा उत्कृष्ट नमुना आहे. फैजीने नितांत सुंदर फारसी काव्य लिहीले. मुघल काळातील अनेक फारसी पत्रसंग्रह (इन्शा) आज उपलब्ध आहे. मुघलांच्या इतिहासावर प्रकाश टाकतानाच या पत्रातून पत्रशैलींचे अनेक प्रकार नजरेस येतात. इतिहास व गद्यलेखनाच्या क्षेत्रात शहाजनच्या काळातील लेखक चंद्रभान याचा उल्लेख करणे महत्वाचे आहे. तसेच औरंगजेबाच्या काळावर प्रकाश पाडणारी तबाकत-इ-आलमगिरी ही साहित्यकृती उपलब्ध झाली आहे. बदायुनी हा अकबराच्या काळातील फारसी लेखक होता. विसाव्या शतकात सुद्धा इक्बालने सुंदर फारसी कविता लिहील्या. हा सर्व भारतीय संस्कृती व वारश्याचा भाग आहे.

या काळातील प्रसिद्ध हिंदी कवीमध्ये कबीर, तुलसीदास, सूरदास आणि रहिम या कवीचा समावेश होत होता. कबीराचे दोहे आजही लोकप्रिय आहेत. तर तुलसीदासांचे रामचरितमानस हा हिंदुचा पवित्र ग्रंथ बनून राहिलेला आहे. अकबराच्या दरबारातील केशव मिश्रांनी अलंकारशेखर हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लेखनशैलीवरील महान ग्रंथ आहे. अकबराने सुद्धा भगवद्गीता उपनिषद यांसारखे ग्रंथ फारसी भाषेत भाषांतरीत केले आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ७.१

१. हिंदी भाषेचे विविध प्रकार कोणते आहेत ?

उत्तर ____________________

२. तुलसीदासांनी रामचरित्रमानससाठी कोणती भाषा वापरली आहे ?

उत्तर ____________________

३. उर्दु भाषा भारतात कशाप्रकारे वापरात आली ?

उत्तर ____________________

४. कोणत्या देशाची राजभाषा उर्दु आहे ?

उत्तर ____________________

५. दक्षिणेत उर्दु भाषेला काय म्हणतात ?

उत्तर ____________________

## ७.३ हिंदी वाङ्मय ः

या काळात हिंदी, बंगाली, असामी, उडिया, मराठी आणि गुजराथी या प्रादेशिक भाषांचा वाङ्मयात प्रचंड मोठी वाढ झाली. दक्षिणेत चौदाव्या शतकात मल्याळम ही एक स्वतंत्र भाषा म्हणुन उदयास आली. या सर्व भाषांच्या उदयामुळे तसेच या भाषांच्या माध्यमांतूनच प्रशासकीय यंत्रणा कार्य करू लागली. त्यामुळे संस्कृत भाषेचा ऱ्हास घडून आला. भक्ती चळवळीचा उदय झाला आणि या प्रादेशिक भाषांचा विविध संतांनी उपयोग केला. त्यामुळे प्रादेशिक भाषांच्या विकासाला व वाढीला मदत झाली.

पृथ्वीराज रासो या ग्रंथाला हिंदीतील पहिला ग्रंथ समजण्यात येते. पृथ्वीराज चौहानाच्या कामगिरीचा यात आढावा घेण्यात आलेला आहे. रासोच्या या शैलीच्या आधारावर इतर अनेक रासो लिहिण्यात आले. प्रत्येक प्रदेशानुसार भाषा बदलते. त्याप्रमाणे तिचा पसाराही वाढतो. नवी परिस्थिती अभिव्यक्त करण्यासाठी नव्या प्रदेशातून शब्द घेतले जातात. तो प्रदेश नव्याने ह्या भाषेच्या प्रभुत्वाखाली आलेला असतो. हिंदी वाङ्मयाने अभिजात संस्कृत साहित्यातून स्फूर्ती घेतली. भारताच्या नाटयशास्त्राचा हिंदी लेखकांच्या मनावर प्रभाव पडलेला होता.

बाराव्या आणि तेराव्या शतकात दक्षिण भारतात भक्ती चळवळीची सुरूवात झाली. ह्या चळवळीचा प्रभाव उत्तरेपर्यंत पोहोचला. हिंदी भाषेत जे गद्य व पद्य लेखन केले जात होते. त्यावरही ह्या चळवळीचा प्रभाव पडू लागला. हिंदी काव्याचे स्वरूप आता अधिक भक्तीपर बनले. तुलसीदासासारख्या काही कवींचे वास्तव्य काही ठराविक भागात राहिले आणि त्या भागाची जी भाषा असेल त्या भाषेतच त्यांनी आपली काव्यरचना केली. परंतु कबीरासारखे कवी एका भागातून दुसऱ्या भागात

जात होते. त्यांनी आपल्या काव्यात फारसी व उर्दु शब्दांचा वापर केला. वाल्मिकीच्या रामायणावर आधारीत रामचरित मानस हा ग्रंथ तुलसीदासांनी लिहिला असला तरी त्यांनी या ग्रंथात लोककथांचा आधार घेत काही प्रसंगात बदल केले. काही प्रसंगांची भर घातली. उदा. सीतेच्या वनवासाचा प्रसंग वाल्मिकी रामायणात नाही तुलसीदासांच्या रामायणात हा प्रसंग आहे.

तुलसीदासाने नायक रामाला देवत्व दिले तर वाल्मिकीने मनुष्यत्व दिले.

सातव्या ते आठव्या शतकांत अपभ्रंश अवस्थेत हिंदीचा विकास झाला. या भाषेला वीरगाथा कला म्हणजे शौर्याच्या कविता किंवा अदिकाल असे चौदाव्या शतकात म्हणण्यात येत होते. आधुनिक काळात खडी बोली एक महत्वाची बोलीभाषा बनली आणि तिच्यामध्ये विविध प्रकारांची वाङ्मय निर्मिती झाली.

त्याचप्रमाणे सूरदासाने सूरसागर हे काव्य लिहिले. या काव्यात खोडया करणारा बालक व गोपींमध्ये श्रृंगार करणारा तरूण अशी कृष्णाची रूपे शब्दबद्ध केली आहेत या कवींनी श्रोत्यांच्या मतावर खोल परिणाम घडवून आणले.

राम आणि कृष्णांचे सण इतके लोकप्रिय होण्याचे श्रेय ह्या कवींना द्यावे लागते. ह्या कवींच्या ग्रंथ आवृत्त्यांनी फक्त कवींनाच नव्हे तर मध्ययुगीन चित्रकारांनाही स्फूर्ती दिली. ह्या कवीपासून संत मीराबाईनांही स्फूर्ती मिळाली. मीराबाईनी राजस्थानीतील भजनांची रचना केली. मुस्लीम असूनही रासखान याने कृष्णभक्तीपर गीतरचना केल्या नंददास हा ही भक्ती कवी होता. रहिम आणि भुषण हे कवी ही आगळे वेगळे वैशिष्टयपूर्ण कवी होते. त्यांच्या विषयात भक्ती, आध्यात्मिकता, नैतिक आचरणे आणि इतर लाभ लोभरहित घटक अशा अनेक घटकांचा समावेश होतो. सतराव्या शतकात सतसाई हा ग्रंथ बिहारी यांनी लिहिला. या ग्रंथातून त्यांनी शृंगार आणि इतर रसांचा ओघवता परिचय करून दिला आहे.

वर उल्लेख केलेल्या भक्ती कवीपैकी कबीर वगळता इतरांनी त्यांची स्वतःची भक्तीची गरज भागविण्यासाठी काव्यरचना केली. कबीरांनी संस्थात्मक स्वरूपातील धर्माला नाकारले. ते निर्गुण उपासक होते. देवाचे नामस्मरण हीच त्यांच्या दृष्टीने खरी भक्ती होती ह्या सर्व भक्ती कवींनी उत्तर भारतीय समाजावर अशा पद्धतीने प्रभाव टाकला की त्यापूर्वी असा प्रभाव कोणी निर्माण केलेला नव्हता. कारण गद्यापेक्षा काव्याचे स्मरण करणे सोपे असल्यामुळे हे कवी अधिक लोकप्रिय झाले.

गेल्या १५० वर्षात आधुनिक भारतीय वाङ्मयात अनेक लेखकांनी योगदान दिले आहे. अनेक प्रादेशिक भाषेत तसेच इंग्रजीमध्येही त्यांनी लेखन केले आहे. रविंद्रनाथ टागोर हे महान बंगाली लेखक. त्यांच्या गीतांजली या काव्यासाठी त्यांनी १९१३ सालचा साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळविले.

असे जरी असले तरी एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच हिंदी गद्याची सुरूवात स्वतंत्रपणे होऊ शकली. भारतेन्दु हरिचंद्र यांनी सर्वात प्रथम हिंदी नाटके लिहिली मुळात प्राचीन संस्कृत व इतर भाषतील नाटकांची ही नाटके भाषांतरे होती. परंतु ते प्रवाह निर्माण करणारे ठरले. महावीर प्रसाद यांनी संस्कृत भाषेतून हिंदीमध्ये रूपांतरीत केलेली किंवा भाषांतरीत केलेली नाटके लिहिली. बंकिमचंद्र चॅटर्जी (१८३८-९४) यांनी मूळ बंगालीतील कादंबऱ्या हिंदीत भाषांतरीत झाल्या व त्या फार लोकप्रिय झाल्या. आनंदमठ या त्यांच्या एका कादंबरीतूनच आपले प्रसिद्ध राष्ट्र गान वंदे मातरम्

घेतलेले आहे. स्वामी दयानंद सरस्वतींचे हिंदीतील योगदान दुर्लक्षित करून चालणार नाही. मूळ गुजराथी असलेले व संस्कृतचे विद्वान असलेल्या दयानंद सरस्वतींनी सर्व भारतासाठी हिंदी ह्या समान भाषेचा पुरस्कार केला. सामाजिक व धार्मिक सुधारणांना वाहून घेतलेल्या नियतकालिकांतून ते हिंदी भाषेत लेख लिहू लागले. सत्यार्थ प्रकाश हा त्यांचा हिंदी भाषेतील महत्वाचा ग्रंथ आहे. हिंदी वाङ्मय समृद्ध केलेल्यामध्ये मुन्शी प्रेमचंद यांचे नाव घेता येईल. सुरूवातीला उर्दुमध्ये लेखन केलेल्या प्रेमचंदांनी नंतर हिंदी मध्ये लेखन सुरू केले. सुर्यकांत त्रिपाठीने त्यांच्या साहित्यात(निराला मधून) समाजातील कर्मठपणावर प्रश्न विचारणे सुरू केल्यामुळे त्यांना निराला म्हणण्यात येऊ लागले. महादेवी वर्मा ह्या हिंदीमधील पहिल्या स्त्री लेखिकेने समस्या त्यांच्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला.

मैथली शरण गुप्ता हे हिंदी साहित्यातील दुसरे महत्वाचे नाव आहे. जयशंकर प्रसाद यांनी सुंदर नाटके लिहीली.

### हिंदी भाषा ः

आधुनिक भाषांचा विकास अठराव्या शतकाच्या अखेरीस सुरू झाला. साधुसुख लाल इन्शाकारखान या काळातील प्रमुख लेखक होते. भरतेंदु हरिश्चंद्र यांनाही हिंदी भाषेला मजबुती दिली. त्याचप्रमाणे राजा लक्ष्मण सिंग यांनी शाकुंतलचे हिंदीमध्ये भाषांतर केले. हिंदीचा प्रतिकूल परिस्थितीत विकास घडून आला. कारण कार्यालयीन कामकाज हिंदीमध्ये चालत होते.

### हिंदी वाङ्मय ः

भारतेंदु हरिश्चंद्र, महावीरप्रसाद द्विवेदी, रामचंद्र शुक्ल आणि श्यामसुंदर दास यांचा प्रमुख हिंदी गद्य वाङ्मय लेखकांत समावेश होत होता. जयशंकर प्रसाद, मैथलीशरण गुप्त, सुमीत्रानंदन पंत, सूर्यकांत त्रिपाठी, निराला, महादेवी वर्मा, रामधारी सिंग, दिनकर आणि हरिवंशराय बच्चन यांनी हिंदी काव्याच्या इतिहासात मोठे योगदान दिले. त्याचप्रमाणे प्रेमचंद, वृंदावनलाल वर्मा आणि इलाचंद्र जोशी यांनी कादंबरी लेखन करून हिंदी वाङ्मय समृद्ध केले.

आपण वरील लेखकांच्या लेखनाचे अवलोकन केल्यास त्या सर्वांनी विशिष्ट हेतूने लेखन केले असे दिसते. स्वामी दयानंद सरस्वतींनी हिंदु समाजाच्या सामाजिक सुधारणांसाठी तसेच अंधश्रद्धा आणि सामाजिक दुष्टता यांना विरोध करण्यासाठी लेखन केले. मुन्शी प्रेमचंद यांनी समाजांचे गरीबांच्या दयनीय स्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी लेखन केले. महादेवी वर्मा यांनी स्त्रीयांची सामाजिक स्थिती ठळकपणे मांडली. निराला हे प्रबोधनाचे अग्रदूत बनले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ७.२

१. नाटयशास्त्राचा लेखक कोण आहे ?

उत्तर ____________________

२. वाल्मिकीच्या आणि तुलसीदासांच्या रामाच्या भूमिकेत काय फरक आहे ?



उत्तर ____________________

३. सूर सागरमधील कृष्णाची भूमिका कशाप्रकारे वेगळी आहे ?

उत्तर ____________________

४. आपले राष्ट्रगीत वंदेमातरम कोणत्या ग्रंथातून घेतले आहे ?

उत्तर ____________________

५. हिंदीमधील लेखक काही विशिष्ट हेतूने लिहीत होते असे आपल्याला का वाटते ?

उत्तर ____________________

## ७.४ बंगाली आसामी आणि उडीया वाङ्‌मय ः

हिंदीनंतर बंगालीचे वाङ्‌मय बंगालमध्ये समृद्ध बनले. १८०० मध्ये पहिल्यांदा बापाटिस्ट मिशनचे मुद्रणयंत्र कलकत्याजवळील बेहरामपूर येथे स्थापन झाले. त्याचबरोबर याच वर्षात ईस्ट इंडिया कंपनीने पोर्ट विल्यम कॉलेजची (महाविद्यालयाची) स्थापना केली या कॉलेजने (महाविद्यालयाने) कंपनीच्या नोकरांना भारताच्या कायदा चालीरीती धर्म भाषा आणि वाङ्‌मयाचे कार्यक्षमतेने काम करता यावे म्हणून शिक्षण देण्याची व्यवस्था केली.

भक्ती चळवळीचा विकास आणि चैतन्याने केलेल्या रचना यांमुळे बंगाली वाङ्‌मयाच्या वाढीला चेतना मिळाली. मंगल काव्य म्हणजे कथा काव्यप्रकारही या काळात लोकप्रिय बनला. त्यांनी चंडी या स्थानिक देवतेच्या पुजेचा प्रसार केला आणि शीव व विष्णु या पुराणातील देवताना घरातील देवतांमध्ये रूपांतरीत केले.

या संदर्भात विल्यम कॅरी यांचे काम महत्वाचे व मैलाचे दगड ठरेल अशा प्रकारचे होते. त्यांनी बंगालीचे व्याकरण लिहून इंग्लीश बंगाली असा शब्दकोश निर्माण केला. तसेच त्यांनी संवाद आणि कथाही लिहिल्या हे आपण लक्षात घेणे गरजेचे आहे की, शब्दकोश आणि व्याकरण हे भाषेच्या वाङ्‌मय विकासात फार महत्वाचे आहे. लेखकाला व्याकरण योग्य वाक्यरचनेसंदर्भात आणि शब्दकोश एखादी ठराविक परिस्थिती व कल्पनेसंदर्भात योग्य शब्द निवडायला मदत करतात. जरी ख्रिस्ती मुद्रण यंत्राचा (छापखान्याचा) उद्देश ख्रिस्ती साहित्य प्रसार असला तरी स्थानिक बिगर ख्रिस्ती मुद्रणयंत्रांनी (छापखान्यांनी) बिगर ख्रिस्ती साहित्याचा प्रसार केला. मोठया प्रमाणावर प्रचार पत्रके मोठी व लहान पुस्तके नियतकालिके यांची निर्मिती होऊ लागली. दरम्यानच्या काळात जरी मंदगतीने शिक्षण प्रसार होत होता तरी १८३५ नंतर ज्यावेळेसह पौर्वात्य पद्धतीच्या शिक्षणाचा आग्रह धरणाऱ्या विरूद्ध मॅकोले व त्यांच्या सहकार्यांचा पाश्चात्य पद्धतींच्या शिक्षणाचा आग्रह धरणाऱ्यांचा पक्ष जिंकल्यामुळे शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला. १८५४ मध्ये चार्ल्स वुडस् यांचा शिक्षणाचा खलिता





जाहीर झाला आणि त्यानुसार १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास, मुंबई येथे विद्यापीठे सुरू झाली. शाळा व महाविद्यालयांच्या क्रमिक पुस्तकाव्यतिरिक्त इतर वाङ्मय प्रकारही निर्माण केले गेले. राजाराम मोहन राय यांनी बंगालीमध्ये लेखन केले. याव्यतिरिक्त इंग्रजी वाङ्मयानेही बंगाली वाङ्मयाला बळ निर्माण करून दिले. ईश्वरचंद्र विद्यासागर (१८२०-९१) आणि अक्षय कुमार (१८२०-८६) या इतर दोन लेखकांनी अगदी सुरूवातीच्या काळात बंगालीमध्ये लेखन केले. या व्यतिरिक्त बंकिमचंद्र चॅटर्जी (१८३९-९४) व शरदचंद्र चटर्जी (१८७६-१९३८) व आर.सी.दत्त हे प्रसिद्ध इतिहासकार व इतर गद्य लेखकांनी ह्या सर्वांनी बंगाली भाषेच्या जडणघडणीत मोठा हातभार लावला. परंतु ज्यांनी संपूर्ण भारतावर प्रभाव निर्माण केला असे महत्त्वाचे नाव रविंद्रनाथ टागोर (१८६१-१९४१) त्यांनी बंगालीमध्ये कादंबऱ्या, नाटके, लघुकथा, समीक्षा, संगीत आणि निबंध अशा विविध पद्धतीवे लेखन केले. १९१३ मध्ये त्यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले.

असे जरी असले तरी सुरूवातीला बंगाल आणि नंतर देशाच्या इतर भागावर पडलेला पाश्चात्य कल्पनांचा प्रभाव याबद्दल काही बाबींची नोंद घेणे महत्वाचे आहे. इ.स.सन १८०० पर्यंत निर्माण झालेले बरेच साहित्य धर्म आणि दरबारी वाङ्मयाशी संबंधीत होते. पाश्चात्य प्रभावाने लेखक मुख्य प्रवाहाच्याजवळ आले. बरेच विषय ऐहिक होते. काही धार्मिक वाङ्मयाची सुद्धा निर्मिती झाली. परंतु त्यात काहीच नवीन नव्हते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या सुरूवातीला साहित्यातून राष्ट्रवादासारख्या विषयाला स्पर्श करण्यात आला. ह्या नव्या प्रवाहात दोन महत्वाच्या बाबी घडल्या. पहिली बाब म्हणजे प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती बद्दल प्रेम आणि ब्रिटीश शोषणाची जाणीव ही होती. दुसरी बाब म्हणजे परकीयांना देशाबाहेर मन वळवून किंवा बळाने घालवून देण्यासाठी रणसिंग फुंकून भारतीयांमध्ये जागृती घडवून आणणे. साहित्यातील हा नवीन प्रवाह सुब्रमण्यम भारती यांनी तमिळमध्ये आणि काझी नझरूल इस्लाम यांनी बंगालीमध्ये सुरू केला. वाचकांच्या मनात राष्ट्रीय भावनांना जागृत करण्यासाठी या लेखकांचे फार मोठे योगदान होते. त्यांचा कविता इतर भारतीय भाषांत भाषांतरीत झाल्या.

## आसामी ः

बंगाली वाङ्मयाप्रमाणेच आसामी वाङ्मयाच्या विकासाला भक्ती चळवळीमुळे गती मिळाली. असाममध्ये शंकरदेव यांनी वैष्णव पंथ रूजवला. त्यामुळे असामी काव्याच्या विकासाला मदत झाली. पुराणांचेही आसामीमध्ये भाषांतर झाले.

अगदी सुरूवातीचे आसामी लेखन दरबारी (बुरूंजी) इतिहास लेखन होते. शंकरदेवांनी अनेक भक्तीपर कविता लिहिल्या. लोक हे काव्य आत्यंतिक उत्साहाने व तल्लीन होऊन गात परंतु १८२७ नंतर खऱ्या अर्थाने आसामी वाङ्मय निर्मितीत रूची दाखवली गेली. लक्ष्मीकांत बेझुबरवा आणि पद्मनाभा गोहिन बरूआ या दोघांची नावे विसरता येत नाही. फकीर उद्दीन सेनापती आणि राधानाथ राय यांच्या नावाचा ओरिसा संबंधी उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यांच्या लेखानाला उडिया वाङ्मयाच्या इतिहासात मानाचे स्थान मिळविण्याची खचितच पात्रता आहे.

उडिया वाङ्मयात उपेंद्र भाना (१६७०-१७२०) यांचे लेखन महत्वाचे आहे. कारण त्यांच्या लेखनामुळे

उडिया वाङ्मयाच्या नव्या कालखंडाला सुरूवात झाली. ओरिसामधील सरलदासाचे वाङ्मय हे उडिया मधील आद्य वाङ्मय मानले जाते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ७.३

१. पहिली ख्रिस्ती धर्मीय मुद्रण यंत्र (प्रिंटींग प्रेस) कोठे स्थापन करण्यात आली?

उत्तर ______

२. वुडचा खलिता भारतात केव्हा लागू झाला ?

उत्तर ______

३. पहिली तीन विद्यापीठे कोठे आणि केव्हा स्थापन झाली ?

उत्तर ______

४. १९१३ मध्ये रविंद्रनाथ टागोरांच्या कोणत्या लेखनाला नोबेल पारितोषिक मिळाले ?

उत्तर ______

५. आसामी काव्याच्या विकासात शान कारदवा यांनी कशाप्रकारे योगदान दिले?

उत्तर ______

## ७.५ पंजाबी आणि राजस्थानी वाङ्मय ः

पंजाबी भाषेला अनेक छटा आहेत. ही भाषा गुरूमुखी आणि फारसी या दोन लिपीत लिहीली जाते. शिखांचा पवित्र ग्रंथ अदिग्रंथ या ग्रंथापुरतीच एकोणीसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत गुरूमुखी मर्यादित होती. गुरूद्वारामध्ये या पवित्रग्रंथाचे पठण करणारे ग्रंथीसारखे मोजकेच लोक ही लिपी शिकण्याचा प्रयत्न करत होते. तरीसुद्धा या भाषेत विपुल साहित्य निर्माण झाले. गुरूनानक हे पंजाबातील पहिले कवी होते. या काळातील इतर समकालीन कवी हे मुख्यतः सुफी संत होते. व ते या भाषेत गात होते. सुफी संत किंवा त्यांचे शिष्य ज्यांना त्यांच्या काव्याला लिखित रूप द्यायचे होते त्यांनी ते फारसी लिपीत दिले. सुफी संताच्या या यादीत बाबा फरीद यांना प्रथम क्रमांक द्यावा लागतो. त्यांच्या काव्याला आदिग्रंथात स्थान मिळाले आहे. याशिवाय पहिल्या चार शिख गुरूंचे काव्य आदिग्रंथात ग्रंथित झालेले आहेत. हे सर्व वाङ्मय पंधराव्या व सोळाव्या शतकातील आहे. शेवटच्या काही गुरूमध्ये नवे धर्मगुरू तेग बहादूर यांच्या काव्याच्या आदिग्रंथात स्थान देण्यात आले आहे. दहावे गुरू गोविंदसिंग यांचे बिहार मधील पटणा येथे फारसी व संस्कृत भाषेत शिक्षण झाले. तेथे ते

फारसी व संस्कृत शिकले. त्यांनी पंजाबीत दोन सव्यासींची रचना केली. परंतु त्यांचा आदिग्रंथात समावेश केलेला नाही.

हीर आणि रांझा, सासी आणि पुन्नु, सोहनी आणि महिवाल इ. प्रेमकथांनी या भाषेला सुरूवातीच्या काळात विषय पुरवले. पुरण भगत यांच्या कथेलाही या काळात काही कवींची काव्यासाठी पसंती मिळाली काही सुंदर कविता काही ज्ञात आणि काही अज्ञात कवींनी रचल्या त्या आज उपलब्ध आहेत. ह्या कविता स्थानिक गायक दोनशे वर्षे गात आले आहेत. काही कथात्मक कविता या काळात स्थानिक कवींनी रचल्या. पारंपारिक कलांनी हे काव्य जतन करून ठेवलेले आहे. यातील सर्वात महत्वाचे वारिस शहा यांचे हीर हे काव्य आहे. सुरूवातीच्या काव्यापैकी हे काव्य अतिशय लोकप्रिय आहे. पंजाबी काव्यातील हा मैलाचा दगड आहे. बुल्ले शहालाही तितकीच लोकप्रियता मिळाली आहे. तो सुफी संत होता. त्याने फार मोठया प्रमाणावर काव्य रचना केल्या आहेत. काफी हा त्यांचा एक लोकप्रिय काव्य रचना प्रकार होता. हा काव्य प्रकार शास्त्रीय संगीताच्या धर्तीवर गायला जात होता. लोक हा काव्यप्रकार फार उत्साहात गातात.

विसाव्या शतकात पंजाबी स्वबळावर अग्रेसर बनली. भाई वीरसिंग यांनी राणा सुरतसिंग हे महाकाव्य रचले. पुरवसिंग आणि डॉ. मोहनसिंग हे उच्च दर्जाचे प्रसिद्ध लेखक आहेत. निबंध लघुकथा काव्य कादंबऱ्या या साहित्य प्रकारांनी पंजाबी वाङ्मय सुशोभित बनले आहे.

हिंदीची बोली असणाऱ्या राजास्थानीनेही तिची भूमिका सिद्ध केली आहे. राजस्थानी भाटांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन त्यांच्या वीर कथांतून शूरवीरांच्या कथा मनोरंजनाद्वारे गाऊन जिवंत करून ठेवलेल्या हे या पोवाडयातून व शूर वीरांच्या कथांतून कर्नल टॉड सोनी राजस्थानच्या शौर्याच्या कथा संग्रहीत केल्या व त्या राजस्थानच्या बखरी व शौर्यकथा (ॲनल्स अँड ॲनिक्वीटीज ऑफ राजस्थान) या ग्रंथात संग्रहीत केल्या. संत मीराबाईच्या कवितांना भाषेच्या इतिहासात व त्याचबरोबर भक्तीकाव्यात अभिमानाचे स्थान आहे. मीराबाईचे त्यांच्या परमेश्वरावरील म्हणजे श्रीकृष्णावरील प्रेम कधी कधी इतके तीव्र होते की बऱ्याच वेळा लोकीक जीवनाच अनुभव सोडून मीराबाईच्या जगाच्या अनुभूतीचा अनुभव या कविता वाचतांना वाचकांना देतात.

> भक्ती चळवळीच्या विकासामुळे हिंदी, गुजराथी, मराठी, पंजाबी, कन्नड, तमिळ आणि तेलगु सारख्या विविध प्रादेशिक भाषांचा उदय झाला.

## ७.६ गुजराती वाङ्मय :

अगदी सुरूवातीचे गुजराती वाङ्मय चौदाव्या पंधराव्या शतकातील त्यांच्या भक्ती काव्याच्या स्वरूपात आढळते. ते त्यांच्या जुन्या पारंपारिक स्वरूपात उपलब्ध आहे व ते गुजरातमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. नरसी मेहता यांचे नाव या संदर्भात आघाडीवर आहे. गुजराती लोक हे भक्ती काव्य त्यांच्या पारंपारिक नृत्यात आणि धार्मिक समारंभात बऱ्याच वेळा बेमालूमपणे गुंफून त्याचा प्रत्यय उत्कृष्ट अभिव्यक्तीतून देतात.

नर्मद यांच्या काव्याने गुजराती वाङ्मयाला नवीन बहर आला. गोवर्धन राम यांची सरस्वतीचंद्र ही कादंबरी हे उच्च दर्जाचे लेखन बनले आणि त्याने इतर साहित्यकारांना स्फूर्ती दिली. डॉ. के.एम.

मुन्शी यांचे नाव गुजराती वाङ्मयात विसरले जाऊ शकत नाही. ते कादंबरीकर इतिहासकार आणि निबंधकार होते. त्यांनी विस्तृत ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. वास्तव आणि काल्पनिक यांचे बेमालूम मिश्रण करण्याचे त्यांचे सामर्थ्य त्यांच्या कादंबऱ्यातून दिसते. पृथ्वी वल्लभ ही त्यांची नितांत सुंदर कादंबरी आहे. नरसी मेहता यांच्या नावाचा विशेष उल्लेख करावा लागेल. कारण त्यांच्या कृष्ण भक्तीच्या काव्याने त्यांना व गुजराथी भाषेला लोकप्रियता मिळवून दिली.

## ७.७ सिंधी वाङ्मय :

सिंध हे सुफी संताचे एक महत्त्वाचे केंद्र होते. सुफींनी सिंधमध्ये अनेक ठिकाणी खनक स्थापन केले. सुफी भक्ती गायकांनी ही भाषा लोकप्रिय बनविली. सिंधी मध्ये वाङ्मय निर्मितीचे श्रेय मिर्झा कैलास बेग आणि दिवाण कौरमल यांना जाते.

## ७.८ मराठी वाङ्मय :

महाराष्ट्र हे पठारावर वसल्यामुळे या भागात अनेक स्थानिक बोली निर्माण झाल्या. या स्थानिक बोलीतून मराठीचा उदय झाला. पोर्तुगीज मिशनऱ्यांनी धर्माचे तत्वज्ञान शिकवण्यासाठी मराठी भाषेचा उपयोग केला.

मराठीतील अगदी सुरूवातीचे काव्य व गद्य हे संत ज्ञानेश्वरांचे आहे. ते तेराव्या शतकात होऊन गेले. त्यांनी भगवद्गीतेवर विस्तृत भाष्य लिहिले. त्यांनी महाराष्ट्रात किर्तन परंपरा सुरू केली. त्यांच्यानंतर नामदेव, गोरा, सेना आणि जनाबाई हे मराठी संत होऊन गेले. या सर्वांनी मराठी भक्ती कविता गायली आणि लोकप्रिय बनविली. त्यांचे काव्य आजही पंढरपूरच्या वारीच्या यात्रेत अनेक वारकरी गातात. त्यानंतर जवळजवळ दोनशे वर्षांनी एकनाथांचा प्रवेश झाला. (१५३३-९९) त्यांनी रामायण व भागवत पुराणांवर त्यांची भाष्ये लिहिली. त्यांची भक्ती काव्ये सर्व महाराष्ट्रभर लोकप्रिय आहेत.

त्यानंतर तुकारामांचा उदय झाला. (१५९८-१६५0) ते भक्ती संतातील महान भक्ती कवी होते. ते राजकीय चळवळीत कृतीशील होते. त्यातून त्यांनी शिवाजीला स्फूर्ती दिली. एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या कालावधीत मराठी वाङ्मयाचा खरा उत्कर्ष दिसतो. राष्ट्रीय चळवळीमुळे मराठी गद्य लोकप्रिय व महत्त्वपूर्ण बनले. बाळ गंगाधर टिळक (१८५७-१९२0) यांनी केसरी हे मराठीतील वर्तमानपत्र सुरू केले. यामुळे मराठी वाङ्मयाच्या वाढीला गती मिळाली. परंतु केशवसुत आणि व्ही.एस. चिपळूणकर यांची भूमिकाही महत्वाची आहे. हरी नारायण आपटे आणि आगरकर यांनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्या फार लोकप्रिय बनल्या. मराठी गद्य लेखनाने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात महत्वाचे योगदान दिले. प्रेरक कविता लिहिणाऱ्यात एच.जी. साळगांवकर यांचे नाव स्मरणात राहते. एम.जी. रानडे आणि के.टी.तेलंग याव्यतिरिक्त कवी आणि कादंबरीकार म्हणून ग.त्रं. माडखोलकर हे ही फार महत्वाचे होते.

### काश्मिरी वाङ्मय :

ज्या काळात कल्हणाने संस्कृतमध्ये राजतारांगिणी हा ग्रंथ लिहिला. त्या वेळेस काश्मीरला वाङ्मयीन महत्व आले. परंतु हे अभिजनांच्या म्हणजे संस्कृत भाषेसंदर्भात घडले. स्थानिक लोकांसाठी काश्मीरी

ही लोकप्रिय बोली होती. लाल दंडे नावाच्या पहिल्या भक्ती कवियित्रीने कदाचित काश्मीरमधील पहिले भक्ती काव्य गायले असावे. ती शैव गुढ आध्यात्मिक कवियित्री होती. इस्लामच्या प्रसारानंतर सुफींचा प्रभाव स्पष्ट दिसू लागला. हबा खातून, महजूर, जिंदा कौल, नुर दिन (याला नंदी ऋषी असेही म्हणतात.) अख्तर मोहियाद दिन, सुफी गुलाम महंमद आणि दिनानाथ नदिम यांनी काश्मीरमध्ये भक्ती काव्य लिहिले. या साहित्यकारांनी काश्मीरी वाङ्मयाच्या वाढीसाठी योगदान दिले.

एकोणिसाव्या शतकापर्यंत पाश्चात्य प्रभाव काश्मीरपर्यंत पोहोचला नाही. १८४६ मध्ये पहिल्या शीख युद्धानंतर जम्मूमधील डोग्रा तेथे राज्यकर्ते बनले. डोग्रांना त्यांच्या डोग्रा भाषेबद्दल काश्मीरपेक्षा जास्त रूची होती तेथे शिक्षणाचा व शाळांचा अभाव होता. काश्मीरमध्ये सर्वत्र दारिद्र्य व आर्थिक मागासलेपण होते ह्या सर्वांमुळे वाङ्मयीन दारिद्र्यही होते.

आधुनिक भारतीय भाषांची एकुण संख्या फार असली तरी भारतीय राज्यघटनेने मुळात १५ भारतीय भाषांनाच मान्यता दिलेली होती. त्यामुळे असाम, बंगाली, गुजराथी, हिंदी, काश्मीरी, मराठी, उडिया, पंजावी, संस्कृत, सिंधी, उर्दु, तमिळ, तेलगु, कन्नड आणि मल्याळम भाषांचा समावेश होता. परंतु त्यामध्ये नंतर नेपाळी मणिपुरी आणि कोकणी या भाषांचा समावेश करण्यात आला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ७.४

१. कोणती भारतीय भाषा फारसी व गुरूमुखी या दोन लिप्यांमध्ये लिहीली जाते?

उत्तर ____________________________________________

२. पंजावीमधील किमान दोन प्रेमकथाची नावे लिहा.

उत्तर ____________________________________________

३. बुल्लेशाह यांच्या लोकप्रिय रचना कोणत्या आहेत ?

उत्तर ____________________________________________

४. गोवर्धनराम यांच्या कादंवरीचे नाव लिहा.

उत्तर ____________________________________________

५. महाराष्ट्रांत किर्तन परंपरा कोणी सुरू केली ?

उत्तर ____________________________________________

६. काश्मीरीमध्ये दर्जेदार वाङ्मयाच्या तुटवडयाला कोणती कारणे कारणीभूत आहेत?

उत्तर ______________________________

## ७.१० ख्रिस्ती मिशनऱ्यांची भूमिका ः

युरोपियन लोकांच्या भारतातील आगमनामुळे भारतात इंग्लीश, फ्रेंच, डच, पोर्तुगिज या भाषांचा भारतीयांना परिचय झाला. या भाषांतील अनेक शब्द भारतीय भाषात रूढ झाले. त्यामुळे भारतीय भाषा समृद्ध झाल्या.

भारतीय भाषांच्या विकासात ख्रिस्ती मिशनऱ्यांचे योगदानही महत्वाचे होते. मिशनऱ्यांनी अनेक स्थानिक भाषांचे शब्दकोश व व्याकरण पहिल्यांदा बनवले. हे ग्रंथ युरोपातून पहिल्यांदा भारतात येणाऱ्या पाद्रयांना (ख्रिस्ती पुरोहितांना) उपयोगी ठरत. या ग्रंथांनी तसे पाद्रयांना सहाय्य केले तसे स्थानिक भाषेतील साहित्यकारांनाही सहाय्य केले . योग्य वाक्यरचना व शब्दयोजनेसाठी ते व्याकरण व शब्दकोशांचा आधार घेऊ लागले.

दुसरी महत्त्वपूर्ण बाब म्हणजे शिळा मुद्रण (पाषाण पृष्ठीय मुद्रण) हा छापखान्याचा नविन प्रकार पहिल्यांदाच भारतात एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला आणला गेला. परकियांनी नव्या धर्मातरीतांसाठी व धर्मातरीत होऊ इच्छिणाऱ्यांसाठी स्थानिक भाषेत साहित्य छापले जावे यासाठी अशी मुद्रणयंत्रे भारतात आणली. त्यामुळे वाङ्मयच्या विकासातील मुद्रणयंत्राची भुमिका आपण दुर्लक्षित करू शकत नाही. तिसरे महत्वाचे वास्तव म्हणजे मिशन शाळा व महाविद्यालयांची स्थापना करण्यात आल्या. इंग्रजीबरोबर येथे स्थानिक भाषाही शिकवल्या जायच्या. त्यांचा उद्देश जरी ख्रिश्चन धर्माचा प्रसार व्हावा असा असला तरी नव्याने निर्माण होणाऱ्या साहित्याच्या वाचनाची अपेक्षा धरणाऱ्या नव्या शिक्षीतांचाही त्यामुळे उदय झाला त्यामुळे भारतीय भाषा व वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास लिहिताना मिशनऱ्यांची भूमिका विसरता येत नाही.

> भारतामध्ये इंग्रजी वाङ्मयाचे अनेक साहित्यीक होते. इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम करण्यात आले व त्यानंतर भारतीय लोक इंग्रजी मध्ये लिहू लागले. अनेक भारतीयांनी इंग्रजीमध्ये साहित्याच्या रचना करायला सुरूवात केली. काही लेखकानी गद्यात तर काहींनी पद्यामध्ये रचना करण्यास सुरूवात केली. मायकेल, मधुसुदन, तारादत्त, सरोजिनी नायडू, रविंद्रनाथ टागोर इ. कवीनी इंग्रजी कवितांमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. सुरेंद्रनाथ बॅनजी, फिरोजशहा मेहता, जवाहरलाल नेहरू यांनी इंग्रजी गद्यामध्ये रूची दाखविली.

## तुम्ही काय शिकलात?

- बहुसंख्य लोक हिंदी बोलत असत.
- उर्दु व फारसी भाषा मुघलांच्या काळात लोकप्रिय बनल्या. मुस्लीम सैन्य व दिल्लीतील स्थानिक रहिवासी यांच्यात जो भाषिक विनिमय व्यवहार झाला. त्यातून उर्दुचा जन्म

झाला. अबुल फझल चंद्रभान, बदायुनी हे मुघल काळातील प्रसिद्ध लेखक होते.

- हिंदी वाङ्मयाने अभिजात श्रेष्ठ संस्कृत वाङ्मयीन कृतीकडे मार्गदर्शक म्हणून पाहिले. भक्तीकाव्य हे हिंदी वाङ्मयाच्या क्षेत्रातील मैलाचा दगड आहे. कबीर तुलसीदास आणि सूरदास हिंदी वाङ्मयाचे दीपस्तंभ आहेत.
- एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला हिंदी गद्य अस्तित्वात आले.
- हिंदी वाङ्मयानंतर लगेचच बंगाली वाङ्मय समृद्ध झाले. रविंद्रनाथ टागोर, बंकिमचंद्र, शरतचंद्र यांनी बंगाली वाङ्मय तयार होत असताना योगदान दिले. आसामी वाङ्मयात बुरांजीचा समावेश होतो. उडिया संदर्भात ही या प्रमाणेच निरिक्षण आहे
- एकोणिसावे शतक संपेपर्यंत गुरूमुखी आदिग्रंथापर्यंतच सिमीत होती. हीर रांझ्यासारख्या प्रेमकथांनी पंजाबी वाङ्मयाला विषय पुरविले. मीराबाईच्या भक्ती काव्याने राजस्थानीला मानाचे स्थान दिले.
- गुजराती, सिंधी, मराठी आणि काश्मीरीने काळाच्या ओघात आपले वाङ्मय विकसित केले.
- अनेक भारतीय लेखकांनी त्यांच्या रचना इंग्रजीमध्ये रचल्या.

## सत्रान्त अभ्यास

१. भारतामध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांची भूमिका काय होती ?

२. हिंदी भाषेचा विकास थोडक्यात वर्णन करा.

३. मध्ययुगीन काळातील पर्शियन भाषेची भूमिका विशद करा.

४. भारतीय भाषा व वाङ्मयाने भारतीय समाजाला आकार देण्यात मध्ये जी भूमिका साकारली त्याचे महत्व स्पष्ट करा.

## प्रश्नांची उत्तरे

**७.१**

१. ब्रजभाषा अवधी, भोजपुरी, मागधी, राजस्थानी, खडी बोली.

२. अवधी

३. तुर्की रहिवाशी व स्थानिकांच्या परस्पर व्यवहारातून उर्दु भाषेचा उदय झाला.

४. पाकिस्तान

५. दख्खनी किंवा दक्षिणी





**७.२**

१. भारत

२. तुलसीदासांच्या रामायणात रामाला परमेश्वर म्हणुन रंगविण्यात आले आहे तर वाल्मिकी रामायणात माणूस म्हणून रंगविण्यात आले आहे.

३. कृष्णाला किशोरवयात खोडकर म्हणून तर तरूण वयात गोपींबरोबर रासक्रीडा करताना रंगविले आहे.

४. आनंदमठ

५. हिंदु समाजात सुधारणा होण्यासाठी स्वामी विवेकानंदानी लेखन केले. मुन्शी प्रेमचंद यांनी गरीबांच्या आत्यंतिक दारिद्रयाबद्दल लिहीले आहे.

महादेवी वर्मा यांनी स्त्रीयांच्या खालावलेल्या स्थितीबद्दल लिहिले आहे.

**७.३**

१. इसवीसन १८00 मध्ये कलकत्त्याजवळील बेहरामपुर बद्दल

२. १८५४

३. १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास, मुंबई

४. गीतांजली

५. त्यांनी आसाममध्ये वैष्णव पंथाची स्थापना केली.

**७.४**

१. पंजाबी

२. हीर-रांझा, सोहनी-महेवाल, ससी-पुन्नु

३. काफी

४. सरस्वती चंद्र

५. संत ज्ञानेश्वर

६. गरीबी, आर्थिक मागसलेपण आणि डोंगरीचा वापर

# विभाग ४

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

## भारतातील धर्म आणि तत्वज्ञान

भारतीय तत्वज्ञान विचारांचे परिक्षण व मोठया ऐतिहासिक कालखंडातून चालत आलेल्या व आजही चालू असलेल्या ऐतिहासिक परंपराचा वेध घेणे हे ह्या अभ्यासघटकांचे उद्दिष्ट आहे. भारतातील विविध धर्मात ज्या दुष्ट प्रवृत्ती अनेक वर्षे शिरल्या होत्या, त्याच्या निवारणार्थ आधुनिक काळात ज्या सुधारणा चळवळी झाल्या त्या चळवळींची चर्चा करणे हा ही उद्देश या अभ्यासघटकाचा आहे.

घटक ८ : प्राचीन भारतातील धर्म आणि तत्वज्ञान

घटक ९ : मध्ययुगीन भारतातील धर्म व तत्वज्ञान

घटक १० : आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी

टिपा

७

# प्राचीन भारतातील धर्म व तत्वज्ञान

दरवर्षी नोव्हेंबर व डिसेंबर महिना झाला की बाजारपेठेत नवीन वर्षांच्या दिनदर्शिकांची गर्दी होते. या दिनदर्शिका वेगवेगळया रंगाच्या असतात. यातील तारखांवर छोटेसे चिन्ह, चित्र किंवा आकृत्या असतात. त्यावर सुट्टयांची यादी असते. धार्मिक व राष्ट्रीय सणांच्या सुट्टया विशेष करून नमुद केलेल्या असतात. भारत हा देश अत्यंत सुंदर व त्याच्या प्रेमात पडावा असा आहे. या बहुभाषिक, विविध धर्मीय, प्रांतीय भाषा या प्रकारे विविधता असणाऱ्या देशातील धर्म व विकास याचा अभ्यास करणे खरोखरच आनंददायक असणारे आहे. धर्म व तत्वज्ञान यांच्यातील संबंध अभ्यासणे महत्वाचे आहे. या प्रकारणामध्ये आपल्याला धर्माचा विकास आणि प्राचीन भारतातील तत्वज्ञानाचा अभ्यास करायचा आहे.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- धर्माचा अर्थ स्पष्ट करणे.
- प्राचीन भारतातील धार्मिक चळवळींच्या वैशिष्टयांची माहिती घेणे.
- वैदिक तत्वज्ञानाच्या सहा विचारांच्या कल्पना स्पष्ट करणे.
- चार्वाक विचारधारेची भूमिका स्पष्ट करणे.
- वस्तुनिष्ठेबद्दलची जैन विचारधारा स्पष्ट करणे.
- बुद्ध तत्वज्ञानाचे योगदान स्पष्ट करणे.

## ८.१ धर्म :

धर्म हा शास्त्राचा आत्मा आहे. नैतिकता व नीतिमूल्ये हा कोणत्याही धर्माचा आधार असतो. धर्माचा भारतीय जीवनावर प्राचीन काळापासून प्रभाव आहे. धार्मिक कल्पना, विचार आणि व्यवहार वेगवेगळया समुहांमध्ये भिन्न असतात. भारतामध्ये धर्म कधीही संकुचित वृत्तीचा नव्हता. तो स्वयंरफूर्त गतिमान होता.

> भारतातील प्रत्येक पद्धती सत्यावर आधरित आहे. जी सर्वत्र व सर्वकाळ समान असते. प्रत्येकाची सादरीकरणाची प्रक्रिया भिन्न असते. तर्क भिन्न असतो. मात्र उद्देश समान असतो.प्रत्येकाचा प्रयत्न सत्याचा मागोवा घेणे आहे, हाच असतो.
>
> मला माझ्या धर्माचा अभिमान आहे कारण या धर्माने जगाला सहिष्णूता व सर्वमान्यता दिली आहे. आम्ही केवळ वैश्विक संयमाकडे पाहत नसून आमचा सर्व धर्म सत्याकडे मार्गस्थ होतात यावर विश्वास आहे.
>
> **–स्वामी विवेकानंद – शिकागो – १८९३.**

भारतीय तत्वज्ञानाचे मूळ धार्मिक परंपरामध्ये आहे. जीवनाच्या संघर्षातून तत्वज्ञानाचा जन्म झाला अहे. भारतीय ऋषींनी योगाच्या माध्यमातून विशेष धार्मिक /आध्यात्मिक तंत्र विकसीत केले आहे. योगाच्या माध्यमातून या ऋषींनी महत्वाचे सत्य व मानवी मनाच्या स्वरूपाचा अभ्यास केला आहे.

ऋषींनी असे तत्वज्ञान मांडले आहे की, मनुष्यावर केवळ शरीर किंवा मनाचाच प्रभाव नसून त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीचाही प्रभाव असतो. ज्यास आत्मा असे म्हणतात.

मनुष्याचा ज्ञानाचा सुखाचा व शक्तीचा खरा स्त्रोत आहे, तो म्हणजे आत्मा. ऋषींनी असे ही तत्वज्ञान मांडले आहे की सर्व प्राणीमात्र ब्रह्माचा अंश आहेत. ब्रह्म हेच अंतिम सत्य आहे, मानवाच्या मूळ स्वरूपापासून दूर जाणे म्हणजेच संघर्षाला सामोरे जाणे आहे. आत्मा व ब्रह्माच्या ज्ञानापासून मानसिक कलहापासून मुक्ती प्राप्त करता येते. ज्यातून मानवाची कायमची सुटका होऊ शकते. ज्यास मोक्ष असे म्हणतात.

ह्याप्रमाणे तत्वज्ञानाने सत्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्विकारला आहे. धर्मामुळे जीवनाकडे पाहण्याचा योग्य मार्ग सापडतो, तर तत्वज्ञानामुळे दृष्टी. तत्वज्ञान म्हणजे सिद्धांत आहे जर धर्म म्हणजे व्यवहार. याप्रमाणे प्राचीन भारतात तत्वज्ञान व धर्म एकमेकांना पूरक होते असे म्हणता येईल.

> " आपल्या मनाला प्रकाशमान करणारे उत्तम श्रवण होवू दे, आपल्याला सर्वत्र भव्यदिव्य दिसू दे आणि आपल्याला सर्वशक्तीमान ईश्वराचे अस्तित्व जाणवू दे, आपल्याला शरीर व मनाच्या माध्यमातून ईश्वराची उपासना /सेवा करण्याची संधी मिळू दे व कायम शांतत नांदू दे.
>
> **–ऋग्वेद – १–८९.**

## ८.२ पूर्ववैदिक व वैदिक धर्म ः

शिलालेखाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे वैदिक काळात लोकांचा रचनात्मक शक्तींवर विश्वास होता असे दिसते. शिलालेखाच्या आधारे असे म्हणता येईल.की त्या काळातील लोक सूर्य व चंद्राची उपासना करित असत. आर्याच्या साहित्यावरूनही या समजाला बळकटी मिळते. त्यांच्या अनेक देवांवर विश्वास होता. उदा. इंद्र, वरूण, सूर्य व रूद्र. बळी देणे व अन्न

आणि पेयांची अग्नीत आहुती देणे याप्रमाणे धार्मिक चालीरीती अस्तित्वात होत्या. सामवेद व यर्जु वेदाने बळी देण्याच्या व इतर प्रथांचे वर्णन केले आहे. या प्रथांची तपशीलवार माहिती ब्राह्मणकामध्ये आहे.

वैदिक साहित्यातील अरण्यके व उपनिषदाच्या माध्यमातून प्रागतिक दृष्टीकोन स्पष्ट होतो. प्रारंभीच्या काळाचे वर्णन उपनिषदांमधून स्पष्ट होते. त्याद्वारे आध्यात्मही वर्णिले आहे. याचा उपयोग धार्मिक नेत्यांनी केला. तसेच प्राचीन व मध्ययुगीन भारताच्या सुधारकांनीही त्याचा उपयोग केला आहे.

- प्राचीन काळापासून भारतामध्ये जीवन या विषयावर विचार होत आहे.
- अंतिम सत्याच्या शोधामधून तत्वज्ञानाचा उगम झालेला आहे. तत्वज्ञानाचा व्यक्तीमत्व व स्वातंत्र्य प्राप्त करण्याशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे केवळ तत्वज्ञानाच्या माध्यमातून नव्हे तर वर्तणूकीतील शिस्त व भावना आणि सवयी यांच्यावरील नियंत्रणातून व्यक्तीमत्व विकास शक्य आहे.
- भारतीय तत्वज्ञानाचे वैशिष्टय म्हणजे यामध्ये अध्यात्म व तत्वज्ञान यांची सांगड घातली आहे. भारतीय तत्वज्ञान व पाश्चिमात्य तत्वज्ञान यांच्या संकल्पना पूर्णपणे भिन्न आहेत.
- भारतीय तत्वज्ञानामुळे आध्यात्मिक उजाळा मिळून भारत विकसीत होईल असे नाही तर त्याची अधुनिक जगाशी सांगड घातली जाऊन बंधुभाव आणि ऐक्य निर्माण होईल.
- भारतीय तत्वज्ञानाचे मूळ केवळ भाकीतांवर अवलंबून नसून, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे. लोकांना केलेल्या उपदेशाप्रमाणेच ज्याचे आचरण आहे तोच खरा तत्ववेत्ता होय.

## ८.३ बिगर परंपरावादी धार्मिक चळवळी :

महावीर व बुद्धांच्या धार्मिक चळवळी इसवीसन पूर्व पहिल्या शतकाच्या कालखंडाच्या मध्याला सुरू झाल्या. या दरम्यान इतर पंथही अस्तित्वात होते. काही पंथांचा वेदीक तत्वज्ञानावर विश्वास नव्हता. या काळात क्षत्रीयांचा उदय झाला. बुद्ध तत्वज्ञानामध्ये कर्म या तत्वज्ञानावर भर होता. पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास होता. यापैकी बरीचशी विचारसरणी मुख्य उपनिषदांशी मिळतीजुळती होती.

## ८.४ विवेकवादी धार्मिकता :

विवेकवादी चळवळी बिगर विवेकवादी चळवळीबरोबर उदयाला आल्या होत्या. यातील विचारधारा वैदिक विचारधारेपासून वेगळी होती. ही विचारधारा बिगरपरंपरावादी चळवळीतून आली होती. वैदीक पूर्व व वेदीकोत्तर विचारांचा प्रभाव या चळवळींवर होताच. भक्तीच्या मार्गातून ही विचारधारा विकसीत झाली होती. यातून वेगवेगळया भक्तीमार्गाचा उदय झाला. उदा. वैष्णव, शैव, शाक्त

इत्यादी. या सर्व भक्तीमार्गांना ब्राह्मण्याचा प्रभाव होता. या उदयास आलेल्या पंथांचा बौद्ध व जैन धर्मावर प्रभाव पडला होता.

## ८.५ लोककला /लोकसाहित्य इत्यादी ः

प्राथमिक धार्मिक विचारधारेवर भक्तीचा प्रभाव होता. तसेच लोककलेचाही प्रभाव होता. तत्कालीन साहित्यातून याला दुजोरा मिळतो. तत्कालीन भक्तीमार्गाविषयीचे लेखन आणि पुरातत्व खात्याच्या संशोधनातून याला दुजोरा मिळतो.

### वासुदेव /कृष्ण भक्ती ः

पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथातून वासुदेव (कृष्ण) याच्या भक्तीची माहिती मिळते. छांदोग्य उपनिषदातूनही कृष्णाबद्दलची माहिती मिळते. अनेक लोकांनी वासुदेव कृष्णाची आपला वैयक्तिक देव म्हणून प्रार्थना केली आहे. या लोकांना भागवत म्हणून ओळखले जाई. गुप्त कालखंडाच्या उत्तरार्धापासून भक्तीमार्गात वैष्णव पंथाचा उल्लेख केला जावू लागला. ज्यांना ईश्वराचा अवतार समजले जाते त्यांची उपासना होवू लागली ती या काळापासूनच.

## ८.६ दक्षिणेतील वैष्णव चळवळ ः

गुप्त कालखंडाच्या उत्तरार्धापासून वैष्णव धार्मिक चळवळ सुरू झाली. त्याची सुरूवात दक्षिण भारतात झाली. वैष्णव लोकांच्या गीतरचना करणाऱ्यांना 'अलवार' या नावाने संबोधले जात होते. हे सर्व विष्णूभक्तीवर कवने करीत. त्यांचा एकात्मिक भक्तीवर विश्वास होता. त्यांच्या गितांना प्रबंध म्हणत असत.

## ८.७ शैव पंथ ः

पाणिनीने उल्लेख केल्याप्रमणे शिवाची उपासना करणाऱ्या समूहाचा शिव भागवत म्हणून उल्लेख केलेला आहे. शिवधर्माचा दक्षिणेतील वाढता प्रभाव ६३ संतांच्या कामगिरीतून झाला आहे. तमिळ मध्ये त्यांना 'नयनार' असे म्हणत. त्यांनी तेवरम स्तोत्रे रचली. या स्तोत्रांना द्रविड वेदांच्या नावानंही ओळखले जाते. नयनार सर्व जातींतून आले होते. अनेक विचारवंतांचा शैवधर्मावर विश्वास होता. त्यांनी या विचारधारेला बळ दिले. आगमंत, शुद्ध व विरशैव या पंथातील लोकांनी शैवधर्मा ला बळकटी दिली.

> तत्वज्ञान समजण्यास सोपे असावे. त्यातील तत्वामुळे न उलगडलेली तत्वेसुद्धा समजण्यास मदत व्हावी. शास्त्र व धर्म यांची त्यात सांगड असावी.
>
> ज्या वेळेला आपण तत्वज्ञान म्हणजे शास्त्र असे म्हणतो, त्यावेळेला विचारांची पद्धतशीर गुंफण अपेक्षित असते. तसेच ते परस्परांना छेद देणारे असू नयेत. संपूर्ण विचार एक सिद्धांत म्हणून सिद्ध झाला पाहिजे.
>
> शास्त्र म्हणजे अंशतः ज्ञान आहे. तर तत्वज्ञान म्हणजे संपूर्ण ज्ञान आहे. ज्ञान असण्याबरोबर काही गोष्टी अज्ञात आहेत. या अज्ञात गोष्टींमध्येच आत्मा, स्वर्ग, परमेश्वर इ. बाबींविषयी सत्य लपले आहे. त्यांचा शोधही करावयाचा आहे.
>
> **– हर्बर्ट स्पेन्सर**

## ८.८ इतर धार्मिक चळवळी :

शक्तीची उपासना व सूर्याची उपासना यांना तत्कालीन पंथामध्ये समान महत्व मिळाले नाही. पूर्व वेदीक कालखंडात शक्तीच्या उपासनेला दुय्यम स्थान दिले आहे. वेदीक काळात स्त्रीत्वाला आदर दिला जात असे. माता म्हणून, देवी म्हणून, शक्ती म्हणून तिला संबोधित असत. शक्तीची उपासना महत्वाची समजली जात असे. मात्र सुरूवातीला केवळ देवीची उपसना करणारे फार कमी होते असे दिसते.

वैदीक व उपनिषदांच्या काळात सूर्य व अन्य देवदेवतांना महत्वाचे स्थान होते. पूर्व इराण मधून उत्तर भारतात शाकद्विपी पंथाचे (सूर्य उपासक) लोक आले होते. मात्र या कालावधीला धार्मिक चळवळीचा कालावधी म्हणता येणार नाही.

### पाठ्यांशांवरील प्रश्न ८.१

१. कोणत्या वैदीक साहित्यात प्रगतीशील दृष्टीकोन दिसून येतो ?

उत्तर ____________________

२. बुद्ध विचारधारेतून कोणत्या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे ?

उत्तर ____________________

३. कोणत्या विचारधारेमुळे बुद्ध व जैन तत्वज्ञान लोकप्रिय झाले ?

उत्तर ____________________

४. वैदीक काळात स्त्रीत्वाचा आदर कसा दर्शविण्यात आला होता ?

उत्तर ____________________

५. शैव धर्माला बळकटी देणारे पंथ कोणते ?

उत्तर ____________________

## ८.९ वैदीक तत्वज्ञान :

ऋग्वेदी लोकांचा धर्म सोपा होता. त्यांचा विश्वास निसर्गातील विविध गोष्टी आणि घटना यावर होता. त्यांची ते उपासना करत. वेदीक कालखंडाच्या उत्तरार्धात काही निश्चित आदर्श आणि तत्वज्ञानाचा विकास झाल्याचे दिसून येते. आत्मा या संकल्पनेचा या काळातच विकास झाला.





वैदीक संकल्पनांच्या आधारेच सहा वेगवेगळया विचारधारा विकसीत झाल्या. यास 'षट्दर्शन' असे म्हणत. या परंपरावादी विचारसरणी आहेत. या सहा विचारधारांची ओळख करून घेवू.

### सांख्य विचारधारा ः

या तत्वज्ञानाप्रमाणे सत्य या संकल्पनेत दोन तत्वे समाविष्ट होतात. एक स्त्री व दुसरे पुरूष म्हणजे प्रकृती . प्रकृती व पुरूष पूर्णपणे स्वतंत्र व परिपूर्ण आहे. या पद्धतीप्रमाणे पुरूष हा जास्त जागरूक आहे म्हणून त्यास बदल करता येत नाही. प्रकृती ही विचार, चळवळ व बदल यावर आधारीत आहे. सांख्य ही विचारधारा या दोन तत्वांमधील संबंध स्पष्ट करते. ह्या तत्वाचा पुरस्कर्ता 'कपिल' आहे. ज्याने सांख्य सूत्र हा ग्रंथ लिहिला.

### योग विचारधारा ः

योगाचा अर्थ दोन प्रमुख तत्वांचे एकत्रीकरण होय. योगाचे मूळ पातांजलीच्या योगसूत्र या ग्रंथात आहे. इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकात पातंजलीने हा ग्रंथ लिहीला. मानसिक यंत्रणेमधून शुद्धीकरण करून योगाच्या माध्यमातून पद्धतशीरपणे प्रकृतीमधून पुरूषाला वेगळे करता येते. योगाच्या माध्यमातून शरीर, मन व घ्राणेंद्रियांवर नियंत्रण प्रस्थापित करता येते. यातून मुक्ती किंवा स्वातंत्र्य मिळते. स्वयंनियंत्रण (यम) यातून स्वातंत्र्य प्राप्त होते, नियमांचे पालन (नियमन), स्थिरस्थिती (आसन), प्राणायाम, प्रत्याहारी व ध्यान धारणेच्या माध्यमातून शांतता लाभते. आपल्या अस्तित्वाला पूर्ण विसरपणे म्हणजे समाधी अवस्था यातून मनःशांती मिळते. योग देवाचे अस्तित्व मान्य करतो. ई श्वर शिक्षक व मार्गदर्शक आहे यावर योगाचा विश्वास आहे.

### न्याय विचारधारा ः

न्याय म्हणजे तर्कशुद्ध विचार करणे होय. न्यायप्रमाणे वैध ज्ञान म्हणजे खरे ज्ञान . याचा अर्थ वस्तू आहे तशी दिसणे व असणे आहे. न्याय संकल्पनेमध्ये तत्वज्ञान सांगते की ईश्वर निर्माता आहे, पालनकर्ता आहे व नष्ट करणारा आहे. गौतम हा 'न्याय सूत्रा'चा लेखक मानला जातो.

### वैशेषिका विचारधारा ः

वैशेषिका विचारधारा ही सत्य व वस्तूनिष्ठ तत्वज्ञानावर आधारित आहे. वैशेषिका विचारधाराचा असा विश्वास आहे की, विश्वातील सर्व वस्तू पाच घटकांपासून बनल्या आहेत. पृथ्वी, पाणी (जल), वायू (आप), तेज व आकाश. या सिद्धांताप्रमाणे ईश्वर हा मार्गदर्शक आहे. सुख व दुःख माणसाला कर्माप्रमाणे मिळते. जगाची निर्मिती व नष्ट होणे ही चक्रीय प्रक्रिया आहे व हे चक्र ई श्वराच्या मर्जीवर अवलंबून आहे. कुनादाने वैशेषिका विषयक तत्वज्ञान लेखन केले आहे. वैशेषिका तत्वज्ञान हे अणू सिद्धांतावर अवलंबून आहे. विश्व अणूपासून तयार झाले हे त्याने सांगितले. या विचारधारेवर प्रशास्तपद या लेखकाने केलेली टीका उल्लेखनीय आहे.

### मीमांसा विचारधारा ः

मीमांसा हे तत्वज्ञान संहिता व ब्राह्मण या वेदातील सिद्धांतावर अवलंबून आहे. या सिद्धांताप्रमाणे वेदांमध्ये सर्व ज्ञान समाविष्ट केले आहे. या तत्वामध्ये न्याय व या दोन्ही वैशेषिका विचारधारांचे मिश्रण आहे. या तत्वज्ञानाचा आधार 'जेमिनी सूत्र' हा ग्रंथ आहे ज्याचे लेखन ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात झाले आहे. या सिद्धांताचे पुरस्कर्ते सावर स्वामी आणि कुमारिल भट्ट आहेत.







### वेदांत विचारधारा ः

वेदांत मध्ये उपनिषदांचे तत्वज्ञान मांडले आहे. उपनिषदांवर शंकरचार्यांनी भाष्य केले आहे, तसेच ब्रह्मसूत्र व भगवद् गीतेवर भाष्य केले आहे. शंकराचार्यांनी अंतिमसत्य म्हणजे ब्राह्मण्य आहे असे सांगितले आहे. वेदांना च्या सिद्धांताप्रमाणे ब्राह्मण्य सत्य आहे, जग असत्य आहे, आपण स्वतः आणि ब्राह्मण्य वेगळे नाहीत. शंकराचर्यांचा विश्वास आहे की ब्राह्मण्य अस्तित्वात आहे. ज्ञानी व सत्य सांगणारा आहे. ब्राह्मण्याचे ज्ञान हे सर्वव्यापी आहे.

वेगवेगळया विचारधारांमधील एक विचारप्रवाह असा आहे की, मानवी मनापर्यंत पोहचता येते, आणि त्यास वेदांतीक तत्वज्ञान असे म्हणतात.

वेदांत तत्वज्ञानापर्यंत दृष्य अहंकाराला जागा नसते. वेदांत हे तत्वज्ञाान व धर्म आहे. तत्वज्ञान व धर्म आहे. तत्वज्ञानाच्या आधारे आपणाला सर्वोच्च सत्यापर्यंत जाते येते. वेदांत तत्वाप्रमाणे सर्व धर्म एकाच मार्गाने जातात आणि त्याचे उद्देश समान असतात. वेदांताकडून मिळणारा महत्वाचा संदेश म्हणजे प्रत्येक कृतीला ज्ञान व बुद्धीची जोड असावी. मनाकडून चूक होवू शकते परंतू बुद्धीच्या वापरामुळे चूक होत नाही. प्रत्येक धर्म वेगवेगळया वाटेने अंतिम सत्याकडेच येतो. ही वेदांताची मुख्य शिकवण आहे.

## ८.१० चार्वाक विचारधारा ः

चार्वाक विचारधाराचा प्रणेता म्हणून बृहस्पतीचे नाव घेतले जाते. याचा उल्लेख वेदामध्ये आणि उपनिषदांमध्ये आढळतो. या विचारसरणीप्रमाणे ज्ञान हा संयोग आहे व हा संयोग चार घटकांवर अवलंबून आहे जो मृत्यूनंतर शिल्लक राहत नाही वा तिचा शोध लागत नाही. चार्वाक तत्वज्ञानाला समुहाचे तत्वज्ञान म्हटले जाते.

चार्वाकच्या सिद्धांताप्रमाणे दुसरे जग अस्तित्वात नाही. त्यामुळे मृत्यू हा मानवाचा अंत आहे. आनंद हा आयुष्याचा उद्देश आहे. ईश्वर, आत्मा आणि स्वर्ग यावर या विचारसरणीचा विश्वास नाही. सर्व विश्व चार मुलभूत घटकांवर आधारीत आहे ते घटक म्हणजे पृथ्वी, पाणी, अग्नी व वायू.

## ८.११ जैन तत्वज्ञान ः

चार्वाकाप्रमाणे जैन तत्वज्ञानाचा सुद्धा वेदांवर विश्वास नाही. मात्र त्यांना आत्म्याचे अस्तित्व मान्य आहे. काही परंपरागत विश्वासांवर जैन तत्त्वज्ञानाचाही विश्वास आहे जसे की, यातना मनावरील नियंत्रणद्वारे नियंत्रणात आणता येतात. योग्य वर्तणूकीद्वारे व योग्य ज्ञानाने यातना नियंत्रित करता येतात. जैन तत्वज्ञान प्रथमतः तिर्थकार ऋषभ देव यांनी मांडले. अजितनाथ व अरिस्तनेमी यांचे नावही ऋषभदेवांबरोबर घेतले जाते २४ तिर्थकरांनी जैन दर्शनाची मांडणी केली आहे. प्रथम तिर्थ कारांना याची जाणीव झाली की, जैन तत्वज्ञानचा स्त्रोत आदिनाथ आहे. २४वा व शेवटचा तिर्थ कार म्हणजे वर्धमान महावीर. महावीरांचा जन्म ख्रिस्तपूर्व ५९९ मध्ये झाला. सत्याचे ज्ञान होण्यासाठी त्यांनी ३० व्या वर्षी घरादाराचा त्याग केला. त्यांना सत्याचे आकलन झाल्यावर त्यांना महावीर या नावाने ओळखले जावू लागले. त्यांचा ब्रह्मचर्यावर गाढा विश्वास होता.

### जैन तत्वज्ञान – मुलभूत घटकांचे सात प्रकार ः

जैन सिद्धांताचा असा विश्वास आहे की नैसर्गिक व अलौकिक गोष्टी यांची विभागणी सात मुलभूत घटकात करता येते. त्या म्हणजे जीव, अजीव, अस्तिक्य, बंध, सामवार, निर्जन आणि मोक्ष. दर्जे दार आयुष्यामध्ये अर्थ असतो आयुष्य बदलणारे असते. उदा. चेतना ही आत्म्यासाठी आवश्यक असते. इच्छा, आनंद व दुःख हे बदलणारे घटक आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ८.२

१. षड दर्शनच्या किती विचारधारा अस्तित्वात आहेत ?

उत्तर ______________________________

२. सांख्य तत्वज्ञानाच्या निर्मात्याचे नाव सांगा.

उत्तर ______________________________

३. योगाचे तत्वज्ञान कोणी शोधले ?

उत्तर ______________________________

४. न्याय सूत्राचे लेखक कोण आहेत ?

उत्तर ______________________________

५. कोणत्या विचारधारा वेदामध्ये सर्व ज्ञान समाविष्ट आहे हे सांगते?

उत्तर ______________________________

६. उपनिषदांचे तत्वज्ञान काय आहे ?

उत्तर ______________________________

७. मृत्युनंतर अस्तित्वात न राहणाऱ्या अशा चार घटकांवर ज्ञान अवलंबून असते असे कोणत्या विचारधारेचे मत आहे ?

उत्तर ______________________________

८. जैन दर्शन मध्ये एकूण किती तीर्थंकर होऊन गेले ?

उत्तर ________________

९. महावीरांचा जन्म कधी झाला ?

उत्तर ________________

१०. कोणत्या तीर्थंकाराचे नाव भगवान महावीर आहे ?

उत्तर ________________

११. जैनांचे सात प्रमुख मुलभूत घटक कोणते ?

उत्तर ________________

## ८.१२ बुद्धाचे तत्वज्ञान ः

बुद्ध तत्वज्ञानाचे जनक म्हणून गौतम बुद्धांचे नाव घेतले जाते. लुंबीनी येथे त्यांचा जन्म ख्रिस्त पूर्व ५६३ मध्ये झाला. त्याचे बालपणीचे नाव सिद्धार्थ होते. त्यांच्या वयाच्या ५ व्या वर्षी त्यांच्या मातोश्री मायादेवी यांचे निधन झाले. वयाच्या सोळाव्या वर्षी यशोधरा नावाच्या सुंदर राजकन्येशी त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर एक वर्षांनी त्यांना मुलगा झाला, ज्याचे नाव त्यांनी राहूल असे ठेवले. वयाच्या २९व्या वर्षी गौतम बुद्धांनी ऐहिक जगाचा त्याग केला. कारण त्यांना मृत्यू, दारिद्र्य, आजार इ. मानवी क्लेषांवर उपाय (मार्ग) शोधायचे होते. त्यांनी ६ वर्ष जंगलात घोर तपश्चर्या केली. मग त्यांना दिव्यत्व प्राप्त झाले. व ते बौद्ध म्हणून ओळखले जावू लागले. त्यांनी आपला संदेश पोहचविण्यासाठी खूप प्रवास केला. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

गौतम बुद्धांच्या तीन शिष्यांनी त्यांचा संदेश जगभर पसरविला. त्यांची नावे उपाली, आनंदा, महाकश्यप अशी होती. बुद्धांच्या निर्वाणानंतर राजगृह येथे सभा झाली. उपालीने 'विनयपटीका' नावाचा ग्रंथ लिहिला त्यामधे शिस्तीचे नियम सांगितले आहे, आनंदाने 'सुत्तपिटीका' ग्रंथ लिहिला ज्यामध्ये बुद्धाचे जीवनविषयक नीतीमुल्ये समाविष्ट केली आहेत. काही काळानंतर अभिधम्म पटिका नावाचा बुद्ध तत्वज्ञान सांगणारा ग्रंथ लिहीला गेला.

### प्रमुख वैशिष्ट्ये ः

बुद्धांनी जगण्याची सोपी तत्वे सांगितली आहेत, ज्याचे आचरण करणे सोपे आहे. त्यांनी असे सांगितले की जग हे पूर्णपणे दुःखाने भरले आहे. मानवानी या क्लेषदायक जगातून मुक्ती मिळविली पाहिजे. अंधश्रद्धेला त्यांनी ठाम विरोध केला. बुद्धांचे तत्वज्ञान व्यवहारी व वस्तूनिष्ठ आहे. त्यातून मनःशांती कशी मिळवावी याचे ज्ञान होते.

### चार सत्ये ः

#### अ. मानवी जीवनात दुःख आहे ः





ज्यावेळेला बुद्धांनी मानवी यातना पाहिल्या, उदा. आजारपण, दुःख , मृत्यू ह्यावरून त्यांचे ठाम मत झाले की मानवी जीवनात दुःख आहे. जन्मापासूनच दुःख आहे. आनंदापासून दूर जाणे दुःखदायक असते. इच्छांची पूर्तता न होणे दुःखदायक असते.

**ब. दुःखाला कारण असते ः**

कोणत्याही दुःखाला कारण असते. जन्म व मृत्युचा फेरा सतत चालू असतो. म्हणून इच्छा हे दुःखाचे कारण आहे.

**क. दुःखाचा अंत असतो. ः**

ज्यावेळेला इच्छा, प्रेम इ. गोष्टीचा समूळ नाश होतो तेंव्हा दुःख संपते. अहंकाराचा अंत महत्वाचा आहे. परस्परातील गुंतणे, द्वेष, शंका, दुःख इ.दुःखाची कारणे नष्ट होतात. इच्छांपासून दूर जाणे दुःखापासून दूर जाणे आहे. यांस निर्वाण म्हणता येईल.

**ड. मुक्तीचा मार्ग ः**

चवथे आदर्श सत्य म्हणजे मुक्ती आहे. जरी दुःख हे जीवनाचे मूळ असले तरी त्यापासून मुक्ती मिळू शकते. मुक्ती कडे जाण्यासाठी आठ अवस्था किंवा मार्ग आहेत ज्याचे प्रत्येकाला आचरण करावे लागते.

## निर्वाणकडे जाण्याचा आठपदरी मार्ग ः

**१. योग्य दृष्टी ः**

अज्ञान दूर केल्याने योग्य दृष्टी प्राप्त होते. अज्ञानामुळे आपले व बाह्य जगाचे नाते चुकीच्या संकल्पनेच्या आधारे जोडले जाते. म्हणून जगाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन म्हणजे योग्य दृष्टी.

**२. योग्य सोडवणूक ः**

अत्यंत तीव्र इच्छा शक्तीच्या बळावर इतरांना त्रास होईल अशा गोष्टीपासून आपण दूर राहू शकतो. यामध्ये त्याग, सहानुभूती, दया इत्यादीचा समावेश होतो.

**३. योग्य कथन (बोलणे) ः**

मानवाने आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. इतरांवर टीका करण्यासाठी चुकीचे व असंसदीय शब्द वापरू नयेत.

**४. योग्य वर्तणूक ः**

आयुष्याला घातक होईल अशी वर्तणूक असू नये. चोरी, हावरटपणा, सौंदर्याची कृत्रीम साधने व त्याचा वापर, दागदागिने, ऐषोआरामी राहणी याचा त्याग करावा.

**५. जगण्याचा आदर्श मार्ग / माध्यम ः**

आपल्या उदरनिर्वाह करण्यासाठी मार्ग योग्य असावा. अपहार, लूटालुट, चोरी या मार्गाने धनसंचय करू नये.

### ६. योग्य कष्ट ः

वाईट भावनाा व मतप्रदर्शन टाळावे. योग्य स्वनियंत्रण, आवश्यक असते. जीवन योग्य विचारांनी समृद्ध असावे.

### ७. आदर्श मनोभावना ः

याचा अर्थ आपले शरीर, हृदय व मन सुस्थितीत असावे. जेंव्हा वाईट विचारांनी मन प्रेरीत होते तेंव्हा आपल्याला दुःखाची प्रचीती येते.

### ८. योग्य निग्रह ः

जेंव्हा वरील सात गोष्टींचे पालन होते तेंव्हा आपण आपले मन योग्य प्रकारे केंद्रित करू शकतो. व्यक्तीला निग्रह (केंद्रीकरणा) मुळे निर्वाण अवस्था प्राप्त होते.

> फ्रेंच तत्ववेत्ता व्हिक्टर कुसीन यांच्या मते भारताकडे सर्व तत्वज्ञानाचे अस्तित्व आहे. पूर्वेच्या देशातील काव्यात्मक व तत्वज्ञानाचे अवशेष पाहता असे लक्षात येते की भारतीय तत्वज्ञानाचा युरोपकडे प्रसार होत आहे. सत्य व सत्याचा शोध भारतीय तत्वज्ञानात सापडतो. व्हिक्टर कुसीन पूर्वेच्या तत्वज्ञानापुढे गुडघे टेकतो. भारत या तत्वज्ञानाची मायभूमी आहे.

बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करण्याकरिता बिहारामध्ये बुद्धगयाला भेट दिली पाहिजे. तेथे महाबोधी वृक्ष आहे, जिथे सत्याचा शोध घेतला गेला.दिव्यप्राप्तीनंतर बुद्ध बुद्धगया येथे सात आठवडे वास्तव्यास होते. बुद्धांच्या मृत्युनंतर ९७० वर्षांनी चिनी प्रवासी फा येन याने राजगीर या स्थळाला भेट दिली. बुद्धांच्या अनेक कथांना ह्या ऐतिहासिक स्थळांची साक्ष आहे. राजा बिंदूसाराने याच ठिकाणी बौद्ध तत्वज्ञान स्विकारले. पहिली बौद्ध परिषद सप्तमी लेणी येथे भरली होती. नालंदा विद्यापीठाची स्थापना ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात झाली. गुप्त कालखंडात हे विद्यापीठ भरभराटीला आले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ८.३

१. गौतम बुद्धाचे बालपणीचे नाव काय होते ?

उत्तर

२. गौतम बुद्धांनी तपश्चर्या कोठे केली ?

उत्तर

३. गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती कोठे झाली?

उत्तर

४. सुतपिटीकेत काय सांगितले आहे ?

उत्तर

५. विनयपिटीकेत काय सांगितले आहे?

उत्तर

६. गौतम बुद्धाची चार आदर्श सत्ये कोणती?

उत्तर

७. आत्म्याचे अस्तित्व कोणती विचारधारा नाकारते ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- धर्माचे मूळ वैदीकपूर्व समाजात आहे.
- प्राचीन भारतातील धार्मिक विकास पारंपारिक तसेच अपारंपारिक मार्गाने झाला.
- वेदातून निर्माण झालेल्या तत्वज्ञानाला परंपरागत पद्धती म्हणतात.
- सांख्य तत्वज्ञानाने पुरूष व प्रकृती हे तत्वज्ञान मांडते.
- योग ही वस्तुनिष्ठ तत्वज्ञान पद्धती आहे.
- न्यायामुळे तार्किक विचारधारा निर्माण होते.
- बौद्ध तत्वज्ञानातून चार आदर्श सत्ये समोर येतात.
- बौद्धाने आठ पदरी मार्ग सांगितला जो मुक्तीकडे नेतो.

## सत्रान्त अभ्यास

१. प्राचीन भारतातील धार्मिक चळवळींची वैशिष्टये स्पष्ट करा.

२. चार्वाक विचारधारेचे धार्मिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

३. चार्वाक विचारधारा अन्य विचारधारेपेक्षा भिन्न कशी आहे ?

४. बौद्ध तत्वज्ञान उत्तम मनुष्य (मानव) होणासाठी कशी मदत करतो.

## प्रश्नांची उत्तरे

### ८.१

१. अरण्यके व उपनिषदे

२. कर्माचा नियम

३. वैष्णवपंथ, शैवपंथ, शक्तीपंथ

४. शक्ती

५. आगमंत, शुद्ध, वीरशैव

### ८.२

१. सहा

२. कपिला

३. पतंजली (योग सूत्र)

४. गौतम

५. मीमांसा विचारधारा

६. वेदांत

७. चार्वाक

८. २४

९. ५९९ ख्रिस्त पूर्व

१0. २४ वा, शेवटचा तीर्थंकर

११. जीव, अजीव, अस्तिक्य, बंध, सामवार, निर्जन, मोक्ष.

### ८.३

१. सिद्धार्थ

२. बौद्धगया इथे पिंपळाच्या झाडाखाली, विहार.

३. बोधगया, विहार.

४. बौद्ध तत्वज्ञान

५. उपालि

६. १. मानवी जीवनात दुःख आहे.

   २. दुःखाला कारण आहे.

   ३. दुःख जाणवते

   ४. मुक्तीचा मार्ग

७. चार्वाक विचारधारा.

# ९

# मध्ययुगीन भारतातील धर्म व तत्वज्ञान

सुफी व भक्ती संताच्या गाण्याचे कार्यक्रम दर महिण्याला कोणत्या ना कोणत्या तरी सभागृहात सादर होत असतात. ह्या गीतांची लोकप्रियता ह्या गीतांना उपस्थित असणाऱ्या लोकांच्या संख्येवरून लक्षात येते. हे कार्यक्रम सरकार, व्यवसाय व व्यक्तीगतरित्या प्रायोजित केलेले असतात. मध्ययुगीन भारतामध्ये सुफी व भक्ती पंथांचा उदय झाला आहे असे दिसून येते. ह्या दोन पंथांमुळे धार्मिक सामंजस्याचा नवीन प्रवाह हिंदू व मुस्लीम धर्मीयांत दिसून येतो आहे. सुफी लोकांचा इस्लाम मधील मुक्तवादी चळवळीवर विश्वास नसून सर्व मानवजात एकच आहे यावरच त्यांचा विश्वास आहे. जाती व्यवस्थेवर ह्या संप्रदायाचा विश्वास नसून सर्व मानवजात एकच आहे यावरच त्यांचा विश्वास आहे. सुफी व भक्ती संतांनी मुसलमान व हिंदू यांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. स्थानिक भाषेचा वापर करून त्यांनी धर्माचा आवाका वाढविला आहे व लोकांपर्यंत पोंहचविला आहे.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- मध्ययुगीन भारतामध्ये सुफी व भक्ती पंथाच्या उदयाची कारणे अभ्यासणे.
- सुफी चळवळीच्या विकासाचा मागोवा घेणे.
- सुफी संप्रदायाच्या प्रमुख चालीरीतींचा अभ्यास करणे.
- सुफी विचारधारेच्या मुख्य विचारांचा अभ्यास करणे.
- भक्ती संप्रदायातील संत कबीर व गुरूनानक यांच्या तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण अभ्यासणे.
- शिख धर्माचा उदय अभ्यासणे.
- वैष्णव संतांच्या विचारधारेचे स्पष्टीकरण पाहणे.
- भारतातील संस्कृतीमध्ये सुफी व भक्ती संप्रदायाचे योगदान अभ्यासणे.







## ९.१ सुफी संप्रदायाची चळवळ ः

### पार्श्वभूमी - इस्लाम धर्माचा उदय ः

प्रेषित महमंद पैंगबराने इस्लाम धर्माची स्थापना केली. इस्लामने अनेक धार्मिक व आध्यात्मिक चळवळी पाहिल्या आहेत. या सर्व चळवळी 'कुरान' या पवित्र ग्रंथाशी संबंधीत आहेत. इस्लाम मध्ये दोन प्रमुख पंथ आहेत शिया व सुन्नी. आपल्या देशात हे दोन पंथ अस्तित्वात आहेत. परंतु अनेक राष्ट्रे उदा. इराण, इराक, पाकिस्तान इ. मध्ये यापैकी एकच पंथ अस्तित्वात आहे.

सुन्नीमध्ये इस्लामच्या चार विचारधारा अस्तित्वात आहेत. या कुराण व हादिस वर आधारित आहेत. सुन्नी या परंपरावादी पंथाला खरे आव्हान प्राप्त झाले ते विवेकी विचार धारेमुळे ज्यांना मुतझिलास् असे म्हणतात. त्यांच्या मते ईश्वर हा केवळ न्याय मानतो व तुमच्या पापाशी त्याला काहीही कर्तव्य नसते. मनुष्य स्वतः स्वतःच्या कृतीबद्दल जबावदार असतो.

मुतझिलास् यांना आशारी विचारधारेचा विरोध होता ही विचारधारा अबुल हसन आशारी यांनी प्रचलित केली. यांच्या मते ईश्वराला ज्ञात असते, तो पाहू शकतो व बोलूही शकतो. कुरान हे अमर आहे. या विचारधारेचा अबू हमीद अल गझली हा प्रवर्तक होता. त्याने सुफी संप्रदाय स्विकारला होता.

गझालीच्या विचारधारेचा प्रभाव जास्त जाणवला राज्यांनी निर्माण केलेल्या शिक्षणपद्धतीमुळे त्यांनी मदरशांची स्थापना केली. आशारी विचारधारा यामध्ये शिकविली जाते. त्यांनी सरकार कसे चालवावे व सुन्नीची परंपरावादी भूमिका मांडली आहे. उलेमा यांनी मध्ययुगीन भारताच्या राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### सुफी संप्रदाय ः

उलेमांच्या विरोधात कृती सुफींची होती. ही सर्व अत्यंत पवित्र मंडळी होती. संपत्तीच्या सार्वजनिक प्रदर्शनाला त्यांचा तीव्र विरोध होता. अनेकांनी सार्वजनिक जीवनातून निवृत्ती पत्करली होती. सुफी संप्रदायांची विचारधारा उलेमांच्या विचारधारेपेक्षा खूप भिन्न होती. मुक्त विचारधारा व स्वातंत्र्य यावर सुफी संप्रदायाचा विश्वास होता. धर्मातील औपचारीक प्रार्थना, अलवचिकता यास या संप्रदायाचा विरोध होता. कालांतराने सुफी संप्रदायाची वेगवेगळया सिलसिलास् मध्ये विभागणी झाली.

सिलसिलास्चे मार्गदर्शक पीर होते. पीर त्यांचा वारस निवडत असत. सुफी संप्रदायाने समास (पवित्र गीते) रचली होती. बसरा (इराक) हा सुफी संप्रदायाचा केंद्रबिंदू होता. इस्लामच्या चौकटीत राहून नवीन धर्मापेक्षा उदारमतवाद निर्माण करण्याकडे या संप्रदायाचा कल होता.

### भारतातील सुफी संप्रदाय ः

बाराव्या व तेराव्या शतकात भारतामध्ये सुफी संप्रदायाचा उदय झाला. यातील प्रमुख अल-हजारी भारतात स्थायीक झाला होता. त्यास दाता गंज बक्ष नावाने ओळखले जात असे. प्रारंभी सुफी संप्रदायाची प्रमुख केंद्रे म्हणजे मुलतान व पंजाब होती. १३व्या आणि १४व्या शतकामध्ये या संप्रदायाचा प्रसार काश्मीर, बिहार, बेंगाल इ. ठिकाणी झाला. भारतामध्ये प्रसार होण्यापूर्वी सुफी संप्रदायाने निश्चित स्वरूप धारण केले होते. सुफी भारतामध्ये अफगाणिस्तानमार्गे आले होते.





भारतीय समाजात त्यांना मान मिळाला कारण त्यांचे समर्पित जीवन आणि मानवतावादी दृष्टीकोन.

अबुल फझल याने आइने अकबरीमध्ये १४ सिलसिलास् बद्दल उल्लेख केला आहे. या सिलसिलास् चे दोन प्रकार पडतात, बा-शारा, बे-शारा, बा-शारा इस्लामचे कायदे मानतो (शरीयत) व नमाझ व रोजावर विश्वास ठेवतो. यातील प्रमुख म्हणजे चिश्ती, सुरावर्दी, फिरदौसी, काद्री व नक्षबंदी बे-शारा ही शरीयतशी बांधीलकी मानीत नाहीत.

### चिश्ती संप्रदाय ः

हेरात या भारतातील शहरात चिश्ती संप्रदायाची स्थापना ख्वाजा मोईबुद्दिन चिश्तीने केली. अजमेर हे त्यांनी आपल्या शिक्षणाचे केंद्र ठेवले मानवाची सेवा ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ सेवा आहे असे त्याचे म्हणणे होते. अजमेर येथे त्यांचे १२३६ मध्ये निधन झाले. मुगलांच्या काळात अजमेर हे महत्त्वाचे धार्मिक केंद्र बनले होते. आजच्या काळात ही लाखो मुस्लीम व हिंदू बांधव या स्थळाला भेट देतात. यावरून त्यांची लोकप्रियता दिसून येते. ख्वाजा चिश्तींच्या अनुयायांमध्ये नागोरच्या शेख हम्मीउद्दिन व कुतुबद्दीन बक्तीयार इ.चा समावेश होतो. शेख हमीनुद्दीन गरीब शेतकरी म्हणून राहत व त्यांनी अल्तमशने दिलेली जहागीर नाकारली होती. सुल्तान अल्तमशने कुतुबमिनार या संताला समर्पीत केला. हरियाना व पंजाबमध्ये चिश्ती संप्रदाय शेख फकरूद्दिन यांनी लोकप्रिय केला. त्यांनी सर्वांना आपल्या संप्रदायाची द्वारे खुली केली. बाबा फरीद म्हणून हिंदू व मुस्लीम धर्मीयांमध्ये त्यांच्याबद्दल आदर होता. त्यांनी पंजाबी भाषेत लिहीलेली कवने आदिग्रंथामध्ये समाविष्ट केली गेली आहेत.

चिश्ती संप्रदायाला दिल्लीमध्ये शेख निजामुद्दिन अवलिया यांनी लोकप्रिय केले आहे. ते १२५९ मध्ये दिल्ली मधे आले होते. आपल्या ६0 वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी सात सुलतानांची कारकीर्द पाहिली. गरीबांमध्ये अन्न व वस्त्रांचे वाटप हे त्यांचे प्रमुख कार्य होते. त्यांच्या अनुयायामध्ये प्रमुख लेखक अमीर खुश्रु चा समावेश होता.

शेख नसरूद्दिन महमंद हा आणखीन महत्वाचा चिश्ती संत होता. त्यास चिराग ए दिल्ली या नावाने ओळखले जात होते.

### सुरावर्दी सिलसिलास् ः

ह्या पंथाची स्थापना शेख शीलाबुद्दिन महमुद यांनी केली आहे. ह्याची मूळ सुरूवात शेख बहादुन झकारीया (११८२-१२६२) ह्यांनी केली. मुलतान येथे त्यांनी याची स्थापना केली ज्याला उच्च राजनितिज्ञ, सरकारी अधिकारी व श्रीमंत व्यापारी भेट देत असत. सुरावर्दी सिलसिलाज् ह्यांनी पंजाब सिंध या ठिकाणी स्थापना केली आहे. ह्या सिलसलाज्च्या शिवाय फिरदौसी, शत्तारी काद्री यांनी देखील सिलसिलाची स्थापना केली.

### सुफी चळवळीचे महत्त्व ः

सुफी संप्रदायाने भारतीय समाजाच्या मुल्यांमध्ये मोठे योगदान दिले आहे. सुफी संप्रदायाने इस्लाम मध्ये उदारीकरणाची भूमिका मांडली. १५ व्या शतकात भक्ती व सुफी संप्रदायाने उदारमतवादी भूमिका घेतली. विश्वव्यापी प्रेमाच्या संदेशाच्या आधारे संत कबीर व गुरू नानक यांनी व्यापक भूमिका मांडली. सर्व समाज व लोक एकच आहेत ही त्यांची भुमिका होती. वेगवेगळया धर्माच्या शिकवणी एकसारख्याच होत्या. या विचारधारेला भारतात लोकप्रियता मिळाली. भारतीय व सुफी योगी (संत) यांच्या परस्परात वैचारीक देवाण घेवाण होत असे. हठयोग तत्वज्ञानाचा ग्रंथ'अमृतकुंडचे







अरेबीक व पर्शियन भाषेमध्ये रूपांतर झाले होते.

सुफी संप्रदायाने समाजातील गरीब आणि निम्नस्तरावरच्या लोकांची सेवा केली. सुल्तान व उलेमा सामान्यांपासून दूर राहत तेंव्हा सुफी संतांनी सामान्य माणसांशी जवळीक साधली होती. सुफी विचारधारेप्रमाणे देवाची सेवा म्हणजे मनुष्याची सेवा होय. निजामुदिन अवलीया गरीबांना दान देत असे त्यासाठी तो धर्म किंवा जातीचा भेद करित नसे. खनकाह (न्यायदरबार) या ठिकाणी आलेल्या प्रत्येकाची गाऱ्हाणी ऐकण्याशिवाय तो आराम करित नसे. तो हिंदू मुस्लीम एकच आहेत असे मानत असे. अमीर खुसरो यांनी म्हटले आहे की जरी हिंदू माझ्या धर्माप्रमाणे नसले तरी मी जे करतो तेच ते करतात यावर माझा विश्वास आहे.

सुफी संप्रदायाने समानता व बंधुत्वाचा संदेश दिला आहे. इस्लाम समानता या तत्वावर भर देत सुफी संत याचे अनुकरण करित असत. उलेमा कुराणाच्या मुळ तत्वापासून दूर जात आहेत असा सुफी संप्रदायाचा विश्वास होता परंपरावादी व उदारमतवादी यांच्यातील हा संघर्ष सोळाव्या, सतराव्या आणि अठराव्या शतकांपर्यंत चालला होता. सुफी संतानी सामाजिक सुधारण आणण्यावरही भर दिला होता.

बहुतेक सुफी संत कवी होते. ते स्थानिक भाषेत लिखाण करित असत. बाबा फरिद यांनी धार्मिक लेखनासाठी पंजाबी भाषेचा पुरस्कार केला. शेख हमीउद्दिन यांनी तत्पूर्वी हिंदी मध्ये लेखन केले आहे. सय्यद गेसू दराज यांनी दख्खनी हिंदी मध्ये लेखन केले आहे. काही सुफी संतांनी बंगाली मध्येही लेखन केले आहे.

यापैकी सर्वात प्रसिद्ध लेखक म्हणजे अमिर खुसरो (१२५२-१३२५) हा निजामुद्दिन अवलियाचा भक्त होता. हिंदुस्तानी असल्याचा त्याला अभिमान होता आणि भारतीय तत्वज्ञान ही आपली परंपरा आहे असा त्याचा विश्वास होता. त्यांनी नवीन शैली लेखनात निर्माण केली त्यास तबाक-ए-हिंदी असे म्हणतात. १५ व्या शतकात हिंदीचा प्रसार झाला आणि कबीराने त्याचा भरपूर वापर केला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ९.१

१. उलेमाज् कोणाला म्हणत ?

उत्तर ______

२. कलाम म्हणजे काय ?

उत्तर ______

३. दाता गंज बक्श कोणाला म्हणतात ?

उत्तर ______

४. आयने अकबरी मध्ये किती सिलसिलाज् आहेत ?

उत्तर

५. ख्वाजा मोहिनुद्दिन चिश्तीचा दर्गा कोठे आहे ?

उत्तर

६. इस्लमिक कायदे दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखले जातात ?

उत्तर

७. चिराग ए दिल्ली कोणाला म्हणतात ?

उत्तर

## ९.३ भक्ती संप्रदायाची चळवळ ः

सातव्या ते बाराव्या शतकात भक्ती संप्रदायाची चळवळ तामिळनाडूत विकसीत झाली. नायनार व अलवार यांच्या भावानात्मक काव्यात जी प्रतिबिंबित होते. त्यांनी स्थानिक भाषेत लेखन केले (प्रामुख्याने तामिळ व तेलुगु) . कालांतराने दक्षिणेतील विचारधारा उत्तरेकडे प्रसारित झाली. संस्कृतलाही नवीन परिमाण लाभले. भागवत पुराण जुन्या प्रौराणिक भाषेत लिहीलेले होते. याच्यात कृष्णाच्या बाल्यावस्थेपासून तारूण्यापर्यंत वर्णन होते. वैष्णव पंथाची चळवळ त्यामुळे वाढीस लागली.

भक्ती संप्रदायाची चळवळ स्थानिक भाषेमध्ये जास्त वेगाने प्रसारित झाली. भक्ती संप्रदायाने स्थानिक भाषेत लेखन केले आहे. संस्कृतमधील लेखनाला त्यांनी सोप्या भाषेत रूपांतरीत केले आहे. ह्याप्रमाणे असे आढळून येते की ज्ञानदेवाचे लेखन मराठीत, कबीर, सुरदास व तुलसीदासांचे हिंदीत, शंकरदेवांचे आसामीमध्ये चैतन्य व चंडीदास यांनी बंगालीत लेखन केले आहे. मिराबाईने हिंदी व राजस्थानीमध्ये लिहीले. याशिवाय काश्मीरी, तेलुगू, कन्नड, ओरिसा, मल्याळम्, मैथिली व गुजराथी भाषेतही विपूल लेखन झाले आहे.

भक्तीमार्गाच्या विचारधारेमध्ये जातींवर विश्वास नव्हता. देवापुढे सर्व समान असा दृष्टीकोन होता. ते सर्व संत वेगवेगळया सामाजिक घटकातून वेगवेगळी पार्श्वभूमी असणारे होते. रामनंद यांचे भक्त हिंदू व मुस्लीम संप्रदायातील होते जे स्वतः ब्राह्मण कुटुंबातून आलेले होते. कबीर विणकर समाजातील गुरू नानक ग्रामिण भागात हिशोब लिहिणाऱ्याच्या कुटुंबीयातील होते. नामदेव शिंपी होता. संतांनी समानतेची शिकवण दिली व जाती व्यवस्था नाकारली व वर्णभेदावर टिका केली. संत केवळ धार्मिक गोष्टीवर आधारित लेखन करित नसत. त्यांनी सामाजिक सुधारणेलाही महत्व दिले आहे. सती प्रथेला, बालविवाहाला विरोध केला महिलांना कीर्तनास प्रवेश देण्यासाठी प्रोत्साहन दिले.







कबीर व गुरूनानक यांचे भक्ती संप्रदायातील योगदान खूप मोठे आहे. त्यांच्या धार्मिक कल्पना हिंदू मुस्लीम धर्मातून घेतलेल्या होत्या. कबीर (१४४०-१५१८) हा ब्राह्मण विधवेचा मुलगा होता. मुसलमान विणकराच्या घरी त्याचे पालनपोषण झाले. ईश्वरा पर्यंत पोहंचण्याचा मार्ग म्हणजे भक्ती आहे यावर त्यांचा विश्वास होता. विश्वनिर्माता एकच आहे यावर त्यांची श्रद्धा होती. त्यांनी देवाला अनेक नावाने संबोधले जसे की, राम, हरि, गोविंदा, अल्ला, रहिम, खुदा याप्रमाणे. त्यामुळे मुसलमान त्यांस सुफी समजत, हिंदू रामभक्त आणि शिखांनी त्यांची गीते आदिग्रंथामध्ये समाविष्ट केली. त्यांची भक्ती व विचारधारा त्यांच्या लेखनातून म्हणजे 'दोहा' यातून प्रतिबिंबीत होते. जर दगडामध्ये देव असेल तर मी सर्वात मोठा दगड म्हणजे पर्वताची पूजा करायला तयार आहे असे कबीर म्हणत असे. दगडी जात्याची पूजा करणे चांगले कारण त्यामुळ पोटभर अन्न मिळते. ही त्याची धारणा होती. धार्मिक साधेपणावर कबीराचा भर होता. भक्तीमार्गात देवापर्यंत जाता येते यावर त्यांचा विश्वास होता. कठिण परिश्रमाशिवाय यश नाही, ईश्वर एकच आहे हे त्यांचे तत्वज्ञान होते.कबीरांच्य कल्पना कोणत्याही धर्माच्या पलिकडच्या होत्या. समाजातील संकुचित वृत्तीला त्यांचा विरोध होता. त्यांची कविता (दोहा) सोप्या भाषेत, प्रभावी पण मांडलेली आहे. दैनंदिन जीवनातील दाखले त्यात दिलेले ओहेत.

गुरूनानक (१४६९-१५३९) यांचा जन्म तळवंडी (नानकसाहिब) इथे झाला. लहानपणापासून त्यांची अध्यात्माकडे ओढ होती. गरिब व गरजूंना ते मदत करित त्यांचे अनुयायी त्यांना शिख म्हणत.

गुरूनानक साधे व शांत स्वभावाचे होते. समाजातील वाईट रूढींच्या ते विरूद्ध होते. सामाजिक क्षेत्रात एक नवीन मार्ग त्यांनी निर्माण केला. महिलांच्या सामाजिक दर्जातील सुधारणेला त्यांनी महत्त्व दिले. स्त्रिया राजांना जन्म देतात त्यांच्याविषयी वाईट बोलू नये. असे ते म्हणत. त्यांची 'वाणी' व इतरांची 'वाणी' (शिख गुरू) गुरूनानक साहिब ग्रंथात समाविष्ट आहे जो शिख धर्मियांचा पवीत्र ग्रंथ आहे.

### वैष्णव चळवळ ः

राम व कृष्णाच्या भक्ती भोवती आधारीत वैष्णव चळवळ तत्कालीन भक्तीमार्गातील महत्वाची चळवळ आहे. राम व कृष्ण यांना विष्णूचे अवतार म्हणतात. त्यांचे मुख्य प्रसारक सुरदास, मिराबाई , तुलसीदास व चैतन्य आहेत. त्यांच्या भक्तीमार्गात कविता, गीते, नृत्य व किर्तनास महत्व होते.

सुरदास (१४८३-१५६३) हा बल्लभाचार्यांचा अनुयायी होता. ते आंधळे होते व गीत रचत. ही सर्व गीते कृष्णाच्या जीवनावर आधारित असत. त्यांच्या काव्याला सुरसागर म्हणत.

कृष्णावरील भक्ती मीराबाईच्या गीतामधूनही ध्वनीत होते. (१५०३-१५७३) बालपणीच ती विधवा झाली होती व तिच्या प्रिय देवाशी तिचे लग्न झाले असे ती आध्यत्मिकरित्या मानीत असे. तिची गीते अत्यंत लोकप्रिय आहेत.

चैतन्यामुळे वैष्णव संप्रदायाची चळवळ पूर्वेकडे प्रसारीत झाली. (१४८९-१५३३) कृष्णाला ते देवाचा सर्वोच्च अवतार मानीत असत. कृष्णाप्रती त्यांची भक्ती त्यांच्या संकीर्तनातून स्पष्ट होते. जे घरी, देवळात व काहीवेळा रस्त्यातही संकीर्तन करत. या संतांनी सामाजिक ऐक्याचा पुरस्कार केला.

रामावरील भक्तीसाठी संत रामानंद (१४००-१४७०) हे प्रसिद्ध आहेत. ते रामाला सर्वोच्चस्थानी

मानीत. त्यांनी भक्ती मार्गात स्त्रिया व इतर जातीतील लोकांना देखील प्रवेश दिला. रामभक्तमधील सर्वात प्रसिद्ध म्हणजे तुलसीदास (१५३२-१६२३) ज्यांनी रामचरीत मानस हे काव्य रचले.

वैष्णव संतांचे तत्वज्ञान हिंदू तत्वज्ञानावर आधारित आहे. मानवतेवर त्यांचा विशेष भर होता.

## ९.४ भक्ती व सुफी संप्रदायाचे महत्व ः

सुफी / भक्ती संप्रदायाने समाजामध्ये नवीन शक्ती, चैतन्य निर्माण केले. त्यांनी समाजात आत्मविश्वास निर्माण केला व नवीन सामाजिक व धार्मिक मूल्ये निर्माण केली कबीर व गुरूनानक यांची नवीन धर्म स्थापनाकरण्याची इच्छा नव्हती परंतु त्यांच्या पश्चात त्यांचे अनुयायी कबीर पंथीय व शीख म्हणून एकत्र आले. भक्ती व सुफी संप्रदायाचे महत्त्व त्यांनी निर्माण केलेल्या नवीन वातावरणावरून स्पष्ट होते. ज्याचा प्रभाव भारताच्या सामाजिक, धार्मिक व राजकिय जीवनावर झालेला आहे. अकबराच्या उदारमतवादी कल्पना या विचारसरणीवर आधारित आहेत. गुरूनानकांची शिकवण पिढयानपिढया आत्मसात केली जात आहेत. यामुळे एक स्वतंत्र धार्मिक समुदाय तयार झाला. त्यांची स्वतंत्र भाषा व लिपी तयार झाली. गुरूमुखी ही त्यांची लिपी असून गुरू ग्रंथ साहिब हा ग्रंथ आहे. उत्तर भारतात राजा रणजीत सिंगच्या रूपाने या संप्रदायाला राजकिय शक्ती मिळाली.

सुफी व भक्ती संप्रदायांच्या वैचारिक देवाणघेवाण प्रक्रियेमुळे भारताच्या समाजव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडला. सुफी संतांनी पर्शियन शब्द वापरण्याऐवजी हिंदी शब्दांचा वापर केला. कृष्ण, राधा, गोपी, जमुना, गंगा या सारख्या शब्दांच्या वापरामुळे सांस्कृतिक वारसा निर्माण झाला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ९.२

१. कोणत्या ग्रंथामुळे वैष्णव चळवळ वाढीस लागली ?

उत्तर ____________________

२. आदिग्रंथ हा कोणत्या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे ?

उत्तर ____________________

३. कबीर व गुरूनानक जनमानसात लोकप्रिय कसे झाले ?

उत्तर ____________________

४. "स्त्रिया राजांना जन्म देतात, त्यांच्या विषयी वाईट बोलू नये." हे कोणी म्हटले?

उत्तर ____________________

५. सुरसागर हा ग्रंथ कोणी लिहिला?

उत्तर ______________________________

## मध्ययुगीन भारतातील तत्वज्ञान ः

- भक्ती संप्रदायातील वल्लभाचार्य, रामानुजम, निंबरका यांनी नवीन विचार मांडले. ते शंकराचार्यांच्या अद्वैत तत्वज्ञानावर आधारित आहेत.
- विश्वअद्वैत म्हणजे एक ईश्वरवादी ह्या तत्वज्ञानाप्रमाणे अंतिम सत्य म्हणजे देव असून प्रकृती व आत्मा हे त्याचे वैशिष्ट्य आहे.
- श्रीकंठाचार्याचे शिवादैवत ः या तत्वज्ञानाप्रमाणे सत्य म्हणजे शिवा व शिवा मध्ये शक्तीचा वास आहे. शिवा विश्वव्यापी आहे.
- माधवाचार्यांचे द्वैत तत्वज्ञान, या तत्वज्ञानाप्रमाणेच जगामध्ये अनेक मतमतांतरे व विरोधाभास आहेत.
- निंबारकाचे द्वैत /अद्वैत – ईश्वराने जग व आत्म्याची निर्मिती केली आहे.
- हे विश्‍व व आत्मा देवापासून भिन्न आहे. त्यांचे अस्तित्व केव देवावरच अवलंबून आहे.
- वल्लभाचार्याचे शुद्धद्वैत – वल्लभाचार्याने वेदांतसुत्र व भगवतगीता या ग्रंथावर टीका लिहील्या. त्यांच्या मते ब्रह्म (देव) हा श्रीकृष्ण आहे. त्याने स्वतःला आत्मा आणि विश्वमध्ये रूपांतर केले आहे. देव व आत्मा एकच आहेत. त्यांच्या तत्वज्ञानाला पृष्टीमार्ग नावाने ओळखले जाऊ लागले आणि या पंथाला रूद्रसंप्रदाय म्हणून ओळखले जाऊ लागले.

## तुम्ही काय शिकलात?

- भक्ती व सुफी संप्रदाय या हिंदू व इस्लाममधील उदारमतवादी चळवळी होत्या. या चळवळीमध्ये मानव आणि देव यामधील संबंधांवर विशेष भर होता.
- सुफी चळवळ विश्वव्यापी प्रेम व बंधूताचा संदेश देते.
- नयनार व अलवार यांच्या मार्फत भक्ती संप्रदाय दक्षिणेकडे प्रसारीत झाला.
- भक्ती संतांचे निर्गुण व सगुण असे दोन प्रकार आहेत.
- सगुण अनुयायांच्या मताप्रमाणे देवाला निश्चित आकार आहे. उदा.राम व कृष्ण.
- भक्ती व सुफी संतांनी मध्ययुगीन भारतीय समाजाच्या विकासात मोठे योगदान दिले आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. इस्लाममध्ये सुफी चळवळ कशी विकसीत झाली ?

२. चिश्ती व सुरावर्दी संप्रदाय एकमेकांपासून भिन्न कसे आहेत ?

३. भक्ती व सुफी संत एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे विधान स्पष्ट करा.

४. गुरूनानक व कबीरातील साम्य कोणते ?

५. वैष्णववादी चळवळीवर थोडक्यात टिप लिहा.

## प्रश्नांची उत्तरे

### ९.१

१. परंपरावादी सुन्नी विचारधारा जपणारे विद्वान.

२. इस्लाम धर्माची परंपरावादी विचारसरणी.

३. अल-हुजवारी

४. चौदा

५. शरियत

६. अजमेर

७. शेख नसरूद्दिन महमूद

### ९.२

१. भागवत पुराण

२. शिखधर्म

३. या कल्पना हिंदू /इस्लाम धर्मातून घेतल्या आहेत. तसेच त्यांची भाषाही सोपी होती.

४. गुरूनानक

५. सुरदास

# १०

# आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी

सध्याच्यायुगात आपण नशीबवान आहोत. कारण आपणावर कोणत्याही परकीय राज्यर्त्यांचा वरचष्मा नाही. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतीय समाजात जातींचे प्रावल्य होते. मानवी मूल्यांना त्यामध्ये फारशी किंमत नव्हती. त्यासाठी सामाजिक बदलाची गरज होती. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी इंग्रजी भाषेचा प्रचार व प्रसार सुरू केला. ह्याद्वारे मुक्त संचार, आर्थिक व सामाजिक समानता, लोकशाही व न्याय्यव्यवस्था ही तत्वे रूजू करण्यात आली. याचा भारतीय समाजावर खोलवर परिणाम झाला . सुदैवाने आपल्या देशात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर, दयानंद सरस्वती यासारखे अनेक सुधारक झाले ज्यामुळे आपण पश्चिमेकडील आव्हानांना तोंड देवू शकलो.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- काही समान धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींचे साम्य ज्ञात होणे.
- धार्मिक सुधारणांमध्ये राजा राममोहन रॉय व ब्राह्मो समाजाची भूमिका व योगदान.
- धार्मिक व सामाजिक सुधारणांमध्ये प्रार्थना समाजाची भूमिका.
- आर्यसमाजाची तात्विक बैठक अभ्यासणे.
- १९ व्या शतकात रामकृष्ण मिशनचे सामाजिक जागृतीमधील योगदान.
- थियोसॉफिल सोसायटीची भूमिका अभ्यासणे.
- अलिगड चळवळीचे योगदान अभ्यासून मुस्लीम धर्मातील सांस्कृतिक व शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करणे.
- शिख व पारसी यांनी आपल्या समाजासाठी केलेल्या कामाचे योगदान पाहणे.

## १०.१ आर्थिक व सामाजिक सुधारणांची चळवळींची साम्यस्थळे ः

१९ व्या शतकापासून युरोपियन व भारतीय विद्वानांनी प्राचीन भारताचा इतिहास, तत्वज्ञान, शास्त्र, धर्म व साहित्याचा अभ्यास सुरू केला. यामुळे भारतीय संस्कृतीचा अभिमान वाटावा अशी ती असल्याचे अभ्यासातून दिसून आले. सामाजिक चळवळीतील बहुतेक चळवळी धार्मिक स्वरूपाच्या होत्या. या सामाजिक सुधारणा जातीनिर्मुलन, अस्पृश्यता दूर करणे, सतीची चाल नष्ट करणे, बालविवाहाविरूद्ध जनजागृती, सामाजिक समता व न्याय यावर आधारीत होत्या. यापैकी काही चळवळींना ब्रिटीशांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले. कायद्याच्या स्वरूपात ब्रिटीशांनी यापैकी काही चळवळींना सहकार्य केले आहे.

## १०.२ ब्राह्मो समाज व राजा राममोहन रॉय ः

आज स्त्रीपुरूषांना स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. परंतु याचे कारण म्हणजे काही समाजसुधारकांचे योगदान आहे. यापैकी राजा राममोहन रॉय यांचे योगदान विशेष अभ्यासण्यासारखे आहे. त्यांच्या विचारांमध्ये पूर्व पश्चिम यांचा वैचारिक संयोग झाला होता. राजा राममोहन हे उत्तम साहित्यिक व भारतीय संस्कृतीचे जाणकार होते. त्यांनी ख्रिश्चन व इस्लाम धर्माचाही अभ्यास केला.

हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती विरूद्ध त्यांनी मत प्रदर्शन केले. मुर्तीपूजा, बलीप्रथा व अन्य अनिष्ट चालीरीती विरूद्ध लढा दिला. त्यांनी १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. धार्मिक सुधारणांमध्ये ब्राह्मो समाजाचे योगदान मोठे आहे. अन्य धर्मिय लोकांवर टीका करणे त्यांनी टाळले. माणसाने सत्याची कास धरावी ही त्यांची भूमिका होती.

राजा राममोहन रॉय केवळ धार्मिक नव्हे तर समाज सुधारकही होते. हिंदू समाजात स्त्रियांना कनिष्ठ दर्जा दिल्यामुळे सतीची चाल रूढ झाली होती. अनेक वर्ष त्यांनी सतीच्या चालीविरूद्ध लढा दिला. १८१८ मध्ये त्यांनी सतीच्या चालीविरूद्ध जनमत घेण्याचे ठरवले. त्यांनी कलकत्त्याच्या स्मशानघाटावर जावून विधवेच्या नातेवाईकांना सती विरूद्ध प्रवृत्त केले. परंपरावादी हिंदूनी त्यांना विरोध केला.

राजा राममोहन रॉय यांनी जातीप्रथाविरूद्धही तीव्र लढा दिला. त्यांनी सातत्याने जाती पद्धती विरूद्ध लिखाण व भाषणे केली. त्यांनी बंगाली व इंग्रजीत लिखाण केले. ईश्वर एकच आहे असे त्यांचे म्हणणे होते. ते इंग्रजी शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यांना पर्शियन भाषाही अवगत होती. त्यांचे मुक्त व विवेकपूर्ण विचार त्यांच्या भाषेत त्यांनी मांडले आहेत. त्यांनी बहुपत्नीत्वाच्या चालीलाही विरोध केला. महिलांना मालमत्तेमध्ये हिस्सा मिळावा म्हणून त्यांनी लढा दिला. त्यांनी विधवा विवाहाचे समर्थन केले.

आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. सर्वांसाठी ह्या समाजाची दारे खुली होती. स्वतंत्र धर्म म्हणून जरी याची स्थापना झालेली नसली तरीसुद्धा जे एकाच ईश्वराला मानतात त्यांच्यासाठी हा समाज होता. प्रतीमा पूजन व बळी इथे मान्य नव्हते.

देवेन्द्रनाथ टागोर (१८१७–१९०५) जे द्वारकानाथ टागोरांचे चिरंजीव होते त्यांनी राजा राममोहन रॉय

नंतर या ब्राह्मो समाजांची सूत्रे हाती घेतली. टागोरांनंतर कौस्तुभचंद्र सेन (१८३८-१८८४) यांनी ब्राह्मो समाजाची सूत्रे हाती घेतली. याचा प्रामुख्याने बुद्धीवंत, सामाजिक व राजकिय जीवनावर प्रभाव पडला आहे.

## १०.३ प्रार्थनासमाज व रानडे ः

प्रार्थना समाजाची स्थापना डॉ.आत्माराम पांडूरंग (१८२५-१८९८) यांनी मुंबई येथे १८७६ मध्ये केली. याचा उद्देश विवेकपूर्ण आराधना व सामाजिक सुधारणा असा होता. याचे दोन प्रमुख आधारस्तंभ म्हणजे आर.सी.भांडारकर व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे. विधवा विवाहाचे त्यांनी समर्थन केले.

महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१) ह्यांनी आपले संपूर्ण आयुष्य प्रार्थना समाजाला अर्पित केले. त्यांनी विधवा विवाहासाठी संस्था स्थापन केली. (१८६१) त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.त्यांनी पुणे सार्वजनिक सभेचीही स्थापना केली. धार्मिक सुधारणा सामाजिक सुधारणांपासून अलग करता येत नाही असे रानडेंचे मत होते. कर्मठ धार्मिक भावनांमुळे सामाजिक, आर्थिक व राजकिय क्षेत्रात यश येणे कठीण आहे असे रानडे यांचे मत होते.

प्रार्थना समाजावर ब्राह्मो समाजाच्या विचारांचा पगडा असला तरीही त्यांनी प्रतिमा पूजनास विरोध केला नाही. त्यांनी जात व्यवस्था निर्मुलनाची हाक दिली आहे. वेद म्हणजे अंतिम सत्य ही कल्पना रानडेंना मान्य नव्हती. ते पुर्नजन्म व आत्मा यावर विश्वास ठेवत नसत.

## १०.४ डेरोझिओ व बंगाल चळवळ ः

स्कॉटलंडमधील हेन्री लूई डेरोझिओ हे कलकत्ता यामधील हिंदू कॉलेजात प्राध्यापक होते. त्यांनी कलकत्ता येथे घड्याळ विक्री व्यवसाय सुरू केला होता. परंतु नंतर त्यांनी शिक्षणप्रसार हेच ध्येय ठेवले. डेरोझिओ यांनी आपले विचार व कल्पनांचा प्रसार आपल्या अध्यापनातून तसेच साहित्य, तत्वज्ञान, इतिहास व शास्त्र यासाठीच्या संघांची स्थापना करून त्याद्वारे केला. डेरोझिओ व त्यांचे प्रसिद्ध अनुयायी डेरझियन्स नावाने ओळखले जात जे ज्वलंत राष्ट्रभक्त होते. त्यांनी फ्रेंच क्रांतीचे स्वागत केले व ब्रिटनच्या मुक्त विचारांचेही स्वागत केले. डेरोझिओ यांचे वयाच्या २२व्या वर्षी कॉलऱ्याने निधन झाले.

यंग बंगाल चळवळ डेरोझिओच्या निधनानंतरही चालू राहिली. नेतृत्वाच्या अभाव असतानासुद्धा या समूहाचे सदस्य विचार प्रसार चालूच ठेवीत होते.

### ईश्वरचंद्र विद्यासागर ः

बंगालचे दुसरे नावाजलेले सुधारक म्हणजे ईश्वरचंद विद्यासागर होत.(१८२०-१८९१) अत्यंत बुद्धीमान असलेले विद्यासागर स्त्रियांच्या शोषणाविरूद्ध व त्यांच्या शिक्षणासाठी विचार मांडीत असत. १८५६ मध्ये विद्यासागर यांच्या प्रयत्नाने विधवा विवाहातील अडथळा दूर होवून त्यास मान्यता मिळाली. त्यांनी मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. आणि मुलींसाठी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. धार्मिक प्रश्नाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले नाही. जे धर्माच्या नावावर सुधारणांना विरोध करित असत. त्यांच्या विरोधात ते होते.

## १०.५ पश्चिम व दक्षिण भारतातील सुधारणांचा प्रसार :

मुंबईमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी सुधारणा चळवळ चालवली. ब्राह्मण्यवादी विचारसरणीतील विरोधाभासांवर त्यांनी टीका केली. व खऱ्या हिंदु धर्माचा प्रसार केला.

१८४९ मधे पुण्यात परमहंस मंडळाची स्थापना झाली. तसेच सातारा व अन्य शहरातही या मंडळाची स्थापना केली. त्यांनी जाती व्यवस्थेला विरोध केला. त्यांचा ईश्वरावर विश्वास होता. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी सहकार्य केले व विधवा विवाहाला मान्यता दिली. सामाजिक सुधरणांशिवाय राजकीय व धार्मिक विकास व प्रगती शक्य नसल्याचे रानडेंचे मत होते. हिंदू मुस्लिम ऐक्याचे ते पुरस्कर्ते होते.

पश्चिम भारतात अन्य दोन सुधारकांचे योगदान महत्त्वाचे आहे ते म्हणजे गोपाळ हरि देशमुख (लोकहितवादी) आणि जोतीराव गोविंदराव फुले ज्यांना जोतिबा म्हणून ओळखले जाते. त्यांनी स्त्रियांच्या प्रगतीसाठी व समाजातील तळागळातील लोकांच्या विकासासाठी प्रयत्न केले. १८५७ मध्ये जोतिबांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांच्या मदतीने मुलींसाठी शाळा काढली. विधवा विवाहाच्या महाराष्ट्रातील चळवळीचे प्रणेते म्हणून जोतिबांकडे पाहिले जाते. जोतिबांच्या कामकाजाने प्रभावित होवून त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली गेली. १८७३ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

भारताच्या दक्षिण भागात (आंध्र) कंडुकूरी विरसलिंगम (१८४८-१९१९) यांनी विधवा विवाह व स्त्रियांच्या शिक्षणासाठी काम केले. वेद सरनाज यांनी मद्रास येथे १८६४ मध्ये विधवा विवाहासाठी व स्त्रियांच्या शिक्षणासाठी भरीव काम केले. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्यांनी काम केले. वेद समाजाचे प्रसिद्ध विचारवंत म्हणजे चेमंवती श्रीधरलू नायडू होत. त्यांनी वेद समाजाची पुस्तके तमिळ व तेलगू रूपांतरित केली.

केरळात मागासवर्गीय व भारतीय समाजातील उपेक्षीत समाजासाठी श्री नारायणा गुरू (१८५८-१९२८) यांनी या काळात काम केले. १९03 मध्ये त्यांनी श्री नारायण धर्म परिपालन योगम् (SNDP) ही संस्था स्थापन केली. त्याचा उद्देश सामाजिक सुधारणा करणे हा होता. जातीवर आधारीत भेदभाव नारायण गुरू यांनी मान्य नव्हता. म्हणून ते 'एक जात, एक धर्म व एक ईश्वर' याचा प्रसार करित असत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १०.१

१. ब्राह्मो समाज स्थापनेमागची पार्श्वभूमी सांगा.

उत्तर

२. ब्राह्मो समाजाची तत्त्वे कोणती होती ?

उत्तर

३. सामाजिक भेदभाव कमी करण्यामध्ये प्रार्थना समाजाची कशी मदत झाली ?

उत्तर ___

४. महादेव गोविंद रानडे कोण होते ?

उत्तर ___

## १०.६ स्वामी दयानंद सरस्वती (१८२४-१८८३) व आर्य समाज :

आर्यसमाजाच्या सभांना आपण कधी गेला होतात का ?

आर्यसमाजच्या सभांना महिलांची उपस्थिती लक्षणिय असते. ते यज्ञ करित असत. आर्यसमाजाला महत्त्वाचे योगदान दिले ते म्हणजे मुळ शंकर यांनी. धार्मिक सुधारणावादी मुळ शंकर गुजराथचे होते. कालांतराने त्यांना दयानंद सरस्वती नावाने ओळखले जावू लागले. (१८२४-१८८३) त्यांनी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली.

उत्तर भारतामध्ये अत्यंत प्रभावशाली अशी धार्मिक व सामाजिक सुधारणांची चळवळ दयानंद सरस्वती यांनी सुरू केली. वेदांच्या माध्यमातून ईश्वरी ज्ञानाचा बोध होतो अशी त्यांची शिकवण होती. जाती व्यवस्थेला त्यांचा विरोध होता. त्यांनी पाश्चिमात्य शास्त्राच्या अध्यापन विषयक बाबींचा पुरूस्कार केला. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने त्यांनी भारतभ्रमण केले व १८७५ मध्ये आर्य समाजाची मुंबईत स्थापना केली.

शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी शाळा, महाविद्यालयाची स्थापना केली. यापैकी प्रमुख म्हणजे दयानंद अंग्लो-वेदिक स्कूल ऑफ लाहोर, ज्याचे नंतर प्रिमियर कॉलेज ऑफ पंजाब मध्ये रूपांतर झाले. आधुनिक तत्वांच्या आधारे या संस्थांमधून इंग्रजी व हिंदीत अध्यापन /अध्ययन केले जात असे.या क्षेत्रात लाला हंसराज यांनी खूप योगदान दिले आहे. १९०२ मध्ये स्वामी श्रद्धानंद यांनी हरिद्वारजवळ गुरूकुलाची स्थापना केली. गुरूकुल प्राचीन आश्रमाचीच प्रतिकृती होती.

आर्य समाजाने आत्मसन्मान रूजवण्याचा प्रयत्न केला व देशबांधव स्वावलंबी बनवण्यासाठीचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांचा आणखी एक उद्देश म्हणजे हिंदूचे धर्मांतर थांबवणे हा होता. त्याचप्रमाणे या समाजाच्या माध्यमातून पूर्वी ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मात धर्मांतरीत झालेल्या हिंदूचे पुन्हा धर्मात आणून शुद्धीकरण करण्याचे धोरण व योजना आर्य समाजाकडून राबविण्यात आल्या.

## १०.७ रामकृष्ण मिशन व स्वामी विवेकानंद :

गदाधर चटोपाध्याय (१८३६-८६) हा एक गरीब ब्राह्मण होता ज्याला कालांतराने रामकृष्ण परमहंस म्हणून ओळखले जावू लागले. तत्वज्ञान व शास्त्रात त्यांचे कोणतेही औपचारिक शिक्षण झाले नव्हते. त्यांनी आपले जीवन ईश्वराला अर्पण केले. त्यांचा असा विश्वास होता की ईश्वरापर्यंत पोहचण्याचे अनेक मार्ग असून मनुष्याची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा आहे. मानवधर्माला त्यांनी विशेष महत्त्व दिले.

## आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी

नरेंद्रनाथ दत्त (१८६३-१९०२) ज्यांना सर्वजण विवेकानंद म्हणून ओळखतात हे रामकृष्णांचे प्रसिद्ध शिष्य होते. त्यांनी रामकृष्ण परमहंसाचा संदेश जगभर प्रसारित केला. (प्रामुख्याने अमेरिका व युरोपमध्ये.)

भारताच्या प्राचीन परंपरांचा विवेकानंदांना अभिमान होता. मात्र समाजाला नाकारून जगणे शक्य होणार नाही. असे त्यांचे मत होते. त्यांनी जाती व्यवस्थेवर प्रहार केला. त्यांनी समानतेचा पुरस्कार केला.

विवेकानंद प्रखर राष्ट्रनिष्ठ होते. भारतीय संस्कृतीवर त्यांचा गाढा विश्वास होता.

सर्व धर्माच्या अस्तित्वावर रामकृष्ण परमहंसांप्रमाणेच विवेकानंदांचाही विश्वास होता. प्रामुख्याने विवेकी विचारधारा म्हणून त्यांनी वेदांचा पुरस्कार केला.

बहुजनांचा उद्धार हा विवेकानंदाचा मंत्र व तत्व होते. गरीब ब अतिगरिबांना उद्धारासाठी मदत करणे हा सर्वोच्च धर्म आहे, असे ते मानीत. त्यांनी १८९७ मध्ये रामकृष्ण मिशनची स्थापना केली. दुष्काळ, महापूर व साथीच्या आजारात या संस्थेने खूप मोठे योगदान दिले. या मिशन तर्फे अनेक शाळा, इस्पितळे, अनाथालये चालविली जातात.

१८९३ मध्ये अमेरीकेतील शिकागो येथे त्यांनी जागतिक धर्म परिषदेत भाग घेतला. त्यांनी वेद हा सर्वांचा धर्म आहे केवळ भारतीयांचा नाही याचे प्रतिपादन केले. त्यांचे शिकोगातील भाषण अत्यंत प्रभावी झाले. भारतीय संस्कृतीला त्यांनी शिकागोमध्ये मोठा सन्मान मिळवून दिला. राष्ट्रीय जीवनाला सुधारण्याकामी या मिशनने खूप योगदान दिले.

गरीबी व हलाखीच्या परिस्थितीविषयी विवेकानंदांना अत्यंत आपुलकी होती व बहुजनांना दुर्लक्षणे पाप आहे असे ते मानीत. ते असे म्हणत की, 'आपल्या अधःपतन व दारिद्र्याला आपण स्वतः जबावदार आहोत.' रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून अनेक सेवाभावी कार्यकर्ते निर्माण झाले आहेत.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १०.२

१. आर्य समाजाची स्थापना कोणी केली ?

उत्तर ______________________

२. पहिले दयानंद अंग्लो-वेदीक महाविद्यालय कोठे स्थापन झाले ?

उत्तर ______________________

३. गंगाधर चटोपाध्याय यांच्या मते ध्येय कसे प्राप्त करता येईल ?

उत्तर ______________________

४. स्वामी विवेकानंदाचे मूळ नाव काय होते ?

उत्तर ______________________________

५. स्वामी विवेकानंदांच्या मते सर्वोच्च धर्म कोणता आहे ?

उत्तर ______________________________

## १०.८ थिऑसोफीकल सोसायटी व ॲनी बंझेट :

आधुनिक भारताच्या जडनघडणीत थिऑसोफिकल सोसायटीने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. (प्रामुख्याने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात.) अमेरिकेत १८७५ मध्ये ह्या संस्थेची स्थापना रशियन विदुषी एच.पी. ब्लावस्टकी यांनी केली. त्याचा उद्देश प्राचीन धर्माचा अभ्यास करणे असा होता.

भारतात या सोसायटीचा प्रवेश १८७९ मध्ये झाला. त्याचे मुख्य कार्यालय मद्रास जवळील अडयार येथे होते. त्याचा प्रसार प्रामुख्याने ॲनी बेझंट यांच्या कार्यामुळे झाला. १८९३ पासून त्यांनी कार्य आरंभ केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी प्राचीन हिंदू, झोरो व बुद्ध धर्माच्या पुर्नवांधणी व सक्षमीकरणासाठी चळवळ उभारली. विश्व बंधूभावावर त्यांनी विशेष भर दिला. शिक्षणावर त्यांचा विशेष भर होता. ॲनी बेंझट यांच्या सुधारणावादी चळवळीला पाश्चिमात्य विद्वानांचा पाठिंबा होता.यामुळे भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

शिक्षणक्षेत्रातील ॲनी बेझंट यांचे योगदान विशेष महत्वाचे आहे. त्यांनी बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. नंतर त्यांनी ते कॉलेज मदनमोहन मालवीय यांना हस्तांतरीत केले. जरी थिऑसोफिकल सोसायटीला फार लोकप्रियता लाभली नाही तरी त्यांचे भारतीयांसाठीचे कार्य उल्लेखनिय आहे.

भारतातील नागरीकांत राष्ट्रीय भावना जागविण्याचे काम ॲनी बेंझट यांनी केले आहे. अड्यार येथील या संस्थेचे मुख्य कार्यालय ज्ञानाचे केंद्र बनले जेथे दुर्मिळ संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत.

सोसायटीने अस्पृश्यतेविरूद्ध लढा दिला आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी आपल्या कार्याचे वर्णन करताना म्हटले आहे की भारतातील काम हे प्रथम पुर्नवांधणी, सक्षमीकरण व प्राचीन धर्माला उद्धारणे आहे. यामुळे आत्मसंन्मान निर्माण झाला, प्राचीन काळातील भारतीय संस्कृतीला प्रतिष्ठा लाभली, उज्ज्वल भविष्याची आशा निर्माण झाली. त्यामुळे राष्ट्रभक्ती निर्माण झाली. त्यामुळे देशाच्या पुर्नबांधणीला वेग आला.

ॲनी बेझंट यांच्या अनेक कार्यात महत्वाचे कार्य म्हणजे सेंट्रल हिंदू स्कूलची स्थापना करणे आहे. ॲनी बेझंट यांनी भारताला आपले घर मानले. त्यांनी भारतीय राजकारणात महत्वाचे योगदान दिले. भारतीय लोकांच्या गरजा राष्ट्रभक्तीची चेतना निर्माण करणे आहे व शिक्षण या आहेत.ॲनी बेझंट यांनी नेहमीच भारताला स्वातंत्र्याची तरफदारी केली. त्यांनी १९१६ मध्ये होमरूल चळवळ सुरू केली.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या भारतात अनेक शाखा आहेत. थियॉसोफिस्ट हे त्यांचे मासिक मोठया

प्रमाणावर वाचले जाते. सामाजिक व धार्मिक सुधारणांमध्ये सोसायटीने योगदान दिले. प्रामुख्याने दक्षिण भारतात त्यांचे काम होते. सोसायटीने केलेल्या बहुतेक कार्यावर ॲनी बेंझट यांचा प्रभाव होता.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १०.३

१. स्थिऑसोफीकल सोसायटीची स्थापना कोठे झाली ?

उत्तर

२. थिऑसोफीक सोसायटी कोणी स्थापन केली ?

उत्तर

३. थिऑसोफिक सोसायटीचे मुख्य कार्यालय कोठे होते ?

उत्तर

४. १९१६ मध्ये होमरूल चळवळ कोणी सुरू केली ?

उत्तर

## १०.९ अलिगढ चळवळ आणि सय्यद अहमद खान ः

हिंदू धार्मिक सुधारणावादी चळवळीप्रमाणेच इस्लाम धर्माच्या सुधारणांसाठीही चळवळी झाल्या. मुस्लीमांतील वरिष्ठवर्गाने पाश्चिमात्य शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. १८५७ च्या बंडानंतर धार्मिक आधुनिक प्रवाह निर्माण झाला. १८६३ मध्ये कलकत्ता येथे नवाब अब्दुल लतिफ यांनी महमुदीयन लिटररी सोसायटीची स्थापना केली. आधुनिक तत्वांच्या आधारे त्यांनी धर्म, समाज व राजकीय प्रश्नांवर चर्चा केली. त्यांनी पाश्चिमात्य शिक्षण घेण्यास मुस्लीम धर्मियांना प्रोत्साहन दिले. मुस्लीम एकतेसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. मुस्लीम समाज चिस्ती सुफी संतांच्या कार्याने प्रभावित झाला. दुसरी चळवळ दिल्लीच्या शाहवलीउल्लाह यांच्याशी संबंधीत आहे. त्यांनी परंपरागत धार्मिक चालीरीती, रूढी, परंपरांना विरोध केला. लखनो येथील फिरंगी महाल शिक्षणसंस्थेत शाहवलीअल्लाह यांच्या शैक्षणिक व तत्वज्ञान विषयक संकल्पनाचा समावेश केला. बंगालचे शरीतउल्ला हे बंगालच्या फैराझी चळवळीचे प्रणेते होते.

उत्तरप्रदेशातील रायबरेली येथील सय्यद अहमद हे मुस्लीम सुधारक होते. त्यांनी मुस्लीम कलाकुसर कामगारांकडे लक्ष दिले. मुसलमानांनी ब्रिटीश साम्राज्यातील बदलाच्या प्रवाहाला जर आत्मसात केले नाही तर सर्व नवीन संधीना ते मुकतील. असे त्यांचे मत होते. आधुनिक शास्त्रीय विचारधारेनी त्यांना प्रभावित केले होते. त्या विचारांना इस्लामशी सुधारणेकरीता जोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

त्यांनी कुराण शास्त्र व विवेकाच्या आधारावर स्पष्ट करून सांगितले. त्यांनी विचार स्वातंत्र्यावर भर दिला. त्यांनी लोकांना सहिष्णुतेची शिकवण दिली. १८८३ मध्ये ते म्हणाले, "हिंदू व मुस्लीम आपण दोघेही भारतातील हवेवर जगतो, इथल्या गंगायमुना नदीचे पाणी पितो, या भूमिवरचे अन्न खातो, आपण देशाच्या विकासासाठी योगदान दिले पाहिजे. परस्परांत सहानुभुती, प्रेम, यांची वाढ केली पाहिजे. आपल्या देशाचे भवितव्य आपल्या एकीवर, परस्पर प्रेमावर अवलंबुन आहे. परस्परविरोध व कलह आपल्याला नष्ट करतील."

सय्यद अहमदखान यांच्या मते एकांगी, स्वतंत्र विचार मुस्लीम धर्माच्या प्रगतीच्या आड येणारे आहेत. बाह्य जगाच्यासाठी संपर्क महत्वाचा आहे. ब्रिटीशांचे शत्रुत्व व मुस्लीमांप्रती कडवेपणा कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

मुस्लीमांचे धार्मिक व सामाजिक जीवन केवळ आधुनिक पाश्चिमात्य शिक्षणामुळे सुधारू शकले यावर त्यांनी भर दिला. म्हणून आधुनिक शिक्षणाचा प्रसार हे प्रथम कार्य आहे. एक अधिकारी म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी शाळा स्थापन केल्या. त्यांनी अनेक पाश्चिमात्य पुस्तकांचे उर्दुत भाषांतर केले. अलिगढ येथे १८७५ मध्ये त्यांनी महमुद्दीन अंग्लो ओरिएंटल कॉलेज स्थापन केले. हे ठिकाण पाश्चिमात्य संस्कृतीचे केंद्र बनले. नंतर या कॉलेजचे रूपांतर अलिगढ मुस्लीम विद्यापिठात झाले.

सय्यद अहमद खान यांनी मुक्त, सामाजिक व सांस्कृतिक चळवळ उभारली त्यास अलिगढ चळवळ म्हणतात. अंग्लो ओरिएंटल कॉलेज त्याचे केंद्र होते. त्यांनी मुस्लीमांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ह्या केंद्राची स्थापना केली. भारतीय मुसलमानांसाठी ते शैक्षणिक केंद्र बनले.

अलिगढ चळवळ मुसलमानांच्या उद्धारासाठी महत्वाची ठरली. भारतातील अनेक ठिकाणी विखुरलेल्या मुसलमानांसाठी एक महत्वपूर्ण चळवळ म्हणजे अलिगढ चळवळ आहे. त्यांनी सर्वात एक समान संकल्पना व समान भाषा दिली ती म्हणजे उर्दू. मुस्लीम प्रेसचाही विकास या ठिकाणी झाला. ज्यामुळे उर्दू साहित्य लिखाण संकलन करणे छापणे शक्य झाले. सय्यद अहमद यांनी सामाजिक क्षेत्रातही योगदान दिले. त्यांनी सामाजिक सुधारणांसाठी काम केले. त्यांनी स्त्रियांनी शिक्षण घ्यावे यासाठी प्रयत्न केले. बुरख्याला त्यांनी विरोध केला.

मुसलमानांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी इतर अनेक सामाजिक धार्मिक चळवळी उभारल्या गेल्या. १८९९ मध्ये मिर्झा गुलाम अहमद यांनी अहमदिया चळवळ उभारली. या चळवळी अंतर्गत देशभरात अनेक शाळा, कॉलेजास स्थापन झाली. त्यांच्यामार्फत आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला.

भारतामधील एक महान कवी महमंद इक्बाल (१८७६-१९३८) यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून तत्वज्ञान व धार्मिक विचार सरणीवर प्रभाव टाकला. त्यांच्या मुसलमान व हिंदू तरूणांवर विशेष प्रभाव होता. ते मानवतावादी होते.

## १०.१० पारशी समुदायातील सुधारणावादी चळवळ ः

१९ व्या शतकाच्या मध्ये मुंबई येथे पारशी लोकांच्या धार्मिक सुधारणा चळवळीला प्रारंभ झाला. नवरोजी फुरदोनजी, दादाभाई नवरोजी, एसएस बंगाली यांनी १८५१ मध्ये रेहनुमाई माझ दयासन, सभा किंवा धार्मिक सुधारणा संस्था स्थापन केली. त्यांनी रास्त गोफ्तार हे मासिक सामाजिक व धार्मि

## आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी

क सुधारणांचा प्रसार करण्यासाठी प्रकाशित केले. मुलींमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी विशेष काम केले. कालांतराने पारशी धर्मिय पाश्चीमात्य विचारसरणीचा सर्वात जास्त पगडा असणारा समाज ठरला.

### १०.११ शीख धर्मियांमधील धार्मिक सुधारणा ः

१९ व्या शतकाच्या अखेरीला ज्यावेळी अमृतसर येथे खालसा कॉलेजची स्थापना झाली तेंव्हा शीख धार्मिक सुधारणांना सुरूवात झाली. १८९२ मधे सिंग सभा व ब्रिटीशांच्या पाठिंब्याने खालसा कॉलेजची स्थापना झाली.

१९२० नंतर अकाली चळवळीमुळे शीख धार्मिक सुधारणांना गती मिळाली. गुरूद्वाराच्या व्यवस्थापनात सुधारणा करणे. यामागचा प्रमुख उद्देश होता. तोपर्यंत गुरूद्वारा ही महंत खाजगी मालमत्ता समजत असत. १९२५ मध्य कायदा करून गुरूद्वारांचे व्यवस्थापन, शिरोमणी गुरूद्वारा प्रबंधक समितीकडे वर्ग करण्यात आले.

### आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी ः

ब्रिटीशांना समाजातील परंपरावादी उच्चवर्णीयांना आपलेसे करून घ्यायचे होते. म्हणून त्यांनी केवळ दोन प्रमुख कायदे केले होते. त्यांनी कायदेशीर उपाययोजनांच्या माध्यमातून स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य केले. उदा.सतीची प्रथा बेकायदेशीर ठरविली गेली (१८२९). १८५६ मध्ये कायद्याने विधवा विवाहाला मान्यता दिली. १८६० मध्ये मुलींच्या विवाहाचे वय १० वर्षे ठरविण्यात आले.

१८७२ मधे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाला मान्यता देण्यात आली. बालविवाहाल प्रतिबंध करणारा कायदा झाला. याप्रमाणे १४ वर्षाखालील मुलीचे व १८ वर्षाखालील मुलाचे लग्न बेकायदेशीर ठरले. १९१९ नंतर विसाव्या शतकात भारतीय राष्ट्रीय चळवळ सामाजिक सुधारणांसाठी प्रभावी ठरली. १९३० पासून सामाजिक सुधारणांसाठी कादंबरी, नाटके, कविता व सिनेमांच्या माध्यमातून जनजागृती झाली.

अनेक सुधारणावादी नेत्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाह, बुरखाप्रथा इत्यादीसाठी कार्य केले. अनेक अंधश्रद्धांना मूठमाती दिली. एकपत्नीकायदा, स्त्रियांना शिक्षण देणे, स्त्रियांना नोकऱ्या देणे यामुळे स्त्रियांची प्रगति झाली.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १०.४

१. महमुद्दीन अंग्लो ओरिएंटल कॉलेज कोणी स्थापन केले ?

उत्तर ______________________________

२. अलिगढ मुस्लीम विद्यापीठ कोठे स्थापन झाले ?

उत्तर ______________________________

विभाग ४

भारतातील धर्म आणि तत्वज्ञान

टिपा

३. मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात सय्यद अहमद खान यांचे काय विचार होते ?

उत्तर

४. महमुदीयन लीटररी सोसायटी कोठे स्थापन केली ?

उत्तर

५. पारशी धर्मातील कोणत्याही तीन प्रसिद्ध सामाजिक धार्मिक सुधारकांची नावे सांगा.

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- ब्रिटीश राजवटीच्या प्रभावामुळे सामाजिक धार्मिक सुधारणांना वाव मिळाला.
- आधुनिक शिक्षण, शास्त्र, तंत्रज्ञान इ.साठी राजा राममोहन रॉय यांचे योगदान.
- प्रार्थना समाजाच्या माध्यमातून न्या.रानडे व भांडारकर यांचे सामाजिक सुधारणांमधील योगदान.
- आर्य समाजाच्या माध्यमातून स्वामी दयानंद सरस्वतींचे योगदान. अस्पृश्यतेविरूद्ध व जाती निर्मुलनासाठीचे कार्य.
- मानवतावादी स्वामी विवेकानंदांचे कार्य. रामकृष्ण मिशनचे कार्य.
- ॲनीबेझंट यांचे थिऑसोफिकल सोसायटीच्या माध्यमातून कार्य.
- मुस्लीम धर्मियांतील धार्मिक सुधारणावादी चळवळ. सय्यद अहमद खान यांचे योगदान.

## सत्रान्त अभ्यास

१. भारतीय सामाजिक सुधारणांमध्ये राजा राममोहन रॉय यांची भूमिका स्पष्ट करा.

२. प्रार्थना समाज धार्मिक व सामाजिक क्षेत्रात काम करित असे हे विधान स्पष्ट करा.

३. आर्यसमाजाचा वेदांवरील विश्वास याचे समर्थन कसे कराल ?

४. १९व्या शतकात भारतीय समाजात रामकृष्ण मिशनमी जनजागृतीचे कार्य कसे केले ते स्पष्ट करा.

५. मुस्लीम धर्मियांसाठी सय्यद अहमद खान यांचे योगदान स्पष्ट करा.

६. भारतीय समाजात थिऑसॉफिल सोसायटीचे योगदान स्पष्ट करा.

७. शिख धर्मीयांची सुधारणावादी चळवळ यावर टीप लिहा.

टिपा

## प्रश्नांची उत्तरे

### १०.१

१. सतीप्रथा, जातीला विरोध

२. बळी देण्याच्या प्रथेला विरोध, सती प्रथेला विरोध, मूर्तीपूजेला विरोध.

३. आंतरजातीय लग्न, विधवा विवाह, वंचीत समाज व स्त्रियांचा उद्धार इ.च्या माध्यमातून

४. प्रार्थना समाजाच्या विचारधारेचा समर्थक

### १०.२

१. दयानंद सरस्वती यांनी आर्यसमाजाची स्थापना केली.

२. लाहोर येथे १८८६ मध्ये.

३. मानवतेची सेवा

४. नरेंद्रनाथ दत्त

५. वंचित व गरीबांची सेवा.

### १०.३

१. अमेरिकेमध्ये

२. एच पी ब्लाटावस्की, रशियन

३. चैनई नजीक अडयार

४. ॲनी बेझंट

### १०.४

१. सय्यद अहमद खान

२. अलिगढ

३. स्त्री शिक्षण व बुरखाप्रथेला विरोध

४. १८६३ मधे कलकत्ता येथे

५. दादाभाई नवरोजी, एस एस बेंगाली, नवरोजी फिरदोंजी.

# विभाग ५

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

# चित्रकला, ललित कला आणि स्थापत्यशास्त्र

संगीत किंवा नृत्य यापैकी काहीही असो यातील सर्व क्षेत्रातील कलात्मक निर्मितीमुळे नेहमीच भारतीय संस्कृतीला वेगळे वैशिष्ट प्राप्त झाले आहे. कारण कला ही सर्वात सुंदर सांस्कृतिक अभिव्यक्ती आहे. किंबहुना दुसऱ्या शब्दात सांगायचे तर वरील प्रकारची कलात्मक निर्मिती ही एक सांस्कृतिक निर्मितीच आहे. भारतातील चित्रकला, हस्तकला, संगीत नृत्य, वास्तुकला व शिल्पकला यासारख्या कला प्रकारांचा भारतातील उत्क्रांतीचा मागोवा या अभ्यास घटकात घेतलेला आहे.

**घटक ११ : भारतातील चित्रकला**

**घटक १२ : ललित कला : संगीत, नृत्य आणि नाटक.**

**पाठ १३ : भारतीय स्थापत्यशास्त्र**

# ११

# भारतीय चित्रकला

आपण बाजारात किंवा प्राचीन वस्तुसंग्रहालयात फेरफटका मारताना आपल्याला अनेक चित्रे, मूर्ति इ. कलाकृती आढळतात. या सर्व कलाकृती भारतीय प्राचीन काळाशी निगडीत आहेत. त्यातून तत्कालीन लोकांचे जीवनमान प्रतिबिंबीत होते. राजा, राणींचे, सामान्यांचे पेहराव त्यातून कळतात. भावनांचे प्रकटीकरण करण्याची गरज प्राचीन काळापासून आहे. ही गरज चित्रे, मूर्ती यामधून भागविली जाते. आधुनिक काळात सुद्धा या कलेची गरज आहेच. भारतीय कलाकृतींनी स्वतःची अशी एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आधुनिक भारतीय कलाकृती भारताची समृद्ध गौरवशाली परंपरा प्रतिबिंबित करतात. त्याच प्रमाणे आधुनिक कल्पना व कलाप्रवाह प्रतिबिंबित करतात.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- ऐतिहासिक कालखंडापूर्वीपासूनची चित्र कला अभ्यासणे.
- मोगल राज्यकर्त्यांचे कलेतील योगदान आभ्यासणे.
- या कलेशी निगडीत विविध विचारधारा उदा. राजस्थानी पाहरी इ. अभ्यासणे.
- स्थानिक विभाग उदा. कांगडा कुलू व पाहडी या क्षेत्रातील शैलींचा अभ्यास करणे.
- राजा रवी वर्मा यांचे चित्रकला या क्षेत्रातील योगदान आभ्यासणे.
- बेंगाल कला विकसीत करण्यातील रविद्रनाथ टागोर व अवनिन्द्रनाथ टागोर यांची भूमिका अभ्यासणे.
- सुधारणावादी समुहातील फ्रान्सीन न्यूटन सौझा यांचे योगदान अभ्यासणे.
- लोककलेचे योगदान अभ्यासणे.

## ११.१ प्राचीन कालखंड - सुरूवात (प्रारंभ) ः

गुहांच्या अस्तित्वातून चित्रकलेचे प्राचीनत्व लक्षात येते. भारतातील चित्रकला मध्यप्रदेशातील भिमबेटका लेण्यांइतक्या प्राचीन आहेत हे लक्षात येते. या ठिकाणी जनावरांची चित्रे काढली आहेत. नृसिंहगड येथील चित्रामध्ये काळवीटाचे कातडे वाळत घातल्यासारखे चित्र आहे. हजारो वर्षापूर्वी चित्रे व रेखाटने हडप्पा संस्कृतीमध्ये आढळून येतात.ब्राह्मण व बुद्ध साहित्यात विविध प्रकारच्या कला अस्तित्वात असल्याचे दिसून येते. लेप्यचित्र, रेखाचित्र आणि धुलीचित्र या तीन पद्धतींचे वर्णन वरील साहित्यात आहे. धुलीचित्रे जमिनीवर काढली जात असत.

विनयपिटीका या बौद्ध ग्रंथात इमारतीवरील चित्रे आढळून येतात. मुद्रा राक्षस या नाटकात अनेक चित्रांचा उल्लेख आहे. वात्सायनाच्या कामसूत्र या ग्रंथात ६४ प्रकारच्या कला सांगितल्या आहेत.

विष्णूधर्मोत्तर पुराणात चित्रकलेवर 'चित्रसूत्र' नावाचे स्वतंत्र प्रकरण आहे. याचा अर्थ प्राचीन काळापासून शिल्पकला व साहित्याच्या माधमातून चित्रकलेचा प्रसार झाला आहे हे लक्षात येते.गुप्त काळातील शिल्पकलेचा उत्तम नमुना म्हणजे अजिंठाच्या लेण्या आहेत. जातक कथा प्राणी झाडे फुले मानवी आकृत्या इ. त्याचे चित्र विषय होते.

भिंत छत इ. वर भित्तीचित्रे काढलेली आहेत. ९ क्र. च्या लेणीत बुद्ध भिक्षू स्तूपाकडे जात असल्याचे चित्र आहे. १0 क्र. लेणीत जातककथा चितारली आहे. आपणाला राजमहालातील राजकुमार, राजस्त्रियांची अंतःपूरे, हमाल, भिकारी तसेच पशु, पक्षी, वनस्पती यांची चित्र आढळतात. पानांवरील चित्रांसाठी ओरीसा राज्य प्रसिद्ध आहे.

### चित्रकलेसाठी वापरलेले साहित्य ः

वेगवेगळया प्रकारच्या चित्रांमध्ये वेगवेगळे साहित्य वापरलेले असते. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले लाल, पिवळा, निळा, काळा या रंगाचा वापर केला आहे. संमिश्र रंगाचा वापरही आढळून येतो.

सहाव्या व नवव्या शतकामध्ये उत्तर व दक्षिणे कडील राज्यात बुद्ध काळातील चित्रकला दिसून येते. जरी या चित्रांचा गाभा धार्मिक असला तरिही या सर्व चित्रांमधून धर्मनिरपेक्षता दिसून येते. या चित्रकलेचे कमी नमुने शिल्लक राहिले असले तरीही राहिलेल्या चित्रांमध्ये देव, देवता, यक्ष, किन्नर, अप्सरा, समृद्ध निसर्ग तसेच प्रेम, लोभ, करूणा यांचेही दर्शन होते. बदामी (कर्नाटकातील)च्या इ.लेण्या औरंगाबादजवळील ऐलोरा (वेरूळ) च्या लेण्या इ. मधून उत्तम शिल्पकला व भित्तीचित्रे पाहायला मिळतात. या सर्व लेण्यांवर मध्ययुगीन संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

## ११.२ मध्ययुगीन भारतातील कला ः

दिल्ली सलतनतच्या काळात मोगल चित्रे शयनगृहे व मशिदीतून आढळून येत असत. यामध्ये प्रामुख्याने फुले पाने व झाडांचा समावेश होता. अल्तमशच्या काळात (१२१0-१२३६)चित्रांच्यावर पर्शियन व अरेबियन कलेचा प्रभाव दिसून येतो.

अन्य प्रादेशिक राज्यांमधून या देखील या कालखंडातील चित्रे आढळून येतात. बावर व अकबर हे दोघेही ग्वाल्हेरचे राजे मानसिंह तोमर यांच्या राजप्रसादातील चित्रांनी प्रभावीत झाले होते. जैन



व्यापारामुळे गुजरात व राजस्थानाच्या कलेचा प्रसार मध्य् उत्तर व पूर्व भारतात झाल्याचे दिसून येते. मध्यप्रदेशातील मंडू पूर्व उत्तर प्रदेशातील जैनपूर व पूर्व बंगाल इत्यादी राज्यात कलेचा प्रसार झाल्याचे दिसून येते.

पूर्व भारतातील बंगाल् ओरिसा या राज्यात ९ व्या व १० व्या शतकात नवीन प्रकारची चित्रकला (मिनीअेचर) विकसीत झाली. नाशवंत वस्तुंच्या साह्याने छोटया प्रकारची चित्रे करणे म्हणजे मिनीअेचर होय.

१३ व्या शतकानंतर तुर्की सुलतानांनी उत्तर भारतातून पार्शियन संस्कृतीचा प्रभाव असलेली चित्रे निर्माण केली. सोळाव्या शतकात भारतीय व पार्शियन संस्कृती चा मिलाप पाहायला मिळतो. पश्चिम भारतात जैन संस्कृतीचा प्रभाव होता. जैन चित्रे देवळातील ग्रंथालयाला दान दिली होती. यातून तिर्थकरांचे जीवन प्रतिबिंबीत होते. अकबराच्या काळात या कलाक्षेत्रात क्रांतीकारक बदल झाला. अकबराने काश्मीर व गुजरातमधून कलाकार आणून त्यांना आश्रय दिला. हुमयुनाने दोन पर्शियन कलाकारांना त्याच्या दरबारात आणले. या काळातील नामवंत कलाकार म्हणजे अब्द–अुस–समद दासवंत व बासवान हे होते. बाबरनामा व अकबरनामा मध्ये सुरेख चित्रे काढली आहेत. अकबराने व्यक्तिचित्रे काढण्याचे कलेलाही प्रोत्साहन दिले.

चित्र कलेला खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ लाभला तो जहांगीरच्या काळात तो स्वतः एक उत्तम कलाकार होता. या काळात कलाकारांनी चित्रांमध्ये वेगवेगळे रंग वापरले. मन्सूर् बिषनदास् मनोहर हे जहांगीराच्या काळातील नावाजलेले चित्रकार होते. अबुहसन याचे उत्तम व्यक्तिचित्र मन्सूरने तयार केले. दाराशुकोह हा शहाजहानचा पुत्र जहांगीरचा नातू उत्तम कलाकार होता. कलाकारांना राजघराण्यांकडून मिळणारा आश्रय औरंगजेबाच्या काळात काढून घेण्यात आला आणि कलाकार वेगवेगळया प्रातांत विखुरले गेले. पुराण् वेद् व दंतकथावर आधारित चित्रे असत. काही चित्रे निसर्ग व रागमाला वर आधारित असत. मिनीअेचर चित्रे स्थानिक पातळीवर विकसीत झाली होती. उदा. कांगडा् कुलू बासोली् गुलेर् चंबा् गढवाल् बिलासपूर् जम्मू इत्यादी. भक्तीमार्गाच्या चळवळीने सुद्धा या कलेला पाठबळ दिले.

## ११.३ आधुनिक कालखंडातील कला ः

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १९ व्या शतकाच्या प्रारंभी स्थानिक कला व पाश्चिमात्यकला चित्रामध्ये प्रतिबिंबीत झाल्या होत्या. चित्रे भारतीय समाजजीवन उत्सव यावर आधारीत असत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये प्रमुख भारतीय शहरात युरोपियन नमुन्यावर आधारीत कला विकसीत झाली. (कलकत्ता् मुंबई व मद्रास) त्रावणकोरचा राजा रविवर्मा यांची तैलचित्रे त्याकाळात अत्यंत लोकप्रिय होती.

रविंद्रनाथ टागोर, अबनिनंदनाथ टागोर, ई.बी.हावेल, कुमारस्वामी यांनी बंगाल स्कूल ऑफ आर्ट निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. शांतीनिकेतन मध्ये रविंद्रनाथ टागोरांनी कलाभवन उभारले. नंदलाल बोर, विनोदबिहारी मुखर्जी, रामकिंकर बैज इ. कलाकारांनी नवीन कलाकारांना प्रशिक्षण दिले. अमृता शेरगील या महान चित्रकर्तीला पॅरीस व बुडापेस्ट येथे प्रशिक्षण मिळाले. तिने भारतीय स्त्रियांवर आधारीत चित्रे केली. ती जरी अल्पायुषी होती तरी तिच्या पश्चात मोठा खजिना चित्रांच्या रूपाने ठेवला आहे.

कालांतराने इंग्रजी शिक्षणाचा कलेच्या क्षेत्रावर प्रभाव पडला, प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गीय चित्रकारांवर त्याचा प्रभाव दिसून येतो. ब्रिटीश साम्राज्याबाबत तिरस्कार, राष्ट्राभिमान व राष्ट्रीय अस्मिता यामुळे पूर्वीपेक्षा वेगळी कला उदयास आली.

१९४३ दरम्यान दुसऱ्या महायुद्धाच्या काळात परितोष सेऩ निरोडा मुजुमदार व प्रदोष दासगुप्ता यांनी एक गट स्थापन केला. त्यांनी नव्या शैलीतून आणि नवी तंत्रे वापरून भारतीय समाजाची स्थिती चित्रातून दाखविली. राजा रविवर्माची पौराणिक तैलचित्रे प्रसिद्ध होती. १९४८ मध्ये फ्रांसीस सौझा यांनी प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप स्थापन केला. यामध्ये एस.एच.रझा, एम.एफ.हुसैन, के.एम.आरा इ.चा समावेश होता.

१९७0 च्या काळात कलाकारांनी त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण केले. त्यामुळे भ्रष्टाचार, दारिद्रय, राजकिय परिस्थिती कलेचे विषय झाले.आधुनिक कलाकारांवर प्रभाव पाडणारे मद्रास स्कूल ऑफ आर्ट् कला केंद्र म्हणून विकसीत झाले. आधुनिक कलाकारांमध्ये तय्यब मेहता, सतिश गुजराल, कृष्ण खन्ना, मनजीत बावा इत्यादींचा समावेश होतो. भारतामध्ये कला व संगीताच्या विकासासाठी दोन संस्थांची स्थापना करण्यात आली. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि ललित कला अकादमी या त्या संस्था होत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ११.१

१. मध्यप्रदेशातील प्रसिद्ध लेणी कोणती आहे ?

उत्तर

२. प्राचीन भारतात ब्राह्मण व बुद्ध साहित्यात कोणत्य तीन प्रकारच्या चित्रपद्धती आहेत ?

उत्तर

३. धुळीचित्राच्या चित्रे सामान्यपणे कोठे काढली जात असत ?

उत्तर

४. अजिंठा लेणीच्या चित्रांची मध्यवर्ती कल्पना काय आहे ?

उत्तर

५. सहाव्या व नवव्या शतकात आढळलेल्या बौद्ध चित्रे कोणती ? दोनांची नावे सांगा.

उत्तर

६. मिनीअेचर चित्रे म्हणजे काय ?

उत्तर

७. मध्ययुगीन काळात चित्र कलेचा राजाश्रय कोणी काढून घेतला ?

उत्तर

८. शहरी इंग्रजी शिक्षित कलाकारांची मध्यवर्ती कल्पना काय होती ?

उत्तर

९. कलेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या दोन संस्थाची नावे सांगा.

उत्तर

१०. पानांवरील चित्रांसाठी कोणते राज्य प्रसिद्ध आहे ?

उत्तर

११. शांतीनिकेतन येथे रविंद्रनाथ टागोरांनी कोणती संस्था स्थापन केली ?

उत्तर

१२. त्रावनकोरचा राजा रवी वर्मा कशासाठी प्रसिद्ध आहे ?

उत्तर

## ११.४ सुशोभीकरणाची कला ः

भारतामध्ये कला क्षेत्र केवळ कागदावर चित्रे करण्यापुरते मर्यादित नसून भितीवर सुशोभीकरण करणारी चित्रही काढली जातात. ग्रामीण भागातील घरात ही चित्रे आढळतात. रांगोळी कला प्राचीन आहे. उत्तरेत यास रांगोळी म्हणतात, बंगालमध्ये अल्पना, उत्तरांचल मध्ये अल्पन, कर्नाटकात रंगावली, तामिळनाडूत कोल्लम आणि मध्यप्रदेशमध्ये मंदाना म्हणतात. रंग वापरून रांगोळी उठावदार करतात.

## ११.५ मिथिला शैली ः

मिथिला चित्रांना मधुवनी लोककला म्हणतात. बिहारच्या मिथिला भागात ही कला आहे. ग्रामिण महिला त्या सादर करतात. या चित्रांमध्ये सितेचे अरण्यातील जीवन, राम लक्ष्मणाचे अरण्यातील

जीवन, लक्ष्मी, गणपती या प्रमाणे चित्रे आढळून येतात. सूर्य व चंद्राच्या प्रतिमाही चितारल्या जातात. तुळशीचे चित्रही यात आढळून यल्ते. त्यात न्यायालयही दिसून येते. विवाह व अन्य सामाजिक कार्याचाही त्यात समावेश होतो. चित्रकार विचार करून एखादी संकल्पना चित्रात काढतात.

आयुष्यातील घटनांवर आधारित चित्र काढणे ही अप्रतिम कला आहे. या चित्रातून उत्तम वैवाहिक जीवनाचा संदेश दिला जातो. विषय व रंग निवडीच्या संदर्भात या मध्ये विविधता आढळून येते. उच्चवर्णीयांकडून साकारलेले चित्र अत्यंत रंगीत असते. कनिष्ठ स्तराच्या वर्गाकडून लाल व काळया रेषा वापरल्या जातात. मात्र ग्रामीण भागातील महिलांनी या चित्राच्या संबंधातील कला स्वतः विकसित केलेली आहे. मातेकडून मुलीला याप्रमाणे ती संक्रमीत झालेली आहे. अलिकडच्या काळात मधुबनी कला भेटवस्तू म्हणुन वापरली जाते. भेटकार्डामध्ये त्याचा वापर होतो व ते एक उत्पन्नाचे साधन झाले आहे.

## ११.६ कलमकारी चित्रे ः

याचा शब्दशः अर्थ पेन (कलमद्वारे) द्वारे काढलेले चित्र असा होतो. वंशपरंपरागत पद्धतीने ही कला विकसीत झालेली आहे. आंध्रप्रदेशामध्ये ही चित्रे आढळून येतात. भाज्यांची पावडर कापडावर वापरून ही चित्रे तयार करतात. मसुलीपरन्नम (आंध्रप्रदेश) याठिकाणी ही चित्रे आढळतात. विजयनगर साम्राज्यात ही कला आढळून येत होती. भारतीय पुराणातून रामायणातून महाभारतातून ह्या चित्रांसाठी विषय निवडला जात होता. विषय निवडल्यानंतर अनेक विषयांवर चित्र साकारले जात असे. कपडयावर हे चित्र चितारले जात असे. ते अत्यंत टिकाऊ असे. गोवळकोंडा येथील कला पर्शियन पेंटिग्जच्या प्रभावाखालील होती. ही कला कपडे, चादरी व पडद्यावर चितारली जात असे. कलमकारी चित्रांसाठी रंग झाडांच्या मुळापासून, पानांपासून, लोखंडी किस, तांबे इ. पासून तयार केले जात असत. श्री कलहस्ती हे गाव कलमकारी चित्रांसाठी प्रसिद्ध आहे.

कालीघाट चित्रकला नावाचा प्रकार ओरिसात आढळून येत असे. हे चित्र कापडांवर चितारले जात असे. अत्यंत रंगीत असे हे चित्रकाम आहे. यावर हिंदू देवदेवतांची चित्रे आढळून येतात.

### फड चित्रकला ः

ही कला जवळपास ७00 वर्षे जुनी आहे. राजस्थानातील भिलवाडा पासून ३५ किमी अंतरावरील शाहपुरा येथे ही कला विकसीत झाली आहे. सातत्यपूर्ण राजेशाही आश्रयामुळे ही कला विकसीत झाली होती. अनेक पिढया ही कला अस्तित्वात आहे. एखाद्या नायकाची कथा त्यात चितारलेली असे. राजे महाराजांच्या कथा त्यात साकारतात. भारतातील सांथाळ या जमतीने गोंड कला सादर केली आहे. गोदावरी खोऱ्यातील सांथाल लोकांनी ही कला विकसीत केली आहे. ही आता पूर्णपणे भारतीय स्वरूपाची कला समजली जाते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ११.२

१. खालील सुशोभीकरणाच्या कला व कलास्थान यांच्या जोडया जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| रांगोळी | तामिळनाडू |
| अलपना | मध्यप्रदेश |
| आयपन | उत्तरभारत |
| रंगावली | बंगाल |
| कोलम | उत्तरांचल |
| मंदाना | कर्नाटक |

२. वालिकांना कोणत्या चित्रांचा आधारे सल्ला दिला जातो ?

उत्तर

३. कलमकारी काम कसे केले जाते ?

उत्तर

४. कलमकारी चित्रांचे वैशिष्टय काय आहे ?

उत्तर

५. कलमकारी कलेचे सर्वात प्रसिद्ध ठिकाण कोणते ?

उत्तर

## ११.७ वारली चित्रकला :

महाराष्ट्रातील गोंड आदिवासी वारली चित्रांसाठी प्रस्द्धि आहेत. महाराष्ट्राच्या आदिवासी विभागाशी ही कला संबंधीत आहे. फरशी व भिंतीवर सुशोभित करणारी ही कला आहे. वृक्ष, पक्षी, पुरूष, स्त्री इ. एकत्रितपणे वारली चित्रांमध्ये आढळतात. सहज उपलब्ध वस्तूंपासून त्या कला सादर करतात. चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, बिंदू रेषा याप्रमाणे भूमिती आकार वापरले जातात. वारली चित्रांमध्ये धार्मिक गोष्टींचा वापर होत नाही.

## ११.८ कालीघाट चित्रकला :

कोलकाता येथील कालीघाट यावरून या केलेला कालीघाट नाव पडले आहे. कोलकता जवळील कालीमातेच्या मंदिराजवळ कालीघाट आहे. पटूआ हे चित्रकार ग्रामिण बंगालमधून येवून कालीघाट येथे स्थायिक झाले होते. १९ व्या शतकातील देवता व देवींची चित्रे येथे काढतात. कागदावर रंगाच्या माध्यमातून ही काढली जातात. काली, लक्ष्मी, कृष्णा, गणेश, शिवा इ. च्या प्रतिमा चित्रामधे वापरतात.

## ११.९ भारतीय हस्तकला ः

भारतामध्ये अनेक हस्तकला अस्तित्वात आहेत. भारतीय कलाकार सोपे विषय चितारतात. भारताच्या प्रत्येक राज्यात नवीन गोष्टी आढळतात. उदा. काश्मीर, काश्मीरी शालीसाठी प्रसिद्ध आहे बांधणी कापडासाठी राजस्थान, बिद्री कामासाठी आंध्रप्रदेश, कांजीवरम साठी तामिळनाडू, चंदेरी व कोसासाठी मध्यप्रदेश, बनारसची सिल्कसाडी, बंगालचे हस्तकला इत्यादी. हजारो वर्षापासून ही कला विकसीत झाली आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ११.३

१. वारली चित्रकला कोठे आढळते ?

उत्तर ______________________

२. वारलीसाठी कोणते आदिवासी प्रसिद्ध आहेत ?

उत्तर ______________________

३. वारली चित्रांचे वैशिष्टय काय आहे ?

उत्तर ______________________

४. काश्मीर राज्यातील कलामधे वैशिष्टयपूर्ण काय आहे ?

उत्तर ______________________

## तुम्ही काय शिकलात?

- भारतीय चित्रकला फार प्राचीन आहे.
- ब्राह्मणी औद्ध लिखाणातून वेगवेगळया चित्रशैलींचे उल्लेख आढळतात.
- बौद्धकालीन अजंठा लेणी चित्रांसाठी प्रसिद्ध ाहे.
- मोगलकालात भारतीय व पर्शियन चित्रशैलीचा मिलाफ झाला.
- राजस्थानी आणि पहाडी चित्रशैलींचे योगदान महत्वपूर्ण आहे.
- १८व्या शतकाच्या उत्तरार्थात व १९ व्या शतकाच्या प्रारंभी स्थानिक कला व पाश्चिमात्य कला भारतीय शैलीच्या चित्रात प्रतिबिंबित झाल्या.
- कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे युरोपियन आर्टस्कूलप्रमाणे आर्ट स्कूल्स सुरू झाली.

स्वतंत्र बंगाली शैली विकसित झाली. या दोन गोष्टी भारतीय चित्रकलेमधील मैलाचे दगड आहेत.

- फ्रान्सिस सौझा, रझा, हुसेन यांनी बंगाली शैलीशी बंडखोरी करून नवीन शैली वापरण्यास सुरूवात केली.
- मधुबनी, कलमकारी, वारली, कालिघाट यासारख्य भारतीय लोककलांच्या शैलीने भारतीय चित्रकलेला नवीन परिमाण प्राप्त झाले आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. मध्ययुगीन भारतातील कलेचा विकास आपण कसा वर्णन कराल ?

२. मधुबनी कलेची व्याख्या सांगा.

३. मिथिला व कलमकारी चित्रांमधील फरक स्पष्ट करा.

४. कालीघाट चित्रांमध्ये बंगालच्या सांस्कृतीचे प्रतिबिंब आहे हे विधान स्पष्ट करा.

५. भारतीय कलाकार धातू लाकूड इ. पासून कला चितारतात हे विधान स्पष्ट करा.

६. मोगलांचे चित्रकला या कलेतील योगदान स्पष्ट करा.

७. टिपा लिहा.

अ. कलमकारी कला

ब. पाहाडी कला

क. कालीघाट कला.

## प्रश्नांची उत्तरे

**११.१**

१. भीमबेटका

२. लेप्यचित्रे, लेखाचित्रे, धुलीचित्रे

३. जमीनीवर

४. जातक कथा

५. बाश, बदामी

६. छोट्या आकारात काढलेली चित्रे

७. औरंगजेब

८. अ. ब्रिटीश साम्राज्याबाबत तिरस्कार

ब. राष्ट्राभिमान

क. राष्ट्रीय अस्मिता

९. १. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट

२. ललित कला अकादमी

१०. ओरीसा

११. कलाभवन

१२. पौराणिक तैलचित्रे

**११.२**

१.

| अ | ब |
|---|---|
| रांगोळी | उत्तरभारत |
| अलपना | बंगाल |
| आयपन | उत्तरांचल |
| रंगावली | कर्नाटक |
| कोलम | तामिळनाडू |
| मंदाना | मध्यप्रदेश |

२. मिथिला शैली

३. वनस्पती रंग वापरून

४. भारतीय पौराणिक कथांवर आधारित चित्रे

५. श्री कलाहस्ती

**११.३**

१. महाराष्ट्र

२. गोंड

३. चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, बिंदू हे भौमितिक आकार वापरले जातात.

४. काश्मिरी शाली.

# १२

# ललितकला ः संगीत नृत्य आणि नाटक

संगीत, नृत्य, नाटक, लोककला व कळसूत्री बाहुल्या इ. सर्व भारतीय संस्कृतीचा अतिशय महत्वाचा भाग आहे. ढोलाचा आवाज कानी पडताच आबालवृद्ध त्या दिशेला धावतात. लाहीरी हा सांस्कृतिक उत्सव साधारणतः १३ जानेवारीला उत्तर भारतात साजरा होतो. उत्साहाने लोक गाणी म्हणतात व नाचतात. पंजाब मधे या नृत्याला भांगडा व गिड्डा म्हणतात. मानवी जीवनातल्या वेगवेगळे भागांच प्रतिबिंब या गाण्यातून व नृत्यातून दिसून येतं. खेडयातल्या लोकांच्या चालीरिती व प्रथा याचे चित्र यात आढळते. हेच आता शहरी जीवनाचेही एक अंग बनले आहे.शाळेतला कुठलाही कार्यक्रम नृत्याशिवाय पूर्ण होत नाही.शतकानुशतके हे उत्सव चालत आलेले आहोत व शेतीच्या उत्पादनाच्या भरभराटीसाठी जमिनीच्या सुपीकतेसाठी, बाळाच्या जन्मासाठी व दीर्घ आयुष्यासाठी हे साजरे केले जात असावेत. उत्सव साजरा करण्याची कारणे अनेक आहेत. पण सर्वांचा उल्लेख करणे अशक्य आहे. आपणच या साऱ्या विविध कार्यक्रमाची नोंद का करू नये व शोधून काढू नये की लोक हे उत्सव का साजरा करतात. हे करण्यात काही विशेष रस तुम्हांला वाटणार नाही. पण एकदा का तुम्ही करायला लागलात की तुम्हांला थांबण शक्य होणार नाही. याच कारण असे आहे की या संगीत, नृत्य व नाटकात खूप विविधता आहे.

भारत ही समृद्ध संस्कृती व वारशाची भूमी आहे. संस्कृतीचा सुरवातीच्या काळापासून संगीत व नृत्य हे या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. सुरवातीच्या काळात धार्मिक व सामाजिक प्रबोधनासाठी याचा उपयोग करीत. नृत्य व संगीत याचा वापर वैदिक काळापासुन तर मध्ययुगीन काळापर्यंत प्रभावी लोक शिक्षणासाठी केला जात होता. वैदिक ऋचांचे पठण कसे करावे याचा अतिशय काळजीपूर्वक उल्लेख वेदांमधे आहे.

हे श्लोक म्हणतांना उच्चार व आवाजाच्या पातळीचे पण नियम घालून दिलेले आहेत. या साऱ्याचा उपयोग धार्मिक व समाज प्रबोधनापेक्षा लोकासमोर उत्तम उदाहरण देण्यासाठी होता. सध्याच्या काळात, या साऱ्या कलांचा उपयोग जगभरच्या लोकांची करमणूक करण्यासाठी केला जातो.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- ललित कला व त्यांची वेगवेगळया काळात झालेली वाढ स्पष्ट करणे .
- प्राचीन व मध्ययुगीन काळातील ललित काळांच्या उपयुक्ततेचे वर्णन करणे.
- हिंदुस्थानी रागदारी व कर्नाटकी संगीत यातील फरक ओळखणे.
- नाटकाच्या वेगवेगळया टप्प्यात आलेल्या प्रगतीचा आढावा घेणे व यातील लोकनाटयाचा सहभाग स्पष्ट करणे.
- माणसाच्या व्यक्तिमत्व विकासात या तीन कलांचे महत्व अभ्यासणे.
- आजच्या काळातील या कलांचा सद्यस्थितीचा आढावा घेणे.

## १२.१ ललीत कलांच्या संकल्पना ः

कला म्हणजे काय ? मानवी मनाच्या वेगवेगळया वैशिष्टयांच सुंदर सादरीकरण म्हणजे कला. ही सगळी मानवी वैशिष्टये 'रस' म्हणून प्रसिद्ध आहेत. 'रस'चा हिंदी अनुवाद म्हणजे साखरेचा पाक यामधून आनंदाच अंतिम रूप ध्वनीत होत ह्या मानवी भावनांचे नऊ उपविभाग होतात. ते खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हास्य | २. | भयानक |
| ३. | शौर्य | ४. | करूणा |
| ५. | वीर | ६. | अद्‌भूत |
| ७. | वीभत्स | ८. | शांती |
| ९. | शृंगार | | |

कला मानवी भावना प्रतिबिंबीत करतात. माणसं उत्स्फूर्तपणे त्यांच्या मनाच्या अवस्था या वेगवेगळया कलातून व्यक्त करतात. याची अभिव्यक्ति संगीत, नाटक, नृत्य अशा विविध प्रकारातून व्यक्त होते. यातले काही प्रकार हे प्रत्यक्ष सादर केले जातात. यापैकी काही दृश्य स्वरूपात समोर येतात. रेखाटन, चित्रकला व शिल्पकला या दृश्य कला होत. भारतात या सर्वात संगीत ही लोकप्रिय अशी कला आहे. संगीताचे सात स्वर आहेत. सा, रे, ग, म, प, ध, नि, सा.

संगीताचा उगम सामवेदातून झाला. त्यातील श्लोक सुरात म्हटले जात. वैदिक मंत्राच पठण, त्यातले ठरवून केलेले उच्चार व आवाजाची लय हे धार्मिके रीवाजांचा महत्वाचा भाग आहेत. ललित कलांवर वर लिहलेले भारताचे 'नाटयशास्त्र' हे सर्वात पहिले पुस्तक आहे. (याची रचना इसपूर्व दुसरे ते इस दुसरे या दरम्यान झाली.) यातली सहा प्रकरणे संगीतावर आहेत. या विषयावर दुसरा महत्वाचा ग्रंथ म्हणजे मातंगचा 'ब्रिहादेसी' याचे संकलन आठव्या व नवव्या शतकात झाले. या पुस्तकात रागांवर सविस्तर चर्चा आहे व रागांना विशिष्ट नावे देण्यात आली आहेत. १३ व्या शतकात शारंगदेवाने लिहिलेल्या 'संगीत रत्नाकर' या ग्रंथात २६४ रागांचा उल्लेख आहे.विविध प्रकारची तंतूवाद्ये व श्वासावर चालणारी वाद्ये याचा याच दरम्यान शोध लागला. प्राचीन ग्रंथात वीणा, बासरी, ढोल व झांजेचा उल्लेख आहे. समुद्रगुप्त, धरचा राजा भोज, कल्याणचा राजा सोमेश्वर हे संगीताचे आश्रयदाते होते. गुप्त घराण्यातला समुद्रगुप्त स्वतः एक निष्णात संगीतकार होता. त्याच्या काही नाण्यांवर तो वीणा वाजवितांनाची चित्रे आहेत. मंदीरात देव व देवी यांच्या

पूजेत संगीताला स्थान होते. १२ व्या शतकात ओरिसातल्या जपदेवेने अतिशय उत्तम अशा गीत गोविंदची निर्मिती केली. यातिल प्रत्येक गीत रागावर आधारीत असून ते राधा व कृष्णाच्या प्रेमकथेवर आधारीत आहे. अभिनव गुप्ता (९९३-१०५५) चे 'अभिनवभारती' संगीतावद्दल उपयुक्त माहिती देते. संस्कृत ग्रंथात आढळणाऱ्या संज्ञा व संकल्पनाशी साधर्म्य असलेल्या संज्ञा व संकल्पना तामीळ संगीतात आढळतात. शैवपंथी नयनार व वैष्णवपंथी अल्वार यांनी भजनांना चाली लावल्या.

अशाप्रकारे मध्ययुगीन काळातील सुफी आणि भक्ती संगीताला प्रोत्साहन दिले. सुफी पंथात कव्वाली गायल्या जायच्या तर भक्तिसंगीत किर्तन व भजन हे भक्ति पंथातील संतामध्ये लोकप्रिय झाले. कवीर, मीराबाई, सुरदास, चंदीदास, तुलसीदास, विद्यापती यांचा अतिशय जवळचा संबंध धार्मिक संगीताची होता. अमीर खुस्त्रो सारख्या प्रसिद्ध विद्वानांचेही संगीतात योगदान होते. माळव्याचा प्रसिद्ध राजा बाज बहादूर आणि रूपमती ह्यांच्या प्रेमकहाणीतून नवीन राग जन्माला आला. इब्राहिम अदिलशहा II याने सतराव्या शतकात लिहिलेल्या 'किताबे नवरस' मध्ये हिंदू देवदेवींची व मुस्लीम संताची स्तुती करणारी गाणी आहेत. इतर कोणाशीही तुलना होवू शकणार नाही असा गवई तानसेन अकबराच्या दरबारी होता. इतरही बरेच गायक होते. बैजूबावरा हा देखील अकबराच्या काळातील गायक होता. त्याकाळी राजेरजवाडे यांनी दिलेल्या आश्रयामुळे संगीताची परंपरा जिवंत राहिल्या. मुगल राजे संगीताचे मोठे आश्रयदाते होते. लॅनपूलच्या मते ''बाबर सुद्धा संगीताचा आश्रयदाता हाता. त्याने सुद्धा काही प्रसिद्ध संगिताच्या नवीन पद्धतीचा उपयोग कव्वाली व ख्याल मधे केला. अकबर गाणी लिहायचा आणि त्याला संगीतही द्यायचा स्वामी हरीदास आणि त्याच्या शिष्यांनी वेगवेगळया चालीची गाणी रचली. पुंडरिक विठ्ठल या प्रसिद्ध संगीतकाराने 'रागमाला' लिहीली. मीराबाई, सुरदास व तुलसीदासच्या भक्तिसंगीताने संगीत समृद्ध झाले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १२.१

१. कलेची अभिव्यक्ति कोणत्या प्रकारातून व्यक्त होते ?

उत्तर ______

२. करमणूक व निर्मिती व्यतिरिक्त ललितकलांचा वापर कशासाठी होत होता ?

उत्तर ______

३. ललितकले विषयी लिहलेला सर्वात प्राचीन ग्रंथ कोणता ?

उत्तर ______

४. आठव्या व नवव्या शतकादरम्यान ललित कलांवर लिहलेला ग्रंथ कोणता ?

उत्तर ______

५. कोणत्या ग्रंथात रागांवर सविस्तर चर्चा आहे ? रागांना नावे देण्यात आली आहेत ?

उत्तर ____________________

६. संगीत रत्नाकर मधे किती रागांचा उल्लेख आहे.

उत्तर ____________________

७. जयदेवच्या 'गीतगोविंद'ची गीते कशावर आधारित आहेत ?

उत्तर ____________________

८. कोणत्या दोन तमीळ कवींनी भजनांना चाली लावल्या ?

उत्तर ____________________

९. किताबे नवरस हा ग्रंथ कोणी लिहला ?

उत्तर ____________________

१०. मालवाचा राजा बाज बहादूर व त्याची राणी रूपमती यांचे संगीतातले योगदान सांगा.

उत्तर ____________________

## १२.२ भारतीय शास्त्रोक्त संगीताची घराणी ः

मध्ययुगीन काळात भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये दोन घराणी होती.

१. उत्तर भारतात प्रचलित असलेले उत्तर हिंदुस्थानी शास्त्रोक्त संगीत.

२. कर्नाटकी संगीत

### हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत ः

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे मूळ दिल्लीचे सुलतान व अमीर खुस्त्रोपर्यंत (१२५३-१३२५) पोहचते. अमीर खुस्त्रोने संगीत वाद्यांसोबत संगीत मैफिली करण्यास प्रोत्साहन दिले. अमीर खुस्त्रोने तबला व सतार शोधून काढले. व नवीन रागांची ओळखही करून दिली. बरेच भारतीय संगीतकार स्वतःला तानसेनचे वारसदार समजतात. धुपद, धायर, ठुमरी, खयाल आणि टप्पा हे हिंदुस्थानी संगीताचे विविध प्रकार आहेत. असे म्हणतात की तानसेनच्या संगीताचा जादू सारखा प्रभाव असायचा. आपल्या संगीताने ते यमुनेचे उसळणारे पाणी शांत करीत व त्यांनी गायिलेल्या मेघरागाने बरसात होई . वस्तुतः तानसेनची गाणी आजही लोक आवडीने साऱ्या भारतभर गातात. अकबराच्या दरबारातील काही सरदार हे बैजू बावरा, सूरदास यांचे आश्रयदाते होते.

वहार, भैरवी, सिंधू भैरवी, भीम पलास, दरबारी, देस, हंसध्वनी, जय जयवंती, मेघ मल्हार, तोडी, यमन, पिलू, शाम कल्याण, खमाज हे सर्वात लोकप्रिय राग होते.

भारतात संगीत वाद्यांचीही खूप समृद्ध परंपरा आहे. तंतू वाद्यामध्ये सर्वात प्रसिद्ध वाद्ये म्हणजे सतार, सरोद, सारंगी व संतूर आहेत. पखवाज, तबला, मृदंग हे ढोल ही ताल देणारी वाद्ये आहेत. तर बासरी, शहनाई, नादस्वरम ही श्वास वाद्ये आहेत.

हिंदुस्थानी संगीतकारांची त्यांच्या शैलीनुसार वेगवेगळी घराणी आहेत. वारसा हक्काने येणारी त्या त्या घराण्याच्या विशिष्ट शैलीसाठी ही घराणी प्रसिद्ध आहेत. घराण्यांमध्ये गुरू शिष्य परंपरा असते. यात गुरू शिष्याला घराण्याच्या गायकीची परंपरा सुपूर्द करतो. किराणा, जयपूर, ग्वालीयर ही संगीताची प्रसिद्ध घराणी होत.

आदी ग्रंथातले राग, मोहरम्मच्या दरम्यान होणारी संगीताची मजलिस, किर्तन, भजन या सर्वांना भारतीय संगीतात विशेष स्थान आहे. याचबरोबर लोकसंगीताची एक वेगळी अशी समृद्ध संगीत शैली आहे.

## १२.३ कर्नाटकी संगीत :

इसवी सन १७00 ते १८५0 दरम्यान रचल्या गेलेल्या कर्नाटकी शैलीतल्या संगीताचे श्रेय तीन संगीतकारांना एकत्रितपणे दिले जाऊ शकते. शाम शास्त्री, त्यागराज व मुथ्थूस्वामी दिक्षितार हे ते तीन संगीतकर होते. पुरंदादास हे आणखी एक कर्नाटकी संगीतकार होते. त्यागराज हे एकाचवेळी संत, संगीतकार व कर्नाटकी शैलीचे आद्य संगीतकार मानले जातात. भक्तिसंगीताच्या प्रथेतल्या ह्या रचना कृति म्हणून ओळखल्या जात. ह्या तीन संगीतकरांनी संगीतात नवीन रचनांचे प्रयोग केले. या काळातील तीन प्रमुख संगतिकार म्हणजे महा वैद्यनाथ अय्यर (१८४४– १८९३)परनम सुब्रम्हण्यम अय्यर (१८५४–१९0२) आणि रामनाथ श्रीनिवास अय्यंगर (१८६0–१९१९) बासरी, मृदंगम, वीणा, नादस्वरम, घटम ही वाद्ये साथीसाठी वापरत असत.

हिंदुस्थानी व कर्नाटक संगीतात फरक असलातरी काही साम्यस्थळेही आहेत. उदा. कर्नाटक संगीतातील अलपना व हिंदुस्थानी संगीतातील आलाप, कर्नाटक संगीतातील तिल्लाना व हिंदुस्थानी संगीतातील तराणा यात साम्य आहे. दोन्ही संगीतात तालांवर भर दिला आहे.

## १२.४ आधुनिक भारतीय संगीत :

आपण इंग्रजांची व्हायोलिन, क्लॅरिओनेट ही वाद्ये वापरण्यास सुरूवात केली.

पूर्वी संगीताचे कार्यक्रम फक्त उच्चभ्रू लोकांसाठी असत. ते आता सामान्य लोकांसाठी खुले झाले आणि हजारो लोक देशभर त्याचा स्वाद घेवू लागले. पूर्वीसारखे संगीताचे शिक्षण फक्त गुरूशिष्य परंपरेशी निगडीत न रहाता संगीत देणाऱ्या संस्थेतर्फे संगीताचे शिक्षण दिले जाऊ लागले.

### संगीतकार :

अमीर खुस्त्रो, सदारंग अदारंग, मियाँ तानसेन, गोपाल नायक, स्वामी हरीदास, पं.व्ही.डी. पलुसकर, पं.व्ही.एन्. भातखंडे, त्यागराज़, मुथ्थुस्वामी दिक्षितार, पं.ओंकारनाथ ठाकूर, पं. विनायकराव

पटवर्धन, उस्ताद चाँद खाँ, उस्ताद बडे गुलामअली खाँ, उस्ताद फैयाज खान, उस्ताद निसार हुसेन खाँ, उस्ताद अमीर खान, पं.भीमसेन जोशी, पं.कुमार गंधर्व, केसरबाई केसकर, श्रीमती गंगूबाई हनगल हे सर्व प्रसिद्ध गायक आहेत. वाद्यसंगीतात बाबा अल्लउद्दीन खाँ, उस्ताद बिसमिल्ला खान,उस्ताद अल्लारखा खान हे प्रसिद्ध वादक आहेत.

## १२.५ लोकसंगीत ः

लोकप्रिय किंवा लोकसंगीताची भारताला एक समृद्ध परंपरा आहे. लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब या संगीतात दिसते. जीवनातल्या प्रत्येक प्रसंगावर आधारलेली ही साधी गाणी आहेत. हे प्रसंग नव्या ऋतुचे आगमन, उत्सव किंवा मुलांचा जन्म असे आहेत. राजस्थानी लोक संगीत मांड किंवा बंगालचे भाटियाळी संगीत सर्व भारतभर लोकप्रिय आहेत. रागिणी हे हरीयाणातले लोकप्रिय लोकसंगीत आहे.

लोकगीतात विशेष अर्थ असतो. बहुधा ती ऐतिहासिक किंवा महत्वाच्या चालीरितींवर आधारलेली असतात. काश्मीरी गुलराज ही एक लोककथा आहे व मध्यप्रदेशातल्या पंडियांनी लोकगीतात घटना गाण्यातून वर्णन करून सांगितलेली असते. मुस्लीम लोक सोजख्वाणी ही दुःखद गाणी मोहरमच्या दरम्यान म्हणतात. ख्रिसमस कॅरोल्स व (समूहगीते) उत्सवाच्या निमित्ताने म्हटली जातात.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १२.१

१. भारतीय संगीतातली दोन घराणी कोणती ?

उत्तर ______

२. हिंदुस्थानी संगीतामध्ये कोणती परंपरा आहे ?

उत्तर ______

३. भारतीय संगीतातले घराणे म्हणजे काय ?

उत्तर ______

४. काही प्रसिद्ध भारतीय संगीत घराणी कोणती ?

उत्तर ______

५. कर्नाटकी संगीतातली कृती म्हणजे काय ?

उत्तर ______

६. कर्नाटकी संगीतातले काही प्रसिद्ध संगीतकार सांगा.

उत्तर

७. कर्नाटकी संगीतात वापरल्या जाणाऱ्या काही वाद्यांची नावे द्या.

उत्तर

८. भारतीय संगीत व कर्नाटकी संगीतातली दोन सारखी वैशिष्ट्ये कोणती ?

उत्तर

## १२.६ भारतीय नृत्य प्रकार ः

ऋग्वेदामध्ये नृत्य, नतृ चा उल्लेख आहे आणि पहाटेची तुलना एका पारंगत नृत्यांगणेशी केलेली आहे. ब्राम्हणके, जेमिनी व कौसीटकी या ग्रंथात नृत्य आणि संगीताचा एकत्र उल्लेख आहे. महाकाव्य पृथ्वी व स्वर्गातल्या नृत्यांच्या संदर्भांनी भरलेली आहेत. संगीतासारखीच भारतीय नृत्याला एक समृद्ध परंपरा आहे. यात कथा कथन करतांना भावना व हावभाव यांना विशेष स्थान आहे.

भारतात नृत्याचे मूळ हडप्पा संस्कृतीपर्यंत पोहचते. हडप्पा येथे सापडलेला नृत्यांगनेचा पुतळा तेथील स्त्रिया नृत्य करीत याचा पुरावा आहे.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत नृत्यातून धार्मिक कल्पना व्यक्त करणे हा प्रमुख उद्देश होता. शिवाचे नटराज रूप हे वैश्विक निर्मिती आणि क्षय या चक्राचे प्रतिक आहे. शिवाच हे लोकप्रिय नटराज रूप नृत्याची जनमानसातील लोकप्रियता दाखवते. दक्षिणेकडे असे एकही मंदिर नाही की ज्यात नृत्य करणाऱ्या मूर्ति नाहीत. भरत नाटयम्, कथ्थक, कुचीपुडी, मणिपुरी, ओडिसी हे सर्व समृद्ध अशा भारतीय नृत्य कलेचे वेगवेगळे अविष्कार आहेत.

नृत्याचा उगम कसा झाल हे शोधणे तसे खूप अवघड आहे. पण एवढे मात्र नक्की की आनंद व्यक्त करण्यासाठी नृत्याचा जन्म झाला. हळूहळू नृत्याची विभागणी अभिजात व लोकनृत्य अशी होवू लागली. अभिजात नृत्य प्रकार हे मंदिरात किंवा राजदरवारात सादर होत. मंदिरात नृत्यामागे धार्मि क भावना असायची तर राजदरवारात केले जाणारे नृत्य करमणूकीसाठी असायचे. या दोनही नृत्यप्रकारातली कलाकारांची भावना ही आपण देवाला प्रार्थना करतो आहोत अशी असायची. दक्षिणेत भरतनाटयम व मोहिनीनाटयम मंदिरातील विधी म्हणून प्रगत झाले.केरळातील कथकलीतील यक्षगान रामायण व महाभारतातल्या गोष्टी कथन करतात तर कथ्थक व मणिपूरी हे नृत्यप्रकार बहुतांशी कृष्ण व त्याच्या लिलांचे वर्णन करतात. ओडिसीचे सादरीकरण हे भगवान जगन्नाथाशी संबंधीत आहे. कथ्थक जरी कृष्ण लिला व शिवांच्या गोष्टी संबंधी असले तरी हा नृत्यप्रकार मध्ययुगात राजदरबारीही सादर केला जायचा. या सोबत ठुमरी व गझल पण सादर केल्या जायच्या, हे या सादरीकरणाचे वैशिष्ट असे. मणिपूरी नृत्य सुद्धा धार्मिक कारणासाठी उपयोगात आणीत. सामान्य माणसांच्या गोष्टीतून लोकनृत्याचा उगम झाला हे सर्व एकत्रितपणे सादर केले जायचे. आसाम मधे शेती हंगाम 'बीहू' या उत्सवाद्वारे साजरा केला जायचा. अशाच रितीने गुजरातचा

गरबा, पंजाबचा भांगडा व गिड्डा, मिझोरामचे बांबूनृत्य, काश्मीरचे धुमाळ, बंगालचा चाहु हे या लोककलाचे आगळेवेगळे अविष्कार आहेत. ज्यामधे लोकांच्या सुखदुःखाचे प्रतिबिंब दिसते.

या कलापद्धतीच्या विशेषणात्मक अभ्यासाचा भारताचे नाटयशास्त्र मूळ स्त्रोत आहे. नृत्य व त्याच्या विविध अंगाची चर्चा भारताने बारीक तपशीलासह केलेली आहे. चेहऱ्यावरचे हावभाव, शरीराच्या हालचाली, हस्तमुद्रा व पदन्यास हे सर्व नृत (पदन्यास) नृत्य (अंगविक्षेप) व नाटय (अभिनय) या तीन विभागात एकत्रित केलेले आहे. स्त्री व पुरूष बरोबरीने नृत्यात रस घेत. पण स्त्रीने नृत्य करणे कमीपणाचे समजले जात. पण प्रसिद्ध संगीत विचारवंत् धार्मिक व सामाजिक सुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्री नर्तिकेला सन्मान प्राप्त झाला.

मध्ययुगीन काळात, मुस्लीम राज्यकर्त्यांनी नृत्याचा पुरस्कार केला. एक औरंगजेब सोडला तर इतर सर्व मुस्लीम राज्यकर्त्याच्या दरबारात सादर केले गेलेल्या नृत्याच्या सादरीकरणाचे उल्लेख आहेत. दक्षिणेकडील मंदीर, प्रांगण व इमारतीचे इतर भाग नृत्यासाठी असत. राम, कृष्ण, गणेश, दुर्गा यांच्या पौराणिक गोष्टी नृत्यातून सादर केल्या जात. उत्तरेतला राज्यकर्ता वाजीद अली शाह हा नृत्याचा संगीताचा मोठा आश्रयदाता होता. याचा काळ लखनौ घराण्याच्या नृत्य परंपरेची मुहुर्तमेढ झाली. आधुनिककाळातील नर्तक बिरजू महाराज हे याच लखनौ नृत्य परंपरेतले. मध्ययुगीन काळात दक्षिणेतले नृत्याविषयी कडक नियम संस्कृत ग्रंथातून स्विकारलेले होते.दक्षिण नृत्य शिक्षणाचे प्रमुख केंद्र झाले व नृत्य शिक्षण देणाऱ्या विविध संस्था दक्षिण भारतात उदय पावल्या.

आधुनिक काळात जास्तीत जास्त भारतीय नृत्य प्रकार हे दक्षिणेत आढळतात. कुचीपुडी, भरतनाटयम, कथ्थक हे ते प्रकार आहेत. पूर्वेकडे ओडिसी नृत्याची भरभराट झाली. अभिजात नृत्यप्रकाराबरोबर लोकनृत्यपण भरभराटीस आले. बहुतेक प्रांतात त्या त्या भागातले नृत्यप्रकार विशेष लोकप्रिय झाले. मणिपुरी, संथम, रविंद्र नृत्य, नाटय, चाहू रास, गिड्डा, भांगडा, गरबा हे नृत्यप्रकार भरभराटीस आले. हे प्रकार अतिशय लोकप्रिय असून ते कलानिपुणतेने व नाविन्याने भरलेले आहेत. जवळ जवळ सर्व प्रांतांना स्वतःची समृद्ध अशी एक नृत्य परंपरा आहे. उदाहरणार्थ आसामचा बीहू, लडाखचे मुखवटा नृत्य, मेघालयाचे वांगळा, सिक्कीमचा भुतिया किंवा लेफ्चा. याचप्रकारे उत्तरांचलचा चोलीया, केरळचा प्रसिद्ध कलाटी पिङ्क, मणिपूरचा चांगय ही लग्नादरम्यानची नृत्ये आहेत.

सध्या तीनही कला प्रकारांची भारतात भरभराट होत आहे. अनेक नवीन संगीताचे शिक्षण देणाऱ्या संस्था नव्यांना संधी देत आहेत. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संगीताचे विभाग आहेत. खैरगडचे इंदिरा कला विश्व विद्यालय हे संगीताचे विद्यापीठ आहे. गंधर्व महाविद्यालय कथ्थक केंद्र आणि इतर अनेक संस्था संगीत प्रसाराचे कार्य करीत आहेत. संगीताच्या परिषदा, बैठकी, भाषणे, प्रदर्शनातून भारतातल्या कानाकोपऱ्यात संगीताचा प्रसार होत आहे.स्पिक–मॅके इंडिया इंटरनॅशनल रूरल सेंटर कल्चरल सेंटरने खूप मेहनत घेवून संगीत कलाकार व आधुनिक पिढयांमधे एक दुवा निर्माण केला आहे.

परदेशातही आपल्या कडील दिग्गज संगीतकार पं. रविशंकर, उस्ताद अली अकबर खाँ, अल्लारखा खाँ यांनी संगीताचा प्रसार केला व संस्थाही सुरू केल्या. परदेशातले कित्येक विद्यापीठांतून भारतीय संगीताचे डिप्लोमा आणि पदव्या देण्याची सोय आहे. साऱ्या जगभर भारतीय कलाकारांना वेगवेगळया उत्सवाचे वेळी कार्यक्रम सादर करण्यासाठी आमंत्रित केले जाते.

### आधुनिक भारतातले प्रसिद्ध नर्तक ः

कथ्थक ः पं. बिरजू महाराज, पं. शंभू महाराज, पं.गोपीकृष्ण, पं.लच्छू महाराज.

भरतनाटयम ः सरोज वैद्यनाथन, पद्मा सुब्रमण्यम, गीता चंद्रन.

ओडिसी ः केल्लुचरण महापात्रा, संयुक्ता पाणिग्रही, किरण सहगल, माधवी मुदगल

कुचीपुडी ः स्वप्नसुंदरी, सत्यनारायण शर्मा, राजा व राधा रेड्डी, सोनल मानसिंग

संगीतकार ः नारदमुनी, पं.शारंगदेव, पं.सोमनाथ, पं.अहोबाला, पं.वेकटमखी, पं.राममला, एस्.एम्.टगोरे, आचार्य के.सी.डी. ब्रहस्पती.

मागील काही शतकात नृत्य आणि नर्तक यांच्या प्रतिमेत बदल घडून आला आहे. स्वतःच्या व्यक्तिमत्व समृद्ध करण्यासाठी तरूण मुले नृत्य शिकत आहेत. काही शाळा व महाविद्यालयात नृत्य शिकविण्यासाठी नृत्य विभाग स्थापन करण्यात आले आहेत. अनेक प्रख्यात अभिजात नृत्य करणाऱ्या नर्तकांना पदमश्री व पदमभूषण देवून गौरविण्यात आले आहे.

सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मिळालेल्या नर्तिकेच्या मूर्तिपासून तर त्यानंतरच्या अनेक काळात भारतीय लोक त्यांचा आनंद व दुःख वेगवेगळया कलामधून, नृत्यांतून व गाण्यातून व्यक्त करीत आलेले आहेत. या कलांचा उपयोग त्यांच्या सर्व भावना, राग, द्वेष, ईर्षा आणि जीवन जगण्याचा संघर्ष दर्शविण्यासाठी होतो. त्याने संस्कृतिसुद्धा समृद्ध होते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न

१. शिवाचे नटराज रूप कशाचे प्रतिक आहे ?

उत्तर

२. नृत्याचे वेगवेगळे प्रकार कोणते ?

उत्तर

३. जोडया लावा.

| | |
|---|---|
| लोकनृत्य | प्रांत |
| बीहू | बंगाल |
| गरबा | मिझोराम |
| भांगडा व गिड्डा | महाराष्ट्र |
| बांबूनृत्य | काश्मिर |
| कोळी | पंजाब |
| धुमळ | गुजरात |
| चहू | आसाम |

४. नृत्याचे तीन विभाग कोणते ?

उत्तर ______________________________

५. कथ्थकच्या दोन प्रसिद्ध नर्तकांची नावे सांगा.

उत्तर ______________________________

६. भरतनाटयमचे काही प्रसिद्ध नर्तक सांगा.

उत्तर ______________________________

## १२.७ नाटक :

देशी व आधुनिक संशोधनानुसार नृत्याचा उगम वेदांमधे आढळतो. रामायणामध्ये नृत्य करणाऱ्या समुहाचे उल्लेख आहेत व कौटिल्यच्या अर्थशास्त्रात देखील संगीतकार, नृत्यकार व नाटकांच्या प्रयोगांचे उल्लेख आहेत.

नाटक ही एक ललित कला आहे. ज्याचा उपयोग शतकानुशतके होत आलेला आहे. लहान मूल खेळते, अनुकरण करते, नकला करते त्यातूनच नाटकाचा जन्म झाला.

अगदी अगदी सुरूवातीच्या काळापासून देवी देवतांमधे युद्धांच्या कथा प्रसिद्ध आहेत.भारताने नाटयशास्त्र लिहले. आणि असूर, पराजय अमृत मंथन सारखी नाटकंही निर्मिली. नाटयशास्त्र हा ग्रंथ नाटक व इतर ललितकलांविषयी लिहीला गेलेला एक प्रमुख ग्रंथ आहे.

नंतरचे युग येते ते भासाचे ज्याने रामायण व महाभारतावर आधारित नाटकं लिहिली. स्वप्नवासवदत्ता ही त्याची श्रेष्ठ कलाकृती आहे. इसवीसन पूर्व दुसऱ्या शतकातले पातंजलीचे . महाभाष्य हे नाटकाच्या विविध अंगांचा उल्लेख करते. त्यामधे कलाकार, संगीत, रंगमंच व रस इ. उल्लेख करण्यात आला आहे.

नाटयसंबंधी भाष्य करतांना भारताने नर, नारी, संगीत, नृत्य, संगीतवाद्ये, संवाद, मध्यवर्ती कल्पना व रंगमंच यांच्यावर भाष्य केले आहे. असे आपल्याला आढळते. भारतकाळात नाटकाची वाटचाल परिपूर्णतेकडे होत होती. भरतच्या मतानुसार नाटक हे संवादाचे उत्कृष्ट साधन आहे. नाटकासाठी बंदीस्त नाटयगृहाची कल्पना त्यानेच अमलात आणली. यामधे "शैलूश" नावाच्या जमातीचा उल्लेख यतो. या जमातीच्या व्यावसायिक नाटक कंपन्या होत्या. वीररसाच्या कथा गाण्यातून सादर करण्यासही खूप लोकप्रियता लाभली. याचा परिणाम म्हणून 'खुशीलावस' नावाचे व्यावसायिक गायकांचा उदय झाला.बुद्ध आणि महावीराच्या काळात या धर्माच्या तत्वांचा प्रसार करण्यासाठी नाटकाचा उपयोग झाला. नाटिका आणि नाटकांचा उपयोग लोकशिक्षणासाठी झाला. नाटकाची परिणामकता वाढविण्यामध्ये नृत्य व संगीताचे मोठे योगदान होते.

प्राचीन काळात दहाव्या शतकापर्यंत शिकलेल्या लोकांची भाषा संस्कृत होती. म्हणून नाटके या भाषेत सादर केली जात. पण समाजातील खालच्या स्तराच्या नाटकातील पात्रे मात्र प्राकृत भाषेत

संवाद म्हणतं. कौटिल्याचे अर्थशास्त्र, वात्सायनाचे कामसूत्र, कालिदासाचे अभिजात शाकुंतल ही सर्व संस्कृतमधे लिहलेली लोकप्रिय नाटके होती. भास हा प्रतिथयश नाटककार होता. त्याने तेरा नाटके लिहीली. दहाव्या शतकामध्यें प्राकृत भाषेतली नाटके सुद्धा लोकप्रिय होवू लागली. चौदाव्या शतकादरम्यान होऊन गेलेला विद्यापती हा सुद्धा महत्वाचा नाटककार होता. त्याने हिंदी आणि इतर प्रांतीय भाषेत गाणी लिहीली. याच काळातील उमापती मिश्रा व शारदा तनया सुद्धा नाटकाच्या प्रसारासाठी कारणीभूत झाले होते.

नाटकाच्या संदर्भात दोन प्रकार वृद्धिंगत झाले. एक म्हणजे अभिजात नाटक व दुसरे म्हणजे लोकनाटय उत्स्फूर्त आणि ऐनवेळेस सादर केलेले असायचे. प्रचलीत बोलीभाषा या लोकनाटयात वापरली जायची आणि वेगवेगळया प्रांतात विविध लोकनाटयाचे प्रकार विकसित झाले. संगीत व नृत्यासोबत केलेला अभिनय ही एक लोकप्रिय प्रथा होती. वेगवेगळया प्रांतात या लोकनाटय प्रकारांना विविध नावे देण्यात आली.

१. बंगाल ः जत्रा, किर्तन नाटक

२. बिहार ः बिदिशा

३. राजस्थान ः रास, झुमर, ढोला मारू

४. उत्तरप्रदेश ः रास, नौटंकी, स्वांग, भांड

५. गुजराथ ः भवाई

६. महाराष्ट्र ः लळिते, तमाशा

७. तामीळनाडू, केरळ, कर्नाटक-कथकली, यक्षगान

कुंतलेश्वर दैत्यम या नाटकामुळे कालीदास हा गुप्त काळात होवून गेला हे सिद्ध होते.

ढोल करताल. मंजिरा व खंजिरा ही वाद्ये लोकनाटयात वापरली जात.

मध्ययुगीन काळ हा संगीत व नृत्याच्या भरभराटीचा होता. मात्र नाटकाला तेवढे महत्व प्राप्त झालेले नव्हते. वाजीदअली शहा हा संगीत व नाटक दोन्हींचा आश्रयदाता होता. तो कलाकारांना नाटकात भूमिका करण्यासाठी प्रोत्साहित करत असे. प्रचलित बोली भाषेचा उपयोग करणारी लोकनाटये दक्षिणेत जास्त लोकप्रिय होती.

भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर समाजमनात बदल घडायला लागले. अठराव्या शतकादरम्यान एका ब्रिटीश गृहस्थाने कलकत्यात नाटकगृहाची स्थापना केली. होरासिम लेबेडेव्ह या नावाच्या रशियन गृहस्थाने स्थापना केलेल्या नाटयगृहापासून आधुनिक भारतीय रंगभूमीची सुरूवात भारतात झाली. विशेषतः शेक्सपिअरच्या इंग्रजी नाटकाचा मोठा प्रभाव भारतीय नाटकावर झाला.यामधे शिकलेल्या भारतीयांनी विकसित केलेल्या काही पद्धती खुल्या नाटयगृहाच्या परंपरेपेक्षा वेगळया होत्या. यामध्ये सरकते पडदे व बदलते सीन यांची भर पडली, मुंबईत स्थापन झालेल्या एका पारशी कंपनीने हे सिद्ध केले की नाटक या कलेचा व्यावसायिक उपयोग शक्य आहे. नाटकातून शोकांतिका, हास्यरसप्रधान व गुंतागुंत असलेले शहरी जीवन दाखवले जावू लागले. नाटके वेगवेगळया प्रांतीय भाषेत लिहली जावू लागली. या सोबतच लोक नाटयातले जत्रा, नौटंकी, ख्याल आणि नाच सुद्धा भरभराटीस आले. ललित कलांवर लोकनाटयातल्या काही वैशिष्ट्याचा अभिजात रंगभूमीने स्विकार

केला. लोकनाटयाचा ललित कलांवर मोठा प्रभाव पडला. या विविध क्षेत्रातील तज्ञ लोकांनी त्यांच्या कलांचा उपयोग एक माध्यम म्हणून लोकांसाठी केला.हा हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी लोककलेला तसं वळवलं. हीच परिस्थिती नाटकी लिहण्यात पण दिसायला लागली. मध्ययुगीन काळात 'विद्यासुंदर' ह्या लोकप्रिय नाटकांवर जत्रेचा (एक नाटयप्रकार) प्रभाव होता. जयदेवाने 'गीतगोविंद'तल्या कृष्णाच्या गोष्टी कीर्तननाटक व जत्रा शैलीत सांगितल्या आहेत.

अलिकडच्या काळात रंगभूमीच्या क्षेत्रात अनेक प्रयोग होत आहेत. शंभूमित्रा, बादल सरकार, विजय तेंडूलकर फैजल अल्काजी यांच्या शैलीवर पाश्चिमात्य प्रभाव आहे. आता अनेक प्रकारचे नाटय प्रकार भरभराटीस येत आहेत त्यापैकी काही खालील प्रमाणे

१. रंगमंच
२. रेडियो नाटय
३. कोपरा नाटय
४. एकपात्री प्रयोग
५. संगीत रंगभूमि
६. नाटिका
७. एकअंकी नाटक

नाटय संगीताच्या संहिता व मध्यवर्ती कल्पनेसाठी अभिजात साहित्याचा आधार लागतो. १३ व्या शतकातील जयदेवचे गीतगोविंद हा असून त्याचा प्रभाव भारतभर संगीत व नाटकावर दिसतो. थेट मणीपूर आसाम पासून गुजरात पर्यंत. मथुरा व वृदांवनपासून तामीळनाडू केरला पर्यंत याचा प्रभाव दिसून येतो. संगीत व नाटकासाठी साहित्य म्हणून गीत गोविंदची अनेक हस्तलिखिते आहेत व याचा उपयोग या प्रकारांची संहिता म्हणून केला जातो. वैष्णव पंथाच्या प्रसारामुळे नृत्य व नाटकाचे अनेक प्रकारांना पुढे येण्यास उत्तेजन मिळाले.

## १२.८ काही प्रमुख नाटके व त्यांचे लेखक :

भारतात नाटकाला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असून याचा विश्लेषणात्मक व व्याकरणदृष्टीने अभ्यास भारताच्या नाटयशास्त्रात आहे. नृत्य व संगीत यांचा नाटकांची आवश्यक अंगे म्हणून उल्लेख आहे. रामायण, महाभारत व कालीदास, वाणभट्ट व भास यांनी लिहलेल्या नाटकामध्ये संगीत, नृत्य व नाटक या तीन्हींचा संगम आढळतो. नाटककार व त्यांची नाटकांची नावे खालीलप्रमाणे

मेघदूत : कालीदास, पद्मावती : मधूसूदन, अभिज्ञान शाकुंतल : कालीदास

हर्षचरितम् : बाणभट्ट, नीलदेवी : भारतेंदू, सत्यहरिश्चंद्र : भारतेंदू,

अंधेरनगरी : भारतेंदू, चंद्रवळ : जयशंकर प्रसाद, राजश्री : जयशंकर प्रसाद,

अजातशत्रू : जयशंकर प्रसाद, चंद्रगुप्त : जयशंकर प्रसाद,

प्रायश्चित्त : जयशंकर प्रसाद, करूणामन्य : जयशंकर प्रसाद,

भारतेंदु : जयशंकर प्रसाद

## पाठ्यांशांवरील प्रश्न १२.४

१. नाटकाचा जन्म कसा झाला?

उत्तर ____________________

२. भारताच्या दोन नाटकांची नावे सांगा.

उत्तर ____________________

३. भारतच्या मते संवादाचे उत्कृष्ट साधन कोणते ?

उत्तर ____________________

४. कोणत्या जमातीच्या नाटक कंपन्या होत्या ?

उत्तर ____________________

५. खुशीलावस कोण होते ?

उत्तर ____________________

६. आजच्या युगात कोणते नाटकप्रकार भरभराटीस येत आहेत ?

उत्तर ____________________

७. कालीदासाच्या दोन नाटकांची नावे सांगा.

उत्तर ____________________

८. पद्मावती कुणी लिहले ?

उत्तर ____________________

९. जपशंकर प्रसादच्या दोन नाटकांची नावे सांगा.

उत्तर ____________________

## १२.९ ललितकलांची सद्यस्थिती ः

सद्यस्थितीत संगीत, नृत्य व नाटक हे तीनही प्रकार देशात भरभराटीस येत आहेत. गंधर्व महाविद्यालय व प्रयाग संगीत समिती अभिजात संगीत व नृत्याचे शिक्षण पन्नासपेक्षा जास्त वर्षे देत आहे. मोठया संख्येने विद्यापीठ व महाविद्यालयाचा या ललित कलांचे शिक्षण देणारे विभाग आहेत व अभ्याक्रमाचे भाग आहेत. खैरागड येथिल इंदिरा कला संगीत विश्वविद्यालय हे संगीताचे विद्यापीठ आहे. कथ्थक केंद्र, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, भारतीय कला केंद्र व आणि अनेक संस्था त्यांच्या परीने संगीताचा प्रसार करीत आहोत. संगीताच्या परीषदा, बैठका व्याख्यान यातून गायक, संगीत तज्ञ, संगीताचे शिक्षक त्यांच्या परीने संगीत लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्पिक मॅके, संगीत नाटक अकॅडमी संगीताचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सादरीकरण, संवर्धन आणि लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर संगीतकारांनी मोठे योगदान दिले आहे. पंडित रविशंकर, अल्लारखा खान व उस्ताद अली अकबर खान यांनी सुरू केलेल्या संस्था परदेशी लोकांना संगीत शिकवत आहेत. पुष्कळ आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून भारतीय संगीताचे विभाग आहेत व ते पदविका व पदवीपर्यंत शिक्षण देत आहेत. भारतीय कलाकारांना जगभरातून वेगवेगळया परिषदांमध्ये कार्यक्रम सादर करण्यासाठी निमंत्रित केले जाते. इंडियन कौसील ऑफ कल्चरल रिलेशन्स, मनुष्यबळ खाते सतत या कलांचा प्रसार करते. प्रसिद्ध कलाकारांना व तरूण कलाकारांना शिष्यवत्त्या व अनुदान देते व एक्सचेंज प्रोग्रामही राबवते.

## १२.१० ललितकला व व्यक्तिमत्व विकास ः

संगीत व नृत्याशी आलेल्या संपर्कातून संगीत व नृत्यास असलेल्या अंगभुत शक्तिमुळे मानवी मनाची जोपासना होते व आनंदी वातावरण निर्मिती हाते. या कलेचं ज्ञान व सरावामुळे व्यक्तिमत्व विकास होतो. या कलेशी संबंधित लोकांनमध्ये मानसिक संतुलन् मनःशांती मनावर तावा व प्रेम इ. गोष्टींमधे वृद्धी होते. यातल्या सहभागामुळे त्यांच्यामधे आत्मविश्वास येतो व ते सर्व परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात. यातून नकारात्मक भावनांच्या जागी प्रेम व करूणा या गुणांची वृद्धी होते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १२.५

१. सरकारमधील कोणते मंत्रालय या कलेचा प्रसार करते ?

उत्तर ______________________

२. भारत सरकारचे कोणता विभाग या कलेच्या संवर्धनता मोठी भूमिका पार पाडते ?

उत्तर ______________________

३. सुप्रसिद्ध कलाकारांना सरकार कशाप्रकारे प्रोत्साहन देते ?

उत्तर

४. ललित कला आपल्याला कशी मदत करतात ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- कलेचे तीन प्रकार : संगीत, नृत्य, नाटक भारतीय संस्कृतीची अविभाज्य अंगे
- नाटयशास्त्र चा लेखक भारतचे रंगभूमिला योगदान.
- राजकिय उलथापालथीमुळेसुद्धा या कलांवर परिणाम झाला नाही.
- तज्ञ व सामान्य लोकांनी या कलांमधला अभिजातपणा जोपासण्यासाठी खूप कष्ट आणि रस घेतला.
- ललितकलांवर मोठया प्रमाणात पाश्चिमात्य प्रभाव आहे.
- आधुनिक काळातही या कलांचे देशात व परदेशात मोठे महत्त्व आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. ललित कलांचे भारतातील मुख्य ध्येय व उद्देश काय ?

२. ललित कलांच्या विकासाचा आढावा घ्या.

३. आधुनिक संगीतात झालेल्या बदलांचे वर्णन करा.

४. लोकगीतांचे महत्व सांगा व काही लोकगीते सांगा.

५. अभिजात नृत्याचे महत्व सांगा व काही नृत्यप्रकारांची नावे सांगा.

६. ब्रिटिशांच्या आगमनानंतर नाटयक्षेत्रातले बदल विषद करा.

७. भारतात ललितकलांच्या वाढीस भरपूर वाव आहे. स्पष्ट करा.

## प्रश्नांची उत्तरे

### १२.१

१. नृत्य, नाटक, संगीत.

२. हे एक लोकशिक्षण साधन आहे.

३. भरतचे नाटयशास्त्र हे बहुधा ख्रिस्तपूर्व १ल्या इसवी सनाच्या २ऱ्या शतकात रचले गेले.

४. मातंगचे ब्रीहदेसी

५. ब्रीहदेसी ग्रंथ

६. २६४ राग

७. राधाकृष्णाचे प्रेम

८. शैवपंथी नयनरस आणि वैष्णवपंथी अल्वारस

९. इब्राहिम आदिलशहा दुसरा

१०. त्यांनी नवीन रागांची ओळख करून दिली.

## १२.२

१. अ. उत्तर हिंदुस्थानातील शास्त्रीय संगीत्

ब. दक्षिणेतील कर्नाटकी संगीत

२. ध्रुपद, धमार, ठुमरी, खयाल व टप्पा

३. ते एक गुरू शिष्य परंपरेतले विशिष्ट संगीत आहे.

४. जयपूर, किराणा व ग्वालीयर घराणी

५. मुख्य रचना

६. अ. श्याम शास्त्री

ब. त्यागराज

क. मुथ्थुस्वामी

ड. पुरंदरदास

७. वासरी, वीणा, नादस्वरम्, मृदंग्म, घटम

८. अ. कर्नाटकी अलप्पना हे भारतीय संगीतातल्या आलापर सारखंच आहे.

ब. कर्नाटक संगीतातले तिल्लाणा हे भारतीय संगीतातले तराना सारखे आहे.

क. दोनही शैलीमधे तालावर भर देतात.

९. अ. मांड राजस्थान

ब. भाटियाळी बंगाल

१०. जीवनातला प्रत्येक प्रसंग राजरा करणारी ही साधी गाणी आहेत.

## १२.३

१. वैश्विक चक्रातले लय व क्षय चक्र

२. शास्त्रीय नृत्य व लोकनृत्य

३. वीहू – आसाम, गरबा – गुजराथ,
भांगडा, गिड्डा –पंजाब, बांबू डान्स–मिझोराम,
कोळी – महाराष्ट्र धुमाळ – काश्मिर,
चाहू –बंगाल

४. अ. नृत – पदन्यास
ब. नृत्य – देहबोली
क. नाटय – अभिनय

५. पं.विरजूमहाराज, पं.शंभू महाराज, सितारादेवी, पं.गोपी कृष्ण, पं.लच्छू महाराज

६. अ. गीता चंद्रन
ब. डॉ.पद्मा सुब्रम्हण्यम्
क. श्रीमती सरोजा विद्यानाथन

## १२.४

१. लहान मूल खेळते, अनुकरण करते, नकला करते.

२. असूर पराजय, अमृत मंथन

३. नाटक

४. शैलूश

५. व्यावसायिक गायकांकडून म्हटली गेलेली वीररसपूर्ण व नाटयाने भरलेली गाणी.

६. अ. रंगमंच
ब. रेडियो नाटक
क. पथनाटय
ड. एकपात्री प्रयोग.
ई. संगीत रंगभूमि
फ. नाटिका
ग. एकांकिका

७. अ. मेघदूतम
ब. अभिज्ञान शाकुंतल

८. मधूसुदन

९. अ. अजातशत्रू
ब. चंद्रगुप्त
क. प्रायश्चित्त

ड. राजश्री

इ. करूणालय

१२.५

१. मनुष्यबळ व मनुष्यबळ विकास मंत्रालय

२. इंडियन कौन्सिल ऑफ कल्चरल रिलेशन्स (ICCR)

३. अनुदान शिष्यवृत्ती फेलोशिप आणि एक्सचेंज कार्यक्रम

४. ललित कला आपल्याला मानसिक संतुलन मनावर ताबा आणि सर्वापरी प्रेम शिकवतात. या कला आपल्याला आत्मविश्वास व परिस्थितीशी जुळवून घेणे शिकवतात.

# १३

# भारतीय स्थापत्यशास्त्र

आग्रा, दिल्ली, जयपूर, मुंबई व कलकत्ता येथील सुंदर इमारती पाहिल्या की भारतीय स्थापत्यशास्त्राची कल्पना येते. यातील काही स्तंभ, राजवाडे, मंदिरे, चर्चेस, मशीदी व स्मरके आहेत. आपल्या पुरातन वेभवाची साक्ष देणारे स्थापत्य नमुने आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये कला व स्थापत्यशास्त्र यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय इतिहासातील स्थापत्य शास्त्राची विभागणी हिंदू, बौद्ध, जैन याप्रमाणे विभागलेली होती. इंग्रजाच्या राजवटीनंतर मध्ययुगीन कालखंडात पर्शियन व अन्य शैलींचा या कलेवर प्रभाव आढळून येतो.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- भारताच्या स्थापत्य शास्त्रातील मुख्य शैलींचा अभ्यास करणे, शिल्पकलेचा अभ्यास करणे.
- भारताच्या स्थापत्यशास्त्राच्या इतिहासाचा किंवा उगमाचा अभ्यास करणे.
- भारतीय स्थापत्यशास्त्रात बौद्ध व जैन संस्कृतीच्या योगदानाचा अभ्यास करणे.
- भारतातील मंदीर उभारणीमध्ये गुप्त, पल्लव व चोल साम्राज्याचे योगदान अभ्यासणे.
- मध्ययुगीन काळातील स्थापत्यशास्त्रावर कोणकोणत्या संस्कृतीचा प्रभाव पडला आहे त्याचा अभ्यास करणे.
- इंग्रजांच्या काळातील स्थापत्यशास्त्र शैलीचा अभ्यास करणे.

## १३.१ स्थापत्यशास्त्र प्रारंभ व भारताचे योगदान ः

स्थापत्यशास्त्र ही आधुनिक कला नाही. आदिमानवाने गुहेत राहण्याची सुरूवात केल्यापासून ही कला मानवाला अवगत आहे. जंगलत राहताना मानवाने स्वतःसाठी निवारा बांधण्यास सुरूवात केली. यावरून स्थापत्यशास्त्राचा उगम म्हणजे मानवी गरज, कल्पना, क्षमता व कामगारांची कार्य क्षमता यांचे मिश्रण आहे हे लक्षात येते.

### स्थापत्यशास्त्र प्रकार व बांधकामाचे वर्णन ः

स्थापत्यशास्त्रावर स्थानिक व प्रादेशिक सांस्कृतिक परंपरा, सामाजिक गरजा, आर्थिक भरभराट, धार्मिक परंपरा इत्यादींचा प्रभाव आढळतो. भारतीय स्थापत्यशास्त्राचा विकास वेगवेगळया काळात व वेगवेगळया प्रदेशात झाला. अनेक महत्वाच्या घडामोडींवर स्थापत्यशास्त्राचा जागतिक विकास अवलंबून आहे. भारताबाहेरच्या स्थापत्यशास्त्राचा प्रभाव भारतीय स्थापत्यशास्त्रावर पडलेला आढळून येतो.

## १३.२ हडप्पा कालीन स्थापत्यशास्त्र ः

हडप्पा व मोंहोंजोदारोच्या उत्खननामध्ये प्राचीन काळातील नागरीकरण, शहरी वसाहत, नगरनियोजन इ.स्थापत्यशास्त्रीय कौशल्ये आढळून येतात. हडप्पा ही आर्यांच्या पूर्वीची उत्तम नागरी वसाहत आहे. सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था, उत्तमप्रकारचे रस्ते ही त्याकाळातील वैशिष्टे होती. हडप्पाच्या कालत ३ प्रमुख प्रकारच्या इमारतींचे बांधकाम आढळून येते. यात घरे, खांब असणारी भव्य सभागृहे व सार्वजनिक न्हाणीघरे याचा समावेश होतो. हडप्पा संस्कृतीची प्रमुख वैशिष्टे.

१. इसवीसन पूर्व तिसऱ्या शतकात या वसाहती निर्माण झाल्या असाव्यात.

२. उत्खननात गंगा नदीच्या किनाऱ्यावर काही प्रमुख नागरी वसाहती आढळून येतात.

३. नागरीकांच्या संरक्षणासाठी सर्व शहरांना संरक्षण भिंती होत्या.

४. या शहरांमध्ये परस्परांना काटकोनात छेदणाऱ्या रस्त्यांचे जाळे होते.

५. बांधकामासाठी चिखलाच्या भाजलेल्या विटांचा वापर होत असे.

६. या काळात सार्वजनिक इमारती, प्रशासकीय व व्यापारी इमारती बांधलेल्या आढळतात. परंतु मंदिर बांधकामाचा कोणताही पुरावा त्या काळात आढळून येत नाही.

७. सार्वजनिक इमारतींमध्ये धान्य कोठारांचा समावेश होता.

८. वरील बांधकामाशिवाय एका एका लहान खोल्यांचे बांधकाम आढळते या बहुदा कामगारांच्या उपयोगासाठी बांधण्यात आल्या असाव्यात.

९. हडप्पा काळात अभियांत्रिकी कला अस्तित्वात होती. याचा पुरावा म्हणजे मोहंजोदडो येथील भव्या सार्वजनिक स्नानगृह ते आजही सुस्थितीत आहे. तसेच प्रत्येक घरामध्ये स्नानगृहे व विहीरी आढळून आल्या. यावरून त्या लोकांची स्वच्छतेविषयीची जाणित स्पष्ट होते.

१०. काही बांधकाम अवशेषांमध्ये घरांमध्ये कोठारे आढळून येतात. ही घरे बहुधा राज्यकर्त्यांची असावीत.

११. शहरांना तटबंदी होती यावरून त्याकाळात शहरांवर हल्ला होण्याची भिती होती हे ज्ञात होते.

१२. गुजराथ मधील लोथल येथे बंदर अस्तित्वात असल्याचे दिसते. यावरून त्या काळात समुद्रामार्गे व्यापार चालत होता असे हे सिद्ध करता येते.

दुसरे महात्वाचे वैशिष्टय म्हणजे येथील लोकवस्तीमध्ये आणि शहरामध्ये सुनियोजित भूमिगत गटारांची

पद्धती होती. घराघरातील लहान गटारे मुख्य मोठया गटारांना जोडलेली असायची. मुख्य गटारे मुख्य रस्त्याच्या बाजूनी काढलेली असायची. गटारे भूमिगत असून गटारे स्वच्छ करण्यासाठी त्यावरील आच्छादने सैल ठेवलेली असायची. राहण्याच्या घराचे नियोजन निटनेटकेपणे केलेले असायचे. या ठिकाणी जिन्याचे अवशेष आढळतात. यावरून तेथील घरे दुमजली असावीत. घराचे दरवाजे बाजूच्या गल्लीत उघडत असत. त्यामुळे धुळीपासून घराचा बचाव होत असे.

हडप्पा वास्तुकलेचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे त्यांचे शहर नियोजनबद्ध आणि कौशल्यपूर्ण होते. ही शहरे भौमितिक चौकोनी आराखड्यानुसार बांधलेली असत. रस्ते चौकात एकमेकांना काटकोनात छेदत. त्यांची व्यवस्थित बांधणी केलेली असे. सिंधू संस्कृतीमधील वस्त्या ह्या नद्यांच्या किनाऱ्यावर असत. आणि त्या मुख्य पुरांनी वारंवार उध्वस्त होत असत. असे होऊनही लोक तेथेच आपली नवी घरे बांधत. यामुळे वस्तीचे व इमारतीचे थरामागून थर उत्खननातून आढळून आले आहेत. सिंधू संस्कृतीचा ऱ्हास इ.स.पूर्व दुसऱ्या सहस्त्रकातील शेवटी कसा झाला हे आजही गूढ आहे.

हडप्पा काळातील सर्वात महात्वाचे स्थापत्यशास्त्राचे वैश्टि म्हणजे दर्जेदार शहर नियोजन व कौशल्य पूर्ण रस्ता बांधणी. शिल्पकला व घरगुती कला कौशल्य यांचा विकास झाला होता. मोहजदरो मध्ये प्रथमच नृत्य करणाऱ्या मुलीचे शिल्प आढळून आले. योगमुद्रेमधील पुरूषाचे शिल्प सुद्धा आढळून आले आहे. त्यानंतर आर्यांचा उदय झाला. आर्य लाकडांच्या घरात राहत असत. आर्य संस्कृती ग्रामीण संस्कृती होती. आलिशान महालांच्या उभारणीसाठी लाकडाचा उपयोग केल जात असे. यज्ञवेदी त्याकाळी महत्वाची मानली जात होती. अनेक धार्मिक कार्यात आर्य यज्ञवेदीचा उपयोग करित असत. गुरूकुलाचे अस्तित्वही याच काळात आढळून आले आहे. ६व्या शतकात जैन व बौद्ध या धर्मांचा उदय झाला. या काळात स्थापत्यशास्त्रावर जैन व बौद्ध संस्कृतीचा प्रभाव आढळून आला आहे. बौद्ध धर्मातील स्तुप हे स्थापत्यशास्त्राचा सर्वोत्कृष्ट नमुना आहे. मोठया टेकडीवर स्तुपाचे बांधकाम केले जात असे. त्यामध्ये भाजलेल्या विटांचा वापर केलेला आढळून आला आहे. लुंबीनी हे गौतम बुद्धाचे जन्मस्थळ आहे. तेथे स्तुप आढळून येतो. दुसरा स्तुप गया येथे आहे. येथे बोधीवृक्षाखाली बौद्धाला ज्ञानप्राप्ती झाली. सारनाथ येथे असाच स्तुप आहे. बौद्ध व जैन काळात स्तुप़ विहार व चैत्यांचे बांधकाम झाले. कुशीनगर येथे बुद्धाचे अवशेष पुरले आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.१

१. भारतीय संस्कृतीची उत्क्रांती म्हणजे काय ?

उत्तर

२. हडप्पा संस्कृतीची वैशिष्टये सांगा.

उत्तर

३. हडप्पा काळात अभियांत्रिकी कौशल्य कसे होते ?

उत्तर

४. बुद्धांचे अवशेष कोठे पुरले आहेत ?

उत्तर

५. बुद्धांचे स्तूप कोठे उभारले आहे ?

उत्तर

६. भारतात पहिले मंदिर कधी बांधले गेले ?

उत्तर

७. बुद्ध विहार व चैत्य म्हणजे काय ?

उत्तर

८. वंदर कोठे आढळले आहे ?

उत्तर

## १३.३ भारतीय स्थापत्यशास्त्राचा प्रारंभ

भारतीय स्थापत्यशास्त्राचा प्रारंभ मौर्य काळात झाला. या काळात सर्व क्षेत्रात प्रगती झाली. मॅगेसथॅनीस या ग्रीक ॲवेंझेडर ने चंद्रगुप्त मौर्याच्या काळातील स्थापत्यशास्त्रातील कौशल्यांवर प्रकाश टाकला आहे. चंद्रगुप्त मौर्याचा राजवाडा म्हणजे लाकडातून कोरलेला प्रचंड महाल आहे. असे मॅगॅस्थेनिसने राजवाडयाचे वर्णन केले आहे.



साचीचा स्तूप

अशोकाच्या काळात मौर्य साम्राज्यात (इ.स.पू.३२२-१८२) मोठया प्रमाणावर स्थापत्य शास्त्राचा विकास झाला होता. त्यावर ग्रीक व पर्शियनांचा प्रभाव होता. अशोकाच्या काळात स्तंभाची उभारणी झाली. त्यांवर धम्माची वचने कोरली होती. भारतीय संविधानामध्ये अशोकचक्र व सारनाथ स्तंभावरील सिंहाचा मानचिन्ह म्हणून स्विकार केला आहे. मौर्यकाळातील स्थापत्यशास्त्राचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून



साची व सारनाथ येथील स्तुपांचा उल्लेख करता येईल. जातककथेतील चित्रे सांची स्तुपावर कोरली आहेत.

त्यानंतर ग्रीक व भारतीय कलेचा संयोग होऊन गांधार विचारधारा विकसीत झाली. त्याशिवाय मथुरा व अमरावती विचारधारा स्थापत्यशास्त्रात आढळून येते. कुशाणांच्या काळात याचे अस्तित्व आढळून येते.

मथुरेतील शिल्पे/चित्रे लाल ठिपक्यांच्या दगडात बनलेली आहेत. याठिकाणी बौद्ध व जैन या दोन्ही संस्कृतीचा स्थापत्यशास्त्रावर प्रभाव आढळून येतो.



सातवहानाच्या आश्रयाखाली अमरावती विचारधारा विकसीत झाली होती. लोअर गोदावरी विभागात मोठा स्तुप आहे.



बौद्ध स्थापत्यशास्त्रासाठी प्रसिद्ध असणारे दुसरे ठिकाण म्हणजे नागार्जुन कोंडा आहे. हिंदू मंदिरांची उभारणी गुप्त कालखंडात झाली आहे. झांशी जिल्ह्यातील देवगड येथील मंदिर याचे उदाहरण आहे. त्यामध्ये गाभारा व गर्भगृह आहे. कानपूर जिल्ह्यातील भित्रीगाव येथे दुसरे आहे. ही या काळातील सर्वोत्कृष्ट मंदिरे आहेत.

## लेणी स्थापत्यशास्त्र ः


भारतीय स्थापत्यशास्त्रामध्ये लेणी स्थापत्यशास्त्र हा विकासातील एक मोठा टप्पा आहे. एक हजाराहून अधिक लेण्यांचे काम इसपूर्व दुसरे शतक ते इ.स. दहाव्या शतकात दरम्यान झाले आहे. महाराष्ट्र ातील अजिंठा व वेरूळच्या लेण्या प्रसिद्ध आहेत. यामध्ये बौद्ध विहार, चैत्य, मंडप इ. असून हिंदू देव देवतांची चित्रे साकारली आहेत.



Group of Monuments at Mahabalipuram
महाबलिपूरम

## मंदिर स्थापत्यशास्त्र ः

गुप्तांच्या काळातील मंदिरे बांधण्याचे काम नंतरच्या कालावधीत ही सुरूच राहिले. दक्षिण भारतात


लाला किल्ला

पल्लव, चोल, पांडया, होशाल व त्यानंतर विजयनगरच्या राजांनी मोठी मंदिरे बांधली. महाबलीपूरम येथे पल्लवांनी मोठे मंदिर बांधले. पल्लवांनी कैलासनाथ व वैकुंठ पेरूमल मंदिर कांचीपूरम येथे बांधले. तंजोर येथील बृद्धेश्वराचे मंदिर चोल राजांनी बांधले. चोल राजांनी द्रविड पद्धतीचे बांधकाम केले.


Kandariya Mahadev Temple
Khajuraho Temples खजुराहो मंदिर

द्रविड प्रकारच्या मंदिराच्या बांधकामा शिखर उंच भिंती आणि गोपूर यांचा समावेश होतो. उत्तर व पूर्व भारतामध्ये नागर पद्धतीचे बांधकाम आढळून येते. यामध्ये शिखर व गर्भगृह व मंडपाचे काम आढळून येते. ओरिसा मध्येही काही सुंदर मंदिरे आहेत. गंगा राजांनी लिंगराज मंदिर बांधले आहे. भुवनेश्वर येथील मुक्तेश्वराचे व पुरी येथील जगन्नाथाचे मंदिर प्रसिद्ध आहे. १३ व्या शतकात कोणार्क येथे सूर्यमंदिर नरसिंह देवल या गंगा राज्यकर्त्यांनी बांधले. हे मंदिर सूर्याला अर्पण केले आहे. १२ चाके असलेल्या रथावर हे मंदिर आहे. मंदिराचा समूह खजुराहो येथे चंडेला राजांनी बांधला. बुंदेलखंड या मध्यप्रदेशच्या भागात याचे बांधकाम आहे. यात महत्वाचे कंदारिया महादेव मंदिर आहे.

राजस्थानातील माऊंट अबू दिलवाडा मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. जैन तीर्थकारांना हे मंदिर समर्पित आहे. शुद्ध सफेद संगमरवराचे हे बांधकाम आहे. सोलंकी राज्यकर्त्यांनी याचे बांधकाम केले आहे.

गुजरातचे सोमनाथ मंदिर, बनारसचे विश्वनाथ मंदिर, मथुरेतील गोविंद मंदिर, गोहत्ती मधील कणाख्य मंदिर, काश्मीरचे शंकराचार्य मंदिर, कालीघाट येथील कालीचे मंदिर याप्रमाणे महत्त्वाची मंदिरे बांधलेली आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.२

१. चंद्रगुप्त मोर्याच्या राजवाडयाचे मेगसस्थॅनीसने कसे वर्णन केले आहे.

उत्तर

२. मोर्य स्थापत्यशास्त्राची वैशिष्टे दाखविणारे दोन स्तुप कोणते ? त्यांची नावे सांगा.

उत्तर

३. अशोकाच्या काळात धम्म वचने कशावर कोरली होती ?

उत्तर

४. प्राचीन काळातील तीन स्थापत्य विचारधारांची नावे सांगा.

उत्तर

५. उदयगिरी लेण्या कोठे आहेत ?

उत्तर

६. वेरूळ येथील कैलास मंदिर कोणी बांधले आहे ?

उत्तर

७. महावलीपुरम येथील रथ मंदिर कोणी बांधले ?

उत्तर

८. द्रविड प्रकारच्या मंदिराच्या बांधकामात कशाचा समावेश होतो ?

उत्तर

९. तंजोर येथील चोल राजाने बांधलेले मंदिर कोणते ?

उत्तर

१०. नागर प्रकारचे स्थापत्यशास्त्र म्हणजे काय ?

उत्तर

११. कोणार्क येथील सूर्य मंदिर कोणी बांधले ?


उत्तर

१२. माऊंट अवू राजस्थान येथील प्रसिद्ध जैन मंदिराचे नाव सांगा.

उत्तर

## १३.४ मध्ययुगीन काळातील स्थापत्यशास्त्र ः

### दिल्ली सल्तनत ः



कुतुबमिनार

१३ व्या शतकातील तुर्कांच्या आगमनानंतर स्थापत्यशास्त्रात नवीन प्रगती झाली. ज्यामध्ये पर्शियन, अरेबियन व मध्य आशिया स्थापत्य पद्धतींचा समावेश होतो. या स्थापत्यशास्त्रामध्ये कळस, चक्र किंवा कमानीच्या आकाराचे बांधकाम इ. वैशिष्टे आढळून येतात. राजमहाल, मशिदी इत्यादींचे बांधकाम याकाळात झाले होते. तुर्की राजांनी स्थानिक कलाकारांच्या सहाय्याने बांधकामे केली आहेत. या काळातील सर्वात जुन्या इमारती म्हणजे दिल्ली येथलि क्वालुल इस्लाम मशिद व कुतुबमिनार या होत. कुतुबमिनार हा मिनार असून ७0 मिटर उंच आहे. यानंतरच्या बादशहांनी अनेक इमारती बांधल्या. अल्लाउद्दिन खिलजीने क्वालुल इस्लाम या मशिदीचे बांधकाम पुढे वाढवून आणखीन सुंदर केले. त्याला एक प्रवेशद्वार बनवले. ज्याला अलाही दरवाजा असे म्हणतात. आजही स्थापत्यशास्त्रात याचे सौंदर्य वाखाणले जाते. त्याने हौस खास या इमारतीचे बांधकाम केले. ज्यामध्ये जलशक्तीचा वापर केला गेला आहे. तुघलकाबादचे किल्ला हा ही उत्कृष्ट स्थापत्यशास्त्राचा नमुना आहे.

### प्रादेशिक राजघराणी ः

बंगाल, गुजरात व दक्षिणेकडे स्वतंत्र प्रादेशिक राजघराणी स्थापन झाल्याने त्या त्या प्रदेशात त्यांच्या पद्धतीचे स्थापत्यशास्त्र आढळून येते. जामा मशिद, सदी सय्यद, माहीद, व अहमदाबाद येथील हलते मनोरे ही काही उदाहरणे आहेत. मंडू येथे जामा मशिद, हिंदोळा महाल, जहाज महाल आहेत. गुलबर्ग्याची जामा मशिद, बिहारच्या महमंद गचान येथील मदरसा, इब्राहिम रौउझा, विजापूरचे गोल घुमट व गोवळकोंडा किल्ला इत्यादी त्यापैकी काही आहेत. गोलघुमट जगातील सर्वात मोठा घुमट आहे.

### बहामनी ः

बहामनी राजांनी पर्शियन, सिरीया, तुर्की इ.शैली आत्मसात केल्या होत्या. यातील गुलबर्ग्याची जामा मशिद प्रसिद्ध आहे. यातील मशिद परिसर अनेक कळसांनी व्यापला आहे. भारतातील ही एकच मशिद अशी आहे की तिचा संपूर्ण परिसर आच्छादित आहे. घुमट, कमानी आणि मिनार ही तुर्की स्थापत्यशास्त्राची शैली आहे.

### मोगल ः

मोगलांच्या काळात स्थापत्यशास्त्राला नवीन दिशा मिळाली. अकबराच्या काळात मोगल कलेला प्रारंभ झाला. या काळातील पहिली इमारत म्हणजे हुमायुन घुमट जो दिल्लीत बांधला आहे.



यामध्ये लाल दगडाचा वापर केला आहे. अनेकांनी त्यास ताजमहाल पूर्वीची कला म्हटले असून ताजमहाल बनवण्यासाठीची प्रेरणा हुमायुन घुमट आहे. अकबराने आग्रा व फत्तेहपूर सिक्री इथे किल्ले बांधले. बुंदेल दरवाजा म्हणजे मोगल राजवटीचा स्थापत्यशास्त्रातील वारसा आहे. पर्शियन व भारतीय स्थापत्य कलेचे उदाहरण म्हणजे सलीमचिश्ची, जोधाबाई महाल, इबादत खाना, बिरबल महल व फत्तेहपूर सिक्रीच्या अन्य इमारती आहेत. लालकिल्ला व दिल्लीची मस्जिद व ताजमहाला याची उत्तम उदाहरणे आहेत. ताजमहालचे बांधकाम शहाजहानने केले होते. इमारतीवरील अलंकारिक नक्षीला 'पिएट्राडयुरो' असे म्हणतात.

### अकबराने फत्तेपूरसिक्री येथे बांधलेल्या इमारतींचे वर्णन :

अकबराच्या काळात मोगल स्थापत्यशास्त्राचा प्रारंभ झाला. त्याने अनेक महत्त्वाच्या इमारती बांधल्या. फत्तेपूर सिक्री इथे त्यांनी नवीन राजधानी बांधली. बुलंद दरवाजा हे जगातील उत्तम प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. सलीम चिश्ती चीकवर सौंदर्याचे उत्तम उदाहरण आहे. नियोजन व सुशोभीकरणासाठी दिवाणी आम व दिवाणी खास प्रसिद्ध आहेत. इबादतखाना व पंचमहाल या अन्य सुंदर इमारती आहेत. पंचमहाल हा पिरॅमीड आकाराचा असून पांच मजली आहे. बौद्ध विहाराच्या प्रमाणे त्याचा आकार आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १३.३

१. तुर्की स्थापत्यशास्त्राची शैली कोणती ?

उत्तर ______________________

२. मोगलांच्या काळात बांधलेल्या घुमट व मशिदीची नावे सांगा.

उत्तर ______________________

३. जगातील सर्वात मोठया घुमटाचे नाव काय ?

उत्तर ______________________

४. पियट्राडयुरो म्हणजे काय ?

उत्तर ______________________

५. मोगल राजवटीमधील स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून कोणती इमारत प्रसिद्ध आहे ?

उत्तर ______________________________

## १३.५ वसाहती काळातील स्थापत्यशास्त्र व आधुनिक कालखंडः

कार्यालयीन इमारतीमध्ये वसाहत कालीन स्थापत्यशास्त्राचे प्रतिबिंब दिसते. युरोपियन लोकांनी अनेक चर्चे व इमारती बांधल्या. पोर्तुगीजांनी गोव्यात अनेक चर्चे बांधली.यातील महत्त्वाची चर्चेस म्हणजे बिसीलीका बोम, जिझस व सेंट फ्रांसीसचे चर्च ही आहेत. ब्रिटिशांनी प्रशासकीय व निवासी इमारतींचे बांधकाम केले. रोमन व ग्रीक स्थापत्यशास्त्राचाही प्रभाव ब्रिटीशांच्या स्थापत्यशास्त्रावर आढळून येतो. लोकसभा इमारत व कॅनॉट प्लेस या दिल्लीतील इमारती त्याची उत्तम उदाहरणे आहेत. कलकत्याची व्हिक्टोरिया मेमोरीयल इमारत संगमरवरामधील उत्तम बांधकामाचा नमुना आहे. सध्या या इमारतीत ब्रिटीशकाळातील वस्तुंचे उत्कृष्ट असे संग्रहालय आहे. सेंट पॉल यांचे कलकत्ता येथील चर्च अत्यंत सुंदर आहे. मुंबईतील विक्टोरीया टर्मिनल हे बांधकामाचे उत्तम उदाहरण आहे. चंदिगड मध्ये अनेक इमारतींचे बांधकाम फ्रेंच आर्कीटेक्चर कार्बुसिअरने केले आहे. मागील काही दशकांमध्ये भारतात अनेक प्रतिभावान भारतीय स्थापत्यशास्त्रज्ञ उदयास आले आहे. उदा. राज रेवाल, चार्लस कोरिया रेवाल यांनी स्कोप कॉम्प्लेक्स (इमारत समूह) व जवाहर व्यापार भवन या इमारती पूर्णत्वास नेल्या आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.४

१. पोर्तुगीजांनी गोव्यात बांधलेली प्रसिद्ध चर्चे कोणती ?

उत्तर ______________________________

२. राष्ट्रपती भवनाची रचना करणाऱ्या स्थापत्यशास्त्रज्ञाचे नाव सांगा.

उत्तर ______________________________

३. ब्रिटीश राजवटीत बांधलेल्या इमारतीमध्ये कोणती वास्तूशैली वापरण्यात आली आहे ?

उत्तर ______________________________

४. कलकत्त्याच्या विक्टोरिया मेमोरियलमध्ये सध्या काय आहे ?

उत्तर ______________________________

५. चंदिगड शहरांची रचना कोणी केली ?

उत्तर ______________________________

६. दिल्लीतील इंडियन इंटरनॅशनल सेंटर चा आराखडा तयार करणाऱ्या वास्तुविशारदाचे नाव सांगा.

उत्तर

७. आधुनिक भारतातील काही प्रसिद्ध वास्तुरचनाकारांची नावे सांगा.

उत्तर

## १३.६ भारतातील शहरे व नगरे :

नागरीविकासाशी संबंधीत असणारे नियोजन म्हणजे नगरनियोजन होय. भारतात नगररचना व नियोजनाचा दीर्घ इतिहास आहे. इसपूर्व २३५0 पर्यंत त्याचा मागोवा घेता येतो. मोहंजोदरो हडप्पाच्या काळात उत्तम नगररचना होती. ड्रेनेज, रस्ते, इत्यादी गोष्टी अस्तित्वात होत्या. राजगीर, वाराणसी, आयोध्या, हस्तिनापूर व द्रविड संस्कृतिचा संगम पाहायला मिळतो. मौर्यांच्या काळात जनपद (खेडे) व महाजनपद (नगर) अशी नगररचना अस्तित्वात होती.

इस्लामी राजवाटीत भारतीय वास्तुरचनाशास्त्रावर इस्लामी संस्कृतीचा प्रभाव आढळून येतो. नागरी भागात मशिदी, किल्ले व राजप्रसाद आढळून येतात.

मोठया शहरांचे लहान लहान भागास कसबा म्हणत असत. ब्रिटीशांनी भारतात आल्यावर पणजी हे शहर गोव्यात वसविले. महाराष्ट्रात मुंबई, मच्छलीपट्टनम, मद्रास इ. शहरे याच कालखंडात वसविण्यात आली. १८५३ नंतर भारतात रेल्वेही ब्रिटीशांनी आणली.

२0व्या शतकाच्या प्रारंभी मुंवई, कलकत्ता, मद्रास ही तिन्ही शहरे प्रशासनासाठी महत्त्वाची समजली जात. तसेच वाणिज्य व औद्योगिकदृष्ट्या ही त्याल महत्व होते. काही महत्वाची ठिकाणे जसे कलकत्याचे डलहौसी चौक, फोर्ट सेंट जार्ज मद्रास ,दिल्लीचे कॅनॉट प्लेस, मुंबईतील मरीन ड्राईव इथला सागरी किनारा युरोपियन लोकांना त्याच्या घराची म्हणजे इंग्लंडची आठवण करून देत असे. याशिवाय काही महत्वाची थंड हवेची ठिकाणे विकसीत झाली. उदा.मसुरी, सिमला, नैनिताल, दार्जिलिंग, शिलांग, निलगीरी, कोडाई कॅनॉल इत्यादी. नवीन नागरी वसाहतीसुद्धा विकसीत झाल्या.

नागरी वसाहतीत ब्रिटीश सनदी अधिकारी राहत असत. ब्रिटीश लष्करी अधिकाऱ्याची वसाहत म्हणजे कॅन्टोन्मेंट होय.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.५

१. प्राचीन भारतात उदयाला आलेल्या ५ शहरांची नावे सांगा.

उत्तर

२. ब्रिटीशांनी उभारलेली ५ बंदरे सांगा.

उत्तर

३. ब्रिटीशांनी विकसीत केलेली ५ थंडहवेची ठिकाणे कोणती ?

उत्तर ______

४. नागरी वसाहतीत कोण राहत असत ?

उत्तर ______

५. कॅन्टोनमेंट म्हणजे काय ?

उत्तर ______

## १३.६.१ चैन्नई :



चैन्नई हे शहर पूर्वी मद्रास या नावाने ओळखले जात असे. ही तामिळनाडूची राजधानी आहे. हे चार महानागरांपैकी एक आहे. १९४७ च्या नंतर चैन्नई ही मद्रास राज्याची राजधानी म्हणून ओळखली जावू लागली. १९६८ मध्ये मद्रासला तामिळनाडू म्हणून ओळखले जावू लागले. चैन्नई वरील ब्रिटीशांचा प्रभाव विविध चर्च, इमारती, वसाहतीवरून दिसून येतो.




हायकोर्टाची इमारत १८९२ मध्ये बांधली. लंडन नंतर ही सर्वात मोठी न्यायालय इमारत म्हणून ओळखली जाते. सेंट जॉनचर्च, पोस्ट ऑफिस या इमारतींवर आधुनिक वास्तुशास्त्राचा प्रभाव आहे. ब्रिटीश काळात आइस हाऊसचा उपयोग बर्फाचे मोठे ठोकळे साठवून ठेवण्यासाठी होत असे. जहाजाने ते अमेरिकेतून आणले जात असत. चर्च ऑफ सेंट जॅन ही सुंदर इमारत आहे. त्याला मनोरा आहे. पोरबंदर दगडातून ते उभारले आहे. त्याचे छत टिक वूड लाकडापासून बनवले आहे. त्याची जमीनीची फरशी इंग्लंडहून मागवली आहे. चैन्नईतील मध्यवर्ती टपाल कार्यालय १८७२ मध्ये बांधून पूर्ण झाले. त्यास मध्यवर्ती हॉल असून त्याला उंच घुमट आहे. हे एक उत्तम पर्यटक आकर्षण स्थळ आहे.



## १३.६.२ कोलकोता :

कोलकोताचा इतिहास अत्यंत रंजक आहे. आपणास माहिती आहे का, की कोलकाता ही ब्रिटीश काळात १९११ पर्यंत ब्रिटीशकालीन भारताची राजधानी होती. या शहराची रचना १६८६ मध्ये झाली. १७५६ मध्ये सिराज-उद-

दौलाने आक्रमण करून ब्रिटीशांना या शहराबाहेर घालवले. १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली. नवाबाचा पराभव करून रॉबर्ट क्लाईव्ह यांनी शहराचा ताबा घेतला. १७७४ मध्ये कलकता येथे सुप्रीम कोर्टाची स्थापना झाली. १९११ मध्ये राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला स्थलांतरीत झाली. कलकत्ताचे कोलकाता म्हणून २००१ मध्ये नामांतर करण्यात आले.





हावडाब्रीज हुबळी नदीवर आहे. या पुलामुळे हावडा व कोलकाता ही शहरे जोडली जातात. २७० फुट उंच खांबावर हा पुल आधारलेला आहे. याची जोडणी कोणताही स्क्रू किंवा नट यांचा वापर न करता झाली आहे. कोलकाताचे प्रतिक म्हणून हा पुल ओळखला जातो. जगातील कोणत्याही पूलावरून होणाऱ्या रहदारीपेक्षा सर्वात जास्त रहदारी या पुलावरून होते.



उत्तर कोलकातामध्ये मार्बल महल आहे. १८३५ मध्ये याचे बांधकाम झाले. तिथे कलादालन आहे. त्यामध्ये शिल्प, चित्रे व तैलचित्रे आहेत. तिथे प्राणी संग्रहालयसुद्धा आहे. तिथे दुर्मिळ पक्षी पाहायला मिळतात.



हुबळी नदीच्या तीरावर फोर्ट विल्यम आहे. इ.स.१६९६ मध्ये रॉबर्ट क्लाईव्ह यांनी बांधकामाची सुरूवात केली. व १७८० मध्ये ते पूर्ण झाले. आक्रमण थोपविण्यासाठी त्याची उभारणी झाली होती. कोलकाता येथे विक्टोरिया मेमोरियल हॉल हे प्रसिद्ध म्युझियम आहे. ते १९२१ मध्ये उभारले आहे. ६४ एकर क्षेत्रावर या म्युझियमची उभारणी झाली आहे. १८६४ मध्ये इडन गार्डन क्रिकेट क्लबची स्थापना झाली. या मैदानात १,२०,००० प्रेक्षक बसू शकतात. रायटर्स इमारतीची उभरणी १६९० मध्ये सुरू झाली. गर्व्हनर ॲशले एडनच्या काळात १८७७ मध्ये त्याची पूर्तता झाली.



Kandariya Mahadev Temple
Khajuraho Temples



### १३.६.३ मुंबई :

अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर मुंबईची उभारणी झाली आहे. हा सात बेटांचा समुह होता. १७ व्या





शतकात ब्रिटीशांच्या आगमनानंतर मुंबईची खरी ओळख निर्माण झाली. त्यास बॉम्बे म्हणत असत. भारतात या शहरात प्रथम रेल्वे आली. मुंबई व कोलकाता या दोन शहरातून एकाच वेळी वर्तमानपत्रे प्रसिद्ध होण्यास सुरूवात झाली.

१९ व्या शतकाच्या मध्यात या ठिकाणी सचिवालय, कौसिंल हॉल, एलफिल्टन कॉलेज व सर्वात महात्वाचे म्हणजे व्हिक्टोरिया टर्मिनस (आताचे शिवाजी टर्मिनस) अस्तित्वात आले.

प्रसिद्ध गेटवे ऑफ इंडियाची उभारणी किंग पंचम जॉर्ज व क्विन मेरीच्या भारताच्या आगमन प्रसंगी त्यांच्या स्वागतासाठी करण्यात आली. १९२४ मध्ये २४ लाख रू. खर्चून ही इमारत वांधली होती. त्यास २६ मीटर उंचीची कमान आहे. मुंबई हे महत्वाचे औद्योगिक व व्यापारी शहर आहे. स्टॉक एक्स्चेंज, मोठी व्यवसाय केंद्रे, फिल्म इंडस्ट्री (बॉलिवुड) येथे आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.६

१. चेन्नईच्या चार प्रसिद्ध ठिकाणाची नावे सांगा.

उत्तर ______________________

२. कोलकात्याच्या चार प्रसिद्ध ठिकाणांची नावे सांगा.

उत्तर ______________________

३. मुंबईच्या चार प्रसिद्ध ठिकाणांची नावे सांगा.

उत्तर ______________________

### १३.६.४ दिल्ली :

१९११ पासून दिल्ली ब्रिटीश कालीन भारताची राजधानी बनली ती आजतागायत. म्हणून दिल्लीचा शतक महोत्सव २०११ मध्ये साजरा केला गेला. दिल्लीला खूप प्राचीन इतिहास आहे. यमुना नदीवर दिल्ली वसली आहे. तिला इंद्रप्रस्थ नावाने ओळखले जात असे. दिल्ली ही अत्यंत मोठी नगरी



आहे. केवळ भारतातील नव्हे तर जगातील.

अशोकाच्या काळात वासुकी नावाचा नागराज कुतुबमिनारच्या लोखंडी खांबाखाली गाडला गेला. मात्र राजा तोमर आनंग पाल (लालकोटचा राजा) याने दिल्ली वर राज्य प्रस्थापित केले तेंव्हा त्याने हा खांब उखडून काढला व त्याने नागराजास मोकळे केले. त्यानंतर असे भाकीत वर्तवण्यात आले की कोणतेही साम्राज्य दिल्लीवर दीर्घकाळ राज्य करू शकणार नाही. कुतुबउद्दीनने कुतुबमिनारचे काम केले. त्यामध्ये नंतर अल्तमशने सुधारणा केली. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात सिरी हे मध्यवर्ती सत्ताकेंद्र बनले. सिरी किल्ला ही अस्तित्वात आला. अल्लाउद्दीन खिलजीच्या राज्याला सतत मोगलांच्या आक्रमणाला तोंड द्यावे लागत असे. काही मोगलांनी बंड पुकारले. अल्लाउद्दीन खिलजीने त्यांची शिरे कापून हत्या केली. व त्यांची शिरे शहराच्या भिंतीखाली गाडून टाकण्यात आली. म्हणून या जागेला सिरी हे नाव पडले. गियसुद्दीन तुघलकने तुकलघाबाद शहराची स्थापना केली. महंमद बिनतुघलकने जुन्या दिल्लीची उपनगरे एकत्र करून त्यास जहापनाह असे नाव दिले.





इबान बटुटा हा महमंद तुघलकाच्या दरबारात होता. त्याने दिल्ली शहराचे वर्णन करताना म्हटले आहे की, दिल्ली हे भारताचे महानगर आहे हे शहर सौंदर्य पूर्ण आहे. ह्या शहराभोवती संरक्षक भिंत आहे जी जगातल्या कोणत्याही शहराभोवती नाही.



तुघलक राजवटीतील दुसरा राजा म्हणजे फिरोजशाह या काळात दिल्लीची लोकसंख्या प्रचंड होती. त्याने फिरोजाबादची स्थापना केली. जे फिरोजशाह कोटला मैदानाजवळ आहे. मात्र समरकंदचा राजा तिमूर याने १३९८ मध्ये आक्रमण केल्यानंतर जहापनाहचे वैभव नष्ट झाले. भारतीय मिस्त्रींच्या सहाय्याने त्याने समरकंद येथे मशिद बांधली. यानंतरच्या राजांनी दिल्लीहून राजधानी आग्रा येथे हलविली.

मुघल बादशहा हुमायुनने दिनपनाह हे राजधानीचे शहर बांधले. प्राचीन इंद्रप्रस्थावर ही इमारत

आहे. मात्र शहाजहानच्या काळात दिल्लीचे गतवैभव पुन्हा प्राप्त झाले. त्याने लाल किल्याची उभारणी १६३९ मध्ये सुरू केली व १६४८ मध्ये ते काम पूर्ण झाले. त्याने १६५0 मध्ये जामा मशिद बांधली. शहाजहानच्या शहराला शहजहानाबाद असे नाव पडले. दर, मिर, मिर्झा गालिब इ. नी गझल लिहून उर्दु भाषेला प्रसिद्धी मिळवून दिली. इराकच्या बगदाद शहरापेक्षाही शहजानाबाद हे जास्त सुंदर शहर होते. हे शहर नादिरशहा (१७३९)च्या सैन्याने लुटल होते. अहमदशाह अब्दाली (१७४८) यानेही दिल्लीची लूट केली. मात्र तरीही दिल्लीचे सौंदर्य कमी झाले नाही. येथील नृत्य, संगीत, नाटक व स्वादिष्ट खाणे प्रसिद्ध आहे.

असे म्हणतात की, दिल्ली हे किमान २४ सुफी संतांचे शहर आहे. यापैकी काही खालीलप्रमाणे

१. मेहरूली स्थित कुतुबद्दिन भक्तीयार काकी

२. निजामउद्दिन अवलिया ज्याचे समाधीस्थळ निझामउद्दिन येथे आहे.

३. शेख नसरूद्दिन मोहमंद ज्यास चिराग–ए–दिल्ली नावाने ओळखले जाते.

४. अमिर खुसरो– जो मोठा नावाजलेला कवी होता.

१८0३ मध्ये मराठयांचा पराभव करून ब्रिटीशांनी दिल्ली काबीज केली. काश्मीरी गेट व सिव्हील लाईन या ठिकाणी ब्रिटीशांनी इमारती बांधल्यामुळे या भागाचे महत्त्व वाढले. १९११ मध्ये ब्रिटीशांनी दिल्ली राजधानी करून नवी दिल्ली हे पूर्णपणे नवीन शहर बसविले. इंडिया गेट, व्हाईसरॉय हाऊस (राष्ट्रपतीभवन), पार्लमेंट हाऊस, उत्तर व दक्षिण ब्लॉक इ. ची उभारणी ब्रिटीश राजवटीत झाली. १९३२ मध्ये या शहराच्या उभारणीचे काम संपले. दिल्ली हे भारताचे महत्त्वाचे व्यापारी, सांस्कृतिक, राजकीय केंद्र आहे. सर्व जगातील राष्ट्रांचे राजदूत यांची कार्यालये व निवासस्थाने इथे आहेत.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १३.७

अ. दिल्ली शहराचा विभाग व त्याचे बांधकाम करणारा राजा यांच्या जोडया लावा.

| | शहराचे नाव | राजाचे नाव |
|---|---|---|
| १. | इंद्रप्रस्थ | पृथ्वीराज चौहान |
| २. | लालकोट | महमंदबीन तुघलक |
| ३. | मोहरूली | युधिष्ठीर |
| ४. | सिरी | फिरोजशाह तुघलक |
| ५. | जहापनाह | हुमायुन |
| ६. | तुघलकाबाद | शहाजहान |
| ७. | फिरोझाबाद | अल्लाउद्दिन खिलजी |
| ८. | दिनपनाह | अनंगपाल तोमर |
| ९. | शहाजहानाबाद | गियासुद्दिन तुघलक |

ब. ४ प्रसिद्ध सुफी संतांची नावे सांगा.

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- भारतीय स्थापत्यकलेचा इतिहास सिंधू संस्कृतीइतकाच प्राचीन आहे.
- भारतीय वास्तुकलेचा इतिहास सिंधू संस्कृतीचे वैभव समजून घ्यावयाचे असेल तर वास्तुकला ही ह्याची गुरूकिल्ली आहे. कारण वास्तुकलेवर विविध काळातील धार्मिक चालीरिती आणि सांस्कृतिक परंपरा यांचा प्रभाव पडला आहे.
- बौद्ध आणि जैन धर्माने भारतातील प्रारंभीच्या वास्तुशैलीच्या विकासाला स्तुर्प, विहार आणि चैत्य बांधून मदत केली.
- नंतरच्या काळात गुप्त पल्लव आणि चोल ह्या राजवटीत मंदिर वास्तुकला भरभराटीस आली.
- दिल्ली सुलतानशाही आणि मुघलांनी त्यांच्याबरोबर पार्शियन (इराणी) वास्तुकला आणली आणि त्यामुळे आपण भारतीय इराणी (पार्शियन) शैलीची वास्तुकला प्रत्यक्षात पाहू शकतो.
- ब्रिटीश व इतर वसहतीवर युरोपियन वास्तुकलेचा प्रभाव पडला. त्यातून दोन्ही वास्तुकलेचे संयुगीकरण झाले. तसेच नमुनेदार वसाहतिक वास्तु शैलीला संस्थात्मक स्वरूपही दिले. त्यामुळे शाही इमारती व कार्यालये बांधली गेली.
- हडप्पा संस्कृतीच्या सुरूवातीपासून भारताला शहर नियोजनाचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. त्याचा उगम इ.स.पूर्व २३५० पासून आढळतो.
- त्यानंतर अनेक शहरे उदयास आली.
- १५९४ मध्ये भारतात २८३७ शहरे होती.
- २० व्या शतकाच्या सुरूवातीला मुंबई, कोलकाता आणि चेन्नई ही शहरे प्रशासर्न, वाणिज्य आणि उद्योगधंद्यासाठी प्रसिद्ध झाली.
- १९११ मध्ये दिल्ली राजधानी झाली. तथापि दिल्लीचा इतिहास फार जुना आहे.
- दिल्ली बरोबरच इंद्रप्रस्थ, लालकोट, मेहरूली, सिरी, तुघलकबाद, फिरोझाबाद आणि शाहजहानबाद ही सात महत्त्वाची जुनी शहरे होती.

## सत्रान्त अभ्यास

१. हडप्पाकालीन स्थापत्यशास्त्रांची वैशिष्टे सांगा.

२. गुप्त, पल्लव आणि चोला या राजघराण्यांनी मंदिरस्थापत्यशास्त्रात दिलेले योगदान सांगा.

३. भारतात स्थापत्य कलेच्या कोणकोणत्या वेगवेगळया शैली आढळतात ?

४. बुद्ध आणि जैन या धर्मांनी भारतीय स्थापत्यकलेत मोठेच योगदान दिले आहे ? या विधानाचे स्पष्टीकरण करा.

५. दिल्लीवर राज्य करणाऱ्या सुलतानांच्या कारकीर्दीत झालेली बांधकामे सांगा.

६. मोगल साम्राज्याच्या काळात भारतीय वास्तुशिल्पे म्हणजे भारतीय, पर्शियन, मंगोल आणि मोगल शैली यांचे मिश्रण होते. या विधानाचे स्पष्टीकरण करा.

७. तुमच्या शब्दात 'दिल्ली'चे सविस्तर वर्णन करा.

८. 'दिल्ली है दिलवालोंकी' या विधानातील सत्य जाणून घ्या. या शीर्षकाचा एक निबंध तयार करा.

यासाठी लागणारी अवांतर माहिती ग्रंथालयामधील पुस्तके, संदर्भग्रंथ किंवा इंटरनेटवरून मिळवा.

## प्रश्नांची उत्तरे

### १३.१

१. भारतात मोठमोठया राजघराण्यांचा उदय आणि अस्त झाला. त्यानुसार भारतीय संस्कृतीची वाढ होत गेली. तिची उत्क्रांती झाली.

२. अतिशय नियोजनबद्ध शहरे, उत्तम घरे, काटकोनात छेदणारे रस्ते ही हडप्पा संस्कृतीची वैशिष्टे होती.

३. मोहंजोदडोतील सार्वजनिक स्नानगृहे ही त्या संस्कृतीमधील स्थापत्यशास्त्राची प्रगति दर्शविते. म्हणजेच अभियांत्रिकी कौशल्य दर्शविते.

४. कुशीनगर

५. लुंबिनी, सारनाथ, बोधिगया, कुशीनगर

६. गुप्त साम्राज्य काळात

७. गौतम बुद्धाशी व बौद्ध धर्माशी संबंधित बांधकामे

८. लोथर, गुजराथ येथे.

### १३.२

१. चंद्रगुप्त मौर्याचा राजवाडा म्हणजे लाकडातून कोरलेला प्रचंड महाल आहे.

२. सांची स्तूप आणि सारनाथ स्तूप

३. सांभार

४. गांधार, मथुरा, अमरावती

५. ओरीसामध्ये

६. राष्ट्रकूट राजवंश

७. पल्लव राजवंश

८. द्रविड प्रकारच्या मंदिराच्या बांधकामात शिखर, उंच भिती आणि गोपूर यांचा समावेश होतो.

९. वृहदेश्वर मंदिर

१०. मंदिराला शिखर, गर्भगृह व मंडप असतो. हे नागर प्रकारचे स्थापत्यशास्त्र आहे.

११. नरसिंहदेवल

१२. दिलवाडा मंदिर

**१३.३**

१. घुमट, कमानी आणि मिनार ही तुर्की स्थापत्यशास्त्राची शैली आहे.

२. क्वाघुल इस्लाम मशिद – दिल्ली कुतूब मिनार – दिल्ली महामंद तघलक, फिरोज तघलक, इब्राहिमलोधी यांच्या कबरी

३. गोल घुमट

४. मोगल साम्राज्यकाळात इमारतीवरील अलंकारिक नक्षीला पिएट्राडुरा असे म्हणतात.

५. बुलंद दरवाजा

**१३.४**

१. बॅसिलिका बोम जिझस, सेंट फ्रान्सिस चर्च

२. ल्युटेन्स्

३. ग्रीक आणि रोमन

४. ब्रिटीश काळातील वस्तूंचे उत्कृष्ट संग्रहालय

५. फ्रेंच वास्तुविशारद कार्बुसिअर

६. ऑस्ट्रेलियन वास्तुविशारद स्टेन

७. १. राज रेवल २. चार्लस कोरिया

**१३.५**

१. हडप्पा, मोहंजोदडो, वाराणसी, अयोध्या, कपिलवस्तु आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

२. पणजी, मुंबई, मच्छलीपट्टणम, मद्रास, कलकत्ता आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

३. मसूरी, सिमला, नैनिताल, निलगिरी, कोडाईकोनाल आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

४. ब्रिटीश सनदी अधिकारी

५. लष्करी अधिकारी

**१३.६**

१. हायकोर्ट, आईस हाऊस, चर्च ऑफ सेंट जॉन आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

२. हावडाब्रिज, मार्वल महल, फोर्ट विल्यम आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

३. सचिवालय, कौन्सिल हॉल, एलफिस्टन कॉलेज आणि पाठात आलेली /न आलेली ठिकाणे.

**१३.७**

| १. | **शहराचे नाव** | **राजाचे नाव** |
|---|---|---|
| १. | इंद्रप्रस्थ | युधिष्ठीर |
| २. | लालकोट | अनंगपाल तोमर |
| ३. | मोहरूली | पृथ्वीराज चौहान |
| ४. | सिरी | अल्लाउद्दिन खिलजी |
| ५. | जहापनाह | महामंदबीन तुघलक |
| ६. | तुघलकाबाद | गियासुद्दिन तुघलक |
| ७. | फिरोझाबाद | फिरोजशाह तुघलक |
| ८. | दिनपनाह | हुमायुन |
| ९. | शहाजहानाबाद | शहाजहान |

२. कुतुबद्दिन भक्तियार काकी, निजामुद्दीन अवलिया, शेख नसिरउद्दीन महंमद, अमिर खुसरो आणि पाठात आलेली /न आलेली नावे.

# विभाग ६

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

## विज्ञान आणि तंत्रज्ञान

संस्कृतीच्या संदर्भातील सर्व क्षेत्राबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही भारतीयांना त्यांच्या पूर्वजांकडून समृद्ध ठेवा किंवा वारसा मिळाला आहे. हा अभ्यासघटक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील इतिहास काळातील भारताच्या ह्या क्षेत्रातील प्रगतीचे परिक्षण करणार आहे. त्याचबरोबर हा अभ्यासघटक आधुनिक भारतातील आधुनिक शास्त्रज्ञांच्या योगदानाचेही मूल्यमापन करणार आहे.

पाठ १४ : भारतातील शास्त्र आणि तंत्रज्ञान

पाठ १५ : प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ

पाठ १६ : मध्ययुगीन भारतातील शास्त्र व शास्त्रज्ञ

पाठ १७ : आधुनिक भारतातील शास्त्रज्ञ

# १४

# भारतातील शास्त्र व तंत्रज्ञान

जगातील इतर राष्ट्राप्रमाणेच भारतालाही विज्ञान व तंत्रज्ञान याच संपन्न वारसा आहे.शास्त्रीय वातावरण निरीक्षण व अज्ञाताकडे ओढ यामुळे विज्ञानात प्रगती होण्यास मदत होते. शास्त्रीय सत्य उलगडून सांगणे आणि त्याचा मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोग करणे हे शास्त्रज्ञासमोर मोठे आवाहन आहे.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- भारतातील शास्त्राची प्रगती कशी झाली आहे, त्याचा अभ्यास करणे.
- विभिन्न शास्त्रीय क्षेत्रात भारताने कसे योगदान दिले आहे, त्याचा अभ्यास करणे.
- विविध घटक आणि शक्तीस्थाने ज्यामुळे शास्त्राची प्रगती झाली आहे. त्याचा अभ्यास करणे.
- आधुनिक शास्त्र व शास्त्रीय वारसा याचा अभ्यास करणे.

## १४.१ प्राचीन भारतातील शास्त्राचा विकास ः

गणित या विषयांत भूमिती, अंकशास्त्र, खगोलशास्त्र, भविष्य इ.चा समावेश होतो. आकडेशास्त्र/अंकगणितामध्ये पाटीन गणित,(फळ्यावर उदाहरण सोडविणे) अंकगणित, भूमिती, बीजगणित समाविष्ट होतात. ग्रहशास्त्र इत्यादी ज्योतिष्य विद्येत समाविष्ट होतात.

भारताला शास्त्र व तंत्रज्ञानाचा मोठा वारसा आहे. निसर्गावरचे अवलंबन दूर करण्यासाठी शास्त्राच्या प्रगतीचा उपयोग होवू शकतो. प्राचीन भारतामध्ये धर्म व शास्त्र परस्पर संलग्न होते. प्राचीन भारतातील शास्त्राच्या विकासातील टप्पे पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.





### खगोलशास्त्र ः

ह्या शास्त्राची मोठी प्रगती झाली आहे. ग्रहताऱ्यांच्या निरीक्षणावर हे शास्त्र अवलंबून आहे. आर्य भट्ट (इस ४९९) यांनी या क्षेत्रात संशोधन केले आहे. त्यांनी खगोल शास्त्राला शास्त्रीय बैठक दिली. आर्यभट्टांनी १२१ प्रकरणे असलेले 'आर्यभट्टीया' नावाचा ग्रंथ लिहीला आहे. या मध्ये ज्योतिषशास्त्रातील व्याख्या, ग्रहांची सत्य स्थिती शोधणे, सूर्य व चंद्राचे भ्रमण व ग्रहण माहिती करून घेणे इ. प्रकरणांवर प्रकाश टाकला आहे. ग्रहणाचे कारण स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की पृथ्वी गोल आहे व तिच्या आसाभोवती ती फिरत असते, तिची सावली चंद्रावर पडते त्यामुळे चंद्रग्रहण दिसते. या सर्वांचा उल्लेख 'पंचसिद्धांतीका' या ग्रंथामध्ये दिसून येतो. हा ग्रंथ वराहमिहीर यांनी लिहिलेला आहे. प्राचीन भारतात ज्योतिष व पत्रिका याचा अभ्यास होत असे.

### गणित ः

हडप्पाच्या शहर नियोजनावरून हे स्पष्ट होते की, प्राचीन भारतातील लोकांना भूमिती व मोजमापाचे यांचे यथायोग्य ज्ञान होते. गणित हा स्वतंत्र विद्याशाखा म्हणून विकसीत झालेला विषय आहे. भारतीय गणिताचा उगम शुल्वसूत्र मधून झालेला आहे. दुसऱ्या शतकात अपस्तंभ यांनी भूमितीतील कोन विकसीत केले भारतीयांची तीन महत्त्वाची योगदाने म्हणजे अंकलेखन पद्धती, दशांश पद्धती व शून्याचा वापर. भारतीयानी शुन्याचा शोध लावला. आर्यभट्टाने बीजगणित व त्रिमीतीचे शास्त्र विकसीत केले. सूर्यसिद्धांत आणि बृहदसंहिता हे प्रसिद्ध ग्रंथ आहेत.

### औषध शास्त्र किंवा वैद्यक शास्त्र ः

आजार, उपचार आणि औषधांविषयी प्रथमतः अथर्ववेदामध्ये उल्लेख आढळतो. ताप, खोकला, हगवण, नैराश्य, कुष्ठरोग इ. आजारांचा उल्लेख आढळतो. भूत, पिशाच्च यांच्या शरीर प्रवेशामुळे आजार होतात असे समजले जात असे.

इसपूर्व ६00 पासून उपचारासाठी वास्तविक शास्त्राचा वापर करण्यात आला. तक्षशीला व वाराणसी ही औषधशास्त्र व शिक्षणांचे केंद्रे बनली. चरकसंहिता हे चरक व शुश्रुतसंमीहता हे सुश्रुताचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भारतीय औषधशास्त्राचे ज्ञान चीन, मध्य आशिया या देशापर्यंत पोचले.

चरकसंहितेमध्ये वनस्पतीचा वापर वैद्यकशास्त्रात कसा होतो आहे ते स्पष्ट केले आहे. त्यांना ७६0 औषधी वनस्पतींची माहिती होती.

इसवीसनाच्या चौथ्या शतकात शल्यकर्म अस्तित्वात आले. सुश्रुताला शल्यकर्माचे जनक मानले जाते. शल्यकर्म जखम भरण्यासाठी उपयुक्त आहे असे मानले जाते. त्याने १२१ शल्य उपकरणांची यादी दिली आहे. या बरोबर त्याने शल्यकर्माची पद्धतीही स्पष्ट केली आहे. अस्थिभंग वगैरेसाठी शल्यकर्माचे प्रामुख्यने विवेचन केले आहे. भारतीय शल्यकर्मी प्लॅस्टिक सर्जरीतही तज्ञ होते.

### धातूशास्त्र ः

वेद काळात लोकांना धान्य, फळे आंबविण्याची कला अवगत होती. कातडे कमविण्याची कला सुद्धा अवगत होती. प्रथम शतकाच्या अखेरीस लोखंड, पोलाद, चांदी, सोने इ. धातूंचे उत्खनन करण्याचे ज्ञान अवगत होते. कुतुबमिनार मधील पोलादीखांबावरून स्पष्ट होते की उच्च पद्धतीचे मिश्रण करण्याची कला त्याकाळात होती. त्यांना आम्ल व अल्कलीचे औषधी उपयोग ज्ञात होते. रंग तयार करण्यासाठी या कलेचा उपयाग होत असे. वस्त्र रंगविणे अत्यंत लोकप्रिय होते. अजंठा

लेणीचे रंगकाम हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या लेणीतील रंगकाम अद्यापही अस्तित्वात आहे.

**भूगोल ः**

मानव व निसर्ग यांच्या सततच्या संपर्कामुळे लोकांना भूगोलाचा अभ्यास करणे आवश्यक बनले. आपल्या लोकांना प्राकृतिक भूगोलाचे ज्ञान होते. चीन व पाश्चात्य राष्ट्राचीही त्यांना माहिती होती. परंतू त्या राष्ट्राचे स्थान अथवा अंतर याविषयी त्यांना ज्ञान नव्हते. भारतीय लोकांनी जहाज वाहतूकीकडे लक्ष दिले नाही. परंतु गुजरातमधीाा लोथल येथून सागरी वाहतूक होत असे. मध्ययुगाच्या पुर्वार्धात तीर्थयात्रेच्या संकल्पनेमुळे भौगोलिक माहिती मोठया प्रमाणावर संकलित करण सोयीचे झाले होते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १४.१

१. विकसनशील शास्त्राचे महत्व काय आहे ?

उत्तर ____________________

२. ग्रहशास्त्रात आर्यभट्टचे काय योगदान आहे ?

उत्तर ____________________

३. अपस्तंभ कोण होता त्याचे गणितातील योगदान काय आहे ?

उत्तर ____________________

४. प्राचीन भारताचे गणितातील तीन महत्वाची योगदाने कोणती आहेत ?

उत्तर ____________________

५. प्राचीन भारतातील वनस्पतींचा औषधी उपयोग कोणत्या ग्रंथात स्पष्ट केला आहे ?

उत्तर ____________________

६. सुश्रुषमित्रा ग्रंथात किती शल्यकर्म उपकरणांचा उल्लेख आहे ?

उत्तर ____________________

७. भारतीय वैद्यक शास्त्राला महत्वपूर्ण ठरणारे दोन ग्रंथ कोणते ?

उत्तर ____________________





८. प्राचीन भारतातील शल्यविशारद किती व औषधजन्य वनस्पतींशी ज्ञात होते ?

उत्तर ____________________

## १४.२ मध्ययुगीन भारतातील शास्त्रीय व तांत्रिक विकास :

मध्ययुगीन काळात (अकरा ते अठराव्या शतकादरम्यान) भारतातील शास्त्र व तंत्र विकास दोन मार्गा ंनी झाला. एक परंपरागत ज्ञानावर आधरीत होता तर दुसऱ्या मर्गावर इस्लाम व युरोपच्या ज्ञानाचा पगडा होता. मदरसा अस्तित्वात आल्या आणि त्याचा प्रभाव निर्माण झाला. या संस्थाना राजाश्रय मिळाला. राजांनी मोठया संख्येने कारखाना (उत्पादन) क्षेत्र निर्माण केले व त्याद्वारे आवश्यक तो पुरवठा होवू लागला. तसेच त्यातून तरूणांना शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत लागले.

मुस्लीम राज्यकर्त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुधारणा केली. काही महत्वाचे विषय उदा. अंकगणित, भूमिती, ग्रहशास्त्र, लेखाशास्त्र, सामान्य प्रशासन इ. विषयाम्चे समावेशन करण्यात आले. भारतीय परंपरागत शिक्षण आणि सुधारित शास्त्रीय शिक्षणाची सांगड घालण्याचा प्रयत्न झाला.

### जीवशास्त्र :

१३ व्या शतकात हम्सदे यांनी मृग-पाक्षी-शास्त्र (जीवशास्त्र) याचा अभ्यास केला. मध्ययुगीन भारतात राज्यकर्ते, शिकारी, लढवय्ये होते. काही प्राणी पाळले जात. उदा. घोडा, कुत्रा, चिता इ. अकबराने काही जनावरांच्या प्रजातींकडे विशेष लक्ष दिले. अकबराकडे पाळीव व हिंस्त्र प्राण्यांचे संग्रहालय होते. संकरीत जनावरांचा तुझुक-ए-जहांगीरी या जहांगीराच्या ग्रंथात उल्लेख आढळतो. त्याने जनावरांच्या ३६ प्रजातींचे वर्णन केले आहे. निसर्गाचा चाहता या नात्याने जहांगीराने वनस्पतींचा अभ्यास केला आहे.

### गणित :

मध्ययुगाच्या प्रारंभीच्या काळात 'गणितसारा' हे श्रीधराचा व 'लिलावती' हे भास्कराचार्यांचा ग्रंथ अद्वितीय होते. गणितसारामध्ये गुणाकार, भागाकार, आकडेशास्त्र, वर्गमुळ इ. चा समावेश होता. लिलावती या ग्रंथाचे फैदी यांनी पर्शियन भाषेत भाषांतर केले. ताजिक या निळकंठ जोतिर्वीदाच्या ग्रंथात पर्शियन तांत्रिक संज्ञांचा समावेश होता. नसरूद्दिन तुसी या क्षेत्रातील मोठा अभ्यासक होता. अकबराने गणित या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केला.

### रसायनशास्त्र :

कागदाचा लेखनासाठी वापर करण्यापूर्वी झाडांच्या पानावर लेखन केले जात असे. मध्ययुगीन काळात लेखनासाठी कागदाचा वापर सुरू झाला. कागद उत्पादनात काश्मीर, सियालकोट, जाफ्राबाद, पाल्ना, मुर्तिदाबाद, अहमदाबाद, औरंगाबाद, मैसुर इ. शहरे आघाडीवर होती. टिपू सुलतानचा काळात मैसूर कागद उत्पादनात आघाडीवर होते.

मोगलांना बंदुकीची दारू तयार करणे अवगत होते. फटाके उत्पादनात रॉकेट, तुडतुडे इत्यादींचे उत्पादन केले जात असे. तुझाक-इ-बाबरी या ग्रंथात तोफा कशा तयार कराव्यात यासंबंधी माहिती आहे. नूरजहानच्या आईने अत्तर ऑफ रोजेसचा शोध लावला. अैन अकबरी या पुस्तकात अत्तर कार्यालयामधील नियम सांगितले आहेत.

### खगोलशास्त्र :

खगोलशास्त्राच्या अभ्यासात उज्जैन, वाराणसी, मथुरा व दिल्ली ही शहरे प्रमुख होती. फिरोजशहा तुघलकाने दिल्ली येथे निरीक्षण केंद्र स्थापन केले. यंत्रजा नावाने ग्रहशास्त्रासाठीचे उपकरण महेंद्र सुरीने विकसीत केले. निळकंठ सोमसुतवन याने आर्यभट्टच्या ग्रंथावर टीका लिहीली. जयपूरचे महाराज सवाई जयसिंग द्वितीय यांनी दिल्ली, उज्जैन, वाराणसी, मथुरा व जयपूर या पाच ठिकाणी वेधशाळेची स्थापना केली.

### औषधशास्त्र :

वेगवेगळया रोगांवर वेगवेगळे उपाय शोधण्याचे प्रयत्न झाले. रोगाचे कारण कळावे म्हणून नाडीपरीक्षा होऊ लागली. रसचिकित्सा पद्धतीत खनिजांपासून आणि धातूंपासून औषधे कशी तयार करावीत याचे विवेचन आहे.

या काळात भारतात युनानी औषधपद्धती विकसित झाली. तसेच औषधपद्धतीवर अनेक ग्रंथाचे लेखन केले गेले.

### कृषीक्षेत्र :

मध्ययुगीन काळात शेतीची परिस्थिती प्राचीन भारताप्रमाणेच होती. अर्थात काही महत्वाचे बदल दिसून येतात. तंबाखू, बटाटे, पेरू, काजू या वनस्पती भारतात आल्या. पिकांमध्ये गहू, तांदूळ, दाळी, तेलबीया, कापूस, उस इत्यादी समाविष्ट होतात. काश्मीर सफरचंद व अन्य फळांसाठी प्रसिद्ध होते. तामिळनाडूत दालचिनी, लवंगा याचे उत्पादन होत होते.

शेतीला विहीरी, तलाव या माध्यमातून पाण्याचा पुरवठा होवू लागला. कृषीक्षेत्राचा मध्ययुगीन काळात मोठा विकास झाला.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १४.२

१. कारखान्याचे मध्ययुगीन भारतात काय कार्य होते ?

उत्तर ______________________________

२. १३ व्या शतकात मृग-पक्षी-शास्त्र कोणी संग्रहीत केले ?

उत्तर ______________________________

३. मथुरा वेधशाळा कोणी स्थापन केली ?

उत्तर ______________________________

४. लिलावती ग्रंथाचे पार्शियन मध्ये कोणी भाषांतर केले ?

उत्तर ______________________________





५. गणित या विषयाचा अभ्यासक्रमात कोणत्या मोगल बादशहाने समावेश केला ?

उत्तर

६. कागदाच्या शोधपूर्वी लेखनासाठी कशाचा वापर होत असे ?

उत्तर

७. मध्ययुगीन काळात कोणत्य ग्रंथात तोफांचा उल्लेख आढळतो ?

उत्तर

८. नूरजहानच्या आईने शोधलेल्या अत्तराचे नाव काय ?

उत्तर

९. ऐने अकबरी या पुस्तकात कशाविषयी नियम सांगितले आहेत ?

उत्तर

१०. महाराजासवाई जयसिंग २ याने किती वेधशाळांची स्थापना केली ? त्या कोठे आहेत ?

उत्तर

११. यंत्रजाचा विकास कोणी केला ?

उत्तर

१२. यंत्रजा म्हणजे काय ?

उत्तर

१३. मोगलांनी कोणती औषधी पद्धती विकसीत केली ?

उत्तर

१४. रसचिकीत्सा कशाशी संबंधित आहे ?

उत्तर

१५. १६ व १७ व्या शतकात कोणत्या नवीन वनस्पती भारतात आल्या ?

उत्तर ______________________________

## १४.३ आधुनिक भारतातील शास्त्र व तंत्रज्ञान ः

### कृषीक्षेत्र ः

आजच्या काळात कृषी उत्पादन वाढले आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आधुनिक शास्त्र व तंत्राचा कृषी क्षेत्रातील वापर आहे. प्रामुख्याने संकरीत बियाणांचा विकास व उर्जा व्यवस्थापन व तंत्राचा वापर यामुळे कृषी विकास शक्य झाला आहे. यामध्ये 'इंडियन कॉन्सील फॉर ॲग्रीकल्चरल रिसर्च' या संस्थेने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. ७३ कृषी, ३२ पशुवैद्यकीय व ८ कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मार्फत या संस्थेतर्फे कृषी विकास साधला जातो.

### औद्योगिक क्षेत्र ः

औद्योगिक क्षेत्रात आधुनिक शास्त्र व तंत्रज्ञानाने क्रांतीकारक प्रगती केली आहे. दोन सरकारी यंत्रणा Council for Scientific & Industrial Research (CSIR) व Defence Research & Development organisation (DRDO) यांनी या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. कोळसा, वगैरे सारख्या उत्खनन क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. संरक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठा वापर झाला आहे. भारताने अग्निबाणांचे उत्पादन केले आहे हा त्याचाच परिणाम आहे.

### अणुऊर्जा ः

शांततेच्या कारणासाठी अणुऊर्जा वापर हे भारताचे धोरण आहे. १९४८ मधे अणुऊर्जा आयोगाची स्थापना झाली. १९५७ मध्ये भाभा अणु संशोधन केंद्राची स्थापना झाली. तारापूर (महाराष्ट्र), कोटा (राजस्थान), कलपक्कम (तामीळनाडू), नरोरा (उत्तरप्रदेश) इत्यादी ठिकाणी अणुऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. याच्या परिणामी भारत हा जगातील अणुऊर्जाधारक देश बनला आहे. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स, कृषी, औषधी इ. क्षेत्रातही अणुऊर्जेचा वापर होतो.

### अंतराळ तंत्रज्ञान ः

आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणारे क्षेत्र म्हणून या क्षेत्राकडे पाहीले जाते. भारतीय उपगृह आर्यभट्ट १९७५ मध्ये व त्यानंतर भास्कर १ व भास्कर २ रशियाच्या भूमिवरून अवकाशात सोडण्यात आले. INSAT -IB, १९८३ मध्ये सोडण्यात आले. रेडिओ व संपर्क क्षेत्रात त्यामुळे क्रांती झाली.

### इलेक्ट्रॉनिक्स ः

संदेशवहन व अन्यक्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्समुळे क्रांती झाली. रडार, अणुऊर्जा, ऊर्जा नियंत्रण पद्धतीमुळे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात प्रगती झाली. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात गेल्या दशकात दरवर्षी १८ % वाढ झाली आहे. आपण आज इलेक्ट्रॉनिक उपकरणे निर्यात करित आहोत. कॉम्प्युटरचा वापर वाढला आहे. सेमी कंडक्टर लिमिटेड (चंदिगड), नॅशनल इंटरॲक्शन सेंटर (नवी दिल्ली) इ. ठिकाणी ही यंत्रणा निर्माण केली आहे.



टिपा

## औषधी व आरोग्य शास्त्र :

औषध क्षेत्रात मोठया प्रमाणावर प्रगती साध्य करण्यात आली आहे. रोगनियंत्रणाबाबतीत मोठया प्रमाणावर यश आले आहे. क्षय, मलेरिया, कांजण्या, कॅन्सर यासारख्या रोगांवर नियंत्रण प्रस्थापित करणे शक्य झाले आहे. संशोधनाच्या माध्यमातून आयुर्मान वाढले आहे. मृत्युदर कमी झाला आहे. बालमृत्युचे प्रमाणही कमी झाले आहे. सरकारी रूग्णालयातून सुधारित आरोग्यसेवा पुरविल्या जात आहेत.

## सागर संशोधन प्रगती :

किनारपट्टीलगतच्या प्रदेशात खनिजतेल मिळविणे, मासेमारी करणे हे व्यवसाय समुद्रावर करता येतात. त्यासाठी १९८१ साली भारत सरकारने पंतप्रधानांच्या अखत्यारीत कार्यरत असणारे 'सागर सुधार खाते' (Dept. of Ocean Development) निर्माण केले आहे.

या खात्याकडे संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्रीयुक्त 'सागरकन्या' आणि 'सागर संपदा' ही जहाजे आहेत. या जहाजांवर भौतिक, रासायनिक, जैवशास्त्रीय, भूगर्भशास्त्रीय चाचण्या घेण्याची सोय आहे. 'गवेष्णा' नावाच्या जहाजामार्फत आपण समुद्रतळावर असणाऱ्या खनिजाचे उत्खनन आणि संशोधन करत आहोत. तसेच आपण अंटार्क्टिका खंडावर 'दक्षिण गंगोत्री' हे कायमचे संशोधन केंद्र उभारले आहे.

समुद्रातून मोठया प्रमाणावर खनिजतेल व ज्वलनशील वायू यांचे उत्पादन होत आहे.

## इतर क्षेत्रातील प्रगती :

वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांखेरीज आपण आणखी इतर क्षेत्रातही खूप प्रगती केली आहे.

पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने आपण खूपच सकारात्मक प्रगती केली आहे. तसेच सौरऊर्जानिर्मितीतही आपण चांगले यश मिळविले आहे. गंगा प्रदूषणमुक्त करण्यासाठी एक महामंडळ नेमून त्यामार्फत गंगेच्या दोन्ही तीरावर मैला जलशुद्धीकरण यंत्रे बसविण्यास सुरवात झाली आहे.

## विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रगतीचा आढावा :

विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात भारताने अतिशय भरीव प्रगती केली आहे. नवनवीन संकल्पना, नवनविन पद्धती आणि उच्च निर्मितीमूल्ये असलेली उत्पादने देशात निर्माण होत आहेत. अंतराळ संशोधन आणि अणू संशोधन यामधील आपली प्रगती वाखाणण्यासारखी आहे. सर्वात जास्त वैज्ञानिक आणि तांत्रिक मनुष्यबळ असणारा भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

त्याबरोबरच या प्रगतीशी विसंगत अशा काही बाबी आहेत. उदा. आपण अजूनही वस्त्र आणि पोलाद उद्योगात आयात तंत्रज्ञान वापरतो. सतत आयात तंत्रज्ञानामुळे आपल्याकडे स्वदेशी तंत्रज्ञान प्रगत होऊच शकत नाही. अत्यंत महत्वाच्या अशा संरक्षण खात्याच्या गरजांबाबतीतसुद्धा आपण मुख्यतः आयात तंत्रज्ञानावरच अवलंबून आहोत.

भारताच्या तळागाळातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी तंत्रज्ञान वापरणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. उदा. कमी खर्चात राहती घरे बांधण्यासाठी अजूनही तंत्रज्ञान विकसित करण्यात आले नाही. अंतराळ आणि अणूसंशोधन यांची प्रगती वाखणण्यासारखी आहे. परंतु त्याने समाजातील गरीबांचा फायदा झाला असे वाटत नाही.



टिपा



सर्वसाधारणपणे विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील प्रगती समाधानकारक असली तर त्याचा लाभ समाजाच्या सर्व स्तरातील सर्व लोकांपर्यंत सारख्याच प्रमाणात पोहोचला आहे असे वाटत नाही.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १४.३

१. शास्त्र म्हणजे काय ?

उत्तर

२. तंत्रज्ञानाची व्याख्या करा.

उत्तर

३. शास्त्र व तंत्र विभागाची भारत सरकारने कधी स्थापना केली ?

उत्तर

४. संरक्षणाच्या दृष्टीने कार्यरत असणाऱ्या दोन सरकारी यंत्रणांची नावे सांगा.

उत्तर

५. भारतातील ५ अणुऊर्जा प्रकल्पाची नावे सांगा.

उत्तर

६. भाभा अणु संशोधन केंद्र केंव्हा व कोठे स्थापन झाले ?

उत्तर

७. भारतीय पहिले अवकाश यान कोणते ?

उत्तर

८. INSAT -IB सॅटेलाईटचे कार्ये कोणते ?

उत्तर

९. लसीकरण कार्यक्रम कसा उपयुक्त आहे ?

उत्तर

१०. दक्षिण गंगोत्री कोठे आहे ?

उत्तर

११. सागरी विज्ञान खात्याचे कार्यक्षेत्र सांगा.

उत्तर

१२. गंगा नदीच्या प्रदुषणावर नियंत्रणासाठी कोणती यंत्रणा आहे ?

उत्तर

१३. नैसर्गिक वायु उत्खननासाठीची राष्ट्रीय अधिकारी संस्था कोणती आहे ?

उत्तर

१४. आधुनिक तंत्रज्ञान आयातीतील प्रमुख दोष कोणते आहेत ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- प्राचीन भारतामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाची खूप प्रगती झाली होती.
- प्राचीन भारतातील खगोलशास्त्र, गणित, औषधनिर्माणशास्त्र, आरोग्यशास्त्र, धातूशास्त्र आणि रसायनशास्त्र यामधील संशोधनाचा आधार आधुनिक शास्त्रज्ञांनी घेतला आहे.
- मध्ययुगीन काळात भारतातील विद्वानांचा अरबी देशातील शास्त्रीय माहितीशी संपर्क आला.
- तुर्क आणि मोगल राज्यकर्त्यांनी बंदुकीची दारू वापरण्यास सुरवात केली.
- उज्जैन, वाराणसी, मथुरा, जयपूर आणि दिल्ली या वेधशाळांची उभारणी केली गेली.
- आधुनिक भारताच्या शास्त्रीय प्रगतीकडे शासन बारकाईने लक्ष पुरवत आहे. आणि या संशोधनाचा लाभ पंचवार्षिक योजनांमार्फत जनतेला उपलब्ध करून देत आहेत.
- अणुऊर्जेचा वापर सकारात्मक कार्यासाठी करण्यात येत आहे.
- भारतीय अंतराळसंशोधन कार्यक्रमाचे लक्ष्य स्वयंनिर्भरता आणि राष्ट्राची सर्वांगीण प्रगती हेच आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. प्राचीन भारतातील लोकांची धातुशास्त्र विषयक क्षमता याविषयी चर्चा करा.

२. मध्ययुगीन कालखंडातील रसायनशास्त्रातील दोन शोधांचे वर्णन करा.

३. औषध व आरोग्य सेवा या क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आढावा घ्या.

४. कृषी व कृषी आधारीत उद्योगांमध्ये शास्त्र/तंत्राचा वापर कसा होतो ते सांगा.

५. आधुनिक भारतीय शास्त्राच्या विकासावर प्राचीन शास्त्रीय परंपराचा कसा प्रभाव पडतो ? ते वर्णन करा.

## प्रश्नांची उत्तरे

### १४.१

१. शास्त्राच्या विकासामुळे निसर्गावरचे अवलंबित्व कमी होते.

२. आर्यभट्टांनी खगोलशास्त्राला शास्त्रीय बैठक दिली.

३. अपस्तंभ हा दुसऱ्या शतकातील गणितज्ञ होता. त्याने भूमितीतील विविध कोन विकसित केले.

४. अ. अंकलेखन

ब. दशांश पद्धती

क. शुन्याचा वापर

५. चरकसंहिता

६. १२१ शस्त्र उपकरणे

७. चरकसंहिता व सुश्रुसंहिता

८. ७६0 वनस्पती

### १४.२

१. उत्पादनाशिवाय त्यांनी तंत्रज्ञान व व्यावसायिक प्रशिक्षणाचा विकास केला.

२. हमसदेवा

३. सवाई जयसिंग दोन

४. फैझी

५. अकबर

६. दक्षिणभारतातील पाम वृक्षावर लिहण्याची प्रथा होती. काश्मीर मध्ये साहित्य भोजपत्रावर लिहून जतन केले जात होते.

७. तुझक-ए-बाबरी

८. द अतार ऑफ रोझेस

९. अकबराच्या कार्यालयाच्या नियमाप्रमाणे

१०. (५) दिल्ली, उज्जैन, वाराणसी, मथुरा, जयपूर

११. फिरोजशहाचा न्यायालयीन सल्लागार महेंद्र सुरी

१२. ग्रहशास्त्र उपकरण

१३. युनानी

१४. तत्वतः खनिज औषधी

१५. तंबाखू, मिरची, बटाटे, पेरू, सिताफळ, काजू, फणस

**१४.३**

१. भौतिक जगाचे ज्ञान घेण्यासाठीची पद्धतशीर यंत्रणा

२. शास्त्राचा उत्पादनातील उपयोग

३. १९७१

४. Council for Scientific & Industrial Research (CSIR) व Defence Research & Development organisation (DRDO)

५. तारापूर (महाराष्ट्र), कोटा (राजस्थान), कलपक्कम (तामीळनाडू), नरोरा (उत्तरप्रदेश), ककरापार (गुजरात)

६. १९७१ मध्ये तुर्भे येथे

७. आर्यभट्ट

८. रेडिओ, टिव्ही, टेलिकम्युनिकेशन सेवा

९. बालमृत्यु प्रमाण कमी होते.

१०. अंटार्क्टिकावर

११. भौतिक, रसायनिक, जीवशास्त्र, भूगोल, सागरी व धातू विषयक क्षेत्रात कार्यरत आहे.

१२. केंद्रिय गंगा प्राधिकरण.

१३. तेल व नैसर्गिक वायु प्राधिकरण.

१४. नविन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची अपुरी क्षमता स्पष्ट करते.

# १५

# प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ

मागील पाठात तुम्ही शास्त्र व तंत्रज्ञान यातील संबंधाबाबत वाचले. या पाठात तुम्ही प्राचीन भारतीयांनी गणित आणि वैद्यकशास्त्र, आयुर्वेद, योग, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र यासह शास्त्रात दिलेल्या योगदानाबद्दल वाचणार आहात. प्राचीन भारतात इतक्या वर्षापूर्वी मोठया प्रमाणावर शास्त्रीय ज्ञान विकसित होते हे जाणून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- गणित व शास्त्र या क्षेत्रात भारताने जगाला केलेले योगदान.
- बौद्धायन, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, भास्करचार्य, कणाद, वराहमिहिर, नागार्जून, सुश्रुत, चरक, पतंजली या सारख्या प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी ज्ञानात घतलेली भर.

## १५.१ गणित व खगोलशास्त्र :

भारतात प्राचीन काळात गणित व शास्त्र मोठया प्रमाणात विकास पावले होते. प्राचीन भारतीयांनी गणित त्याचप्रमाणे शास्त्रांच्या विविध शाखांमध्ये प्रचंड योगदान दिले. या भागात आपण गणितातील प्रगती व त्यात योगदान देणाऱ्या विद्वानांबद्दल वाचणार आहोत. तुम्हाला आश्चर्य वाटेल की आजच्या काळातील बरेच सिद्धांत प्राचीन भारतीयांना माहित होते. तरीही प्राचीन भारतीयांना त्यांच्या आधुनिक पाश्चात्य जगातील प्रमाणे नोंदणी /अभिलेख करणे, व प्रसार प्रचाराचे योग्य ज्ञान नसल्याने त्यांच्या योगदानाला योग्य स्थान प्राप्त झालेले नाही. त्याचप्रमाणे पाश्चात्य जगाने दीर्घ काळ बहुतांश जगावर शासन केले. ज्यामुळे ज्ञानासह सर्वच क्षेत्रांवर आपल्या श्रेष्ठत्वाचा हक्क प्रस्थापित करण्याची त्यांना संधी मिळाली. आपण आता प्राचीन भारतीय गणितज्ञांच्या योगदानापैकी काहींचा अभ्यास करूया.





### १५.१.१ बौधायन

गणितातील बऱ्याच संकल्पनाप्रत पोचण्यामधे बौधायन हा सर्वप्रथम होता. ज्यांचा त्यानंतर पाश्चात्य जगाने पुन्हा शोध लावला. पाय् $\pi$ ची किंमत प्रथम त्याने आकडेमोडीने सिद्ध केली. वर्तुळाचे क्षेत्रफळ व परीघाची किंमत काढण्यात पाय उपयुक्त आहे हे तुम्हाला माहित आहे. आज ज्याला पायथॅगोरसचे प्रमेय म्हणून ओळखले जाते ते बौधायन च्या 'सुल्व सूत्रामध्ये' आधीच आढळते. जे पायथॅगोरसच्या काळाच्या कितीतरी आधी लिहिले गेले होते.

### १५.१.२ आर्यभट्ट ः

आर्यभट्ट हा पाचव्या शतकातील गणिती, खगोलविद ज्योतिर्विद व भौतिकीतज्ञ होता. गणिताच्या क्षेत्रामध्ये तो अग्रदूत होता. वयाच्या २३ व्या वर्षी त्याने त्याच्या काळातील गणितावरील संदर्भग्रंथ असलेले 'आर्यभट्टीय' हे पुस्तक (ग्रंथ) लिहीले. या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचे चार विभाग आहेत.

पहिल्या विभागात तो मोठया दशांश संख्या अक्षरांनी दर्शविणाच्या पद्धतीचे वर्णन करतो. दुसऱ्या विभागात आपल्या आधुनिक काळातील गणितातील प्रकरणावर कठीण प्रश्न जसे अंक सिद्धांत, भूमिती, त्रिकोणमिती, बीजगणित आढळतात. उरलेले दोन विभाग खगोलशास्त्रावर आहेत.

आर्यभट्टांनी दाखवले की शून्य हा केवळ एक अंक नसून ते एक संकेत आणि एक संकल्पनाही आहे. शून्याच्या शोधाने आर्यभट्टाला पृथ्वी व चंद्र यांच्यामधील प्रत्यक्ष अंतर शोधण्यास मदत झाली. शून्याच्या शोधाने ऋण अंकांची संकल्पना स्पष्ट झाली. आपण आधी वघितल्याप्रमाणे आर्य भट्टीयांचे शेवटचे दोन विभाग खगोलशास्त्रावर आहेत. साहजिकच आर्यभट्टाने शास्त्रांच्या क्षेत्रात विशेषतः खगोलशास्त्रात ही प्रचंड योगदान दिले आहे.

प्राचीन भारतात खगोलशास्त्राचे विज्ञान बरेच प्रगत होते. खगोल ही नालंदा येथलि सुप्रसिद्ध वेधशाळा होती. जेथे आर्यभट्ट अभ्यास करी. वास्तविक खगोलशास्त्राचे विज्ञान अति प्रगत होते व आपल्या पूर्वजांना त्यांचा रास्त अभिमान होता. खगोलशास्त्र विज्ञानाच्या विकासामागील हेतू बिनचूक कालदर्शिका दिनदर्शिका असणे, योग्य पेरणी वेळ व योग्य पिकाची निवड करण्यासाठी हवामान व (पावसाचे) पर्जन्यमानाची योग्य जाण असणे, ऋतू व सण उत्सवांच्या तारखा निश्चित करणे, नौवहन, कालगणना आणि ज्योतिर्विद्येमध्ये वापरसाठी कुंडली मांडणीसाठी हा होता. खगोलशास्त्राचे ज्ञान विशेष करून भरती ओहोटी व ताऱ्यांचे ज्ञान हे व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचे होते कारण महासागर तथा वाळवंटातून रात्री प्रवास करण्यासाठी त्याची गरज होती.

आपला ग्रह पृथ्वी हा अचल ही लोकांमधील धारणा अव्हेरून त्याने त्याचा "पृथ्वी गोल असून स्वतःच्या अक्षाभोवती फिरते." हा सिद्धांत मांडला. सूर्याचे पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकतांना दिसणे हे भ्रामक आहे हे त्याने उदाहरणे देऊन स्पष्ट केले. जेव्हा एखादी व्यक्ती बोटीतून प्रवास करते त्यावेळी किनाऱ्यावरील झाडे विरूद्ध दिशेला सरकतांना दिसतात. चंद्र व इतर ग्रह हे सूर्याच्या परावर्तीत प्रकाशाने चमकतात हे ही सत्य त्याने सांगितले. त्याने सूर्यग्रहण व चंद्रग्रहणाचे शास्त्रीय स्पष्टीकरण दिले व स्पष्ट केले की ग्रहणे ही राहू किंवा केतू अथवा कोण्या राक्षस दानवामुळे होत नाहीत. तुम्हाला भारताकडून पृथ्वीच्या कक्षेत पाठवल्या गेलेल्या पहिल्या कृत्रिम उपग्रहाला आर्य भट्टाचे नाव का दिले गेले हे आता कळले कां ?

टिपा

### १५.१.३ ब्रह्मगुप्त ः

७व्या शतकात ब्रह्मगुप्ताने गणित इतरांपेक्षा अधिक उच्च पातळीवर पोचवले. त्याने त्याच्या गुणाकारांचा पद्धतीमध्ये स्थानिक किंमतीचा वापर जवळजवळ त्याचप्रकारे केला, जसा आज केला जातो. त्याने ऋणसंख्या आणि शून्यवरील क्रियांचा गणितामध्ये प्रथम समावेश केला. त्याने ब्रह्मस्फुट सिद्धांतिका हा ग्रंथ लिहिला. ज्याचाद्वारे अरबांना आपल्या गणिताबद्दल माहिती झाली.

### १५.१.४ भास्कराचार्य ः

भास्कराचार्य हा १२ व्या शतकातील प्रख्यात गणिती होता. तो कर्नाटकात विजापूर येथे जन्मला. त्याच्या सिद्धांत शिरोमणी या ग्रंथासाठी तो सुप्रसिद्ध आहे. त्याचे चार विभाग आहेत. लीलावती (अंकगणित), बीजगणित, गोलाध्याय व ग्रहगणित. त्याने बीजगणितीय सुत्रे सोडवण्यासाठी चक्रावत पद्धतीचा प्रथम समावेश केला. ही पद्धत सहाशतकांनंतर युरोपियन गणितज्ञांनी पुन्हा शोधली. ज्याला त्यांनी इन्व्हर्स सायकल (उलट चक्रावत) असे संबोधले. १९व्या शतकात जेम्स टेलर या इंग्लिश माणसाने लीलावतीचे इंग्लिश भाषांतर केले व भास्कराचार्य यांचे थोर योगदान जगाला ज्ञात करून दिले.

### १५.१.५ महावीराचार्य ः

जैन साहित्यामध्ये (ख्रि.पू. ५०० ते ख्रि पू. १००) गणिताचे इत्यंभूत तपशीलवार वर्णन आहे. चतुष्पदी समीकरणे कशी सोडवायची हे जैन गुरूंना माहित होते. त्यांनी अपूर्णांक, बीजगणितीय समीकरणे, सारणी, संच सिद्धांत, घात गणित व हे अतिशय मनोरंजक पद्धतीने मांडले आहे. जैन गुरू महावीराचार्यांने गणित सार संग्रह हा ग्रंथ इ.स.८५० मध्ये लिहिला. जो आजच्या स्वरूपातील अंकगणिताचे आद्य पाठयपुस्तक आहे. दिलेल्या संख्यांचा साधारण विभाज्य (ल.सा.वि.) काढण्याची प्रचलित पद्धत सुद्धा त्यांनी लिहीलेली आहे. अशा तऱ्हने जॉन नेपीयरने ती जगात आणण्यापूर्वी भारतीयांना ती आधीच ज्ञात होती.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १५.१

१. गणिताच्या क्षेत्रात बौधायनाने केलेली दोन योगदाने सांगा.

उत्तर

२. शून्याचा शोध कोणी लावला ?

उत्तर

३. 'ब्रह्मस्फूट सिद्धान्तिका' चे काय महत्व आहे ?

उत्तर





४. पुढील ग्रंथाच्या त्यांच्या ग्रंथकारांशी जोडी जुळवा.

| 'अ' | 'ब' | उत्तर |
|---|---|---|
| १. सुल्वसूत्र | १. आर्यभट्ट | |
| २. आर्यभटीय | २. महावीराचार्य | |
| ३. ब्रह्मस्फुट सिद्धांतिक | ३. ब्रह्मगुप्त | |
| ४. गणित सारसंग्रह | ४. भास्कराचार्य | |

## १५.२ शास्त्र ः

### १५.२.१ कणाद

कणाद हा भारतीय तत्वज्ञानाच्या सहा पद्धती (प्रणाली) पैकी 'वैशेषिक' या विद्याशाखेचा सहाव्या शतकातील शास्त्रज्ञ होता. त्याला कणाद हे नाव पडण्याचे कारण बालपणापासूनच त्याला अतिसूक्ष्म कणाबद्दल जाणून घेण्यात रस होता. त्याचा अणूसिद्धांत हा कोणत्याही आधुनिक अणू सिद्धांताशी जुळता आहे. कणादांच्या मते भौतिक विश्व हे कणांचे बनले आहे. ज्याला त्यांनी अणू म्हटले व तो साध्या डोळयांनी दिसू शकत नाही व ज्यांचे पुन्हा विभाजन करता येत नाही. अशाप्रकारचे अविभाज्य अविनाशी कण आहेत. तुम्हाला ज्ञातच आहे की हेच आधुनिक अणू सिद्धांत सुद्धा म्हणतो.

### १५.२.२ वराहमिहीर ः

वराहमिहीर हा प्राचीन भारतातील आणखी एक शास्त्रज्ञ होता. तो गुप्त कालखंडात होऊन गेला. वराहमिहीरने जलशास्त्र, भूगर्भशास्त्र, पर्यावरण शास्त्र यामध्ये भरीव कार्य केले. वाळवी व वनस्पती या भूजलाच्या अस्तित्वाचे निदर्शक (दर्शक) असू शकतात असा दावा करणाऱ्या आद्य संशोधकांपैकी एक होता. त्याने पाण्याचा अस्तित्व सूचवू शकणाऱ्या सहा प्राणी व तीस वनस्पतींची यादी दिली. वाळवी (उधई) बद्दल त्याने ही महत्वाची माहिती दिली की स्वतःचे वारूळ ओले ठेवण्यासाठी पाणी आणण्यासाठी ते पाण्याच्या पातळीच्या पृष्ठभागापर्यंत पोचू शकतात. दुसरा सिद्धांत ज्याने शास्त्रीय जगाचे लक्ष वेधले तो आहे 'भूकंप ढग सिद्धांत' जो वराहमिहीरने आपल्या बृहत् संहितेमध्ये दिला आहे. या संहितेचा ३२ वा अध्याय प्रकरण 'भूकंपाच्या लक्षणांना' वाहिलेला आहे. त्याने भूकंपाचा संबंध ग्रहांचा प्रभाव, समुद्रांतर्गत हालचाली, भूजल नेहमीपेक्षा वेगळे (वेगळे) ढग निर्मिती तथा प्राण्यांच्या विचित्र अनैसर्गिक वर्तन यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे.

दुसरे क्षेत्र ज्यामध्ये वराहमिहीराचे योगदान कार्य उल्लेखनीय आहे ते म्हणजे फलज्योतिष्य अथवा ज्योतिर्विद्या. भारतात प्राचीनकाळी ज्योतिर्विद्याला फार उच्च्य दर्जा बहाल केला होता व तो आजही कायम आहे. ज्योतिष याचा शब्दशः अर्थ प्रकाश विज्ञान (शास्त्र) आहे. हे शास्त्र वेदांमध्ये उगम पावले. ते शास्त्रशुद्ध व पद्धतशीर स्वरूपात आर्यभट्ट व वराहमिहीर यांच्याद्वारे मांडले गेले. आर्य भट्टाच्या 'आर्यभट्टीयम' या ग्रंथाचे चार पैकी दोन विभाग खगोलशास्त्राला वाहीले आहेत. हे तुम्ही पूर्वी पाहिलेच आहे. जो ज्योतिर्विद्येचा पाया आहे. ज्योतिर्विद्या हे भविष्य वर्तवण्याचे शास्त्र आहे. वराहमिहीर हा विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक होता. वराहमिहीराचे अंदाज एवढे अचूक असत की राजा विक्रमादित्याने त्याला 'वराह' ही पदवी बहाल केली.

### १५.२.३ नागार्जुन ः

नागार्जुन हा दहाव्या शतकातील शास्त्रज्ञ / वैज्ञानिक होत त्याच्या प्रयोगाचा मुख्य हेतू / उद्देश मूलद्रव्याचे सोन्यात रूपांतर करणे हा होता, ज्याप्रमाणे पाश्चात्य जगातील 'किमयागार' अलकेमिस्टाचा होता. हाच हेतू होता. जरी तो उद्दिष्टांमध्ये / ध्येयामध्ये सफल झाला नाही तरी सुद्धा सोन्याप्रमाणे चकाकणारे एक मूलद्रव्य बनवले. त्यांचे तंत्र आजही कृत्रिम दागिने घडवण्यासाठी वापरले जाते. त्याच्या रसरत्नाकर या प्रबंधामध्ये त्याने सोने चांदी (रूपे) कथिल व तांबे हे धातू काढण्याच्या पद्धतीची चर्चा केली आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १५.२

१. कणाद कोण होता ? त्याला हे नाव कसे प्राप्त झाले ?

उत्तर

२. बृहतसंहिता कोणी लिहीली?

उत्तर

३. नागार्जुन आयुष्यात कोणते लक्ष्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत होता ?

उत्तर

४. नागार्जुनाच्या रसरत्नाकर या प्रबंधाचा विषय सांगा.

उत्तर

## १५.३ प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र (आयुर्वेद व योग)ः

प्राचीन भारतात शास्त्रीय ज्ञान हे अतिशय पुढारलेले होते. काळानुसार वैद्यकशास्त्रसुद्धा अतिशय प्रगत होते. आयुर्वेद ही प्राचीन भारतात विकसित केली गेलेली मौलिक औषधी पद्धती / प्रणाली होती. आयुर्वेद या शब्दाचा शब्दशः अर्थ चांगल्या स्वास्थ्य व दीर्घायुष्याचे शास्त्र ही प्राचीन भारतीय औषधी प्रणाली केवळ रोगोपचरातच सहाय्यभूत नाही तर त्या आजाराचे / रोगाची कारणे व निदान शोधण्यास ही सहाय्यभूत ठरते. आयुर्वेद हे निरोगी तद्वतच् रोगी दोघांनाही मार्गदर्शक आहे. आरोग्याची व्याख्या ते त्रिदोषाचे संतुलन व रोग आजार हा या तीन दोषांमधील असंतुलन किंवा बिघाड अशी करते. रोगावर वनस्पती औषधाच्या सहाय्याने रोगोपचार करतांना त्याच्या मुळावर आघात करून त्याचे कारण नष्ट करणे हा आयुर्वेदाचा उद्देश /हेतू असतो. आरोग्य व दीर्घायु हे आयुर्वेदाचे मूळ ध्येय आहे. आयुर्वेद ही जगातील सर्वात जुनी वैद्यकीय प्रणाली /पद्धती आहे. आयुर्वेद संहिता हा आयुर्वेदावरील प्रबंध जगातील सर्वात जुना वैद्यकिय ग्रंथ आहे. 'चरकाला'

आयुर्वेदिक औषधांचा जनक व सुश्रुताना शल्यकार्याचा पिता म्हणतात. सुश्रुत, चरक, माधव, वाग्भट्ट व जीवक हे नामांकित आयुर्वेद व्यावसायिक होते (डॉक्टर). पाश्चात्य जगतात आजकाल आयुर्वेद अत्यंत लोकप्रिय झाला आहे हे आपणास माहित आहे का याचे कारण आयुर्वेदाचे आधुनिक वैद्यकशास्त्र /औषधीशास्त्रापेक्षा (ॲलोपथी) असलेले जादा फायदे.

### १५.३.१ सुश्रूत ः

शल्यचिकित्सा क्षेत्रात सुश्रूत हा अग्रणी होता. तो शल्यचिकित्सेला रोगोपचारकलेची सर्वोच्च शाखा व अपयशाची सर्वा कमी शक्यता /जबाबदारी मानायचा त्याने मानवी शरीराचा अभ्यास मृत देहांच्या मदतीने केला. सुश्रुतसंहितेत ११00 आजार नमूद केले आहेत. त्यात २६ प्रकारचे ताप, आठ प्रकारची कावीळ व वीस प्रकारच्या मूत्रविषयक तक्रांरींचा (दोषांचा) समावेश आहे. ७६0 वनस्पतींचे वर्णन केलेले आहे. मूळ, साल, रस, रेझीन (डिंक वा पाझरलेला द्रव), फुले हे सगळे भाग औषधासाठी वापरले जात. दालचिनी, तीळ, मिरी, वेलदोडे, आले ही आजसुद्धा घरगुती औषधे आहेत.

सुश्रुतसंहितेमध्ये शरीरशास्त्राच्या विस्तृत अभ्यासासाठी मृत शरीराची निवड व जतन करण्याचे सुद्धा विवरण केले आहे. अभ्यासासाठी सामान्यपणे एखाद्या वृद्धाचे अथवा भयंकर रोगाने मरण पावलेल्या व्यक्तिंचे मृत शरीर हे ग्राह्य नसते. शरीर संपूर्णपणे अतिशय स्वच्छ करणे आवश्यक होते. ते एका वृक्षाच्या सालीत लपेटले जाई. ते नंतर एका पिंजऱ्यात ठेऊन नदीपात्रात विशिष्ट ठिकाणी काळजीपूर्व क लपवले जाई. तिथे नदीची जलधारा त्याला मऊ करी व सात दिवसानंतर ते शरीर नदीपात्रातुन हलवले जाई. त्यानंतर ते गवताची मूळे केस व बांबूच्या केलेला ब्रशने स्वच्छ केले जाई. हे केल्यानंतर शरीराचा प्रत्येक अंतर्गत व बाह्य भाग स्पष्ट दिसू शके.

सुश्रुताचे सर्वात महान योगदान म्हणजे अवयवरोपण (प्लास्टिक सर्जरी ऱ्हीनो प्लास्टी) व नेत्रचिकित्सा मोतीबिंदू काढणे. त्या काळात नाक व कान कापणे या सामान्य शिक्षा होत्या. यांची पुनस्थापना (पुन्हा बसवणे) अथवा युद्धात गमावलेले हातापायाचे रोपण हे मोठे वरदान होते. या शल्य क्रियांचे पायरीपायरीने (प्रत्येक अवस्थेचे) काटेकोर वर्णन सुश्रूत संहितेत आहे. सुश्रूत अवलंब करीत असलेल्या या प्रत्येक अवस्थेचे आधुनिक शल्य चिकित्सक (सर्जन) अवयव रोपण (प्लास्टिक सर्जरी) करीत असलेल्या प्रत्येक अवस्थेशी अतिशय नोंद घेण्याजोगे लक्ष्यणीय साम्य आहे ही आश्चर्यकारक बाब आहे. सुश्रूत संहितेचे शल्यक्रियेत वापरण्याच्या १0१ उपकरणांचा तपशील आहे. कांही गंभीर शल्यक्रिया मध्ये मातेच्या गर्भपिशवीतून (गर्भाशयातून) गर्भ काढणे जखमी मोठे आतडे दुरूस्त करणे मूत्राशयातून मूतखडा काढणे इ. चा समावेश आहे. हे अतिशय मनोरंजक व अद्भूत आहे, असे वाटते का?

### १५.३.२ चरक ः

प्राचीन भारतीय औषधीशास्त्राचा चरक हा जनक मानला जातो. राजा कनिष्कच्या दरबारातील तो राजवैद्य होता. त्याची चरकसंहिता हा औषधांवरील उल्लेखनीय ग्रंथ आहे. त्यात असंख्य आजारांचे वर्णन आहे आणि त्यांची कारणे ओळखण्याचे तसेच उपचार पद्धतीचेही वर्णन आहे. पचन, चयापचय क्रिया व रोग प्रतिकारशक्ती हे आरोग्यासाठी व पर्यायाने वैदकशास्त्रासाठी महत्वाचे आहे हे कथन करणारा सुश्रूत हा पहिला तज्ञ आहे. चरक संहितेत आजारावर उपचार करण्यापेक्षा त्याचे कारण मूळ

नष्ट करण्यावर जास्त भर दिला आहे. शास्त्रांची मूलतत्वे ही चरकाला माहित होती. हजारो वर्षा पूर्वी वैद्यक शास्त्र हे भारतात इतक्या प्रगत अवस्थेत होते हे जाणून तुम्हाला अभिमान वाटतो ना !

### १५.३.३ योग व पातंजली ः

भारतात योगशास्त्राचा विकास हा औषधाशिवाय मानसिक व शारिरिक पातळीवर स्वास्थ लाभावे यासाठी आयुर्वेदाचे सहयोगी शास्त्र म्हणून झाला. योग हा संस्कृत शब्द 'योकत्र' पासून उत्पन्न झाला आहे. योकत्र याचा शब्दशः अर्थ मनाची बाह्य जाणीव / संवेदना वस्तूपासून मुक्ती करून / विलगीकरण करून ते आत्म्याशी जोडणे असा आहे. इतर सर्वशास्त्रांप्रमाणे त्याचे मूळ ही वेदातच आहे. 'चित्त' याची व्याख्या ते मानवाच्या जाणीवा जागृत मनातील विचार भावना व इच्छा यांचा विलय लोप करून संतुलनाची अवस्था प्राप्त करणे अशी करते. योग आत्मबल जागृत करवते व त्याद्वारे चित्त शुद्धी व उन्नयन करून दैवीशक्तीची प्रचिती घडवते. योग हा शारीरिक तथा मानसिक दोन्ही आहे. शारीरिक योगाला 'हठयोग' म्हणतात. त्याचे ध्येय आजार नष्ट करणे व शरीराला निरोगीपणा प्राप्त करून देणे हे आहे. मानसिक योगाला 'राजयोग' म्हटले आहे. त्याचे अंतिम ध्येय आत्मप्रचिती व बंधनातून मुक्ती शारीरिक, मानसिक व भावनिक व आत्मिक संतुलनातून प्राप्त करणे आहे.

योग हा मौखिकरित्या (तोंडी) एका ऋषीकडून दुसऱ्या ऋषीकडे हस्तांतरित केला गेला. या महान शास्त्राच्या शास्त्रशुद्ध मांडणीचे श्रेय पातंजलीला जाते. पातंजलीच्या 'योगसूत्र' या ग्रंथात ॐ हे परमेश्वराचे प्रतिक मानले आहे. तो ॐ चा उल्लेख वैश्विक ध्वनी असा करतो जो हवेच्या बाह्य तरल थरातून चिरंतन आहे व ज्याचे अस्तित्व फक्त ज्ञान झालेल्यालाच जाणवते. योगसूत्रांशिवाय पतंजलीने औषधीवर ग्रंथ लिहिला आहे. आणि पाणिनीच्या व्याकरणावर महाभाष्य हा ग्रंथ लिहीला आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न १५.३

१. आयुर्वेद काय आहे ?

उत्तर

२. औषधीवरील सर्वात जुना ग्रंथ ................ हा आहे.

३. सुश्रूत संहिता हा ...................... वरील ग्रंथ आहे.

४. प्राचीन भारतीय औषधशास्त्राचा ................ हा जनक असून त्याने ................... नावाचा ग्रंथ लिहीला आहे.

५. 'योग' म्हणजे काय ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- शास्त्र व गणित प्राचीन काळात भारतात अती प्रगत अवस्थेत होते.
- काही प्राचीन भारतीय प्रसिद्ध गणितज्ञ बौद्धायन, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य व महाविराचार्य हे होते.
- कणाद, वराहमिहीर व नागार्जुन हे काही प्रसिद्ध शास्त्रज्ञ होते.
- प्राचीन भारतात वैद्यकशास्त्र ही अति प्रगत होते.
- आयुर्वेदही मौलिक औषधी प्रणाली होती जी प्राचीन भारतात विकसित झाली होती. आयुर्वेदाचा शब्दशः अर्थ उत्तम आरोग्य (स्वास्थ्य) व दीर्घायुष्य असा आहे.
- चरकाला प्राचीन भारतातील आयुर्वेदिक औषधीचा जनक व सुश्रूताला शल्यचिकित्सेचा जनक म्हणतात.
- चरकाचे महान योगदान अवयव रोपण त्वचारोपण (ऱ्हीनोप्लास्टी /प्लास्टिक सर्जरी) व नेत्र शल्यक्रिया (मोतीबिंदू काढणे) हे होते.
- चरकाने लिहीलेली चरक संहिता हा औषधीवरील उल्लेखनीय ग्रंथ आहे.
- योगशास्त्र हे प्राचीन भारतात विनाऔषधी शारीरिक व मानसिक पातळीवर स्वास्थप्राप्तीसाठी आयुर्वेदाचे सहकारीशास्त्र म्हणून विकसित केले गेले.
- पतंजली हा हे महान शास्त्र पद्धतशीर पणे त्याच्या योगसूत्राद्वारे मांडणारा प्रथम विद्वान होता.

## सत्रान्त अभ्यास

१. खगोलशास्त्र विज्ञानाच्या क्षेत्रात आर्यभट्टाने प्रतिपादित केलेले सिद्धांत कोणते?

२. भास्कराचार्याचे 'सिद्धांत शिरोमणी' कशाबाबत आहे ?

३. अंकगणिताच्या पहिल्या पाठयपुस्तकाचे नाव सांगा. ते कोणी लिहीले? त्या हाताळलेली काही प्रकरणे नमूद करा.

४. वराहमिहीराच्या शास्त्रीय ज्ञानातील योगदानाची चर्चा करा.

५. कृत्रिम दागिने घडवण्यातील प्रक्रियेत नागार्जुनाचे योगदान कोणते ?

६. 'प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र यावर' निबंध लिहा.

७. स्पष्ट करा.

अ. सुश्रूत संहितेत दिलेली मृत शरीराची निवड व जतनाची पद्धत.

ब. हठयोग व राजयोग

क. चरकाची त्रीदोष सिद्धांत

ड. योगासंदर्भात 'चित्त' ची संकल्पना

## प्रश्नांची उत्तरे

### १५.१

१. अ. 'पाय'ची किंमत मूल्य आकडेवारीने काढणारा प्रथम गणितज्ञ

ब. पायथॅगोरसचे प्रमेय म्हणून ओळखले जाणारे प्रमेयाची सिद्धता/शोध.

२. आर्यभट्ट

३. अरबांना या पुस्तकाद्वारे आपली गणित प्रणाली ज्ञात झाली.

४.

| ग्रंथ | लेखक/ रचनाकार |
|---|---|
| सुल्वसूत्र | बौधायन |
| आर्यभट्टीय | आर्यभट्ट |
| ब्रह्मस्फुट सिद्धांतिका | ब्रह्मगुप्त |
| सिद्धांत शीरोमणी | भास्कराचार्य |
| गणित सार संग्रह | महावीराचार्य |

### १५.२

१. वैशेशिका (शाखेचा) संप्रदायाचा सहाव्या शतकातील शारत्रज्ञ अगदी बालपणापासून त्याला अतिसूक्ष्म 'कणा'त रूची होती म्हणून त्याचे नाव 'कणाद' ठेवण्यात आले.

२. वराहमिहीर

३. मूलद्रव्यांचे सोन्यात रूपांतर करणे.

४. त्याने सोन्यासारखी झळाळी/चकाकी असलेला धातू बनवला. सोने, चांदी, कथिल व तांबे यासारखे धातू मिळवण्याच्या पद्धती शोधून काढल्या.

### १५.३

१. प्राचीन भारतात विकसित केली गेली मौखिक औषधीप्रणाली, उत्तमस्वास्थ व दीर्घायूचे शास्त्र.

२. अत्रेय संहिता

३. शल्य चिकित्सा

४. चरक, चरक संहिता

५. ज्ञानेंद्रियाच्या विषयांतून मनाला विलग करून त्याचा अंतरात्म्याशी संयोग घडवणे.

### कृती ः आपल्यासाठी उपक्रम

१. तुम्ही वैदिक गणिताबद्दल ऐकले आहे कां ? आजकाल ते शालेय पातळीवर /स्तरावर सुद्धा लोकप्रिय होत आहे त्याबद्दल माहिती मिळवा व त्यावर एक निबंध लिहा.

२. आयुर्वेद व ॲलोपथी मधील फरक शोधा. आयुर्वेदाच्या वाढत्या लोकप्रियतेची पाश्चात्य देशातसुद्धा कारणे नमूद करणारा अहवाल/वृत्तांत तयार करा.

योग ही स्वस्थ करण्याची आणखी एक प्रणाली आहे जी अतिशय लोकप्रिय झाली आहे. त्याबद्दल आधी वाचन करा. योगामधील आठ पायऱ्यांची/ अवस्थांची (अष्टांग मार्ग) माहिती मिळवा. व एक अहवाल / वृत्तांत तयार करा.

# १६

# मध्ययुगीन भारतातील शास्त्र व शास्त्रज्ञ

तुम्ही प्राचीन काळातील भारतीय शास्त्र व शास्त्रज्ञ यांच्याबद्दल वाचले आहे. मध्ययुगीन कालखंडादरम्यान भारतात शास्त्र व तंत्रज्ञानाचे दोन पैलू आहेत. एक आधीच आखलेला आद्य परंपरांच्या मार्गाशी संबद्ध व दुसरा इस्लामिक व युरोपीय आघातामुळे उदभवलेल्या नवीन प्रभावाशी संबद्ध. या नवीन प्रगती बाबत आपण या पाठात जरा तपशीलवार माहिती घेऊया.

## उद्दिष्टे :

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- मध्ययुगीन कालखंडात उदयास आलेल्या शैक्षणिक पद्धती.
- मध्ययुगीन भारतात शास्त्र व तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीचा मागोवा.
- शास्त्र व तंत्रज्ञान क्षेत्रातील काही सुप्रसिद्ध विद्वज्जन आणि या कालखंडातील त्यांचे कार्य.

## १६.१ मध्ययुगीन कालखंडातील शास्त्रे :

मध्ययुगीन कालखंडात भारतात मुस्लीमांचे आगमन झाले. या काळापर्यंत पारंपारिक स्वनिर्मित शास्त्रशुद्ध शिक्षणाची अगोदरच घसरण, पीछेहाट चालली होती. या कालखंडादरम्यान अरब देशांमध्ये प्रचलीत असलेली शिक्षणपद्धती हळूहळू अंगीकारली गेली. परिणामी मकतब आणि मदरसे अस्तित्वात आले. या संस्थांना राजाश्रय असे. ही अनेक जागी उघडलेल्या मदारशांची साखळी पूर्वनियोजित अभ्यासक्रमाचा अवलंब करीत असे. दोन भाऊ शेख अब्दुल्ला व शेख अजीजुल्ला जे तर्कशुद्ध शास्त्राचे विशेषज्ञ होते हे सम्बल व आग्रा येथील मदरशांचे प्रमुख होते. देशात स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विद्वान व्यक्तींशिवाय अरबस्थान पर्शिया आणि मध्य आशिया मधील विद्वज्जनांना मदरशांमध्ये शिकविण्यासाठी बोलविले जाई.

मुस्लिमराज्यकर्त्यांनी प्राथमिक शाळांना अभ्यासक्रम सुधारण्याचा प्रयत्न केला हे तुम्हाला माहित आहे का ? अंकगणित, मापन, भूमिती, खगोलशास्त्र, हिशोबशास्त्र, सामान्य प्रशासन आणि शेतीशास्त्र

अशा विषयांचा अंतर्भाव प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासविषयात करण्यात आला. जरी शिक्षणात सुधारणा घडवून आणण्याचे विशेष प्रयास राज्यकर्त्याकडून केले गेले तरी शास्त्रांनी विशेष प्रगती केली नाही. भारतीय पारंपारीक शास्त्रीय संस्कृती तथा इतर देशांमध्ये शास्त्रविषयक प्रचलित मध्ययुगीन दृष्टिकोन यामध्ये एकप्रकारचे मेळ बसविण्याचा प्रयास केला गेला. आता आपण या कालखंडात विविध क्षेत्रांमध्ये झालेली प्रगती बघू.

राजपरीवारास तथा शासकीय खात्यांना धान्य, माल व उपकरणे पुरवण्यासाठी मोठया कार्यशाळांची ज्याला कारखाना म्हणत योजना केली गेली. कारखाने हे केवळ निर्मितीची माध्यमे नसून तरूणांना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणारी केंद्रे म्हणून कार्य पार पाडत. कारखाने प्रशिक्षण देत व वेगवेगळया शाखांमध्ये कुशल कामगार तथा कारागीर निर्माण करीत जे पुढे स्वतःचे स्वतंत्र कारखाने काढीत.

### १६.१.१ गणित ः

गणिताच्या क्षेत्रात अनेक ग्रंथ या कालखंडात निर्मिले गेले. नरसिंह दैवज्ञ याचा पुत्र नारायण पंडीत त्याच्या गणितातील गणित कौमुदी आणि बीजगणितवतंस या ग्रंथासाठी सुप्रसिद्ध आहे. गुजरातमध्ये गंगाधरने लीलावती, सुद्धांतदिपिका आणि लिलावती व्याख्या हे ग्रंथ लिहीले. यात त्रिकोणमितीय साईन, कोसाईन, टॅजंट व कोटॅजंट सारख्या संज्ञांसाठी नियम दिले आहेत. नीलकंठ सोमसुत्वन याने तंत्रसंग्रह हा त्रिकोणमितीय फलांचे नियम असलेला ग्रंथ निर्मिला.

गणेश दैवज्ञाने भरपूर उदाहरणे असलेला 'बुद्धीविलासिनी' हा 'लीलावती' वरील भाष्य ग्रंथ लिहीला. वलहाल घराण्यातील कृष्णा याने भास्कर द्वितीय रचित बीजगणितावर नवांकुर लिहीले जे प्रथम व द्वितीय श्रेणीतील संदिग्ध समीकरणांच्या नियमांत सुधारणा सुचवते. निळकंठ ज्योतिर्विद याने ताजिक हा मोठया संख्येने पारशी तांत्रिक पारिभाषिक शब्दांचा परीचय देणारा संग्रह रचला. अकबराच्या आदेशावरून फैजीने भास्कराच्या बीजगणिताचे भाषांतर केले. अकबराने इतर विषयांबरोबर गणिताचा अभ्यासक्रमात समावेश करावा हा आदेश दिला. नसिरूद्दिन अत तुसी हा गणितातील आणखी एक विद्वान होता.

### १६.१.२ जीवशास्त्र ः

याचप्रकारे जीवशास्त्राच्या क्षेत्रातसुद्धा प्रगती झाली होती. हंसदेवाने तेराव्या शतकात मृगपक्षीशास्त्र हा जीवशास्त्रावर ग्रंथ रचला. यात काही शिकारीचे प्राणी व पक्ष्यांचे (जरी सर्वच शास्त्रीय नाही तरी) सामान्य वर्णन आले आहे. मुस्लिम राजे योद्धे तथा शिकारी होते शिकारीसाठी प्राण्यांचा ताफा बाळगायचे जसे घोडे, कुत्री, चित्ते, ससाणे पाळीव तथा जंगली दोन्ही प्रकारचे प्राण्यांचे वर्णन या ग्रंथात केलेले आहे. बाबर व अकबर दोघेही राजकारण तथा युद्धे यात व्यस्त असूनही हा ग्रंथ अभ्यासण्यासाठी वेळ काढत. जातीवंत हत्ती व घोडे यासारख्या प्राण्यांच्या पैदाशीमध्ये अकबराला विशेष रस होता. जहांगीरने त्याच्या तुझुक इ. जहांगीरी या ग्रंथात पशूंची पैदास व संकरीत पशू यांच्या बद्दल त्याची निरीक्षणे नोंदली आहेत. त्याने प्राण्यांच्या ३६ प्रजातींची माहिती दिली आहे. त्याचे दरबारी कलाकार विशेषतः मन्सूर प्राण्यांची मनोहरी व अचूक चित्रे काढीत. यापैकी काही अद्यापही अनेक संग्रहालये व खाजगी संग्रहालयांमध्ये जतन करून ठेवलेली आहेत. निसर्गप्रेमी जहांगीरला वनस्पतींच्या अभ्यासाचीही आवड होती. त्याच्या दरबारी कलाकारानी ५७ च्या जवळपास

वनस्पतींची चित्रे काढली आहेत.

### १६.१.३ रसायनशास्त्र ः

मध्ययुगीन कालखंडात कागदाचा वापर सुरू झालेला होता हे तुम्हाला माहित आहे का ? कागद निर्मितीमध्ये रसायनशास्त्राचा महत्वाचा उपयोग होत होता. काश्मीर, सियालकोट, जाफराबाद, पाटणा, मुर्शिदाबाद, अहमदाबाद, औरंगाबाद आणि म्हैसूर ही कागद उत्पादनाची महत्वाची केंद्रे बनली. कागद बनवण्याचे तंत्र संपूर्ण देशात जवळपास सारखेच होते फरक फक्त वेगवेगळया कच्च्या मालापासून लगदा तयार करण्यात होता.

मोगलांना बंदूकीची दारू बनवण्याचे तंत्र आणि त्याचा गोलंदाजीत वापर अवगत होते, रसायनशास्त्राचा आणखी एक उपयोग. भारतीय कारागीर हे तंत्र शिकले व आणि योग्य विस्फोटक मिश्रण विकसित केले. शुक्रनीती या शुक्राचार्याच्या श्रेय ग्रंथात सोरा गंधक व कोळसा यांचा वेगवेगळया प्रमाणात वापर करून वेगवेगळया बंदूका तोफांमध्ये वापरासाठी वेगवेगळी दारू कशी तयार करता येते याचे वर्णन आले आहे. मुख्य प्रकारचे दारूकामात जे हवेतून तीरासारखे जाते अग्नीच्या ठिणग्या उडवते विविध रंगाचा प्रकाश देते व शेवट विस्फोटाने होतो अशांचा समावेश होतो. ऐन इ अकबरी हा ग्रंथ अकबराच्या सुगंधी कार्यालयाच्या कायद्यांबाबत बोलतो. गुलाबाचे अत्तर हे लोकप्रिय होते ज्याचा शोध शहाजहानची बायको नूरजहांने लावल्याचे मानले जाते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १६.१

१. मध्ययुगीन कालखंडात प्राथमिक शाळांमधून कोणते विषय शिकवले जात ?

उत्तर ______________________________

२. अकबराद्वारे ............. हा विषय प्राथमिक शाळेत सक्तीचा अभ्यास विषय करण्याचा आदेश देण्यात आला.

३. कारखान्यांची दोन कार्ये कोणती होती ?

उत्तर ______________________________

४. पुढील विद्वानांच्या त्यांच्या ग्रंथांशी जोडया जुळवा.

| | विद्वानाचे नाव | | ग्रंथाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | नारायण पंडित | १. | बुद्धीविलासिनी |
| २. | गंगाधर | २. | मृग पक्षी शास्त्र |
| ३. | गणेश दैवज्ञ | ३. | गणित कौमुदी |
| ४. | हंसदेव | ४. | लीलावती व्याख्या |
| ५. | जहांगीर | ५. | ताजीक |



टिपा

| | |
|---|---|
| ६. शुक्राचार्य | ६. तुजुक इ जहांगीरी |
| ७. नीलकंठ ज्योतिर्विद | ७. शुक्रनीती |

५. मध्ययुगीन कालखंडात जिथे कागद निर्मिती केली जात होती अशा चार ठिकाणांची नावे द्या.

उत्तर ______________________________

## १६.१.४ खगोल शास्त्र :

या कालखंडादरम्यान भरभराटीस आलेले खगोल शास्त्र हे आणखी एक शास्त्र होय. खगोल शास्त्रामध्ये आधीच प्रस्थापित झालेल्या खगोल शास्त्रीय कल्पनांवरील भाष्ये उदयास आली. सम्राट फिरोज शहाच्या दरबारातील खगोल शास्त्रज्ञ महेंद्र सूरीने एक उपकरण यंत्रणा विकसित केली. परमेश्वर व महाभास्करीय ही दोन्ही केरळमधील खगोल शास्त्रज्ञ व पंचांगकर्ती प्रसिद्ध घराणी होती. नीळकंठ सोमसुतवनने आर्यभट्टीय वर भाष्य लिहीले. कमलाकरने इस्लामिक खगोलिय कल्पनांचा अभ्यास केला. तो इस्लामिक ज्ञानाचा अधिकारी होता. जयपूरचे महाराज जयसिंग द्वितीय खगोल शास्त्राचे आश्रयदाता होते. त्यांनी दिल्ली, उज्जैन, वाराणसी, मथुरा आणि जयपुर या पाच ठिकाणी खगोल शास्त्रीय वेधशाळा उभारल्या.

## १६.१.५ औषधे :

मध्ययुगीन कालखंडात राजाश्रयाभावी आयुर्वेदिक औषध पद्धती तितक्याशा जोमाने प्रगत झाली नाही जेव्हढी ती प्राचीन काळी होती. तथापि आयुर्वेदावर काही महत्वाचे प्रबंध जसे वंगसेन चे सारंगधर संहिता आणि चिकित्सा संग्रह तसेच भवमिश्राचे यागरथबाजरा व भावप्रकाशयांची रचना झाली. तेराव्या शतकात लिहीले गेलेल्या सारंगधर संहिताच्या औषधी द्रव्यामध्ये व निदान, मूत्र परिक्षणामध्ये अफूचा समावेश आहे. यात नमूद केलेल्या औषधांमध्ये रसचिकित्सा पद्धतीची धातू द्रव्ये आणि आयात केलेल्या औषधांचा ही समावेश आहे.

रस चिकित्सा प्रणाली मुख्यत्वेकरून मोठया प्रमाणात खनिज औषधांसंबंधी पारद व बिना पारद या दोन्हीप्रकारच्या बाबत होती. तमीळनाडूमध्ये बहुप्रचलित असलेली सिद्ध प्रणाली ही नामवंत सिद्धांची देणगी होती ज्यांनी दीर्घायु बनवणारी खनिज औषधीद्रव्यांनीयुक्त मिश्रणे बनवल्याचे मानले जाते.

मध्ययुगीन कालखंडात युनानी तिब्ब प्रणाली भराभराटीला आली. अली बिन रब्बन याने संपूर्ण ग्रीक औषधी प्रणाली आणि भारतीय औषधी ज्ञान यांचा सारांश त्याच्या फिरदौसु हिकमत या पुस्तकात दिला आहे. युनानी औषधी प्रणाली भारतात मुस्लीमांसोबत अकराव्या शतकाच्या सुमारास आली आणि लगेच तिला वाढीसाठी राजश्रय मिळाला. हकीम दिया महम्मद याने अरबी पारशी व आयुर्वेदिक वैद्यकिय ज्ञान संकलित करून माजिनी–ए–दियाए हा ग्रंथ लिहिला. तिब्बे फिरोजशाही हे पुस्तक लिहीले. औरंगजेबाला अर्पण केलेले तिब्बे औरंगजेबी हे पुस्तक आयुर्वेदिक स्त्रोतांवर आधारित आहे. मुसलाजती दाराशिकोही हे नुरूद्दिन मुहम्मदने लिहीलेले व दाराशिकोहला अर्पण केलेल्या पुस्तकात ग्रीक औषधीद्रव्यांबाबत तपशील आहे.

### १६.१.६ शेती :

मध्ययुगीन कालखंडात शेतीउद्योगातील कामे पूर्वापार चालत आलेल्या भारतीय पद्धतीचीच होती. नवीन पीकप्रकार, वृक्ष तसेच फळबागायती वनस्पतीचा परकीय व्यापारी यांचे मार्फत झालेला परीचय यातून काही महत्वाचे बदल घडून आले. प्रमुख पिके गहू, तांदूळ, जव, ज्वारी, बाजरी, डाळी, गळीताची धान्ये, कापूस, ऊस आणि नीळ ही होती. पश्चिम घाटात उत्तम दर्जाच्या काळी मिरीचे उत्पादन व काश्मीरने आपली केशर व फळांची परंपरा कायम ठेवली. तमीळनाडूचे आले व दालचिनी आणि केरळची वेलदोडे, चंदन व नारळ ही उत्पादने दिवसेंदिवस लोकप्रिय होत होती. भारताला सोळाव्या व सतराव्या शतकात परीचित करून देण्यात आलेल्या महत्वाच्या वनस्पती तंबाखू, मिरची, बटाटा, पेरू, सिताफळ, काजू आणि अननस या होत्या. याच काळात खसखशीच्या रोपांपासून अफूचे उत्पादन माळवा प्रांत व बिहार प्रदेशात सुरू झाले. फळबागायतीच्या सुधारीत पद्धती अगदी यशस्वीपणे अंगीकारल्या गेल्या. आंब्याची कलमे करण्याची रीतसर कृती गोव्याच्या जेसुइटसनी सोळाव्या शतकाच्या मध्याला आणली. मुगल सम्राटांच्या बागा फळझाडांच्या मोठया प्रमाणावर लागवडीसाठी योग्य ठिकाणे होती.

जलसिंचन विहीरी, तळी, (पाट) कालवे, रहाट, चर, ढेकली चर (मोट) द्वारा होत असे. आग्रा भागात पारशी चाक वापरले जाई. शासनाने मध्ययुगीन कालखंडात जमीन मोजणी व जमीनीची वर्गवारीची पद्धत लागू करून शेतीला मजबूत आधार दिला जे शासक व कसणारे दोघांनाही फायद्याचे ठरले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १६.२

१. जयपूरचे महाराजा सवाई जयसिंग द्वितीय द्वारा खगोल शास्त्रीय वेधशाळा ज्या शहरात उभारल्या गेल्या त्यांची नावे द्या.

उत्तर ______________________

२. मध्ययुगीन कालखंडात आयुर्वेदावर लिहीलेल्या दोन प्रवंधांची नावे द्या.

उत्तर ______________________

३. फिरदौस हिकमत काय आहे ?

उत्तर ______________________

४. कोणत्या ग्रंथात अरबी, पारशी व आयुर्वेदिक वैद्यकिय ज्ञान एकत्र आले आहे?

उत्तर ______________________

५. मध्ययुगीन कालखंडात भारतात लागवड सुरू झालेल्या ४ पिकांची नावे द्या.

उत्तर ______________________________

## तुम्ही काय शिकलात?

- शिक्षण प्रणालीत लक्षणीय बदल झाले. अरब प्रणालीची मोठया प्रमाणात सुरूवात झाली. सर्वदूर मदरसे व मकतब यांची स्थापना झाली. शासनकर्त्यांनी सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला.
- गणित रसायन शास्त्र जीवशास्त्र खगोलशास्त्र व औषधी याक्षेत्रात ग्रंथ रचना झाली.
- या काळातील बहुतेक ग्रंथसंपदा ही पूर्वीच्या ग्रंथावर भाष्ये भावार्थ टीकात्मक स्वरूपात होती.
- बरेचसे महत्वाचे खगोल शास्त्र औषधी आणि इतर शास्त्रे यावरील ग्रंथसंपदा संस्कृतमधून पारशी अरबी आणि पारशी अरबीमधून संस्कृतमध्ये उपलब्ध करण्यात आली.

## सत्रान्त अभ्यास

१. मध्ययुगीन कालखंडात विकसीत झालेल्या शिक्षण प्रणालीचे वर्णन करा.

२. मध्ययुगीन कालखंडात औषधी क्षेत्रात झालेल्या प्रगतीची चर्चा करा.

३. या कालखंडात जलसिंचन कसे केले जाई ?

४. मध्ययुगीन कालखंडातील शास्त्र व शास्त्रज्ञ यावर निबंध लिहा.

## प्रश्नांची उत्तरे

**१६.१**

१. अंकगणित मापन भूमिती खगोलशास्त्र लेखाशास्त्र सामान्य प्रशासन व शेतकीशास्त्र

२. गणित

३. अ. निर्मिती माध्यमे  ब. तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे

४.

| विद्वानाचे नाव | ग्रंथाचे नाव |
|---|---|
| १. नारायण पंडित | १. गणित कौमुदी |
| २. गंगाधर | २. लीलावती व्याख्या |
| ३. गणेश दैवज्ञ | ३. बुद्धीविलासिनी |
| ४. हंसदेव | ४. मृग पक्षी शास्त्र |

| | |
|---|---|
| ५. जहांगीर | ५. तुजुक इ जहांगीरी |
| ६. शुक्रचार्य | ६. शुक्रनीती |
| ७. नीलकंठ ज्योतिर्विद | ७. ताजीक |

५. काश्मीर, सियालकोट, जाफराबाद पाटणा, मुर्शिदाबाद, अहमदाबाद, औरंगाबाद आणि म्हैसूर यापैकी कोणतेही चार.

**१६.२**

१. दिल्ली, ऊज्जैन, वाराणसी, मथुरा आणि जयपुर.

२. सारंगधर संहिता, चिकित्सा संग्रह, यागरथबाजरा व भावप्रकाश यापैकी कोणतेही दोन.

३. अली बिन रब्बन याचा संपूर्ण ग्रीक औषधी प्रणाली आणि भारतीय औषधी ज्ञान याचा सार असलेला ग्रंथ.

४. माजिनी ए दियाए

५. तंबाखू, मिरची, बटाटा, पेरू, सिताफळ, काजू, अननस यापैकी कोणतेही चार

## कृती : आपल्यासाठी उपक्रम

१. जयपूरचे महाराजा सवाई जयसिंग द्वितीय द्वारा खगोल शास्त्रीय वेधशाळांपैकी एकीला भेट देण्याचा प्रयत्न करा. वेधशाळेची उपयुक्तता व्यक्त करणारा व तेथे उपलब्ध असणाऱ्या उपकरणांचे वर्णन असलेला अहवाल तयार करा.

२. कागद कारखान्याला भेट द्या. निर्मिती प्रक्रियेचा वृत्तांत लिहा.

३. तुम्ही दोन औषध प्रणालीबद्दल शिकला. आयुर्वेदिक जी प्राचीन काळादरम्यान विकसित केली गेली व युनानी तिब्ब जी मुस्लिमांद्वारे मध्ययुगीन कालखंडात भारतात आणली गेली. तुम्हाला माहित आहे का की तुम्ही आजारी असतांना सहसा ज्या डॉक्टरांकडे सल्ला घेण्यास जाता ते ॲलेपॅथिक प्रणालीचा अवलंब करतात जी आधुनिक काळात ब्रिटीशांद्वारा भारतात आणली गेली. या तिन्ही प्रणालींची मूलतत्वे शोधून काढा व त्यामधील भेद शोधून काढा. माहिती मिळण्यासाठी तुम्ही पुढील पैकी एक किंवा अधिक बाबींचा वापर करू शकता.

- तुमच्या शिक्षकांशी चर्चा
- ग्रंथालयातून या विषयांवरील ग्रंथ मिळवून वाचन
- इन्टरनेटचा वापर
- डॉक्टरांशी चर्चा

या प्रणालीमधील भेद शोधून काढून व प्रत्येकीची मूलतत्वे मांडून अहवाल तयार करा.

४. मध्ययुगीन कालखंडात भारतात आगमन झालेली कोणतीही दोन पिके निवडा आणि त्यांचे मूळ व ती भारतात कशी आली ते शोधा. त्यांच्या कथा लिहा.

# १७

# आधुनिक भारतातील शास्त्रज्ञ

आधुनिक भारतातील शास्त्रीय विचारांच्या विकासाचे श्रेय या कालखंडातील शास्त्रज्ञांना जाते. एकोणाविसाव्या शतकाचा दुसऱ्या भागात सर सी.व्ही. रमण यांनी शास्त्रीय विचारांमध्ये एक अभूतपूर्व बदल घडवून आणला. आपल्या अणूकेंद्रकीय भौतिकशास्त्राचे पितामह म्हणून ओळखले जाणारे डॉ.होमी जे.भाभा यांनी भारतीय शास्त्राचे भविष्य वर्तविले. वनस्पती शरीरक्रियाशास्त्र क्षेत्रातील डॉ.जे.सी.बोस अणुऊर्जा व औद्योगिकरण क्षेत्रातील डॉ.विक्रम साराभाई आणि संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील डॉ.अब्दुल कलाम यांनी आधुनिक भारताच्या वैभवाचे पुनरूत्थान घडवून आणण्यासाठी क्रांतीकारक बदल घडवून आणले.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- आधुनिक भारतातील काही थोर शास्त्रज्ञांच्या महत्वपूर्ण कामगिरीबाबत सांगू शकाल.
- मानवी समाजाच्या सेवेत दिलेल्या योगदानाची जंत्री देऊ शकाल.

## १७.१ श्रीनिवास रामानुजन (१८८७-१९२०) ः

श्रीनिवास ऐय्यंगार रामानुजन भारतातील थोर गणितज्ञापैकी एक. यांचा जन्म तमीळनाडूमधील एरोडे येथे २२ डिसेंबर १८८७ला झाला. नंतर त्यांचे माता पिता चेन्नई पासून १६० किलोमिटर अंतरावर असलेल्या कुम्भकोणम येथे राहायला गेले. रामानुजन कुम्भकोणमच्या टाऊन हॉल स्कूल येथे शिकले तिथे ते सर्वगुणसंपन्न विद्यार्थी म्हणून नावाजले गेले. त्यांचे गणितावरचे प्रेम विलक्षण होते. अंक त्यांना अदभूत चुंबकीय आकर्षणाने खेचून घेत. शाळेतच तेरा वर्षांचे असतांना त्यांना जी.एस. कार यांचे सिनॉप्सिस ऑफ एलिमेंन्ट्री रिझल्टन इन प्युअर मॅथेमॅटिक्स हे पुस्तक मिळाले. हे पुस्तक जुने असले तरी या पुस्तकाने त्यांना गणित विश्वाचा परीचय घडवला. त्यांनी गणितात स्वतःच्या कल्पना विकसित करणे सुरू केले. ते स्वतःच्या कल्पना व परीणाम लिहून काढीत व निष्कर्षांचे टाचण काढीत.







त्यांच्या शोध निबंध वह्यापैकी तीन आपल्याला उपलब्ध आहेत. त्यांना रामानुजनच्या झिजलेल्या टाचणवह्या म्हणतात. स्वतःच्या कल्पना विकसित करण्यापायी त्यांना समस्या येत व त्या जर्नल ऑफ इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीमध्ये सोडवित यामुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता आले नाही. १९११ मध्ये याच जर्नलमध्ये त्यांनी बर्नाली संख्यांवर विद्वत्तापूर्ण शोध प्रबंध प्रकाशित केला. यामुळे त्यांना मान्यता प्राप्त झाली आणि ते मद्रासच्या वर्तुळात गणितातील प्रतिभावंत म्हणून परीचित झाले.

औपचारीक शिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना उपजीविका करणे कठिण झाले. मोठया मुश्किलीने त्यांना मद्रास पोर्ट ट्रस्ट मध्ये लेखनिकाची नोकरी मिळाली जी त्यांना सुदैवी ठरली. त्यांना या ठिकाणी गणितात प्रशिक्षित लोकांचा संपर्क लाभला. त्यांना जी.एच.हार्डी यांनी लिहिलेले ऑर्डर्स ऑफ इन्फिनिटी हे पुस्तक मिळाले. त्यांनी त्यांना पत्र लिहिले ज्या मध्ये त्यांनी १२० प्रमेये तथा सूत्रे यांचा उल्लेख केला. हार्डीनी त्यांच्यातील बुद्धीमत्ता चटकन ओळखली आणि त्यांची लंडनला येण्याची व्यवस्था केली. आवश्यकत्या शैक्षणिक पात्रतेचा अभाव असुनही त्यांना ट्रिनिटी कॉलेज मध्ये नाव नोंदण्यास परवानगी देण्यात आली तेथून त्यांना शास्त्र स्नातक ही पदवी दोन वर्षापेक्षा कमी कालावधीत मिळाली त्यांची हार्डी व जे. ई. लिटलवुड यांच्यासोबत चांगली जोडी जमली आणि त्यांनी गणिताच्या क्षेत्रात आश्चर्यजनक योगदान दिले. त्यांनी लंडनमध्ये अनेक पेपर प्रसिद्ध केले. रॉयल सोसायटी ऑफ लंडन चे फेलो निवडून येणारे ते दुसरे भारतीय होते आणि ट्रिनिटी कॉलेजचे फेलो निवडून येणारे ते पहिले भारतीय होते.

रामानुजन यांचे अंकांशी जवळचे अतुट नाते होते. १९१७ मध्ये ते गंभीर आजारी झाले. परंतु शरीर साथ देत नसताना सुद्धा अंक त्यांचे मित्र राहिले. दुर्दैवाने त्यांचे स्वास्थ्य अधिकच विघडले आणि ते १९१९ मध्ये भारतात परतले. नाव लौकिक व शास्त्रामध्ये नाव मिळवून. ते १९२० मध्ये मरण पावले. त्यांची गणितीय प्रतिभा, भारत ही खरोखर गणितीय कल्पनांची जन्म भूमी व स्त्रोत आहे याचा पुरावा आहे.

## १७.२ चंद्रशेखर वी. रमण (१८८८-१९७०) ः

चंद्रशेखर वी.रमण ज्यांना सी.वी.रमण या नावाने ओळखतात हे केवळ एक थोर शास्त्रज्ञ नव्हते तर मानवकल्याण व मानवीप्रतिष्ठा यावर निष्ठा असणारे थोर विचारवंत होते. त्यांना १९३० मध्ये भौतिक शास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. हे पारितोषिक मिळवणारे ते पहिले आशियन होते.

सी.वी. रमण यांचा जन्म १८८८ मध्ये तमीळनाडूमधील तिरूचिरापल्ली येथे झाला. त्यांचे वडील भौतिकशास्त्र व गणिताचे प्राध्यापक होते. ते संस्कृत वाङ्मय, संगीत व शास्त्राच्या वातावरणात वाढले. निसर्गाने त्यांना एकाग्रता बुद्धीमत्ता व चौकसबुद्धी यांची महान देणगी बहाल केली होती. बालपणीसुद्धा ते प्रतिभावान बालक म्हणून प्रसिद्ध होते. इंडियन ऑडिटस् ॲण्ड अकाउन्टस् (IAAS) परीक्षेत ते प्रथम आले व १९ वर्षाचे असतांना कलकत्यात अर्थखात्यात सहाय्य महालेखाधिकारी म्हणून नियुक्त झाले. शास्त्राच्या प्रेमापोटी त्यांनी आपल्या या उच्च पदावर पाणी सोडले व ते सायन्स कॉलेज ऑफ कलकत्ता युनिव्हर्सिटी येथे भौतिक शास्त्राचे प्राध्यापकपदी रूजू झाले. संगीतावरील गाढ प्रेमापोटी त्यांनी वीणा, व्हायोलीन, तवला आणि मृदंगम या वाद्यावर प्रयोग सुरू केले. १९२१ मध्ये त्यांनी रॉयल सोसायटी ऑफ लंडन समोर आपला तंतूवाद्यांवरील सिद्धांत मांडणारा प्रबंध सादर





केला. त्यांना १९२४ मध्ये रॉयल सोसायटीचे सदस्य केले गेले.

लंडनच्या प्रवासात ते सागराच्या निळाईकडे अतिशय आकृष्ट झाले. जेव्हा मोठया लाटा गरगरत वर उसळतात तरीही ते पाणी निळेच कसे राहते हे जाणून घेण्यास ते उत्सुक होते. त्यांना अंतर्बुद्धीने सुचले की हे पाण्याच्या रेणूंद्वारा होणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या विभाजनामुळे हे घडते. त्यांनी अनेक प्रयोग करून पाण्याच्या सूर्यप्रकाशाच्या रेण्विक विकीरणावर एक लांबलचक प्रबंध लिहून रॉयल सोसायटी ऑफ लंडनला पाठवला. त्याच्या बुद्धिमत्तेच्या तेजाने शास्त्रजगत अचंबित झाले.

### रामन इफेक्ट ः

जेव्हा एकरंगी प्रकाशकिरण शलाका एखाद्या पारदर्शक पदार्थातून जाते तेंव्हा ती विखुरते. त्या विभाजित प्रकाशाचा रामन यांनी अभ्यास केला. त्यांना आढळून आले की दोन अतिशय कमी तीव्रतेच्या रंगपट्ट रेषा एकरंगी पतित प्रकाशकिरणाशी समांतर आहेत. यावरून असे दिसले की जरी पतित प्रकाश किरण एक रंगी असला तरी विभाजित प्रकाश एक रंगी नव्हता. अशा प्रकारे निसर्गा तील एक महान गुपीत घटना त्यांना उघड झाली. ही घटना रामन इफेक्ट या नावाने व विभाजित प्रकाशातील रंगपट्टा रेषा रामन रेखा या नावाने प्रसिद्ध झाली. शास्त्रज्ञ, प्रकाश हा लहरी रूपात की कण स्वरूपात आहे या प्रश्नावर वाद विवाद करीत असतांना रामन इफेक्टने सिद्ध केले की प्रकाश हा कणांचा बनला आहे. त्यांना फोटॉन म्हणतात.

डॉ.रामन हे एक थोर शिक्षक आणि एक मार्गदर्शकसुद्धा होते. त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण केला. त्यांच्या एका विद्यार्थ्याचा आत्मविश्वास ढळला होता कारण त्याच्याकडे केवळ एक किलोवॅटशक्तीचे एक्सरे उपकरण होते तर इंग्लंड मधला शास्त्रज्ञ ५ किलोवॅटशक्तीचे एक्सरे उपकरण वापरत होता. डॉ.रामन यांनी त्याला त्याऐवजी त्याचा १0 किलोवॅट शक्तीचा मेंदू वापरण्यास सांगून त्याला प्रोत्साहित केले.

रामन यांचे जीवन आपल्याला अनुकरणीय एक महान उदाहरण आहे. भारत ब्रिटीश अंमलाखाली असतांना आणि प्रयोगांसाठी पुरेशी मुलभूत साधन सामग्री नसतांना देखील, त्यांनी त्यांची मनशक्ती प्रयोगशाळा म्हणून वापरली. आपल्या पूर्वजांनी कसे मनाची शक्ती वापरून कसे महान सिद्धांत मांडले असतील ते त्यांनी आपल्या उदाहरणावरून सिद्ध केले.

## १७.३ जगदिशचंद्र बोस (१८५८-१९३७)ः

जे.सी. बोस हे भारताला किर्ती व आदर मिळवून देणारे आणखी एक महान शास्त्रज्ञ होत. त्यांचा जन्म ३0 नोव्हेंबर १८५८ ला मयमनसिंग येथे आता आताच्या बांगला देशमध्ये असलेल्या ठिकाणी झाला जिथे त्यांनी त्यांचे सुरूवातीचे शिक्षण घेतले. त्यांनी उच्च शिक्षण सेंट झेवियर्स कॉलेज कलकत्ता येथे घेतले. त्यांची १८८५ मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली परंतु त्यांनी वेतन घेण्यास नकार दिला कारण ते वेतन इंग्लिश माणसाच्या वेतनापेक्षा निम्मे होते. नंतर त्यांनी भारताची कीर्ती जी प्राचीन काळी जगभर पसरली होती ती पुन्हा प्राप्त करण्यासाठी शास्त्रज्ञ होण्याचे ठरवले. विद्युत लहारींच्या गुणधर्माचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी एक उपकरण बनवले. त्यांच्या विद्युतचुंबकीय प्रारण व विद्युत किरणाचे ध्रूवीकरण या शोधनिबंधासाठी १९१७ मध्ये त्यांना नाईट पद बहाल करण्यात आले व १९२0 मध्ये रॉयल सोसायटी ऑफ लंडनचे फेलो सदस्य बनवण्यात आले. हा बहुमान मिळवणारे ते भौतिक शास्त्राचे प्रथम भारतीय शास्त्रज्ञ

होत. डॉ. बोस हे संपूर्ण जगात क्रेस्कोग्राफचे शोध लावणारे म्हणून प्रसिद्ध आहेत या उपकरणाच्या सहाय्याने वनस्पतींची मिलीमीटरच्या दशलक्षाव्या भागाएवढी वाढ अथवा हालचालही नोंदता येते. क्रेस्कोग्राफच्या सहाय्याने काढलेल्या आलेखांच्या आधारे त्यांनी वनस्पतींनाही अभिसरण संस्था आहे हे सिद्ध केले. क्रेस्कोग्राफने वनस्पतींमध्ये रसाची ऊर्ध्व दिशेला होणारी चाल ही सजीव पेशींचे कार्य आहे हेही दाखवून दिले.

डॉ.बोस यांनी इतर अनेक उपकरणे बनवली जी बोस इंस्ट्रुमेंटस् म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. धातूसुद्धा बाह्य चेतकांना प्रतिसाद देतात. बोस उपकरणांनी दाखवले की कात्री आणि यंत्रसामग्रीमध्ये वापरलेले स्टील व इतर धातूसुद्धा थकतात व विश्रांतीच्या कालखंडानंतर पुन्हा कार्यक्षमता प्राप्त करतात. क्रेस्कोग्राफ व इतर बोस उपकरणांशिवाय त्यांचे बिनतारी संशोधनेही मार्कोनीच्या शोधांच्यापूर्वी चे होते. वायरलेस कोहरर (ध्वनीलहरी संकेत शोधक उपकरण) आणि विद्युत लहरींचे विकीरण दर्श वणारे उपकरण शोध लावणारेही ते पहिले होते. जेव्हा कोणीतरी ही वस्तुस्थिती त्यांच्या लक्षात आणून दिली तेव्हा त्यांनी असा शेरा मारला की ते संशोधन संशोधकापेक्षा मानवजातीसाठी अधिक महत्वाचे आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १७.१

१. भारतातील अणूकेंद्रकीय भौतिकशास्त्राचे जनक कोणाला म्हटले जाते ?

उत्तर ______

२. श्रीनिवास रामानुजन कोणत्या क्षेत्रात अग्रेसर होते ?

उत्तर ______

३. श्रीनिवास रामानुजन यांचा कोणता लेख इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आला ?

उत्तर ______

४. द ऑर्डर्स इन्फीनिटी हे पुस्तक कोणी लिहीले ?

उत्तर ______

५. सी.वी. रमण यांना भौतिक शास्त्राचे नोवल पारितोषिक केव्हा मिळाले ?

उत्तर ______

६. सी.वी. रमण यांना लंडनच्या प्रवासावेळी सर्वात अधिक कशाने आकर्षित केले ?

उत्तर

७. सी.वी. रमण यांनी कोणता लेख लिहीला व रॉयल सोसायटी ऑफ लंडनला पाठवला ?

उत्तर

८. रामनइफेक्ट कशाला म्हणतात ?

उत्तर

९. फोटॉन्स काय आहे ?

उत्तर

१०. जगदिशचंद्र बोस यांच्या कोणत्या लेखनासाठी नाईटपद बहाल करण्यात आले ?

उत्तर

११. क्रेस्कोग्राफचा शोध कोणी लावला ?

उत्तर

१२. क्रेस्कोग्राफ कशाची नोंद करते ?

उत्तर

१३. पहिला वायरलेस कोहरर कोणी शोधला ?

उत्तर

## १७.४ होमी जहांगीर भाभा (१९०९-१९६६):

होमी जहांगीर भाभा हे महान शास्त्रज्ञ होते. त्यांनी भारताला अणूयुगात आणले. त्यांना भारतीय अणूशास्त्राचे जनक म्हटले जाते. त्यांचा जन्म ३० आक्टोबर १९०९ ला प्रसिद्ध पारशी कुटुम्बात झाला. लहान असतांनाही त्यांनी आपल्या बुद्धीमत्तची चमक दाखवली व खूप बक्षिसे मिळवली. त्यांनी सुरुवातीचे शिक्षण मुंबईत घेतले. त्यांनी मेकॅनिकल इंजिनियरींगची पदवी प्रथम श्रेणीमध्ये केंब्रीज मधून मिळवली व पुढे तिथेच संशोधन पूर्ण करून १९३५ मध्ये डॉक्टरेट मिळवली. १९३९ पर्यंत त्यांनी वैश्विक प्रारणांवर मूलभूत संशोधन केले.जेव्हा दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा ते भारतात परतले.

टिपा

डॉ.सी.वी. रमण यांच्या विनंती वरून इंडियन इंस्टिटयूट ऑफ सायन्सेस, बंगलोर मध्ये ते प्रपाठक पदी रूजू झाले. लवकरच ते भौतिक शास्त्राचे प्राध्यापक बनले. त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला व सर दोरावजी टाटा यांना भारतात एक संस्था स्थापन केली जावी जी भारतात अणूकेंद्रकीय ऊर्जेचा पाया घालील असे सुचवणारे पत्र लिहिले. ही संस्था स्वतःचे तज्ञ निर्माण करील आणि भारताला बाह्य स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागणार नाही. अशाप्रकारे टाटा इंस्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR) डॉ.भाभा यांच्या वडिलोपार्जित घरात १९४५ मध्ये सुरू झाली.

भारताचे आज भाभा ॲटोमिक रीसर्च सेंटर म्हणून ओळखले जाणारे प्रथम अणू संशोधन केंद्र ट्रॉम्बे येथे स्थापन केले गेले. भारताचा पहिली अणूभट्टी अप्सरा त्यांच्याच तज्ञ मार्गदर्शनाखाली उभारण्यात आली. १९४८ साली स्थापन झालेल्या अणू ऊर्जा आयोगाचे ते प्रथम अध्यक्ष बनले. आंतरराष्ट्रीय वर्तुळात त्यांचा अणूऊर्जा क्षेत्रातील अभ्यास फार महत्वाचा मानला जातो. संयुक्त राष्ट्रांनी पाठिंबा दिलेल्या अणू ऊर्जेचा शांततापूर्ण उपयोग या विषयावरील आंतरराष्ट्रीय परीषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले आहे. भारत सरकारने त्यांचा पद्मभूषण पुरस्काराने गौरव केला आहे. डॉ.भाभा १९६६ मध्ये एका विमान दुर्घटनेत ठार झाले.

## १७.५ डॉ.विक्रम अंबालाल साराभाई (१९१९-१९७०)ः

डॉ.विक्रम अंबालाल साराभाई हे आधुनिक भारताचे आणखी एक प्रतिभावंत व्यक्तित्व होते. भारताच्या प्रथम उपग्रह आर्यभट्टाच्या प्रक्षेपणामागील प्रमुख प्रेरणा होय. त्याचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या आईवडिलांनी चालवलेल्या शाळेत मिळाले. त्यांनी वैश्विक किरणांचा अभ्यास डॉ.सी.वी.रमण यांच्या मार्गदर्शनाखाली केला आणि केंम्ब्रिजमधून पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांच्या वैश्विक किरणांच्या अभ्यासातून वैश्विक किरण हे बाह्य अवकाशातून येणाऱ्या ऊर्जा किरणांचा झोत आहे हे स्पष्ट झाले पृथ्वीवर पोचतांना त्यांच्यावर सूर्य, पृथ्वीचे वातावरण व चुंबकत्व यांचा परीणाम होतो हे त्यांनी दाखवून दिले.

डॉ.साराभाई हे बहुआयामी व्यक्तित्व होते. ते एक थोर उद्योजक होते. आज त्यांनी स्थापन केलेल्या साराभाई केमिकल्स, साराभाई ग्लास, साराभाई गायगी लिमिटेड, साराभाई मर्क लिमिटेड आणि इतर कंपन्या आहेत. त्यांनी सैनिकी सामग्री बनवण्याची व परदेशातून आयात करण्यात येत असलेली प्रतिजैविके व पेनिसिलीन भारतात तयार करण्याची मोहिम सुरू करून भारताचे करोडो रूपये बचत करण्यास सहकार्य केले आहे. अहमदाबाद टेक्स्टाईल इंडस्ट्रियल असोसिएशन व अहमदाबाद मनी असोसिएशन या संस्थांचेसुद्धा ते संस्थापक होते. अशाप्रकारे त्यांनी बऱ्याच यशस्वी उद्योगाची स्थापना केली.

डॉ.विक्रम अंबालाल साराभाई यांनी अशा बऱ्याच संस्थाची स्थापना केली ज्या आंतरराष्ट्रीय कीर्ती च्या आहेत. त्यामध्ये इंडियन इंस्टिट्यूटस ऑफ मॅनेजमेंट (IIMS) या आहेत ज्या त्यांच्या व्यवस्थापनाच्या अभ्यासक्रमाबाबत जागतिक दर्जाच्या मानल्या जातात. ते इंडियन नॅशनल कमिशन फॉर स्पेस रिसर्च (INCOSPAR) (भारतीय राष्ट्रीय अंतराळ संशोधन आयोग) आणि ॲटोमिक एनर्जी कमिशन (अणुऊर्जा आयोग) चेअरमन होते. त्यांनी थुंबा विषुववृत्तीय अग्निबाण प्रक्षेपण स्थानकाच्या (ERLS) उभारणीत मार्गदर्शन केले. त्यांनी उपग्रह दळणवळणाच्या माध्यमातून शिक्षण ग्रामिण भागात नेण्याच्या योजना देखील आखल्या. त्यांना १९६६ मध्ये पद्मभूषण व मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांच्या मृत्यूने देशाची अपरिमित हानी झाली.

## १७.६ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ः

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, भारताचे ११ वे राष्ट्रपती, १५ ऑक्टोबर १९३१ ला तामीळनाडूच्या वेट रामेश्वरम या गावात जन्माला आले. त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सम्मान भारतरत्न १९९७ मध्ये शास्त्र आणि अभियांत्रिकी या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल देण्यात आला. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे प्राथमिक शिक्षण रामेश्वरम येथे झाले. त्यांनी त्यांची दहावीची परीक्षा रामनाथपुरमच्या श्वार्टझ हायस्कूल मधून व एरॅनॉटिकल इंजिनियरींग मध्ये पदवी मद्रास इंस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी येथून प्राप्त केली.

डॉ कलाम यांनी इंडियन स्पेस रीसर्च ऑर्गनायझेशन (ISRO भारतीय अवकाश संशोधन संघटना) मध्ये १९६३ ते १९८२ या काळात काम केले. विक्रम साराभाई स्पेस सेन्टर मध्ये त्यांनी उपग्रह प्रक्षेपण वाहन एस एल व्ही ३ विकसित केले ज्याने रोहिणी हा उपग्रह अंतराळ कक्षेत स्थापित केला. १९८२ मध्ये संचालक, संरक्षण संशोधन विकास संघटना (Defence Research Development Organisation - DRDO) , या नात्याने एकात्मिक मार्गदर्शित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाची ( Integrated Guided Missile Development Programme IGMDP) जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनी संरक्षण विभागासाठी पृथ्वी, त्रिशूल, आकाश, नाग आणि अग्नी हे पाच प्रकल्प विकसित केले. त्यांनी क्षेपणास्त्र क्षेत्रात भारताला स्वावलंबनाच्या युगात नेले. जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे अग्नि हे क्षेपणास्त्र एक अद्वितीय उपलब्धी आहे. त्याच्या यशस्वी प्रक्षेपणाने भारताला उच्च विकसित देशांच्या मंडळाचा सदस्य बनवले. अग्नि क्षेपणास्त्रासाठी तयार करण्यात आलेल्या कार्बन संयुग द्रव्याचा वापर पोलिओग्रस्तांच्यासाठी बनवण्यात येणाऱ्या कॅलिपर्ससाठी वापरण्यात येत आहे. या द्रव्यामुळे कॅलिपर्सचे वजन ४ कि.ग्रॅ.वरून ४00 ग्रॅम एवढे कमी झाले आहे. हे मानवजातीसाठी एक महान वरदान ठरले आहे. हे द्रव्य हृदयरोग्यांच्या उपचारात वापरण्यात येणाऱ्या वलून अँजिओप्लास्टीमध्ये स्प्रिंगच्या आकाराच्या गुंडाळया बनवण्यासाठी वापरतात ज्यांना व्हेंट म्हणतात.

डॉ.कलाम यांचे जीवन भारताच्या वास्तव्य तत्वाचे प्रतिक आहे. ते भारतीय परंपरा व धर्माचे सच्चे पाईक आहेत. त्यांनी शास्त्राची धर्म व तत्वज्ञनाशी सांगड घातली आहे. अंतरात्म्याच्या मार्गदर्शनावर त्यांची गाढ श्रद्धा आहे अर्थात "आंतरिक संकेतांवर जास्त व बाह्य वर कमी विसंबून असणे." त्याचप्रमाणे निस्वार्थपणे आपली कर्तव्ये पार पाडणे. डॉ.कलाम म्हणतात, "व्यावहारीक अर्थाने माझे काहीच नाही. मी काहीच हस्तगत केले नाही, काहीही बांधकाम केले नाही, काहीही धारण केले नाही, कुटुंब, मुले, मुली नाहीत."

### पाठ्यांशांवरील प्रश्न १७.२

१. डॉ.होमी जहांगीर भाभा यांचे संशोधन कार्य कोणते ?

उत्तर

२. होमी जहांगीर भाभा यांच्या वडिलोपार्जित घरात कोणती संस्था सुरू करण्यात आली?

उत्तर ______

३. भारताच्या पहिल्या अणुभट्टीचे नाव काय ?

उत्तर ______

४. वैश्विक किरण म्हणजे काय ?

उत्तर ______

५. डॉ.विक्रम अंबालाल साराभाई भारताच्या करोडो रूपयांची बचत कशी करू शकले ?

उत्तर ______

६. TERLS काय आहे ?

उत्तर ______

७. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी संरक्षण विभागासाठी विकसित केलेल्या प्रकल्पांची नावे द्या.

उत्तर ______

८. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी पोलिओग्रस्तांना कसे सहाय्य केल ?

उत्तर ______

## तुम्ही काय शिकलात?

- श्रीनिवास रामानुजन भारतातील थोर गणितज्ञ होते. ज्यांच्या नावावर याक्षेत्रातील बऱ्याच असामान्य उपलब्धींचे श्रेय आहे.
- डॉ. सी.व्ही.रामण हे एक असामान्य भारतीय शास्त्रज्ञ होते. ज्यांनी १९३० मध्ये भौतिकशास्त्रासाठी नोबेल पारितोषिक मिळवले. प्रकाश फोटॉन्स ओळखल्या जाणाऱ्या या कणांचा बनलेला असतो हा शोध रामन परिणाम या नावाने ओळखला जातो.
- डॉ. जे.सी.बोस यांना, बोस इंस्ट्रुमेंटस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उपकरणांचा शोध, क्रेस्कोग्राफ च्या शोधाचे श्रेय जाते जे वनस्पतीच्या वाढ व हालचालींची नोंद घेऊ शकते.

- डॉ.होमी जहांगीर भाभा हे आणखी एक महान भारतीय शास्त्रज्ञ होते. ज्यांनी भारताला अणू युगात नेले.
- डॉ.विक्रम अंबालाल साराभाई हे आधुनिक भारताचे आणखी एक प्रतिभावंत व्यक्तिमत्व होते जे भारताच्या प्रथम उपग्रह आर्यभट्टच्या प्रक्षेपणामागील प्रमुख आधारस्तंभ होते. ते एक थोर उद्योजकसुद्धा होते. ज्यांनी अनेक उद्योगांची स्थापना केली. ते इंडियन नॅशनल कमिशन फॉर स्पेस रिसर्च (INCOSPAR) (भारतीय राष्ट्रीय अंतराळ संशोधन आयोग) आणि ॲटोमिक एनर्जी कमिशन (अणूऊर्जा आयोग) चे अध्यक्ष होते.
- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम भारताचे ११ वे राष्ट्रपती, यांनी उपग्रह प्रक्षेपण वाहन एस एल व्ही ३ विकसित केले ज्याने रोहिणी हा उपग्रह अंतराळ कक्षेत सोडला.संचालक, संरक्षण संशोधन विकास संघटना, या नात्याने त्यांनी संरक्षण विभागासाठी पृथ्वी, त्रिशूल, आकाश, नाग आणि अग्नी हे पाच प्रकल्प विकसित केले.भारतीय तरूणांना ते आजतागायत प्रेरणा देत आहेत.

## सत्रान्त अभ्यास

१. जगदिशचंद्र बोस यांच्या शास्त्र व तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाचे वर्णन करा.

२. डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या भारताला आण्विक महासत्ता बनवण्यासाठी केलेल्या प्रयासाचे तपशीलवार वर्णन करा.

३ आपल्या पूर्वजांनी मानवी शक्ती वापरून महान सिद्धांत मांडले हे डॉ.सी.व्ही. रमण कसे सिद्ध करू शकले ?

४. डॉ. कलाम यांचे जीवन भारताच्या वास्तव तत्वाचे प्रतिक आहे. चर्चा करा.

## प्रश्नांची उत्तरे

**१७.१**

१. डॉ. होमी जहांगीर भाभा

२. गणित

३. बर्नौली संख्यांवर विद्वत्तापूर्ण शोध प्रबंध.

४. जी.एच. हार्डी

५. १९३0 मध्ये

६. सागराची निळाई

७. प्रकाशाचे रेण्विक विकीरणावर.

८. विभाजित प्रकाशात दोन अतिशय कमी तीव्रतेच्या रंगपट्ट रेषा एकरंगी पतन प्रकाशकिरणाशी



टिपा

समांतर होत्या. यावरून असे दिसले की जरी पतित प्रकाश किरण एक रंगी असला तरी विभाजित प्रकाश एक रंगी नव्हता.

९. प्रकाश ज्या कणांचा बनलेला असतो ते.

१०. त्यांच्या विद्युतचुंबकीय प्रारण व विद्युत् किरणाचे ध्रूविकरण या शोधनिबंधासाठी.

११. जगदिश चंद्र बोस.

१२. वनस्पतींची मिलीमीटरच्या दशलक्षांशाव्या भागाएवढी वाढ आणि हालचाल.

१३. जगदिश चंद्र बोस.

**१७.२**

१. वैश्विक प्रारण

२. टाटा इंस्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR)

३. अप्सरा

४. वैश्विक किरण हे वाह्य अवकाशातून येणाऱ्या ऊर्जा किरणांचा स्त्रोत आहेत.

५. त्यांनी सैनिकी सामग्री बनवण्याची व परदेशातून आयात करण्यात येत असलेली प्रतिजैविके व पेनिसिलीन भारतात तयार करण्याचे काम सुरू केले.

६. थुंबा विषुववृत्तीय अग्निवाण प्रक्षेपण स्थानक (Thumba Equatorial Rcket Launching Stationa)

७. संरक्षण विभागासाठी पृथ्वी, त्रिशूल, आकाश, नाग आणि अग्नी हे पाच प्रकल्प विकसित केले.

८. कॅलिपर्सचे वजन ४ कि.ग्रॅ.वरून ४०० ग्रॅम एवढे कमी करून.

# विभाग ७

| गुण | तासिका |
| --- | --- |
| 10 | 20 |

# भारतातील शिक्षण

शिक्षण हे सांस्कृतिक संक्रमणाचे साधन आहे. सर्व संग्रहीत ज्ञान रचनात्मक पद्धतीने सामाजिक पद्धतीने सामाजिक गटात संक्रमीत करण्याचे शिक्षण हे फार चांगले साधन आहे. फार प्राचीन काळापासून भारताने त्याची स्वतःची वैशिष्टयपूर्ण शिक्षण पद्धती विकसित केली. ज्या मध्ये नेहमीच इतर संस्कृतींचे प्रभाव अंतर्भूत केला गेला. भारताच्या इतिहासाच्या विविध अवस्थांतील शैक्षणिक व्यवस्थेच्या उत्क्रांतीचा मागोवा या अभ्यासघटकात घेण्यात आलेला आहे.

शिक्षण हा विषय आणि ह्या विषयातील अंतर्भुत बाबी ह्या संबंधी प्रगती अधिक ठळकपणे दाखविणे हे ह्या अभ्यास घटकाचे उद्दिष्ट आहे. भारतातील आधुनिक व आधुनिक पूर्व शिक्षणाच्या मर्यादा आणि बलस्थाने यांचे मूल्यमापन करण्याच्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा ही एक हेतू या अभ्यास घटकाचा आहे.

**पाठ १८ ः भारतातील शिक्षण**

# १८

# भारतातील शिक्षण

आतापर्यंत तुम्ही संस्कृतीच्या विविध पैलूंबद्दल वाचत आहात. जसे कला, वास्तुकला, धर्म व शास्त्र, संस्कृतीचा आणखी एक पैलू आहे शिक्षण. परंतु शिक्षण म्हणजे काय ? तुम्ही कदाचित म्हणाल शाळेत किंवा पुस्तकातून काहीतरी शिकणे हे केवळ अंशतः सत्य आहे. शिक्षण हा अध्ययनानुभव आहे. आपण आयुष्यात सतत शिकत असतो. हे मिळणारे शिक्षण प्रसंगानुरूप अनौपचरिक पद्धतीने मिळते. शालेय औपचारिक शिक्षणाची मात्र जाणिवपूर्वक पद्धतशीर आखणी केलेली असते. याचा उद्देश शिकणाऱ्यामध्ये सकारात्मक बदल घडावा हा असतो. तुम्ही जसजसे या पाठयक्रमातील विविध पाठातून जात असताना एका शैक्षणिक अनुभवातून जात आहात. परंतु शिक्षण हे संस्कृतीशी कसे संबंधीत आहे यावर तुम्ही कधी विचार केला आहे का ? संस्कृती हे पूर्वीच्या पिढयांच्या संचित अनुभवांचे व लक्ष्यप्राप्तींचे पुढीलपिढयांनी समाजाचे सदस्य या नात्याने वारसापोटी प्राप्त केलेले फलीत आहे.

हे अनुभवाचे व लक्ष्यप्राप्तीचे संचित पुढे संक्रमित करण्याची सुरचित प्रक्रिया म्हणजेच शिक्षण असे म्हणता येईल. म्हणून शिक्षण केवळ सांस्कृतिक समजूती व कल्पना संक्रमित करण्याच साधन नव्हे तर ते सांस्कृतिक समजूतींनीं आकार दिलेले सुद्धा आहे. कारण ते संस्कृतीचेच उत्पादन आहे. अशाप्रकारे शिक्षणप्रणालीत संस्कृतीतील घडामोडीनुसार बदल होत असतात. या पाठात आपण अति प्राचीन काळापासून भारतात प्रचलित असलेल्या शिक्षणप्रणालीमध्ये झालेल्या उत्क्रांतीचा शोध घेणार आहोत समाजातील घटकांचे शिक्षण हे समाजाचे प्राथमिक कर्तव्य आहे.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- भारतीय इतिहासाच्या विविध कालखंडात प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक दिल्या गेलेल्या शिक्षणाच्या स्वरूपाचे वर्णन.
- जैन व बौद्ध शिक्षण प्रणालींच्या योगदानाचे मूल्यमापन स्त्रियांना शिक्षणाची उपलब्धता व त्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप या संदर्भात समाजात स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा

/स्थान याचे मापन.

- मध्ययुगीन भारतात सुलतानशाहीच्या स्थापनेसोबत शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांचा मागोवा घेणे.
- शिक्षण अधिक तर्कशुद्ध बनवण्यामागे मोगल सत्ताधिशांची भूमिका अभ्यासणे.
- वसाहत काळात आधुनिक शिक्षणाच्या प्रकाराच्या प्रभावाचे परीक्षण.
- स्वतंत्र भारतातील प्राथमिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, उच्च शिक्षण आणि प्रौढ शिक्षण यामध्ये झालेल्या बदलांचा व प्रगतीचा आढावा घेणे.

## १८.१ प्राचीन काळातील शिक्षण ः

### १८.१.१ वैदिक काळ ः

प्राचीन काळात शिक्षकांना 'गुरू' असे संबोधले जाई व विद्यार्थी हे त्यांच्याकडे आलेले व त्यांच्या घरी घरच्या सदस्याप्रमाणे राहणारे असत. अशा ठिकाणाला गुरूकुल म्हणत. गुरूकुल हे घरगुती शाळेची भूमिका पार पाडत असे. ज्याला आश्रम म्हणत जिथे अध्ययन हे गुरूने विकसित केलेले असे जे विद्यार्थ्यांना व्यक्तिगत सूचना देत व वैयक्तिक काळजी घेत. शिक्षण हे प्राधान्याने उच्चजातींसाठीच होते. अध्ययन हे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील जिव्हाळयाचे नाते होते. याला गुरूशिष्य परंपरा म्हणत. सामान्यपणे शिक्षण प्रक्रीयेची सुरूवात एका धार्मिक समारंभाने होई ज्याला उपनयन (व्रतबंध) म्हणत. बहुधा शिक्षण मौखिक असे. त्यामध्ये वेद व धर्मशास्त्र अशा ग्रंथाचे अंशतः वा संपूर्ण पाठांतराचा समावेश असे. नंतर व्याकरण, तर्कशास्त्र व तत्वज्ञान शिकवले व शिकले जाई. मैत्रयणी उपनिषद असे शिकवते की ज्ञान हे विद्या, चिंतन व तपाचे फलीत आहे. आत्म विश्लेषणातून प्रत्येकाला सत्य, चित्तशुद्धी व आत्मिक समाधान हे पायरीपायरीने प्राप्त करून घ्यायचे आहे. या काळात स्वयंशिक्षण हे सर्वोच्च ज्ञान प्राप्तीची योग्य पद्धत गणली जाई.याचे उत्तम उदाहरण तैत्तरेय उपनिषदात आढळते. ज्यात वरूणाचा मुलगा भृगू वडीलांकडे जाऊन त्यांना ब्राह्मण काय आहे ते शिकवण्याची विनंती करतो. वडील त्याला चिंतनातून ते शोधण्यास सांगतात.

### १८.१.२ मौर्य काळ ः

मौर्य काळात व मौर्योत्तर काळांच्या कालखंडात भारतीय समाजात लक्षणीय्र बदल झाले. शहरी केंद्रे व व्यापार यांच्या विकासाने व्यापारी समुदायांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. परिणामतः व्यापारी संघ शिक्षण प्रदान करण्यामधे कृतीशील भूमिका करू लागले. तांत्रिक शिक्षणाची ती केंद्र बनली व खाणकाम, धातूशास्त्र, सुतारकाम, वीणकाम व रंगारी कामासंबंधी ज्ञानाची वाढ होत गेली. बांधकाम व वास्तु कला यामध्ये नवीन रचना सूत्रांची निर्मिती झाली. शहरी जीवनाच्या उदयाबरोबर नवीन वास्तू रचनांची निर्मिती झाली.

या संघांनी त्यांना महासागरातील प्रवास सहाय्यभूत व्हावे म्हणून खगोलशास्त्र, ताऱ्यांच्या स्थानांचा अभ्यास अशा शाखांनाही आश्रय दिला. खगोलविद व विश्वविद यांनी काल या विषयावर परिसंवाद चर्चा घडवली. यामुळे भूतकाळाच्या तुलनेत काळाचे भान अधिक सुस्पष्ट होण्यास मदत झाली. वैद्यकिय ज्ञानाची पद्धतशीर मांडणी आयुर्वेदाच्या रूपात झाली. या मूलतत्वांनी भारतीय वैद्यकिय प्रणालीचा पाया घातला.

टिपा



वनस्पतीच्या औषधी गुणधर्माचे व त्यांच्या उपयोगाचे ज्ञान प्रगत अवस्थेत पोचले. औषधांसाठी 'चरक' व शल्यक्रीयेसाठी 'सुश्रुत' हे प्रसिद्धी पावले. चरकाने लिहीलेली 'चरक संहिता' औषधांवर विश्‍वसनीय व परिपूर्ण ग्रंथ ठरला.

तुम्ही चाणक्याबद्दल ऐकलेच असेल जो प्रख्यात तत्ववेत्ता, विद्वान व शिक्षक होता. त्याचा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथ आहे 'अर्थशास्त्र'. अर्थशास्त्रात आलेले विघेचे पाठयक्रम प्राथमिकतेने राजपुत्रांच्या शिक्षणाचा संदर्भात आहेत. उपनयनानंतर राजपुत्र चार वेद शिकत आणि वैदिक अध्ययनात शास्त्रांचा समावेश असे. ते तर्कशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांचे देखील अध्ययन करीत. त्या काळातील शिक्षण प्राथमिक जीवनकौशल्यावर आधरित असे जे आजच्या शिक्षणापेक्षा कितीतरी वेगळे आहे. रामायणामधील राजपुत्रांसाठी अभ्यासक्रम धनुर्वेद, नितीशास्त्र, गजशिक्षा व रथशिक्षा लेखन, चित्रकला, उंच, लांब उडी मारणे व पोहणे असा होता.

### १८.१.३ गुप्त काळ ः

गुप्त काळात जैन व बौद्ध शिक्षणप्रणालींनी वेगळे आयाम धारण केले. बुद्धमठामध्ये विद्यार्थ्यांना दहा वर्षासाठी प्रवेश दिला जाई. अध्ययन मौखिक पद्धतीने सुरू होई. नंतर ते वाङ्मयीन ग्रंथांच्या अध्ययनाकडे वळे. मठांमध्ये ग्रंथालये असत. महत्वाची हस्तलिखिते नक्कल/ प्रतिलिपी करून जतन केले जाई. चीन, मध्यपूर्व आशिया अशा इतर देशांमधून विद्यार्थी बौद्ध मठात शिक्षणासाठी घेत. श्रीमंत व्यापारीवर्ग व राजे यांच्याकडून मिळालेल्या देणग्या मधून मठांचे व्यवस्थापन केले जाई . निकट व दूरच्या विद्वानांना मठ आकृष्ठ करीत. फाहैनने कित्येक वर्ष पाटलीपुत्र येथील मठात बौद्ध धार्मिक ग्रंथांच्या अध्ययनात घालवली. पाटलीपुत्राशिवाय वाराणसी, मथुरा, उज्जैन व नाशिक अशी इतर अध्ययन केंद्रेही होती. नालंदा विद्यापीठ (विश्‍व विद्यालय) त्याच्या उच्च दर्जा च्या विद्वत्तेबद्दल आशिया खंडात प्रसिद्ध होते. तेथे शिकवल्या जाणाऱ्या विषयात वेदांत, तत्वज्ञान, पुराणांचा अभ्यास, खंडकाव्ये, व्याकरण, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, औषधशास्त्र इ. चा समावेश असे. राजभाषा संस्कृत हे प्रतिपादनाचे माध्यम असे. सुरूवातीच्या काळात जैन संस्कृत साहित्य 'आदिपुराण' तथा ' यशतिलक' यांचा शिक्षणासाठी वापर करीत. परंतु शिक्षण अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने माध्यम प्राकृत तथा अन्य प्रादेशिक भाषा जसे तमीळ, कन्नड इत्यादी असे बदलले गेले. जैन व बौद्ध ग्रंथालयातील पुस्तके ताडपत्रांवर लिहून व एकत्र बांधून ठेवत व त्याला ग्रंथ म्हणून ओळखले जाई. हळूहळू जैन व बौद्ध पंथाचा राजाश्रय गेला व त्यांच्या मठात अध्ययन व शैक्षणिक केंद्रे म्हणून ओळख हळूहळू कमी होत गेली. ब्राम्हणांनी आश्रय दिलेले मठ हे जैन व बौद्ध मठांना समांतर होते हे मठ आश्रमाप्रमाणेच शैक्षणिक कार्य करीत.

### १८.१.४ गुप्तकाळानंतरचा काळ ः

हर्षाच्या राजवटीत कला व शिक्षण यांनी मोठी झेप घेतली. त्याने सर्वस्तरावरील शिक्षणाला उत्तेजन दिले. शिक्षण मंदिरे व मठात दिले जाई व उच्च शिक्षण तक्षशिला, उज्जैन, गया व नालंदा विद्यापीठात दिले जाई. नालंदामध्ये ह्यूएनसंगने बौद्ध शिल्पांच्या अध्ययनात कित्येक वर्षे घालवली. प्रसिद्ध विद्वान शीलभद्र तेथील प्रमुख होते.

सातव्या व आठव्या शतकांत 'घटिका' अथवा मंदिराशी संलग्न महाविद्यालये अध्ययनाची नवी केंद्रे म्हणून उदयास आली. घटिकामध्ये ब्राम्हणी शिक्षण दिले जाई. शिक्षणाचे माध्यम संस्कृत होते. ही

मंदिरे महाविद्यालये फक्त उच्चवर्णीयांसाठी अथवा द्विजांसाठी खुली होती. शिक्षणाचे माध्यम संस्कृतच्या वापराने सामान्य जनास शिक्षणापासून दूर नेले. शिक्षण हा केवळ उच्च वर्णीयांचा हक्क बनला.

## १८.२ शिक्षणाचे ध्येय ः

प्राचीन काळात शिक्षण हे वैयक्तिक स्वरूपाची बाब होती. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास हे शिक्षणाचे ध्येय होते. शिक्षण ही एखाद्याच्या आंतरिक विकास व स्वयंपरीपूर्णतेची प्रक्रिया असा दृष्टिकोन ठेऊन तंत्रे, नियम व पद्धती निर्मिल्या गेल्या. असे समजले जाई की व्यक्तीचा विकास हा प्रथमतः त्याच्या /तिच्या मनाचे ज्ञान ग्रहणाचे साधन या दृष्टीने केलेले प्रशिक्षण. हे ज्ञान तिची/त्याची निर्मिती क्षमता वाढवील. 'मननशक्ती' ही विचारवस्तू (मनन विषय) पेक्षा उच्च मानल गेला. अशाप्रकारे शिक्षणाचा प्राथमिक विषय 'मन' हाच होता.

## १८.३ विषय ः

उपयोजित शास्त्रे जसे धातू शास्त्र, भाजलेल्या विटा, झळाळी (चमक), क्षेत्रफळ व व्याप यांचे मापन यांचे ज्ञान प्राचीन भारतीयांना होते. वेदोत्तर काळात औषधाची शास्त्रीय पद्धत विकसीत केली गेली. तक्षशिला, वाराणसी या अध्ययन केंद्रात 'औषधशास्त्र' हा विषय शिकवला गेला. औषधांवरील 'चरक संहिता' व शल्य क्रियेवरील 'सुश्रुत संहिता' हे त्या त्या क्षेत्रातील महत्वाचे ग्रंथ बनले. सूश्रूत शल्यक्रियेला 'रोग निवारण कलेची सर्वोच्च शाखा व अपयशाची कमीत कमी शक्यता असणारी शाखा' असे मानी गणितामध्ये अंकगणित, भूमिती, बीजगणित, खगोलशास्त्र व फलज्योतिष यांचा समावेश होता. अंकगणिताची आवड रस व त्याच्या उद्योग व वाणिज्य यामधील उपयोगितेमुळे होत. 'आर्यभट्टाने' लिहीलेले 'आर्यभट्टीय' हे गणित क्षेत्रातील महत्वाचे योगदान होते. खगोलशास्त्र हे ब्राह्मणी अंधश्रद्धांनी झाकोळलेले होते. खगोलशास्त्रातील ग्रंथ 'सूर्य सिद्धांत' हे निरीक्षणाची उपकरणे व पद्धती यांच्या विषयीच्या माहितीने भरलेले होते. ती माहिती अचूक ही नव्हती व प्रभावी पण नव्हती. कांसे व तांबे हे रसायन शास्त्र व धातूशास्त्रातील प्रगतीचे सिंधू संस्कृती पासून निदर्शक होते. कातडे कमावणे, रंगवणे व किण्वन करणे हे याच काळात शोधले गेले.

## १८.४ भाषा ः

संस्कृतला मानाचा दर्जा प्राचीन काळापासून होता ती ब्राह्मणी शिक्षणाचे माध्यम होती. सुशिक्षित उच्च जाती व हिंदू राज्यकर्ते व दरबारी यांची ती मुख्य व्यवहार भाषा होती. बौद्धधर्माच्या उगमासोबत 'प्राकृत' भाषेचा विकास झाला. ती सामान्यजनांची भाषा बनली. मौर्य राजा अशोकाने तिचा वापर त्याच्या जाहीरनाम्यांसाठी केला. संस्कृत नाटकांमध्ये स्त्रिया व निम्न पात्रांना प्राकृत संवाद बोलावे लागत ही नोंद घेणे मनोरंजक आहे. पाली ही प्राकृतच्या सुरूवातीच्या प्रारूपापैकी एक होती. बौद्धांचे बहुतेक धार्मिक लेख प्राकृत व पाली भाषेत आहेत. त्या काळी संस्कृत साहित्य प्रचारात होते. दुसरी भाषा 'अपभ्रंश' गुजराती आणि राजस्थानी लेखकांद्वारे काव्यरचनेसाठी वापरली जाई. द्रवीड भाषा, तमीळ, तेलगु, कानडी व मल्याळी या दक्षिण भारतात वापरत होत्या. या काळातील साहित्यात सुद्धा त्यांचे अस्तित्व दिसते.

नालंदा हे विद्यापीठ हे प्राचीन भारताच्या प्रगतीचे सर्वोत्तम उदाहरण होय. चिनी प्रवासी ह्यूएन त्संग हा नालंदा विद्यापीठाची प्रगत अभ्यास व संशोधनाचे पदव्यूत्तर विद्यापीठ असा उल्लेख करतो. नालंदा हे त्याच्या 'विवाद पीठा'साठी सुद्धा प्रसिद्ध असल्याचे अन्य ठिकाणी निवास असणाऱ्या विद्यार्थ्यांनी उल्लेख केले आहेत. राजा बलपुत्रदेव याने 'जावा' या देशातून येथून नालंदा येथे अभ्यासासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक मंदीर बांधले.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १८.१

१. शिक्षण हे संस्कृतीशी कसे निगडित आहे ?

उत्तर ______

२. उपनयन संस्कार काय आहे ?

उत्तर ______

३. प्राचीन काळी शिक्षण कोठे दिले जात असे ?

उत्तर ______

४. प्राचीन काळी भारतीय वैद्यकीय प्रणालीचा आधार /पाया कोणता होता ?

उत्तर ______

५. प्राचीन भारतात शिक्षणासाठी जैन वापर करत असलेल्या दोन ग्रंथांची नावे लिहा.

उत्तर ______

६. प्राचीन काळी सामान्यजनांनी त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याची कोणती कारणे होती ?

उत्तर ______

## १८.५ मध्ययुगीन काळातील शिक्षण ः

दिल्लीत सुलतान शाहीचे स्थापनेनंतर इस्लामिक शिक्षण प्रणालीची सुरूवात झाली.

मध्ययुगीन काळातील शिक्षण बगदादच्या अब्बासिडस निर्देशाखालील शिक्षण परंपरेच्या अनुसार बनवले आखले गेले. परीणामी समरकंद, बुखारा आणि इराण सारख्या देशातील विद्वान भारतीय विद्वानांकडे मार्गदर्शनासाठी येत. एक विशेष व्यक्तिमत्व असलेल्या अमीर खुस्रोने केवळ गद्य व पद्य लेखनाची कौशल्येच विकसित केली नाही तर स्थानिक परिस्थितीला अनुरूप अशी एक नवीन भाषा

ही विकसित केली. समकालिन काही मिन्हाज उस सिराज, झियाउद्दिन बराणी आणि अफीफसारख्या इतिहासकारांनी भारतीय विद्ववत्तेबद्दल लिहून ठेवले आहे. शालेय शिक्षण देणाऱ्या संस्थांना मखताब म्हणत तर उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना मदरसा म्हणत. मखताब सार्वजनिक निधीतून चालवले जात तर मदरसे राजे  आणि सरदार यांच्याकडून चालवले जात. यासाठी सहा वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था असत.

१. सरदार व राजे यांनी स्थापन केलेले व चालवलेले

२. विद्वानांनी वैयक्तिकरीत्या सरकारी सहाय्य किंवा देणग्यातून सुरू केलेले

३. मशिदीशी संलग्न असलेले

४. मजारीशी संलग्न असलेले

५. विद्वानांनी वैयक्तिकरीत्या सुरू करून चालवलेले आणि

६. सुफी धर्मशाळाशी संलग्न.

दिल्लीतील मुइझी व फिरूजी मदरसे, बिदर येथील माहम्मद गवानीचा मदरसा, फत्तेपूर सिक्रीचा अवुल फजलचा मदरसा हे प्रसिद्ध मदरसे होते. सिरत ए फिगुज शाहीने मदरशांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या १४ विषयांची यादी दिली आहे. यात न्यायव्यवस्था व कुराणपठण, वाचन व पाठांतराचे शास्त्र असलेला दिरत या विषयांचा समावेश आहे.

मुस्लिम शिक्षण प्रणालीचे मुख्य वैशिष्टय म्हणजे ती वळणाने पारंपारीक व पाठयवस्तूत अध्यात्मिक होती. अभ्यासक्रम ढोबळमानाने दोन वर्गात पारंपारिक शास्त्रे  व तर्कनिष्ठ शास्त्रे यात विभागलेला होता. परंपरा, कायदा व इतिहास आणि वाङ्मय हे परंपरागत शास्त्रांपेक्षा तर्कनिष्ठ शास्त्रांवर भर दिला गेला. पारंपारिक शास्त्रांचा शिक्षणामध्ये इल्तुमिश (१२११–३६) च्या काळापासून तो सिकंदर लोधी (१४८९–१५१७) च्या शासनकाळापर्यतं वरचष्मा होता. सिकंदर लोधीने जेव्हा शेख अजिजुल्ला या बंधूना मुल्तानहून दिल्लीला बोलावले त्या काळापासून हे दृश्य पालटू लागले. त्यांनी तत्वज्ञान तर्कशास्त्र यांचा समावेश अभ्यासक्रमात केला.

**महान मोगलांच्या अंमलाखालील शिक्षण प्रणाली ः**

मोगल काळाने विद्याभ्यास व शिक्षणक्षेत्रात अतिशय योगदान दिले. मोगल  सम्राटांना अध्ययनाबद्दल अत्यंत प्रेम होते व त्यांनी आणि त्यांनी पाठशाळा विद्यापीठे मकतव आणि मदरशांच्य माध्यमातून शिक्षण प्रसार करण्यास मोलाचे योगदान दिले. अकबराने शिक्षणसंस्थांना देणग्या दिल्या. त्याने जामा मशिदीजवळ एक महाविद्यालय सुरू केले. त्याकाळी शिक्षण ही राज्याची /शासनाची जबाबदारी नव्हती. बहुधा मंदिरे आणि मशिदी ही प्राथमिक शिक्षणाची केंद्रे असत. ती शासक/ राज्यकर्ते धनिक व देणगीदार यांच्या देणग्यांवर अवलंबून असत. संस्कृत व पर्शियन अनुक्रमे मंदिर व मशिदी मध्ये शिकवले जात. स्त्रीशिक्षणाची तरतूद नव्हती. राजघराण्यातील व श्रीमंतांघरच्या स्त्रीयांना घरीच शिक्षण मिळे.

मोगल शासक/ राज्यकर्ते विद्याभ्यास व वाङ्मय यांचे थोर आश्रयदाते होते. ऊर्दूचा भाषा म्हणून उदय याच काळात झाला. जो पर्शियन व हिंदी म्हणजेच तुर्क आणि भारतीयांच्या दीर्घ संपर्कामुळेच घडून आला. बाबरने ताझुक–ई–बाबरी नावाचे आत्मचरित्र लिहीले.मोगल सम्राट हुमायूंने गणित,



टिपा



खगोलशास्त्र व भूगोल या विषयांचा अभ्यासामध्ये अंतर्भाव दिल्लीच्या मदरशांमधून केला. त्यामुळे प्रचलित शिक्षण प्रणाली आधुनिक होण्यास हातभार लागला. बऱ्याच हिंदूंनी पर्शियनचा अभ्यास केला. संस्कृतमधून पर्शियन मध्ये बरीच भाषांतरे झाली. अकबराने लेखाशास्त्र, सामान्य प्रशासन, भूमिती अशा विषयांची भर घातली आणि त्याच्या राजवाड्याशेजारी एक कार्यशाळा बांधली. तो स्वतः कार्यशाळेवर लक्ष ठेवून असे. कर्मठ लोकांना अकबराचे निधर्मी व शास्त्रीय शिक्षण व्यवस्था राबविण्याचे प्रयत्न रूचले नाही. अकबराच्या प्रयासांनी एक बदल घडून आला जो कित्येक शतके टिकला. अठराव्या शतकात काही सरदार चौकशी, निरिक्षण, संशोधन व प्रयोग यांचा अंतर्भाव असलेल्या पाश्चात्य पद्धतीचा अवलंब करण्याच्या विरोधात होते मुस्लिम मदरशांमध्ये पाठांतर, चर्चा व धडे लिहून काढणे हा शिक्षणाचा पाया होता. अकबराने अबुल फजल, फैजी, राजा तोडरमल, बिरबल आणि रहिम अशा अनेक विद्वानांना आश्रय दिला. ते त्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी होते, ज्यांनी संस्कृती व शिक्षण प्रसरास हातभार लावला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १८.२

१. मध्ययुगीन काळात शालेय शिक्षण कोणत्या संस्था देत असत ?

उत्तर ______________________________

२. मध्ययुगीन काळात मदरशांची व्यवस्था कोण बघत असे ?

उत्तर ______________________________

३. मध्ययुगीन काळातील काही प्रसिद्ध मदरशांची नावे द्या.

उत्तर ______________________________

४. मुस्लिम शिक्षण प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते होते ?

उत्तर ______________________________

५. मध्ययुगीन काळात पाश्चात्य देशांनी अंगीकारलेल्या पद्धती कोणत्या ?

उत्तर ______________________________

६. अकबराने शिक्षणात केलेले बदल कोणते ?

उत्तर ______________________________





## १८.६ आधुनिक काळातील शिक्षण ः

### १८.६.१ अठरावे शतक ः आधुनिक काळाची सुरूवात ः

भारतातील समाज जीवनाच्या इतर पैलूंप्रमाणेच शिक्षण क्षेत्रात देखील पूर्वीच्या शतकातील पारंपारिक शिक्षण पद्धती चालू होती. उच्चशिक्षणाची तक्षशीला, नालंदा, भागलपूर जवळील विक्रमशीला, उत्तर बंगाल मधील जगद्दाल येथील, काठियावाड येथील वल्लभी दक्षिणेतील काची प्रसिद्ध प्राचिन केंद्रे फार पूर्वी नष्ट झाली होती. उलटपक्षी इस्लामिक शिक्षणाची राजाश्रय व सरदरांच्या आश्रयाने त्याचवेळी भरभराट होत गेली. तरीही बहुसंख्य हिंदू प्रजेला त्यांच्या गौरवशाली संस्थामधून शिक्षण मिळणे सुरूच राहिले व त्यांच्या स्थानिक साहित्याच्या वाढी सोबतच ते अभिजात साहित्याचा अभ्यास करीत. थॉमस १८९१ मध्ये लिहितो. "असा देश नाही जिथे विद्याभ्यासाच्या प्रेमाचा उगम एवढया आद्य काळात होता वा ज्याचा इतका दीर्घकालीन व जबर प्रभाव पडल. त्याच्या मते ' इंग्रजांना भारतभर सर्वत्र प्रसार झालेली प्राथमिक शिक्षण तसेच उच्च शिक्षण शैली आढळून आली ज्यापैकी पहिली मुख्यत्वे व्यावहारीक व दुसरी मुख्यत्वे साहित्यिक, तत्वशास्त्रीय व धार्मिक होती.

ब्रिटीश भारतात जवळ जवळ १५० वर्षे व्यापार व मोहिमा करण्यात गुंतलेले होते. म्हणून ते शिक्षणासह सर्व प्रकारच्या सांस्कृतिक घडामोडींपासून दूर राहीले. पौर्वात्य शिक्षणाची सुरूवात वॉरन हेस्टिंग्जने १७८१ मध्ये कलकत्ता मदरसा सुरु करून केली. त्याचा हा प्रयास प्राधान्याने प्रशासकीय कारणांसाठी होता. अकरा वर्षांनी १७९२ मध्ये वाराणसीचा रेसीडेन्ट जोनाथन डंकनने युरोपीयनांना सहाय्य करण्यासाठी हिंदूंना शिक्षण देण्यासाठी संस्कृत महाविद्यालय काढले.

दरम्यान ख्रिश्चन मिशनरी प्राथमिक शाळा उघडून व समाजातील तथाकथित अस्पृश्य जातीसकट दुर्वल घटकांना पाश्चिमात्य शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत होते.

### १८.६.२ एकोणिसावे शतक ः

एकोणिसावे शतकाचा पूर्वार्धाला शैक्षणिक प्रयोगांचा कालखंड म्हणता येईल. ईस्ट इंडिया कंपनीचा चार्टर्ड ॲक्ट १८१३ ने कंपनीला "वाङ्मय साहित्याचे पुनरूत्थान व विकास तथा शिक्षित स्थानिकांना प्रोत्साहन आणि ब्रिटिश प्रदेशातील रहिवाशांमध्ये शास्त्रीय ज्ञानाचा परीचय व उत्थान होण्यासाठी" १ लाख रूपये तरतूद करण्याची मान्यता दिली. पौर्वत्यवादी व आंग्लवादी यांच्यामध्ये चर्चा होऊन अंती मेकॉलेज मिनीटस् (मेकॉले इतिवृत्त) व वेंटिंक्स रिझोल्यूशन (वेंटिंक ठराव) १८३५ द्वारा त्याबाबत निर्णय घेण्यात आला. हा निधी युरोपियन वाङ्मय साहित्य तथा शास्त्रे यांच्या उत्थानासाठी वापरण्याचे ठरले. विल्यम बेंटिंकने शासकिय अधिकृत भाषा म्हणून इंग्लिशची निवड केली. १८४४ मध्ये लॉर्ड हार्डिजने ज्यांनी इंग्लिश शिक्षण घेतले आहे अशा भारतीयांना रोजगार देण्याचे ठरवले.

वुडस् डिस्पॅच (वुडचा खलिता) १८५४ मध्ये शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे अधोरेखित केली आहेत ती अशी "सुधारित युरोपीय कला शस्त्रे तत्वज्ञान आणि साहित्य यांचा इंग्लिश अथवा इतर आधुनिक भारतीय भाषाच्या माध्यमातून प्रसार." डिस्पॅच मध्ये सुचवले आहे की बॉम्बे (मुंबई), मद्रास (चेन्नई), कलकता (कोलकता) याठिकाणी विद्यापीठे स्थापन केली जावीत. खाजगी उद्योग, ग्रॅण्टस इन एड (तदर्थ अनुदान) व्यवस्था, शाळेत प्रशिक्षित शिक्षक, स्त्री शिक्षण आणि इतर बाबींवर त्यामध्ये भर दिला आहे. १८५७ मध्ये मुंबई, मद्रास् कलकता विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. पंजाब व अलाहाबाद विद्यापिठे अनुक्रमे १८८२ व १८८७ मध्ये स्थापन करण्यात आली.



टिपा



## १८.६ विसाव्या शतकाची सुरूवात :

१९०१ मध्ये लॉर्ड कर्झनने सार्वजनिक शिक्षण संचालकांची परिषद निमंत्रित केली ज्यामुळे या परिषदेच्या निर्णयांवर आधारीत शैक्षणिक सुधारणांच्या युगाला सुरूवत झाली. १९०४ मध्ये विद्यापीठांना अध्यापन महाविद्यालयांची तपासणी आणि उच्चशिक्षणामध्ये गुणवत्ता सुधारण्याचे उपाय करण्याचे अधिकार देणारा इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट (भारतीय विद्यापीठ कायदा) संमत करण्यात आला.

वसाहत शासन काळात सामान्य वर्गाचे / जनसमुदायाचे शिक्षण दुर्लक्षित करण्यात आले तथा शासक व शासित यांच्या दरम्यन दुभाष्याचे कर्तव्य पार पाडण्याचे कार्य करील असा शिक्षित उच्चवर्ग तयार करण्याचा प्रयत्न झाला. माध्यमिक शाळा व विद्यापीठे अशा दोन्ही स्तरांवर भर देणारी शिक्षण प्रणाली होती. इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव समान नव्हता. खेडयांपेक्षा गावांमध्ये सुशिक्षितपणा व शिक्षणाचा भर अधिक होता. याची सकारात्मक बाजू अशी की याने सुशिक्षित राजकीय नेते तथा समाज सुधारक तयार झाले. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयात महत्त्वाची भूमिका पार पाडली. वृत्तपत्रे व पुस्तिकांनी जनसमुदायात जागृती निर्माण केली.

### १८.६.४ इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव :

ब्रिटीशांनी प्रशासकीय कार्यालयांमधून लिपीक अथवा बाबू म्हणून काम करायला लोकांची गरज असल्याने शाळा व महाविद्यालयांमध्ये इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला प्रोत्साहन दिले. याचे त्यांना लोकांचा एक नवा वर्ग निर्माण करण्यास सहाय्य झाले. ज्याने त्यांना पुढे राज्यकारभारात त्याचप्रमाणे प्रशासनाच्या अनेक बाबीवर नियंत्रण राखण्यास मदत केली. परिणामी भारतात आलेल्या मिशनऱ्यांनी इंग्रजी शिकवणाऱ्या अनेक शाळा तुम्हाला भारतात आजही दिसतील. अशीच एक शाळा दिल्ली मधील प्रेझेंटेशन स्कूल ही आहे. जी अद्याप सरू आहे व चांगले शिक्षण देत आहे. बरेच भारतीय आपल्या मुलांना यामुळे त्यांना शासकिय कार्यालयामधून नोकऱ्या मिळण्यात मदत होईल. या विचाराने या शाळांमध्ये घालत.

ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्यांच्या स्वतःचे हेतूंना पूरक ठरण्यासाठी इंग्रजी शिकवण्याला प्रोत्साहन दिले पण परंतु ते वेगळयाप्रकारे भारतीयांना फायद्याचे ठरले हे तुम्हाला माहीत आहे का ? भारताच्या वेगवेगळया भागात राहणारे लोक वेगवेगळया भाषा बोलतात आणि सगळयांना समजेल अशी एक भाषा नव्हती. इंग्रजीचा वापर भारतीयांना संपूर्ण देशात वापरली जाणारी एक भाषा व सगळयांना सांधणारा एक दुवा ठरली. इंग्रजी पुस्तके व वर्तमानपत्रांनी त्यांना समुद्रापलीकडे म्हणजे इतर देशातून नवीन कल्पना आणल्या. स्वातंत्र्य, लोकशाही, समता, बंधूता सारख्या नवीन पाश्चात्य कल्पना इंग्रजी जाणणाऱ्या भारतीयांच्या विचारांवर प्रभाव टाकू लागल्या ज्यामुळे राष्ट्रीय जागृतीला चालना मिळाली. सुशिक्षित भारतीय आता ब्रिटीश राजवटीपासून मुक्ती मिळण्याचा विचार करू लागले.

## १८.७ स्वातंत्र्योत्तर शिक्षण :

आपल्यला ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य १९४७ मध्ये मिळाले हे तुम्ही जाणताच आणि आपल्या जनतेच्या शिक्षणाच्या नियोजनाची जबाबदारी स्वतंत्र भारताच्या सरकारवर पडली. वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासाचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी विकासाच्या वेगवेगळया पातळीवर असू शकणाऱ्या, वेगवेगळे भाषिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टये





धारण करणाऱ्या लोकांच्या शिक्षणाच्या एकात्मिक कार्यमासाठी योग्य तरतूद करणे आवश्यक आहे. असे कार्यक्रम विविधतेत एकता मजबूत करण्यासाठी आणि देशाच्या एका भागातून अन्य भागात संचार सोयिस्कर होण्यासाठीसुद्धा एका सामाईक अभ्यासक्रमावर आधारीत असायला हवेत.

जर शिक्षणच्या प्रसारासाठी पुरेशी उपाययोजना केली नाही तर आर्थिक विषमता, प्रादेशिक असंतुलन आणि सामाजिक अन्याय अधिक वाढू शकेल. ज्यामुळे समाजात ताण वाढू शकेल. त्यामुळेच १९६६ मध्ये शैक्षणिक आयोगाच्या अहवालात (१९६४-६६ कोठारी आयोग नावाचे प्रसिद्ध असलेला) शिक्षणाचा उल्लेख "शांततापूर्ण सामाजिक बदलाचे एकमेव साधन" असा केलेला आहे. या उद्देशाने १९७६ च्या घटना दुरूस्तीत शिक्षणाचा समावेश सामायिक यादीत केलेला आहे म्हणजे केंद्र आणि राज्य दोघेही शिक्षणाची जबाबदारी सामायिकपणे स्विकारतात.

### १८.७.१ प्राथमिक शिक्षण :

प्राथमिक शिक्षण ही शिक्षणाची सर्वात निर्णायक अवस्था आहे ज्यात पहिली आठ शालेय वर्षे कालखंड आहे व व्यक्तिविकास, प्रवृत्ती, सामाजिक आत्मविश्वास, सवयी, जीवन कौशल्ये आणि संवाद कौशल्ये यांचा पाया घालणारी अवस्था आहे. घटनेच्या ४५व्या कलमात राज्याने बालकांसाठी वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत अनिवार्य व मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्याची तरतुद केली आहे. प्राथमिक शाळेचा कालावधी हा घटना दुरूस्तीनुसार मोफत व अनिवार्य शिक्षणाचा कालावधी म्हणून मान्यता प्राप्त व शिक्षणाला मूलभूत अधिकार ठरवला गेला आहे. या कायद्याचा आपण या पाठाच्या विभाग १८.९ मध्ये विस्ताराने अभ्यास करू. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अधोरेखित केल्यानुसार प्राथमिक शिक्षणाचे भर देण्याचे विभाग पुढील प्रमाणे असतील.

१. सार्वत्रिक सुलभता व पटनोंदणी

२. १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीने शाळा प्रवेश.

३. सर्व बालकांना अध्ययनाचा आवश्यक स्तर गाठण्याप्रत सक्षम बनवण्याच्या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्तेत भरीव प्रगती.

सर्व शिक्षा अभियान हा केंद्र शासनाच्या प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या २००१ मध्ये सुरू झालला कार्यक्रम इतर सर्व कार्यक्रमांच्या अग्रभागी होता.

### १८.७.२ माध्यमिक शिक्षण :

"माध्यमिक शाळा हा आत्यंतिक बदल व स्वत्व निर्मितीचा काळ आहे. हा प्रचण्ड उत्साह व शक्तीचा देखील काळ आहे." स्वातंत्र्यप्राप्तीपासून माध्यमिक शिक्षणाचा असाधारण विस्तार झालेला आहे. यात १४ - १८ (इयत्ता ९ वी ते १२ वी)वयोगटातील बालके येतात. २००१च्या जनगणनेनुसार ८८.५ दशलक्ष बालकांची माध्यमिक शिक्षणाकडे नोंद झाली आहे. परंतु पटनोंदणी आकडेवारी यातील केवळ ३१ दशलक्ष बालके २००१-२००२ मध्ये शाळेत जात असल्याचे दर्शवते. शाळांच्या संख्येत तसेच पटनोंदणी मध्ये प्रचंड वाढ झाली असतांना शिक्षकांच्या संख्येत मात्र तुलनात्मक कमी वाढ झालेली आहे. एकंदरीत शिक्षक विद्यार्थी गुणोत्तरावर विपरीत परीणाम झाल्याचे स्पष्ट आहे. विस्तारासाठी दबाव निश्चितपणे सुरू राहणार व जसजसा देश शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाकडे वाटचाल करणार तसतसा हा दबाव वाढतच जाणार आहे. जरी भारतात ज्या कोणाला माध्यमिक शिक्षण (१० वी पर्यंत) घ्यायचे आहे त्याला तशी मुभा आहे तरी ज्यांनी वरिष्ठ प्राथमिक स्तर उत्तीर्ण केलेला

आहे अशापैकी अर्ध्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यी माध्यमिक वर्गात प्रवेश घेत नाहीत. प्राथमिक स्तरावर सर्व शिक्षा अभियान च्या यशानंतर केंद्र शासन राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक स्तरावर सार्वत्रिकीकरणाचे ध्येय गाठण्यासाठी सज्ज आहे ज्याबाबत विस्ताराने आपण विभाग १८.९ मध्ये अभ्यास करणार आहोत.

उच्च माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षण हा स्वतंत्र अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या कृती अंतर्भूत असलेल्या व्यवसायासाठी तयार करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकीकरण करणे हे १९६८ साली अंगिकृत केलेल्या शैक्षणिक धोरणाने अपेक्षित असलेल्या बदलांचे प्रमुख उद्दिष्ट होते. तरीही आजवर केलेल्या प्रयासांना फळ आलेले नाही व या योजने अंतर्गत +२ स्तरावरील विद्यार्थ्याची ५०% च्या जवळपास अपेक्षित असलेली पटनोंदणी काठावरच व केवळ काही राज्यांपुरतीच सिमित राहिली आहे. नियोजन मंडळाच्या ११व्या पंचवार्षिक योजनेच्या अहवालानुसार ५७ अभियांत्रिकी व ५० अभियांत्रिकेतर व्यावसयांचे प्रशिक्षण देणाऱ्या जवळपास ५११४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या दिशेने अलीकडील काळात उचललेले सकारात्मक पाऊल म्हणजे राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान व प्रशिक्षणाची सुरूवात होय.

### १८.७.३ उच्च शिक्षण ः

भारताच्या आधुनिकीकरणाचा पाया घालणारे प्रथम पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर केले की जर विद्यापीठांचे कार्य सुरळीत असेल तर राष्ट्राचे कार्यही सुरळीत राहील. विद्यार्थ्या ने उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) स्तर पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षणाची सुरूवात होते. तो नंतर महाविद्यालयात जो विद्यापीठाचा भाग आहे प्रवेश घेतो. उच्च शिक्षण अत्यंत महत्वपूर्ण असूनही या क्षेत्रातील प्रगती अत्यंत विषम आहे. जरी काही महाविद्यालये व विद्यापीठे शैक्षणिक पारंगततेच्या बाबत महत्वाची भूमिका पार पडत असतील तरी महाविद्यालये व विद्यापीठांची सर्वसामान्य अवस्था राष्ट्राच्या दृष्टीने मोठया चिंतेची बाब आहे.

१८ ते २० वयोगटातील उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांची पटनोंदणी संख्या अतिशय कमी आहे. काही प्रदेशात हे प्रमाण आणखी विपरीत आहे विशेषतः स्त्रिया, अनुसुचित जाती व जमातींच्या बाबतीत. दर्जेदार उच्चशिक्षणाने ग्रामिण भागाला केवळ काठावर स्पर्श केला आहे. महाविद्यालयातील सुविधा मध्ये विविध तफावती आहेत. उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम व पाठयक्रम हे जीवनाशी जवळून निगडीत व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास व कार्य कारण व अध्ययन कार्यक्षमतेला अनुलक्षून असावेत. राज्य शासनाने उच्चशिक्षणाला मोठया प्रमाणावर अनुदान दिले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी शुल्काच्या रूपात अतिशय कमी रक्कम भरतो. उरलेला खर्च राज्य अथवा केंद्र शासन करते. हा जनतेचा पैसा असून तो काळजीपूर्वक व उच्चशिक्षणास पात्र आहेत, अशांसाठीच खर्च झाला पाहिजे.

भारतातील उच्च शिक्षणाच्या अहवालानुसार एकूण पटनोंदणी गुणोत्तर १९५० – ५१ मधील ०.७ % वरून वाढून २००६ – ०७ पर्यंत ११% वर पोचले आहे. २०१२ पर्यंत (११व्या पंचवार्षिक योजनेच्या अंतापर्यंत) ते १५% वाढणे अपेक्षित आहे.

### प्रौढ शिक्षण ः

प्रौढ निरक्षरतेचे निवारण हे एक आवश्यक उद्दिष्ट मानण्यात आलेले असून प्रौढ शिक्षण विशेषतः १५-३५ वर्षे वयोगटाच्या लोकासाठी, न्यूनतम गरजा कार्यक्रमाचा भाग म्हणून सहाव्या योजनेत





अंतर्भूत करण्यात आलेले आहे. याबाबत राष्ट्रीय साक्षरता अभियान (NLM) चे उद्दिष्ट ८० दशलक्ष निरक्षरांना क्रियात्मक साक्षरता प्रदान करण्याचे आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साक्षरता दर १९५१ मध्ये जनसंख्येचा १८.३% होता तो वाढून २०११ मध्ये ७४.० % झाला. पुरूष साक्षरता दर ८२.१४% व स्त्री साक्षरता दर ६५.४५ % आहे.

### १८.७.४ तंत्र व व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण ः

तंत्र शिक्षणाचे महत्व फार मोठे आहे. भारतात आधीच प्रशिक्षित मनुष्यबळाचा सर्वात मोठा साठा आहे. तंत्र व व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे लक्ष्य उद्योगाच्या चालू त्याचप्रमाणे भविष्यातील गरजा हे होत. तांत्रिकदृष्टया प्रशिक्षित व्यक्ती पूर्वापार शास्त्रीय व औद्योगिक विकासाच्या शक्तीचे उगमस्थान राहिलेले आहे. वारंवार असे सुचवले जाते की बुद्धिवान अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना असे व्यवसाय व कामाचे वातावरण उपलब्ध करून दिले जात नाही जे त्यांना ध्येयपूर्तीची भावना व कार्यपूर्तीचे समाधान देईल. याची परिणती बौद्धिक संपदेचा ओघ विकसित देशांकडे अथवा व्यवस्थापन अभ्यासक्रमाकडे वळण्याच्या घटनांमध्ये होते. ज्यावेळी हुशार उच्चशिक्षित स्त्री पुरूष चांगल्या उत्पन्नासाठी स्वदेश सोडून परकीय देशात जातात अशा घटनेला ब्रेनड्रेन (बौद्धिक संपदानिर्गमन) म्हणतात. तंत्र व व्यवसाय शिक्षण देणारी भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) व भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) अशी उत्तम केंद्रे भारतात आहेत.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ः

स्वातंत्र्य प्राप्तीपासून राष्ट्राने आपल्या संसाधनाचा बराच मोठा हिस्सा शिक्षणावर गुंतवला आहे. त्यामुळे शिक्षण संस्थांच्या कारभार सक्षम असण्याची अपेक्षा करण्याचा राष्ट्राला अधिकार आहे. १९६८ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेने स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक इतिहासात लक्षणिय टप्पा नोंदला आहे. राष्ट्रीय प्रगतीला चालना, समान नागरीकत्व व संस्कृतीची भावना आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट करणे हे या योजनेचे ध्येय होते. शिक्षण प्रणालीची आमूलाग्र पुनर्रचना, तंत्रज्ञान, नैतिक मूल्यांचे संवर्धन आणि शिक्षण व जीवन यामध्ये जवळीक यावर यात भर दिलेला होता.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ गेल्या वर्षातील उपलब्धींच्या बळावर आखण्यात आले. भारतात शाळांचे विशाल जाळे आहे. जवळजवळ ९५% लोक प्राथमिक शाळेच्या १ किलोमिटरच्या आत व माध्यमिक शाळेच्या ३ किलोमिटरच्या आत राहत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) नुसार एक सर्वसमावेशक कार्यक्रम 'राष्ट्रीय साक्षरता अभियान' (NLM) १५-३५ वर्षे वयोगटातील लोकांना साक्षर करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.

भारतात टेलिव्हिजन व रेडिओ केंद्राचे मोठे जाळे आहे. उपग्रह व दूरदर्शनचे बहुसंख्य जनतेपर्यंत पोचणारे जाळे असणे हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे जो औपचारिक शिक्षण संपन्न करून आणि अनौपचारीक व दूरअध्ययन कार्यक्रमाला सहाय्य करून अध्ययन - अध्यापन प्रणालीमध्ये निःसंशय क्रांती घडवू शकतो.

प्रत्येक जिल्ह्यात प्रगत नवोदय विद्यालये स्थापन करण्याचा निर्णय केवळ केंद्राच्या शिक्षणाबाबतच्या बांधिलकीच्या प्रमाणाचा निदर्शक नाही तर त्याच्या सर्वाना समान शिक्षण या जाणीवेचाही निदर्शक आहे. या शाळांमधून विशेष गुणवत्तावान बालके, विशेषतः ग्रामीण भागातील, त्यांच्या पालकांचा आर्थिक दर्जा विचारात न घेता दर्जेदार शिक्षण घेऊ शकतील.

### मुक्त व दूर अध्ययन प्रणाली :

असे बरेच अध्यनार्थी आहेत ज्यांना औपचारीक शिक्षण प्रणालीत अभ्यास अर्धवट सोडणे भाग पडते. हे आर्थिक, भौगोलिक, शैक्षणिक अथवा वैद्यकीय कारणामुळे असू शकेल. मुक्त व दूर अध्ययन (ODL) प्रणाली ही अशा अध्ययनार्थीसाठी आहे. या प्रणालीमध्ये अध्ययनार्थी दूर अध्ययनाच्या संस्थांद्वारा पाठवण्यात आलेल्य पाठांद्वारे वर्गात उपस्थित न होता अध्ययन करू शकतात. ते अभ्यास करता करता त्यांच्या व्यवसायात अथवा नोकरीत व्यग्र राहू शकतात.

अध्ययनार्थी शिक्षकाच्या प्रत्यक्ष संपर्कात नसतो. तो काही अंतरावर असतो. मुक्तशाला सध्या माध्यमिक (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) शिक्षण देतात. तुम्ही मुक्तशालेत प्रवेश घेतला आहे. आपला नियमित रोजगार सांभाळून तुम्हाला पाठवण्यात आलेल्या पाठांच्या माध्यमातून तुम्ही अध्ययन करीत आहात हे तुम्हाला माहित आहेच. हे पाठ अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेले आहेत. ही मुक्तप्रणाली आहे कारण यात गती स्थळ व काळ याबाबत लवचिकता आहे. तुम्हाला विषयांची कोणतीही संगतीनिवडण्याची व ते तुमच्या सोयीनुसार पाच वर्षांच्या कालावधीत उत्तीर्ण होण्याची मुभा आहे. अशीच सुविधा उच्च शिक्षणात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाद्वारे पुरविली जाते.

या संस्था अशा प्रत्येक भारतीय नागरिकापर्यंत ज्याला त्याचे शिक्षण नियमित प्रवाहात सुरू ठेवणे शक्य झाले नसेल शिक्षण पोचविण्यासाठी बरेच काही करत आहेत. अशाप्रकारे भारतात स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची प्रगती जलद गतीने झालेली आहे. शिक्षण क्षेत्रात विकास, एकात्मता, दर्जा व समानता ही राष्ट्रीय ध्येये तेव्हाच गाठता येऊ शकतात जेव्हा देशातील प्रत्येक मूल किमान शैक्षणिक क्षमतेचा उंबरठा पार करेल. विकास, परीश्रम आणि दर्जा यांचे परीपूर्ण वातावरण अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून निर्माण करावे लागेल ज्यात प्रत्येकाचा नवीन वृत्ती व कल्पनांचा प्रवर्तक त्याचप्रमाणे ग्राहक अशा दोन्ही प्रकारे अंतर्भाव असेल.

## १८.८ शिक्षणातील अलीकडच्या घडामोडी :

### शिक्षण हक्क कायदा :

शिक्षणाला मूलभूत हक्क बनवणारी ८६ वी दुरूस्ती संसदेत संमत करण्यात आली. मुक्त व अनिवार्य शिक्षणाचा बालकांचा हक्काची अंमलबजावणी शक्य व्हावी यासाठी संसदेने एप्रील २०१० मध्ये कायदा संमत केला.

हा कायदा ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला त्याच्या जवळच्या परीसरातील शाळेत मोफत /मुक्त प्राथमिक शिक्षण मिळते याची खातरजमा करणे राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक करतो. संबंधित वयोगटात आजमितीस २२ कोटी बालके आहेत. परंतु तरीसुद्धा या वयोगटातील ४.६ % बालके (जवळ जवळ ९२ लाख) शाळेबाहेर आहेत. या कायद्यानुसार शालेय व्यवस्थापन समिती वा स्थानिक अधिकारी ६ वर्षावरील गळती अथवा शाळाबाह्य बालकांचा शोध करील आणि त्यांना वयास अनुरूप वर्गात विशेष प्रशिक्षण देऊन दाखल करील.





## राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) ः

RMSA रा.मा. शि.अ. ही केन्द्र पुरस्कृत योजना माध्यमिक स्तरावरील दर्जेदार शिक्षणाची प्राप्यता व सुधारणा यांच्या सार्वत्रिकरणासाठी असून ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात लागू केली गेली.

RMSA रा.मा. शि.अ.चे ध्येय सर्व १५ –१६ वर्षे वयोगटातील इयत्ता ९ वी १० वी तरूण विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे माध्यमिक शिक्षण उपलब्ध, प्राप्य व सुयोग्य बनवणे हे आहे. या योजनेचे प्रमुख लक्ष्य १५– १६ वर्षे वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरील शिक्षण कोणत्याही वास्तव्याच्या ठिकाणाच्या ५ किलोमिटरच्या आत माध्यमिक शाळा पुरवून व कोणत्याही वास्तव्याच्या ठिकाणाच्या ५ किलोमिटरच्या आत उच्चमाध्यमिक शाळा पुरवून सार्वत्रिक प्राप्य करणे आणि २०१० पर्यंत सार्वत्रिक करणे.

## RMSA रा.मा. शि.अ.च्या अंमलबजावणीसाठी रणनीती ः

१. विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळा सुलभ करण्यासाठी RMSA रा.मा. शि.अ.च्या कृती आराखडयामध्ये पुढील रणनीती धोरण आहे.

   अ. वर्गखोल्या, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, मुल व मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे यांचे बांधकाम करणे व ज्यादा शिक्षकांची नियुक्ती करणे याद्वारा उच्च प्राथमिक शाळांचा दर्जा सुधारणे आणि

   ब. वर्गखोल्या, संगणक कक्ष, मुले व मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे यांचे बांधकाम करणे व ज्यादा शिक्षकांची नियुक्ती करणे प्रयोगशाळा सुविधांचे सबलीकरण करणे याद्वारा असलेल्या माध्यमिक शाळांचे सबलीकरण करणे व दूरूस्ती व नादुरूस्त असलेल्या शालेय इमारतींचे नुतनीकरण करणे.

२. वेगवेगळया सामाजिक गटांमधील तफावत नष्ट करणे, या योजनेत अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्य व समाजातील इतर दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विशेष प्रोत्साहन.

३. RMSA रा.मा. शि.अ. योजनेचा दर्जा सुधारण्यासाठी पुढील कामे पार पाडण्याचे प्रस्तावीत आहे.

   अ. प्रयोगशाळा, ग्रंथालय यांचे बांधकाम

   ब. शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण

   क. शाळाप्रमुखांचे नेतृत्व प्रशिक्षण

   ड. अभ्यासक्रमीय सुधारणा

   इ. शास्त्र व गणित शिक्षण

   फ. संगणकाच्या सहाय्याने शिक्षण

   ग. सहशालेय उपक्रम

   ह. अध्यापक अध्ययन साहित्य



टिपा



## पाठ्यांशांवरील प्रश्न १८.३

१. १८३५ चा बेंटिंकचा ठराव कोणता ?

उत्तर

२. इंग्रजी ही शासनाची अधिकृत भाषा म्हणून कोणी लागू केली ?

उत्तर

३. इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट भारतीय केव्हा संमत करण्यात आला ?

उत्तर

४. १८५७ मध्ये तीन विद्यापीठे कोठे स्थापन करण्यात आली ?

उत्तर

५. वसाहतीच्या शासनकाळात शिक्षणाचा पाया काय होता ?

उत्तर

६. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतात इंग्रजी शिक्षणाची सकारात्मक बाजू कोणती होती ?

उत्तर

७. राज्यघटनेच्या सामाइक सूचीत शिक्षण हा विषय केव्हा आला ?

उत्तर

८. नवीन राष्ट्रीय धोरण केव्हा आखण्यात आले ?

उत्तर

९. प्राथमिक शिक्षणातील भर द्यावयाची क्षेत्रे कोणती ?

उत्तर

१०. माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व काय ?

उत्तर ____________________

११. ऊच्च शिक्षण स्तरावर चिंताजनक परिस्थिती कोणती ?

उत्तर ____________________

१२. प्रौढ शिक्षणाचा वयोगट कोणता ?

उत्तर ____________________

## तुम्ही काय शिकलात?

- वैदिक काळात शिक्षण हे आश्रमात दिले जाई व तो प्राधान्याने तथाकथित उच्च वर्गाचा हक्क होता.
- शिक्षण हे व्यापारी संघातसुद्धा दिले जाई जी खि.पू.२०० ते इ.स.३०० काळात संघ तांत्रिक शिक्षणाची केंद्रे बनली.
- बौद्ध मठ व जैन शिक्षण प्रणाली यांनी भारताला जगात आघाडीचे विद्याभ्यासाचे केंद्र बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.
- दिल्ली सुलतानशाही प्रस्थापित झाल्यानंतर मुस्लिम शिक्षण प्रणाली लागू झाली जी प्राथमिक व उच्च विद्याभ्यास यांचा समावेश करणारी परीपूर्ण व्यवस्था होती.
- पाश्चिमात्य शिक्षण प्रणालीच्या आगमनाने समाजाच्या, तथाकथित अस्पृश्यांसह, सर्व घटकांना शिक्षण देण्याच्या स्वरूपाने काही आमुलाग्र बदल आणले.
- १९८६ च्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वतंत्र भारताच्या शिक्षणाच्या इतिहासात एक महत्वाचे पाऊल ठरले आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. प्राचिन काळातील शैक्षणिक विकास थोडक्यात वर्णन करा.

२. दिल्ली सुलतानशाही स्थापनेसोबत मध्ययुगीन भारतात शिक्षण क्षेत्रात घेण्यात आलेल्या बदलांचा मागोवा घ्या.

३. मोगल काळात शिक्षण प्रणालीत लागू करण्यात आलेले बदल कोणते

४. १८५४ तल १९०४ या काळातील शैक्षणिक प्रगती विषद करा.

५. निरक्षरता नष्ट करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाय योजनांची चर्चा करा.

टिपा



## प्रश्नांची उत्तरे

### १८.१

१. सांस्कृतिक बदलासोबत शिक्षण प्रणाली बदलते

२. विद्याभ्यासाची सुरूवात यज्ञोपवीत बंधनाने (जानवे बांधून) उपनयन संस्काराने होते.

३. आश्रमांमध्ये

४. वायू (वात), कफ पित्त.

५. आदिपुराण आणि यशतिलक

६. अ. शिक्षण ही उच्चवर्गाची/ उच्चवर्गाची मक्तेदारी /विशेषाधिकार होती.

 ब. शिक्षणात संस्कृत भाषेचा वापर.

### १८.२

१. मखतब.

२. राजे (शासक) व सरदार.

३. दिल्लीत मुइझी, नसिरी, फिरूझी.

 बिदरमध्ये मोहम्मद गवानी मदरसा

 फत्तेपूर शिक्रीत अब्दूल फजल मदरसा

४. ती वळणाने पारंपारीक व पाठयवस्तूत धार्मिक होती.

५. त्यामध्ये चौकसबुद्धी, निरीक्षण, संशोधन व प्रयोग यांचा शिक्षणात अंतर्भाव होता.

६. त्याने शिक्षणात धर्मनिरपेक्ष व शास्त्रीय पद्धत आणली.

### १८.३

१. युरोपियन साहित्य व शास्त्रे यांना चालना देणे.

२. विल्यम बेंटिंक

३. १९०४

४. मुंबई, मद्रास, कलकत्ता

५. शासक व शासित यांच्या दरम्यान दुभाष्याचे कर्तव्य पार पाडण्याचे कार्य करील असा शिक्षित उच्चवर्ग तयार करणे.

६. सुशिक्षित राजकीय नेते तथा समाज सुधारकांचा नवावर्ग निर्माण झाल. ज्याने देशाच्या स्वातंत्र्य लढयात मदत केली.

७. १९७६ ची घटना दुरूस्ती

८. १९८६ मध्ये





९. अ. सार्वत्रिक सुलभता आणि पट नोंदणी

ब. १४ वर्षापर्यंतच्या बालकांचे सार्वत्रिक संधारण

क. सर्व बालकांना अध्ययनाचा आवश्यक स्तर गाठण्याप्रत सक्षम बनवण्याच्या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्तेत भरीव प्रगती.

१०. ते बालकांना ज्ञानाच्या पायाभूत शाखांशी सुपरीचित करते.

११. अ. १८ ते २० वयोगटातील उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांची पटनोंदणी संख्या अतिशय कमी

ब. स्त्रिया, अनुसूचित जाती व जमातींचे उच्च शिक्षणातील प्रमाण अतिशय कमी आहे.

१२. १५ तो ३५ वर्षे.



टिपा

# विभाग ८

| गुण | तासिका |
| --- | --- |
| 10 | 20 |

## सामाजिक रचना

भारतीय संस्कृतीच्या सर्व घटकांचा परिचय होण्यासाठी भारतीय समाजरचनेचा अभ्यास आवश्यक आहे. भारतीय समांजाच्या विविध घटकांचे परिक्षण व समाजरचनेचे विश्लेषण करणे, हा या अभ्यासघटकाचा हेतू आहे. त्याच बरोबर काही समकालीन सामाजिक समस्यांचे परिक्षण करण्याचाही प्रयत्न केला गेला आहे व या समस्यावर काही योग्य उपाययोजना सुचविण्याचाही प्रयत्न केला गेला आहे.

**पाठ १९ ः भारतीय समाज रचना ः**

**पाठ २० ः समकालीन भारतातील सामाजिक सांस्कृतिक समस्या**

टिपा

# १९

# भारतीय समाज रचना

आपण भारतीय संस्कृतीच्या वैविध्येतेचे वर्णन करणार आहोत. चालीरिती आणि परंपरा भिन्न असलेले किती तरी लोक या देशात राहतात. जगात इतर कोणत्याही देशात आढळणार नाही अशा प्रकारची भिन्नता प्रांत (उदा. उत्तर भारत, दक्षिण भारत) भाषा (उदा. हिंदी, तामिळ, तेलगू) धर्म (उदा. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शिख) या प्रत्येक घटकांमुळे व इतर ओळख अनुबंधामुळे स्वतंत्र अशी सामाजिक नाती निर्माण झाली आहेत. म्हणजेच स्वतंत्र समाज रचना निर्माण झालेली आहे तरीही सर्वांना जोडेल असा समान धागाही आहे. अनेक वर्षापासून झालेली भारतीय समाजाची उत्क्रांती आता आपण पाहणार आहोत.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- भारतीय समाज रचनेचे परिक्षण करणे.
- पुरूषार्थ, आश्रम, संस्कार जाणून घेणे.
- भारतीय समाजात रूढ असलेली अस्पृश्यता वर्णन करणे.
- भारतात अस्तित्वात असलेल्या गुलामगिरी पद्धतीचा आढावा घेणे.
- जाजमानी पद्धतीचे वर्णन करणे.
- कुटुंब संस्था आणि लग्नसंस्था यांच्या भारतातील भूमिकेचे मुल्यमापन करणे.
- भारतीय समाज रचनेतील स्त्रियांच्या स्थानाचे मूल्यमापन करणे.
- भारतातील आदिवासी लोकांची स्थिती अभ्यासणे.

## १९.१ जमाती, वर्ण आणि जाती ः

जमात ही सुरूवातीच्या काळातील सहज ओळखू येणारी सामाजिक संस्था होती. मुंड, हो. ऑरॉन, भिल्ल, गड्डी, संथाल, कोलकंध, खाशी, गारी, मिझो, नागा यासारख्या बहुसंख्य जमाती भारताच्या

विविध भागातून आढळतात. भारतीय राज्य घटनेतील तरतुदीनुसार त्यांचा समावेश विशिष्ट जमातीच्या गटात म्हणजेच घटनेतील वेगळया सूचित केलेला आहे. म्हणून त्यांना अनुसूचित जमाती म्हणतात. एक समयोजित प्रश्न नेहमीच येतो. जमात म्हणजे काय ? जमाती इतर जाती किंवा वर्ण यात काय फरक आहे ? ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या सामाजिक संस्थांच्या कार्यातच आहे आपण जमात खालील लक्षणांच्या आधारे ओळखू शकतो.

१. सर्व सदस्य एकमेकांशी रक्ताच्या नात्याने जोडलेले असतात.

२. सर्व सभासदांचा दर्जा समान असतो.

३. त्यांच्या सर्वाचे पूर्वज एकच आहेत. असा त्या सर्वाचा विश्‍वास असतो.

४. उत्पादन साधनांवर सर्वांना सारखाच हक्क असतो.

५. खाजगी मालमत्तेचा हक्क क्वचितच आढळतो.

६. वय आणि लिंग या आधारेच सामाजिक भेद केला जातो. जमात ही एकापेक्षा जास्त कुळांपासून बनलेली असते. कुळ हां बहिर्विवाही गट आहे. जमात हा अंर्तविवाही गट आहे.

वैदिक काळापासून अशा जमाती आढळून येतात. त्या काळात भरत, यदु, उस्वास, ध्रुयुस, पुरू आणि अनु ह्या काही प्रमुख जमाती होत्या. जमातीच्या प्रमुखाला राजा म्हटले जाई. सर्वांच्यात पहिला असलेला राजा असे. लोकांमध्ये प्रमुख भेद हा रंग किंवा वर्ण यावरून केला जाई. जे लोक ह्या वैदिक काळातील जमातीमध्ये समाविष्ट नसर्त, त्यांना दासवर्ण समजले जाई. त्यांची भाषा वेगळी असे ते रंगाने काळे असत आणि त्याचे उपास्य दैवत वेगळे असे.

ह्या सुरूवातीच्या भेदाचे रूपांतर पुढे गुंतागुंतीच्या वर्णव्यवस्थेमध्ये झाले. जमातींच्या ऐवजी आता समाजाची विभागणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा घटकात झाली. जमातीमधलि संघर्ष, दोन जमातींमधील संघर्ष, परस्पर वैर आणि जिंकणे, मिळालेली लुट आणि संपत्तीचे वाटप यावरून वर्ण उदयाला आले.

ब्राह्मण वर्णातील लोकसामान्यपणे धर्मगुरूची कार्ये करत असत. क्षत्रिय राजकिय कार्यांशी संबंधीत असत. वैश्य हे सामान्यपणे शेतकरी होते. आणि शुद्र हा सेवक वर्ग होता. संख्येने मोठया असणाऱ्या व अधिक उत्पादन काढणाऱ्या वैश्य वर्णाचे पहिल्या दोन वर्णांनी शोषण केले. वरील तिन्ही वर्ण शुद्रांचे शोषण करत असत. पहिले तीन वर्ण उपनयन करू शकत असत. त्यांना द्विज (दोनदा जन्म घेणारे) म्हटले जात.

उत्तरवैदिक काळात अर्थव्यवस्थेत खूप बदल झाले. त्यामुळे ह्या बदललेल्या अवस्थेला समाजातील विविध घटकांना पारंपारिक सनातनी तत्वज्ञानापेक्षा वेगळया अकर्मठ धार्मिक चळवळी उदयाला आल्या. ह्या चळवळीनी ब्राह्मणी धर्माचा उपहास व विडंबन केले तरी बौद्ध धर्माने पूर्णपणे जाती व्यवस्थेचा अंत केला नाही. बौद्ध मताप्रमाणे जमातीच्या दर्जात्मक उतरंडीत क्षत्रियाना सर्वोच्च स्थान होते. ज्या वैश्य वर्णाचे ब्राह्मणांकडून अधिक शोषण आले होते, त्यातील अनेकांनी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी इतर धर्मात प्रवेश केला. बौद्ध आणि जैन यांच्यामध्ये जाती विषयक जेष्ठतेची कल्पना नव्हती. शक, कुशाण, पर्शियन्स आणि इंडोग्रीक लोक यांच्या येण्याने वर्ण जाती व्यवस्थेत पुनः बदल होत गेले. अर्थव्यवस्थेतही बदल होत होते. शहरांची वाढ, हस्तव्यवसाय व्यापार यामुळे

संघ किंवा श्रेणी यांचा उदय झाला. पुढे त्यांचेच रूपांतर जातींमध्ये झाले. संघातील लोकांच्या वर्त नावर संघ न्यायालयाचे नियंत्रण असे. रूढींप्रमाणे संघाना कायद्याचा अधिकार होता. हे संघ बँकर, सावकार किंवा विश्‍वस्त म्हणूनही काम करत असत. साधारणपणे ही कामे वेगळया प्रकारचा व्यापाऱ्याकडून केली जात. ज्यांना श्रेष्ठी समजले जाई. (सध्या उत्तर भारतातील सेठ आणि दक्षिण भारतातील चेट्टी आणि चेट्टीगार) अशा प्रकारे इ.स.पूर्व ५०० या काळात जाती व्यवस्था नियमित झाली. जातींची संख्या बहुविधी प्रकारांनी वाढली. काळाबरोबर हस्तव्यवसाय वाढले. लोकसंख्येत नविन प्रवाह आले. आंतरजातीय विवाह होऊ लागले. काही जमाती श्रेष्ठतेमुळे जातींमध्ये समाविष्ठ झाल्या. धर्मशास्त्र आणि स्मृतिंनी प्रत्येक जातीची कामे निश्‍चित करण्याचा प्रयत्न केला. जाति जातीमधील संबंध अंर्तविवाह, हस्तव्यवसायाच्या प्रकारची मक्तेदारी समान संबंध या नियमांनी ठरवले जात.

पाचव्या आणि सातव्या शतकाच्या दरम्यान वर्णजाती संख्येत आणखी बदल होत गेले. जमीनी दान देण्याच्या पद्धतीमुळे जमीनदारांचा नविन वर्ग निर्माण झाला आणि वैश्य वर्णाचे रूपांतर सेवा करणारी कुळे यांच्यामध्ये झाले. अनेक जमातींमधील शेतकरी आता शुद्र समजले जाऊ लागले. परिणामी वैश्य आणि शुद्र आता एकमेकात मिसळले गेले. गंगेच्या खोऱ्यातील परिसर वगळता इतरत्र जाती व्यवस्थेचे वेगळेच रूप उदयाला आले. बंगाल, दक्षिण भारत आनि सीमाकाठच्या प्रदेशांमध्ये दोनच जाती राहिल्या. त्या म्हणजे ब्राह्मण आणि शुद्र सातव्या शतकानंतर उत्तर भारतात राजपूतांचा समाजातील महत्वाचा घटक म्हणून उदय झाला. ह्या काळात जाती व्यवस्था लोकांच्या मनात इतकी रूजली होती की झाडांची विभागणी सुद्धा जातींच्या आधारावर केली जात असे.

मध्ययुगीन काळातील महत्वाची प्रगती म्हणजे विशेषतः दक्षिण भारतात शुद्रांची विभागणी दोन वर्गा त सत् (शुद्ध) आणि असत् (अशुद्ध)अशी केली जात असे. दक्षिणेतच डावे (आयडंगी) आणि उजवे (वलंगी) असे जातीचे भेद होते. मनुस्मृतीत या जातींचा उल्लेख आहे. नंतरच्या ग्रंथांमधून शेकडो मिश्र जाती (वर्ण संकर) असल्याचा उल्लेख आहे. रजपूत यांच्या शिवाय एक कायस्थ नावाची नविन जात उदयाला आली.परंपरेने कायस्थ हे लेखक आहेत. त्यांची एक स्वतंत्र जात एकत्रीकरणातुन व अंर्तविवाही गटातून तयार झाली. नेहमीच बहुतेक जाती आपले पूर्वज फार थोर व्यक्ति होत्या. आता मात्र आपल्या आर्थिक किंवा इतर दर्जा खाली आला आहे असे म्हणत असत. उत्तर भारतात खत्री ही महत्वाची जात आहे ते स्वस्ताला मूलतः क्षत्रीय असल्याचे मानतात. काहींनी व्यापार उदीम सुरू केला त्यामुळे जातीतील लोकांना त्याच्या इतर जात बांधवांनी बंधनकारक केले म्हणून कमी दर्जा म्हणजे वैश्य दर्जा स्विकारावा लागला. आपण उच्च जातीचे आहोत असा दावा करण्याचा प्रयत्न सन १९५० पर्यंत चालू होता. पण ह्याच वेळी भारतीय राज्यघटनेने खालच्या जातींसाठी सरकारी नोकरीत आरक्षण सुरू केले.

जाती व्यवस्थेचे स्वरूप प्रदेशांप्रमाणे वेगळे होते. इ.स.पूर्व आठव्या शतकात झालेला प्रदेश आणि प्रादेशिक कल्पनांचा उदय यामुळे जाती व्यवस्थेत बदल झाले. उत्तर भारतातील ब्राह्मणांची विभागणी फक्त त्यांच्या गोत्रावरून न करता. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचाही विचार केला जात असे कन्याकुब्जा सरपुरेरियार आणि मैथिला ब्राह्मण जे अनुक्रमे कनोज सरयु नदी आणि मिथिला येथे रहात असत. राजपुतांमधील असंख्य उपजाती अजूनही त्यांच्या जमातींची नावे धारण करतात जसे तोमर, कच्छवाह, हाद आणि चौहान ह्या सर्व उपजातींना स्वतःची गोत्रे आहेत. मध्ययुगीन

काळापर्यंत जात. उपजात आणि गोत्र यांचे प्रमाण वाढत गेले. मराठा ही पण स्वतंत्र जात निर्माण झाली. आधुनिक काळात जाती व्यवस्थेला नविन वैशिष्टये चिकटली. आडनाव असण्याची कल्पना अस्तित्वात आली. एखाद्या विशिष्ट जातीला किंवा उपजातीला एक किंवा दोन आडनावे मिळू लागली. तरीही यातही खूप भेद व फरक आढळून येतात. जाती आणि जाति विरूद्ध चळवळींमुळे अलीकडील काळात नव्याच जाती निर्माण झालेल्या आहेत. ब्राह्मो समाजाला आता जातीचाच दर्जा मिळालेला आहे.

वरील वर्णनावरून लक्षात येईल की जाती व्यवस्थेला गुंतागुंतीची कार्यपद्धती आहे. मोठया प्रमाणात प्रादेशिकता असल्याने त्यात बदल म्हणून अगदी मोजक्या शब्दात व्याख्या करणे शक्य नाही. प्रदेश, उपप्रदेश, आर्थिक दर्जा, राजसत्तेची जवळीक, हस्तकला, अधिसत्ता, व्यवसाय, विशिष्ट देवाची उपासना ह्या घटकांची भूमिका जात ठरविताना आणि त्यात बदल होताना असते.

जाती व्यवस्थेचा प्रभाव इतका तीव्र होता की मध्ययुगातील बसव, रामानंद यासारख्या समतावादी सामाजिक संतांनी त्यांच्या शिष्यामध्ये जाती व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या पंथानी जाती व्यवस्थेने वेगळीच वैशिष्टे उचलली पण जाती व्यवस्था नष्ट झाली नाही. शिख लोक जात विसरू शकत नाहीत. मुस्लीमांनाही त्यांचे जात गट निर्माण केले. केरळचे सिरीयन ख्रिश्चन सुरूवातीला अनेक गटात विभागलेले होते. नंतर त्यांनीही जातीची वैशिष्टये उचलली. ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या लोकांनी मूळच्या जातीचे वैशिष्टे टिकवली आहेत. उच्च जातीतल्या धर्मातरितांनी खालच्या जातीतील धर्मातरितापासून अलगत्व निर्माण केले आहेत. ते स्वतःला खालच्या जातीपासून वेगळे मानतात.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १९.१

१. ओळखता येणारी सुरवातीच्या काळातील कोणती सामाजिक संस्था आहे ?

उत्तर ____________________

२. वैदिक काळातील दोन जमातींची नावे सांगा.

उत्तर ____________________

३. द्विज म्हणजे काय ?

उत्तर ____________________

४. कोणत्या लोकांच्या आगमनाने भारतातील जाती व्यवस्थेत बदल झाले ?

उत्तर ____________________

५. शुद्रांची विभागणी सत् आणि असत् अशी केव्हा झाली ?





## १९.२ अस्पृश्यता ः

भारतीय समाजात असलेल्या शुद्धतेच्या कल्पनेमुळे अस्पृश्यता निर्माण झाली. अस्पृश्यता ही कल्पना वैदिक काळापासून अस्तित्वात आली आणि बुद्धाच्या काळात ती स्वतंत्र सामाजिक घटक ठरली. काही वेळेला त्यांचा उल्लेख पंचम म्हणजे पाचवा वर्ण असा केला जाई.

अनेक प्रकारच्या अस्पृश्यांचा उल्लेख स्थूल मानाने चांडाळ असा केला जाई. त्यांना इतर जाती असलेल्या खेडेगावामध्ये राहता येत असे. मुख्य वस्तीच्या बाहेर एका बाजूला त्यांना राहावे लागले. त्यांचे मुख्य काम म्हणजे प्रेते वाहून नेणे आणि जाळणे. त्यांनी प्रेताची वस्त्रे घालावीत. फुटक्या भांडयातून पाणी प्यावे आणि फक्त लोखंडाचे दागिने घालावे असा स्मृतीचा (कायदेविषयक ग्रंथाचा) दंडक होता. गुप्तांच्या काळात तर त्यांचा दर्जा इतका घसरला की गावात येण्यापूर्वी त्यांना ढोल वाजवावा लागे. शिकारी (निषाद) कोळी (कैवरतस) कातडी काम करणारे (चर्मकार) झाडूवाले (कुक्कुसा) आणि टोपल्या विणणारे (वैणा) ह्या सर्वांना अस्पृश्य समजले जाई. डोम किंवा डोंब यांनाही अस्पृश्य समजले जाई. आपण शुद्र राजांच्या शिवाय डोंब राजांचा उल्लेखही पुस्तकांमधून वाचतो. म्लेच्छांनाही शुद्र समजले जाई. अगदी अलीकडच्या काळापर्यंत ही अस्पृश्यता अस्तित्वात होती. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा असला तरी अजूनही काही भागात ही प्रथा चालू आहे. ह्या प्रथेविरूद्ध महात्मा गांधी यांनी चळवळ सुरू केली. त्यांनी त्या लोकांना हरीजन म्हणून म्हणायला सुरूवात केली. नावात झालेल्या बदलांमुळे त्यांच्या स्थितीमध्ये काहीही फरक पडला नाही.

## १९.३ गुलामगिरी ः

भारतात आढळणारी गुलामगिरी त्याचे स्वरूप आणि त्याचा गाभा ह्या दोन्हीही दृष्टीने ग्रीक आणि रोममध्ये आढळून येणाऱ्या गुलामगिरीपेक्षा वेगळी होती त्यामुळेच मॅगेस्थेनेस याला भारतात गुलाम आढळून आले नाहीत. परंतु त्याचे विधान पूर्णपणे चुकीचे होते. गुलामी ही प्रस्थापित झालेली संस्था असून मालक आणि नोकर यातील संबंध कायदेशिररित्या स्पष्ट केलेले असत. उदाहरणार्थ जर एखाद्या गुलाम स्त्रिला मालकापासून मूल झाले तर ती कायदेशीर रित्या मुक्त होत असे आणि ह्या मुलाला मालकाच्या मुलाचा दर्जा दिला जाई. तरीही उत्पादन प्रक्रियेत गुलामांचा वापर मोठया प्रमाणात केला जात नसे. अर्थशास्त्र या पुस्तकातील उल्लेखानुसार माणूस जन्माने, स्वेच्छेने स्वतःला विकून, युद्धात पकडला गेला तर किंवा कायदेशीर शिक्षा झाली तर गुलाम होऊ शकतो. संस्कृत मध्ये गुलाम याला दास असा शब्द आहे. या दासांना आर्यांच्या टोळया पकडून अडकवत. अशा अनेक दासांना वेठबिगार बनवले जाई. भारतात गुलाम सामान्यपणे घरगुती नोकर आणि वैयक्तिक रक्षक व्यक्ति असत. अर्थातच गुलाम हा मालकाच्या घरातील व्यक्तींपेक्षा दुय्यम दर्जाचा समजला जाई. गुलामांच्या जगण्यावर मालकाचा काही हक्क नसे. सुरूवातीच्या काळात गुलामांचा बाजार नसे परंतु इसवीसनाच्या सुरवातीच्या शतकांमध्ये भारत आणि रोम याच्यात स्त्री गुलामांचा व्यापार दोन्ही बाजूंनी चाले. विजयनगरच्या साम्राज्यत सोळाव्या शतकात गुलामगिरी अस्तित्वात होती.

दिल्लीच्या सुलतानाकडे खूप गुलाम होते. परंतु ह्यांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती. मालीक काफुर नावाचा गुलाम अल्लाउद्दीन खिलचीच्या काळात सैन्य प्रमुख बनला होता. सोळाव्या शतकात पोर्तुगिज या गुलामांच्या व्यापारात शिरले आणि मोठया प्रमाणात व्यापार सुरू झाला. गोवा येथे होणाऱ्या गुलामांच्या व्यापाराचा उल्लेख महत्वाचा आहे. मोठया संख्येने गुलामांचा उपयोग खालीसा (जमीनीवर काम करण्यासाठी) जमिनीसाठी किंवा कारखान्यात काम करण्यासाठी केला जाई. ह्या प्रकारची गुलामगिरी ब्रिटीशांच्या राजवटीपर्यंत चालू होती.लॉर्ड कॉर्नवालीस याने त्यावर हल्ला चढविला. गुलामांच्या व्यापारावर पूर्ण बंदी घातली गेली. जरी ही प्रथा गैर व बेकायदेशीर असली तरीही अजूनही भारताच्या ग्रामीण भागात कर्ज फेडण्यासाठी वेठ बिगारीच्या स्वरूपात गुलामगिरी अस्तित्वात आहे.

## १९.४ पुरूषार्थ, आश्रम आणि संस्कार ः

पुरूषार्थ, आश्रम आणि संस्कार ह्या संकल्पना परस्परांशी निगडीत आहेत. पुरूषार्थ हे आयुष्याचे ध्येय असून ते चार आश्रमात किंवा टप्प्यात विभागलेले आहे. प्रत्येक आश्रमासाठी संस्कार सुचविलेले होते आणि ते करणे सक्तीचे होते. आपण वर्णाश्रम धर्म याविषयी ऐकतो. आयुष्याचे चार उद्दिष्टे असतात. धर्म (योग्य वर्तणूक) अर्थ (चरितार्थासाठी मिळकत) काम (व्यावहारिक इच्छा) मोक्ष (मुक्ती) ही उद्दिष्टे प्राप्त करता यावी यासाठी माणसाचे आयुष्य चार विभागात विभागलेले आहे. प्रत्येक आश्रमात कसे वागावे यासंबंधी नियम सांगितलेले आहेत. चार आश्रम हे शिडीच्या चार पायऱ्या आहेत.

पहिला आश्रम हा ब्रह्मचर्य नावाने ओळखले जातो. व्यक्तिची मुंज झाल्यावर या आश्रमात प्रवेश होतो. ह्या आश्रमाच्या काळात व्यक्ति शिक्षण घेते आणि स्वतःच्या इच्छा भावना यांना शिस्त लावण्यास शिकते.

त्याला या काळात गुरूंबरोबर जंगलात त्यांच्या आश्रमात रहावे लागते आणि त्यांची सेवा करावी लागते. तो गुरू आणि स्वतःसाठी भिक्षा मागतो, पाणी काढणे आणि आश्रम परिसर स्वच्छ करणे ही आडवळणाची कामे ही करत असे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या वचनाची तो सवय करत असे. राजाचा मुलगा असेल तरीही त्याला हे सर्व करावेच लागे. ब्रह्मचर्य आश्रमात गृहस्थाश्रमाची जबावदारी घेण्याची तयारी करून घेतली जाते.

गृहस्थाश्रम ही माणसाच्या आयुष्यातील महत्वाची अवस्था आहे. ह्या अवस्थेमध्ये तो धर्मानुसार अर्थ आणि काम मिळविण्याचा प्रयत्न करतो. ह्या काळात तो लग्न करतो. त्याला मुले होतात, स्वतः आणि कुटुंबासाठी उत्पन्न मिळवितो आणि समाजाबद्दलची बांधीलकी पूर्ण करतो.

गृहस्थाश्रमीची कर्तव्य पार पडल्यानंतर तो वानप्रस्थ आश्रमामध्ये प्रवेश करतो. या अवस्थेत तो कुटुंबाचा त्याग करतो. निवृत्त होतो आणि जंगलात जातो. जेथे तो ऐहिक वस्तुंपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो. ह्या काळात त्याला फक्त फळे आणि कंदमुळे खायची असतात आणि हरणाच्या कातडयाचे किंवा झाडाच्या सालींचे कपडे वापरावयाचे असतात. तो ध्यान धारणा करण्याचा सराव करतो. तसेच विरक्तीचे जीवन जगतो. जर त्याला या काळात मृत्यु आला तर त्याचा मोक्ष मिळतो. नाहीतर तो संन्यासाश्रमात प्रवेश करतो जेथे तो पूर्णपणे विरक्त असतो. समाजाशी असलेले सर्वबंध सोडून तो मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करत असतो.

ही पद्धत आदर्श पद्धत आहे. परंतु व्यावहारिक स्थिती नाही. बहुसंख्य माणसे सांगितलेला पहिल्या अवस्थेच्या सांगितलेल्या मार्गांनी पुढे जात नाहीत. अभ्यास कौटुंबिक जीवन आणि मोक्ष हे सर्व एका आयुष्यात साधणे हे अशक्य आहे व ते साधण्याचा प्रयत्न यातून केलेला आहे. अशीही शक्यता आहे की बुद्ध आणि जैन धर्मासारखी अकर्मठ (आधुनिक) विचारसरणीन माणसे कौटुंबिक जीवन पूर्णपणे सोडण्याचे सांगितले म्हणून त्याला विरोध म्हणून हे आश्रम सांगितले गेले असतील. सनातनी कर्मठ पंथांनी अकर्मठ पंथांना मान्यता दिली नाही. परंतु नंतर तशी तरतूद या पंथानी केली.

ह्या पद्धतीप्रमाणे जीवनाच्या चारी अवस्था जन्मपासून सुरू होत नाहीत तर मुंजीपासून सुरू होतात. मुलगा (बालक) हा मुंज हा धार्मिक विधी झाल्यावरच समाजाचा एक पूर्ण घटक बनत असे. हा एक महत्वाचा समारंभ किंवा संस्कार आहे. गर्भ अवस्थेपासून मृत्युपर्यंत अनेक संस्कार सांगितले आहेत. अशा प्रकारचे जवळजवळ चाळीस संस्कार आहेत. त्यापैकी काही महत्वाचे संस्कार म्हणजे गर्भदान, पुंसवन (मुलगा होण्यासाठी) , सिमान्तोन्नयन, जातकर्म (जन्म), निषक्रमण (सूर्य दर्शन), अन्न प्रदान, चुडाकर्म (जावळ काढणे), उपनयन (मुंज) , समा वर्तन (गुरूच्या आश्रमातून परत येणे), विवाह, अंत्येष्टी इत्यादी. हे सर्व संस्कार वरच्या तीन वर्गासाठी आहेत. शुद्रांसाठी किंवा अस्पृश्यांसाठी नाहीत. अर्थात वरच्या वर्णातील स्त्रियांनाही यापैकी काही संस्कार करता येत नव्हते.

## १९.५ जाजमानी पद्धत ः (बलुतेदारी पद्धत )

मध्ययुगीन काळात सुरू झालेली आणि भारताच्या ग्रामीण भागात अजूनही चालू असलेली पद्धत म्हणजे जाजमानी पद्धती. ही पद्धती म्हणजे प्रभावी जमिन मालक जात, सेवा आणि कारागिरी जाती यांच्यामधील परस्पर पुरक अशी अंत संबंध पद्धत होती. ह्या पद्धतीत सेवा करणारी जात जमीन मालकांना आणि वरच्या वर्गांना सेवा देत असे आणि ह्याबद्दल त्यांना मोबदला परंपरेने ठरविलेल्या वस्तुच्या स्वरूपात किंवा जमीनीच्या स्वरूपात दिली जाई. चांभार, न्हावी, गुरव, माळी, नांगरट करणारे, सोनार, कुंभार, लोहार व विविध कारागीर हे वरच्या जातींसाठी काम करत असत आणि त्यांना ठराविक प्रसंगी वस्तुरूपात मोबदला मिळत असे. कधी कधी तो जमिनीच्या स्वरूपात मिळे. परंतु ह्या पद्धतीत ही सेवा पुरवणाऱ्या जाती त्यांच्या सेवा व माल विकताना नेहमीच त्यांचे स्वातंत्र्य अबधित ठेवण्याचा प्रयत्न करत. पैशाचा वापर, शहरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे ही पद्धत मागे पडत चालली आहे. मध्ययुगीन काळात ह्याच पद्धतीने लोकांना संकट आणि निराशेच्या काळात आधार दिलेला आहे. जे कारागिर या जाजमानी पद्धतीत समाविष्ट झालेले नव्हते त्यांना दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील गरीब लोकांपेक्षा जास्त तडाखा बसल्याचा उल्लेख आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १९.२

**रिकाम्या जागा भरा.**

१. ............ ह्याला पाचवा वर्ण (पंचम) म्हणत असत.

२. महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निवारण्याची मोहीम सुरू केली. आणि त्यांना ............ म्हणायला सुरवात केली.

टिपा

३. ........... यांना भारतात गुलाम आढळले नाहीत.

४. माणूस जन्माने स्वतःला विकून युद्धात जिंकल्यामुळे किंवा कायदेशीर शिक्षा म्हणून गुलाम बनतो. हे उद्‌गार .......... यांचे आहेत.

५. पुरूषार्थाची विभागणी .......... अवस्थांमध्ये केलेली आहे.

६. जाजमानी पद्धत नाहीशी होण्याची कारणे कोणती ?

उत्तर

## १९.६ कुटुंब ः

प्राचीन काळात भारतात नातेसंबंधांनी एकत्र असलेला समुदाय तयार होत असे. त्याला संयुक्त कुटूंब असे म्हणत असत. दोन किंवा जास्त पिढया एकाच छताखाली रहात असतील किंवा एका समाईक स्वयंपाकघराचा सर्वजण वापर करत असतील तर त्याला एकत्र कुटुंब म्हणतात. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता असे हे कुटुंब सामान्यपणे पितृसत्ताक व पितृवंशी पद्धतीचेच असे. वडील किंवा कुटुंबातील सर्वात वयस्कर व्यक्ति कुटुंबप्रमुख असे आणि कुटुंब प्रमुखपद घरातील फक्त पुरूष व्यक्तिकडेच वारताने येत असे. आधुनिक काळात केंद्रीय कुटुंबे आढळतात. ज्यामध्ये आई, वडिल आणि मुले यांचाच समावेश असतो. ही कुटुंबे ही पितृसत्ताकच व पितृवंशी असतात. परंतु केरळ आणि ईशान्येकडील मेघालय, नागालँड येथे मातृसत्ताक व मातृवंशी पद्धती असणारी कुटुंबे ही आहेत. तेथे कुटुंब प्रमुख स्त्री असते. कुटुंब प्रमुखपद आपोआपच स्त्रिकडे चालत येते.

कुटुंबाचे स्वरूप कसेही असले तरी तो समाजाचा प्राथमिक घटक असतो. कुटुंबातील सर्व व्यक्ति एकत्र श्राद्ध घालत असतात. श्राद्ध म्हणजे आपल्या पुर्वजांचे स्मरण करण्याचा विधी असतो. श्राद्धाच्या आधारावर कुटुंबाचे वर्गीकरण होत असे. श्राद्ध कार्यक्रमात ज्यांना सहभाग घेता येतो त्यांना सपिंडक असे म्हटले जाते. म्हणजेच ते त्या कुटुंबाचे सदस्य म्हणून ओळखले जात. या एकत्र राहण्यामुळे कुटुंबातील व्यक्तींना सामाजिक सुरक्षा मिळत असे. संकटकाळात व्यक्तीला कुटुंबातील इतर व्यक्तींवर अवलंबून राहता येत असे. सण समारंभ किंवा लग्न कार्यातून हे बंध अधिक पक्के होत असत आणि जवाबदाऱ्यांचे वाटप केले जात असे.

भारतातील कुटुंबे साधारणपणे धार्मिक नीति नियम आणि रूढी यांच्या आधारेच चालविली जात असत. ही कुटुंबे दयाभग किंवा भिताक्षर या स्मृतीवर (धार्मिक श्रद्धेवर) आधारलेली असत. बंगाल आणि आसाममधील बहुसंख्य कुटुंब ह्या भगाचे नियम पाळतात तर इतर ठिकाणची भारतीय कुटुंबे भिताक्षर वर आधारलेली आहेत. जी कुटुंबे फार मोठी आहेत किंवा टिकवून ठेवणे कठिण आहेत. त्यांचे लहान भाग करण्यासाठी धार्मिक तरतूद केलेली असे. कुटुंब प्रमुखाच्या मृत्यनंतर अशी वाटणी होत असे. कुटुंबाच्या सामाईक मालकीच्या मालमत्तेमध्ये व्यक्तिगत मालमत्तेचा समावेश सर्वात अलिकडे म्हणजे मध्ययुगीन काळापासून केला जात नसे त्यामुळे अशा वैयक्तिक संपत्तीची वाटणी केली जात नसे. स्वातंत्र्यानंतर घटनेतील तरतूदीप्रमाणे प्रत्येक धार्मिक समूहाने लग्न, घटस्फोट, वारस, दत्तकविधान, पालकत्व मुलांचा ताबा आणि देखभाल या बाबतीत आपआपल्या धर्मात





सांगितलेल्या नियमांप्रमाणे वागावे असे नमूद केलेले आहे. त्यामुळे हिंदू, बौद्ध, शीख आणि जैन धर्मिय लोकांसाठी १९५५-५६चा कायदा ग्राह्य धरण्यात आलेला आहे. मुस्लीम, ख्रिश्चन आणि पारशी धर्मियांना स्वतःचे त्यांच्या धर्मावर आधारित वेगळे कायदे आहेत.

## १९.७ विवाह :

लग्न ह्या महात्वाच्या संस्कारांचा परिणाम म्हणजे कुटुंबाची निर्मिती होय. लग्नाच्या स्वरूपावरून त्याचे वेगवेगळे प्रकार पाडले जातात. लग्नाचे विविध प्रकार असतात वरच्या वर्णातील पुरूष आणि खालच्या वर्गातील स्त्री, पुरूष केंद्रित वरचा वर्णातील (अनुलोम) खालच्या वर्णातील पुरूष आणि उच्च वर्णातील स्त्री, (प्रतिलोम) किंवा वेगवेगळया वर्णाच्या संकरातून तयार आलेल्या वर्णातील स्त्री, पुरूष असे अनेक प्रकार असतात, एक पत्नी किंवा बहुपत्नी व बहुपती हे वर्गीकरण किती जोडीदार आहेत ह्या संख्येवर अवलंबून आधारित असते. ह्या सगळया प्रकारच्या लग्नाची उदाहरणे भारतीय समाजात आढळतात. पारंपारिक भाषेत सांगायचे म्हणजे लग्ने ही आई वडिलांनी ठरविलेली असतात. ज्या व्यक्ती एकाच जातीच्या आहेत. परंतु त्यांची गोत्र आणि त्याचे प्रवर वेगळे आहेत. त्यांच्या मध्ये लग्नाचे व्यवहार होतात. जर ते अद्विज म्हणजे खालच्या जातीतील असतील तर त्यांना गोत्र आणि प्रवर नसतात. तरी ही बहुसंख्य समाजातील व्यक्तींना गोत्र मिळालेले असते. प्रवर म्हणजे प्रतिबंधाचे प्रमाण ठरविणारे नियम ते काटेकोरपणे पाळले जात असत. वडिलांकडून सात पिढयांपर्यंत एक पूर्वज आणि आईकडून पाच पिढयांपर्यंत एक पुर्वज असेल तर लग्न केली जात नसत. दक्षिण भारतात मात्र हे नियम अमलात आलेले आढळत नाहीत. त्यांच्याकडे मावस, मामे, भावंडाची लग्ने होतात. ज्याला कायदेशीर व समाजाची ही मान्यता असते. सन १९५३ च्या हिंदू विवाह कायद्यानुसार या समुदायांना सवलत देण्यात आलेली आहे.

सामान्यपणे एक पत्नीत्वाची पद्धत रूढ होती. एक पुरूषाने एकाच स्त्रीशी लग्न करण्याची पद्धत होती. परंतु बहुपत्नीत्वावर काही निर्बंध नव्हते. श्रीमंत आणि श्रेष्ठ व्यक्तिंना एकापेक्षा जास्त वायका असत. बहुपत्नीकत्वाची पद्धत अनेक कारणांसाठी अस्तित्वात आली. राजे लोकांना इतर श्रेष्ठ (सामर्थ्यवान) व्यक्तिंशी सोयरिक करण्याची गरज वाटत असे. त्यासाठी ही विवाह पद्धती सोयीस्कर होती. चंद्रगुप्त आणि अकबर यांचे विवाह या स्वरूपाचे होते. आपल्यानंतर वारसा म्हणून मुलगा हवाच या श्रद्धेतूनही अनेक पत्नी केल्या जात असत. सध्याच्या कायद्यानुसार बहुपत्नीकत्वावर बंदी घातलेली आहे. फक्त मुस्लीम व्यक्ती चार वेळा लग्न करू शकते व त्यालाही काही पूर्व अटी आहेत. ब्राह्मणी पवित्र मानल्या गेलेल्या कायद्यानुसार सप्तपदी झाल्यानंतर विवाह हे अतूट बंधन मानले गेले आहे. याचा अर्थ यामध्ये घटस्फोटाला अजिबात थारा नाही. अर्थ शास्त्राने काही प्रसंगात मात्र घटस्फोटाला परवानगी दिली आहे. नंतरच्या काळात ह्या तरतुदी विसरल्या गेल्या. आधुनिक काळात, दोन्ही बाजुकडची संमती, दुर्बलता, परित्यक्त व हिंसाही घटस्फोटासाठी कायदेशीर कारणे मानली गेली आहेत.

आपण सर्वांनाच माहित आहे की द्रोपदीचे पांच भाऊ असणाऱ्या पांडवांशी लग्न झालेले होते. ह्या प्रकारच्या लग्नाला बहुपतीत्व लग्न म्हणतात. असे अजुनही काही समाज आहेत ज्यांच्यामध्ये या प्रकारचे विवाह योग्य समजले जातात आणि त्यांना विशेष पसंती आहे. अशा समाजातून स्त्री सहसा एकाच कुटुंबातील भावांशी विवाह करते असे विवाह हे समाज विरोधी कृत्य असल्याचे मैदानी

प्रदेशात राहत असणाऱ्या वरच्या वर्णाकडून समजले जाते. परंतु ज्या समाजात एकापेक्षा जास्त पुरूषांशी विधिवत लग्न केले जाते तेथे ती गोष्ट लाजीरवाणी न मानता अभिमानाची मानली जाते.

## १९.८ स्त्रिया ः

भारतातील स्त्रियांचा इतिहास हा सातत्याने अधोगतीकडे जाणारा आहे. वैदिक काळात अगदी पितृसत्ताक पद्धत असली तरी टोळी युद्धात स्त्रिचाही सहभाग होत असल्याची उदाहरणे आहेत. त्या ऋचा रचत असत आणि त्यांना समजत्या वयात स्वतःच्या आवडीने पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. वैदिक काळानंतर जमातीचे महत्व कमी झाले तशी त्यांची पिछेहाट सुरू झाली. पूर्वीच्या कायद्याने स्मृती ग्रंथांनी तर स्त्रियांना शुद्रासारखा दर्जा दिलेला होता. स्त्रीधन म्हणून असलेल्या संपत्तीशिवाय त्यांच्याकडे वैयक्तिक संपत्ती नसे. वेदांचा अभ्यास करण्याचीही त्यांना परवानगी नव्हती. यावेळी काही अकर्मठ धर्माच्या सुधारकांनी मात्र स्त्रियांना दर्जा दिलेला होता. मध्ययुगीन काळातील सुरूवातीच्या तांत्रिक पंथांनी स्त्रियांना पंथात सहभाग करून घेतले व स्त्री संन्यासिनींचा वेगळा पंथ निर्माण केला.

सामान्यपणे ऐतिहासिक आणि मध्ययुगीन काळात स्त्रियांना कोणत्याही बौद्धिक कार्यात सहभागी करून घेतले जात नसे. त्यांचे खरेखुरे काम म्हणजे लग्न करणे आणि मुलांची आणि कुटुंबाची काळजी घेणे हे होते. वरच्या जातीतील काही स्त्रियांना शिक्षण मिळालेले होते. संस्कृत नाटकांमधून प्रमुख स्त्रीपात्रे स्त्रियांना सामान्यपणे वाचणे लिखाण करणे पद्य रचना करणे अशा स्वरूपाच्या कामात असल्याची वर्णने आली आहेत. मध्ययुगीन काळापासून अगदी अलिकडच्या काळापर्यंत गायन आणि नृत्य या कला वरच्या समाजातील स्त्रियांसाठी निषिद्ध मानलेल्या होत्या. फक्त खालच्या वर्गातील स्त्रिया किंवा नायकिणीच फक्त ह्या कला शिकत होत्या. परंतु अगदी सुरूवातीच्या काळात अशी स्थिती नव्हती. ऋग्वेद काळ वगळता स्त्रियांना समाजात दर्जा दिला गेलेला असे. लहान वयात लग्न करण्याची पद्धत सर्वत्र रूढ होती. सतीची चालही अस्तित्वात होती. मुलगा नसलेल्या विधवा स्त्रीला जायला लावण्यामागे तिची संपत्ती गिळंकृत करण्याचा इतर कुटुंबियांचा उद्देश असे. इब्न बतुता या परदेशी प्रवाशाने सती जाण्यापूर्वी राजाची परवानगी घ्यावी लागत असे वर्णन केले आहे. विधवा स्त्रीला पुनः लग्न करण्याचा हक्क नव्हता. परंतु तिला काही वेळा संपत्तीमध्ये हिस्सा मिळत असे.

मध्ययुगीन काळात वरच्या वर्गातील स्त्रियांनी पडदा (आपला चेहरा वस्त्राने झाकून) घेण्याची पद्धत होती. अरब आणि तुर्क लोकांनी ही पद्धत इराणमधून भारतात आणली. त्यामुळे उत्तरभारतात ही पद्धत सर्वत्र रूढ झाली. हिंदू स्त्रियांमध्ये पळविले जाण्याच्या भितीमुळे ही पद्धत अस्तित्वात आली. वैदिक काळात स्त्रियांची काळजी घेतल्याने पुरावे मिळाले आहेत. यावरून वैदिक काळापासून स्त्रियांची काळजी घेण्याची पद्धत अस्तित्वात आली असावी. मध्ययुगीन काळात बुरखा किंवा परदा घेण्याची पद्धत हे सामाजिक दर्जाचे लक्षण मानले जाऊ लागले. त्यामुळे ज्या समाज घटकांना (स्त्रियांना) आपण श्रेष्ठ आहोत हे दाखवायचे असे त्या समाज घटकांतील स्त्रियांतही बुरखा घेण्याची पद्धत सुरू झाली. खालच्या वर्गातील स्त्रियांमध्ये ही पद्धत रूढ नव्हती.

मोगल सत्ता जाऊन इंग्रजांचा प्रभाव भारतात पसरल्यानंतर आधुनिक नविन कल्पना रूढ होऊ लागल्या. त्यांचा प्रसार वाढत त्या प्रक्रियेला विविध मार्गांनी गती मिळाली. आधुनिक शिक्षणाच्या प्रभावाने सामाजिक सुधारणांची चळवळ सुरू होऊन स्त्रियांची स्थिती सुधारण्यासारखी परिस्थिती

निर्माण झाली. त्यासाठी कायदे केले जाऊ लागले. राजाराम मोहन राय, राधाकांत देव, भवानी चरण बॅनर्जी यांच्या प्रयत्नांमुळे सती जाण्याच्या प्रथेवर १८२९ मध्य बंदी घालण्यात आली. सन १८९५ मध्ये स्त्री अर्भकाला ठार मारणे हा वध समजला जाऊ लागला. स्वतंत्र भारतात सन १९५५च्या हिंदू विवाह कायद्यानुसार मुलाच्या लग्नाला वयाची मर्यादा अठरा वर्षे आणि मुलींच्या वयाची मर्यादा पंधरा वर्ष इतकी केली गेली. सन १८६0 मध्ये पंडित विष्णुशास्त्री यांनी विधवा पुर्नविवाह संघटना स्थापन केली. या सगळयांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांचा दर्जा बऱ्यापैकी उंचावण्यास मदत झाली. अलीकडेच उच्चतम न्यायालयाने वडिलांच्या संपत्तीत मुलीचा हिस्सा मान्य केलेला आहे. कायदे आणि समाजातील जागरूकता यामुळे दिवस दिवस स्त्रियांचा दर्जा उंचावला जाणार आहे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १९.३

१. अनुलोम आणि प्रतिलोम विवाहाचा आधार काय असतो ?

उत्तर ______________________________

२. एक पत्नी विवाह म्हणजे काय ?

उत्तर ______________________________

३. भारतातील प्राचीन कुटुंब संस्थेचे नियंत्रण करणारी प्रथा आणि धार्मिक कायदा (स्मृती ग्रंथ) यांची दोन नावे सांगा.

उत्तर ______________________________

४. अन्य कोणत्याही संपत्ती साठविण्याचा हक्काशिवाय स्त्रीयांना स्वतःची संपत्तीचा धारण करण्याचा हक्क होता त्याला काय म्हणतात ?

उत्तर ______________________________

## १९.९ भारतातील आदिवासी जमाती ः

आदिवासी ही एक नवीन संज्ञा आहे ही संज्ञा अगदी जुन्या काळापासून खंडप्राय देशामध्ये राहणाऱ्या लोकांसाठी वापरण्यात येते. साधारणपणे आदिवासी जमातीची काही वैशिष्ट्ये ः

१. आदिवासी यांची मुळे पुरातन काळात आहेत.

२. ते डोंगरात व जंगलात स्वतंत्रपणे राहतात.

३. त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

४. त्यांची जीवन शैली (भाषा, रिती-रिवाज) समाजातील इतरांपेक्षा वेगळया असतात.

आदिवासी हे मूळ लोक असतात. त्यांना चवथे जग म्हणून संबोधले जाते. हे लोक मूळ प्राचीन काळातील लोकांचे वंशज मानले जातात. त्यांना आजही पूर्णपणे किंवा काही थोडया अधिकारांपासून वंचित ठेवले जाते. हे लोक त्यांची सभ्यता, धर्म, अर्थविषयक व संस्कारामुळे वेगळे जाणवतात. त्यांचे अजूनही बाहेरच्या जगात शोषण केले जाते. त्यांना आजूनही काही लोक पवित्र संस्कार यांचे आदर्श मूर्त स्वरूप मानतात. तर काही त्यांना आर्थिक प्रगतीतील अडथळा मानतात. हे आदिवासी आपल्या वेगळया चालीरिती सांभाळतात. ते वसाहतवादाचे शिकार आहेत. कांही आदिवासी त्यांच्या रितीनुसार जगतात. तर काही कल्याणकारी योजनेवर जगतात. काही कारखान्यांत काम करतात तर काही इतर व्यवसाय करतात. आदीवासींचे आपल्या मातीशी व जमातीशी खूप जवळचे नाते असते. ते देवाण घेवाण व सहकार्याने जगतात. ते भूमातेचा आदर करतात व जीवनाला आधार देतात.

भारतात या जमातींना आदिवासी म्हणतात. म्हणजे हे लोक पूर्वीपासून समाजापासून अलिप्त राहतात. प्राचीन व मध्ययुगीन भारतीय साहित्यामध्ये आदिवासींच्या भारतात राहणाऱ्या खूप जातीची नावे नमुद केली आहेत. जाती व्यवस्थेची ओळख होण्याअगोदर लोकांचे या जमातींमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते.

भारत सरकार ने ४२७ जमातींना आदिवासींच्या यादीत समाविष्ठ केले आहे. ह्या जमातींना वर्गीकृत जमाती म्हणतात. भारतीय संविधाना प्रमाणे यांना विशेष सुरक्षा व विशेष हक्क दिले जातात.

प्रमुख तीन जमाती – गोंड, भिल्ल आणि संथाल आहेत. व त्यांची लोकसंख्या प्रत्येकी तीस लाख आहे. त्यांच्यानंतर मिना, मुंडा व ओरगॉन आहेत. यांची प्रत्येकी लोकसंख्या पाच लाख पेक्षा जास्त आहे. त्यानंतर ४२ जमाती आहेत, त्यांची प्रत्येकी लोकसंख्या १ ते ५ लाख पर्यंत आहे.

भारतातील जमाती, अनुसुचित जमाती या संवर्गात येतात व त्यांना भारतीय संविधानाप्रमाणे विशेष हक्क व सुरक्षा दिली जाते. २००१ च्या जनगनने प्रमाणे यांची लोकसंख्या ८.४३ कोटी आहे, ती भारतातील लोकसंख्येच्या ८.२% इतकी आहे. जमातीच्या एकूण भारतातील विभागणी नुसार, ती भारताच्या सात भागामध्ये विभागली जाते.

### १. उत्तर क्षेत्र ः

हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश व बिहार यामधील मुख्य जमाती खासा, थारू, भोकसा, भोटीया, गुजार आणि जाऊनसारी आहेत. खासा ही बहुपत्नित्व जमात आहे. भोटीया हे गालीचा बनवतात भारत चीन सीमावर व्यवसाय करतात. गुज्जर हे शेतकी जमातीचे. मुख्य प्रश्न गरिबी, संपर्काचा अभाव, असुरक्षितता व जमीनची वाटप व्यवस्था असा आहे.

### २. उत्तर-पूर्व क्षेत्र ः

ह्यामध्ये सात उत्तर-पूर्व राज्ये येतात. यातील मुख्य अदिवासी संघ नागा, खासी, गारो, मिसिंग, मिरी, खारबी आणि अपाताऊस आहेत. स्थलांतरीत शेती मूळे झालेले सभोवतालची परिस्थितीचे झालेले नुकसान व दळणवळण साधनाच्या अभाव हे प्रमुख प्रश्न आहेत. खूप मोठया प्रमाणात एकाकीपणा आल्यामुळे हे कोणत्याही भारतीय इतिहासाच्या प्रवाहात सामील होत नाहीत व त्यांचा

इतिहास शेजारच्या देशाच्या इतिहासाना मिळता जुळता आहे. त्यामुळे या जमातींमध्ये आपल्याविषयी शत्रुत्वाची भावना आढळते.

### ३. मध्य भारतीय क्षेत्र ः

या क्षेत्रात सर्वात जास्त आदिवासी संख्या आहे. हा भाग मध्य प्रदेश ते दक्षिण बिहार व उत्तर ओरिसाच्या पलिकडे येतो. यातील मुख्य जमाती संथाल, एच ओ बॅगा, अभुजानारिया, मुरिया, मुंडा, बिहोर या आहेत. या कटिबंधातील जमातीचे प्रमुख प्रश्न आहेत. एकाकीपणा व कर्ज. सांथालांना आपली एक वेगळी लिपी निर्माण केली आहे. त्याचे नाव ओले चिक्वी आहे. बंगा प्रामुख्याने स्थलांतरीत शेती करतात. बिरहोर ही अत्यंत मागासलेली जमात आहे. त्यांचा दैनंदिन जीवनात आवश्यक व स्थिर गोष्टी नाहीत म्हणून या जमाती नष्ट होण्याचा धोका संभवतो.

### ४. दक्षिण क्षेत्र ः

या क्षेत्रात निलगिरी व त्याला लागूनचे आंध्र क्षेत्र व कर्नाटकातील डोंगराळ प्रदेश येतात. हा सर्वात छोटा व मागासलेला विभाग आहे. या विभागातील जमाती तोडा, कोया, चिनचु आणि आलार आहेत. तोडा जमाती म्हशी पाळतात. आलर हे झाडावरती राहतात. चिनचु हे शिकार करतात.

या जमातीचे प्रमुख प्रश्न स्थलांतरीत शेती, अर्थिक मागासलेपणा, एकाकीपणा, दळणवळण साधनांचा अभाव व भाषा नष्ट होण्याची भीती असे आहेत.

### ५. पूर्व क्षेत्र ः

या क्षेत्रात पश्चिम बंगाल, ओरिसा येतात. व यांतील जमाती पाराजा, कोळस, भोंडा, भूमिया, वडबा, भिउनिया आणि स्कोरा. या जमातीचे प्रमुख प्रश्न आर्थिक मागासलेपणा, वन अधिकाऱ्यांकडून शोषण, जमीनीवरील परकेपणाची भावना, रोगराई व कारखान्यामुळे झालेले स्थलांतर.

### ६. पश्चिम क्षेत्र ः

या क्षेत्रात राजस्थान व गुजरात येतात यातील जमाती भिल्ल, घरशिया आणि मीना. मीना जमात आधुनिक व शिक्षित आहे.

### ७. बेटाचा प्रदेश ः

या क्षेत्रात अंदमान आणि निकोबार, लक्ष्यद्विप, दमण आणि दीव येतात. ग्रेट अंदमानीसी सानतीनेलीसी, जारवा, ओनजी, निकोबार, शामपेन. या बेटातील जमाती आहे. या बेटातील काही जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. व त्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातील कांही छोटया जमाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या प्रदेशातील प्रमुख प्रश्न जिवंत राहणे, रोगराई, कुपोषित अन्न.

शासनाच्या प्रमुख नियोजनामध्ये आदिवासींना सुरक्षा देणे व त्यांनी आर्थिक उन्नती करणे याचा समावेश आहे. जमातीच्या रक्षणाबद्दल पाचव्या पंचवार्षिक योजनेत विचार करण्यात आला होता. याचे उदिष्टे आदिवासींचे शोषण थांबविणे, सामाजिक व आर्थिक विकास, त्यांच्यातील व इतरातील भेद कमी करणे, जीवन स्तर उंचावणे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न १९.४

१. जमातीय लोकसंख्येची दोन वैशिष्टे सांगा.

उत्तर

२. मूळ लोक कोण ?

उत्तर

३. भारतात जमातिंसाठी वापरात असलेली संज्ञा कोणती ?

उत्तर

४. भारतामध्ये किती समुदयांना अनुसुचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे?

उत्तर

५. भारतात जमातीय लोकसंख्येची टक्केवारी किती ?

उत्तर

६. भारतात जमातीय लोकसंख्येचे निकष कोणते ?

उत्तर

७. अनुसुचित जमातींच्या ओळखीचे दोन मापदंड सांगा ?

उत्तर

८. उत्तर भारतातील प्रमुख जमाती कोणत्या ?

उत्तर

९. उत्तर क्षेत्रातील अदिवासींच्या प्रमुख समस्या कोणत्या ?

उत्तर

१०. अतिशय कमी लोकसंख्या असलेल्या काही जमातीची नावे द्या.

उत्तर

११. आदिवासी प्रगती उपयोजना नितीची सुरूवात कधी झाली ?

उत्तर

१२. आदिवासींच्या प्रगतीसाठी शासन उपयोजना काय आहे ? व तिची उद्दिष्टे कोणती ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- भारत हा प्रदेश भाषा आणि धर्मावर आधारित अनेक ओळख अनुबंधाचा देश आहे. प्रत्येकाला काही प्रमाणात भिन्न सामाजिक संरचना आहे व अनेक काळापासून त्याचा विकास होत आला आहे.
- जमाती ही स्वतःची ओळख असलेली सामाजिक संस्था वैदिक काळापासून अस्तित्वात आहे.
- व्यक्तिच्या रंगावरून सुरूवातीला वर्गीकरण केले जात असे नंतर त्याचे रूपांतर गुंतागुंतीच्या वर्ण पद्धतीत झाले. वर्ण पद्धत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्यात विभागलेली होती.
- नंतरच्या काळात वैदिक समाजातील जाती संस्थेत खूपच बदल झाले हे बदल सुरूवातीला बौद्ध आणि जैन धर्मियांचे आगमन आणि नंतर आलेल्या शक, कुशाण, पर्शियन आणि इंडो ग्रीक या लोकांमुळे झाले.
- अठराव्या शतकानंतर जाती व्यवस्थेमध्ये खूपच प्रादेशिक बदल झाले. कारण प्रादेशिकता ह्या कल्पनेची जाणीव झाली आणि नंतर ही पद्धत जास्तच जाचक बनत गेली. त्यातून असंख्य जाती आणि उपजाती तयार झाल्या.
- वैदिक काळाच्या शेवटच्या सत्रापासून अस्पृश्यता ही किळसवाणी पद्धत सुरू झाली. बौद्ध काळापर्यंत त्याला स्वतंत्र ओळख होती.
- ग्रीक रोममध्ये आढळणाऱ्या गुलामगिरीपेक्षा वेगळी गुलामगिरी भारतात आढळत होती.
- पुरूषार्थ आश्रम आणि संस्कार परस्परांवर अवलंबून असणाऱ्या संकल्पना आहेत.
- जमीन मालक आणि कारागीरांचा सेवक वर्ग यांच्यात परस्परपूरक संबंध असणारी जाजमानी अशी व्यवस्था होती जी पद्धत अगदी अलीकडेही चालू होती. परंतु नंतर पैशाचा वाढता

प्रभार्व, शहरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे या व्यवस्थेचा ऱ्हास होत आहे.

- लग्न ह्या संस्काराचा परिमाण म्हणजे कुटुंबाची निर्मिती. अनुलोम प्रतिलोम असे लग्नाचे प्रकार असतात. जे वेगवेगळया वर्णाच्या एकत्रीकरणावर आधारलेले आहेत. एकपत्नी किंवा बहुपतीची पद्धत ही जोडीदाराच्या संख्येवर आधारलेली असे. जी अजूनही अस्तित्वात आहे.
- पारंपारिक भारतीय संयुक्त कुटुंब असे व ते स्मृती (कायदा ग्रंथ) यांच्या आधारे चालविले जात असे. ह्या स्मृति संख्येने दोन होत्या व त्यांची नावे 'मिताक्षरा' व 'दयाभाग' अशी होती.
- स्त्रीयांच्या दर्जाचा इतिहास पाहिला तर अगदी अलिकडील आधुनिक काळापर्यंतचीच परिस्थिती निराशाजनक होती. पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार सामाजिक सुधारणा धार्मिक सुधारणा यामुळे आता त्यात बदल झालेला आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. भारतात आढळणाऱ्या विविध संस्थाचा उगम स्पष्ट करा.

२. वर्ण व्यवस्था आणि जाती संस्था यातील फरक स्पष्ट करा.

३. भारतातील जाती व्यवस्थेची वैशिष्टे सांगा.

४. पुरूषार्थ, आश्रम आणि संस्कार एकमेकांशी कसे संबंधीत आहेत ते स्पष्ट करा.

५. भारतात अस्तित्वात असणाऱ्या विवाहाच्या विविध प्रकारांची माहिती लिहा.

६. भारतीय समाजाच्या इतिहासातील स्त्रियांच्या भूमिकेचे वर्णन करा.

७. जाजमानी पद्धत म्हणजे काय ? अलीकडील काळात तिचा ऱ्हास का होत आहे ?

## प्रश्नांची उत्तरे

### १९.१

१. जमाती

२. भारत, यदु, पुरू इ. कोणतेही दोन.

३. द्विज जन्म

४. शक, कुशाण, पर्शिया, इंडो ग्रीक इत्यादी.

५. मध्ययुगीन काळ.





**१९.२**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अस्पृश्यता | २. | हरीजन |
| ३. | मेगॅस्थेनीस | ४. | अर्थशास्त्र |
| ५. | आश्रम | ६. | शहरीकरण आणि औद्योगिकरण. |

**१९.३**

१. वेगवेगळया वर्णाच्या जातीच्या संबंधावर आधारलेले.

२. एक व्यक्ती दुसऱ्या एकाच व्यक्तिशी लग्न करते हा विवाह प्रकार.

३. मिताक्षर आणि दयाभाग

४. स्त्रीधन

**१९.४**

१. अ. जमातीचे मुळ पुरातन काळात आहे.

   ब. ते पर्वतात व जंगलत स्वतंत्रपणे राहतात.

२. जमाती

३. आदिवासी

४. ४२७ जमाती

५. ८.२ %

६. प्रामुख्याने जे पर्वतात व जंगलात राहतात त्या आदिवासीचे जीवनमान उंचावणे हे राज्यकर्ते व प्रशासन ठरवतात.

७. अलिप्त आणि मागास असणे.

८. खासा, तारू, भोकसा, भोतिंस, गुज्जार, जाऊँनसरी.

९. आर्थिक मागास असणे, वन अधिकारी, ठेकेदारांकडून शोषण करणे, जमीन न मिळणे, रोगराई कारखान्यांमुळे स्थलांतर.

१०. जेष्ठ अंदमानसी, जास्वास, निकोबार आणि शॉमपूर

११. चालू पाचवी पंचवार्षिक योजना.

१२. आदिवाशीचे शोषण थांबविणे, सामाजिक व आर्थिक विकास, त्यांच्यातील व इतरातील भेद कमी करणे, जीवनस्तर उंचावणे.

# २०

# समकालीन भारतातील सामाजिक सांस्कृतिक समस्या

या आधीच्या पाठात तुम्ही भारतातील समाज रचनेबद्दल शिकलात. तुम्ही जमातीय, ग्रामीण तथा नागरी (शहरी) समाजाबद्दल, जाती आणि वर्गानुवर्ती स्तरीकरणाबद्दल, कुटुंब, विवाह आणि भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान याबद्दल वाचलेत, भारतीय समाज युगानुयुगे उत्क्रांत झालेला आहे आणि त्यांची विविध क्षेत्रात प्रगती झालेली आहे. तुम्ही या आधीच्या पाठात भारतीय समाजातील समाजसुधारणाबद्दलही वाचलेले आहे. तरीही प्रत्येक समाजात सांस्कृतिक समस्या असतात. ज्यांचा निर्देश व निराकरण गरजेचे असते. समकालीन भारतीय समाजात नागरी (जन) सुरक्षा, विशेषतः दुर्बल विभाग, जसे स्त्रिया, बालके आणि ज्येष्ठ नागरीकांची सुरक्षा हा प्रमुख चिंतेचा विषय आहे. प्रस्तुत पाठात आपण तातडीने लक्ष देण्याची गरज असलेल्या प्रधान समाज सांस्कृतिक विषयांचा अभ्यास करणार आहेत जर आपल्याला आपल्या सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करायचे असले तर आज निर्देश करण्याची आवश्यकता असलेल्या काही महत्वाच्या समाज सांस्कृतिक बाबी आहेत. जातीयता, हुंडा, सामुदायिकता, दारू पिणे, नशा (नशीले पदार्थ सेवन), इत्यादी. येथे चर्चीलेले विषय सर्वंकष नाहीत. इतर अनेक बाबींना ढोबळमानाने राष्ट्र व विशेषकरून प्रदेश आणि सांप्रदायिक स्तरावर सामना द्यावा लागत आहे की ज्याबद्दल आपण विचार करणे आवश्यक आहे तुम्ही अशा काही बाबींची यादी करू शकाल ?

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- समकालीन भारतीय समाजातील काही प्रधान बाबी व समस्यांची यादी.
- जाती व्यवस्था, हुंडा, मादक द्रव्य वस्तुचे दुरूपयोग आदी बाबीची चर्चा.
- दुर्बल गट जसे बालके, स्त्रिया आणि ज्येष्ठ नागरीक यांच्याशी संबंधीत बाबींचे परीक्षण.
- गरीबी व बेरोजगारी यासारख्या आर्थिक बाबींची चर्चा.





## २०.१ समकालीन भारतातील समाज सांस्कृतिक जाती व्यवस्था ः

तुम्ही या आधीच्या पाठात शिकल्यानुसार चार जाती आहेत. तुम्हाला त्या आठवतात का ? त्या येथे लिहा.

१. २. ३. ४.

भारतातील जातीव्यवस्थेचे मूळ (उगम) प्राचीन भारतात आहे. ज्याप्रमाणे आश्रम धर्माने व्यक्तीच्या अधिभौतिक जगातील आयुष्याच्या अनुषंगाने नियम व कर्तव्ये घालून दिली आहेत, वर्ण अथवा जातीव्यवस्थेने ज्या विशिष्ट जातीची ती व्यक्ति आहे त्या जाती संदर्भात कर्तव्ये ठरवून दिली आहेत. सुरूवातीला सर्व नागरिक समान सामाजिक दर्जाचे गणले जात आणि आवडेल तो व्यवसाय ते अंगीकारू शकत. इतर व्यवसायाच्या सदस्यांसोबत जेवण अथवा विवाह संबंध याबाबत बंधने नव्हती. परंतु वंशपरंपरेने व्यावसायिक कौशल्य तज्ञता आल्याने व जन्मजात कुशल कारागिरांच्या संपर्कात आल्याने परिस्थिती बदलली आणि जन्मावरून जात ठरू लागली (व्यवसायावरून नाही). अशा तहेने त्याकाळी विकसित झालेली वर्णव्यवस्था ही सामाजिक व आर्थिक विकासाचा परीणाम होती.परंतु कालांतराने ती समाजाच्या उच्च जाती व नीच जाती अशा विभाजनात परीणत झाली की ज्या आपसात मिसळू शकत नव्हत्या. आंतरजातीय भोजन व विवाहावर प्रतिबंध आले. तथाकथित नीच जातीच्या लोकांचे शोषण सुरू झाले व हळूहळू युगांतराने त्यांची अवस्था शोचनीय झाली. ते गरीब ठरले व समाजात समानता मिळण्यास पारखे ठरले. त्यांना गावातील सामान्य / सर्वसाधारण विहीरीतून पाणीसुद्धा काढू दिले जात नसे. किंवा मंदिरात सुद्धा जाता येत नसे किंवा तथाकथित उच्चजातीच्या लोकांच्या जवळ जाता येत नसे. अशा प्रकारे विशिष्ट व्यवसायात प्रवेश हा कुवतीवर /लायकीवर न ठरता जन्मावर आधारीत झाल्याने विविध व्यवसायांची निकोप प्रगती खुंटली.

जाती व्यवस्थेवर आधारीत भेदाची बरेचदा हिंसाचारात परिणिती झाली आहे.आपल्या देशात लोकशाहीची वाटचाल या जातीव्यवस्थेने कठीण झाली आहे. समाज कृत्रिम गटामध्ये विभाजित होतो ज्यामुळे आपल्या जातीच्या उमेदवाराला समर्थन देण्याची प्रवृत्ती वाढते. लोक तो किंवा ती (उमेदवार) लायक उमेदवार आहे किंवा नाही या वस्तुस्थितीकडे विशेष लक्ष देत नाहीत. भारतातील लोकशाहीच्या आरोग्यासाठी हे चांगले नाही. ही व्यवस्था पूर्णपणे नामशेष झाल्याशिवाय आपला देश खरी प्रगती करू शकत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९४७ नंतर अशा बाबींची दखल घेतली आहे आणि त्यांची हाताळणी विधेयकामार्फत (अशा बाबींना अटकाव करणारे कायदे पारीत करून) तद्वतच सामाजिक कृती द्वारे (नागरी समाजास समाविष्ट करून) एन.जी.ओ. (विनसरकारी संघटना) आणि सामाजिक समूह (संस्था) यांच्याद्वारे या उपायांनी परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. परंतु बरेच काही करणे गरजेचे आहे.

तुमच्या संप्रदायाव्यतिरिक्त अन्य संप्रदायातील व्यक्तीच्या घरी जा. त्यांच्या राहणीमान व भोजन सवयीमध्ये तुम्हाला कांही फरक आढळतो कां ? दोन संप्रदायातील फरक व समानतेवर आधारित लघुनिबंध लिहा.

## २०.२ भारतीय संस्कृती व वारसा ःस्त्रियांसंबंधी बाबीः

आपली राज्यघटना स्त्री आणि पुरूष दोघांनाही प्रत्येक क्षेत्रात समान हक्क प्रदान करते. आज स्त्री मतदानाचा हक्क, वारसा हक्क तथा मालमत्तेचा हक्क उपभोगते. राज्यघटना जनतेतील दुर्बल घटकांच्या विषयांची विशेष काळजीने अंमलबजावणी करण्याचे सरकारला निर्देश देते. स्वातंत्र्यापासूनचे स्त्रियांच्याबाबींचे संवर्धन करण्याचे बरेच कायदे पारीत केले गेले आहेत. हे कायदे विवाह, मालमत्तेचा वारसाहक्क, घटस्फोट, हुंडा इ. बाबींशी संबंधीत आहेत. १९७६ मध्ये समान वेतन कायदा पुरूष आणि स्त्री दोघांना ही समान कामासाठी समान मोबदल्याची तरतूद करतो.

अलीकडेच शासनाने कन्या रक्षणासाठी नवीन योजना सुरू केली आहे. या योजनेला 'लाडली' असे समर्पक नाव आहे. ज्यामध्ये बालिकेच्या जन्माच्यावेळीव विशिष्ट रक्कम बाजूला टाकली जाते जी ती बालिका अठरा वर्षांची होताच तिला मिळते. ही रक्कम तिच्या विवाह अथवा शिक्षणासाठी वापरली जाते. त्याचप्रमाणे एक दुसरी योजना जच्चा बच्चा (बाळ-बाळंतिण) योजना ही आहे. या योजनेंतर्गत राज्य सरकार बालकाच्या जन्माचा खर्च तथा बालकांच्या पालनपोषणासाठी लागणाऱ्या वैद्यकिय सहाय्याशी संबंधीत खर्च याबावत तरतूद करते.

या तरतूदी असूनही स्त्रियांवरील भेदाभेदाचे प्रकार आपल्याला आढळून येतात.

### २०.२.१ लिंग भेदाभेद ः

भारतात स्त्रियाबाबत आरोग्य, शिक्षण व नोकऱ्या अशा विविध क्षेत्रात भेदाभेद केला जातो. मुलीच्या डोक्यावर हुंडयाची जबाबदारी लादली असते व लग्नानंतर त्यांना पैतृक घराचा त्याग करावा लागतो. याशिवाय वृद्ध पालक त्यांच्या वृद्धापकाळाच्या सुरक्षा तरतुदीसाठी पुरूष अपत्याला प्राधान्य देतात. बरीच स्त्री अपत्ये केवळ ती मुली आहेत म्हणून गर्भपाताने नष्ट केली जातात. दुर्ल क्षित केली जातात. टाकून दिली जातात. त्यांना अपुरा आहार दिला जातो. राजस्थानमध्ये हे सर्वा धिक घडते. परंतु आता याबाबत बराच फरक झाला आहे. हरीयाणासारख्या कांही राज्यामध्ये जिथे स्त्री बालक गुणोत्तर अतिशय कमी आहे. तेथे शासनाने मुलींच्या शिक्षणाच्या बऱ्याच योजना काढल्या आहेत. स्त्रियांसाठी नोकऱ्यांचे आरक्षण व सहामहिन्यांची मातृत्व रजेची तरतूद याही बऱ्याच इतर तरतूदी पैकी आहेत.

जागतिक बँक प्रपत्र "ए न्यू एजेंडा फॉर विमेन्स हेल्थ अँड न्यूट्रीशन" (स्त्रियांच्या आरोग्य व पोषणासाठी नवीन कार्यक्रम)(वॉशिंग्टन १९९५) च्या आकडेवारीनुसार विकसनशील देशांमध्ये ४५० दशलक्ष पौढ स्त्रियांच्या विकास समस्या त्यांच्या बालपणातील प्रथिन ग्रहणाच्या कमतरतेमुळे आहेत. बऱ्याच समुदायांमध्ये स्त्रिया व बालिकांना कमी अथवा कमी दर्जाचे सुमार अन्न पुरूष व मुले यांच्या तुलनेने दिले जाते.

आजारी असतांना त्यांच्याकडे कमी लक्ष दिले जाते. अथवा जेव्हा आजार अतिशय गंभीर अवस्थेत पोचतो तेव्हा लक्ष दिले जाते. जागतिक पातळीवर स्त्रिया आणि पुरूषांच्या आरोग्य दर्जाच्या आणि त्यांच्या वैद्यकिय सुविधांच्या प्राप्तीच्या फरकाच्या बावत पुरेसा पुरावा आहे.

बहुसंख्य देशामध्ये पुरूषांच्या पेक्षा स्त्रियांच्या साक्षरता दर फार कमी आहे. ६६ देशांमध्ये स्त्री व पुरूष साक्षरता दरातील तफावत १० % पेक्षा जास्त आहे.६ ते ११ या वयोगटांमध्ये जो प्राथमिक



टिपा

शिक्षणाशी निगडीत आहे. २०११ तील जनगणनेनुसार स्त्री आणि पुरूष यांच्या साक्षरता दरात १६.७ % तफावत आहे. म्हणजेच माणसांची साक्षरता ८२.१४% स्त्रियांच्या साक्षरता दराच्या तुलनेत आहे जी केवळ ६५.४६% आहे. जवळ जवळ जगातील २४.५ % (८५ दशलक्ष) मुली शालाबाह्य असलाचा अंदाज आहे. हाच आकडा मुलांच्या बाबतीत १६.४ % (६० दश लक्ष) आहे.

भारतात प्राचीन युगापासून स्त्रियांना मान दिला जात असून ही बहुसंख्य भारतीय कुटुंबांमधे स्त्री वालक हे अतिशय कमी स्वागतार्ह आहे. मुली शिक्षणामध्ये श्रेष्ठत्व दाखवत असूनसुद्धा परंपरा, रितीरिवाज व सामाजिक समारंभ वा प्रथा मधून मुलांना मुलींपेक्षा अधिक महत्व बहाल केले जाते व मुलींना आर्थिक भार म्हणूनच बघितले जाते. समाजाचा हा दृष्टिकेन स्त्री बालकाच्या तिचे अंगभूत क्षमता पूर्णपणे प्राप्त करण्यामध्ये सुद्धा अडथळा ठरतो. अलीकडच्या स्त्री बालकावरील एका अहवालामध्ये पुढील निरीक्षणे आली आहेत. "मुली या जगातील सर्वात व्यर्थ घालवलेली देणगी आहेत. त्या प्रचंड क्षमता प्राप्त मौल्यवान मानव आहेत. परंतु जगभर सामान्यपणे त्या त्यांच्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेने शेवटच्या तर मूलभूत अधिकार नाकारल्या जाण्यामध्ये सर्वप्रथम आहेत."

बऱ्याचदा मुलींच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सेवा, शिक्षण, संगोपन आणि खेळण्याचा अवधी या गरजा अपूर्णच राहतात. त्यांचे सुरक्षेचा अधिकार आणि छळवाद आणि शोषणापासून मुक्तीचा अधिकार त्याचप्रमाणे त्यांचा वाद, विकास व वहरण्याचा अधिकार हे नाकारले जातात.

स्त्री बालकाच्या विरूद्ध पूर्वग्रह पुढील ०-६ वर्षाच्या गुणोत्तराच्या आकडेवारीवरून अधिक स्पष्ट व तीव्रपणे दृग्गोचर होतो. २०११च्या जनगणनेमध्ये हे गुणोत्तर ९१४ एवढ नोंदले गेले जे २००१ च्या जनगणनेतील ९२७ या गुणोत्तरच्या तुलनेत कमी आहे. स्त्री बालिका गुणोत्तर हे सातत्याने १९६१च्या ९७६ पासून ते २०११ च्या ९१४ पर्यंत घसरले आहे.

### २०.२.२ हुंडा प्रथा ः

हुंडा पद्धती ही आपल्या संस्कृतीवर दुष्परीणाम करणाऱ्या सामाजिक प्रथापैकी सर्वात वाईट प्रथा आहे. स्वतंत्र भारतात उल्लेखनीय अधिनियमांपैकी एक आहे. प्रतिबंध कायदा १९६१. जो स्वतंत्र भारताच्या शासनाने पारित केला हुंडा देणे व घेणे हे कायद्याने प्रतिबंधक केले असून आणि असे कृत्य हा कायद्याने दंडपात्र गुन्हा असून सुद्धा ही प्रथा आपल्या संस्कृतीत एवढी रूतलेली आहे की ती निर्वीध चालू आहे. शहरी भाग असो वा ग्रामीण या कायद्याचे निर्वेध उल्लंघन आहे. केवळ हुंडाबळीच नव्हे तर घरगुती स्त्रीहिंसेची बहुसंख्य घटना ज्यामध्ये मानसिक तथा शारिरीक छळाचा समावेश आहे. हुंडयाशी संबंधीत आहे. स्त्रियांच्या काही अत्यंत मूलभूत मानवी हक्कांचा भंग जवळजवळ रोजच होत असतो. कांहीवेळा कांही मुली हुंडाविरोधात त्यांच्या हक्कांवर भर देण्यासाठी ठामपणे उभ्या ठाकल्याचे बघणे हे मनोधैर्य वाढवणारे दृष्य दिसते. अशा रोगापासून भारतीय समाजाला वाचवण्यासाठी अशा हातांचे बळ वाढवणे कांही खंबीर तसेच सर्वकंष सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय उपाय करणे निकडीचे आहे.

> शाळेत न जणारी एक बालिका शोधून काढा. तिच्या आईवडिलांना सांगा की शासनाने मुलीच्या विकासासाठी "लाडली "नावाची योजना सुरू केली आहे. ती यापुढे आर्थिक बोजा राहीली नसून उलट एक गुंतवणूक ठरणार आहे. म्हणून त्यांनी तिला शाळेत पाठवायला हवे.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २०.१

१. लोकशाहीवर जातीव्यवस्था कशी परीणाम करते ?

उत्तर

२. भारत शासनाची 'लाडली' योजना काय आहे ?

उत्तर

३. हुंडा उल्लंघनाला कोणता कायदा प्रतिबंध करतो ?

उत्तर

## २०.३ द्रव्य दुरूपयोग (मादकद्रव्य दुरूपयोग)/व्यसनाधीनता ः

दारू / मद्यार्क पेये, तंबाखू, विडी, सिगारेट, मादकद्रव्य (वैद्यकिय उपचारार्थ व्यतिरिक्त) अशा हानीकारक पदार्थाच्या सेवनाची सवय असणे यालाच द्रव्य दुरूपयोग व व्यसनाधीनता म्हणतात. अशा व्यसनाधीनत्व (मादक) द्रव्यांची कक्षा सतत वाढती असल्याने अधिकाधिक विशेषतः पौगंड वयोगटातील मुले व्यसनाधीन होत आहेत. द्रव्य दुरूपयोगच्या सापळयात तरूण तथा प्रौढ यांना ढकलण्यामध्ये बरेच घटक जबाबदार आहेत. या घटकात समवयस्क मित्रांचा आग्रह घरातील कुंद वातावरण आणि ताण यांचा समावेश होतो.

द्रव्य दुरूपयोग ही अशी अवस्था आहे की ज्यात वैद्यकिय व मानसिक मदतीची गरज असते. आई वडीलांची मुलांच्या बाबतीत समंजस असायला हवे विशेषतः त्यांच्या बालपण ते पौगंडावस्था व प्रौढावस्थेत स्थित्यंतर होतांना ज्यावेळी त्यांच्या शरीर रचनेत बदल घडून येतात. पौगंडावस्थेतील मुलेमुली नैसर्गिकरित्या नवीन गोष्टी जाणण्याकरीताउत्सुक असतात. नवीन सृष्टीचा ते शोध घेत असतात. नवीन कल्पना, वर्तन आणि नाती यांचा शोध लावत असतात. या प्रक्रियेत ते मादक द्रव्याच्या संपर्कात येतात. त्यांचे पर्यावरण, कुटुंब, शाळा आणि मित्रपरिवार यांच्याकडून या द्रव्यांच्या वापराचे दुष्परिणामाबद्दल त्यांना प्रवोधन झाले नाहीतर त्या मादक द्रव्यांच्या सापळयात अडकण्याचा





संभव असतो. दारूपिणे आणि धूम्रपान ही सर्व सामान्य त्याचप्रमाणे हानीकारक व्यसनाधीनता कृत्ये आहेत.

दारूपिणे ही एक समाजातील अतिशय गंभीर समस्या आहे. दारूपिणे चिंता व वैफल्य यांच्या तात्कालिक का होइना विसर पडणे हा एक सहज सोपा विरंगुळा आहे. अगदी जेमतेम उत्पन्न कमाई असलेले दारूडेही कुटुंबाचा गरजा बाजूला ठेऊन दारू विकत घेतात. जर दर्जेदार दारू खरेदी करणे महाग असल्याने शक्य नसेल तर ते सुमार दर्जाहीन दारू घेतात. कधी कधी विषारी द्रव ही पितात. पिल्यानंतर ते भान हरपतात. कधी कधी त्याचा परीणाम मृत्यू वा कायमचे अपंगत्व यात होतो. बहुतेक वेळा ते त्यांच्या बायकामुलांना दारू पिऊन वाईट वागणूक देतात.

धूम्रपान ही दारू पिण्यापेक्षाही प्रकृतीला हानीकारक आहे. धूम्रपान केवळ धूम्रपान करणाऱ्यालाच नाही तर आसपासच्या लोकांनाही अपाय करते जे वातावरणातील धूराने बाधित होतात. आपण जर इतरांच्या अधिकारांचा मान राखत असू तर आपण बसेस, रेल्वे, बाजार, दुकाने, कार्यालये अशा सार्व जनिक ठिकाणी धूम्रपान करू नये. धूम्रपान हे वायू प्रदूषणाचे एक प्रमुख कारण असून कॅन्सर (कर्क रोग), हृदयविकार, श्वसनविकार अशा प्राणघातक आजारांना निमंत्रण देते. जागतिक आरोग्य संघटना W.H.O. च्या मते तंबाखूचा वापर विशेषतः धूम्रपान हा जगातील क्रमांक एकचा मृत्यूदुत आहे. केंद्रीयमंत्री मंडळाने सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी घातली आहे. शाळा आणि महाविद्यालयांजवळ तंबाखू उत्पादन विक्रीवर त्यांनी बंदी घातली आहे. या उत्पादनांच्या निर्मात्यावर या उत्पादकांच्या सेवन करणाऱ्यांना या उत्पादनांच्या दुष्परिणामाबद्दल इषारा देणे तसेच प्रत्यक्ष उत्पादनांवर तशी सूचना छापणे बंधनकारक केले आहे.

## २०.४ सांप्रदायिकता ः

भारत वेगवेगळया धार्मिक श्रद्धांचा देश आहे. वेगवेगळया सांप्रदायाचे लोक हिंदू, शिख, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी इत्यादी भारतात राहतात. एका संप्रदायाचा इतर संप्रदायाबावत आक्रमक प्रवृत्तीमुळे ताण निर्माण होतो आणि त्यातून संघर्ष होतो. सांप्रदायिक दंग्यामध्ये शेकडो लोक मरण पावतात. त्यातून द्वेष व आपसातील संशयाचा जन्म होतो. सांप्रदायिकता हा एक असा विषय आहे की ज्याची हाताळणी व निर्मुलन होणे गरजेचे आहे. आपल्या देशातील लोकशाही व एकात्मतेला ते एक आव्हान आहे म्हणून ते आपल्या प्रगतीच्या मार्गातील एक प्रमुख अडथळा आहे. शिक्षण हे एक फार महत्वाचे साधन आहे की ज्यायोगे आपण समाजात शांतता व सुव्यवस्था आणण्याची आशा करू शकतो. आपण हे लक्षात घेतलेच पाहिजे की आपण कोणत्याही धार्मिक संप्रदायाचे असण्याआधी प्रथम एक मानव आहोत. आपण सर्व धर्माचा आदर राखला पाहिजे. आपला देश निधर्मी आहे याचा अर्थ सर्व धर्मांना समान वागणूक व प्रत्येकाला आपापला धर्म अनुसरण्याची मुभा आहे.

एखाद्या धूम्रपान, मादकद्रव्ये, दारूपान किंवा जुगाराच्या व्यसनाधीन व्यक्तीला भेटण्याचा प्रयत्न करा. त्याला या गोष्टींच्या दुष्परीणामांची कल्पना द्या व त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग सूचवा.



टिपा



## २०.५ वृद्धांशी ज्येष्ठांशी संबंधीत बाबी ः

जागतिक लोकसंख्या ही वयस्कर वृद्ध होत आहे. जागतिक स्तरावर १९५० मध्ये ८ % २००० मध्ये १० % वृद्ध होते आणि २०४० मध्ये २१ % पर्यंत वाढ होण्याचा अंदाज आहे. भारतात वृद्ध ज्येष्ठ लोकांची संख्या १९६१ ाध्ये ५.८ % (२५.५ लक्ष) होती. ती वाढून १९९१ मध्ये ६.७% (५६.६ लक्ष) झाली. २०११ मध्ये वाढून ती ८.१% (९६ लक्ष) होण्याचा अंदाज आहे. जी १३७ लक्षापर्यंत वढण्याची २०११ मध्ये अपेक्षा आहे. भारतीय वृद्धांची संख्या वाढून ती तिप्पट होण्याची पुढील काही दशकात अपेक्षा आहे. वृद्धांना सामाजिक आर्थिक आणि मानसिक आधार पुरवणे समाज विकासाचा मूलभूत चिंता विषय म्हणून उदयास येत आहे.

एकत्रित कुटुंबाच्या विभाजनांबरोबर, विशेषतः शहरी क्षेत्रामध्ये, जिथे मातापिता व मुले हे एक केंद्रिय कुटुंब बनले आहे, तेथे वृद्ध हे त्यांच्याच घरात नकासे व्हायला लागले आहेत. वृद्धांना समाजाकडून आधाराची अपेक्षा आहे. आपल्या संस्कृतीतील वृद्धांचा आदर हे मूल्य नवीन पिढीच्या मनात रूजवणे आवश्यक आहे जेणेकरून वृद्धांना त्यांचा आत्मसन्मान राखता येईल. लक्षात ठेवा त्यांनी ते तरूण असतांना तुमची काळजी घेतली आहे आणि आता परतफेड करण्याची तुमची पाळी आहे. तुम्ही तुमच्या वृद्ध आजी आजोबांची काळजी घ्यायलाच हवी आणि त्यांची सेवा केलीच पाहीजे.

एखाद्या वृद्धाश्रमाला भेट द्या. आणि तेथे राहणा वृद्ध लोकांशी गप्पा मारा. त्यांना अधिक चांगले व सुखी जीवन जगण्यासाठी तुम्ही कशी मदत करू शकता त्याचा विचार करा.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २०.२

१. द्रव्य दुरूपयोग म्हणजे काय ?

उत्तर ____________________

____________________

____________________

२. जागतिक आरोग्य संघटनेच्या अनुसार क्रमांक एकचा मृत्यूदूत कोण आहे ?

उत्तर ____________________

३. भारतातील वृद्धांची अपेक्षित लोकसंख्या २०११ पर्यंत किती आहे ?

उत्तर ____________________

४. वृद्ध लोकांकडे लक्ष न देण्यामागील मुख्य कारण काय आहे ?

उत्तर ______________________________

______________________________

______________________________

## २०.६ गरीबी आणि बेरोजगारीचा प्रश्न ः

भारत हा क्षेत्रफळाने प्रचंड मोठा देश आहे. ढोबळमानाने तो जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.४ % आहे. परंतु जगाच्या लोकसंख्येच्या किती टक्के भारताची लोकसंख्या आहे हे तुम्हाला माहिती आहे ? ती जवळ जवळ १६.७ % आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी आहे. अशा प्रचंड लोकसंख्येपोटी काही आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या आहेत बेरोजगारी, चलन फुगवटा, गरीबी आणि मूल्यवृद्धी महागाई. आपल्या लोकसंख्येच्या एक मोठा हिस्सा दारिद्रय रेषेखाली जगतोय. प्रचंड बेरोजगारी आहे. चलनफुगवटा व मूल्य वृद्धीने समस्येत भर घातली आहे.

एवढया मोठया संख्येने लोक दारिद्रय रेषेखाली जगत असतांना सामाजिक आर्थिक सीमारेषेवरील कुटुंबांवर निम्न दर्जाचे जीवन, रोगराई कमी साक्षरता, कुपोषण आणि बालमजूरी या स्वरूपात होणारा परीणाम हा गंभीर चिंता विषय आहे. अनुसूचित संवर्गात जगणारा लोकसंख्येचा जवळजवळ पावभाग हा पूर्णपणे दारिद्रय रेषेखाली आहे. गरीबी ही एक मूलभूत समस्या आहे. ज्यामुळे विकासाच्या उद्दिष्टांवर बंधन आले आहे.

बेरोजगारी ही अशी समस्या आहे ज्यामध्ये एक शारीरिक सक्षम काम करणाची इच्छा असलेली व्यक्ति जगण्यासाठी काम रोजगार मिळण्यास अपयशी ठरते. तीव्र बेरोजगारी व त्यातून उद्भवलेली गरीबी हे मानवी मूल्यांची हानी होण्यास कारणीभूत आहेत. गरीबीच्या अनिवार्यतेमुळे आई वडिल त्यांच्या मुलांनाही श्रम करण्यासाठी पाठवण्यास कचरत नाहीत. या परिस्थितीमुळे लाखो मुले आपली बालपण हरवतात. ती अशिक्षित आणि अज्ञानी राहतात. ज्याचा परिणाम त्यांच्या बेरोजगारी अथवा निम्नरोजगारी आणि त्यातून उद्भवणारी गरीबी मध्ये होते.

### २०.६.१ भिकारी ः

आपण कोठेही गेलो तरी तिथे भिकारी दिसणे हा एक वेदनादायक अनुभव आहे. बाजारात, रेल्वे स्थानकात, रूग्णालयात, मंदिरात अगदी रस्ता ओलांडतांना तुम्हाला कांही लोक हात पसरून तुमच्या जवळ येतांना दिसतील. ते पैसा किंवा अन्नाची मागणी करतात. आपल्याला रस्त्यात सुद्धा बरीच बालके भीक मागतांना दिसतात. भिक्षाटन ही भारतातील एक प्रमुख समस्या आहे. आपल्या देशातील भिक्षाटनाची प्रमुख कारणे गरिबी आणि बेरोजगारी आहेत. आजकाल आपल्या समाजात अनेक टोळया कार्यरत आहेत. ज्या सुसंघटित पद्धतीने भीक मागण्याचा धंदा करतात.

भिक्षाटन हा एक सामाजिक शाप आहे. जो नष्ट केलाच पाहिजे. जर तुम्हाला रस्त्यात अथवा इतरत्र भिकारी दिसले तर त्यांना सांगा भीक मागणे हा गुन्हा आहे. जो कायद्याने शिक्षापात्र आहे. दोघांनाही जो भीक मागतो त्याला व जो भीक देतो त्यालाही.

## २०.७ बालकांच्या समस्या ः

बालकांच्या विकासाकडे पुरेसे लक्ष न देणारा देश प्रगती करू शकत नाही. बालक हा देशाचा भावी नागरिक आहे केवळ तीच मुले जी निरोगी वातावरणात जगतात, मोठी होतात, तीच देशाच्या विकासात आणि शक्तीत योगदान करू शकतात. आपल्या देशात बालकांची मोठी लोकसंख्या आहे. आपले कर्तव्य आहे की त्यांना चांगले आरोग्य तथा शिक्षणाची संधी प्राप्त होते आहे की नाही याची खात्री करणे. बऱ्याच मोठया संख्येने मुले गरीबीमुळे शाळेत जात नाहीत. अथवा त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच शाळेतून काढून घेतली जातात आणि कोवळया, अपक्व वयात कारखान्यात, वीटभट्टीवर , उपहारगृहात, दुकानात इ. काम करण्यास पाठवली जातात.

त्यामुळे त्यांच्या वाढीवर शारिरीक, मानसिक आणि भावनिक स्वरूपात बाधा येते. ती तिरस्कार व वेदना बाळगून मोठी होतात व राष्ट्राचे लायक नागरिक बनण्यास अयशस्वी होतात.

६ ते १४ वयोगटातील बालक शाळेत असावे असे गृहित आहे. परंतु दुर्दैवाने या वयोगटातील २00 दशलक्ष भारतीय मुलांपेकी ११.३ दशलक्ष मजूर आहेत. अशी ६0 दशलक्ष बालके आहेत ज्यापैकी २ लाख बालके घरगुती काम करतात व जवळजवळ तेवढीच संख्या वेठबिगार आहेत.

ही बालके शारीरिक व मानसिक अत्याचार व शोषणास बळी पडतात. त्यांना उपाशी ठेवले जाते. मार दिला जातो आणि लैंगीक अत्याचार ही केला जातो. ही एक गंभीर समस्या आहे. आणि सामान्यपणे बालक दुर्वव्यहार म्हणून ओळखला जातो.

शिक्षणाचा अधिकार कायद्यान्वये २00९ मध्ये ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांच्या शिक्षणाची तरतूद आहे. हे जोपासलेले सर्व शिक्षणाचे ध्येय एकदा का साध्य झाले तर आपल्या मुलांची अवस्था फार चांगली असेल.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २०.३

१. २0११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या किती आहे ?

उत्तर

२. लोकांना इतर लोकांकडे पैसे अन्न व वस्त्रांची भीक मागण्यासाठी काय कारणीभूत ठरते ?

उत्तर

३. तुम्हाला एखादा भिकारी भेटला तर त्याला /तिला तुम्ही काय सल्ला द्याल ?

उत्तर

४. बालक दुर्व्यवहार काय आहे?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- अलीकडच्या काळात हुंडा, बालमजूरी, बाल दुर्व्यवहार आणि मद्यपान यासारख्या वाईट प्रथा धोकादायक प्रमानात वाढल्या आहेत.
- स्त्रीया व मुलीच्या बावत लिंगभेद व संबंधीत अडचणीचा त्यांना करावा लागणारा सामना हा अनिर्बंध झाला आहे व त्यामुळे त्यांना त्यांच्या संपूर्ण क्षमतेचा अविष्कार करण्यापासून रोखले आहे.
- एकत्रित कुटुंबव्यवस्थेचे विघटन व पतीपत्नी व मुले कुटुंबपद्धतीचा उदय यामुळे वृद्धांच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे.
- गरीबी व बेरोजगारी यांचा जीवनातील दर्जावर हानीकारक परीणाम झाला आहे.

## सत्रान्त अभ्यास

१. आवडीचा व्यवसाय निवडण्यामध्ये जातीयता ही एखाद्या व्यक्तिला अडथळा कशी ठरते ?

२. "हुंडा ही एक सामाजिक समस्या आहे." स्पष्ट करा.

३. स्त्री व्यक्तित्वांचा विकास हा राष्ट्राला फायदेशीर कसा आहे ?

४. मूल हे आपल्या देशाचे भांडवल आहे. या विधानाशी आपण सहमत आहात का ?

५. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ हुंडा समस्येस आळा घालण्यास परिणामकारक आहे कां ?

६. "जगात सगळीकडे उधळपट्टी करून वाया घालविली जाणारी देणगी म्हणजे मुली आहेत." ते चर्चा करा.

७. गरीबी व बेरोजगारी या अनेक सामाजिक समस्यांच्या मूळ कारण आहेत. चर्चा करा.

## प्रश्नांची उत्तरे

### २०.१

१. समाज कृत्रिम गटामध्ये विभाजित होतो ज्यांचा त्यांच्या जातीच्या उमेदवाराला समर्थन करण्याकडे कल असतो. ते गट तो /ती ही लायक /पात्र उमेदवार आहे किंवा नाही या तथ्याकडे पुरेसे लक्ष देत नाही.

२. बालिकांच्या संरक्षणार्थ एक योजना ज्यामध्ये बालिकेच्या जन्माच्या वेळी एक रक्कम बाजूला ठेवली जाते जी तिला ती वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मिळते. ती तिच्या शिक्षण अथवा विवाहासाठी खर्च केली जाते.

३. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१.

### २०.२

१. दारू, मद्य, तंबाखु, विडी, सिगारेट, मादकद्रव्ये (वैद्यकिय सल्यानुसार उपचारासाठीच्या वापराव्यतिरिक्त) या सारख्या हानीकारक द्रव्यांची सवय (दैनंदिन वापर) अथवा त्यावर अवलंबून म्हणजे द्रव्य दुरूपयोग अथवा व्यसनाधीनता.

२. तंबाखू

३. १३७ दशलक्ष

४. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाबरोवर विशेषतः शहरी भागात जिथे पतीपत्नी व मुले मुली असे कुटुंबपद्धती आहे. वृद्ध हे त्यांच्याच कुटुंबात नकोसे व्हायला लागले आहेत. हे वाढत्या प्रमाणावर वनू लागले आहेत.

### २०.३

१ १२१ कोटी

२. गरीबी व बेरोजगारी

३. भीक मागणे हा कायद्याने शिक्षापात्र गुन्हा आहे. दोघांनाही जो मागत आहे त्याला व जो भीक देतो त्याला.

४. ६ ते १४ वयोगटातील बालक शाळेत असावे असे गणले जाते. परंतु दुर्दैवाने या वयोगटातील २०० दशलक्ष भारतीय मुलांपेकी जवळजवळ ११.३ दशलक्ष मजूर आहेत. अशासकिय

अधिकारी यांचा अंदाजानुसार हा आकडा ६0 दशलक्ष आहे ज्यापैकी २ लाख घरगुती काम करतात व जवळजवळ तेवढीच संख्या वेठबिगार आहेत.ही मुले शारीरिक व मानसिक शोषणास बळी पडतात. त्यांना उपाशी ठेवले जाते. मार दिला जातो आणि लैंगीक अत्याचार ही केला जातो. ही एक गंभीर समस्या आहे. तिला सामान्यतः बालक दुर्वव्यहार असे संबोधले जाते.





# विभाग ९

| गुण | तासिका |
|---|---|
| 10 | 20 |

## भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

भारताने नेहमीच इतर देशांशी संबंध प्रस्थापित केले आहेत. वस्तुतः भारतीयांनी सर्वदूर प्रवास केला व ज्या ज्या ठिकाणी ते गेले तेथे त्यांनी त्यांच्या सांस्कृतिक पाऊल खुणा ठेवल्या. त्या मोबदल्यात त्यांनी कल्पना, प्रभाव, चालीरीती आणि परंपरा दूरदूरच्या भागातून भारतात आणल्या. ह्या प्रकरणात कशा प्रकारे भारतीय संस्कृती इतर देशात प्रत्यारीत झाली आणि तिचा त्या देशावर कशा प्रकारे प्रभाव पडला याचा शोध घेणार आहोत.

पाठ २१ : भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

२१

# भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

आजच्या काळात माणूस खूप प्रवास करत आहे. तो रस्ते जहाज विमान रेल्वे अशा विविध मार्गाने प्रवास करतो. पण तुम्हाला ठाऊक आहे काय ? की माणूस तेव्हाही दूरवर प्रवास करत होता. जेव्हां भारतात रेल्वे व विमाने अशी साधने उपलब्ध नव्हती. भारताने इ.स.पूर्व तिसऱ्या शतकामध्ये मध्य काळापासून बाहेरच्या जगाशी व्यवहारीक संपर्क ठेवलेला होता. भारत तीन बाजूंनी समुद्रांनी तर उत्तरेच्या बजूने हिमालयाने वेढलेला आहे. परंतु या बाबींनी भारतीयांना उर्वरित जगाशी संबंध प्रस्थापित करण्यापासून रोखले नाही. वस्तुतः भारतीयांनी सर्वदूर प्रवास केला. व ज्या ज्या ठिकाणी ते गेले, तेथे त्यांनी त्यांच्या सांस्कृतिक पाउलखुणा ठेवल्या. त्या मोबदल्यात त्यांनी कल्पना, प्रभाव चालीरिती आणि परंपरा दूरदूरच्या भागातून भारतात आणल्या. विशेषतः मध्य आशिया, अग्नेय आशिया, चीन, जपान, कोरिया इत्यादी. हा सांस्कृतिक प्रसार कोणत्याही प्रकारची मालकी, हल्ला व मानवी जीवाला हानी न करता झाला. हा सांस्कृतिक प्रसार स्वखुशीने स्विकारला गेला. ही सर्वात लक्षणीय बाव आहे. या प्रकरणात भारतीय संस्कृती इतर देशात कशा प्रकारे प्रसारीत झाली आणि तिचा त्या देशांवर कशा प्रकारे प्रभाव पडला याचा शोध घेणार आहोत.

## उद्दिष्टे ः

ह्या पाठाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबीचे ज्ञान होईल.

- ज्या विविध मार्गाने भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार झाला त्यांचे स्पष्टीकरण.
- ज्या व्यापारी मार्गांनी भारतीय संस्कृती प्रसाराचे पहिले सांस्कृतिक राजदूत ठरलेले व्यापारी परदेशात गेले ते व्यापारी मार्ग जाणून घेणे.
- भारतीय विद्यापीठे, शिक्षक (गुरू) आणि धर्मप्रसारक यांची भारतीय संस्कृती प्रसारातील भूमिका स्पष्ट करणे.
- भारतीय संस्कृतिच्या पूर्व आशिया आणि आग्नेय आशियाई देशातील प्रसाराचा मागोवा घेणे.
- भारताचे रोमन साम्राज्याशी असलेल्या व्यापारी संबंधाचे वर्णन करणे.

- भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार
- बौद्ध धर्माचा अनेक देशातील शांततेचा धर्म म्हणून जो प्रसार झालेला आहे. त्याची चर्चा करणे.
- संस्कृत भाषेचा या संबंधीत देशांच्या भाषेवर आणि वाङ्मयावर जो परिणाम झाला आहे त्या परिणामाचे परिक्षण करणे.
- भारतीय महाकाव्ये, भारतीय तत्त्वज्ञान भारतीय प्रकारचे प्रशासन आणि कायदा यांची त्या संबंधीत देशातील लोकप्रियतेचे सविस्तर वर्णन करणे.
- त्या देशात अनेक शतकात निर्माण केलेली भव्य मंदिरे, चित्रे या स्वरूपातील जो सामाईक वारसा आहे. त्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करून उलगडा करणे.
- अरब संस्कृतीशी असलेला भारताचा सांस्कृतिक संबंध वर्णन करणे.

## २१.१ भारतीय संस्कृतिचा व्यापारी, शिक्षक राजदूत आणि धर्मप्रसारकामार्फत प्रसार

प्राचीन काळात भारतातील व्यापारी व्यापारातील नविन संधी शोधण्यासाठी दूरच्या देशात गेले. ते पश्चिमेकडे रोमला व पूर्वेकडे चीनपर्यंत पोहोंचले. इ.स.पूर्व पहिल्या शतकात व्यापारी सोन्याच्या शोधार्थ इंडोनेशिया आणि कंबोडिया मध्ये व विशेषतः जावा, सुमात्रा आणि मलायाच्या बेटावर जाऊ लागले होते. म्हणून या बेटांना सुवर्णद्वीप म्हणू लागले. (सुवर्ण म्हणजे सोने आणि द्विप म्हणजे बेट) हे व्यापारी खूप संपन्न शहरात फिरत जसे की काशी, मथुरा, उज्जैन, प्रयाग आणि पाटलीपुत्र. नंतर यांनी समुद्र किणाऱ्यावरील शहरात प्रवास केला. उदा.मामलापूरम, ताम्रलिप्ती पुरी आणि कावेरी पट्टणम ः सम्राट अशोकाच्या काळात कलिंग राज्याचे, श्रीलंकेशी व्यापारी संबंध होते. जेव्हा व्यापारी नव्या भागात पोहचले तेथे त्यांनी सांस्कृतिक संबंध स्थापन केले अशा प्रकारे व्यापाऱ्यांनी सांस्कृतिक राजदूताची भूमिका निभावली.

पूर्व किनाऱ्याप्रमाणेच पश्चिम किनाऱ्यावर किंवा किनाऱ्याजवळही सांस्कृतिक वास्तुकलात्मक उभारणी सापडलेली आहेत. कार्ले भाजे कान्हेरी, अजिंठा आणि वेरूळ ह्या ज्ञात स्थळाचा त्यात समावेश होतो. ह्या पैकी बरीच केंद्रे बौद्ध भिक्षुंनी उभारली होती. विद्यापीठे ही सांस्कृतिक संवादाच्या दृष्टीने सर्वात महत्वाची केंद्रे होती. अशा केंद्रांनी मोठया प्रमाणावर विद्यार्थी आणि विद्वानाना आकर्षित करून घेतले. परदेशातील आलेले विद्वान नेहमीच नालंदा विद्यापीठाला व ग्रंथालयाला भेट देत. हे ग्रंथालय सात मजली होते. असे म्हणतात. ह्या विद्यापीठातील विद्यार्थी व शिक्षकांनी (गुरू शिष्यांनी) भारतीय संस्कृती, तिचे ज्ञान व धर्म संहिता परदेशात नेली. चिनी प्रवाशी युआन श्वांगने भारताला भेट दिली होती व त्यांने भारतातील विद्यापीठाबद्दल भरपूर माहिती दिली आहे.

उदाहरणार्थ त्याने पूर्वेकडील नालंदा व पश्चिमेकडील वल्लभी विद्यापीठांमधील त्याच्या वास्तव्याचे वर्णन केले आहे.

विक्रमशीला हे दुसरे विद्यापीठ होते व हे विद्यापीठ गंगेच्या उजव्या किनाऱ्यावर वसलेले होते. तिबेटमधील विद्वान तारानाथ यांनी ह्या विद्यापीठाचे वर्णन केलेले आहे. ह्या विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थी इतके प्रसिद्ध होते की एकदा तिबेटच्या राजाने ह्या विद्यापीठाच्या प्रमुखाना तिबेटमधील सामायिक संस्कृती व भारतीय शहाणपण यांना उत्तेजन देण्यासाठी त्यांनी तिबेटला भेट द्यावी, म्हणून

त्यांना पाचारण करण्यासाठी एक शिष्ट मंडळ पाठविले होते.

आणखी एक विद्यापीठ बिहारमधील उदांतपुरी हे होते. पाल राजांच्या आश्रयाखाली ह्या विद्यापीठाची भरीव वाढ झाली. ह्या विद्यापीठातून अनेक बौद्ध भिक्षू तिबेटमध्ये स्थलांतरीत झाले व तेथे ते स्थायिक झाले.

दोन भारतीय शिक्षक चीनी सम्राटाच्या आमंत्रणावरून इ.स.६७ मध्ये चीनला गेले. ह्यांची नावे कश्यप मातंग आणि धर्मरक्षिताम अशी होती. त्यांचे अनुकरण नालंदा तक्षशीला आणि विक्रमशीला विद्यापीठातील शिक्षकांनी केले. जेव्हा आचार्य कुमारजीव यांनी चीनला भेट दिली तेव्हा चीनच्या राजाने त्यांना संस्कृत ग्रंथ चीनी भाषेत भाषांतरीत करण्याची विनंती केली. तत्त्वज्ञान आणि योगावर प्राविण्य मिळविलेल्या बोधीधर्म ह्या विद्वानांचा आजही चीन आणि जपानमध्ये आदर केला जात आहे.

नालंदा विद्यापीठाचे आचार्य कमलाशील यांना तिबेटच्या राजाने आमंत्रण दिले होते. त्यांच्या मृत्यूनंतर तिबेटीयन लोकांनी त्यांच्या पार्थिव शरीराचे जतन केले व ल्हासाच्या विहारात ते जतन करून ठेवले.

जनभद्र हे दुसरे वैशिष्ट्यपूर्ण विद्वान होते. ते त्यांच्या दोन मुलांबरोबर तिबेट येथे धर्माची शिकवण देण्यासाठी गेले होते. त्यांनी बिहारमधील उदांतपूरी विद्यापीठाच्या धर्तिवर तिबेटमध्ये एका विहाराची स्थापना केली.

विक्रमशीला विद्यापीठाचे प्रमुख आचार्य अतीशा हे होते. त्याना दिपंकर श्रीजनाना असेही म्हणतात. अकराव्या शतकात ते तिबेटमध्ये पोहचले व तिबेटमध्ये त्यांनी बौद्ध धर्माचा पाया भक्कम केला. थोनमी संभोटा हे नालंदा विद्यापीठात अध्ययन करून ते पुन्हा तिबेटमध्ये गेले व तेथे त्यांनी बौद्ध धर्माची शिकवण दिली. अनेक तिबेटी लोकांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला. तेथील राजानींही बौद्ध धर्म स्वीकारला. राजाने बौद्धधर्माला राजधर्म म्हणून घोषित केले. इतर उल्लेखनीय शिक्षकांमध्ये अनेक देशात आजही प्रसिद्ध असलेल्यामध्ये कुमारजीव हे आहेत ते पाचव्या शतकात कार्यरत होते.

## २१.२ भारतीय संस्कृतीचा इतर मार्गानी प्रसार ः

### रोम किंवा जिप्सी ः

भारतातील कांही भटकणारे गट परदेशात गेले ते रोम म्हणून प्रसिद्ध आहेत. ते पश्चिमेकडे सद्याचा पाकिस्तान व अफगाणिस्तान ओलांडून गेले. तेथून त्यांचे तांडे इराण, इराक मार्गे तुर्कीकडे गेले. प्रशियातील खडतर पर्व रांग आणि कान्स्टॅटिनोवल (इस्तंबूल) शहर ओलांडून ते युरोपातील अनेक भागात पसरले. आज ते ग्रीस, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, रूमानिया, हंगेरी, झेक, स्लोव्हाक गणराज्य , रशिया, पोलंड, स्विर्झलंड, फ्रान्स, स्वीडन, डेन्मार्क आणि इंग्लंड या देशात पसरले आहेत. त्यांना या सर्व देशात पसरण्यासाठी जवळजवळ चारशे वर्ष लागली. एवढया काळानंतर त्यांना त्यांच्या मातृभूमीचा विसर पडला असला तरी त्यांनी त्यांची भाषा, जीवनशैली आणि त्याचे व्यवसाय टिकवून ठेवले आहेत.

रोमन त्यांच्या नृत्य व संगीताबद्दल प्रसिद्ध आहेत. प्रत्येक रोम संगीतकार नितांत सुंदर कलाकार असतो असे म्हटले जाते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २१.१

१. भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार कोणी केला ?

उत्तर

२. चीनी प्रवासी युआन श्वांग यांनी कोणत्या दोन विद्यापीठांना भेट दिली ?

उत्तर

३. तिबेटच्या विद्ववानाचे नाव सांगा ज्याने विक्रमशाला विद्यापीठाचे वर्णन केले आहे ?

उत्तर

४. कोणत्या दोन भारतीय शिक्षकांनी इ.सन.६७ मध्ये चीनला भेट दिली ?

उत्तर

५. आचार्य कुमारजीव चीनला का गेले ?

उत्तर

६. प्राचीन काळी जिप्सी कोण होते ?

उत्तर

## २१.३ मध्य आशियातील भारतीय संस्कृती ः

मध्य आशियाची भूमी चीन, रशिया, तिबेट, भारत आणि अफगाणिस्तानने वेढली आहे. अनेक अडचणी कष्ट असूनही नियमितपणे व्यापारी लोक मध्य आशियाचा भाग ओलांडून चीनमध्ये आणि चीनमधून येऊन मध्य आशियाचा भाग ओलांडून प्रवास करत होते. व्यापारी लोकांनी खुला केलेला हा मार्ग नंतर रेशीम मार्ग म्हणून प्रसिद्ध झाला. ह्या मार्गाला रेशीम मार्ग नाव पडले कारण चीनचा मुख्य व्यापार रेशीम. नंतरच्या काळात हाच मार्ग विद्वान भिक्षु आणि धर्मप्रसारकांनी वापरला.

## भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

मध्य आशियातील साम्राज्यापैकी कुची हे फार महत्त्वाचे भरभराटीला आलेले केंद्र होते. ह्या साम्राज्यात रेशीम मार्गाला दोन फाटे फूटत असत व दोन्ही फाटे पुन्हा चीनमध्ये दून हूंग गुंफाजवळ एकत्र येत. अशा प्रकारे उत्तर व दक्षिण असे दोन रेशीम मार्ग होते. उत्तरेकडील रेशीम मार्ग समरकंद, काशगर, तुमशुक, अकसु, कराशर, तुरफान आणि हामी या ठिकाणाहून जात होता. दक्षिण रेशीम मार्ग दारकंम्द, यारकन्द खोदान, करिया, चेरचेन आणि मिरान या ठिकाणावरून जात होता. अनेक भारतीय व चीनी विद्वान या मार्गाहून ज्ञान आणि शहाणपणाच्या शोधासाठी तसेच बौद्ध तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी ये जा करत होते.

रेशीम मार्गावर धर्मप्रसारकांसाठी भिक्षु तसेच यात्रेकरू व व्यापाऱ्यासाठी विश्रांतीची ठिकाणे हेती. ही ठिकाणे नंतर बौद्ध शिक्षणाची प्रसिद्ध केंद्रे बनली. रेशीम, हिरे व मौल्यवान खडे, घोडे व अनेक मौल्यवान वस्तुंची या मार्गावर देवाण घेवाण व्हायची. परंतु सर्वात महत्त्वाचा व चिरकाल टिकणारा खजिना म्हणजे बौद्ध धर्म, त्याची वाहतूक ह्याच मार्गावरून झाली. अशा प्रकारे व्यापारी मार्गाने धर्म आणि तत्वज्ञान, कल्पना आणि श्रद्धा, भाषा आणि वाङ्मय, कला आणि संस्कृती संक्रमीत होत असे.

खोटान हे अतिशय महत्वाचे बाह्य केंद्र होते. हे ठिकाण दक्षिण रेशीम मार्गावर होते. भारत आणि या राज्याच्या सांस्कृतिक संवंधाचा इतिहास दोन हजार वर्षापेक्षा ही मागे जातो ओसाड प्रदेशातील ओॲसिस म्हणजे भरभराटीला आलेले खोटानचे राज्य. रेशीम उद्योग, नृत्य, संगीत, वाङ्मयीन कामगिरी, व्यापारी कामकाज, सोने, हिरे व हिरव्या रंगाच्या मौल्यवान खडयांच्या निर्यातीसाठी प्रसिद्ध होते.

भारत खोटान संवंधाच्या इतिहासाचे साक्षीदार भारतातून खोटानमध्ये जाणाऱ्यामध्ये शिक्षकांचे (आचार्यांचे) व बौद्ध भिक्षूंचे सतत जाणारे लोंढे असत. इ.सनच्या पहिल्या शतकापासून खोटान येथे सापडणाऱ्या नाण्यांच्या उर्ध्व पृष्ठभागावर चिनी भाषेत व अधो पृष्ठभागावर प्राकृत भाषेत खारोष्टी लिपीत मजकूर आढळलेला आहे. हा खोटानमधील संमिश्र संस्कृतीचा पुरावा आहे. मोठया प्रमाणावरील संस्कृत हस्तलिखिते भाषांतरे आणि वौद्ध ग्रंथाच्या संस्कृत नकला वाळूने गाडल्या गेलेल्या विहारातून मिळाल्या आहेत.

## २१.४ पूर्व आशियातील भारतीय संस्कृती ः

भारत व चीनचा संपर्क इ.स.पूर्व २ ऱ्या शतकाच्या आसपास सुरू झाला. चिनी सम्राट मिंग ति यांच्या आमंत्रणावरून कश्यप मातंग आणि धर्मरक्षीता या भारतीय विद्वानांनी इसवीसन ६७ मध्ये चीनमध्ये प्रवेश केला व भारतीय संस्कृतीचा पहिल्यांदा या दोन भिक्षुमार्फत चीनमध्ये प्रवेश झाला.

कश्यप मातंग व धर्मरक्षीता यांच्यानंतर चीनमधून भारतात व भारतातून चीनमध्ये भिक्षुंचे लोंढे सतत ये जा करत होते. जे चिनी लोक विद्येच्या शोधासाठी भारतात येत होते. ते भारतात व भारतीय संस्कृती बावत एवढया मोठया प्रमाणावर लिहीत की आपल्या इतिहासासाठी हे लेखन आज महत्वाचे साधन ठरत आहेत. भारतीय विद्यापीठ व विहारातील महत्वाचे आचार्य चीनमध्ये प्रसिद्ध बनले. उदाहरणार्थ बोधी धर्म हा विद्वान कांचीपूरम येथून चीनमध्ये पोहोचला तो राजपुत्र होता. तो नालंदाला गेला तेथे त्याने अध्ययन केले व नंतर तो चीनला गेला त्याने योग तत्वज्ञान आपल्याबरोबर चीनमध्ये नेले. तेथे त्याने ध्यान (मनन व चिंतन) पद्धती (कृती) लोकप्रिय केली. बोधी धर्म चीन आणि जपानमध्ये इतके लोकप्रिय व्यक्तिमत्व बनले की लोक येथे त्यांची पूजा करू लागले.

इसवी सनाच्या चौथ्या शतकात चीनमध्ये वेई राजवंश सत्तेवर आला. या राजवंशाच्या पहिल्या राजाने बौद्ध धर्माला चीनचा राजधर्म घोषित केले. त्यामुळे भारतीय संस्कृतीच्या चीनमध्ये प्रसार होण्यासाठी गती मिळाली. हजारो संस्कृत ग्रंथ चीनी भाषेत अनुवादित झाले.

बौद्ध धर्माच्या प्रसारानंतर चीनने गुंफा मंदिरे (लेणी) आणि विहार (मठ) संकुले मोठया प्रमाणावर उभारण्यास सुरूवात केली. भव्य प्रतिमा दगडावर कोरल्या गेल्या. या गुंफा आतून सुंदरपणे रंगविल्या गेल्या. डुन हॉंग, चुन भांग, लुंगमेन ही जगात सर्वात प्रसिद्ध गुंफा संकुले आहेत. ह्या संकुलावर भारतीय प्रभाव अगदी स्पष्ट दिसून येतो.

### कोरिया :

चीनच्या ईशान्येला कोरिया देश आहे. या देशाचे भारताशी जुने सांस्कृतिक संबंध आहेत. कोरियामध्ये भारतीय संस्कृतीने चीनमधून प्रवेश केला. इ.स.३५२ मध्ये बुद्ध प्रतिमा आणि बौद्ध सुत्रे घेऊन कोरियामध्ये प्रवेश करणारा सुन्डो हा पहिला बौद्ध भिक्षु होता. इ.स. ३८४ मध्ये त्याच्यानंतर मालान्द हा भारतीय आचार्य तेथे पोहोचला. इ.सन. ४0४ मध्ये भारतीय भिक्षूने कोरियाच्या पोयांग यांग या शहरात दोन मंदिरे बांधली. त्याच्या नंतर भारतातून अनेक आचार्य कोरियात पोहोचले. तेथे त्यांनी तत्वज्ञान, धर्मकला, मूर्ती बनवण्याची कला, चित्रकला, धातुशास्त्र, लेखन, वाचन यांचे अध्यायन केले. अनेक विद्वान कोरियातून भारतात ज्ञानाच्या शोधात आले. त्यांना खगोलविज्ञान, ज्योतिष, वैद्यक आणि ज्ञानाच्या इतर अनेक क्षेत्रातील प्रशिक्षण दिले जात होते. सर्व कोरियात विहार आणि मंदिरे भक्तीची आणि शिक्षणाची केंद्रे बनली. बहुसंख्य संस्कृत मधील बौद्ध ग्रंथ तेथे अनुवादित झाले.

ध्यान योगाचे तत्वज्ञान कोरियात आठव्या ते नवव्या शतकात पोहोचले. राजे, त्यांच्या राण्या, राजपुत्र, मंत्री आणि सैनिक सुद्धा शूर आणि निर्भिड बनण्यासाठी योगाचे आचरण करू लागले. ज्ञानाच्या उपासनेसाठी कोरियन लोकांनी बौद्ध ग्रंथाचे सहा हजार खंड छापले होते. दरम्यानच्या काळात भारतीय लिपी सुद्धा कोरियात पोहोचली होती.

### जपान :

जपानमधील भारतीय संस्कृतीची कथा पंधराशे वर्षापेक्षा जास्त वर्षे मागे जाते असे मानले गेले आहे. भारतीय संस्कृतीचा जपानमधील आगमनाचा अगदी प्रारंभीचा पुरावा इ.स. ५५२ मधील आहे. त्यावेळेस कोरियन सम्राटाने जपानी सम्राटाला बुद्धाचा पुतळा बौद्ध सूत्रे, प्रार्थनेची साधने, कलाकार, शिल्पकार, चित्रकार, वास्तु आरेखनकार भेटी दाखल पाठविले.

लगेचच बौद्ध धर्माला राजधर्माचा दर्जा देण्यात आला. हजारो जपानी लोक भिक्षु आणि भिक्षुणी बनले.

संस्कृतला जपानमध्ये पवित्र भाषा मानले जाते. भिक्षुंना संस्कृत मंत्र व उच्चार लिहीण्याचे प्रशिक्षण दिले जायचे. तेथील लिपीला शित्तान(सिद्धम) म्हटले जायचे. त्यामुळे पूर्ण कौशल्या प्रती सिद्धी साधली जायची असा समज आहे.

आजही जपानी विद्वानांची संस्कृत शिकण्याची तीव्र इच्छा असते. संस्कृत ही बौद्ध धार्मिक ग्रंथाची भाषा असल्यामुळे संस्कृत ही भारत आणि जपान यांना जोडणारी, घट्टपणे एकत्र करणारी शक्ती आहे. चीनी भाषेत भाषांतरीत झालेली बौद्ध सुत्रे जपानमध्ये राजपुत्र शोतोकुताऐशी यांच्या काळात

सातव्या शतकात आणली गेली. ह्या सूत्रातील तत्वज्ञानाने राजपुत्र फार प्रभावित झाला.

### तिबेट :

हिमालयाच्या उत्तरेला पठारावर तिबेट हा प्रदेश आहे. तिबेटी लोक बौद्ध आहेत. तिबेटी राजा नरदेवाने ज्ञानाची वेगळी क्षितीजे खुली केली आणि सातव्या शतकात गादीवर आल्यावरोबर त्याने भारतीय संस्कृतीचा तिबेटमध्ये प्रसार केला. या राजाने त्यांच्या मंत्री थोनमी संभोट याच्याबरोबर सोळा विद्वानांना सोबत देऊन मगधात पाठविले. त्या सर्वांनी भारतीय शिक्षकांच्या (आचार्यांच्या) मार्गदर्शनांखाली अध्ययन केले. काही काळानंतर थोनमी संभोट हे काश्मीरला गेले. थोनमी संभोट यांनी तिबेटसाठी इसवीसनाच्या सातव्या शतकात ब्रह्मलिपीचा वापर करून नवी लिपी तयार केली. या लिपीला भोट असे म्हणतात. या लिपीने मंगोलियन व मंच्युरीयन लिपीला सुद्धा प्रभावित केले आहे. तिबेटमध्ये अजूनसुद्धा या लिपीचा वापर होत आहे.

थोनमी संभोट यांनी भारतातून त्यांच्याबरोबर अनेक ग्रंथ नेले असे दिसते. तिबेटला परत जाताना पाणीनीच्या संस्कृत व्याकरणावर आधारीत तिबेटीयन भाषेसाठी नवे व्याकरण लिहिले. तेथील राजा मंज्याने या आणलेल्या वाङ्मयाने एवढा प्रभावित झाला की त्याचा अभ्यास करण्यात राजाने चार वर्षे खर्ची घातली. संस्कृत ग्रंथाचा तिबेटी अनुवाद करण्याचा पाया त्यांनी रचला. इसवीसनाचे सातवे शतक ते सतरावे शतक या दरम्यान अनुवादासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले असेही परंपरा सांगते. विहारात जतन करून ठेवलेले १७ हजार संस्कृत ग्रंथ तिबेटी भाषेत भाषांतरीत झाले असेही परंपरा सांगते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २१.२

१. चीनला जाणाऱ्या मार्गाचे नाव रेशीम मार्ग का ठेवण्यात आले ?

उत्तर ______

२. कुची कुठे आहे ? कुची कशासाठी प्रसिद्ध आहे ?

उत्तर ______

______

३. चायनिज व प्राकृत खारोष्टी लिपीत लिहिलेली पहिल्या शतकातील नाणी कोठे सापडली होती ?

उत्तर ______

४. ऊन हाँग, युन भांग, लुंग मेन काय आहेत ?

उत्तर ______

५. "ध्यान योगा" हे तत्वज्ञान कोरिया मध्ये केव्हा पोहचले ?

उत्तर ______________________

६. भारतीय संस्कृतीचा जपान मध्ये प्रसार कसा झाला ?

उत्तर ______________________

७. जपान मध्ये शित्तान (सिद्धम) कशाला म्हटले जाते ?

उत्तर ______________________

८. इसवीसनाचे सातवे शतक ते सतरावे शतक या दरम्यान किती संस्कृत ग्रंथ तिबेटी भाषेत भाषांतरीत झाले ?

उत्तर ______________________

## २१.५ श्रीलंका व आग्नेय आशियातील भारतीय संस्कृती ः

### श्रीलंका ः

तुम्ही रामायण हे महाकाव्य तर वाचलेच असेल. ज्यामध्ये भगवान राम, अयोध्येचा राजा, आपल्या पत्नी सीतेला परत आणण्यासाठी श्रीलंकेत जातो. त्या वेळेची लंका व आताची श्रीलंका वेगळया जागा असू शकतात. सम्राट अशोकाने भारताबाहेर बौद्ध धर्माच्या वाढीसाठी फार प्रयत्न केले. अशोकाने आपली कन्या संघमित्रा आणि पुत्र महेंद्र यांना बुद्धाच्या संदेशाचा प्रसार करण्यासाठी श्रीलंकेला पाठविले. नंतर अनेक विद्वान त्यांना येऊन मिळाले. असे म्हटले जाते की बोधगया येथील बोधी वृक्षाची फांदी तेथे त्यांनी नेली व तिथे रोपण केले. त्यावेळेस राजा देवानामपिया तिस्सा तेथे राज्य करत होता. भारतातून गेलेल्या लोकांनी बुद्धांची शिकवण येथे तोंडी संक्रमित केली. जवळजवळ दोनशे वर्षे श्रीलंकेत लोकांनी महेंद्राने संक्रमीत केलेली बौद्ध धम्म सूत्रे पाठांतराने जतन करून ठेवली. तेथे बांधण्यात आलेले पहिले विहार महविहार आणि अभयागिरी हे आहेत.

श्रीलंका बौद्ध धर्माचा बालेकिल्ला बनला व आजही श्रीलंका हा बौद्ध धर्माचा बालेकिल्ला टिकून आहे. पाली त्यांची वाङ्मयीन भाषा बनली.

बौद्ध धर्माबरोबरच भारतीय कला प्रकारही श्रीलंकेत पोहोचले. चित्रे, नृत्ये, लोकगीते यांची शैली व तंत्र भारतीय कला प्रकारातून उचललेले आहे. सिगिरिया येथील गुंफा विहारातील चित्रे प्रसिद्ध आहेत. इसवीसनाच्या पाचव्या शतकात राजा कश्यप यांनी या विहाराचे रूपांतर संरक्षित क्षेत्रात केले. या गुंफातील चित्र भारताच्या अमरावती शैलीत रंगविली आहेत.

### म्यानमार ः

भारतातील लोक व संस्कृती इसवीसनाच्या पहिल्या शतकापासून म्यानमारमध्ये दाखल होऊ लागले. चीनला जाण्याच्या मार्गावर म्यानमार आहे. इसवीसनाच्या दुसऱ्या शतकानंतर ताम्रलिपी व अमरावती अशा बंदराच्या ठिकाणाहून आलेले लोक बऱ्याच वेळा म्यानमारमध्ये स्थायिक झाले. जे लोक स्थलांतरीत आले होते त्यात व्यापारी ब्राह्मण, कलाकार, कारागिर व इतर होते.

म्यानमारमध्ये पागान हे अकराव्या ते तेराव्या शतकातील बौद्ध संस्कृतीचे महान केंद्र होते. आज ही ते त्याच्या पॅगोडाबद्दल प्रसिद्ध आहे. सम्राट अनिरूद्ध हे महान निर्माते होते. त्यांनी शेवेझगाँव पॅगोडा आणि जवळपास इतर हजार मंदिरे बांधली. ब्रह्मदेशातील दरबारात भारतीय परंपरा प्रकर्षा ने पाळल्या जात. अगदी अलिकडेच्या काळापर्यंत ज्योतिषी, भविष्यकथन करणारे व विद्वत्ता प्रचुर व्याख्याने देणारे प्राध्यापक हे ब्राह्मण होतेव त्यांना पोण्णा म्हटले जाई. त्यातील बरेच जण मणिपूर मधील होते असे मानण्यात आले होते. तेथील पंडित फार उद्योगी होते. ते त्यांच्या ज्ञानाबद्दल, विज्ञानाबद्दल वैद्यकिय ज्ञानाबद्दल आणि ज्योतिष विद्येबद्दल प्रसिद्ध होते.

### थायलंड ः

१९३९ सालापर्यंत थायलंडला सयाम या त्याच्या मूळ नावाने संबोधले जायचे. इसवीसनाच्या पहिल्या शतकात भारतीय प्रभाव तेथे पोहोचू लागला. पहिल्यांदा तो भारतीय व्यापारी त्यानंतर शिक्षकांनी आणि नंतर धर्मप्रचारकांनी तथे पोहोचवला. थाई राजवटीला द्वारावती, श्री विजय, सुखोदय आणि आयुथिया अशी संस्कृत नावे दिलेली होती. त्यांच्या शहराच्या नावावरूनही प्रभावी सांस्कृतिक प्रभाव दर्शविला जातो. उदा.कंचानाबुरी हे कांचनापुरीम वरून राजपुरीवरून राजबुरी, लावापुरीवरून लोबपुरी ही थायी नावे निर्माण झाली आहेत. प्राचीन बुरी सिंगबुरी ही इतर शहरांची नावे ही संस्कृत नावावरून आलेली आहेत. राजाराम राजाराणी महाजय चक्रवंश ही रस्त्यांची नावे आपल्याला तेथील रामायणाच्या लोकप्रियतेची प्रचिती देतात.

तिसऱ्या आणि चौथ्या शतकात ब्राह्मणी मूर्ती आणि बौद्ध मंदिरे यांची बांधकामे सुरू झाली. तेथे सगळयात प्राचीन मूर्ती विष्णूची मिळाली आहे.

वेगवेगळया काळात थायी साम्राज्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविले जात होते. प्रत्येक ठिकाणी मंदिरे बांधली जात होती. अयुथिया (आयोध्या) हे असे एक स्थळ आहे की जेथे बहुसंख्य मंदिरे अजूनही उभी असून त्यातील बरीच पडझडीच्या अवस्थेत येऊन पोहोचली आहेत. सध्याच्या थायलंडची राजधानी असलेल्या बँकाक मधे चारशे मंदिरे आहेत.

### कंबोडिया ः

खोलवर रूजलेल्या भारत कंबोडिया सांस्कृतिक संबंधांचा इतिहास इसवी सनाच्या पहिल्या ते दुसऱ्या शतकापर्यंत मागे जातो. कौंडीण्य ऋषींनी पहिल्यांदा भारतीय संस्कृती कंबोडियात नेली. कंबोडियन लोकांनी भव्य ऐतिहासिक वस्तु बांधल्या आणि शिव, विष्णू, बुद्ध भारतीय महाकाव्ये आणि पुराणातील देव त्यांच्या मूर्तीनी त्या वस्तु सजविल्या. येथील राजे महत्वाचे ऐतिहासिक प्रसंग सूचित करण्यासाठी धर्मग्रंथातील महत्वाचे प्रसंग निवडत. चौदाव्या, शतकापर्यंत संस्कृत ही त्यांच्या प्रशासनाची भाषा होती.

राजे लोक संस्कृत नावे घेत. ब्राह्मण उच्च स्थान भूषवत हिंदू राजनितीनूसार आणि ब्राह्मणी न्याय

पद्धतीनुसार शासन व्यवस्था चालविली जाई. मंदिराच्या जवळ शैक्षणिक केंद्र म्हणून आश्रम चालविले जात अनेक भागांना ताम्रापुरा, ध्रुवापुरा आणि विक्रमपुरा अशी नावे दिली जात. त्यांच्या भाषेत महिन्यांची नावे येत, विसक, चेत, जेस, असाढ या प्रमाणे असत. वस्तुतः असे हजारो शब्द किंचीत बदललेल्या उच्चारासह आजही येथे वापरात आहेत.

विष्णूचे निवासस्थान वैकुंठधाम मानले गेलेले अंगकोर वट हे एक मंदिर कंबोडियात आहे. या मंदिराची पाच शिखरे सुमेरू पर्वताची पाच शिखरे मानली गेली आहेत. तेथील राजा सुर्यबर्मन याला त्याच्या उत्कृष्ट विजयी कामगिरीबद्दल कंबोडियात विष्णूचा अवतार मानले गेले व ह्या राजाने त्याच्या कामगिरीबद्दल स्वर्ग प्राप्ती केली असे त्याचे चित्रण केले गेले आहे. हे मंदिर एक चौरस मैल परिसरात बांधले गेले आहे. या मंदिराच्या भोवती पाण्याने रूंद भरलेले खंदक आहेत. त्यामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडलेली आहे. मंदिराच्या भिंतीवर रामायण व महाभारतातील प्रसंग कोरलेले आहेत. या सर्व कोरलेल्या प्रसंगात समुद्र मंथनाचा लांबलचक प्रसंग भिंतीवर कोरलेला आहे.

### व्हिएतनाम (चंपा) ः

भारतीय संस्कृती या दूरवरच्या देशात अनेक उद्यमशील व्यापारी व राजदूतांनी नेली. जे तेथे स्थलांतरीत झाले आणि त्यांनी राजकीय व आर्थिक क्षेत्रात जम बसविला. त्यांनी तेथील शहरांना इंद्रपुरा, अमरावती, विजया, कौथरा, पांडुरंग इ नावे दिली.

चंपाच्या लोकांना चाम म्हणत. त्यांनी अनेक हिंदू व बौद्ध मंदिरे बांधली. हे लोक शंकर, पार्वती, सरस्वती, लक्ष्मी, गणेश, बुध आणि लोकेश्वर या देवतांची पूजा करत. सध्या बहुसंख्य मंदिरे ऱ्हासाच्या मार्गावर आहेत.

### मलेशिया ः

मलेशिया आपल्याला प्राचीन काळापासून माहित आहे. रामायणात जातक कथात मिलिंद पन्हा, शिल्पाधिकरण रघुवंशात मलेशियाचे संदर्भ आलेले आहेत. शैव धर्माचा मलेशियात प्रभाव असल्याचे पुरावे केडद आणि वेलस्ली प्रांतातून मिळाले आहेत. त्रिशुल धारण केलेल्या स्त्री देवतांच्या मूर्ती उत्खननातून मिळाल्या आहेत. अग्निजन्य पाषाणापासून बनवलेली नंदी मुख, नक्षीदार उठावदार दुर्गामाता शिल्प, गणेश आणि शिवलिंग अशा अनेक देवतांच्या सातव्या ते आठव्या शतकातील मूर्ती ठिकठिकाणाहून मिळाल्या आहेत.

सर्वात शेवटच्या अवस्थेतील ब्रम्ही लिपी ही मलेशियाची लिपी होती. जुन्या तमिळ लिप्यांशी साम्य असणाऱ्या लिपीत बौद्ध धर्मग्रंथातील भाग लिहिलेल्या चकत्या केडद येथे मिळाल्या आहेत. संस्कृत ही त्यांची एक साधन भाषा होती. आजही त्यांच्या भाषेत अनेक संस्कृत शब्द आढळतात. उदाहरणार्थ ः स्वर्ग, रस, गुण, दंड, मंत्री, धीपती, लक्ष्य, इत्यादी. हनुमान आणि गरूड मलेशियात त्यांच्या अतिमानवी शक्ती बद्दल माहित होते.

आपल्या मलेशियाशी असलेल्या संबंधाच्या सर्वात प्राचीन नोंदी कोरीव लेखनातून मिळतात. हे कोरीव लेख इसवीसनाच्या चौथ्या ते पाचव्या शतकातील भारतीय लिपीत लिहिले आहेत. सर्वात महत्वाचा कोरिव लेख लिंगोर येथील आहे. हे एक महत्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणच्या आसपास पन्नास मंदिरे मिळाली आहेत.

### इंडोनेशिया ः

इंडोनेशियातील जावा बेटावर धार्मिक इमारतींपैकी सर्वात भव्य शिवमंदिर आहे.या मंदिराला प्रंबानन म्हणतात. हे मंदिर नवव्या शतकात बांधले गेले. या मंदिराच्या दोन बाजूला विष्णू आणि ब्रह्मदेवाचीही मंदिरे आहेत. या मंदिराच्या समोरच या देवतांची वाहने मानलेल्या देवतांची मंदिरे आहेत. शिवासाठी नंदी, विष्णूसाठी गरूड व ब्रह्मासाठी हंस ही वाहने मानली गेली आहेत. या मंदिराच्या दोन रांगामध्ये दुर्गा आणि गणेशासाठी मंदिरे बांधली आहेत व त्यांच्या भोवती २४० लहान मंदिरे आहेत. आश्चर्यकारक वास्तुकलेचे हे नमुने आहेत. रामायण आणि भगवान कृष्णाच्या कथा मंदिराच्या भिंतीवर कोरलेल्या आहेत. या कथांची ही कोरीव कामे जगातील सर्वात जुनी कोरीव कामे आहेत.

पूजेच्या वेळी संस्कृत सूत्रांचे पठण केले जात असे. शिव ब्रह्मदेव, दुर्गा, गणेश, बुद्ध आणि इतर देवतांसाठी लिहिली गेलेली पाचशे पेक्षा जास्त स्तोत्र व सूत्रे बाली येथून मिळाली आहेत.

जावामधून दोन हजारापेक्षा जास्त धार्मिक ग्रंथाचा शोध लावला गेला आहे. हे धार्मिक ग्रंथ बहुधा भूर्ज पत्रावर त्यांच्या जुन्या लिपित लिहिले जात. त्यांच्या लिपीला कावी म्हणत. ब्रह्मी लिपीवरून कावी लिपीची उत्पत्ती झाली. अनेक भूर्जपत्रावर संस्कृत श्लोक असून त्यावर कावी भाषेत भाष्ये लिहिलेली आहेत. येथील शैवधर्म आणि तत्वज्ञानावरील ग्रंथात भुवनकोश हा सर्वात जुना आणि दीर्घ ग्रंथ आहे. या ग्रंथात ५२५ संस्कृत श्लोक आहेत. ह्या ग्रंथाचा अर्थ सांगण्यासाठी व स्पष्टीकरणासाठी एक भाष्यग्रंथ लिहिलेला आहे.

कदाचित जगातील कोणत्याही राज्यावर, भारतीय संस्कृती आणि धर्माचा एवढा प्रभाव जाणवला नाही, इतका प्रभाव या संस्कृतीने दक्षिण पूर्व आशियात केला. या संस्कृतीचा प्रभाव आपल्याला भारतातील प्राचीन आशियाच्या लिखाणात व संस्कृतित दिसतो. भारताचा हा प्रभाव सर्वत्र दिसतो. प्राचीन लिखाण, साहित्य भाषा, धर्म, राजकारण, सामाजिक संस्था यांच्यावर भारताचा प्रभाव दिसतो. वर्ण रचनेमुळे समाज जातीत विभागला. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र. ही रचना आशियन लोकांना माहिती होती. पण त्यांची रचना भारतातील जातीरचनेप्रमाणे अभेद्य नव्हती. ती ऋग्वेदाकाळामध्ये जशी होती तशी होती. ज्यामध्ये माणसाची जात त्यांच्या व्यवसायावर ठरत असे. त्याच्या जन्मावर नाही. तसे बालीमध्ये होते. त्यांचे कांही धार्मिक संस्कार आणि लग्न संस्कार ही भारतातील परंपरेनुसार आहेत.

सगळयात मनोरंजक खेळ म्हणजे बाहुल्यांचा खेळ. ज्याला वायांग (भारतातील हलत्या बाहुल्याच्या खेळासारखा) म्हणतात. या खेळात भारतातील रामायण व महाभारतातील कांही कथा दाखवितात. व तो अजूनही दक्षिण पूर्व आशियात प्रसिद्ध आहे.

### पाठ्यांशांवरील प्रश्न २१.३

१. श्रीलंकेतील पहिल्या दोन (मठ) विहारांची नावे लिहा.

उत्तर ____________________



टिपा



२. बौद्ध धर्म श्रीलंकेत कसा पोहोचला ?

उत्तर

३. कोणती भाषा श्रीलंकेची वाङ्मय भाषा झाली ?

उत्तर

४. आंकोर वट काय आहे ?

उत्तर

५. आंकोरवटाची पाच शिखरे कशाचे प्रतिक मानली गेली आहेत?

उत्तर

६. आंकोर वट मंदिर कशाचे प्रतिक आहे ?

उत्तर

७. आंकोरवट मंदिराच्या बांधकामाचे वैशिष्टय सांगा.

उत्तर

८. आंकोर वट मंदिराच्या भिंतीवर काय कोरण्यात आले आहे ?

उत्तर

९. आंकोर वट मंदिरामध्ये कोरण्यात आलेले सर्वात महत्वाचे दृश्य कोणते ?

उत्तर





१०. वफौंन मध्ये काय आहे ?

उत्तर

११. व्हिएतनाम (चंपा) मधील काही शहरांचे नावे सांगा. जी भारतीय संस्कृतीवर आधारित आहेत.

उत्तर

१२. मलेशिया मध्ये शैवधर्माचा प्रभाव असलेले पुरावे कोठे सापडले ?

उत्तर

१३. मलेशिया मध्ये संशोधनात सापडलेल्या महत्वाच्या गोष्टी लिहा.

उत्तर

१४. मलेशियन भाषेमध्ये कोणते संस्कृत शब्द सापडतात ?

उत्तर

१५. चौथ्या व पाचव्या शतकातील सर्वात महत्वाचे मलेशियन लिखाण कोणते ?

उत्तर

१६. लिगोर मध्ये किती मंदिरे सापडली होती ?

उत्तर

१७. प्रंबानन काय आहे ?

उत्तर

१८. शिव, विष्णू व ब्रह्म या तीन मंदिराच्या समोर काय बांधले गेले ?

उत्तर

१९. इंडोनेशियाच्या जावा बेटावर किती मंदिरे आहेत ?

उत्तर ______________________

२०. इंडोनेशियाच्या मंदिराच्या भिंतीवर कोणत्या गोष्टी कोरल्या गेल्या आहेत ?

उत्तर ______________________

२१. बाली इंडोनेशियामध्ये कशाचा शोध लागला ?

उत्तर ______________________

## २१.६ भारत व अरबी जगांमधील संबंध ः

भारताचे पश्चिम आशियाशी समुद्रमार्गे व खुष्कीच्या मार्गे फार प्राचीन काळापासून संबंध होते. या दान सांस्कृतिक प्रदेशांमधील संबंध (राष्ट्र ही संकल्पना त्या काळात विकसित झालेली नव्हती.) इस्लामी संस्कृतीच्या पश्चिम आशियातील विस्तारामुळे मुख्यतः अधिक जवळचे बनले. या दोन प्रदेशातील आर्थिक संबंधाविषयी नवव्या शतकाच्या मध्यापासून अरब प्रवासी तसेच सुलेमान व्यापाऱ्यांसारख्या इतर प्रवाशांच्या वर्णनातून माहिती मिळते. यामध्ये अल मसुदी इब्ना हकल अल इद्रीसी इत्यादींचा समावेश होतो. ह्या प्रवासवर्णनातून या दोन भागातील भरभराटीस आलेल्या व्यापारी विनिमयाची खात्री पटते. सांस्कृतिक अंगानी ह्या दोन प्रदेशात आलेल्या फार क्रियाशील असलेल्या परस्पर आदान प्रदानचे पुराव आठवे शतक आणि त्या पूर्वीचे आहेत.

पश्चिम आशिया आणि भारतामधील फलदायी परस्परसंबंध अनेक क्षेत्रातून दिसून येतो. इस्लामी जगत यामुळे कसे समृद्ध झाले याबद्दल आपण माहिती घेणार आहोत. ब्रह्मस्फुट सिद्धांत ज्याला अग्नी जगतात सिन्दीन या नावाने ओळखले जाते आणि खंडखाद्यका (अरकांड) हे दोन भारतीय ग्रंथ सिंधमधील त्या दूतावासातील दोन भारतीय विद्वानांच्या मदतीने अल्फाझरी यांनी अरबीमध्ये भाषांतरीत केले. त्यांना कदाचित या कामात चाकुबर युन तारिख यांनी सहाय्य केले असावे. नंतर आर्यभट्ट आणि वराहमिहीर यांच्या खगोलशास्त्रावरील ग्रंथाचाही अभ्यास करून त्याच अरबांच्या शास्त्रीय वाङ्मयात समावेश करण्यात आला.

भारताचे अरबी संस्कृतीला दुसरे महत्वाचे योगदान गणितात होते. (भारतीय ह्या क्षेत्रातील अरबांवर ऋण इतके मोठे होते की) अरबांनी गणिताच्या क्षेत्रातील भारताचे ऋणमान्य करण्यासाठी गणिताला हिंदीसा (भारताशी संबधित) ही संज्ञा दिली. वस्तुतः भारतीय गणित हा अरबांचा अभ्यासाचा आणि चर्चेचा आवडता विषय बनला. त्याची लोकप्रियता अलकिंदी यांच्या अरबी ग्रंथानी वाढविली. इतर काही बाबीमध्ये भारतीय दशमान अंक गणन पद्धतीच्या क्रांतीकारी स्वरूपाची त्यांनी तत्काळ दखल घेतल्याचे दिसते. समकालीन सिरीयन विद्वानाने दशमान पद्धतीबद्दल गौरवोद्‌गार काढताना म्हटले आहे. "फक्त नऊ चिन्हांच्या सहाय्याने गणन केले जात असे ग्रीकांना वाटते. त्या लोकांना फक्त ग्रीक बोलता येते. त्यामुळे ते विज्ञानाच्या सीमेपर्यंत पोहोचले, असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे की इतरही काही लोकांना त्यांच्यापेक्षा जास्त माहिती आहे."





## भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

दहाव्या आणि तेराव्या शतकातील अनेक अरबी ग्रंथ आपल्याला भारतातील अनेक वैद्यकिय रोग निवारणावरील ग्रंथाबद्दल माहिती सांगतात. हे ग्रंथ खलिफ हरूण अल रशिद या बगदादच्या राजाच्या प्रयत्नाने इसवी सन ७८६ ते ८०९ मध्ये संस्कृतमधून अरबीत भाषांतरीत झाले. भारतीय विद्वान ही भाषांतराच्या कामात सामील होते. उदाहरणार्थ मंख नावाच्या भारतीय व्यक्तिने सुश्रुत संहितेचे अरबीत भाषांतर केले.

खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्रा व्यतिरिक्त अरबांनी भारतीय संस्कृती व सभ्यतेच्या अनेक अंगाचे कौतुक केले. त्यांनी अनेक विषयावरील बहुविध भारतीय ग्रंथाचे भाषांतर केले.परंतु ते फक्त भाषांतरावर समाधानी राहिले नाहीत तर त्यांनी भाषांतरीत केलेल्या प्रबंधावर आधारित मुळ घटक व घटकांचे प्रमाणशीर मिश्रण व त्यातून तयार होणारे पदार्थ स्वतः तयार करण्याचे प्रयत्न केले. साप, विष, पशु संवर्धन, कला, तर्कशास्त्र व तत्वज्ञानावरील ग्रंथ, नितीशास्त्र, राज्यशास्त्र, सामाजिक शास्त्र, भारतीय ज्ञानाच्या इतर क्षेत्रामधील अरबांच्या ग्रंथाच्या अभ्यासात वरील सर्व विषयावरील भारतीय ग्रंथाचा समावेश होतो. ह्या सर्व प्रक्रियेत त्यांचा शब्दसंग्रह जाणवण्याइतपत समृद्ध झाला. उदा. ज्या नौकानयनाच्या क्षेत्रात अरब आघाडीवर होते. (प्रविण) त्या नौकानयनात जे अरबी शब्द प्रचलीत आहेत त्या अशा अनेक शब्दांचे मूळ संस्कृतमध्ये आहे असे अनेक शब्द तुम्ही चटकन ओळखू शकता. उदा. हुरती (लहान बोट) हा शब्द संस्कृतमधील होरी या शब्दावरून किंवा वानिक वरून आलेला आहे. डोणीज हा शब्द डोंगीवरून आलेला आहे असे कितीतरी शब्द सांगता येतील.

## २१.७ भारताचा रोमशी संबंध ः

पश्चिमी देशात दक्षिण भारतातील व्यापारी मालाला फार मागणी होती. वस्तुतः इसवी सनाच्या पहिल्या तीन शतकात पाश्चिमात्याशी असलेला समुद्री व्यापार भारताच्या फायद्याचा होता. हा व्यापार मुख्यतः रोमन साम्राज्यांशी होता. रोमन लोक भारतीय मालाचे उत्तम ग्राहक होते. हा व्यापार मुख्यतः दक्षिण भारतातून होत होता. अनेक वाङ्मयीन ग्रंथ व कोईमतूर आणि मदुराई येथ सापडलेल्या रोमन नाण्यावरून अशा दोन्ही साधनांनी वरील विधानाची सत्यता पटते. मिरी, सुपारी, विडयाची पाने, मसाल्याचे पदार्थ, अत्तरे यांना रोमन साम्राज्यात मोठी मागणी होती. माणिक, जांभळया रंगाच्या याकुत, मौल्यवान खडे, मोती, हस्तीदंत, रेशीम आणि भारताच्या हस्तउद्योगातून निर्माण केलेल्या तलम मलमली यांना रोमन साम्राज्यात मोठया प्रमाणावर मागणी होती. या व्यापारामुळे भारताला सोन्याची अधिक प्राप्ती होणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे भारताला व्यापारात अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली. त्यातून भारतात त्या काळात कुषाण साम्राज्याला स्थिर सुवर्णचलन प्राप्त झाले. तामिळ राजे युद्धभूमीवर त्यांच्या तंबूचे संरक्षण करण्यासाठी व मुदाराईच्या प्रवेशद्वारावर रक्षक म्हणून यवन लोकांना नोकरीत ठेवत. प्राचीन भारतात यवन हा शब्द पश्चिम आशिया व भूमध्य समुद्री प्रदेशातील लोकांसाठी वापरला जाई व त्यात रोमन आणि ग्रीक लोकांचा ही समावेश होई. काही इतिहासकारांना यवन रक्षक म्हणजे रोमन सैनिक तुकडीतील सैनिक असावेत असे वाटते.

याकाळात कावरेपट्टण हे एक महत्वाचे परदेश व्यापारी केंद्र बनले होते. कावरे पट्टणला जहाजे लावण्यासाठी फलाट बांधण्यात आले होते. जहाजातून उतरणारा माल साठविण्यासाठी वखारी व गोदामे समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आली होती. ह्या मालावरील आयात कर वसूल केल्यानंतर त्यावर चोलांच्या वाघाच्या राजमुद्रेचा शिक्का मारल्यानंतर हा माल व्यापाराकडे पाहोचता होई.

पट्टीन पडलाई किंवा वखारीजवळ परदेशी व्यापाऱ्यांच्या वसाहती असत. हे व्यापारी अनेक भाषा बोलत. या व्यापाऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी मोठमोठे बाजार भरविले जात.

सुवासिक भुकटी आणि अर्धप्रवाहित सुगंधीत द्राव यांचे विक्रेते, फुलांच्या अत्तरांचे विक्रेते, रेशमी कापडाचे विक्रेते इत्यादीचे व शिंपी लोकर किंवा कापसाचे व्यापारी चंदन, मोती, सोने, मौल्यवान खडे, धान्याचे व्यापारी, धोबी, माशांचे व्यापारी, मिठाचे व्यापारी, कसाई, लोहार, सुतार, सोनार, चित्रकार, शिल्पकार, चांभार, खेळणी बनविणारे इतके व्यावसायिक ह्या बाजारात असायचे. या बाजारात फार दूरवरून समुद्रापलिकडील भूमीवरून घोडे आणले जात.

अशा बाजारात येणाऱ्या वस्तू ह्या निर्यातीसाठी बाजारात आणल्या जात. मिरी व आले जे भारतातून निर्यात होई. त्यांच्या किंमतीपेक्षा शंभरपट अधिक त्याची किंमत रोममध्ये द्यावी लागे. अत्तरे, मसाल्याचे पदार्थ आणि भारतातील सुगंधीत पदार्थांना चांगली मागणी होती. रोममध्ये या पदार्थां च्या उपभोगावर प्रचंड खर्च केला जाई.

या काळात भारतीय राजाचा दरबारात पोहोचलेले परदेशी राजदूत यावरून ह्या काळातील परदेशाशी चाललेला भारताचा प्राचीन व्यापार किती महत्वाचा होता हे आपल्या लक्षात येईल. परदेशी लोकांच्या वसाहतीचे हितसंबंध राजनैतिक कराराने निश्चित केले जात. इ.स.पूर्व पहिल्या शतकात पांडय राजाने सम्राट ऑगस्टस याकडे राजदूत पाठविले. तसेच इ.स.९९ नंतर ट्राय यांच्या कडे ही राजदूत पाठविले. क्लाडिअस (सिलोन) ट्राजन, ॲनटोनिमस, पुईस, इन्स्टीमन आणि इतर राजदूतांनी भारतातील विविध राजांच्या दरबाराची शोभा वाढविली.

रोम बरोबरच्या व्यापाराची व्याप्ती इतकी वाढली की ह्या व्यापाराला गती प्राप्त व्हावी म्हणून सोपारा (नाला – सोपारा) बॅरिगाझा (भडोच) ही बंदरे पश्चिम किनाऱ्यावर बांधण्यात आली. तर कोरोमंडल म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील उपयोग सुवर्णभूमी आणि सुवर्णद्विप या प्रदेशांशी व्यापार करण्यासाठी झाला. चोल राजांनी त्यांच्या बंदरावर रात्रभर झगमगीत प्रकाश देणाऱ्या दीपस्थंभाची व्यवस्था केली. अरिकामेडू या पाँडेचरी जवळील प्रसिद्ध ठिकाणी इटालियन बनावटीची अरेन्टाइन नावाची मातीची भांडी मिळाली आहेत. या भांडयावर इटालियन कुंभाराचे शिक्के उमटविले आहेत. रोमन दिव्याचे तुकडे ही येथे आढळले आहेत.

आंध्रच्या भागातही त्या वेळच्या व्यापाराचे पुरावे मिळाले आहेत. या प्रदेशातील काही बंदरे आणि काही अंतर्भागातील शहरे परदेशी व्यापारात भाग घेत होते. पैठण येथून गोमेद खडे आणि तगारा हे सुती कापड तसेच मलमलीचे कापड परदेशी पाठविले जात होती. आंध्र राजा याज्ञ श्री सातकर्णीने जहाजाचे चित्र असलेले वेगळे नाणे काढले. हे राजाच्या समुद्री व्यापाराचे संकेत रूपी चिन्ह आहे.

## २१.८ जहाजे आणि परदेशी व्यापार ः

भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार होण्यासाठी अशा प्रकारे व्यापार हे एक महत्वाचे साधन होते व त्यासाठी व्यापाराची फार मदत झाली. फार प्राचीन काळातही आपली जहाजे उघडया समुद्रावरून प्रवास करू शकत असायची व ती परदेशी किनाऱ्यावर जाऊन अनेक देशांशी व्यापारी संबंध निर्माण करू शकायची. शेजारी देशाचे वाङ्मय, कला आणि शिल्पकला स्पष्टपणे भारतीय संस्कृती व सभ्यतेचा प्रभाव दर्शवितात. सुरीनाम, कॅरेबियन, बेटे, अमेरिकी किनाऱ्याजवळची व फार दूरवरची काही बेटे यावर प्राचीन भारतीय संस्कृतीचा प्रभाव दिसतो.

## भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

इ.स. ३४० – ३८० मधील सम्राट समुद्र गुप्त यांच्याकडे शक्तिशाली सैन्याबरोबरच शक्तिशाली आरमार होते. गंगा द्वीपकल्पाच्या पलिकडील प्रदेश आणि मलायावरील लहान लहान बेटांवर मिळालेल्या कोरीव लेखावरून गुप्तकाळातील भारतीय दर्यावर्दी लोकांच्या कामगिरीचा प्रत्यय येतो. सम्राट व हर्षवर्धन (६०६–६४७) याच्या काळात भारताला भेट दिलेल्या प्रवाशाने त्या काळातील भारताचे विस्तृत वर्णन केले आहे. चोल राजांनी बळकट आरमार बांधले आणि समुद्रावरून मोठया मोहिमा आखल्या.

भारतातील काही व्यापारी जवळजवळ पन्नास जहाजांचे मालक होते. अशी पोर्तुगिजानी नोंद करून ठेवलेली आहे. त्यांच्या मते व्यापाऱ्यांच्या दृष्टीने स्वतःच्या मालकीची जहाजे असणे हा नेहमीचा प्रघात होता.

सिंधू संस्कृतीमधील काही वस्तु पश्चिमेकडच्या अनेक ठिकाणी आढळून आल्या. त्यावरून इजिप्तच्या लोकांशी व मेसेपोतिंमियन लोकांशी इ.स. पूर्व तीन हजार वर्षापूर्वी भारताचे व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध होते हे सिद्ध होते. भारताचे प्राचीन पर्शिया (इराण), ग्रीस आणि रोमशी सुद्धा संबंध होते. त्यामुळे सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कल्पनांच्या आदान प्रदानाला मोठी गती मिळाली. रोमन इतिहासकार लिनी याने रोमन संपत्तीचे जे वहन भारताकडे होत आहे, त्यावद्दल खेद व्यक्त केला होता. यावरून रोमन साम्राज्याशी असलेला व्यापार किती भरभराटीला आला होता हे सिद्ध होते.

## पाठ्यांशांवरील प्रश्न २१.४

१. भारत आणि अरबचे व्यावहारिक नाते किती जुने आहे ?

उत्तर

२. प्रमुख अरबी प्रवाशांची नावे लिहा.

उत्तर

३. भारताने कोणते २ खगोलशास्त्रावरील ग्रंथ अरब देशाला दिले ?

उत्तर

४. भारताचे अरब देशासाठी गणिताच्या क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

उत्तर

५. शुश्रुत संहितेचे अरबी मध्ये कोणी भाषांतर केले ?

उत्तर

६. कोणाच्या सांगण्यावरून भारतातील औषधे व वैद्य अरब मध्ये पाठवण्यात आली ?

उत्तर

७. अरबांनी भारतातील कोणत्या क्षेत्रांचा अभ्यास केला ?

उत्तर

८. भारतामध्ये रोमन नाणी कोठे सापडली ?

उत्तर

९. अरब लोकांमध्ये कोणत्या गोष्टींची खुप मागणी होती ?

उत्तर

१०. कुषाण साम्राज्याला स्थिर सुवर्णचलन कसे प्राप्त झाले?

उत्तर

११. यवन कोण होते ?

उत्तर

१२. प्राचीन भारतात यवनाचे काम काय होते ?

उत्तर

१३. प्रसिद्ध इटली पॉटरी सेरिटाईन चे अवशेष भारतामध्ये कुठे सापडले ?

उत्तर

१४. आंध्रातील कोणत्या राज्याने नाणी प्रसिद्ध केली ज्यावर समुद्र व्यवहारा चे प्रतिक म्हणून जहाजाचे चित्र होते ?

उत्तर

## तुम्ही काय शिकलात?

- अनेक प्रकारांनी भारतीय संस्कृती जगाच्या विविध भागात प्राचीन काळात प्रसारीत झाली.
- भारतीय विद्यापीठे त्यांच्या शैक्षणिक दर्जाबद्दल प्रसिद्ध होती. ह्या विद्यापीठांनी विविध देशांतील विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेतले. हे विद्यार्थी भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचे प्रतिनिधी बनले.
- संस्कृत व बौद्ध ग्रंथ अनेक भाषेत भाषांतरीत झाले. भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचे ते उत्तम साधन बनले.
- ज्या ठिकाणी भारतीय संस्कृती पोचली त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर विहार आणि मंदिरे बांधण्यात आली.
- अनेक देशांच्या कलाकारांनी भारतीय कला शैली स्विकारली.
- भारतीय महाकाव्ये अनेक देशात लोकप्रिय आहेत. रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आग्नेय आशियात लोकप्रिय आहे.
- बौद्ध धर्माचा स्वीकार करणारे श्रीलंका हे पहिले राष्ट्र होते.
- आग्नेय आशियातील अनेक देशांसाठी भारतीय ब्रह्मी लिपी ही त्यांच्या स्वतःच्या लिपीसाठी आदर्श प्रतिकृती होती.
- आशियाई देशात मिळालेले अनेक कोरीव लेख हे भारत आशियाई राष्ट्राच्या सांस्कृतिक संबंधाच्या इतिहासासाठी महत्वाची साधने आहेत.
- ब्रह्मदेश, थायलंड, श्रीलंका आणि कंबोडिया या देशात अजुनही बौद्ध धर्म प्रचलित आहे.
- अरबी संस्कृतीला भारताकडून गणिताचे योगदान मिळाले.

## सत्रान्त अभ्यास

१. कोणत्या विविध प्रकारांनी भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार झाला ?

२. प्राचीन विद्यापीठांची भारतीय संस्कृतीच्या प्रसारामधील भूमिका सांगा.

३. पूर्व आशियात बुद्ध धर्म शांतिप्रिय धर्म म्हणून कसा पोहोचला ?

४. थायलंड मधील भारतीय संस्कृतीचे विश्लेषन करा.

५. इंडोनेशियातील धार्मिक वास्तुकलेचे वर्णन करा.

६. भारताचे रोम बरोबरचे व्यापारीक संबंध थोडक्यात सांगा.

७. प्राचीन भारताचे समुद्रमार्ग व विदेशी व्यापार स्पष्ट करा.

## प्रश्नांची उत्तरे

### २१.१

१. व्यापारी, शिक्षक.

२. नालंदा व वलभी विद्यापीठे

३. तारानास्था, तिबेट विद्वान

४. कश्यप मारतांगा आणि धर्मरक्षिता

५. तो राजाच्या आज्ञाने संस्कृत मधील काही पुस्तके ग्रंथे चायनिज मध्ये भाषांतर करण्यासाठी गेला.

६. ज्या लोकांनी भारत सोडला व फिरत युरोप मध्ये गेले किंवा तिथे स्थाईक झाले. ते भारतीय सांस्कृतिक राजदूत झाले.

### २१.२

१. कारण रेशीम हा चीनचा सर्वात महत्वाचा व्यापार होता.

२. कुची मध्य आशियात होते. या ठिकाणी रेशीम मार्गाला दोन फाटे फुटत.

३. खोटन एक ओएसिस राज्य.

४. जगातील प्रसिद्ध गुंफा

५. १८ वे व १९ वे स.न.मध्ये

६. भारतीय संस्कृती जपान मध्ये कोरिया मधून गेली. इ.स.५५२ मध्ये कोरियन राजाने जपानला भेट म्हणून बुद्धाचा पुतळा, सुत्र, पूजाचे साहित्य, कलाकार, चित्रकार आणि वास्तुशिल्प दिले.

७. शित्तान मध्ये एक भाषा आहे ज्यात मंत्र आणि अक्षरे लिहीली आहेत.

८. ९६,000 संस्कृत पुस्तके

### २१.३

१. महाविहार व अभ्ययागीरी

२. अशोकाने त्याच्या मुलांना महेंद्र व मुलगी संघमित्राला काही अनुनयासोबत श्रीलंकेत पाठविले. बोधीवृक्षाची एक फांदी श्रीलंकेत रोपण करण्यात आले.

३. पाली

४. विष्णू

५. सुमेरी पर्वतची पाच शिखरे म्हणून संबोधण्यात आले.

६. राज सूर्यबर्मन हे विष्णूचे रूप मानले जाते. त्याने स्वर्गा मध्ये जागा प्राप्त केली.

७. हे मंदिर एक चौरस मैल परिसरात बांधले गेले आहे. या मंदिराच्या भोवती पाण्याने भरलेले रूंद खंदक आहेत.

८. रामायण आणि महाभारताची दृश्ये मंदिरांच्या भिंतीवर कोरली गेली आहेत.





९. समुद्र मंथनाचे दृश्य.

१०. राम आणि रावण रामायणातील दृश्य, कैलासवरील शिव पार्वती समवेत आणि कामदेवचा विनाश यांचे दृश्य.

११. इंद्रापुरा, अमरावती, विजया, काठधारा, पांडुरंगा

१२. खेड व वेसलीचा परिसर

१३. स्त्रियां, नंदी, दुर्गाचे चित्र, गणेश व शिवलिंग.

१४. काही शब्द ः स्वर्ग, रास, गुण, धांग, मंत्री, धिपती, लक्ष्य

१५. लिंगोर मध्ये सर्वात महत्वाचा कोरीव लेख आहे.

१६. ५० मंदिरे

१७. पंवानन हे शिवाचे सर्वात मोठे मंदिर जावा या बेटावर आहे.

१८. शिव, विष्णू आणि ब्रह्म यांच्या वाहनांचे मंदिरे.

१९. ८ मोठी मंदिरे, त्यांच्या भोवती २४० छोटी मंदिरे

२०. रामायण आणि कृष्ण

२१. ५०० पेक्षा जास्त मंत्र, शिव स्तोत्र, ब्रह्म, दुर्गा, गणेश, बुद्ध हे ही इथे सापडले.

**२१.४**

१. नवव्या शतकापासूनचे नाते आहे.

२. सुलेमान एक व्यापारी, अल् मासुदी, एवेन हाकूल, आल अडरीसी

३. अ. ब्रह्मस्फुता सिद्धार्थ ज्याला अरबमध्ये सिद्धीन म्हणून ओळखले जाते.
   ब. खंडखाद्यका (आरखंड)

४. शून्याची संकल्पना आणि दशांश पद्धती

५. मांख

६. खलिफा हरून अल् रशिद

७. सर्प विषयावर पुस्तके, प्राणि विज्ञान पुस्तके, कला, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, राजकारण व युद्धाचे शास्त्र.

८. कोईमतूर आणि मदुराई

९. मिरची, पान, मसाले, हिरे, मोती, रेशीम, मुसलिन

१०. रोम बरोबरच्या व्यापारामुळे भारतात सोने आले. त्यामुळे कुशाण राजवटीत सोन्याची नाणी आली.

११. ग्रीक व रोमन

१२. युद्धभूमी आणि मधुराईच्या फाटकाचे रक्षण

१३. अरिकानेदु पौंडेचैरी जवळ

१४. यजनासरी

अभ्यासक्रम

# भारतीय संस्कृती आणि वारसा

## १.० तर्कसंगत दृष्टीकोन ः

जगाच्या प्राचीन संस्कृती पैकी काळाच्या कसोटीवर उतरलेली भारत ही एक प्राचीन संस्कृती आहे. वस्तुतः इतर समांतर संस्कृतिंपेक्षा बाह्य प्रभावांना सामावून घेण्याचा आणि त्यांना एकरूप करून घेण्याच्या तसेच त्यांना स्वतःच्या सांस्कृतिक धाग्यामध्ये विणून घेण्याच्या भारतीय संस्कृतिला वेगळेपणा दिसून येतो. ह्या संमिश्र प्रभावाने भारतीय संस्कृतीला वेगळेपणा लाभला आहे. ह्या संमिश्र प्रभावाने फक्त भारताचे सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरण समृद्ध केले नाहीतर ते अधिक सशक्त केले. भारतीय कला वास्तुकला संगीत, भाषा, तत्वज्ञान आणि धर्म यातून अनेक शतके ह्या विविध प्रभावाचे प्रतिबिंब पडत आहे. भारताचे नागरीक म्हणून आपल्याला ह्या अनेकांगी आणि समृद्ध वारश्याचा अभिमान पाहिजे. परंतु त्याचबरोबर त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून टीकात्मक मूल्यमापन करणे ही आवश्यक आहे.

## २.० उद्दिष्टये ः

या अभ्यासक्रमाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

- विद्यार्थ्यांना भारताची संस्कृती आणि वारश्यांच्या विविध अंगाचा परिचय करून देणे.
- आपल्या पूर्वजांच्या धार्मिक, तत्वज्ञान, विज्ञान, कला, शिक्षण, भाषा आणि वाङ्मय या क्षेत्रातील योगदानाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.
- भारतीय संस्कृतीच्या सर्व अंगाच्या विविधतेमधील एकतेचे गुणग्राहक आकलन (रसग्रहण)करून देण्यात विद्यार्थ्यांना मदत करणे.
- भारतीय संस्कृतीचा जगातील विविध देशावर झालेल्या परिणामांची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.
- भारतीय संस्कृतीच्या संमीश्र रूपाचे विद्यार्थ्यांना गुणग्राहक आकलन (रसग्रहण) करून देण्यात मदत करणे.
- विद्यार्थ्यामध्ये देशांबद्दल प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करणे.

## ३.० अभ्यासक्रमाचे विवरण ः

| अभ्यास घटक | शीर्षक | गुण |
|---|---|---|
| १. | संस्कृती | १० |
| २. | अनेक काळातील भारतीय संस्कृती | १५ |
| ३. | भाषा आणि संस्कृती | १० |
| ४. | भारतातील धर्म व तत्वज्ञान | १२ |
| ५. | कला | १२ |
| ६. | विज्ञान आणि तंत्रज्ञान | १० |
| ७. | शिक्षण | ०९ |
| ८. | समाज रचना | १० |
| ९. | परदेशातील भारतीय संस्कृतीच प्रसार | १२ |
| | **एकूण** | **१००** |

**अभ्यासक्रमाचे विवरण** **गुण ः १०**

**अभ्यास घटक १ ः संस्कृती** **अध्ययन तासिकाः२०**

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

ह्या अभ्यासघटकाची रचना संस्कृतीची संकल्पना आणि अर्थ यांच्या आकलनात वाढ होण्यासाठी करण्यात आली आहे.

भारतीय संस्कृतीच्या ज्या वैशिष्टयांमुळे ती आगळी वेगळी वनली आहे. त्याचीही चर्चा करण्यात येईल.

### घटक १ ः संस्कृती एक ओळख

- संस्कृतीची संकल्पना
- संस्कृती आणि मानवी जग
- संस्कृती आणि वारसा
- संस्कृतीची वैशिष्टये
- संस्कृतीचे घटक

टिपा



- संस्कृतीचे मानवी जीवनातील महत्व

### घटक २ ः भारतीय संस्कृती

- अर्थ
- भारतीय संस्कृतीची वैशिष्टये
- सांस्कृतिक ओळख अनुबंध, धर्म, प्रदेश व वेश संस्कृती
- सांस्कृतिक प्रभाव

टिपा

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक २ ः** | **गुण ः १५** |
| **युगायुगातील भारतीय संस्कृती** | **अध्ययन तासिकाः३५** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

हा अभ्यासघटक भारतीय संस्कृतीच्या ऐतिहासिक विकासाचे आकलन विकसित करण्याचे लक्ष्य ठेवतो. अनेक काळातून जो भारताच्या संस्कृतीचा विकास झाला आहे त्याचा मागोवा घेतला जाई ल. प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक भारताच्या इतिहासातील वैशिष्टयामुळे वैशिष्टतापूर्ण सांस्कृतिक विकास ठळकपणे नजरेस आणून देणे हा ह्या अभ्यासघटकाचा उद्देश आहे.

### घटक ३ ः प्राचीन इतिहास ः

- हडप्पा संस्कृती
- वैदिक संस्कृती ः समाज आणि धर्म ः भौतिक जीवन आणि अर्थशास्त्र
- लोकप्रिय धार्मिक सुधारणा
- पर्शियन (इराणी) आक्रमणे व त्याचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम
- ग्रीक आक्रमणे आणि त्याचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम.
- महान सम्राट अशोक
- मौर्य व उत्तर मौर्यकाळातील कला आणि वास्तुकला
- गुप्त काळ ः वास्तुकला आणि चित्रकला
- वैदिक ब्राह्मणतत्वाचे पुराणिक हिंदुत्वात रूपांतर
- महान शैक्षणिक केंद्र म्हणून नालंदाचा उदय
- भारतातील ख्रिस्ती धर्म
- दक्षिण भारत ः पल्लव आणि चोल

### घटक ४ ः मध्ययुगीन भारत

- मुस्लीमांचे आगमन
- सुफी पंथाचा उदय
- या काळातील राजकीय पार्श्वभूमी
- भारतातील सांस्कृतिक विकास
- धर्म आणि समाजावर प्रभाव
- लोककला, संगीत, चित्रकला यांचा विकास
- आधुनिक भारतीय भाषांचा उदय
- नव्या धर्मपंथाचा उदय - शिख, झोराष्ट्रीयन
- दक्षिण भारत ः चोल, विजयनगर आणि ब्रहामनी यांच्या काळातील विकास.

### घटक ५ ः आधुनिक भारत ः

- पाश्चात्य प्रबोधन आणि धर्म सुधारणा चळवळीचा भारतावरील प्रभाव.
- अठराव्या शतकाच्या अखेरीचा भारत ः सामाजिक व धार्मिक स्थिती.
- सामाजिक आणि धार्मिक सुधारणा ः राम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, जोतिबा फुले, नारायण गुरू, पंडिता रमावाई.
- आधुनिक भारतीय भाषा आणि वाङ्मय व वर्तमानपत्रांची वाढ ः वर्तमानपत्राची भूमिका. काही महत्वाची वर्तमानपत्रे.
- स्वातंत्र्यानंतर भारत ः सामाजिक आणि राजकीय घटना.

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ३ ः** | **गुण ः १०** |
| **भाषा आणि वाङ्मय** | **अध्ययन तासिकाः२५** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

विद्यार्थ्यांना भारतीय भाषा व वाङ्मयाचा परिचय करून देणे, हा ह्या अभ्यासघटकाचा हेतू आहे. प्राचीन भारतातील संस्कृतच्या महत्वपूर्ण भूमिकेचे हा अभ्यासघटक परिक्षण करील. हा अभ्यासघटक उपलब्ध संस्कृत प्राकृत आणि पाली भाषेच्या समग्र वाङ्मयाचा शोध घेण्याचा प्रयत्न करील. विद्यार्थ्यांना तमिळ भाषेतील संगम वाङ्मयाच्या समृद्ध वारस्याचा तसेच दक्षिण भारतातील इतर भाषा म्हणजे तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषांचा परिचय करून देणे हा ही हेतू आहे.

### घटक ६ ः भारतीय भाषा आणि वाङ्मय - १

- भारतीय भाषा ः संस्कृतची भूमिका
- वेद ः ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद

टिपा

टिपा

- उपनिषदे
- महाकाव्ये ः रामायण आणि महाभारत
- भगवद्‌गीता
- पुराणे आणि स्मृती
- पाली प्राकृत आणि संस्कृतमधील बौद्ध आणि जैन वाङ्‌मय त्रिपिटके आणि जातककथा.
- इतर संस्कृत वाङ्‌मय ः धर्मशास्त्र, कौटिल्याचे अर्थशास्त्र, भास, शुद्रक, कालिदास आणि वाणभट्ट या लेखकांच्या वाङ्‌मयीन कृती, वैद्यकशास्त्रावरील ग्रंथ, काश्मीरमधील संस्कृत वाङ्‌मय
- संगम वाङ्‌मय
- तेलगू, कन्नड आणि मल्याळम वाङ्‌मय

### घटक ७ ः भारतीय भाषा आणि वाङ्‌मय - २

- उत्तर भारतीय भाषा आणि वाङ्‌मय. भाषांची उत्क्रांती. बोली आणि लिखित भाषा ब्राह्मी लिपी. हिंदी व तिच्या बोली
- उर्दु आणि फारशी भाषा
- हिंदी वाङ्‌मय
- बंगाली, आसामी आणि उडिया वाङ्‌मय
- पंजाबी आणि राजस्थानी वाङ्‌मय
- गुजराथी वाङ्‌मय
- सिंधी वाङ्‌मय
- मराठी वाङ्‌मय
- काश्मिरी वाङ्‌मय
- ख्रिस्ती मिशनऱ्यांची भूमिका ः शिळा छापाच्या छापखान्याची भूमिका तसेच मिशनऱ्यांची शाळा व महाविद्यालयाची भूमिका

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ४ ः** | **गुण ः १२** |
| **भारतातील धर्म आणि तत्वज्ञान.** | **अध्ययन तासिकाः२५** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

भारतीय तत्वज्ञान विचारांचे परिक्षण व मोठया ऐतिहासिक कालखंडातून चालत आलेल्या व आजही चालू असलेल्या ऐतिहासिक परंपराचा वेध घेणे हे ह्या अभ्यासघटकांचे उद्दिष्ट आहे. भारतातील विविध धर्मात ज्या दुष्ट प्रवृत्ति अनेक वर्षे शिरल्या होत्या, त्याच्या निवारणार्थ आधुनिक काळात ज्या सुधारणा चळवळी झाल्या त्या चळवळींची चर्चा करणे हा ही उद्देश या अभ्यासघटकाचा आहे.

## घटक ८ ः प्राचीन भारतातील धर्म आणि तत्वज्ञान

- पूर्व वैदिक आणि वैदिक धर्म
- पुरोगामी धार्मिक चळवळी बौद्ध आणि जैन धर्म
- वैष्णव धर्म, शैव धर्म व शक्तिधर्म
- लोकपंथ यक्ष व नागाची पूजा
- दक्षिणेतील वैष्णव व शैव चळवळ
- वैदिक तत्वज्ञान सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांशा, अद्वैत
- चार्वाक तत्वज्ञान
- जैन तत्वज्ञान
- बौद्ध तत्वज्ञान

## घटक ९ ः मध्ययुगीन काळातील धर्म व तत्वज्ञान

- सुफी चळवळ – ख्रिस्ती व सुरावर्दी सिलसिला, सुफी चळवळीचे महत्व
- भक्ती चळवळ – भक्तीचे निर्गुण व सगुण पंथ कबीर, नानक, मीराबाई आणि इतर संताची भूमिका.
- मध्ययुगीन काळातील तत्वज्ञान ः विशिष्टअद्वैत, शिवअद्वैत, द्वैत, द्वैतअद्वैत, शुध्दअद्वैत.

## घटक १० ः आधुनिक भारतातील धार्मिक सुधारणा चळवळी

- ब्राह्मो समाज आणि राजा राममोहन राय
- प्रार्थना समाज आणि रानडे
- आर्य समाज आणि दयानंद सरस्वती
- रामकृष्ण मिशन आणि स्वामी विवेकानंद
- थिऑसिकल सोसायटी आणि ॲनी वेझंट
- अलिगड चळवळ आणि सय्यद अहमद खान



टिपा

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ५ ः** | **गुण ः १०** |
| **चित्रकला, ललित कला आणि वास्तुकला** | **अध्ययन तासिकाः२५** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

संगीत किंवा नृत्य यापैकी काहीही असो यातील सर्व क्षेत्रातील कालात्मक निर्मितीमुळे नेहमीच भारतीय संस्कृतीला वेगळे वैशिष्टे प्राप्त झाले आहे. कारण कला ही सर्वात सुंदर सांस्कृतिक अभिव्यक्ती आहे. किंवहुना दुसऱ्या शब्दात सांगायचे तर वरील प्रकारची कलात्मक निर्मिती ही एक सांस्कृतिक निर्मितीच आहे. भारतातील चित्रकला, हस्तकला, संगीत नृत्य, वास्तुकला व शिल्पकला यासारख्या कला प्रकारांचा भारतातील उत्क्रांतीचा मागोवा या अभ्यास घटकात घेतलेला आहे.

टिपा

### घटक ११ ः भारतातील चित्रकला ः

- प्राचीन भारतातील कला हडप्पा संस्कृतीतील सर्जनशील चित्रकला, पाषाण गुहा किंवा लेण्यातील बौद्ध चित्रकला, चित्रशाळा, शिल्पशास्त्र.
- मध्ययुगीन काळातील कला ः मोगल लघुचित्र शैली, चित्रकला, पहाडी चित्रकला.
- आधुनिक काळातील कला ः रविंद्रनाथ आणि अविंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, एम.एफ.हुसेन आणि इतर.
- सजावटीची कला ः रंगोली, अल्पना अइपन, रंगावली, कुल्लम आणि मेदना.
- लोक चित्रकला ः मिथीला चित्रकला, कलमकारी चित्रकला, वारली चित्रकला, कालीघाटी चित्रकला.
- भारतीय हस्तकला ः राजस्थानातील बांधणी, आंध्र प्रदेशातील विट्टी व पोचमपल्ली साडी आणि तमिळनाडूमधील कांजीवरम, रेशमी साडी, म्हैसूर मधील रेशीम आणि चंदनाच्या लाकडाच्या कलात्मक वस्तू आसाममधील वेताचे उपस्कर (फर्निचर), बंगालमधील शाडू किंवा टेराकोटाच्या मूर्ती.

### घटक १२ ः ललित कला ः संगीत, नृत्य आणि नाटक

- ललित कलांची संकल्पना ः संक्षिप्त इतिहास
- भारतीय शास्त्रीय संगीताची घराणी ः हिंदुस्थानी आणि कर्नाटकी
- आधुनिक भारतीय संगीत आणि लोकसंगीत
- भारतीय नृत्य ः विविध नृत्य प्रकार, आधुनिक भारतातील प्रसिद्ध नर्तक.
- नाटक ः पारंपारिक आणि लोकनृत्य, आधुनिक भारतीय नाटकप्रकार विविध नाटके व नाटककार
- ललितकला व तिचा मानवी व्यक्तीमत्वावरील परीणाम.

### पाठ १३ ः भारतीय वास्तुकला

- वास्तुकला ः उदय व भारतीय संदर्भातील वास्तुकला
- भारतीय वास्तुकलेची उत्क्रांती ः प्राग ऐतिहासिक हडप्पा काळ, ऋग्वेदिक काळातील विकास, प्रारंभीचा काळ, गुंफा किंवा लेणी वास्तुकला, पाषाणात कोरलेली मंदिरे, स्वतंत्र उभी मंदिरे, मोगल काळातील वास्तुकला.
- वसाहतिक वास्तुकला आणि आधुनिक काळ

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ६ ः** | **गुण ः १०** |
| **विज्ञान आणि तंत्रज्ञान** | **अध्ययन तासिकाः३०** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

संस्कृतीच्या संदर्भातील सर्व क्षेत्राबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही भारतीयांना त्यांच्या पूर्व जांकडून समृद्ध ठेवा किंवा वारसा मिळाला आहे. हा अभ्यासघटक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील इतिहास काळातील भारताच्या ह्या क्षेत्रातील प्रगतीचे परिक्षण करणार आहे. त्याचबरोबर हा अभ्यासघटक आधुनिक भारतातील आधुनिक शास्त्रज्ञांच्या योगदानाचेही मूल्यमापन करणार आहे.

टिपा

### पाठ १४ ः भारतातील शास्त्र आणि तंत्रज्ञान

- प्राचीन भारतातील विज्ञानाच्या विविध शाखांचा विकास ः खगोलशास्त्र आणि गणितातील आर्यभट्ट आणि वराहमिहीराचे योगदान, चरक आणि सुश्रृताचे योगदान, धातूशास्त्रातील प्रगती, भूगोलाच्या क्षेत्रातील प्रगती.
- मध्ययुगीन काळातील विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयक प्रगती.
- मुस्लीम व युरोपीय जगताचा प्रभाव, मकतब, मदरसा आणि कारखाना ह्या आस्थापनांची भूमिका, गणित, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र आणि वैद्यकशास्त्रातील प्रगती, शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण शोध उपयोगात आणलेली नवीन पिके. जलसंधारणाची नविन तंत्रे इत्यादी.
- आधुनिक भारतातील विज्ञान आणि तंत्रज्ञान ः सी.एस.आय.आर आणि डी.आर.डी.ओ.या संस्थामधील संशोधनाची प्रगती, अणु ऊर्जा आयोगाची स्थापना, अवकाश, उपग्रहांचे प्रक्षेपण व विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील इतर प्रगती.

### पाठ १५ ः प्राचीन भारतातील शास्त्रज्ञ

#### खगोलशास्त्र आणि गणित

- बौद्धायन
- आर्यभट्ट
- ब्रह्मगुप्त
- भास्कराचार्य
- महावीराचार्य

#### शास्त्र

- कनाद
- वराहमिहीर
- नागअर्जून

#### प्राचीन भारतातील वैज्ञकिय शास्त्र (आयुर्वेद आणि योग)

- सुश्रुत
- चरक
- योग आणि पतंजली

टिपा

### पाठ १६ ः मध्ययुगीन भारतातील शास्त्रज्ञ ः

- मध्ययुगीन भारतातील शास्त्र
- गणित
- रसायनशास्त्र
- खगोलशास्त्र
- वैद्यकिय
- शेती

### पाठ १७ ः आधुनिक भारतातील शास्त्रज्ञ ः

- श्रीनिवास रामानुजन ः बर्नोली अंकावर शोध निबंध
- सी.व्ही.रामन ः रामन परिणाम
- जगदीश चंद्रबोस ः क्रेस्कोग्राफ व बिनतारी संदेश यंत्राचा शोध
- होमी जहांगीर भाभा ः टी. आय.एफ.आर. या संस्थेची स्थापना, अणु ऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष.
- डॉ.विक्रम साराभाई ः महान उद्योगपती, लष्करी अवजड व मूळ यंत्रसामुग्री तसेच पेनीसिलिनच उत्पादन सुरू केले. राष्ट्रीय अवकाश संशोधन आयोगाचे अध्यक्ष, थुंबा स्वयंचलित उपग्रह प्रक्षेपक केंद्राचे संचलन, पद्मभूषण आणि पद्मविभूषण पुरस्काराचे मानकरी.
- डॉ.अे.पी.जे.अब्दुल कलाम ः भारताचे अकरावे राष्ट्रपती. इस्त्रो आणि डी.आर.डी.ओ या संस्थामध्ये महत्वाच्या अधिकारी पदावर काम भारताला स्वयं सुरक्षिततेच्या क्षेत्रात अग्रेसर बनविले.

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ७ ः** | **गुण ः ९** |
| **भारतातील शिक्षण** | **अध्ययन तासिकाः३०** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

शिक्षण हे सांस्कृतिक संक्रमणाचे साधन आहे. सर्व संग्रहीत ज्ञान रचनात्मक पद्धतीने सामाजिक पद्धतीने सामाजिक गटात संक्रमीत करण्याचे शिक्षण हे फार चांगले साधन आहे. फार प्राचीन काळापासून भारताने त्याची स्वतःची वैशिष्टयपूर्ण शिक्षण पद्धती विकसित केली. ज्या मध्ये नेहमीच इतर संस्कृतींचे प्रभाव अंतर्भूत केला गेला. भारताच्या इतिहासाच्या विविध अवस्थांतील शैक्षणिक व्यवस्थेच्या उत्क्रांतीचा मागोवा या अभ्यासघटकात घेण्यात आलेला आहे.

शिक्षण हा विषय आणि ह्या विषयातील अंतर्भुत बाबी ह्या संबंधी प्रगती अधिक ठळकपणे दाखविणे हे ह्या अभ्यास घटकाचे उद्दिष्ट आहे. भारतातील प्राचीन व अर्वाचीन पूर्व शिक्षणाच्या मर्यादा आणि बलस्थाने यांचे मूल्यमापन करण्याच्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा ही एक हेतू या अभ्यास घटकाचा आहे.

### पाठ १८ ः भारतातील शिक्षण

- प्राचीन भारतातील शिक्षण वैदिक आश्रम, मौर्य आणि उत्तर मौर्य काळातील व्यावसायिक गट जैन आणि बुद्ध विहार, घटिक किंवा महाविद्यालयातील शिक्षणाची उद्दिष्टे, शिकवत असलेले विषय, स्त्रियांच्या शिक्षणाची स्थिती.
- मध्ययुगीन काळातील शिक्षण ः मदरसा, मकतब पारंपारीक आणि बुद्धीप्रामाण्यवादी विज्ञान, लोकप्रशासन भूमिती आणि हिशोब लेखन या विषयांच्या शिक्षणाची सुरवात.
- आधुनिक काळातील शिक्षण ः वसाहतीक काळाचा वारसा, मॅकॉलेची योजना, वुडवा खलिता, भारतीय विद्यापीठ कायदा.
- स्वातंत्र्यानंतरचे भारतातील शिक्षण ः प्राथमिक शिक्षण, वैश्विक उपलब्धता व प्रवेश आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी १० +२+३ आकृतीबंध, व्यावसायिक शिक्षण, उच्च शिक्षण प्रौढ शिक्षण, सामाजिक गरजानुरूप शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, पत्रद्वारा शिक्षण, दूरशिक्षण.

| | |
|---|---|
| **अभ्यासघटक ८ ः** | **गुण ः १०** |
| **सामाजिक रचना** | **अध्ययन तासिकाः३०** |

अभ्यासक्रम अंमलबजावणी भूमिका

भारतीय संस्कृतीच्या सर्व घटकांचा परिचय होण्यासाठी भारतीय समाजरचनेचा अभ्यास आवश्यक आहे. भारतीय समांजाच्या विविध घटकांचे परिक्षण व समाजरचनेचे विश्लेषण करणे, हा या अभ्यासघटकाचा हेतू आहे. त्याच बरोबर काही समकालीन सामाजिक समस्यांचे परिक्षण करण्याचाही प्रयत्न केला गेला आहे व या समस्यावर काही योग्य उपाययोजना सुचविण्याचाही प्रयत्न केला गेला आहे.

### पाठ १९ ः भारतीय समाज रचना ः

- जमाती, वर्ण आणि जाती
- अस्पृश्यता
- गुलामगिरी
- पुरूषार्थ, आश्रम, संस्कार
- जजमानी पद्धत (बलुतेदारी)
- भारतातील कुटुंब आणि विवाह व्यवस्था
- स्त्रियांची स्थिती
- भारतातील भटक्या जमाती



टिपा

### पाठ २० ः काही समकालीन सामाजिक समस्या

- जाती व्यवस्था
- महिलांच्या समस्या
- हुंडयाची समस्या
- मुली व महिलांच्या समस्या
- मादक पदार्थ सेवन समस्या
- समाजवाद
- वृद्धांच्या समस्या
- गरिबी व बेरोजगारी
- भीक मागणे
- मुलांच्या समस्या

| | |
|---|---|
| **अभ्यास घटक ९ ः** | **गुण ः १२** |
| **भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार** | **अध्ययन तासिकाः३०** |

भारताने नेहमीच इतर देशांशी संबंध प्रस्थापित केले आहेत. वस्तुतः भारतीयांना सर्वदूर प्रवास केला व ज्या ज्या ठिकाणी ते गेले तेथे त्यांनी त्यांच्या सांस्कृतिक पाऊल खुणा ठेवल्या. त्या मोबदल्यात त्यांनी कल्पना, प्रभाव, चालीरीती आणि परंपरा दूरदूरच्या भागातून भारतात आणल्या. ह्या प्रकरणात कशा प्रकारे भारतीय संस्कृती इतर देशात प्रत्यारीत झाली आणि तिचा त्या देशावर कशा प्रकारे प्रभाव पडला याचा शोध घेणार आहोत.

### पाठ २१ ः भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार

- सांस्कृतिक आदान-प्रदान पद्धती ः व्यापाऱ्यांमार्फत, शिक्षक, धर्मप्रसारक, राजदूतांमार्फत व जिप्सीमार्फत.
- मध्य व पूर्व आशियातील भारतीय संस्कृती
- श्रीलंका व पूर्व दक्षिण आशियातील भारतीय संस्कृती
- अरब संस्कृतीशी भारताचे सांस्कृतिक संबंध.
- भारताचे रोमन साम्राज्याशी असलेले व्यापारी संबंध
- जग व भारत यांच्यामधील संस्कृतीक आदान-प्रदानात जहाजे आणि व्यापाराची भूमिका.

## प्रश्न पत्रिका आराखडा

## विषय : भारतीय संस्कृती आणि वारसा (२२३)

## स्तर : माध्यमिक

पूर्ण गुण : १०० वेळ : ३ तास




### गुणांची विभागणी

| क्र. | विभागणी | गुण | % गुण |
|---|---|---|---|
| १. | ज्ञान | ५० | ५० % |
| २. | आकलन | ३० | ३० % |
| ३. | उपयोजन | २० | २० % |
| | | **१००** | **१००%** |

**२. प्रश्नांच्या प्रकारांवरून गुण मूल्य.**

| क्र. | प्रश्नप्रकार | प्रश्नांची संख्या | प्रत्येकी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १. | दिर्घोत्तरी प्रश्न | ५ | ८ | ४० |
| २. | लघुत्तरी प्रश्न | ९ | ४ | ३६ |
| ३. | वस्तुनिष्ठ प्रश्न | ८ | २ | १६ |
| ४. | बहुपर्यायी प्रश्न | ८ | १ | ०८ |
| | | **३०** | | **१००** |

**३. घटकानुसार गुण विभागणी**

| क्र. | अभ्यास घटक | गुण |
|---|---|---|
| १. | संस्कृती | १० |
| २. | इतिहास व संस्कृती | १५ |
| ३. | भाषा व साहित्य | १० |
| ४. | धर्म व तत्वज्ञान | १२ |
| ५. | चित्रकला कला संगीत व नृत्य वास्तुकला | १२ |
| ६. | शास्त्र व तंत्रज्ञान | १० |
| ७. | शिक्षण | ०९ |
| ८. | भारतीय समाज रचना | १० |
| ९. | भारतीय संस्कृतीचा परदेशी प्रसार | १२ |
| | | **१००** |

टिपा

# नमुना प्रश्नपत्रिका

## विषय ः भारतीय संस्कृति आणि वारसा

### माध्यमिक

पूर्ण गुण ः १00 वेळ ः ३ तास

१. खरोष्टी लिपी कशी लिहीली जात होती ? (१)

अ. उजवीकडून डावीकडे ब. डावीकडून उजवीकडे

क. वरतून खाली ड. मोठी अक्षरे

२. प्राचीन भारतात जैन व बुद्ध काळी शिक्षण कोठे दिले जात होते ? (१)

अ. मंदिरे ब. मठ

क. शाळा ड. पंचायत घर

३. हुंडा प्रतिबंधक कायदा केव्हा केला गेला ? (१)

अ. १९५१ ब. १९७१

क. १९६१ ड. १९८१

४. स्त्री अर्भक मृत्यू म्हणजे काय ? (१)

अ. मुलास मारणे ब. बालमुलीस मारणे.

क. मातेला मारणे ड. सावत्र आईस मारणे.

५. केंद्रित कुटुंब कसे बनते ? (१)

अ. पती पत्नी व त्यांची मुले ब. पती एकटा

क. पत्नी एकटी ड. आजी आजोबा

६. उपनयन कार्यक्रम काय आहे ? (१)

अ. शेवटचा विधी ब. अंत विधी

क. मुंज ड. प्रदूषण प्रतिबंध

७. बौद्ध धर्माचे महायान व हीनयान पंथामध्ये विभक्त होण्याची कारणे. (१)

अ. युद्ध ब अस्पृश्यता

क. मूर्तिपूजा ड. बालकांचा छळ

८. संत कबीरांची शिकवण उत्तर भारतीय कवींपेक्षा वेगळी कशी होती ? (१)

अ. सतत फिरता जातीभेदावर विश्वास नव्हता.

ब. एका जागी राहिला, जाती भेदावर विश्वास नव्हता.

क. सतत फिरता, जातीभेद मान्य होते.

ड. एकाची जागी राहिला, जातीभेद मान्य होते.

९. संगम साहित्य प्रसिद्ध होण्याची २ कारणे लिहा. (२)

१०. भारत मोगल शिल्पशैलीच्या ४ विशेषता सांगा. (२)

११. १९ व्या शतकात मुस्लिम बांधवांमध्ये शिक्षण प्रसारण करण्यामध्ये सय्यद अहमद खान याचे योगदान लिहा. (२)

१२. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे शास्त्र व तंत्रज्ञान मधले योगदान लिहा. (२)

१३. आधुनिक काळात विदेशांनी शेती मध्ये सुचवलेल्या बदलांची यादी द्या. (२)

१४. 'प्राचीन भारतामध्ये वैद्यकिय ज्ञान खूप होते.' स्पष्ट करा. (२)

१५. शिक्षणाचा संस्कृतिशी कसा संबंध आहे ? (२)

१६. वयोगट ६ ते १४ वर्ष मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक का आहे ? (२)

१७. मादक पदार्थ सेवन म्हणजे काय? (४)

१८. प्राचीन भारतामध्ये जैन व बुद्ध धर्माच्या उदयाची चार कारणे लिहा. (४)

१९. १८व्या शतकाच्या सुरवातीला उर्दु भाषा प्रसिद्ध कशी झाली ? (४)

२०. भारतातील साहित्याच्या विकासात ख्रिश्चन मिशनरींची भूमिका लिहा. (४)

२१. प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक भारतातील बांधकामशैलीतील मधील फरक स्पष्ट करा. (४)

२२. युद्ध सामग्रीचा विकास करण्यामध्ये मोगलांचे योगदान विस्ताराने सांगा. (४)

२३. १८५४ ते १९०४ भारतामध्ये झालेल्या शैक्षणिक सुधारणा सांगा. (४)

२४. प्राचीन काळात पूर्व आशियाची भारतीय संस्कृतीशी ओळख कशी झाली ? (४)

२५. कोणत्या गोष्टी एका विशिष्ट जमातीला दुसऱ्या जमातीपासून वेगळे बनवतात. (४)

२६. प्राचीन काळापासून 'विविधतेत एकता' भारतीय संस्कृतीत कशी दिसून येते ते सांगा. (८)

२७. मध्ययुगीन काळातील समाजामध्ये बदल घडवून आणण्यामध्ये संत व समाजसुधारक

यांची भूमिका स्पष्ट करा. (८)

२८. प्राचीन भारतातील तत्वज्ञानाची षट्दर्शने सांगा. त्यापैकी एकाची सविस्तर माहिती लिहा. (८)

२९. युरोपियन लोकांनी भारतीय नाटकांमध्ये कोणते बदल घडवून आणले? (८)

३०. चीन व दक्षिण पश्चिम आशिया मध्ये भारतीय संस्कृती पसरवण्यात भारतीय व्यापाऱ्यांची व मिशनरींची भूमिका लिहा. (८)

# भारतीय संस्कृती आणि वारसा
## गुणदान योजना



टिपा

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण गुण |
|---|---|---|---|
| १ | (अ) उजवीकडून डावीकडे | १ | १ |
| २ | (ब) मठ | १ | १ |
| ३ | (क) १९६१ | १ | १ |
| ४ | (ब) बालमुलीस मारणे | १ | १ |
| ५ | (अ) पती, पत्नी व त्यांची मुले | १ | १ |
| ६ | (क) मुंज | १ | १ |
| ७ | (क) महायान पंथ – मूर्तिपूजा | १/२ + १/२ | १ |
| ८ | (अ) सतत फिरता, जातिभेदावर विश्वास नव्हता | १/२ + १/२ | १ |
| ९ | (१) लिखाण निधार्मिक होते<br>(२) असंख्य शूरवीर आणि वीरांगनांवर अनेक कवींनी कवने रचली | १/२ + १/२ | १ |
| १० | | | |
| ११ | (१) पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीवर विश्वास<br>(२) स्त्री शिक्षण<br>(३) वैचारिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोणातून कुराणवर विवेचन<br>(४) स्वातंज्यवादी, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळी (कोणतेही दोन मुद्दे) | १ + १ | २ |
| १२ | (१) संरक्षण कार्यक्रम सहभाग<br>(२) उपग्रह प्रकल्प (SLV-3)<br>(३) रोहिणी उपग्रह<br>(४) विज्ञान, तत्वज्ञान, धर्म यांची सांगड घातली (कोणतेही दोन मुद्दे) | १ + १ | २ |

टिपा

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| १३ | (१) नवीन पिके, वनस्पती आणि फुल झाडे | | |
| | (२) जलसिंचन - पर्शियन चाकाचा उपयोग | | |
| | (३) जमीन मोजणी, प्रतवारी पद्धत | १ + १ | २ |
| | (कोणतेही दोन मुद्दे) | | |
| १४ | (१) अथर्ववेद रोग, उपचार, औषधे माहिती | | |
| | (२) चरक ऋषींची चरकसंहिता | | |
| | (३) सुश्रुत ऋषींची सुश्रुतसंहिता (शल्यक्रिया) | | |
| | (४) अळणी आहार | १ + १ | २ |
| | (कोणतेही दोन मुद्दे) | | |
| १५ | (१) पिढ्यनपिढ्या चालत आलेले अनुभव म्हणजे संस्कृती | | |
| | (२) शिक्षण ही संस्कृती हस्तांतरण प्रक्रिया आहे. | | |
| | (कोणतेही दोन मुद्दे) | १ + १ | २ |
| १६ | शिक्षणामुळे खालील गोष्टींचा पाया घातला जातो. | | |
| | (१) व्यक्तिगत विकास | | |
| | (२) विधायक प्रवृत्ती | | |
| | (३) सामाजिक वावरातील आत्मविश्र्वास | | |
| | (४) सवयी | | |
| | (५) अध्ययन कौशल्ये | | |
| | (६) संपर्क कौशल्ये | | |
| | (७) क्षमता | | |
| | (कोणतेही दोन मुद्दे) | १ + १ | २ |
| १७ | औषधी कारणाशिवाय मादक पदार्थांचे सेवन करणे | ४ | ४ |
| १८ | (१) कर्मकांडाचे अवडंबर | | |
| | (२) भरपूर दक्षिणा उकळणे | | |
| | (३) मोठ्या प्रमाणावर धार्मिक कारणांसाठी पशुहत्या | | |

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| | (४) खर्चिक यज्ञ समारंभ | | |
| | (५) ब्राह्मणांमधील श्रेष्ठत्वाची भावना | | |
| | (६) ब्राह्मणांची घमेंडखोर वृत्ती | | |
| | (७) समाजाचे अलवचिक चार्तुवर्णात विभाजन | | |
| | (कोणतेही दोन मुद्दे) | १+१+१+१ | ४ |
| १९ | (१) समाजातील प्रतिष्ठित वर्गाची संपर्कभाषा | | |
| | (२) सुसंस्कृत भाषा | | |
| | (३) हिंदू व मुस्लीम यामधील संपर्क भाषा | | |
| | (४) प्रशासनाची भाषा | १+१+१+१ | ४ |
| २० | (१) स्थानिक भाषेचे शब्दकोष प्रसिद्ध केले. | | |
| | (२) स्थानिक भाषेचे व्याकरण प्रसिद्ध केले. | | |
| | (३) छपाईसाठी मुद्रणालये काढली. | | |
| | (४) शाळा आणि महाविद्यालये सुरू केली | १+१+१+१ | ४ |
| २१ | **प्राचीन बांधकामशैली** | | |
| | दगडातून कोरलेली मंदिरे, स्तूप, लाकडाचा | | |
| | उपयोग, गुहा, पर्शियन आणि ग्रीक | | |
| | बांधकाम शैली | | |
| | **मध्ययुगीन बांधकाम शैली** | | |
| | घुमट, मिनार, कमानी | | |
| | आधुनिक बांधकामशैली | | |
| | पर्शियन आणि रोमन बांधकाम शैली | | |
| | बांधकामात छत (कॅनॉपी) आणि जाळीचा वापर | | |
| | सॅंडस्टोन प्रकारच्या दगडाचा वापर | ४ | ४ |
| २२ | (१) बंदुकीच्या दारूचे उत्पादन | | |
| | (२) दारूगोळा, स्फोटक द्रव्ये यांचे उत्पादन | | |
| | (३) तोफा तयार करणे. | | |

टिपा

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| | (४) सुगंधी द्रव्ये | १+१+१+१ | ४ |
| २३ | (१) १८५४चा वूडचा खलिता | | |
| | शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे | | |
| | (२) १८५७ मुंबई, मद्रास, कलकत्ता | | |
| | विद्यापीठांची स्थापना | | |
| | १८८२ पंजाब विद्यापीठ स्थापना | | |
| | १८८७ अलाहाबाद विद्यापीठ स्थापना | | |
| | (३) १९०१ लॉर्ड कर्झनने शैक्षणिक परिषद | | |
| | भरवली त्यामुळे शिक्षणक्षेत्रात बदल | | |
| | होण्यास सुरवात | | |
| | (४) १९०४ भारतीय विद्यापीठ कायदा | | |
| | संमत केला त्यामुळे | | |
| | –महाविद्यालयीन तपासणी. | | |
| | –सुधारित अद्यापनपद्धती | | |
| | –उच्च पातळीवर दर्जेदार शिक्षण शक्य झाले. | १+१+१+१ | ४ |
| २४ | (१) व्यापारामुळे देवाणघेवाण | | |
| | (२) फलदायी सांस्कृतिक देवाणघेवाण | | |
| | खगोलशास्त्र | | |
| | गणित – दशांश पद्धती | | |
| | – शून्याचा शोध | | |
| | – गणितीय चिन्हे | | |
| | (३) सुश्रुतसंहितेसारख्या पुस्तकांची भाषांतरे | | |
| | – वैद्यकीय पुस्तके भाषांतर | | |
| | – खगोलशास्त्रीय पुस्तके भाषांतर | ४ | ४ |
| २५ | (१) जमातीतील सर्वांचे परस्परांशी रक्ताचे | | |
| | नाते असते. | | |

टिपा

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| | (२) सर्वांचा सामाजिक स्तर समान असतो.<br>(३) सर्वांचे पूर्वज समान असतात.<br>(४) सर्वांचा संपत्तीवर समान हक्क असतो.<br>(५) कोणाचीही खाजगी मालमत्ता नसते.<br>(६) फक्त वय आणि लिंग यावरच सामाजिक फरक अवलंबून असतो.<br>(कोणतेही चार मुद्दे) | १+१+१+१ | ४ |
| २६ | विविधतेची कारणे<br>(१) देशाचा अमर्याद विस्तार आणि भिन भिन्न भौगोलिक परिस्थिती आणि हवामान<br>(२) भिन्न भिन्न वांशिक गट<br>(३) देशांतर्गत सांस्कृतिक देवाणघेवाण<br>(४) भिन्न भिन्न भाषा पेहराव खाद्यपद्धती आणि चालीरीती<br>एकतेचा पाया<br>(१) व्यापारासाठी देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात प्रवास<br>(२) लष्करी हालचाली<br>(३) वातावरण (हवामान)<br>(४) संगीत, नृत्य, नाटक, कला (चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला)<br>(५) राजकीय संरचना<br>(६) वाहतूक सेवा, संपर्क साधने देशांतर<br>(कोणतेही चार मुद्दे) | ४+४ | ८ |
| २७ | धार्मिक सुधारणावादी संत<br>कवीर, नानक, मीराबाई, रासखान, अब्दुल करीम, | | |



टिपा

टिपा

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| | खान खानास, कालिदास, चैतन्य, नामदेव सुफी आणि भक्तिपंथातील संत | | |
| | (अ) संतांनी भक्ती करणारा आणि भक्ती करवून घेणारा यामधील प्रेमळ दुवा म्हणजे धर्म होय असे सांगितले. | | |
| | (ब) देवासमोर सर्व धर्म वंश जातीचे लोक समान आहेत. | | |
| | (क) जातपद्धती आणि धर्माला विरोध | | |
| | (ड) सतीप्रथा आणि स्त्री गर्भहत्येला विरोध | | |
| | (इ) हिंदू मुस्लीम दरी सांधण्याचा प्रयत्न | | |
| | (कोणतेही चार मुद्दे) | ४+४ | ८ |
| २८ | (१) सांख्य | | |
| | (२) योग | | |
| | (३) न्याय | | |
| | (४) वैशषिका | | |
| | (५) मीमांसा | | |
| | (६) वेदांत | १/२×६=३ | |
| | यापैकी एकाची सविस्तर माहिती | ३+५ | ८ |
| २९ | (१) नाट्यगृहांची उभारणी | | |
| | (२) रशियन व्यक्तीने बंगाली रंगभूमी स्थापन केली | | |
| | (३) रंगमंच अस्तित्वात आला. | | |
| | (४) विनोदी नाटके, शोकांतिका, शहरी जीवनातील समस्यांवर नाटके | | |
| | (५) प्रादेशिक भाषेतील नाटके | | |
| | (६) लोकनाट्यांचा उदय आणि प्रसार | | |
| | (७) वेगवेवळया क्षेत्रातील रसिक आणि परीक्षक | | |

| प्रश्न क्र. | अपेक्षित मुद्दे | गुणवितरण | एकुण |
|---|---|---|---|
| | (८) सर्व समाजापर्यंत पोहोचण्यासाठी लोक कलांचा वापर<br>(कोणतेही चार मुद्दे) | २+२+२+२ | ८ |
| ३० | चीन<br>(१) विचारवंतांचा सतत ओघ<br>(२) भारतीय विद्यापीठातील विद्वानांच्या चीनला भेटी<br>(३) योग तत्वज्ञान<br>(४) ध्यानसाधना<br>(५) हजारो पुस्तकांचे चीनी भाषेत भाषांतर<br>(६) चीनमध्ये मंदिरे आणि मठ संकुले यांची उभारणी<br>कोरिया<br>(१) भारतीय सांस्कृतिक मूल्ये<br>(२) तत्वज्ञान<br>(३) धर्म<br>(४) प्रतिमा बनविण्याची कला<br>(५) चित्रकला /रंगकला<br>(६) धातुशास्त्र<br>(७) ध्यान, योग, तत्वज्ञान<br>(८) भारतीय लिपीचा वापर<br><br>जपान<br>(१) बुद्ध धर्माला राजधर्म म्हणून मान्यता<br>(२) संस्कृतचा पवित्र भाषा म्हणून स्वीकार<br>(३) भारत व जपानमधील संबंध दृढ | २+२+२+२ | ८ |

टिपा

# *Awards Won by NIOS*

Several projects have been implemented by the NIOS to tap the potential of Information and Communication Technology (ICT) for promoting of Open and Distance Learning (ODL) system. The Ni-On project of NIOS won the National Award for e-governance and Department of Information and Technology, Govt. of India. In further recognition of its On-line initiatives and best ICT practices, the NIOS received the following awards:

## NIOS WINS National Award for e-Governance 2008-09



Silver icon for Excellence in Government Process Re-engineering, Instituted by Government of India Department of Administrative Reforms and Public Grievances & Department of Information Technology.

## NIOS receives NCPEDP MPHASIS Universal Design Awards 2012




National Institute of Open Schooling (NIOS) has been awarded THE NCPEDP - MPHASIS UNIVERSAL DESIGN AWARDS 2012 instituted by National Centre for Promotion of Employment for Disabled People. The award was given by **Sh. Mukul Wasnik, Hon'ble Minister for Social Justice and Empowerment, Govt. of India** on 14th August, 2012. NIOS has been selected for its remarkable work done for the learners with disabilities through ICT by making its web portal www.nios.ac.in completely accessible for such learners.

## The Manthan Award South Asia & Asia Pacific 2012




The Manthan Award South Asia & Asia Pacific 2012 to recognize the best ICT practices in e-Content and Creativity instituted by Digital Empowerment Foundation in partnership with World Summit Award, Department of Information Technology, Govt. of India, and various other stakeholders like civil society members, media and other similar organisations engaged in promoting digital content inclusiveness in the whole of South Asian & Asia Pacific nation states for development. The award was conferred during **9th Manthan Award Gala South Asia & Asia Pacific 2012 at India Habitat Centre on 1st Dec. 2012.**

**Complete and Post the feedback form today**

शेवटची घडी व चिटकविणे

पहिली घडी

## प्रतिसाद पाठ क्र. १ ते २१

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठयांश | | | | भाषा | | चित्रे आकृत्या | | आत्मसात केलेले ज्ञान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सोपा | अवघड | मनोरंजक | संदिग्ध | सोपी | अवघड | उपयोगी | निरुपयोगी | अतिशय उपयोगी | थोडे फार उपयोगी | निरुपयोगी |
| १ | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | |
| १६ | | | | | | | | | | | | |
| १७ | | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | | | | | | | |
| १९ | | | | | | | | | | | | |
| २० | | | | | | | | | | | | |
| २१ | | | | | | | | | | | | |

चौथी घडी

तिसरी घडी

विद्यार्थी मित्रांनो,

आपण या पुस्तकाचा अभ्यासपूर्ण केला आहे. आपला अभ्यासक्रम जीवनाशी निगडीत व मनाला समाधान देणारा असावा असा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. पाठयपुस्तके तयार करणे ही द्विमार्गी प्रक्रिया आहे. पाठयपुस्तकांबाबतचा आपला प्रतिसाद अभ्यासविघटक सामग्रीत सुधारणा करताना उपयोगी पडणार आहे. आपल्या अभ्यासातील काही वेळ खर्च करून सोबतचा प्रतिसाद कृपया पूर्ण करा. त्याचा उपयोग उत्तम प्रकारचे अभ्यास साहित्य तयार करताना होईल.

कळावे,
अभ्यासक्रम समन्वयक
अर्थशास्त्र

### प्रश्नांवरील प्रतिसाद

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठयांशावरील प्रश्न | | सहामाही प्रश्न | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उपयोगी | निरुपयोगी | सोपे | अवघडउ | अतिअवघड |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| ११ | | | | | | |
| १२ | | | | | | |
| १३ | | | | | | |
| १४ | | | | | | |
| १५ | | | | | | |
| १६ | | | | | | |
| १७ | | | | | | |
| १८ | | | | | | |
| १९ | | | | | | |
| २० | | | | | | |
| २१ | | | | | | |

दुसरी घडी

आपल्या सूचना

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

आपण या विषयासाठी इतर पुस्तके वापरील का? होय / नाही

जर उत्तर होय असेल तर त्याची कारणे सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

नावनोंदणी क्रमांक ______________________

पत्ता ______________________

______________________

विषय ______________________

पुस्तक क्र. ______________________

**Course Coordinator,**
**Indian Culture and Heritage**
**National Insititute of Open Schooling**
**A-24-25, Institutional Area**
**Sector-62, NOIDA (U.P.), Pin-201309**

Postage
Stamp

No Enclosures allowed